## मुक्तेश्वरकृत महाभारत

# वनपर्व

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. 9280

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय

द्वितीयावृत्ति

१९४६

REFBK-0006775
REFBK-0006775

## दत्तात्रय सीताराम पंगु

# मुक्तेश्वरकृत महाभारत

# वनपर्व

(मूळ, पाठभेद, टीपा, स्पष्टीकरण, शब्दकोश यांसह)


: संपादक :

**दत्तात्रय सीताराम पंगु,**

मराठीचे प्रोफेसर,

राजाराम कॉलेज, कोल्हापूर.



REFBK-0006775



थमावृत्ति १९४१

तृतीयावृत्ति १९४६

एकमेव विक्रेते—

**स्कूल अँण्ड कॉलेज बुकस्टॉल,**

कोल्हापूर.

प्रकाशक :
द. सी. पंगु,
राजाराम कॉलेज, कोल्हापूर.

## प्रो. पंगु यांचीं पुस्तकें

### संपादित

| | |
|---|---|
| १ वच्छहरण : | दामोदर पंडितकृत. |
| २ सीतास्वयंवर : | नागेशकृत. |
| ३ कुशलवोपाख्यान : | मोरोपंतकृत. |
| ४ वनपर्व : | मुक्तेश्वरकृत ( द्वितीयावृत्ति ). |
| ५ ज्ञानेश्वरी : | अध्याय बारावा ( द्वितीयावृत्ति ). |
| ६ ज्ञानेश्वरी : | अध्याय सोळावा. |

### प्रबंध

| | |
|---|---|
| १ सामराज : | द्वितीयावृत्ति |
| २ आस्वाद : | टीकात्मक निबंधसंग्रह. |
| ३ तुषार : | ” ” |
| ४ प्राचीन मराठी कविपंचक : | |

किंमत
४॥ रुपये.

मुद्रक :
मूळ पृष्ठें १–२२२–रॉयल प्रिंटिंग प्रेस, कोल्हापूर.
प्रस्तावना व टीपा स्पष्टीकरण–
श्रीज्ञानेश्वर प्रिंटिंग प्रेस, कोल्हापूर.

अनुक्रम
नों. दे

# प्रास्ताविक

जगांतील कोणत्याही देशाच्या महाकाव्यांत महाभारताचें स्थान अनेक दृष्टींनीं फारच वरचें ठरेल. रामायणाला केवळ काव्य म्हणून महत्त्व असलें, किंवा महाभागवताला ज्ञानभक्तीचा समन्वय करणारा ग्रंथ म्हणून अध्यात्मिक मान्यता मिळाली असली, तरी महाभारतांतर्गत विषयांचा पसारा इतका विश्वव्यापक आहे कीं, ' यांत नाहीं तें कोठेंच नाहीं ' अशी थोडी अभिमानाची प्रौढी, याच ग्रंथास सार्थतेनें मारतां येते. महाभारतांत काव्य, इतिहास, भूगोल, धर्म, नीति, तत्त्वज्ञान, समाजशास्त्र व राजशास्त्र इत्यादि विविध विषयांचें, मूळ भारतीय युद्धकथेच्या अनुषंगानें इतकें विस्तृत विवेचन आलें आहे कीं, गेल्या दोन अडीच हजार वर्षांच्या आर्यसंस्कृतीचा हा विश्वकोशच होय, असें आजपर्यंतचे अनेक संशोधक मानीत आले आहेत. असा हा जवळजवळ एक लक्ष श्लोकांचा महाग्रंथ, भगवान् व्यासांच्या नांवावर मोडत असला, तरी तो त्यांच्या एकट्याकडून रचिला गेला नसून, वैशंपायन व सौती अशा त्यांच्या शिष्यपरंपरेनें वेळोवेळीं त्यांत अनेक प्रकरणांची व आख्यानांची, बेमालूम भर घातली आहे. बुद्ध व जैनधर्मीयांकडून हक्क सांगितल्या गेलेल्या अनेक तरंगत्या आख्यानोपाख्यानांचें आपल्या ग्रंथांत एकत्र संकलन करून, भारतीय प्राचीन संस्कृतीच्या स्थितिस्थापकतेच्या दृष्टीनें सौतीनें तर ही मोठीच राष्ट्रीय कामगिरी करून ठेविली आहे.

महाभारतांत, कौरवपांडवांच्या जन्मेतिहासापासून तों त्यांच्या स्वर्गारोहणापर्यंतची हकीकत अठरा पर्वांत दिली असून, मध्यंतरीं कौरवपांडवांचें द्यूत, पांडवांचा वनवास, अज्ञातवास, भारतीय युद्धाचें प्रत्येक दिवसाचें इत्थंभूत वर्णन, इत्यादि प्रमुख कथाभाग आले आहेत. या सर्व पर्वांत, वनपर्व श्लोकसंख्येनें मोठें आहे, व त्याचें कारणही सयुक्तिक आहे या पर्वांत, पांडवांचा काम्यक व द्वैत या वनांतील आलटून पाल

संचार, अर्जुनाला पाशुपतास्त्राचा लाभ व त्याचा पंचवार्षिक स्वर्गवास, धर्मराजादि पांडवांची तीर्थयात्रा, गंधमादन पर्वतावरील भीममारुतींची भेट, भीमाकडून कुबेरवनांतील कमलांचें हरण, अर्जुनाचें प्रत्यागमन, नहुष-सर्पाकडून गिळंकृत होण्याची भीमावर ओढवलेली आपत्ति, नहुषप्रश्नांचीं धर्मराजाकडून उत्तरें, दुर्वासाकडून पांडवांची सत्त्वपरीक्षा, कौरवांची घोष-यात्रा व पांडवांच्या मदतीनें दुर्योधनादिकांची चित्रसेनगंधर्वाकडून सुटका, जयद्रथकृत द्रौपदीहरण, इंद्राकडून कर्णाचें कुंडलाभिहरण, यक्षप्रश्न व त्यांचीं उत्तरें इत्यादि पांडवविषयक हालचालींच्या वर्णनाबरोबरच, मैत्रेय, मार्कंडेय, बृहदाश्व, लोमश, बकदाल्भ्य व स्वेच्छेनें कोठेंही अवत-रणारे व्यास, इत्यादि महर्षींच्या तोंडून प्रसंगपरत्वें आलेलीं, सुरभीकथा, नलोपाख्यान, मुद्गलाख्यान, रामोपाख्यान, सावित्र्याख्यान, सुकन्याख्यान, अशासारखीं लहानमोठीं अनेक आख्यानोपाख्यानें भरपूर भरलेलीं आहेत. वनवासी पांडवांच्या केवळ हालचालींच्या वर्णनांनीं वनपर्व कदा-चित् इतकें फुगलें नसतें. पण धर्मराजाच्या पृच्छेवरून वरील ऋषींनीं त्याच्या समाधानार्थ जें कथाकथन केलें आहे, त्यामुळेंच वनपर्वाला प्रस्तु-तचें विस्तृत स्वरूप प्राप्त झालें आहे. यांतील बरींच आख्यानें अथवा कथा. सौतीनें मूळ ग्रंथरचनेनंतर पुष्कळ वर्षांनीं जमवून त्यांत समाविष्ट केल्या. पण त्या अशा कौशल्यानें व अनुसंधानानें कीं, त्या क्षिप्त आहेत अथवा मागाहून जोडल्या आहेत, असा संशय चुकूनही सर्वसाधारण वाचकवर्गास न यावा. भरतखंडांत इतस्ततः विखुरलेल्या अनेक प्राचीन कथा एकत्र करून त्यांवर हिंदुसंस्कृतीचें अधिकृत शिक्कामोर्तब सौती-सारख्या राष्ट्रीय पुराणिकाला करावयाचें होतें. अर्थातच यासाठीं महा-भारताच्या इतर कोणत्याही पर्वापेक्षां मूळ कथानकापासून थोडें अलग व सुसंगत असें वनपर्वच त्यानें निवडून काढलें. वनवासांतील पांडवांना आपल्यासारख्याच वनवासी झालेल्या प्राचीन राजांच्या कथांबद्दल कुतूहल उत्पन्न होऊन त्या ऐकण्यास तसा अवसर सांपडणें याच वेळीं शक्य होतें असें कल्पून, सौतीनें नलोपाख्यान, रामोपाख्यान व सावित्र्याख्यान अशा सदृश कथांचें संकलन करण्याची योग्य संधि या पर्वांत साधून घेतली, हेंच प्रस्तुत पर्वाच्या विस्ताराचें प्रमुख कारण होय.

वनवासांत गुदरलेल्या संकटांना तोंड देतांना पांचही पांडव सद्गुणाच्या कसास उत्तम उतरले आहेत. आपल्याबरोबर, असलेल्या अनेक ब्राह्मणांचें पालन करण्यांत धर्मराजाची दानत जशी दिसून येते, तशीच पत्नीनें व बंधूंनीं कौरवांवर पुनः स्वारी करून राज्य परत घेण्याची सल्ला अनेक वेळां दिली असतां, बारा वर्षें वनवासाच्या व एक वर्ष अज्ञातवासाच्या केलेल्या प्रतिज्ञेपासून रतिभरही न ढळण्यांत त्याची सत्यसंध वृत्तीच अधिक प्रकट होते. घोषयात्रेच्या प्रसंगीं दुर्योधन राजा स्वस्त्रियांसह चित्ररथ-गंधर्वाकडून गिरफदार झाला असतां, धर्मराजाच्या सांगण्यावरून त्याच्या सर्वच बंधूंनीं आपल्या शत्रूची सुटका करण्यांत जें औदार्य दाखविलें, तें विशेषच प्रशंसनीय व अनुकरणीय आहे. द्रौपदीचें हरण करण्यांत जयद्रथाचा अपराध वधाला पात्र होण्याइतका गंभीर स्वरूपाचा असतांना, त्याच्या वधानें वृद्ध धृतराष्ट्राला जामातमरणाचें, व आपल्या चुलत बहिणीस वैधव्याचें, दुःख भोगावें लागेल या जाणिवेनें, धर्मराजानें जयद्रथाला जें जीवदान दिलें, त्यांत औदार्याबरोबरच दया व अनुकंपा ओतप्रोत भरलेली आहे. धर्मराजाचें आपल्या सर्वच बंधूंवर निरतिशय प्रेम होतें. अर्जुन स्वर्गांत बरेंच दिवस राहिला असतां, त्याला पाहण्याची धर्मराजाला जशी उत्सुकता वाटली, तशीच भीमाला कुबेरनगरीहून परत येण्यास लागलेल्या विलंबानें त्याला उत्कंठा लागली. नहुषसर्पानें भीमास गिळलें असतां, व यक्षशापानें आपले सर्व बंधु मृत झाले असतां, नहुषाच्या व यक्षाच्या प्रश्नांचीं समाधानकारक उत्तरें देण्यांत धर्मराजाची विद्वत्ता, व्यवहारकुशलता व प्रसंगावधान हे गुण जितके उत्कटत्वानें दिसतात, तितकीच 'सर्व मृत बंधूंत नकुलालाच जिवंत कर' असें यक्षास म्हणण्यांत त्याची न्यायबुद्धि व उदारमनस्कता उठून दिसल्याशिवाय रहात नाहीं. भीम, अर्जुन, नकुल व सहदेव हे सर्वच शूर होते. किर्मीरवध, जटासुरवध अथवा मणिमंतवध, यांसारखी साहसी कृत्यें भीमानें जशी लीलेनें पार पाडली, तशी पाशुपतास्त्राचा लाभ किंवा प्रत्यक्ष इंद्रालाही केलेलें सहाय्य यासारखीं मानवांना केवळ अशक्य असलेलीं कृत्यें अर्जुनाला करतलामलकवत् वाटलीं. इतकें असूनही स्वर्गांत चालून आलेल्या उर्वशीचा अभिलाष न धरतां तिचें पूर्वीचें मातेचें नातें स्मरण्यांत अर्जुनानें दाखविलेली

विषयपराङ्मुखता तर, त्याच्या वीरवृत्तीस साजेशीच आहे. या सर्व बंधूंना प्रसंगविशेषीं आपल्या हीनस्थितीचा त्वेष आला, तरी ते आपल्या वडील भावाच्या शब्दाबाहेर वागलेले दिसत नाहींत. द्रौपदी तर आर्यस्त्रियांच्या उच्च मनोवृत्तीचें प्रतीक होय. उत्तम पतिव्रता असूनही धर्मराजाच्या शांततेच्या धोरणाचा स्पष्ट शब्दांत निषेध करून तिनें आपली तेजस्विता अनेक वेळां निदर्शनास आणली आहे. राजधर्मात सात्विकवृत्तीची अनुपयुक्तता पटवितांना प्रल्हादाच्या व्यावहारिक नीतीचें तिनें केलेलें विवेचन, तिच्या विचक्षणतेचें द्योतक आहे. सारांश वनवासांतही आलेल्या आधिभौतिक व आधिदैविक आपत्तींना धैर्यानें तोंड देतांना, महाभारताच्या या प्रमुख नायक—नायिकांच्या ठिकाणीं असलेल्या व्यापक व सात्त्विक मनोवृत्तींचा जो प्रकर्ष दृष्टीस पडतो, तो तत्कालीन उच्च संस्कृतीचा अनुकरणीय आविष्कारच म्हटला पाहिजे.

वनपर्वांतर्गत दुर्वासप्रकरणांत अथवा पाशुपतास्त्रलाभप्रकरणांत अनुक्रमें श्रीकृष्ण व शिव यांच्या उपासनांची महति वर्णन करतांना, अद्भुतता व असंभाव्यता यांना पुष्कळच वाव मिळाला असला, तरी तेथें आलेलीं दुसरीं आख्यानोपाख्यानें सुसंगत व उदात्तवृत्तींना पोषक अशींच आहेत. वनांत कष्टानें दिवस कंठणाऱ्या व अर्जुनवियोगानें थोडा रंजिस झालेल्या धर्मराजाच्या मनांत, ‘आपल्याप्रमाणें दुर्दैवी राजा कोणी झालाच नसेल’ असा विचार येणें साहजिक होतें, व यावर बृहदश्वासारख्या कथाकोविदानें ओघानेंच नलराजाची कथा सांगून त्याचें समाधान करणेंही सुसंगतच होतें. धर्माप्रमाणेंच नलराजानें द्यूतांत आपलें राज्य गमावलें होतें व त्याच्याही नशिबीं स्वबंधुत्याग व वनवास आला होता. पण अशा दुःस्थितींतही लाजिरवाणा श्वशुरगृहवास न पतकरतां ऋतुपर्णाकडे नोकरीस राहून त्यानें आपल्या चातुर्यानें व धैर्यानें अश्वविद्येंत पारंगतता मिळविली व शत्रुकडून आपलें राज्य परत घेतलें. दमयंतीचे पातिव्रत्यादि गुण व नलशोधनार्थ नव्या स्वयंवराची तिनें योजलेली युक्ति, तिची नलनिष्ठा व चतुरताच स्पष्ट करतात. दुःखी धर्माच्या मनाला विरंगुळा देणारी ही अत्युत्तम कथा, योग्य ठिकाणीं योजण्यांत कवीचे औचित्य प्रगट झालें नाहीं असें कोण म्हणेल? पुढें जयद्रथाकडून द्रौपदीहरण झाल्यानंतरही

विषण्ण झालेल्या धर्मराजाला मार्केडेयानें रामायणांतील सीताहरणाची प्रदीर्घ कथा सांगणें अथवा पतिव्रताधर्मात द्रौपदीच्या पंक्तीला बसणाऱ्या पतिव्रतेबद्दल धर्मराजानें केलेल्या पृच्छेला त्याच ऋषीनें सावित्रीच्या कथेनें उत्तर देणें, हें जितकें सुसंगत व स्वाभाविक, तितकेंच तें कवीच्या रसिक वृत्तीचें निदर्शक असून, स्वार्थत्याग, दया, स्वाभिमान, पत्नीनिष्ठा व पतिनिष्ठा इत्यादि उदात्त मानवधर्मांनीं अधिष्ठित झालेली वनपर्वातील हीं आख्यानोपाख्यानें पाहिली म्हणजे, त्यांच्या रचनाकौशल्याबरोबरच मूळ कथानकाशीं त्यांचा अचूक सांधा जोडण्यांत कवीनें दाखविलेल्या योजकतेबद्दल त्याचें कौतुक करावेसें वाटतें.

मराठींत काव्यरचनेला सुरुवात करण्याचें सर्व श्रेय, महानुभावपंथ व वारकरीपंथ यांनाच दिलें पाहिजे. या दोन्ही पंथांचें आराध्य दैवत श्रीकृष्ण असल्यामुळें, महाभागवत व भगवद्गीता या दोन ग्रंथांना अग्रपूजेचा मान मिळाला. पंडित दामोदर, भास्कर, नरेंद्र इत्यादि महानुभाव कवींनीं, भागवती प्रकरणांवर जशीं आख्यानें रचलीं, तद्वतच ज्ञानदेव, दासोपंत इत्यादि विठ्ठलभक्तांनीं भगवद्गीतेवर विस्तृत व रसाळ टीका लिहिल्या. एकनाथापर्यंतचे बहुतेक कवी या सांप्रदायाच्या पकडींत सांपडल्यामुळें, त्यांची दृष्टि या दोन ग्रंथांपलीकडे क्वचितच गेली. नाहीं म्हणावयास एकनाथांचा रसिक नातू मुक्तेश्वर, यानें मात्र हा ठराविक चाकोरीचा मार्ग सोडून, रचना व काव्यविषय यांत क्रांति करण्याचा अपूर्व मान मिळविला.

मुक्तेश्वराच्या पूर्वी अथवा समकालीं ओवी हें वृत्त सर्वत्र रूढ असूनही आपल्या ‘संक्षेप रामायणांत’ अक्षरगणवृत्तात्मक रचनेला त्यानें जसा प्रथमच मुहूर्त केला, तसाच भागवत व गीता हे नित्याचे अध्यात्मिक काव्यविषय थोडे बाजूला सारून महाभारतासारखा व्यावहारिक, अद्भुत व ललितरम्य कथांनीं ओथंबलेला काव्यग्रंथ अनुवादण्याचा त्यानें प्रथमच उपक्रम केला. काव्य रचावयाचें तें भक्ति किंवा अध्यात्म यांच्या विवेचनासाठींच रचावयाचें हा काव्याचा पारमार्थिक हेतु बदलून, मुक्तेश्वरानें आपल्या सगुण सालंकार वाणीनें काव्यानंद चाखण्याची चटक आपल्यासारख्याच रसिक वाचकांना लावली. इतकेंच नव्हे, तर भक्ति

अथवा वेदांत यांची बैठक न सोडतां, अनेक आख्यानोपाख्यानांवर आपली स्वतंत्र कल्पनाशक्ति चालवून मराठी भाषेची सेवा करण्याची स्फूर्ति त्यानें पुढील अनेक कवींना दिली. शिवकालांत सामराज, नागेश, विठ्ठल व रघुनाथ पंडित अशा आख्यानकवींची अथवा कलाकवींची जी उज्ज्वल परंपरा निर्माण झाली, तिचीं बीजें मुक्तेश्वरानें रूढ केलेल्या या नवीन प्रथेंत कोणालाही दिसण्यासारखीं आहेत.

अशा या कवींचें कुलवृत्त अथवा जन्मशक याची निर्विवाद माहिती मिळूं नये, ही गोष्ट जितकी आश्चर्याची तितकीच खेदाची समजली पाहिजे. मुक्तेश्वरानें स्वत:संबंधीं आपल्या ग्रंथांत जे जातां जातां उल्लेख केले आहेत, त्यांवरून तो श्रीएकनाथांच्या मुलीचा मुलगा[१] असून त्याचें आडनांव मुद्गल, गोत्र अत्रि व सूत्र आश्वालायन होतें असें निश्चित समजतें. करवीरनिवासिनी महालक्ष्मी ही त्याची कुलस्वामिनी[२] असून सोनारीचा भैरव[३] हा त्याचा कुलस्वामी होता. मुक्तेश्वर बरेच दिवस आपले आजे एकनाथ यांच्या घरीं असल्यामुळें, पैठण[४] हेंच त्याचें वसतिस्थान होतें, व एकनाथांचें उपास्य दैवत जें दत्त, तेंच त्याचेंही उपास्य दैवत झालें. 'लीला विश्वंभर' हे आपले गुरु असें मुक्तेश्वरानें ठिकठिकाणीं म्हटलें आहे. पण येथें 'गुरु' हा शब्द त्याच्या मातापित्यांचा निदर्शक मानावयाचा कीं, पारमार्थिक गुरुत्वाचा वाचक समजावयाचा हा प्रश्न थोडाफार विवाद्य होऊन बसला आहे. रा. दा. के. ओक यांनीं तर मुक्तेश्वराचे जनक चिंतामणी व विश्वंभर या दोन भिन्न व्यक्ति होत्या असें उघडपणें म्हटलें असून,[५] विठोबा आण्णा दप्तरदार यांच्यासारख्या कविचरित्रकारानें वर्णन केलेला,[६] 'विश्वंभर व लीला यांचा विवाहसंबंध मुक्तेश्वराच्या जन्मास कारणीभूत झाला असा परंपरागत समजही, त्यांची खात्री करूं शकला नाहीं. तथापि मुक्तेश्वराच्या वंशजांपाशीं असणाऱ्या त्यांच्या घराण्याच्या वंशवृक्षांत मुक्तेश्वराच्या तीर्थरूपाचें नांव

---

१ मुक्तेश्वर–आदिपर्व–१।७७; वन–१।४. २ वन–१।३. ३ वन–१।४. ४ संक्षेप रामायण–४६९,४७०. ५ मुक्तेश्वरकृत विराटपर्व (१९३९)–उपोद्घात पृ. ५. ६ सुश्लोकलाघव–३९८.

‘ चिंतामणि ऊर्फ विश्वंभर गोसावी ’ असें दिल्याचें ज्या अर्थी रा. आजगांवकर सांगतात,[१] अथवा आपल्या सभापर्वात[२] मुक्तेश्वरानें ज्या अर्थी ‘ चिंतामणि ’ असें आपल्या वडिलांचें नांव देऊन त्यांनाच ‘ लीलाविश्वंभर ’ असें म्हटलें आहे, त्या अर्थी त्या दोन्हीं व्यक्ति एकच असाव्या असें मानण्यास आज तरी हरकत दिसत नाहीं. शिवाय उध्दव-चिद्घन, शिवराम, रंगनाथ, उद्धवसुत व सिध्दचैतन्य यांच्या ज्या संतनामावळी[३] प्रसिद्ध आहेत, त्यांत लीलाविश्वंभराचा कोठेंच उल्लेख नाहीं. यावरून “ मुक्तेश्वराचे गुरु ‘ लीलाविश्वंभर ’ हे कोणी निराळेच साधुपुरुष म्हणून प्रसिध्द असते, तर महिपतीसारख्या चरित्रकारांनीं आपल्या ग्रंथांत त्यांचा स्वतंत्र उल्लेख केला असता, ” हें रा. आजगांवकरांचें विधान जितकें तर्कशुद्ध, तितकीच “ पंतांच्या सन्मणिमालेंत व जयरामसुतकृत संतमालिकेंत आढळणारें ‘ लीलाविश्वंभर ’ हें स्वतंत्र नांवही पंतांनीं व जयरामसुतानें मुक्तेश्वराच्या काव्यांतूनच घेतलें असावें ” ही त्यांची अटकळ देखील सत्यापासून फारशी दूर नाहीं असेंच म्हणावें लागतें. मुक्तेश्वराच्या आईचें नांव गोदावरी असून, एकनाथ आपल्या या मुलीस ‘ लीला ’ या नांवानें संबोधीत, व या नांवावरूनच चिंतामणीलाही ‘ विश्वंभर ’ असें नांव पडलें, या सुप्रसिद्ध आख्यायिकेचाही वरील प्रश्न सोडविण्यास कांहींसा उपयोग होण्यासारखा आहे. एकंदरींत आपल्या पित्यालाच गुरु कल्पून ग्रंथारंभीं किंवा शेवटीं त्यांचा साभिवंदन उल्लेख करण्याचें विनयशाली धोरण मुक्तेश्वरानें स्वीकारल्याचें उघड दिसतें. मुक्तेश्वरासंबंधीं किंवा त्याच्या ग्रंथासंबंधीं त्याचे विद्यमान वंशज श्री. तेरवाडकर इनामदार उदासीन असून गाढ अशा अज्ञानांधकारांत चांचपडतांना दिसतात. पण मुक्तेश्वराचें वृंदावन तेरवाड गांवीं आहे, यावरून तो तेथेंच निधन पावला, एवढें मात्र निश्चित.

मुक्तेश्वराची आज जी कविता उपलब्ध आहे, तेवढीच त्यानें रचिली, अथवा यापेक्षां पुष्कळ लिहूनहि, ती कालोदरांत गडप झाली, हें सांगणें

---

१ महाराष्ट्रकविचरित्र भाग १, पृ. ३७–३८. २ सभापर्व–उपसंहार. ३ महाराष्ट्रकवि–अंक ४, पौष शके १८२५.

कठीण झालें आहे. तथापि 'संक्षेप रामायण' हा त्याचा श्लोकबद्ध ग्रंथ पहिला असावा, अशी त्याच्या ओबडधोबड व संस्कृतप्रचुर रचनेवरून कल्पना होते. कालिदास, भर्तृहरी, जगन्नाथराय व जयदेव यांच्या वाणीचे पडसाद अनुवादरूपानें ज्याअर्थी येथें ऐकूं येतात, त्याअर्थी या कवींच्या वाचनानंतर लवकरच हा रामायणाचा परिपाक त्याच्या हातून उतरला असावा. पुढील महाभारतरचनेंत दिसणारा मुक्तेश्वराचा अपूर्व वाग्विलास येथें दिसत नसला, तरी आरंभींची गणवृत्तात्मक व ललितरचना या दृष्टींनीं या ग्रंथाचें महत्त्व आहे. यानंतर मुक्तेश्वरानें शतमुखरावणवधाख्यान, मूर्खांचीं लक्षणें, श्रीएकनाथचरित्र, पदें, आरत्या, व भगवद्गीता अशी अनेक प्रकरणात्मक रचना केली असावी असें दिसतें. या रचनेंत रामायणापेक्षां थोडी सहजता व प्रसाद दिसून आला, तरी विस्कळितपणा व चमत्कृतिप्रियता यामुळें ती महाभारताच्या अगोदरची खास असावी असें अनुमान निघतें. मुक्तेश्वराची कोणती रचना प्रथमची व कोणती मागाहूनची, हें ठरविण्यास भाषापध्दति, विचारसौकर्य, सहजता व श्रृंगारप्रियता या गमकावांचून दुसरीं गमकें उपलब्ध नाहींत. या दृष्टीनें पाहिल्यास मुक्तेश्वराचें महाभारत हा त्याच्या परिणतप्रज्ञेचा विलास होय. या ग्रंथांत मुक्तेश्वराच्या अंगच्या मूळच्या रसिकतेस व स्वतंत्र प्रतिभेस विहार करण्यास पूर्ण मुभा मिळाली असून त्याची वाणी प्रसन्न, सहज व ओघवती बनली आहे. महाभारतांतील मूळच्या स्थलकालव्यक्तीवर्णनांना आपल्या कल्पनेचा नवीन उजाळा देऊन व निरानिराळे प्रसंग रसरंजित करून मुक्तेश्वरानें तें आपल्या श्रोत्यांपुढें अशा हुबेहूब तऱ्हेनें मांडले आहेत कीं, आज उपलब्ध असलेल्या आदि, सभा, वन, विराट व सौप्तिक या त्याच्या महाभारताच्या पर्वांनीं कविमालिकेंत त्याचे नांव अजरामर होऊन इतर पर्वांबद्दल रसिकांना चुटपुट लागावी. मुक्तेश्वरानें साग्र महाभारत अनुवादलें असावें, असा सर्वत्र समज आहे, व पहिल्या चार सलग पर्वांनंतर मधलेंच अकरावें सौप्तिक पर्व सांपडल्यामुळें, व आदिपर्वांत पुढील उद्योग[1] व द्रोण[2] पर्वांचा उल्लेख केल्यामुळें, किंवा विराट[3] आणि

१ आदि–२०।१७३. २ आदि–४८।६५. ३ विराट–८।११९–१२०.

सौतिक[1] पर्वाच्या शेंवटीं पुढील पर्वरचनेचें श्रोत्यांना आश्वासन दिलें गेल्यामुळें, वरील समज खरा मानण्याकडे प्रवृत्ति होते. कदाचित् असेंही असूं शकेल कीं, मुक्तेश्वराचा सर्व महाभारत अनुवादण्याचा मानस असूनही तो तडीस गेला नसेल. पण मुक्तेश्वरानें साग्र महाभारत अनुवादलें होतें, हें सिद्ध करतांना रा. दा. के. ओक[2] यांनीं देवदासकृत संतमालिकेंतील ओंवींचा[3] किंवा मोरोपंतांच्या पांडुरंग दंडकांतील आर्येचा,[4] जो अर्थ लावला आहे, तो मात्र निर्णायक आहे असें वाटत नाहीं. देवदास व मोरोपंत हे देखील मुक्तेश्वराच्या आज उपलब्ध असलेल्या भारताच्या पर्वांनाच 'मुक्तेश्वरकृत भारत' असें संबोधीत असावें, व असें असल्यास त्यांनीं योजिलेल्या अनुक्रमें 'भारथटीका' व 'सर्व' या पदांची रा. ओकांनीं लावलेली संगति ओढाताणीचीच असण्याचा संभव आहे.

शिवाय मुक्तेश्वरानें समग्र भारत रचलें अशी जर मोरोपंतांची समजूत होती व याच्या उलट मुक्तेश्वरानें चारच पर्वें रचिलीं असें जर विठोबाआण्णा दप्तरदार म्हणतात,[5] तर मुक्तेश्वराचीं इतर पर्वें मोरोपंत व विठोबाआण्णा यांच्या मध्यंतरींच्या कालांत नष्ट झालीं, असेंच मानणें भाग आहे. वस्तुतः गेल्या ४०।४२ वर्षांत पुष्कळ संशोधन होऊनही मुक्तेश्वराच्या वरील पांच पर्वांव्यतिरिक्त एकही अधिक पर्व न सांपडणें, व ज्यांनीं ज्यांनीं 'मुक्तेश्वरी भारताचीं सर्व पर्वें सांपडलीं' अशी हाकाटी केली, त्यांच्याही पोथ्यांतून पहिलीं चार पर्वें मुक्तेश्वराचीं, व इतर पर्वें गोपाळ, माधव वगैरे कवींचीं असणें या वस्तुस्थितीमुळें, मुक्तेश्वराच्या साग्र महाभारत-रचनेबद्दल साशंकता उत्पन्न झाली आहे. तथापि महाभारताच्या उपलब्ध मराठी अवतारांत मुक्तेश्वराचें भारत गुणानें जसें श्रेष्ठ आहे, तसेंच तें वयानेंही ज्येष्ठ आहे.

या महाभारतरचनेनंतर मुक्तेश्वरानें शुकरंभासंवाद व हरिश्चंद्राख्यान हीं लहान आख्यानें रचलीं असावीं; कारण यांत महाभारताप्रमाणेंच

---

१ सौति–४।१२७. २ विराट पर्व उपोद्घात पृ. ११. ३ मुक्तेश्वरा मुक्तदशा। दिधली तुवां जगदीशा। पुरवून त्याची आशा। भारथटीका वदविली ॥८८॥ ४ मुक्तेश्वरकृत भारत आवडतें विठ्ठलासि कीं पर्व। सर्वश्रवणें हरितें आशा कविच्या अशेषही गर्व. ॥ ५ सुश्लोकलाघव. ३९९.

शृंगारकरुणादि रसांचा परिपोष व भाषेचे मार्दव, प्रकर्षाला पोंचल्याचें अनेक ठिकाणीं प्रत्ययाला येतें. हरिश्चंद्राख्यानाची थोडी अशी मौज झाली आहे कीं, हें आख्यान काव्येतिहाससंग्रहाच्या मुक्तेश्वरकृत वनपर्वात नलोपाख्यानाच्या ऐवजीं सहाव्या अध्यायापासून दहाव्या अध्यायापर्यंत देण्यांत आल्यामुळें, कित्येकांनीं तें वनपर्वांतर्गतच आहे अशी समजूत करून घेतली आहे. पण महाभारताच्या कोणत्याही प्रचलित संस्कृत प्रतींत, प्रस्तुत हरिश्चंद्राख्यान वनपर्वात ज्याअर्थीं दिलेलें दिसून येत नाहीं, व पहिल्या अध्यायाखेरीज मध्यंतरीं दुसऱ्या कोणत्याही अध्यायाच्या आरंभीं न येणारी गणपति-सरस्वतीची स्तुति, ज्याअर्थीं काव्येतिहाससंग्रहाच्या वनपर्वातील हरिश्चंद्राख्यानाच्या सहाव्या अध्यायाच्या प्रारंभीं आढळते, त्याअर्थीं मुक्तेश्वरानें स्वतंत्रपणें रचलेलें हें आख्यान त्याच्या वनपर्वात मागाहून कोणीतरी घुसडून दिलें असलें पाहिजे याबद्दल शंका राहत नाहीं. पुनः श्री. गोपाळराव पटवर्धनांच्या वडिलांनीं आपल्या मुलास लिहिलेल्या पत्रांत, प्राकृत हरिश्चंद्राख्यानाच्या पांच अध्यायांचा केलेला उल्लेख, मुक्तेश्वरकृत हरिश्चंद्राख्यानासंबंधींचाच आहे, असें ज्याअर्थीं रा. [१] पांगारकरांना निःशंकपणें वाटतें, त्या अर्थीं मुक्तेश्वरानें हें आख्यान स्वतंत्रपणें रचिलें होतें, ही गोष्ट निरपवाद मानण्यास कोणतीच हरकत नाहीं. मुक्तेश्वराचीं हीं सार्धीं त्रुटित प्रकरणें जर पेशवेकालीन मुत्सद्दीवर्गाकडून अभ्यासलीं गेल्याचा हा असा स्पष्ट पुरावा मिळतो, तर शौर्यवीर्यादि प्रसंगांच्या ओजस्वी वर्णनांनीं भरगच्च असलेल्या त्याच्या महाभारताच्या पांच पर्वांनीं कितीतरी वीरांना व योद्धयांना स्फूर्ति दिली असेल हें निराळें सांगण्याचें कारण नाहीं.

कोणताही कवि अथवा ग्रंथकार जसजसा आपल्या व्यवसायांत उत्क्रांत होत जातो, तसतसा तो पांडित्यापासून आत्मप्रवणतेकडे, विनयापासून आत्मविश्वासाकडे अथवा स्वतः केलेल्या अभ्यासाच्या उल्लेखापासून स्वानुभवाच्या व सूक्ष्मावलोकनाच्या उल्लेखाकडे झपाट्यानें जात असतो. मुक्तेश्वराचा संस्कृत काव्यनाटकांचा [२] अभ्यास उत्तम असून त्याचें षट्-

---

१ मुक्तेश्वर-चरित्र व काव्यविवेचन—पृ. २८. २ संक्षेप रामायण श्लोक १.

शास्त्रांचें[1] अध्ययनही त्याच्या ग्रंथांत व्यक्त झालें आहे. त्यानें ज्ञानेश्वर-एकनाथादिकांच्या प्राकृत ग्रंथांचा तर अभ्यास केला होताच, पण महाभारताच्या कांहीं प्राकृत टीकाही त्यानें डोळ्यांखालून घातल्या असाव्या.[2] त्याच्या ग्रंथांत प्रारंभीं स्वीकारलेल्या विनयाची[3] जागा, पुढें पुढें आत्मविश्वासानें[4] घेतली आहे. मुक्तेश्वराला महाराष्ट्र[5] देशाचा व भाषेचा अभिमान[6] असून, हिंदुस्थानांत सर्वत्र डोळे उघडून त्यानें प्रवास केल्यामुळें त्याला चौकसपणा व बहुश्रुतता हे गुण प्राप्त झाले होते. यानें बहुधा जें जें ऐकलें अथवा पाहिलें, तें तें कालौचित्याकडे दुर्लक्ष करूनही आपल्या ग्रंथांत कोठें तरी गोंवून टाकलें. ब्राह्मणांच्या [7]जाति, कुस्त्यांचे पेंच,[8] शिक्षांचे प्रकार,[9] पक्वान्नें,[10] वाद्यें,[11] शस्त्रें,[12] व वस्त्रें[13] या जुजबी गोष्टी सोडून दिल्या, तरी आपणास ठाऊक आहे तें सर्व आपल्या ग्रंथांत समाविष्ट करण्याच्या हव्यासामुळें, मुक्तेश्वराच्या हातून कालविपर्यासाचा दोष अनेक वेळां घडला आहे. दुष्यंतानें जिंकलेल्या राजांत जेथें फिरंगी, इंग्रज,[14] रूमशाम इत्यादि येतात, किंवा नलोपाख्यानांतील[15] ऋतुपर्ण राजा जेथें आपणास 'लीलावती ग्रंथज्ञ' म्हणवितो, तेथें मुक्तेश्वराचें अनवधान कोठवर वर्णावें ? आतां कालविपर्यासाचा दोष रसहानिकारक असला तरी एका दृष्टीनें तो असा उपकारक होतो कीं, त्यामुळें कवि-कालीन गोष्टींवर अथवा कवीच्या ज्ञानावर लख्ख प्रकाश पडावा. मुक्तेश्वरानें केलेला हा दोष मात्र त्याच्याच अनिश्चित कालनिर्णयास दूरतः उपयोगी पडला आहे.

---

१ आदिपर्व १।७३–७५; आदि. १५. २ आदि. ४१।७२. ३ सभापर्व ५।१७५–१७९. ४ वनपर्व ७।२१७–२१८; वन. १०।२०५; वन. १६।१४९. ५ रामायण ४६९. ६ सभा; १।१८–२२. ७ वन. २।३१–३२. ८ सभा. ७।१७–१९; २२–३५; ३८–४०; ५०–५५; वन. २।५४–६०; विराट. ३।१४०–१४८. १५२–१५७; आदि. ३८।७८–९०. ९ वन. ७।५८. १० वन. ११।११६–१३५; आदि. २९।८२–८९; सभा. ९; विराट. ८।५९–८८; ११ वन. १२।५८–५९. १२ वन. १५।१८४–१८५. १३ सभा. १४. १४ आदि. १५।९–१०; सभा. ८।१२७–१५६; आदि. ४०।८५. १५ वन. ८।१११.

विद्वत्व व रसिकत्व यांचें कित्येक ठिकाणीं खडाष्टक आढळतें. पण मुक्तेश्वर या नियमाला अपवाद होता. त्याच्या महाभारतांत व विशेषतः आदिपर्वांतील शकुंतला व ययाति आख्यानांत त्याला सर्वांत प्रिय असणाऱ्या शृंगार रसाची त्यानें लयलूट केली आहे. शकुंतलेच्या [1]रूपाचें अथवा शर्मिष्ठेच्या [2]लावण्याचें त्यानें केलेलें वर्णन इतकें मनोज्ञ आहे कीं, मुक्तेश्वरानें तशी लावण्यवती क्षत्रिय राजकन्या प्रत्यक्ष पाहिली असावी असेंच वाटतें. अनुवाद करीत असलेल्या मूळ ग्रंथाला चिकटून राहण्याचा कसोशीनें प्रयत्न करीत असतांही प्रतिभासंपन्न कवि थोडातरी आपल्या कल्पनाप्रवाहाबरोबर वाहवल्याशिवाय रहात नाहीं. मुक्तेश्वराच्या रसिक वृत्तीनें अथवा शृंगारवर्णनप्रियतेनें प्रसंगविशेषीं अशी कांहीं उचल खाल्ली आहे कीं, तसें वर्णन करीत असतांना देवाधिदेवही त्याच्या तावडींतून सुटलेले नाहींत. दमयंतीपुढें गंगा, पार्वती यांची मातब्बरी नाहीं, हें दाखवितांना सहस्रमुखानें सागराला मिळणाऱ्या गंगेवर त्यानें जी सुंदर [3]हेतूत्प्रेक्षा केली आहे, ती त्याच्या मनोहर कल्पकतेची व रसज्ञ वृत्तीची द्योतक आहे. मुक्तेश्वर यापुढेंही जाऊन कित्येक वेळां थोडा फार पांचटपणा करतो हें खरें आहे. पण शकुंतलाख्यानांतील अथवा सभापर्वांतील अशा हाताच्या बोटावर मोजण्यासारख्या एकाद्या दुसऱ्या उदाहरणानें त्याच्या मनाबद्दल भलतीच अटकळ बांधून त्याच्या शीलावर शिंतोडे उडविणें, हें जितकें अन्यायाचें आहे, तितकेंच त्याच्या मनाचे अंकुर विषयी कल्पून तत्समर्थनार्थ त्याच्या बापासंबंधींच्या आख्यायिका, व त्याच्या पणत्वाला दिलेल्या करवीरकर छत्रपतींच्या सनदेंत उल्लेखिलेलें गायनकलेंतील नैपुण्य, बळेंच उकरून काढून पुढें [4]मांडणें हें निःसंशय आततायीपणाचें आहे. एकाद्या कवीनें अथवा कादंबरीकारानें आपल्या ग्रंथांत चित्रित केलेल्या शृंगारिक प्रसंगावरून वाचकवर्ग जर त्याचें चारित्र्य अजमावूं लागेल, तर त्रिचाऱ्या लेखकवर्गावर प्रत्यही अनवस्था प्रसंग ओढवल्याशिवाय राहणार नाहीं. तशांत एकाद्या

---

१ आदि. १५।९८. २ आदि १९।१६–२३. ३ वन. ६।२०–२१.
४ कै. भावे–महाराष्ट्र सारस्वत–भाग १ (आवृत्ति ३) पृष्ठें २८८–२९०.

शृंगारिक कवीचे वडील थोड्या शिथिल वर्तनाचे असले, किंवा त्या कवीच्या मुलास गायनकलेची आवड असली, तर त्याच्या वडिलाच्या वर्तनाच्या व त्याच्या मुलाच्या गायनप्रियतेच्या वडाची साल, त्याच्या शृंगारिक लिखाणाच्या पिंपळाला लावून त्याला माणसांतून उठवूं पहाणें, कितपत योग्य होईल ? मुक्तेश्वराच्या बाहेरख्याली म्हणून समजल्या गेलेल्या वडिलांचे अनुवंशिक गुण त्याच्यांत उतरले, असा मुक्तेश्वराच्या थोड्या शृंगारिक रचनेवरून तर्क बांधल्यास, त्याचीं अनेक नीतिवचनें, [1]आध्यात्मिक उपमा[2] व रूपकें वाचून एकनाथांचे अनेक सात्त्विक गुण त्यांच्या नातवांत अनुवंशिकतेनें उतरले, असें तरी कां म्हणूं नये ? गायनकला अवगत असणें हें कांहीं हलकटपणाचें लक्षण नव्हे, व तशी समजूत असती तर, किंवा मुक्तेश्वराच्या वर्तनाचा कै. भाव्यांनीं केलेला बभ्रा खरा असता तर, करवीरकर छत्रपतींनीं आमच्या कवीच्या पणत्वास त्याच्या अंगच्या गायनकलेचा एवढा गौरवपर उल्लेख करून तेरवाड हा गांव वंशपरंपरेनें इनाम करून दिला नसता. पुनः छत्रपतींनीं आमच्या कवीच्या पणत्वास दिलेल्या सनदेंत[3] आमच्या कवीबद्दल ज्याअर्थी आदराचे उद्गार काढले आहेत, त्याअर्थी मुक्तेश्वराबद्दल सर्वत्र आदराची भावना परंपरेनें चालत आली होती हें उघड दिसतें. ज्या मुक्तेश्वराच्या अपूर्व काव्यगुणामुळें व सात्विक वृत्तीमुळें छत्रपतींकडून त्याच्या पणत्वाला योगक्षेमार्थ एवढा गांव इनाम मिळाला, त्याच्या शीलाचा प्रश्न विवेचिला जात असतां, त्याच्या पणत्वाचीच गायनकुशलता आक्षेपकांना विरुध्द पुराव्यादाखल सांपडावी, हा दैवदुर्विपाक समजला पाहिजे. जगाच्या कल्याणार्थ देह कष्टविणें, या संतत्वाच्या कसोटीस मुक्तेश्वर उतरणार नाहीं, अथवा रा. दा. के. ओक[4] बांधतात तसें एकाद्या सांप्रदायस्थापनेंच श्रेयही त्याच्या पदरीं बांधतां येणार नाहीं. तथापि मुक्तेश्वरानें आपल्या ग्रंथांत जे थोडे

---

१ पहा पांगारकरकृत कविवर्य मुक्तेश्वर–चरित्र आणि काव्यविवेचन, पृष्ठें १११–१२७. २ वन–२।५८–५९; ३।६८; ४।१२६ ८।३६–३९. ३ आजगांवकर–महाराष्ट्र कविचरित्र–भाग १, पृष्ठें ६३–६४. ४ मुक्तेश्वर–विराटपर्व (१९३९)–उपोद्घात– पृष्ठ ६.

उत्तान शृंगारात्मक उल्लेख केले आहेत, त्यावरून तो असत्प्रवृत्त मात्र कदापि ठरत नसून, उलट त्याची आनंदी, निरोगी, रसिक व दिलखुलास वृत्तीच अधिक प्रत्ययास येते. तो धार्मिक वृत्तीचा व आस्तिक बुद्धीचा होता, याबद्दल त्याचे ग्रंथ अनेक स्थलीं[१] साक्ष देतात. मुक्तेश्वराच्या भारताचें एकही ठिकाणीं पारायण झालेलें ऐकूं येत नाहीं, याला कै. भावे सुचवितात[२] त्याप्रमाणें तो किंवा त्याचें वर्तन जबाबदार नसून, त्याची सगुण सालंकार व बव्हर्थनिर्भर कविता समजण्याची पात्रता नसणारा निरक्षर बहुजनसमाज अथवा भयाबापड्याच अधिक जबाबदार आहेत, असें म्हटलें पाहिजे.

वर वर्णन केलेल्या मुक्तेश्वराच्या रसिक वृत्तीमुळें व विचक्षणतेमुळें महाभारताचा अनुवाद करतांना व्यासांची संगति न सोडण्याचें धोरण त्यास अनेक वेळां सोडावें लागलें आहे. आपली वाणी व्यासाश्रयानें जाते असें तो ठिकठिकाणीं म्हणतो.[३] इतकेंच नव्हे, तर व्यासाची संगति सोडून दुसऱ्या मार्गानें न जाण्याबद्दलही तो बजावतो.[४] पण जेथें एकादा मनोरम प्रसंग आला, किंवा दुसऱ्या एकाद्या प्राकृत ग्रंथांत थोडी कौतुकवती हकीकत आढळली,[५] तेथें व्यासांना गुंडाळून ठेवून आपण पदरचें वर्णन घालतो, असाही कबूलीजबाब तो देतो.[६] अनुवाद करतांना मुक्तेश्वरापुढें हल्लींची प्रचलित महाभारताची प्रत असेलही. पण अमुक गोष्ट व्यासांनीं महाभारतांत सांगितली नाहीं, म्हणून जी तो नवीन सांगतो, तीच नेमकीं प्रचलित महाभारतांत आढळल्यामुळें,[७] कित्येक वेळां मुक्तेश्वरापुढें असणारी संस्कृत महाभारताची प्रत, निराळी असावी अशी शंका येते. मुक्तेश्वराच्या वनपर्वांत येणारी सुरभीकथा[८] महाभारतापेक्षां भिन्न असणें, किंवा दमयंतीच्या कपाळीं महाभारतकारानें वर्णिलेल्या 'पिप्लुरुतमः'च्या

---

१ वन-८।३६; वन ४।२२-२७; वन-९।१८-२२. २ महाराष्ट्र सारस्वत भाग १ (आवृ. ३), पृ. २९०. ३ वन-२।९०; वन-१०।२०५. ४ सभा-१२।२५२. ५ आदि-४१।७२-७३; सभा-७।६०।६१. ६ सभा-९।१६५. ७ वन-१।६२. ८ वन-१।१२४।१४५.

ठिकाणीं 'अनर्घ्यमणि' होता असें वर्णन करणें,[१] या एकदोन उदाहरणांवरूनसुद्धां वरील शंका दृढ होण्याकडे मन वाहतें.

दुसरें असें कीं, मुक्तेश्वराला विस्ताराचा बहुधा कंटाळा आहे.[२] वनपर्वासारखें एवढें मोठें पर्व निवळ १८ अध्यायांच्या लहान चौकटींत बसवितांना मुळांतील अनेक संभाषणें जशीं तो संपुष्टांत आणतो, तशा लहान लहान आख्यानांचा केवळ नामनिर्देश करून तो त्यांना फांटाही देतो. वनपर्वाच्या दुसऱ्या अध्यायांत येणारा शौनकाचा सुमारें सत्तर श्लोकांचा उपदेश, मुक्तेश्वरानें फक्त सहा ओव्यांत आटोपला आहे.[३] तर अर्जुनाच्या पाशुपतास्त्रलाभवर्णनानें व्यापलेल्या मूळ वनपर्वाच्या तीन अध्यायांना त्यानें फक्त १६२ श्लोकांची गवसणी घातली आहे.[४] मार्कंडेय ऋषीच्या समस्यापर्वानें मूळ वनपर्वाचे व्यापलेले ५० अध्याय (१८२–२३२), अथवा मत्स्योपाख्यान, इंद्रद्युम्नाख्यान, सुकन्याख्यान यासारखीं आख्यानें वर्णन करणारे अनेक अध्याय, मुक्तेश्वरानें केवळ नामनिर्देशानें संपविले आहेत. अशा सविस्तर कथा वर्णन करीत बसल्यास आपणास आयुष्य पुरणार नाहीं, व हातीं घेतलेला ग्रंथ आटोपण्याची पंचाईत पडेल असें स्पष्ट सांगतांना, महाभारतकथा स्वल्पांत आणण्याची मोरोपंताप्रमाणेंच त्यानें फार मोठी दक्षता घेतल्याचें उघड होतें.[५]

पण असें हें थोडें काटकसरीचें धोरण असलें, तरी मुक्तेश्वराची काव्यलतिका ज्यावेळीं पल्लवित होते, त्यावेळीं त्याला या गोष्टीचा विसर पडून मुळापेक्षांही सरस व स्वतंत्र प्रसंगकल्पनांची खैरात त्याच्याकडून सहजच होते. प्राचीन कवींना 'भाषांतरे' असें अभिधान हेटाळणीनें देणाऱ्यांचे डोळे मुक्तेश्वरी भारतांतील कल्पनेच्या नवीनतेनें व विशालतेनें, आणि रसांच्या अथवा भावनांच्या उत्कटतेनें व सखोलतेनें दिपून जाऊन, ते सर्व त्याच्या काव्याचे उपासक बनल्यावांचून राहणार नाहींत. मुक्तेश्वराचीं व्यक्तिवर्णनें जशीं उदात्त व डौलदार आहेत, तशीं त्याचीं स्थलवर्णनें भरघोस व संपन्न आहेत. कोणत्याही प्रसंगाचें वर्णन करतांना तो प्रसंग

---

१ वन–८।४८. २ वन–६।१७; वन–९।२४. ३ वन–१।३४–४०. ४ वन. ४. ५ वन. ११।७.

जसा तो वाचकांपुढें हुबेहूब उभा करतो, तद्वतच कोणत्याही कालाचें अथवा ऋतूचें वर्णन करतांना तो वाचकांना विशालकल्पनेच्या विमानांत बसवून प्रसन्न वातावरणांत विहार करण्यास नेतो. ययाति-आख्यानांतील शर्मिष्ठावर्णन[1] नलोपाख्यानांतील त्यानें केलेलें नलवर्णन[2] अथवा दमयंतीवर्णन[3] अगदीं थोडें असूनही भव्य, पण त्या दोन व्यक्तीबद्दल असीम आदर उत्पन्न करणारें आहे. युद्धप्रसंगाचीं त्याचीं वर्णनें अगदीं कायम ठशाचीं वाटलीं, तरी तसे प्रसंग आपल्या डोळ्यापुढें होत आहेत, असें वाटावयास लावणऱ्या विविध हालचाली तो मोठ्या सूक्ष्मतेनें चित्रित करतो[4] स्थलवर्णनांत तर ;मुक्तेश्वराचा हात धरील असा मराठींत दुसरा कवि दिसत नाहीं. स्वर्गाचें[5] त्यानें केलेलें वर्णन जितकें वैभवसंपन्न आहे, तितकेंच तें त्या स्थलाबद्दल वाचकांच्या पवित्र भावना व आकांक्षा वाढविणारें आहे. आदिपर्वांतील त्याचें उषःकालवर्णन[6] व वनपर्वांतील त्याचें वर्षाकालवर्णन[7] जितकें स्वतंत्र तितकेंच विशाल आहे. हीं सृष्टिवर्णनें करतांना मुक्तेश्वर जीं सुंदर रूपकें[8] योजतो तीं इतकीं नाविन्यपूर्ण व पल्लेदार असतात कीं, त्यांनीं वाचकांचें चित्त उन्नत्त व स्तिमित झाल्याशिवाय राहत नाहीं. मुक्तेश्वराच्या काव्यांत इतर अलंकाराचा थाट कमीच. त्याचा सर्व भर रूपकांवर. तथापि दमयंतीची पतीनिष्ठा वर्णन करतांना त्यानें गंगेवर केलेली हेतूत्प्रेक्षा, अथवा दमयंतीला भुलून दाही दिशेकडून आलेल्या राजावर केलेली रूपकयुक्त उत्प्रेक्षा[9] किंवा अरण्यांतील दमयंतीपुढें श्वापदें भ्यालीं असें दर्शवितांना योजलेला काव्यलिंग,[10] मूळ प्रसंगाइतकाच मनोज्ञ आहे.

वरील उत्तुंग कल्पनांप्रमाणेंच उत्कट रसाविर्भावाचे व भावाविष्काराचे अनेक प्रसंग मुक्तेश्वरानें आपल्या काव्यांत निर्माण केले आहेत. नवरस व विविध भाव त्याच्या पुढें असे हात जोडून उभे राहतात कीं, त्यांच्याशीं त्यांस स्वेच्छेनें समरस होता येते. मुक्तेश्वर शृंगाररसाचा थोडा भोक्ता

१ आदि-१९।१९-२३. २ वन-६।४. ३ वन-६।६-१०. ४ वन-३; वन-४।१२०-१२९. ५ वन-५।१८-२०. ६ आदि ३६।६८-८३. ७ वन. १०।१९२-२००. ८ वन. ६।२०-२१; ६।२८, ३१, ५९, ६२. ७।२५, ४९. ९ वन. ६।६३. १० वन. ७।५९.

असला तरी करुण, वीर, रौद्रादि[१] इतर रसांनीं ओथंबलेलीं वर्णनें त्याच्या काव्यांत कांहीं कमी नाहींत. दमयंतीचें मदनदशावर्णन,[२] थोडें फार सांकेतिक भासेल, तरी तिनें केलेला नलाचा धावा[३] मुळाहून अधिक करुणरमणीय आहे. दमयंतीला सोडून जातांना नलाच्या मनाची झालेली विकलता,[४] अशीच वाचकाच्या मनाला पाझर फोडणारी आहे. कौरवांनीं विष्णुयागाच्या वेळीं वनवासी पांडवांना दिलेल्या कुचेष्टेच्या आमंत्रणाला भीमानें पाठविलेलें खोंचदार व जशास तसें [५]उत्तरही वीररसयुक्त आहे. कोणता कां रस अथवा भाव असेना, त्यांत व्यक्त होणाऱ्या शरीराच्या सूक्ष्म हालचाली, मुक्तेश्वरानें साक्षेपानें अवगत करून घेतल्या आहेत. मैत्रेयाच्या उपदेशानें क्रोधाविष्ट झालेल्या दुर्योधनाचें वर्णन,[६] दोनच ओंव्यांत पण इतकें वास्तविक वठलें आहे कीं, तसा रागीट दुर्योधन वाचकांपुढें उभाच रहावा! याशिवाय नलोपाख्यानांतील इंद्र–कली संभाषणांत इंद्राचें व्यक्त झालेलें मोठें मन[७], अथवा त्याच आख्यानांत स्त्रियांच्या चंचल प्रकृतीचें त्यानें केलेलें वर्णन[८], जेवढें सूक्ष्म तेवढेंच मुळापेक्षांही स्वतंत्र व उठावदार आहे.

मुक्तेश्वराच्या काव्यांत कल्पना व भावना यांचा मधुर संगम झाल्यामुळें, इतर कोणत्याही मराठी कवीच्या काव्यापेक्षां, त्याच्या काव्यानें वाचकांच्या मनावर विशेष मोहनी पडते. मूळ ग्रंथांतील स्वभाव अथवा प्रसंगवर्णनें अधिक उद्दीपित करण्याकडे त्याचा कल आहे. तथापि कित्येक वेळां मुळांतील सुंदर स्वभावपरिपोषाला अथवा सूचक व मार्मिक संभाषणांना मुक्तेश्वरानें बगल दिल्यामुळें, मूळ कथेचें स्वारस्य नष्ट झालें आहे. नल सांपडत नाहीं असें पाहून त्याला शोधण्यास पाठविलेल्या ब्राह्मणांना करावयास सांगितलेली घोषणा मुळापेक्षां निराळी व नीरस आहे,[९] तर पर्णादानें केलेली घोषणा ऐकून ऋतुपर्ण कांहीं बोलला नाहीं असें मूळ भारतांत

१ आदि–२६।१२७–१६०. २ वन. ६।४८–५८. ३ वन. ७।१२२–१४७. ४ वन. ७।१०९–११७. ५ वन. १३।६०–६३. ६ वन. २।२६–२८. ७ वन. ७।६–१०. ८ वन. ६।२०–२६. ९ वन. ८।७०.

असतां, त्याच्या तोंडीं घातलेलें भाषण,[१] वाच्य व निरर्थक आहे. अशींच कांहीं उदाहरणें कै. चिंतामणराव वैद्य, यांनीं आपल्या वनपर्वावरील मार्मिक लेखांत[२] ग्रथित केलीं आहेत. या अनुवादांतर्गत अथवा वर उल्लेखलेल्या कालविपर्यासाच्या दोषाशिवाय मुक्तेश्वराच्या काव्यांत वैरस्य उत्पन्न करणारा जो एक दोष अगदीं अल्प प्रमाणांत कां होईना सांपडतो, तो त्याच्या अनवधानाचा होय. दमयंती सर्व पतिव्रतांत श्रेष्ठ होती, असें वर्णन द्रौपदीपुढेंच केलें जात असतांना पतिव्रतांच्या यादींत द्रौपदीचा समावेश करण्यांत,[३] मुक्तेश्वरानें औचित्याबद्दल फारशी काळजी घेतलेली दिसत नाहीं. असे हे थोडे दोष असले तरी मुक्तेश्वराच्या मनोरम काव्यानें व त्याच्या अनुपम भाषाशैलीनें मंत्रमुग्ध झाल्यामुळें, वाचकाच्या ते क्वचितच ध्यानांत येतात.

मुक्तेश्वराची शैली गुणवती व ओघवती आहे. प्रसाद हा तिचा सर्वसाधारण गुण असून शृंगारकरुणादि रसवर्णनप्रसंगीं मधुर[४], व वीररौद्रादि रसप्रसंगीं ओजस्वी[५] होऊन, ती त्या त्या रसाला अनुकूल अशी कोमल अथवा कठोर व्यंजनात्मक रचना धारण करते. त्याची वाणी सहज व स्वाभाविकतेनें स्रवणारी असून वाचकाला नकळत वाहवत नेणारी आहे. अनुरूप रूपकांच्या योजनेमुळें थोडक्यांत अधिक पण परिणामकारक अर्थ व्यक्त करण्याची कला मुक्तेश्वराला साधली[६] आहे. आपल्या कवितेंत ठिकठिकाणीं उदात्त व परिस्थित्यनुरूप अनुकूल वा प्रतिकूल विचार गुंफण्याची संधि तो सहसा कधीं वाया दवडीत नाहीं. आदिपर्वांतील कुलवतीचें कुलक्षण,[७] वनपर्वांत तीर्थस्वरूप कोण ? कोणाचें तीर्थ कोणतें,[८] ब्राह्मणमहत्त्व,[९] स्त्रियांची प्रकृति,[१०] या संबंधीं जे उल्लेख आले आहेत, ते मुळाहून स्वतंत्र अतएव आमच्या कवीच्या मतांचेच द्योतक समजले पाहिजेत. अतिशयोक्तीनें[११] अर्थाधिक्य

---

१ वन. ८।७५. २ वैद्य यांचे निबंध व भाषणें. पृ. १४९–१५१. ३ वन. ६।१६. ४ वन. ६।५१–५८. ५ वन. २।२६–२८, वन. २।३९, ४२; वन. ६।१२३–१४७, वन. १०।२५, १२२; वन. १३।६०–६३. ६ वन. ६।१४१–१४३; वन. १६।३०. ७ आदि. १६।९१–१०५. ८ वन. ९।७–२०. ९ वन. ४।२१–२८. १० वन. ६।२२. ११ वन. ५।९२; ८।२०१.

दाखविण्याचें कौशल्यही त्याच्या ठिकाणीं कांहीं कमी नाहीं. लेखनशैलीनें लेखकाच्या व्यक्तित्वाची पारख होते, हें मत खरें असेल, तर पाल्हाळाचा कंटाळा असणें, थोडक्यांत अधिक अर्थ विशद करणें, वर्णनांत संपन्नता व उदात्तता आणणें, इत्यादि मुक्तेश्वराच्या लेखनशैलीच्या गुणांवरून तो ठाकठिकीचा, नीटनेटका व मोठा डौलदार माणूस असला पाहिजे, अशी कल्पना करण्यास जागा आहे. मुक्तेश्वर काव्यांत बोलत असला, तरी आपलें नित्याचें भाषण परिणामकारक व जोरदार करण्यासाठीं कोणत्या अलंकारांची कशी योजना करावी, हें तो उत्तम जाणत होता असें दिसतें. हा गुण त्याच्यांत उपजत असून अभ्यासानें व निरीक्षणानें तो त्यानें वृद्धिगत केला असावा.

मुक्तेश्वराच्या व्यक्तिमत्वासंबंधीं असा कयास बांधतां आला, तरी त्याच्या कालनिर्णयाची बाब मोठी कठिण होऊन बसली आहे. प्राचीन मराठी कवींमध्यें ज्यांनीं आपल्याबद्दल अथवा आपल्या काव्यासंबंधीं कालाचा स्पष्ट उल्लेख केला आहे, असे फार थोडे. अशा कवींचे जन्ममृत्युकाल ठरविण्यास विश्वसनीय साधनें उपलब्ध नसल्यामुळें, संशोधकांना तत्कालीन ऐतिहासिक पत्रव्यवहार, सनदा, दानपत्रें, वृत्तिपत्रें व महजर अशा बाह्य पुराव्यावर अथवा परंपरेनें वाहत आलेल्या प्रवाद–आख्यायिकांवरच सर्व भिस्त ठेवावी लागली आहे. ज्ञानेश्वर–रामदासांसारखे जे कवी संत म्हणूनही प्रसिद्धि पावून आपल्या स्वतंत्र सांप्रदायाचे प्रवर्तक बनले, त्यांच्या शिष्यप्रशिष्यांनीं प्रत्यक्ष पाहून अगर परंपरागत हकीकतीवरून त्यांचीं चरित्रें लिहून ठेवल्यामुळें, अशा संतकवींच्या कालासंबंधीं थोडीबहुत तरी निश्चिति झाली आहे. पण एकनाथ तुकारामासारखे जे संतकवी भागवत सांप्रदायासारख्या विश्वव्यापी सांप्रदायाचे प्रवर्तक व प्रसारक बनल्यामुळें, विशिष्ठ अशी शिष्यपरंपरा मिळवूं शकले नाहींत, त्यांच्या समाधिकालाबद्दल अगर प्रयाणकालाबद्दल तर्कांचा झुकता लंबक अजूनही जेथें स्थिर झालेला दिसत नाहीं, तेथें मुक्तेश्वर, रघुनाथपंडित अथवा वामनपंडित अशा कलाकवींच्या कालनिर्णयाबद्दल अनुमान व हेकेखोरपणा यांचें केवढें मोठें पीक पिकलें असेल याची नुसती कल्पनाच केलेली बरी. कै. भाव्यांच्या आज सर्वत्र प्रमाण मानल्या गेलेल्या

' महाराष्ट्र सारस्वत ' ग्रंथांत, बऱ्याच शिवकालीन कवींना निरुपायानें शाहुकालांत वावरावें लागलें असून, श्रीशिवछत्रपति व रामदास यांच्यापेक्षां वयानें कितीतरी वडील अशा मुक्तेश्वरासारख्या प्रसिद्ध कवीच्या कपाळीं, रामदासापेक्षां एका वर्षानें लहान असल्याची चिठी चिकटविली गेल्यामुळें, शिंगें मोडून वासरांत शिरण्याची आपत्ति त्या बिचाऱ्यावर ओढवली आहे. या मताचीच री अलीकडे नवीन संशोधनाच्या नांवाखालीं ओढण्याचा उपक्रम, ' काव्यसंग्रह ' द्वारां ' मुक्तेश्वराच्या विराटपर्वाची ' द्वितीयावृत्ति काढतांना, रा. दा. के. ओक यांनीं आपल्या उपोद्घातांत केल्याचें आढळून आल्यामुळें या प्रश्नाला आज थोडी चालना द्यावी लागली आहे.

कोडितकर अत्रे यांच्या दप्तरांतील टिपणवहींत व सरंजामे यांच्या जंत्रींत केलेल्या नोंदीवरून, कै. भावे यांनीं मुक्तेश्वराचा जन्म, पैठणास शके १५३१ ( इ. स. १६०९ ) मध्यें झाला, अशी जी माहिती आपल्या ' सारस्वतां 'त दिली आहे, तिलाच पोषक अशी अगदीं नवीन माहिती, रा. ओक यांनीं तंजावर येथील श्रीगोविंदबाळस्वामींच्या मठांतील ग्रंथसंग्रहांत असणाऱ्या सुमारें १००।१५० वर्षांच्या एका जुन्या हस्तलिखित वहींतील नोंदीवरून देण्याचा प्रयत्न केला आहे. ती माहिती अशी कीं, " (१) जनार्दनस्वामीच्या मातुलाचे पुत्र विसाजीपंत म्हणून कोणी होते. (२) त्यांना तीन मुली होत्या. (३) पहिली एकनाथास, दुसरी सूरोपंतास, व तिसरी कमळाकरपंतास दिली होती. विसाजीपंतानें ह्या कन्या ' आसकीनें दिधल्या होत्या. ' (४) सूरोपंत ( सूर्याजीपंत ) हे श्रीसमर्थ रामदासांचे तीर्थरूप, व एकनाथ हे त्यांचे ( रामदासांचे ) मावसे. (५) कमळाकरपंत, हेही रामदासाचे मावसे. (६) एकनाथ मावसे समर्थांचे बारशास गंगातिरीं जांब गांवास आले होते." या नवीन माहितींतील विधानावरून समर्थांच्या जन्माच्या सालीं म्हणजे शके १५३० (इ. स. १६०८) मध्यें एकनाथ हयात होते हें रा. ओक यांस दिसून येऊन, एकनाथांनीं मुक्तेश्वराच्या तोंडांत खडीसाखर घालून शुभाशीर्वाद दिल्याच्या आख्यायिकेची संभवनीयताही त्यांना सहजच पटली आहे. शिवाय तंजावरच्या वरील टिपणावरून शके १५३० ( इ. स.१६०८ ) मध्यें जन्मलेल्या रामदासांच्या बारशास ज्याअर्थीं एकनाथ हजर होते असें दिसतें, त्याअर्थीं रा. ओकांना, एक-

नाथांच्या सर्वत्र मान्य झालेल्या १५२१ (इ. स. १५९९) या समाधिशकाच्या विश्वसनीयतेबद्दल शंका येऊन, सहस्रबुद्धेकृत एकनाथ चरित्र, आवटेकृत एकनाथ महाराजांच्या अभंगाच्या गाथेची प्रस्तावना, व महाराष्ट्र-भाषाभूषण रा. आजगांवकरकृत एकनाथमहाराजचरित्र यांत उल्लेखलेले खुद्द नाथांचें शके १५२५ ( इ. स. १६०१ ) चें अभयपत्र यांच्या आधारें, शके १५३१ ( इ. स. १६०९ ) मध्येंच एकनाथ समाधिस्थ झाले 'असें म्हणावें लागलें आहे.'

रा. ओक यांना तंजावर येथील टिपणावरून मिळालेली ही नवीन माहिती एकनाथ, मुक्तेश्वर व रामदास यांच्या ज्ञात चरित्रांवर खरोखर मोठाच प्रकाश पाडणारी आहे असें म्हटलें पाहिजे! तिच्यावरून एकनाथ हे रामदासांचे मावसे व मुक्तेश्वर हे रामदासांच्या मावसबहिणीचे जसे पुत्र ठरतात; तसेच एकनाथांचे प्रसिद्ध गुरु जनार्दनस्वामीही आपल्या शिष्याचे लांबचे कां होईना, पण श्वशुर ठरतात. कारण जनार्दनस्वामींच्या मामे-भावाचीच मुलगी एकनाथांना दिली असल्याचें, वरील नोंद सांगत आहे. शिवकालीं व तत्पूर्वी तंजावर प्रांतीं स्थायिक झालेल्या मराठी कवींची माहिती मिळविण्यासाठीं कै. राजवाडे प्रभृति संशोधकांनीं आतांपर्यंत त्या प्रांतांत पुष्कळ प्रवास केला. पण रा. ओकांनाच हस्तगत झालेली तंजावर येथील श्रीगोविंदबाळस्वामींच्या मठांतील ही जुनी हस्तलिखित वही, त्या सर्वांची नजर चुकवून इतके दिवस गुलदस्तांत राहून आतांच एकदम अव-तीर्ण व्हावी याचें आश्चर्य वाटल्यावांचून राहत नाहीं. तंजावर प्रांतीं रघु-नाथपंडित, आनंदतनय, गोसावीनंदन अशा मराठी कवींसंबंधीं प्रचलित असलेल्या अनेक आख्यायिका, संशोधकांनीं तिकडून इकडे आणल्या. पण एकनाथ–मुक्तेश्वर–रामदासासारख्या प्रसिद्ध कवींच्या परस्परांतील अगदीं निकटवर्ती अशा या आप्तसंबंधाची कानवार्ताही त्यांना लागूं नये, यावरून प्रसिद्ध पुरुषांचा परस्परांशीं आप्तसंबंध जोडण्याचा हव्यासच कोणीतरी या हस्तलिखित वहीच्या रूपानें पुरवून घेतला असावा, अशी शंका येते. आणखी असें कीं, या आप्तसंबंधामुळें घडून आलेलें एकनाथ–रामदासांचें हें जवळचे नातें, किंवा समर्थांच्या बारशास एकनाथांचे जांबगांवीं आगमन,

या गोष्टी केशव-महिपतीत्यादि एकनाथांच्या चरित्रकारांना किंवा समर्थांच्या कल्याणादि पट्टशिष्यांना व गिरिधरादि चरित्रकारांना अज्ञात राहिल्या तरी कशा? एकनाथ-रामदासांसारखे दोन महापुरुष नात्यानें खरोखरीच इतके जवळ असते, तर ही लोभनीय वाटणारी गोष्ट आतांपर्यंत गुप्त राहिलीच नसती; व समर्थांना किंवा त्यांच्या चरित्रकार शिष्यांना या मोठ्या नात्याचा उल्लेख आपल्या ग्रंथांत कोठे तरी केल्याशिवायही राहवलेंच नसतें. पुनः वर उल्लेखलेल्या तंजावर येथील हस्तलिखित वहींतील नोंदीप्रमाणें, विसाजीपंतांनीं आपली पहिली व दुसरी मुलगी अनुक्रमें ज्या एकनाथ व सूर्याजीपंतांना दिली, त्या दोघांच्या वयांतील अंतर पाहतां, वरील आख्यायिका तर सर्वस्वी असंभवनीय वाटते. एकनाथांचा जन्म शके १४५० च्या सुमाराचा, तर सूर्याजीपंतांचा शके १४९० मधला आहे. म्हणजे विसाजीपंतांच्या या दोन जामातांच्या वयांतील अंतर जर ४० वर्षांचें होतें, तर त्यांच्या या दोन मुलींच्या वयांमधील अंतरही असेंच मोठें कल्पावें लागेल. शिवाय या मुली आसकीनें दिल्या असल्यामुळें, त्या साधारणतः एक दोन वर्षांच्या फरकानें जन्मलेल्या असून, त्यांचे एकनाथ-सूर्याजीपंतांशीं विवाहही, असेच एक दोन वर्षांच्या फरकानें किंवा एकदमच झाले असावे, असा सर्वसाधारण जो ग्रह वरील नोंद वाचून होतो, त्याला एकनाथ-सूर्याजीपंतांच्या वयांतील मोठ्या फरकानें बाध आल्याशिवाय राहत नाहीं. विसाजीपंतानें आपल्या मुलीसाठीं असे विषम वयाचे वर शोधून काढले असतील असें वाटत नाहीं. म्हणून रा. ओकांच्या दृष्टिपथांत आलेल्या हस्तलिखित वहींतील या नवीन माहितीस पुराव्याच्या दृष्टीनें फारसें महत्त्व देण्याचें कारण दिसत नाहीं.

पण कांहीं असलें तरी मुक्तेश्वराचा जन्मशक ठरविणें हें एकनाथांच्या समाधिशकाच्या निश्चितीवरच सर्वस्वीं अवलंबून आहे. कारण नाथांच्या प्रयाणकालीं मुक्तेश्वर २५ वर्षांचे होते, हें कै. ह. भ. प. पांगारकर[१] व भारताचार्य

---

१ मुक्तेश्वर-चरित्र आणि काव्यविवेचन. ( १९२२ ).

कै. वैद्य[1] यांचें मत गृहीत धरल्यास, मुक्तेश्वराचा जन्म नाथांच्या प्रयाणशकापूर्वी २५ वर्षे झाला होता असें मानण्यास प्रत्यवाय नाहीं. एकनाथांचा समाधिशक १५४६ अगर १५३१ असा नवनीतकारांनीं वेळोवेळींजाहीर केला असला, तरी

" शालीवाहन पंधरा शतशकीं एकागळे विंशति "

या नाथचरित्रकार केशवस्वामींनीं रचलेल्या श्लोकानुसार अथवा

" भूबाहू शरचंद्रमा शकविधि क्षेत्रीं तिजा जो क्रमें "

या श्रीमत्कृष्णदयार्णवांच्या व

" शके पंधराशें एकवीस । वर्षानाम विकारी त्यास, "

या राघवकवींच्या प्रमाणोक्तीवरून, शके १५२१ (इ. सन १५९९) हाच एकनाथांचा निर्याणशक, पांगारकर–भावेप्रभृति सर्व संशोधकांनीं मान्य केला आहे. म्हणजे शके १५२१ च्या मागें २५ वर्षे गेल्यास सुमारें शके १४९६ (इ. सन १५७४) हा मुक्तेश्वराचा जन्मशक ठरतो. असें असल्यावर मग रा. ओक यांनीं प्रकाशांत आणलेल्या, " एकनाथ समर्थांच्या बारशास गंगातीरीं जांबगांवास आले होते," या नवीन व कौतुकवती वार्तेस सहजच एका मनोहर क्लृप्तीचें स्वरूप प्राप्त होतें.

आतां या जन्मशकांत अनुमानाचा थोडा फार भाग असला, तरी आणखी एका बाह्य पुराव्याचें पाठबळ त्यांस मिळण्यासारखें आहे. कवि मुक्तेश्वरापासून चवथे पुरुष मुक्तेश्वरबुवा गवई, यांना कोल्हापूरच्या छत्रपती संभाजी महाराजांकडून तेरवाड गांव इनाम दिल्याची जी सनद मिळाली आहे, तिचा शक १६४९ (इ. स. १७२७) हा आहे. या सनदेंत मुक्तेश्वरबुवांचा ' बहुत भले भगवद्भक्त, गायनविद्येंत अतिनिपुण ' असा उल्लेख केला असल्यानें व सदर इनामही कुटुंबाचा योगक्षेम चालण्यासाठीं, व थोरले मुक्तेश्वर कवि यांचा वृंदावनमहोत्सव चालविण्यासाठीं दिलें असल्यानें, तें मुक्तेश्वरबुवांच्या वयाच्या सुमारें ३०।३५ व्या वर्षी त्यांस मिळालें असावें. शिवाय या मुक्तेश्वरबुवास कोल्हापूरकर छत्रपतीकडून शके १६८१ (इ. स. १७५९) मध्यें दुसरी एक सनद मिळाली असल्यानें,[2] त्यांची

---

१ वैद्य यांचे निबंध व भाषणें. २ आंजगांवकरकृत–कविचरित्र, भाग २, पृ. ६४.

आयुर्मर्यादा मुक्तेश्वर कवीप्रमाणेंच ६०।७० वर्षांची ठरते. म्हणून मुक्तेश्वरबुवास तेरवाड गांव मिळाल्यापासून मागील तीन पिढ्या सरासरीनें प्रत्येकीं ३५ वर्षांच्या मानल्यास, शके १६४९ च्या मागें १५०।१५३ वर्षें, म्हणजे शके १४९६ ( इ. स. १५७४ ) हाच शक येतो, व तोच मुक्तेश्वर कवीचा जन्मशक मानण्यास प्रत्यवाय नसावा.

आणखी असें कीं, रामदासपंचायतनांतील रंगनाथस्वामी निगडीकर ( शके १५३४ ) यांची जी संतमालिका कै. भावे यांनीं प्रसिद्ध केली आहे,[1] तिच्यांतील कवींचा क्रम बहुतांशीं कालानुसार असावा असेंच दिसतें. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथपंचक, जनार्दन, एकनाथ, रमावल्लभ, नामा पाठक, कान्हो पाठक यांच्यानंतरच रंगनाथांनीं मुक्तेश्वरांचा उल्लेख केला असून, अगदीं शेवटीं शेवटीं केशवस्वामी, तुकाराम, रामी-रामदास व वामनस्वामी यांचे नामनिर्देश आहेत, हें विशेष लक्षांत ठेवण्या-सारखें आहे. श्रीसमर्थांचा तर या संतमालिकेंत उच्चारही केलेला नाहीं. यावरून ही संतमालिका रामदासांना समर्थत्व येण्यापूर्वीची असून, रंग-नाथांच्या मतानें तरी निदान मुक्तेश्वर रामदासापेक्षांच काय पण श्रेष्ठापेक्षांही पुष्कळच वडील असल्याचें सिद्ध करते. रा. ओक म्हणातात त्याप्रमाणें, मुक्तेश्वर जर रामदासापेक्षां एक वर्षानें लहान व समकालीन असते, तर रंगनाथांनीं त्यांचें नांव या संतमालिकेंत आजीबात घातलें तरी नसतें, किंवा आज आहे इतकें तें वर न घालतां, तुकाराम, रामीरामदास व वामन-पंडितांच्या बरोबरीनें आगेंमागें कोठेंतरी गुंफलें असतें. यावरून रा. ओकांना दिसून येईल कीं, मुक्तेश्वरांना नमन करतांना रंगनाथस्वामी त्यांना केवळ पूज्यच मानून राहिले नसून, आपणापेक्षां किंवा रामदासापेक्षां कितीतरी वडील समजत होते. रा. ओकांनीं उध्दृत केलेला रंगनाथांच्या संतमालिकेचा पुरावा याप्रमाणें त्यांच्याच उलट जात असून, मीं वर दिलेल्या शके १४९६ (इ. स. १५७४) या जन्मशकाला मात्र तो चांगलाच उपोद्बलक झाला आहे.

भाषाविषयक प्रमाणही या कालप्रकरणीं पुष्कळच उपयोगी पडण्यासारखें आहे. कोणत्याही कवीच्या अगर ग्रंथकाराच्या कालाचा निर्णय लावतांना जी

---

१ 'महाराष्ट्र कवि' स्फुटसंग्रह भाग १.

अंतःसाधनें नेहमीं विचारांत घेतलीं जातात, त्यांत त्याच्या भाषेतील विशिष्ट व्याकरणप्रयोग, शब्दसंपत्ति, म्हणी-संप्रदाय व समाजकालनिदर्शक उपमा दृष्टांत यांना महत्त्वाचें स्थान दिलें जातें. मुक्तेश्वराची भाषा संस्कृतप्रचुर असली, तरी पंतपंडितांच्या भाषेप्रमाणें क्लिष्ट होण्याइतकी ती जड बनलेली नाहीं. तिनें आपलें शुद्ध मराठी वळण सोडलेलें नसून, शिवकालांत सर्वत्र फैलावलेले फारशी शब्द, तिच्यांत फारच अल्प प्रमाणांत सांपडतात. ज्ञानेश्वरापासून एकनाथापर्यंतच्या वाङ्मयाचा मुक्तेश्वरानें कसून अभ्यास केल्यामुळें त्याच्या भाषेवर त्यांच्या भाषेचा संस्कार अगर ठसा उमटावा यांत नवल नाहीं. मुक्तेश्वरी भारतांत दळवाडे, त्रिशुद्धि, नावेक, ओजा, सुरवाडले, आराणूक, वरपडे, साउमा, असे ज्ञानेश्वरकालीन शब्द जसे सांपडतात, तसेच रोकडा, धवधवित, चवरडोली, झोंटधरणी, गदारोळ, अळुमाळ, एकमिळणी, कडोविकडी, असे एकनाथांच्या वाङ्मयांत सर्वत्र भेटणारे शब्दही नेहमीं आपलें तोंड दाखवितात. युद्धप्रसंगासारख्या वर्णनांत तर मुक्तेश्वर एकनाथांच्या अशा वर्णनांचें इतकें हुबेहूब अनुकरण करतो कीं, त्याच्या 'युद्धकदना मिसळले,'[१] अथवा 'खंडविखंड करावे'[२] अशा वाक्यांनीं थोड्याच कालापूर्वी होऊन गेलेल्या त्याच्या आजाच्या वाङ्मयाचा स्पष्ट ठसा त्याच्या वाङ्मयावर पडल्याचा वाचकांना प्रत्यय यावा. त्याशिवाय घालिजे,[३] चालिजे,[४] अशीं कर्मकर्तरीरूपें, नातळे,[५] नेदित,[६] अशीं क्रियापदाचीं अकरणरूपें; शस्त्रेंकरून,[७] घनवृष्टिपासाव,[८] अशीं नामाच्या विभक्तिरूपाला जोडलेलीं शब्दयोगी अव्ययें; तुजलागोनि,[९] नमस्कार त्यालागी;[१०] अशीं द्वितीयेचीं रूपें; धर्माहस्तीं,[११] भीमाउदरीं,[११] असें सामान्यरूप कायम ठेऊन केलेले समास; पुरुषवेख,[१३] हरिख,[१४] यांत 'ष' बद्दल 'ख', व शिसीं,[१५] यांत 'ष' चा 'स' होण्यांत झालेला वर्णाचा फरक; चमत्कारला,[१६] आकांतली,[१७] अशीं नामक्रियापदें; स्वआश्रमा,[१८]

१ वन. ४।३९. २ वन. १४।४२. ३ वन–३।२४. ४ वन–७।७६. ५ वन–१।१०१. ६ वन–१।१२७. ७ वन–१।८५. ८ वन–१।४९. ९ वन–१।१७. १० वन–४।२२. ११ वन–१।७७. १२ वन–१।८५. १३ वन–५।६१. १४ वन–५।१०४. १५ वन–७।१९९. १६ वन–६।७५. १७ वन–७।१३२. १८ वन–४।३०.

देवेंद्र आशेनें[१] यांत संधि करणेची केलेली टाळाटाळ; आठव आठवणें,[२] शोक शोकणें,[३] अशीं सजातीय कर्मांची (Cognate objects) योजना; सगुणाथिला, सत्वाथिला,[४] बळाथिला, अशीं भूतकालवाचक धातुसाधितें; इत्यादि शिवपूर्वकालीन अगर शिवकालाच्या प्रथमपादांतील भाषेंत दिसणारे सर्वसाधारण विशेष मुक्तेश्वराच्या भाषेंत जसे सांपडतात, तसेच धाविन्नला,[५] झाकिन्नला,[६] अशीं भूतकालाचीं रूपें; न वचे हा शब्दप्रयोग;[७] 'नंतर' बद्दल 'पाठी'[८] 'कडे' बद्दल 'उजु'[९] व 'पुढें' बद्दल 'पुढारी'. शब्दांची योजना; वर्तमानाबद्दल विध्यर्थाचा उपयोग;[१०] तृतीयेच्या जागीं प्रथमेच्या एकवचनाची योजना;[११] उडोनि भरला,[१२] वधिले न वचति[१३] असे थोडे भिन्न प्रयोग; इत्यादि ज्ञानेश्वरापासून एकनाथापर्यंत चालत आलेले, पण पुढें शिवकालाच्या शेवटीं शेवटीं लुप्त झालेले भाषाविशेष, मुक्तेश्वराच्या काव्यग्रंथांत दिसत असल्यामुळें त्याचा लेखनसंसार सोळाव्या व सतराव्या शतकांच्या संधिकालांत थाटला गेला असावा, असें अनुमान निघतें.

मुक्तेश्वराच्या वाङ्मयांत येणाऱ्या जुन्या शब्दांच्या व प्रयोगांच्या बाहुल्यामुळें, कालदृष्ट्या तो लोलिंबराज–सामराजाप्रमाणेंच एकनाथयुगाकडे जसा झुकतो, तसा रामदासयुगाकडे मुळींच झुकत नाहीं. तुकाराम अगर इतर शिवकालीन कवींच्या वाङ्मयांत हटकून आढळणारें फारशी शब्दांचें प्राचुर्य त्याच्या ग्रंथांत नसल्यामुळें, कोणत्याही शिवकालीन कवीपेक्षां तो कितीतरी आधीचा व वडील होता, हें सिद्ध होण्यासारखें आहे. तशांत रा. दा. के. ओक म्हणतात त्याप्रमाणें, मुक्तेश्वर जर खरोखर रामदासांपेक्षां एक वर्षानें लहान असता, अगर रामदासांच्या मावस बहिणीचा मुलगा असता, तर इतर अनेक रामदासी कवींप्रमाणें, रामदासांच्या नवीन रामसंप्रदायाचा किंवा त्यांच्या शिकवणुकीचा त्याच्या

---

१ वन–५।५५. २ वन–३।७५. ३ वन–८।५४. ४ वन–६।२. ५ वन–३।१६. ६ वन–३।७०. ७ वन–३।७७. ८ वन–१५।१९६. ९ वन–११।४४. १० वन–१३।६; वन–४।१५८. ११ वन–१।१०३, १।३०, ३।५१. १२ वन–११।७५. १३ वन–१८।२६.

-चाणीवर व विचारसरणीवर स्पष्ट परिणाम झाल्याशिवाय राहिला नसता. शिवाय काल विपर्यासाचा दोष पत्करूनही आपल्या काव्यांत स्वकालीन उल्लेख करण्याच्या त्याच्या संवयीस अनुसरून आपल्यापेक्षां वडील अशा रामदासांच्या प्रचंड सांप्रदाय उभारणीच्या कार्याचें, किंवा शिवाजी महाराजांनीं पुढें केलेल्या अफझुलखानवधासारख्या अनेक रोमहर्षक प्रसंगांचें शब्दचित्र रेखाटण्याचा मोहही त्यांस आवरतां आला नसता. याच्या उलट तुकाराम, समर्थ व शिवछत्रपती यांसारख्या गाजलेल्या विभूतींचा नामनिर्देश पर्यायानेंही त्याच्या वाङ्मयांत ज्याअर्थी येत नाहीं, त्याअर्थी मुक्तेश्वराला त्यांचा समकालीन म्हणणें धाडसाचेच होणार आहे.

वरील विधानांना पोषक अशीं कै. इतिहासाचार्य राजवाडे यांनीं मुक्तेश्वराच्या कालासंबंधीं पूर्वी 'ग्रंथमालेंत' केलेलीं खालील विधानें बरींच मार्गदर्शक झाल्यावांचून राहणार नाहींत. "मुक्तेश्वर आपल्या आदिपर्वाच्या पंधराव्या अध्यायांत व सभापर्वाच्या ८ व्या अध्यायांत 'क्रूर फिरंग्यांचा' व 'दंडेल्या इंग्रजांचा' उल्लेख करतो. इ. सन १६६० च्या सुमारास, इंग्रज लोक १६३०।४० पेक्षां अधिक सभ्यपणा व माणुसकी दाखवूं लागले होते. यावरून वरील 'दंडेल' वगैरे विशेषणांना ते पात्र ठरण्याच्या काळीं म्हणजे इ. सन १६६० पूर्वी, त्यानें आपलें भारत रचिलें असावें. त्याचप्रमाणें 'मुक्तेश्वर जसा इंग्रज, पोर्तुगीज, डच, पठाण इत्यादि परकीयांचा उल्लेख करतो, तसा तो फ्रेंच लोकांचा एकदांसुद्धां करीत नाहीं. फ्रेंचांची पहिली वखार इ. स. १६६८ मध्यें सुरतेस स्थापली गेली, त्याअर्थी फ्रेंचाच्या आगमनापूर्वीच मुक्तेश्वरी भारत रचलें गेलें असावें." या दोन विधानांनीं मुक्तेश्वरी भारताचा काल कै. राजवाड्यांनीं इ. स. १६५० हा ठरविला असून, कै.[1] पांगारकरांनींही त्याला आपला पाठिंबा दिला आहे. पण रा. ओक व कै. भावे यांच्या मताप्रमाणें मुक्तेश्वर जर रामदासांचा किंवा शिवाजी महाराजांचा अगदीं समकालीन असता, तर इतर अनेक शिवकालीन कवींप्रमाणेंच परकीयांच्या आगमनाचा उल्लेख करण्याचें त्याच्या मनांतही आलें नसतें. परकीयांच्या आगमनाची जी प्रत्यक्ष परिस्थिति त्याच्या कानावर

---

१ मुक्तेश्वर—चरित्र व काव्यविवेचन पृ. ३१.

आली, तिचाच त्याच्या स्वभावानुसार त्यानें चट्कन उल्लेख करून टाकल्या-मुळें, मुक्तेश्वराच्या कालनिर्णयाचा तो एक महत्त्वाचा दुवा होऊन बसला आहे. 'रामदासांच्या पुढ्यांतल्या कवींचीं नांवें मुक्तेश्वरी भारतांत नाहींत. तुकारामाचाही नामोल्लेख नाहीं. फक्त ज्ञानेश्वर, एकनाथ व जनार्दनस्वामी यांचेच केवळ उल्लेख आहेत. तुकोबा इ.स.१६४९ सालीं स्वर्गाला गेले व त्यांची कीर्ति पैठणपर्यंत जाण्यापूर्वीच मुक्तेश्वर आटोपले होते.' या कै. राजवाड्यांच्या पुढील विधानांनीं तर मुक्तेश्वराच्या कालाच्या अंतिम मर्यादेवर बराच प्रकाश पडण्यासारखा आहे. कारण तुकारामासारख्या महान् भगवद्भक्ताच्या सदेह स्वर्गगमनाच्या सोहळ्याची खबर, मुक्तेश्वर हयात असता तर त्याच्या काना-वर न जाणें जितकें अशक्य होतें, तितकेंच ती ऐकून तिचा नामोल्लेखही न करण्याइतका मनाचा अनुदारपणा त्याच्यासारख्या रसिकानें दाखविणेंही केवळ असंभाव्य होतें. मात्र तुकारामाच्या सदेह स्वर्गवासाची वार्ता मुक्तेश्वरांच्या कानीं जाण्यापूर्वींच ते आटोपलें होते, असें गृहीत धरल्यास, ते इ० स० १६४९ पूर्वींच एक–दोन वर्षें तरी आटोपलें असले पाहिजेत व त्यापूर्वींच त्यांनीं आपलें महाभारत रचिलें असल्यामुळें, कै. राजवाडे म्हणतात तो इ० स० १६५० हा मुक्तेश्वराच्या रचनेचा काल योग्य दिसत नाहीं. म्हणून मुक्तेश्वर इ० स० १५७३–७४ सालीं जन्मले असावें, त्यांनीं आपले भारत इ० स० १६४० पर्यंत रचलें असावें, व ते इ. सन १६४५–४६ च्या सुमारास स्वर्गवासी झाले असावे, असाच वरील विवेचनाचा समन्वय करावा लागतो.

मुक्तेश्वराच्या सर्व रचनेंत त्याच्या भारतानें कवित्वाच्या व शैलीच्या बाबतींत उत्कर्षबिंदु गांठला आहे. अर्थातच ही रचना त्याच्या बुध्दीच्या परिणतावस्थेंत म्हणजे उतारवयांत झाली असें मानल्यास, सन १६४० हा काल या गोष्टीशीं जुळण्यासारखा आहे. कारण मुक्तेश्वर यावेळीं ६५।६६ च्या घरांत होते. सन १५९९ सालीं झालेल्या एकनाथांच्या वैकुंठवासाच्या सुमारास, २०।२५ वर्षांच्या असणाऱ्या मुक्तेश्वरानें त्यांना ग्रंथरचना करून दाखविली असें गृहीत धरून, कै. वैद्य मुक्तेश्वरी भारताचा काल स्थूलमानानें इ. सन १६०० मानतात.[१] माझ्या मतें हा काल

१ वैद्य यांचे निबंध व भाषणें.

मुक्तेश्वराच्या आरंभींच्या म्हणजे 'संक्षेप रामायणा'च्या रचनेचा असावा. 'मुक्तेश्वराचें भारत, आपला महाराष्ट्र स्वराज्योन्मुख झाला त्या वेळचें आहे, व त्या वेळीं महाराष्ट्रांतील कर्त्या पुरुषांच्या हृदयांत ज्या उच्च मनोवृत्ति उचंबळत होत्या, त्याचें प्रतिबिंब त्याच्या भारतांत लख्ख पडलें आहे.' अशा प्रकारचीं विधानें कै. पांगारकर यांनीं प्रस्तुत काल-प्रकरणीं केलीं आहेत.[१] पण आदिपर्वांतील शकुंतलाख्यान अथवा सभापर्व अध्याय आठ, यांतील ज्या वर्णनावरून तीं काढण्यांत आलीं आहेत, तेथील संदर्भ पाहतां तीं थोडीं अतिशयोक्तीचीं वाटतात. 'गोवध देव-ब्राह्मण–अवज्ञा। करिती त्यांतें करी शूळदंड।' असें दुष्यंताच्या धर्मप्रवण राज्यकारभाराचें वर्णन करतांना, मुक्तेश्वरापुढें शिवाजी महाराजांच्या कार-कीर्दीचा उषःकाल होता असें म्हणण्यापेक्षां, स्वकालीन मुसलमानी छळाचें उग्र स्वरूपच अधिक होतें असें म्हणणें सयुक्तिक व सुसंगत होय. विजापुरच्या अदिलशाही अंमलाखालीं दडपून जाऊन हैराण झालेल्या हिंदुप्रजेला आपली सुटका कधीं होईल अशी उत्कंठा वाटत असली, तरी गोब्राह्मणप्रतिपालक मराठा राजा आतां खात्रीनें होणार अशी दृढ श्रद्धेची भविष्यवाणी त्यांतून निष्पन्न होते असें वाटत नाहीं. तसेंच मुक्तेश्वरानें आपल्या रामायणाच्या युद्धकांडाच्या शेवटीं महाराष्ट्राचा—

'महाराष्ट्र जे सर्वराष्ट्रांसि राजे,।
जयाच्या भयें व्यापिले देव लाजे,।
सदाचारभंगें पळाली प्रतिष्ठा,
प्रतिष्ठान त्या नाभिकारीत निष्ठा ॥'

असा जो गौरवपूर्ण उल्लेख केला आहे, तो त्याच्या पूर्ववैभवाबद्दल असून, आपल्या कालीं महाराष्ट्रांत सदाचाराचा लोप होऊन देशाची प्रतिष्ठा कशी गेली होती याबद्दल खेदोद्गारच त्यानें काढले आहेत. अशा दुस्थितींत कै. पांगारकर म्हणतात त्याप्रमाणें गोदातीरीं पैठणास मुक्ते-श्वराला मराठा राजा असावा असें वाटत नसून, मुसलमानी अमलाखालीं सदाचारभ्रष्ट व प्रतिष्ठाच्युत झालेल्या महाराष्ट्राला आपल्या आजाच्या

---

१ पांगारकर–मुक्तेश्वर चरित्र व काव्यविवेचन–पृ. १२.

वसतीनें पावन झालेलें पैठण आश्वासन देऊन निष्ठेचा मार्ग दाखवील असा, आपल्या जन्मभूमीचा अभिमानच सांगावयाचा होता हें स्पष्ट दिसतें. सारांश मुक्तेश्वराच्या ग्रंथांत स्वराज्योन्मुख महाराष्ट्राचें चित्र नसून मुसलमानी सत्तेनें गांजलेल्या मनःस्थितीचेंच प्रतिबिंब पडलेलें आहे. मुक्तेश्वरी ग्रंथाची रचना शिवाजी महाराजांच्या जन्मापूर्वी अथवा ते अगदीं अल्पवयी असतां झाली असल्यामुळें, 'त्यांच्या चळवळी पैठणपर्यंत मुक्तेश्वराच्या काळीं पोंचल्या नव्हत्या,' हें कै. राजवाड्यांचें विधान खरें वाटतें. स्वतःसंबंधीं फारशी माहिती न देणाऱ्या, पण कालविपर्यासाचा दोष पत्करूनही स्वकालीन परिस्थितीचें प्रतिबिंब आपल्या काव्यांतून पाडणाऱ्या मुक्तेश्वरासारख्या कवीनें केलेले उल्लेख, अनुकूल अथवा प्रतिकूल अशा पूर्वग्रहापासून सर्वथा अलिप्त राहून निर्विकार मनानेंच पारखून घेतले पाहिजेत. मुक्तेश्वरानें भिंदीपाळ[1] इत्यादि शस्त्रांचे केलेले उल्लेख जसे त्याच्या एकनाथी वाङ्मयाच्या परिचयाचे निदर्शक आहेत, तसाच कर्णाटक-यंत्राचा[2] त्यानें केलेला उल्लेख मुलुखमैदानसारख्या तत्कालीन विजापुरच्या प्रचंड तोफांचा निदर्शक असणें शक्य आहे. यावरून मुक्तेश्वर एकनाथ-कालाला जसा जवळचा तसा शिवपराक्रमापूर्वीच्या सर्वत्र थैमान घालणाऱ्या मुसलमानी अंमलालाही अगदीं निकटचा असा भासतो.

वरील अंतर्बाह्य पुराव्यांच्या आधारें केलेल्या विवेचनानें मुक्तेश्वराच्या कालाची आदि व अंतिम मर्यादा बहुतेक ठरल्यासारखीच झाली असून, कोडितकर अत्रे यांच्या दप्तरांतील टिपणवहीवर व सरंजामे यांच्या जंत्रीवर विसंबून कै. भाव्यांनीं, आणि तंजावर येथील गोविंदबाळस्वामींच्या मठांतील कोणत्या तरी वहींतील नोंदीवर विश्वासून रा. दा. के. ओक यांनीं, मुक्तेश्वर रामदासापेक्षां एक वर्षानें लहान व समवयस्क असा जो गैरसमज प्रसृत केला आहे, त्याला बराच आळा बसेल अशी आशा आहे. तथापि महाराष्ट्रांतील अभ्यासक या वादांत कोणत्या बाजूनें आपला कौल देतात, यावरच हा प्रश्न अवलंबून असल्या-मुळें, त्यांच्याच चिकित्सक बुद्धीला आवाहन करणें युक्त होय.

---

१ वन. १५।१८७. २ वन. १५।१८७.

प्रस्तुत वनपर्वाची प्रत, 'काव्येतिहाससंग्रह' व 'काव्यसंग्रह' ३१, (१८९८) यांतून प्रसिद्ध झालेल्या मुक्तेश्वरी महाभारताच्या वनपर्वाच्या प्रतीवरून तयार केली आहे. वरील दोघांही 'संग्रहां'नी दिलेले सर्व पाठभेद या प्रतींत तळटीपांत दिले असून, अर्थाच्या दृष्टीनें सुगम व सयुक्तिक अशा पाठभेदांचा, वर मूळ प्रतींत स्वीकार केला आहे, हें या प्रतीचें वैशिष्ट्य मानावयास हरकत नाहीं. पाठभेदांची व कठिण स्थलांची चर्चा पुढें दिलेल्या टीपास्पष्टीकरणांत केली असून, एकंदर ग्रंथ अभ्यासकांना मार्गदर्शक व विचारोत्तेजक व्हावा इकडे लक्ष पुरविलें आहे.

मुक्तेश्वराचें वनपर्व पुष्कळ दिवस दुर्मिळ झालें होतें, म्हणून त्याची प्रथमावृत्ति, प्रस्तावना, टीपा व स्पष्टीकरणादि नवीन उपकरणांसह मीं १९४१ सालीं प्रसिद्ध केली. पण तीही संपून गेल्यामुळें ही द्वितीयावृत्ति काढण्याचा सुयोग लवकर प्राप्त झाला आहे. प्रस्तुत आवृत्तींतील टीपा–स्पष्टीकरणांत नवीन माहिती बरीच जोडली असून प्रस्तावनेंत मुक्तेश्वराच्या कालासंबंधीं नवीन उपस्थित झालेल्या मुद्द्यांस अनुसरून विस्तृत व निर्णायक चर्चा केली आहे. प्रथमावृत्तीप्रमाणेंच याही आवृत्तीचें स्वागत प्राचीन काव्याभ्यासक, ग्रंथालयें व शिक्षणसंस्था आपुलकीनें करतील व अशा संपादनकार्यांत मला प्रोत्साहन देतील अशी मला दृढ आशा आहे.

कोल्हापूर<br>
नागपंचमी<br>
ता. २।८।१९४६

दत्तात्रय सीताराम पंगु

# मुक्तेश्वरकृत महाभारत

# वनपर्व

ग्रं. क्र. ६६७०५ अनुक्रम विभाग

# अध्याय पहिला

ॐ नमो विश्वंभरा देवा । अभेदभावें तुझी सेवा ।
तूंचि विश्वा[१]सी जीवा । प्रतीति बाणे निर्धारें ॥ १ ॥
हरिहरसूर्यगणेशशक्ति । तूंचि एक बहुधा[२] व्यक्ति ।
जेथें धांवे मनोवृत्ति । तेथें तूं येकू ॥ २ ॥
महालक्ष्मी कुळस्वामिनी । भैरवदेव दंडपाणी ।
त्याचे चरण चिंतिता मनीं । सिद्धी होती वोळगण्या ॥ ३ ॥
मुक्तेश्वरें एकनाथु । यातें साष्टांग प्रणिपातु ।
गुरु[३]स्वरूप म्हणोनि हेतु । ग्रंथारंभीं वंदावा ॥ ४ ॥

### ग्रंथारंभ

आतां तृतीय पर्वींची कथा । जनमेजयें सादरें पुसतां । वैशंपायन विशेष वक्ता । प्रश्नापाठीं निरोपी. ॥ ५ ॥ 'माझे पितामह पांडव । सांडोनि राज्यसंपदा सर्व । वना गेलिया महानुभाव, । काय कैसें वर्तलें? ॥ ६ ॥ त्रयोदश वर्षें वनांतरीं । चर्मांबरजटाधारी । कंदमूळ-फळाहारी । काळ कैसा क्रमियेला? ॥ ७ ॥ सुकुमार वनितांची पुतळी । याज्ञसेनी गुणवेल्हाळी । अरण्यवासक्लेशानळीं । उरली कैशी! सांग पां.' ॥ ८ ॥ वैशंपायन म्हणे, 'राजा! । वना जातां धर्मराजा । तयामागें सकळ प्रजा । पाठोपाठीं चालिली. ॥ ९ ॥ येक पिटिती हृदयवदनें । म्हणती, 'तुजविण गेलों प्राणें । तूं जाशील तेथें नेणें । आमुतेंही दयाळा! ॥ १० ॥ तूं वससील जियें स्थळीं । तेथें वसूं कुटुंबमेळीं । या दुष्टाच्या हातातळीं । राहों न शकों सर्वथा.' ॥ ११ ॥

---

१ विश्वाचिया, २ व्यापक, ३ गुरुस्वामीं म्हणोनि हित.

आलिंगुनियां प्रजातें। धर्म शांतवी समस्तांतें। म्हणे, 'भीष्म[1] विदुर जेथें। तेथेंचि मीही जाण पां. ॥ १२ ॥ नेम साख्नि त्रयोदश वर्षीं। मी येतसें तुम्हांपाशीं। चिंता सांडूनि मानसीं। स्वस्थ सर्वीं असावें. ॥ १३ ॥ मजसंगती येतां तुम्हां। दुर्जन म्हणती चळले नेमा। प्रजा नेलिया नगरी आम्हां। भग्न भांडें ज्यापरी. ॥१४॥ आमचें कल्याण तुम्हां करणें। तरी येकाळीं नगरा जाणें, । वनवास क्रमूनि मज येणें। तुम्हांपाशीं सर्वथा.' ॥१५॥ यापरी शांतवूनी जना। परतविलें तिन्ही वर्णा। ब्राम्हण म्हणती, 'गेळिया प्राणा। तुज सांडोनी नव-जावें. ॥१६॥ वेदशास्त्रपुराणश्रवणें। हरिहरनामसंकीर्तनें। जपतप-क्रियाअनुष्ठानें। काळ कंठू तुजसंगीं. ॥१७॥ तुजसंगतीं संतोषचित्तें। आचरोनी तपश्चर्येंतें[2]। तुझें राज्य साधे तूतें। ऐसें करूं निर्धारें ॥१८॥ तुजसंगीं महाराजया ! । आचरोनी तपश्चर्या। तूं पावसी निजऐश्वर्या। हेंचि करूं तात्काळीं ॥१९॥ नाश होय शत्रूच्या कुळा। युद्धीं जयश्री घाली माळा। ऐसी आचरों तपःकळा। तरी ब्राम्हण तुझे पैं[3] ॥२०॥ तपें दुष्टकर्माचें दहन। भजनें हरिहर सुप्रसन्न। शांती, ऐसें आराधन। तुजलागोंनी आराधों.' ॥ २१ ॥ धर्म म्हणे, 'यथार्थ स्वामी ! । होणार तैसें वदतसां तुम्ही। परंतु माझ्या अंतर्यामीं। चिंता वर्ते अपार. ॥२२॥ खडतर क्षुधेच्या हुताशीं। पीडा पावाल अरण्यवासीं। तेव्हां आम्हीं दारिद्र पुरुषीं। दुःखें प्राण त्यजावे. ॥ २३ ॥ दीप रक्षिजे निर्वातीं। तेंवि तुम्हातें पाळिजे भक्ती। अरण्यवासप्रळयावर्तीं। प्राणकाळिका मावळेल. ॥ २४ ॥ वेढोनिया वल्कलांबरें। विभूति लेपूनि शरीरें। आम्हीं जातसो साचारें। दृष्टीस तुम्ही देखतसां.' ॥ २५ ॥

१ भीष्म द्रोण विदुर. २ महातपश्चर्येंते. ३ जाण.

ब्राम्हण बोलती धर्मातें, । ' उदरभरण न घालूं तूतें । कंदमूळफळजळातें । [1]अंगें कष्टें मेळवूं. ॥ २६ ॥ दरिद्र भोगूं सत्संगतीं । हे हरिहरइंद्राची संपत्ती । कुसंगीं ऐश्वर्यप्राप्ति तोचि नरक निर्धारें. ॥ २७ ॥ विष्णुस्मरणें लोटलिया घडी । चारी पुरुषार्थ जोडती जोडी । सत्संगाची अगाध गोडी । मोक्षपदीं असेना. ॥ २८ ॥ आमची भरणपोषणचिंता । तुवां न करावी कृपावंता ! । अनंत सृष्टींचा पाळिता । तो रक्षील सर्वांतें. ' ॥ २९॥ भीडा न बोलवे वाणी । धर्में मस्तक ठेविला चरणीं, । म्हणे, ' अवश्य येईजे वनीं । रक्षावया दीनांतें. ' ॥३०॥ कान्यकुब्ज तैल[2]भुक्त । कामरूपी उत्कल बहुत । पंचगौड असंख्यात । ब्राह्मण संगीं चालले. ॥३१॥ गुर्जर महाराष्ट्र कर्नाटक । आंध्र चौल मल्याळ देख । पंचद्राविडी अनेक । धर्मासंगीं चालिले. ॥ ३२ । प्रथम दिवशीं चालतां पंथीं । गगनीं वोळावितू गभस्ती । जा[3]ह्नवीतीरीं केली वस्ती । पवित्रस्थळीं पवित्रीं. ॥३३॥ प्रमाणाढ्य वटस्थळीं । गंगोदकप्राशनें सकळीं । निशा क्रमितां अंशुमाळी । उदया आला सांभाळूं. ॥३४॥ सारूनियां प्रातःकर्म । पुढां चालिला राजा धर्म । अरण्यपंथीं नानाद्रुम । चरण पुष्पीं पूजिती. ॥ ३५॥ द्रौ[4]पदी ब्राह्मणांचे क्लेश । दृष्टीदेखतां बहुवस । कोमळ धर्माचें मानस । शोकानळें दग्धलें. ॥ ३६ ॥ नेत्र झांकूनी उभय करीं । मूर्च्छित पडला धरणीवरी । अकस्मात तये अवसरीं । शौनक मुनी पातला. ॥ ३७ ॥ सावध करूनि धर्मातें । नेत्र प्रमार्जिलें हातें ।

१ आंगकष्टें. २ तैलंगमुक्त. ३ जान्हवीतीरा. ४ द्रुपदी.

म्हणे, 'संसारदुःखार्णवातें[1]। आजी कळलें शहाणिया[2]. ॥ ३८ ॥
शोकभयाचे आघात । क्षणक्षणां होती प्राप्त । मूर्ख होती व्याकुळ-
चित्त । ज्ञानी[3] पंडित भ्रमेना. ॥ ३९ ॥ मनीं कल्पिसी लोभास
राया ! । ज्ञानें पहातां सर्वही माया । अवलंबूनि विचारधैर्या । खेद
सांडी मानसा. ॥ ४० ॥ आपत्काळ देखोनि पुढें । ज्ञानिया अंगीं
वीरश्री चढे । कोटी दुःखाचे दळवाडे । विवेकलता विभांडी. ॥ ४१ ॥
ज्ञानें[4] नासे संसारभ्रम । विष्णुस्मरणें पातकें भस्म । कळिकाळ[5] अतिदु-
र्गम । धैर्यबळें लोटावा. ॥ ४२ ॥ तपें जोडीं[6] इच्छिलें फळ । ऐसे
बोलती शास्त्रकुशळ । आतां तुवा चंचळ । चित्त, निश्चळ रक्षावें
॥ ४३ ॥ तपोधनातें सिद्ध पुरुष । सिद्धी करूनी[7] देती वश । तेणें
बळें नाना क्लेश । तृणप्राय नासती.' ॥ ४४ ॥ धौम्य म्हणे,
'विचार सुमती । आराधूनियां गभस्ती । मागां आपत्काळ बहुतीं ।
कीर्तिवंतीं क्रमियेला. ॥ ४५ ॥ चतुराननें निर्मिल्या प्रजा । त्या क्षुधें
पीडितां महाराजा ! । सूर्य प्रतिपाळीं वोजा । पिता जैसा पुत्रातें. ॥४६॥
रस शोषी उत्तरायणीं । जळ मोकळी दक्षिणायणीं । औषधी पोषी
चंद्र किरणीं । हेंही सामर्थ्य सूर्याचें. ॥ ४७ ॥ म्हणोनी विश्वासी
प्रतिपाळिता । सूर्यची जाणा[8] तत्वता । सूर्यापरता अन्नदाता । दुजा नाहीं
त्रैलोक्यीं. ॥ ४८ ॥ सूर्यकिरणें[9] होती घन । घनवृष्टीपासाव अन्न ।
अन्नापासुनी प्रजा जाण । वेदप्रमाण निर्धारें. ॥ ४९ ॥ सूर्यची
ब्रम्ह सूर्यची आत्मा । सूर्य नाशी अज्ञानतमा । विष्णु शंकर देव
ब्रम्हा । सूर्यरूपें जाणावीं. ॥ ५० ॥ यालागीं भानुमय अन्न ।

---

१ दुःखार्णव हे तूतें. २ राया. ३ ज्ञानें पंडित भ्रमे ना. ४ ज्ञान नासी संसारभ्रम. ५ अष्टकाळ. ६ जेडिल. ७ देवता. ८ जाणावा. ९ जाणावें.

प्राणियातें[1] प्राणधारण । करितां सूर्यआराधन । पूर्ण काम तुझे होती. ॥ ५१ ॥ कार्तवीर्य वैन्य नाहुष । आपत्काळीं पावती क्लेश । आराधूनी देव दिनेश । विश्वलोक पाळिला. ॥ ५२ ॥ तैसेची तुवा धरूनि जीवीं । तपीं प्रसन्न करावा रवी । ब्राह्मण पोषणाची गोवी । तो फेडील[2] तात्काळ. ' ॥ ५३ ॥ गंगाजळीं राहोनि धर्में । शुचि-ष्मंत नित्य नेमें । धौम्यें उपदेशिलीं नामें । अष्टोत्तरशतें[3] सूर्याचीं. ॥ ५४ ॥ ब्रह्मयानें उपदेशिलीं शक्रातें । शक्रें कथिलीं नारदातें । नारदें दिधलीं धौम्यातें । तेणें धर्मातें उपदेशिलीं. ॥ ५५ ॥ बारा श्लोकीं अति उत्तमें । अष्टोत्तरशतें[4] सूर्यनामें । धर्मा उपदेशिलीं धौम्यें । सिद्धिप्रदें तात्काळ. ॥ ५६ ॥ स्मरण करितां एकचित्त । कृपेनें कळवळिला दीननाथ[5] । म्हणे, 'कौंतेय माझा सुत । क्लेशातीत करावा.' ॥ ५७ ॥ पुढती धर्में करितां स्तवन । सूर्य पातला न लगतां क्षण । तेजें कोंदलें मही गगन । सुप्रसन्न बोलतु. ॥ ५८ ॥ 'जें जें इच्छील तुझें मन । तें तें पावसी फळ पूर्ण[6] । प्रसाद देतसे स्वल्पान्न । चतुर्विध सुस्वाद. ॥ ५९ ॥ वाढितां पावेल हे वृद्धीतें । तेणें ब्राह्मण सहस्रशतें । प्रतिपाळुनी कष्टकाळातें । अरण्यवास क्रमावा. ॥ ६० ॥ लोटलिया तेरा वर्षें । शत्रू नाशती अनायासें । स्वराज्य पावसी संतोषें । सागरान्त पृथ्वीचें.' ॥ ६१ ॥ बोल[7] बोलती सर्वत्र । सूर्यें दीधलें थालीपात्र । परी तें व्यासाचें वक्त्र । वदलें नाहीं भारतीं. ॥ ६२ ॥ असो, ऐसा देऊनि वरु । स्वस्थळा गेला सहस्रकरु । उदकाबाहेर युधिष्ठिरु । सुखसंतोषें निघाला. ॥ ६३ ॥ नमस्कारिलें धौम्यचरणा । आलिंगिलें चौघाचणां । भीमा, पार्था

१ प्राणियांचें. २ फेडी. ३ शत. ४ शत. ५ कृष्णनाथ. ६ संपूर्ण. ७ लोक.

आणि नंदना । माद्रिचिया आवडी. ॥ ६४ ॥ फिटला चिंतेचा विटाळु । हरुषें निर्भर कुरुनृपाळु । सूर्यप्रसादें ब्राह्मणकुळु । पाळिता झाला काननीं. ॥६५॥ तृप्त[1] झालिया असंख्य द्विज । यानंतरें चौघे अनुज । पाठीं आपण धर्मराज । त्यानंतर द्रौपदी. ॥ ६६ ॥ भोजनीं तोषर्ता ब्राह्मण । नित्य नित्य पुराणश्रवण । सकळसहित कुरुनंदन । काम्यकवना पातला. ॥ ६७ ॥ * जान्हवीतीरींचे[2] ब्राह्मण । कुरुक्षेत्रींचे तपोधन । यमुनातीरींचे वेदज्ञ । सरस्वतीतीरनिवासी. ॥६८॥ शरयू-तीरनिवासी । अग्निहोत्री सामग्रीसी । येते झाले त्या वनासी । धर्मा-संगी बसवाया. ॥ ६९ ॥ येरीकडे हस्तनापुरीं । धृतराष्ट्र चिंतेच्या सागरीं । पडलो[3], तये अवसरीं । 'काढी' म्हणे विदुरातें. ॥ ७० ॥ 'हृदयकुंडीं वडवानळ । प्रदीप्त करूनी कुंतीबाळ । वना गेले ते स्नेहाळ । केंवि होती आमुतें. ॥ ७१ ॥ याचेनि दुःखें प्रजालोक । आहोरात्री करिती शोक । शापशद्बाचा पावक । कौरववनासी लाविती. ॥ ७२ ॥ प्रजा भजति स्नेहभावें । पांडव विषाद सांडिती जिवें । ऐसा उपाव विदुरा ! दैवें । सांगितला पाहिजे.' ॥ ७३ ॥ विदुर म्हणे पुढतो पुढती, । 'तेचि तें तुज सांगिजे किती ? । हित-विचारु तुझ्या चित्तीं । संचरेना सर्वथा. ॥ ७४ ॥ अझूनी तरी विवेक सुमती । पश्चात्ताप धरूनी चित्तीं । आप्त धाडूनि वना-प्रती । शीघ्र पांडव पाचारीं. ॥ ७५ ॥ कुमर धरोनियां करीं[4] । घालीं धर्माच्या चरणावरी । पल्लव पसरोनी करुणोत्तरीं । क्षमा करावी मागिल[5]. ॥ ७६ ॥ दुर्योधन आणि दुःशासन । शकुनि आणि

---

१ तृप्ती. * ही ओवी काव्येतिहाससंग्रहप्रतींत नाहीं. २ शरद्वतीतीर. ३ पडोनी बुडे. ४ करी. ५ मागिल्या.

चवथा कर्ण । धर्माहस्तीं वोंपूनी प्राण । दान मागें तयातें. ॥ ७७ ॥ मस्तक घालुनी भीमाउदरीं । दुःशासन निवेदी करीं । दुर्योधनाचे शिरीं । हस्त स्थापीं धर्माचे. ॥ ७८ ॥ अर्जुनाचीं चरणकमळें स्पर्शावीं कर्णाच्या कपाळें । सहदेवाच्या क्रोधविद्याळें । शकुनिसीं शुभ लक्षिजे. ॥ ७९ ॥ तो वाचवीं त्याचे हातीं । ऐसी दाखवीं स्नेह भक्ति । आलिंगुनी अश्रुपातीं । मस्तक [१]शिंचीं धर्माचा. ॥ ८० ॥ ऐसी वडिलपणाची बुद्धी । आचरोनी विवेक विधी । येणे कल्याण येऱ्हवीं अवधी । आली जाण तव पुत्रा. ॥ ८१ ॥ या परि वर्तता स्नेहभावें । तरीच चुकतीं मृत्युकवे । हा सुविचारु तुझेनि जीवें । आतांचि धरिला पाहिजे. ॥ ८२ ॥ जरी नायकती दुर्जन । तरी भीष्म कृपाचार्य द्रोण । प्रेरूनियां चौघेजण । निग्रहुनी रक्षावे. ॥ ८३ ॥ गारुडी सर्प घाली बंदीं । व्याघ्रसमुदाय बां[२]धिजे व्याधीं । तैसे सर्वही दुर्बुद्धी । तुवां बुद्धिवंतें रक्षावे. ॥ ८४ ॥ काळजीं उदेला जो व्रण । तो स्वहस्तें छेदीं शस्त्रेंकरून । तेवि सस्नेह करूनि प्राण । दुष्ट-दंडण करावें. ॥ ८५ ॥ हनन रक्षण अथवा त्यागु । त्यातें स्वीकारीं येक मार्गु । तरिच खंडेल चिंतारोगु । येऱ्हवीं अनर्थ रोकडा. ॥ ८६ ॥ कुळासहित विश्वजना । उद्धरावें ऐसें इच्छी मना । तऱ्हीं हे त्यागिल्या संपूर्णा[३] । यश संतोष पावशी. ॥ ८७ ॥ युवराज्य वोपूनि धर्मराजा । इतुकेन कल्याण तवात्मजा । एकभावें तुज प्रजा । सकल भजतील निर्धारें.' ॥ ८८ ॥ ऐकोनि विदुराचें उत्तर । क्रोधें धडकला राजेश्वर । बिभीषणवाक्यें दशशीर । रामा-यणीं ज्या परी. ॥ ८९ ॥ ' पांडुपुत्र धर्मराज । त्यातें दे म्हणशी

---

१ शिरीं धर्माचा २ वधिजे ३ संपूर्ण.

स्वराज्य । माझे वीर्यज ममात्मज । त्यातें त्यागूं सांगशी ! ॥ ९० ॥ ब्रह्मनिष्ठांचीं लक्षणें । तुझ्या ठायीं ज्ञान चिन्हें । बुद्धि बोधिली समदर्शनें । शत्रु मित्र तुज नाहीं. ॥ ९१ ॥ जेव्हां विचार पुसावा तुतें । तेव्हां स्तविशी पांडवांतें । सदा निंदिशी मम पुत्रांतें । अभेदता या नांव ? ॥ ९२ ॥ राज्य हातां आलें तुतें । विश्व शून्य वाटे मातें । अखंड तुझिया वचनामृतें । प्राण हा गांजित. ॥ ९३ ॥ राज्य हारविलें पणीं । आपण गुंतले आपुल्या वचनीं । तूं छळितोशी क्षणक्षणीं । हा विवेक कोणता ? ॥ ९४ ॥ दुःखविभागी होशी भ्राता । विचार पुसणें हे मूर्खता । आतां द्विधा न करीं चित्ता । पांडवांप्रति जाइजे. ॥ ९५ ॥ यासी विलंब न करीं क्षणु' । 'अवश्य' म्हणे क्षत्ता प्राज्ञु । नमस्कारूनी ज्येष्ठचरणु । निघता झाला तात्काळीं. ॥ ९६ ॥ रथेशीं आला काम्यकवना । श्रवण जालें कुरुभूषणा । हांसोनि बोले भीम अर्जुना । 'विदुर आला किमर्थ ? ॥ ९७ ॥ पुढती द्यूता बोलाविलें, । कीं पश्चात्तापें चित्त द्रवलें । कीं हरिलें राज्य देवविलें । भीष्मद्रोणें विचारें.' ॥ ९८ ॥ विदुर पातला दर्शना । पांचही जणीं वंदिले चरणा । स्नेहें देऊनी आलिंगना[1] । एकासनीं बैसले. ॥ ९९ ॥ विदुर म्हणे 'गुणैकराशी ! । विचार पुसतां तुमचे विशीं । सुबुद्धि बोलिलों कळली तैशी । हितकारिणी सर्वांतें. ॥ १०० ॥ परि ते नातळे हृदयीं । तें विस्तारें सांगणें काई ? । मातें त्यागूनियां जाई । पांडवांप्रति आनंदे.' ॥ १०१ ॥ या लागीं त्यागुनी भ्रातृजां अधमा । तुजप्रती पातलों देवद्रुमा । दर्शनें पावलों विश्रामा, । सर्व श्रमा विसरलों.' ॥ १०२ ॥

---

१ परिरंभना.

धर्म म्हणे, ' बहुत बरवें । इच्छिलें तैसें घडविलें दैवें, । स्नेहदृष्टी सांभाळावें । बाळकांतें काननीं. ' ॥ १०३ ॥ हस्तिनापुरीं अंबिकासुत । पश्चात्तापें अति संतप्त । विदुरवियोगें अद्भुत[1] । खेद मानी मानसीं. ॥ १०४ ॥ ' बाह्य अक्षम चक्षुहीन । बुद्धि आंधळी विदुराविण । [2]देहीं न धरे माझा प्राण । अंध झालों सबाह्य. ॥ १०५ ॥ म्हणे, संजया ! विदुराविण । देहीं न धरे माझा प्राण । तुवां करुनियां गमन । पाचारूनी आणावा. ' ॥ १०६ ॥ संजय मानुनी राजाज्ञा । सवेग पातला काम्यकवना । भेटोनियां पांचांजणा । निरोप सांगे विदुरातें. ॥ १०७ ॥ म्हणे, ' विदुरा ! सवेग उठीं । रायें प्राण धरिला कंठीं । तुज न देखतां दृष्टी । देह त्यागील तात्काळ.' ॥१०८॥ धर्म म्हणे, ' जाई शीघ्र । विलोकीं अग्रजाचे अंघ्र । विदुर चालिला दिसे[3] व्यग्र । धर्माचेनी वियोगें. ॥ १०९ ॥ सवेग पातला गजाह्वया[4] । नमस्कारिलें पूर्वजपायां । हृदय मेळवूनी हृदया । प्रज्ञाचक्षू आलिंगी. ॥ ११० ॥ ' विदुरा ! न देखतां तुतें । विश्व शून्य वाटे मातें । अखंड तुझिया वचनामृतें । प्राण हा संतोषें. ' ॥ १११ ॥ विदुर पातला देखोनी । दुर्योधन कर्ण शकुनी । दुःशासन हीं मिळोनी । गूढ विचार मांडिला. ॥ ११२ ॥ ' पांडव अरण्यवासा गेले । परी शल्य नाहीं खंडलें । पुच्छ छेदूनी[5] सोडिलें । सर्पमुख ज्यापरी. ॥ ११३ ॥ आतां एकचि बुद्धि ऐशी । आम्हीं जाऊनी दळभारेशीं । पांडव एकटे वनवासीं । रात्रीं मारूनी सांडावे. ॥११४॥ दुरी यादव पांचाळ । आला नाहीं जंव गोपाळ । पांडव आहेत जंव निर्बळ । तंव

१ अति अद्भुत. २ आतां मातें वागविजे कोण ? ३ परि. ४ गजसाह्वया. ५ धरुनी.

मारूनी सांडावे. ॥११५॥ न कळतां भीष्मद्रोणा । नेणतां धृतराष्ट्राच्या मना । करावें पांडवांच्या हनना । पुढां प्रकट होतसे.' ॥११६॥ विचार करितां चौघेजणीं । व्यासदेवें जाणोनी मनीं । गगनामार्गें सभास्थानीं । अकस्मात उतरला. ॥११७॥ व्यास म्हणे, गा! सपुत्रा! । असावधानें दोषपात्रा । स्वपुत्रांच्या कपटमंत्रा । न विचारिशी मूर्खत्वें. ॥ ११८ ॥ राज्य हिरोनी दवडिलें वना । मागुती ते चालिले त्यांच्या हनना । तयां दुर्बुद्धी दुर्जना । निषेध कैसा न करिशी?' ॥११९॥ धृतराष्ट्र म्हणे, 'व्यासराया! । स्पर्श करीतसें तुझिया पायां । जरी पुत्रांची कपटमाया । जाणें अथवा मी प्रेरीं. ॥ १२० ॥ हे प्रवर्तले पांडववधीं । वना जातील दुर्बुद्धी । तरी मी प्राण त्यजीन आधीं । हे त्रिशुद्धी[1] जाण पां. ॥ १२१ ॥ ऐकोनी पुत्र पावले शंका । सोडिला हननाचा आवांका, । व्यास म्हणे, 'नरनायका! । प्रज्ञाचक्षू! अवधारी. ॥ १२२ ॥ चतुराननें निर्मिली क्षिती । चारी खाणी वर्ततां भूतीं । कामधेनु शक्राप्रती । जाऊनी करी शोकातें. ॥१२३॥ 'माझे पुत्र वृषभ सकळ । कष्ट भोगिती सर्वकाळ । दुःख देखोनी, तळमळ । मज अपार वाटतसे. ॥१२४॥ नांगर शकट रथ गोणिया । धान्यमळणी तेलघाणिया । पाठी बहुभार वाहोनिया । अहोरात्र शिणती. ॥१२५॥ दगड, माती, काष्टभार । सदां[2] मारिती निष्ठुर । गाळीप्रदानें अपार । कष्ट करितां वोपिती. ॥१२६॥ शीत उष्ण पर्जन्य वात । निराश्रयें सर्व साहत । भुंके[3] तृणोदक नेदित । उपेक्षिती निर्दय. ॥ १२७ ॥ वत्सें बंधनीं तळमळतीं । भुकेल्या आक्रोशें बोभाती । धेनुकासेहूनी ओढितीं । पय प्राशितां मातेचें. ॥ १२८ ॥ मेल्या वोपिती अना-

१ सत्य. २ प्रतोद. ३ भुकेल्या.

मिका । त्वचेच्या करिती दोर पादुका । ऐसें कर्म सुरनायका ! । किमर्थ त्यांतें निर्मिलें. ॥ १२९ ॥ शक्तिनें खांदीं पाठीवरुतें । वोढुनी नेती बहु भारातें । आक्रोशें पावती कष्टातें । तें दुःख मातें अपार. ॥ १३० ॥ ऐसे नानापरीचे क्लेश । पुत्र भोगिती बहुवस[1] । ऐकोनी इंद्र करी हास्य । म्हणे, ' परिस पवित्रे ! ॥ १३१ ॥ तुझे पुत्र असंख्यात । सुखी बहुत दुःखी बहुत । स्वल्प पुत्रांलागीं चित्त । व्याकुळ करणें कासया ? ॥ १३२ ॥ दीन दुर्बळ त्यागूनि सृष्टी । सुखिये सभाग्य पाहूनि दृष्टी । तुवां असावे सुख संतुष्टीं । खेद पोटीं न मानावा. ' ॥ १३३ ॥ येरीं म्हणे, ' जी निर्धारीं । समान स्नेह सकळांवरी । मातृस्नेहाभीतरी । भेदभाव असेना. ॥ १३४ ॥ त्यामाजीं सात्विकें भाग्यहीनें । जें जें दुःख भोगिती दारुणें[3] । त्यालागीं मातेचेनि मनें । खेद अपार पाविजे. ॥ १३५ ॥ स्वेच्छ भक्षुनी मातले क्षितीं । काममदें बोकाळतीं । दुर्बळ देखोनी बडविती[5] । फुंपाटती[6] परद्वेषें. ॥ १३६ ॥ तयां वेदाज्ञा वेसणी । विहिताचार दावणी । बांधोनी दंडावे हे वाणी । ब्रह्मयाची जाण पां. ॥ १३७ ॥ दीनें[4] दुर्बळें अशक्तें । तऱ्ही पाविजे दुःखातें । परम खेद वाटे मातें । जाण निश्चितें सुरेशा ! ॥ १३८ ॥ तोषोनि बोले अमरपाळ । ' करिती वृषभाचा सांभाळ । तयासी सुखाचा सुकाळ । मी चिर-काळ भोगवीं. ॥ १३९ ॥ पुत्रातुल्य पशूंतें पाळीं । त्यालागी मेघ इच्छिलें काळीं । पाडूनि पिकवी महीतळीं । तृण धान्य सर्वदां. ॥ १४० ॥ करिती वृषभांचें पीडण । त्यांवरी पाडूनी अवर्षण ।

१ ऐसे श्रम. २ अशक्त ते. ३ अशक्तें. ४ दीनें. ५ पीडिती; पीटिती. ६ कीं पाटिती परशब्दें.

शेतीं न पिकें तृण धान्य । नासे प्राण दुर्भिक्षीं. ॥ १४१ ॥ स्वचक्र परचक्र टोळ मूषक । चिकट तांबरा आळिक ॥ दुग्धश्रवादि अनेक । रोग उठती धान्यातें. ॥ १४२ ॥ कष्ट घेऊनी सदाकाळ । न करिती वृषभाचा सांभाळ । त्या दोषाचें हें फळ । मी भोगवीं तयांतें ॥ १४३ ॥ वत्सा अभ्यास नाहीं तृणीं । क्षुधित ओढिती कासे-हुनि । तेणें दोषें मी क्षोभोनी । क्षय करी वंशांचा. ॥ १४४ ॥ धेनु म्हणे, ' स्वामी एक । सकळा देई सारखें सुख ' । संतोषोनी सुरनायक । शांतविले वरदहस्तें. ॥ १४५ ॥ याळागीं धृतराष्ट्रा ! पवित्रा ! । अवलोकुनी स्नेहसूत्रा । स्वपुत्रासमान पांडुपुत्रां । करीं बहुसाल वाटते. ॥ १४६ ॥ पवित्र प्रसंन्न सर्वगुणी । दीनप्राय कष्टती वनीं । हें देखोनी तुझ्या मनीं । खेद कैसा उपजेना ? ॥ १४७ ॥ नगरस्वामी वसती वनीं । नाथ ते अनाथ दिसती रानीं । श्रीमंत भणंगप्राय धरणी । लोळती हें अनुचित. ॥ १४८ ॥ तुज देखतां तुझे कुमर । अरण्यवासी वनीं पामर । अति पाप हे अपार । उभय लोकीं मज वाटे. ॥ १४९ ॥ लक्ष्मिवंताहूनि विशेष । दीना सांभाळीं जगदीश । म्हणोनी ' अनाथबंधु ' हा घोष । भुवनत्रयीं न समाय. ॥ १५० ॥ धृतराष्ट्रा ! पांडूहूनी बहुत । विदुरीं आकळे माझे चित्त । दीन सात्विक विष्णुभक्त परम साधु म्हणोनी. ॥ १५१ ॥ तैशीच त्वांही करावी करणी । स्वपुत्रांहूनी सहस्रगुणी । पांडव साधु हें जाणोनी । स्नेह विशेष करावा. ॥ १५२ ॥ शत पुत्रांची जैशी माया । विशेष पांडवीं धरावी राया ! । विदुर स्नेहाळ दीन हृदया । दीन वदना जाणावे. ॥१५३॥ कैसे कंठती वनवासातें ।

---

१ अशन. २ वैश्यांचा. ३ संपन्न.

केंवी पावती अभिवृद्धीतें । अहोरात्र ऐशी चित्तें । चिंता पाळीं अपार. ॥१५४॥ स्वपुत्र वांचवावे चिरकाळ । संपदा असावी अढळ । तरी वना जाऊनी तात्काळ । पांडव नगरा आणावे ॥ १५५ ॥ ऐश्वर्यपदीं आपुले सुत । अक्षयी असावे जीवें जीत । ऐसे इच्छिशी तरी त्वरित । पवित्र पांडव बुझावी . ॥१५६॥ दुर्योधनें जाउनी वनीं । सुहृद गौरवावे वचनीं । मानें आणूनी राजासनीं । बैसवावे स्वहस्तें. ॥ १५७ ॥ हें न करतां नरेश्वरा ! । कुळक्षयो पातला घरा । पुढतो पुढती हेचि चतुरा ! । काय किती सांगावे ? ' ॥१५८॥ धृतराष्ट्र ह्मणे , ' द्वैपायना ! । मस्तक वाहतसें तुझिया चरणा । ह्याचि उपदेश दुर्योधना । आपुल्या मुखें त्वां कीजे. ' ॥१५९॥ व्यास ह्मणे, ' मी जातसें । मैत्रेय येईल सावकाशे । तो सांगेल तें मानसें । सर्वीं तुह्मीं धरावे. ' ॥ १६० ॥ अदृश्य होता व्यासमुनी । मैत्रेय आला तेंचि क्षणीं । नमस्कारिला सभास्थानीं । भीष्मद्रोणें धृतराष्ट्रें. ॥ १६१ ॥ आतां मैत्रेय वदेल वचनें । तीं न मानितां दुर्योधनें । ऋषिशापोक्तिपाषाणें । हृदयमर्मीं ताडिला. ॥१६२॥ तेंचि भाविकीं परिसावें । जें बोलिले व्यासदेवें । तेंचि महाराष्ट्रवैभवें । अर्थ मिरवे सारिखा. ॥ १६३ ॥ इति अरण्यपर्व भारत । लीलाविश्वंभरानुग्रहीत । मुक्तेश्वराचा वचनार्थ । पवित्रप्राय परिसोत. ॥१६४॥

---

## अध्याय दुसरा

कौरवनरेंद्र आदरें म्हणे, । ' पवित्र तीर्थें पुण्यारण्यें । अवलोकुनी येथें येणें । कृपेनें जाले[1] स्वामिया ! ' ॥१॥ मैत्रेय म्हणे धृतराष्ट्रातें, ।

१ केलें.

'अवलोकुनी बहुत तीर्थे । काम्यकवना पातलो ; तेथें । पांडय दृष्टीं देखिलें. ॥ २ ॥ [1]जटा वल्कलें अजिनांबरी । शीतोष्णपीडा फळहारी । कष्टतां देखोनि अंतरीं । खेद अद्भुत उदेला. ॥ ३ ॥ तुझिया पुत्रांचा अविवेक । ऐकोनि वाटलें परम दुःख । तिहीं लोकांमाजीं एक । बरवें कोणी न म्हणती. ॥ ४ ॥ पुरुषें तंव जगावें जगीं । जंव अपकीर्ति न शिवे अंगीं । अपयशवंत तो कुमार्गी । जितची प्रेतासमान. ॥ ५ ॥ बरवे न करितां न पवे बरवे । अधर्म केल्यानें कैंवी पावे ? । विष भक्षुनी अमर व्हावें । हें अघटित ज्या परी. ॥६॥ तूं आणि [2]पितामहो । वर्तमान असतां पाहा हो ! । पुत्रीं करावया कलहो । कारण कांहीं असेना. ॥ ७ ॥ भीड सोडुनी न बोले वचनीं । तरी भीष्म अपजयो पावेल रणीं । पुत्रशोकाचा वडवाग्नी । तुज ग्रासील निर्धारें.' ॥ ८ ॥ [3]तेवींच म्हणे, दुर्योधना ! । चित्त द्यावें माझिया वचना । स्वल्पासाठीं महाप्राज्ञा ! । पाप अद्भुत जोडिलें. ॥ ९ ॥ नश्वर राज्य जोडिलें वेगीं । परि अपकीर्ति जोडिली युगानुयुगीं । कुबुद्धि विषयकुसंगीं । कवण्या दृष्टी गोंविली ॥ १० ॥ यावरी विरोध व्याधि विषम । सांगिया संगीं व्यापला परम । झडलें भूलतेचे रोम । सारासार विचारीं. ॥ ११ ॥ गेलें प्रतिष्ठेचें घ्राण । उभय लोकीं न दाखवीं वदन । कुश्चित दुर्गुणांचें दर्शन । उघड दिसती जनदृष्टीं. ॥ १२ ॥ यास औषध देतसे एक । करावें पांडवाशीं सख्य । तेणें आरोग्य तात्काळिक । हें निश्चयें जाण पां ॥१३॥ जें वर्तलें नाहीं सृष्टी । ऐसे ऐको तुझी रहाटी । मी साक्षेप पावलो भेटी । याचि लागीं या ठाया. ॥ १४ ॥ बुद्धिभ्रंश

१ तरु. २ भीष्म पितामहो. ३ तैसा.

झाला तुम्हां । कोण्या कर्मे पाडिलें भ्रमा ? । मरे मरे सौबळा ! अधमा ! । महा अनर्थी गोंविलें. ॥ १५ ॥ रक्षुनियां तुझे चित्त । गोड बोलोनी[2] होशी आप्त। तेवीं वैरी तुझा घात। करावया उदेले. ॥१६॥ ओखद कडवट लागे जाण । परी तें अमृतापरी वांचवी प्राण । माझें हितोपदेशवचन । निष्ठुर नव्हे जाण पां. ॥१७॥ न करी बळत्र-तांशीं स्पर्धा । सांडी अविचार आग्रहो क्रोधा । देई धर्माची संपदा । जे अन्यायें हरितली. ॥१८॥ नागायुत बळसंपन्न । परम योद्धा भीमसेन । धनुर्धरांमाजी अर्जुन । जामदग्न्यासारिखा ॥ १९ ॥ असंख्य ऋषिगणांचा मेळू । पातळा धर्मातें सांभाळू । त्यातें कृपेनें कुंतीबाळू । प्रतिपाळिती काननीं ॥२०॥ बलिष्ठ, आप्त, परम साधु । त्यांशी करिशी व्यर्थ विरोधु । मरोनी जोडावा कुशब्दु । अपयशाचा त्रिजगीं. ॥२१॥ आतां निर्वैर निज-मानसीं । सख्यत्व करावें सुहृदाशीं । त्यांचा विभाग देउनी त्यांसी । सुखसंतोषें असावें. ॥२२॥ ऐसें न करितां भूपाळा ! । क्षयो पातळा जाण कुळा । अन्यथा असे तरि रविमंडळा । पतन हो कां भूमंडळीं. ॥ २३ ॥ बाहुयुद्धीं जरासंध । भीमें मारिला वीर प्रसिद्ध । हिडिंबबकासुरांचा वध । केला हें जाणतसां. ॥२४॥ प्रस्तुत किर्मीर महादैत्यु । भीमहस्तें पावल[1] मृत्यु । त्याशीं वैर करितां मृत्यु । बंधुसहित पावशीं ' ॥२५॥ ऐकोनी मैत्रेयाच्या वचना । क्रोध नावरे दुर्योधना, । आरक्तता पातली नयना । खदि-रांगार ज्यापरी. ॥२६॥ मुखें[3] सोडीं दीर्घ हुंकार । जेंवी फूत्कारे[4] महाविखार । गजशुंडाकार कर । तेणें जानु ताडिली ॥२७॥ पादां-

१ परम. २ बोलती होती. ३ दुःखें. ४ धुधुःकारें.

गुष्टें रेखित धरणी । सरोष मौन्यें अधोवदनीं । हें देखोनी मैत्रेय-मुनी । प्रळयानळ क्षोभला. ॥ २८ ॥ म्हणे, 'दुर्जना ! पापरूपा ! हित सांगता आलाशि कोपा । आतां घेईं माझ्या शापा । भस्म होशी स्वकुळेशीं. ॥२९॥ हेचि मांडी गदाप्रहारीं । चूर्ण होईल, रणचत्वरीं । पादलत्ता बसतील शिरीं । वज्रप्राय भीमाच्या. ॥ ३० ॥ माझें अभंग शापवचन । पालटूं न शके चतुरानन ' । ऐसें बोलूनि तपोवन । निघता झाला तात्काळ. ॥ ३१ ॥ धृतराष्ट्र लागोनी पायीं । म्हणे, 'स्वामिया ! उच्छाप देईं ' । ऋषि म्हणे, 'जाण हृदयीं । शाप उच्छाच मद्वाक्यें. ॥ ३२ ॥ माझे पाळिल्या वचन । न बाधे शापहुताशन । आज्ञा भंगितां दारुण । कुळक्षयो निर्धारें. ' ॥ ३३ । पुढें धृतराष्ट्र विनवी वाणी । 'किर्मीर कैसा वधिला वनीं । ऐकावया आवडे मनीं । बळप्रताप भीमाचा. ' ॥ ३४ ॥ मैत्रेय म्हणे, 'न बोलें मुखें । सर्वही विदुराशीं ठाउकें । तों सांगेल तें कौतुकें । श्रवण तुम्हीं करावे. ' ॥ ३५ ॥ मैत्रेय क्षोभूनि गेलियावरी, । धृतराष्ट्र विदुरातें पाचारी, । 'किर्मीर भीमा-चिये करीं । पडिला कैसा मज सांग[1]. ' ॥ ३६ ॥ विदुर म्हणे, 'एक श्रोत्रीं । राज्य हरितल्या तुझ्या पुत्रीं । लोटल्या तीन अहो-रात्री । धर्मराजबंधूंसी. ॥ ३७ ॥ मार्ग क्रमूनियां चरणीं । प्रवेशले काम्यकवनीं । तेथ प्रवर्तली रजनी । वृक्षमूळीं भूशय्या. ॥ ३८ ॥ लोटलिया अर्धनिशीसमयो । वृक्षमूळीं भूप्रळयो[2] । झडझडाटें सुटला वायो । तेणे धूसर दाटलें. ॥ ३९ ॥ राक्षसाचें विकट हांके । वन-देवता घाबरी शंके । श्वापदें पळतीं प्राणधाकें । व्याघ्रसिंहादि

१ सांगा. २ वनीं मांडला महाप्रळयो.

अपार. ॥ ४० ॥ रोषूनी पांडवपंथू । उभा ठेला काळमृत्यु । विशाळ बळाचा प्रतापू । भयानक माजला. ॥ ४१ ॥ विक्राळ दाढा महाक्रूर । नेत्र भोंवंडी चक्राकार । मुखीं नाशिकीं वैश्वानर । ज्वाळा सांडी धडधडा. ॥ ४२ ॥ मुखें गाजवी घोर शद्बू । ' बक माझा सहोदर बंधू । त्याचा तुम्ही केला वधू । निरपराधें दुष्ट हो ! ॥ ४३ ॥ त्याचा सूड घ्यावा हातें । सर्वदां शोधीं भीमसेनातें । आजी अकस्मात येथें । सांपडलेती वैरी हो ! ॥ ४४ ॥ आतां भीमाचेनि रक्तें । महानदी निर्मूनी एथें । स्वर्गीं निमाल्या बकातें । तोषवीन तर्पणीं. ॥ ४५ ॥ हें वन माझें वसतिस्थान । एथें पातला पावे मरण, । आतां[1] सर्वांचें भक्षण । करीन क्षण न लागतां ' ॥ ४६ ॥ त्याचें रूप देखतां नयनीं । मूर्च्छा पावली याज्ञसेनी, । धर्मद्रुमातें वेष्टुनी । कीर्तिवल्लिका ज्या परी ॥ ४७ ॥ हें देखोनी वृकोदरू । भंगिता झाला विशाळ तरू ; गांडीवचाप धनुर्धरू । सज्जिता झाला झडकरी ॥ ४८ ॥ भीम निवारी पार्थातें । ' किर्मीर वध माझेनि हातें । होणा', या लागीं स्वस्थचित्तें । कौतुक दृष्टीं विलोकीं. ' ॥ ४९ ॥ विंध्याद्रींवरी महामेरू । गजासुराशीं नंदिकेश्वरू । तेंवि नर आणि निशाचरू । युद्धकंदनीं[2] मिसळले. ॥ ५० ॥ वृक्षयुद्धीं दारुण । द्रुमविरहित झालें वन, । मग उचलोनी चंड पाषाण । परस्परें हाणिती. ॥ ५१ ॥ क्रोश द्विक्रोश शैलशृंगें । एकमेकांतें ताडिती रागें । तींही सरलियाँ[3] आंगे । मल्लयुद्धा मिळाले. ॥ ५२ ॥ राज्यदारार्थी सकाम । वाळीसुग्रीवा महासंग्राम । तेंवी किर्मीर आणि भीम । घोर द्वंद्वा पेटले. ॥ ५३ ॥ मुष्टि लत्ता लथडवे थडका । हुमणिया कोंपर

---

१ आतां तुम्हां सर्वांचें. २ करितां युद्ध. ३ सरलिया पिटूनी.

हाणिता देखा । चडकणा ताडुनिया मुखा । दंत पाडूं भाबिति. ॥५४॥ मर्मस्थळीं लाविता कळे । ग्रीवा पिळिती[1] हस्तबळें । थापा हाणोनी 'डोळे । फोडूं[2]' म्हणती बळिष्ठ. ॥ ५५ ॥ हस्तपाद कवळूनियां चरणीं । उसळोनी सांडिती उर्ध्व गगनीं । उडी घालोनियां मूर्ध्नीं । फोडावया तळपती. ॥ ५६ ॥ न लेखिती येर येर[3] । माजिले[4] व्याघ्र काळकुंजर । अरण्यरोही वृषभ थोर । फुफाटती अतिरागें. ॥ ५७ ॥ कामिनीकटाक्षांचे बाण । विरक्ता आंगीं तृणप्रमाण । तेंवि असुराचें ताडण । भीमा आंगीं नाढळे. ॥५८॥ धर्मनिरूपणाचे शब्द । अनाचारिया हृदयभेद । तेंवी भीमप्रहारें खेद । असुर पावे आगळा. ॥ ५९ ॥ पशु ओढिजे[5] गळबंधनीं । तेंवी दोर्दंड उचलुनी ग्रीवा-स्थानीं । कवळूनी आसुडिता चरणीं । शैलपाडें पाडियेला. ॥६०॥ म्हणे, 'मी कुंतीचा सांगाती । प्राण ठेवणें माझ्या हातीं । पडोनी उपडा या क्षितीं । कदा नुठीं मागुता.' ॥६१॥ लात वोपूनी हृदयीं । ग्रीवा रागें रगडिली पायीं । किर्मीरातें तये समयीं । मृत्यु भेटों पातला. ॥६२॥ लत्ताप्रहारें कपाळमोक्ष । शुभ्रवर्ण आंत[6] चक्षू । कडकडाट उलथे वृक्षु । तेवी गर्जोनियां पाडिला. ॥६३॥ मुख पसरिलें विक्राळ । जिव्हा लवथवित विशाळ । वमित रुधिराचे कल्लोळ । प्रेतदशा पातली. । ॥६४॥ भूमि त्राहाटुनी बळीवंत । म्हणे, 'बकाचे अश्रुपात । यमलोका जाउनी त्वरित । आपले हस्तीं परिमार्जी.' ॥६५॥ निर्जरीं पिटोनि टाळी । माथां वोपिलि पुष्पांजळीं । म्हणती, 'भीमा! आतुबळी । होई जयवत सर्वदा. ॥६६॥

---

१ करिवा पिळिती हस्तबळें; ग्रीवास्थळीं चोपिती बळें. २ फाडूं. ३ येरा. ४ माजले जैसे व्याघ्र कुंजर. ५ वेष्टित. ६ आतळले.

जे जे पांडवांचे वैरी । मदोन्मत्त, दुराचारी । ते ते वधूनी आपुले करीं । कौतुक दावी आमुतें.' ॥६७॥ यापरी किर्मीराचें हनन । करुनी, विजयी भीमसेन । ऐकोनी धृतराष्ट्राचें मन । अति उद्विग्न पुत्रार्थीं. ॥ ६८ ॥ विवेकविचारचक्षुहीन । पुत्रमोहाचे तम दारुण । निरसोनी आत्महिताचरण । चिंतागर्तें पडियेला. ॥ ६९ ॥ ' हिडिंब किर्मीर दैत्यु । ज्याचेनि हस्तें पावले मृत्यु । त्याशीं विरोध करोनी सुतु । कैंवी क्षेम वांचतीं ? ॥ ७० ॥ महा अनर्थ दिसे पुढां ' । परम चिंतेच्या सांकडा । प्रज्ञाचक्षु होउनी वेडा । मरणांत पडियेला. ॥७१॥ असो कौरवीं हिरोनी राज्य । वना दवडिला धर्मराज, । हें वर्तमान अधोक्षज । ऐकता झाला द्वारके. ॥ ७२ ॥ सत्वर संजोगुनी रथ । वृष्णी अंधक सुहृदांसहित । वना पातला कृष्णनाथ । धर्मराजाजवळिके. ॥७३॥ द्रुपदपुत्र धृष्टद्युम्न । क्लेश भगिनीचें ऐकोन । तोही पातला समाधान । करावया धर्माचें. ॥ ७४ ॥ धृष्टकेतु चैद्यपाळ । केकयराजा अतिस्नेहाळ । परिसोनियां क्लेशकाळ । येते झाले जवळिकें. ॥ ७५ ॥ अवघे पातले काम्यकवना । जंव अवलोकिलें कुरुनंदना ; । अवस्था देखोनी नयना । अश्रुपात सकळांतें ॥ ७६ ॥ कवळुनियां श्रीकृष्णपाय । मोहें द्रौपदी मोकली धाय । श्रीकृष्ण ह्मणे, ' स्वस्थ माये ! । सर्व ठाऊकें मज झालें. ॥७७॥ कर्ण, शकुनी, दुःशासन । चौथा कपटी दुर्योधन । या चौघांचें रक्तप्राशन । पृथ्वी करील निर्धारें. ॥७८॥ करीन कौरवांचा क्षयो । तरीच श्रीकृष्ण देवकीतनयो । खेदसंतापाचा वायो । झगटों नेदीं मानसा.' ॥७९॥ पांचाळ म्हणे, यादवेश्वरा ! । आज्ञा करी मज किंकरा, । कौरव मारूनी धराभारा । मी फेडीन स्वहस्तें. ॥८०॥ नेमस्त वधीन मी द्रोणातें ।

शिखंडी वधील भीष्मातें, । अर्जुन निवटिल कर्णातें, । सौबळातें सहदेव. ॥ ८१ ॥ एक शत धृतराष्ट्राचे कुमर । एकला वधील वृकोदर । आज्ञा देईल रुक्मिणीवर । तरी आतांची उठावें. ' ॥८२॥ अर्जुन म्हणे, 'जगजेठी ! । तुझी कृपा आमुचे गांठीं । असतां कौरवांच्या कोटी । तृणप्राय आमुतें ॥ ८३ ॥ शपथे गुंतला धर्मराजा, । या लागी नचले आमुचा काजा । द्रौपदी गांजिली हे लज्जा । क्षत्रधर्मीं आमुचिया.' ॥८४॥ श्रीकृष्ण म्हणे, 'धर्ममूर्ति ! । शाल्वें वेढिली द्वारावती । त्यास्तव संग्रामाच्या गुंतीं । मी गुंतलो नावेक, ॥ ८५ ॥ तुमचा वृत्तांत ध्यावया देख । आळस झाला कांहीयेक, । इतुक्यामाजी हें कौतुक । परम वैरीं दाखविलें. ॥ ८६ ॥ मी स्वभावें असतों तेथें । तरी करूं नेदितो कपटद्यूतातें, । पाडुनी सौबळाचे दांतातें । कूटपाश भंगितों. ॥८७॥ बोलों नेदितों पैजेतें । पाहों नेदितों द्रौपदीतें । धर्मराज वनवासातें । निघे ऐसें न घडतें. ॥ ८८ ॥ गुंतलों शाल्वाचिये युद्धीं । तंव दुर्जना[1] फावली संधी । असो याचे उसनें युद्धीं । निस्तरीन निर्धारें. ' ॥ ८९ ॥ इतिश्रीभारतवनपर्वणीं । पुढां परिसिजे विचक्षणीं । मुक्तेश्वर कवीची वाणी । व्यासाश्रयें चामके. ॥ ९० ॥ इति अरण्यपर्व भारत । मुक्तेश्वरकाविविराचित । श्रोतीं देऊनी चित्त । परिसिलें पाहिजे ॥ ९१ ॥

---

## अध्याय तिसरा

धर्म म्हणे, 'जी कृष्णराजा ! । शाल्व पातला कवण्या काजा ? ।

---

१ दुर्योधना.

वैराचें कारण अधोक्षजा ! । मजही कळलें पाहिजे.' ॥१॥ श्रीकृष्ण म्हणे, 'ऐक सकळ, । राजसूययज्ञीं शब्द कुटिल । बोलतां निमाला शिशुपाळ । माझेनि हस्तें जाण पां. ॥ २ ॥ तें दुःख धरोनियां चित्तीं । शिशुपाळ बंधूचिये प्रीती । सौभें वेढिली द्वारावती । बलात्कारें मी नसतां. ॥ ३ ॥ विमानयानीं जैसें नगर । असंख्य दैत्यगणांचा भार । बळें रोधिलें द्वारकापूर । हाहाःकार प्रजातें. ॥४॥ खचिल्या परिघाच्या[1] पाळी । भंगिल्या दुर्गाच्या पौळी[2] । मोडिल्या गोपुर आटाळी । विध्वंस केला अपार ॥ ५ ॥ कळस पताका तोरणें । भंगिलीं वनें शृंगारवनें, । प्रजाबाळकें घेतलीं प्राणें । किती[3] येक निष्ठुरें. ॥ ६ ॥ मुखें दुरुक्ति बोले परम । म्हणे, 'केउता यादव अधम । कृष्णवर्ण कृष्णनाम । कृष्णवदन तयाचें. ॥ ७ ॥ शिरच्छेद करुनी त्याचा । सूड घेईन शिशुपाळाचा.' । ऐशी ऐकोन कठिण वाचा । नगरवासी भयाभित. ॥ ८ ॥ ते वेळीं सांब, गद, अक्रूर । रुक्मिणी सत्यभामेचे कुमर । प्रद्युम्नादि महावीर । सिद्ध झाले संग्रामा. ॥ ९ ॥ हस्ती[4] पदाती, रथ, । भार चालिले असंख्यात । वीरवाद्यें गर्जना करीत । हृदय भेदें[5] असुरांचें, ॥ १० ॥ उग्रसेनें पाळिली पुरी । यंत्रें औषधें शस्त्रीं अस्त्रीं । मध्यें गुल्मीं द्वारोद्वारीं भार अपार कोंदलें. ॥ ११ ॥ असंख्य यादवांचे कुमर । गृहीं ठेवुनी वडील नर । तरुण निवडिले झुंजार । वीरश्री संभ्रमे. ॥ १२ ॥ तैशाचि सौभाची ही सेना । लोहो पंजरे गुंडिली जाणा । पराक्रमें[6]

---

१ पौळीच्या. २ मौळी. ३ किती एक अधमें निष्ठुरें. ४ हस्ती वाजी पदाती. ५ भेद असुरातें. ६ शस्त्रें झळकती जेवी घन । माजी वीज तळपती. ॥

करिती गर्जना । नर कंदना पेटले. ॥ १३ ॥ [1]उभय दळीं मिळोनियां झुंजा । शस्त्रें लेउनियां ओजा । नेमें घालुनियां पैजा । परस्परां हाणिती. ॥ १४ ॥ वणवा लावतां [2]श्वापदें भग्नें[3] । तेवी असुरसेना पलायमान । होतां, देखोनी मग प्रधान । क्षेमवृद्धी या नांवें. ॥ १५ ॥ मोकली बाणांचा जलधरु तेणें त्रासला यादवभारु । देखोनी जांबुवंतीचा कुमरु । सांब नामा धाविन्नला. ॥ १६ ॥ रथ लोटुनिया पुढारां । असंख्यबाणीं भेदिलें असुरा । खेद पावोनी माघारा । पाठीं देउनी पळाला. ॥१७॥ हें देखूनी वेगवान । सौभसेना अतिदारुण । घेऊनियां धनुष्यबाण । सांबा उजू पातले. ॥ १८ ॥ ते साहोनी[4] बाणवृष्टी । गदा पडताळुनि मुष्टी । दैत्य ताडिलों[5] भूतळवटीं । प्रेत होवोनि पाडिलों[6]. ॥ १९ ॥ जीर्ण वृक्ष मोडूनी पडे । तेंवी दानव प्राणें विघडे, । हे देखतां घालून होडे[7] । विविधनामा धाविन्नला. ॥ २० ॥ चारुदेष्ण रुक्मिणीकुमर । तेणें विविध तोडिला थोर । जैसा शक्रें वृत्रासुर ; । भांडणीं तैसे मिळाले. ॥ २१ ॥ तीक्ष्ण सोडूनिया बाणजाळ । छेदिलें विविधाचें मौळ । जैसा भंगिजे शैल । वज्रघातें सुरेंद्रें. ॥ २२ ॥ विविध मारिला चारुदेष्णें । हें देखोनी शाल्वें तेणें । प्रेरूनियां असंख्य सैन्यें । आपण युद्धा पातला. ॥ २३ ॥ वांकुडी घालिजे महाघनीं । तेंवी वर्षाव बाणीं । मांडिला देखोनी द्वारकाजनीं । महा कल्पांत भाविला. ॥ २४ ॥ जेष्ठ[8] भीमकीचा नंदन । मदन कामेश्वर प्रद्युम्न । कुसुमशराचें संधान ।

१ आपापल्या धनियांच्या काजा । उभय दळें मिसळलीं झुंजा. ॥ २ तळपे पवन. ३ भग्न. ४ पाहोनी. ५ ताडितां. ६ पाडियलें. ७ घोडे. ८ क्षणें. ९ जो.

साहों न शके हरब्रह्मा. ॥ २५ ॥ त्रैलोक्य भेदिलें एके बाणें । त्यातें झुंजोनी जिंकिजे कोणें ? । यादवांतें धैर्यवचनें । गर्जोनियां बोलत ॥२६॥ ' आजि कौतुक पहा हो ! नयनीं । शाल्व निश्चयें मारीन रणीं, । जैसा त्रिपुरातें भेदूनी । शिव कल्याण पावला. ॥ २७ ॥ दिव्य वाजी[1] कनकरथू । ध्वजीं मिरवे मकरकेतू । चक्रीं चंद्रमा आदित्यू । जडिले तैसे भासती. ॥ २८ ॥ दारुकाचा पुत्र सुमति । प्रद्युम्नाचा तो सारथी । युद्धीं[2] नानापरीच्या युक्ती । गति विगती रथाच्या. ॥२९॥ शाल्वबाणाचिया कोटी । तोडुनी आपुली बाणवृष्टी । दावितां सौभाचिये दृष्टी । अंधकारू पातला. ॥ ३० ॥ शाल्व म्हणे, ' हो ! कौतुक ! म्हणत होतों हा बाळक । होय कृष्णाहूनी अधिक । कृष्णपुत्र निर्धारें. ॥ ३१ ॥ तंव शत्रूचीं गात्रें गात्रें । बाणीं भेदिलीं कृष्णपुत्रें । झांकूनिया उभय नेत्रें । मूर्छित पडे रथांगीं. ॥ ३२ ॥ पडतां देखोनी मुख्य धुर । दैत्य करिती हाहाकार । भयें भेदुनी अंबर । दाही दिशा लंघिती. ॥ ३३ ॥ मुहूर्त लोटलिया सौभपती । सावध होऊनी बैसला रथीं, । धनुष्यबाण घेऊन हातीं । प्रद्युम्न दृष्टी लक्षिला. ॥ ३४ ॥ लवांमाजी[3] लक्ष बाण । सोडितां[4] हस्तलाघवीं निपुण । निवारितां[5] ही प्रद्युम्न । हृदयमर्मीं भेदला. ॥ ३५ ॥ बळी शक्राचिये परी । दोघे झुंजता महामारी । घावो टाळुनी[6] घायानळीं । कृष्णकुमर ताडिला. ॥ ३६ ॥ तेणें मूर्च्छना आली थोरी । पहुडला रथाचिये गुढारीं, । हें देखोनियां यादवभारीं ।

---

१ माझा. २ युद्धीं जाणें नाना परीच्या युक्ती; युद्धीं जाणें बहुतांपरीच्या कूळृती. ३ लक्ष्यामाजी ४ सोडित ५ त्याणें तो ६ अवटाळूनीं हृदयांतरीं; अवटाळोनी घायानळीं

हाहाकार माजला. ॥ ३७ ॥ शत्रुबाणांचा महामारू । अंगप्रत्यंगीं खोंचले वारू । सारथियें रहंवरु । नगरमार्गें फिरविला. ॥ ३८ ॥ पेटोनी धडके वैश्वानरु । तेंवी सावध कृष्णकुमरु । जाला तंव रहं-वरु । ग्राममार्गें पळतसे. ॥ ३९ ॥ रागें सारथियातें म्हणत । 'मार्गें किमर्थ काढिला रथ ? । येणें अपजयाची मात । नलगतां आंगीं लागली. ॥४०॥ कृष्ण बलिराम सात्यकी । खेद पावोनी बोलती मुखीं । म्हणती आमुच्या कुळीं हा कीं । क्लीब पुरुष जन्मला.' ॥ ४१ ॥ सारथी म्हणे, 'ऐक वचन । विषम वेळे दिधला मान । जैसा झालिया अपशकुन । माघारुनी चालिजे. ॥ ४२ ॥ आतां पाहें माझी कळा । याचि रथें शत्रूच्या दळा । विध्वंसनि जैसा अचळां । वज्र करी शतचूर्ण.' ॥ ४३ ॥ ऐसें बोलोनी तये अवसरीं । गर्जोनि फिरविला रथकेसरी । शत्रुभारकुं-जराशिरीं । यशोमुक्तें साधावया. ॥ ४४ ॥ विमान सांडूनी सौभपती । आरूढला आणिके[1] रथीं । धनुष्य घेऊनियां हातीं । शरसंधान लाविलें. ॥ ४५ ॥ दोघांचिये शरसंधानीं । भरलें गगन आणि धरणी । प्रद्युम्न म्हणे, 'प्राणहानी । आतां दाऊं शत्रूतें.' ॥ ४६ ॥ पूर्वी कृष्णें उपदेशिलें । जैसें ब्रह्मतेज प्रकटलें । तें ब्रह्मास्त्र अभिमंत्रिलें । सद्गुरुमुखापासूनियां. ॥ ४७ ॥ एकत्र मिळाले सहस्र तरणी । तैसे तेज झळके गगनीं । कडकडाटे धरणी । सागरांत गिरीसीं. ॥ ४८ ॥ भाळ, हृदय, बाहुमूळी । शस्त्रभेदनें धरातळीं । पडतां देखोनी तेचि काळीं । कृष्णपुत्रें मागुती. ॥ ४९ ॥ शिरच्छेदना अतिसत्वर । जोडितां जो कां वरद शर । जैसा प्रळयार्थ वैश्वानर । जिव्हा काढी

[1] कनक.

सळंबा. ॥ ५० ॥ तो बाण देखतांचि नयनीं । हाहाकार माजला गगनीं । शक्र, कुबेर, नारदमुनी । पवनवेगें पाठविला. ॥ ५१ ॥ म्हणती ' प्रद्युम्ना ! परियेसीं । श्रीकृष्णहस्तें मृत्यु यासी । विधिनें नेमिले नेमासी । विपरीत तुवां न करावें. ॥ ५२ ॥ जोडिलें यश घेईं माथा । सोडी शाल्वा जीवन्मृता । यातें वधील तुझा पिता । तात्काळिक देखसी. ' ॥५३॥ म्हणोनी केला जयजयकार । सुमनें वर्षले सुरवर । अपजयो पावोनियां पामर । शत्रु गेला स्वस्थाना. ॥ ५४ ॥ मुक्त झाली द्वारावती । आनंदली सर्व जगती । राजसूय यज्ञाची समाप्ती । झालिया अंतीं पातलों. ॥ ५५ ॥ शोभाविरहित देखिली पुरी, । भूषणारहित नरनारी, । ' कारण पुसतां सविस्तरीं । वृत्तांत लोकीं बोलिला ' ॥ ५६ ॥ तेव्हां प्रतिज्ञा उत्तरीं । नेम करिता झाला मुरारी, । ' शाल्व मारिल्यावीण नगरीं । प्रवेश न करी सर्वथा. ' ॥५७॥ बळभद्रा निरविलें नगर । ' स्वस्थ रक्षावे नारीनर । करूनी सौभयाचा संहार । मीही सत्वर येतसे. ' ॥ ५८ ॥ सवें घेऊनी यादवसेना । उल्लंघूनी नगरें नाना । पातलों सौभाचियां स्थाना । मनोवेगीं या रथेशीं. ॥ ५९ ॥ बेळें वेढिली शत्रुनगरी । जे कां वसे समुद्रोदरीं । आड लंकेचिया परी । सुरासुरां दुर्गम. ॥ ६० ॥ सौभा जाणवली मात । युद्धा येतसे कृष्णनाथ । पांचजन्य परिसतां कृतांत । दैत्य मारीं पेटला. ॥ ६१ ॥ करूनी मावेचे दुर्ग । झुंजा पेटला अभंग । मांडला युद्धप्रसंग । रामरावणासारिखा. ॥६२॥ दैत्य मावेचा विंदानी । विकार दाखवी क्षणक्षणीं । अनेक रूपें देखतां नयनीं । धैर्य कोणा न धरवे. ॥ ६३ ॥ क्षणें

१ मंडळें. २ घेऊनी. ३ अडा; अटक. ४ म्हणती पातला.

प्रकाश, क्षणें रजनी । क्षणें गगनीं, क्षणें धरणीं, । क्षणें प्रगट दिसे नयनीं, । क्षणैक गुप्त दिसेना. ॥६४॥ फरश, पट्टीश, पाश, वज्रे, । गदा, मुद्गल, शूल, चक्रें, । मुसल, तोमर, अपारें । शैल, पाषाण वर्षत. ॥६५॥ अंगारवृष्टी, सर्पवृष्टी । नाना पर्वतशिळावृष्टी, सिकतावृष्टी, भस्मवृष्टी । यादवसेना भंगावया. ॥ ६६ ॥ अग्निपर्जन्य वातगिरी । पाडुनी ताडी शरधारीं । तितुके परिहारूनी दूरी । असंख्य वैरी मारिले.' ॥ ६७ ॥ मंत्रबाणें लावूनी गुणां । छेदूनी पाडी चक्रपाणी । संसारक्लेश तत्वज्ञानी । जेंवी परिहरी विचारें. ॥ ६८ ॥ मेघींहूनीं पडती गारा । तेंवीं भूतळीं विखुरती तारा । असंख्य वीज पडतां धरा । भंगों पाहे तडाडें. ॥ ६९ ॥ श्यामाजी बाणाच्या संधानें । झाकिन्नलीं यादवसैन्यें । दारुक म्हणे, 'स्वामी प्राणें । वाचतां मार्ग दिसेना. ॥७०॥ सहस्र सूर्यांचीं मंडळें । तेवीं दाखवी एकेचि काळें । तितुकीं चंद्राचीं सोज्वळें । बिंबें दावूनी लोपवी.'॥७१॥ श्रीकृष्ण म्हणे, 'स्वस्थ राहीं । धैर्यस्तंभ कवळी बाहीं । विष्णुस्मरणें पाप कांहीं । नुरे तैसें करीन.' ॥ ७२ ॥ तंव रक्तोदकाचा जळधर । वर्षतां लोटला महापूर । ते देखोनी भयंकर । यादवसेना घाबरी.॥७३॥ तंव द्वारकावासी परम आप्त । मनोवेगें धांविला दूत । नेत्रीं ढळत आश्रुपात । कृष्णनिकटीं पातला. ॥ ७४ ॥ सांगे उग्रसेनाचीं वचनें । शाल्वें घालोनी घालणें । वसुदेव घेतला प्राणें । सर्व यादवा देखतां. ॥ ७५ ॥ म्हणे सांडी युद्धाची आटाटी । पितृप्रेत पाहीं दृष्टी । देवकी शोकाब्धीच्या तटीं । ते शांतवीं स्वमुखें. ॥ ७६ ॥ मनीं

---

१ क्षणैक प्रकाश. २ सांडी छेदुनी चक्रपाणी. ३ शस्त्रा. ४ ऐसा. ५ पाहीं. ६ धांवतां रथ.

विचारिजे हृषीकेशें । हें साचार घडेल कैसें ? । बळभद्र जिता असतां मानसें । कल्पिलें कोणां न वचे पैं. ॥ ७७ ॥ सात्यकी प्रद्युम्न सांब गद । असतां वसुदेवाचा वध । करी ऐसा वीर प्रसिद्ध । भुवनत्रयीं असेना. ॥ ७८ ॥ तंव विमानींहुनी तेथें । टाकिलें वसुदेवप्रेतातें । काष्ठप्राय पादहस्त । विकृतानन देखिलें. ॥ ७९ ॥ पुण्यें सरलिया स्वर्गींहुनी । भूतळीं लोटिती जेंवी प्राणी । तेंवी येराच विमानींहुनी । वसुदेवप्रेत पडियेलें. ॥ ८० ॥ मुक्तकेश बीभत्सवदन[1] । देखोनी शंका पावलें मन । हस्तकींचे धनुष्य बाण । गळोनी पडले धरणीये. ॥ ८१ ॥ नेत्र झाकोनियां मौन । स्तब्ध ठेला अधोवदन । रज्जुसर्पाचें[2] दर्शन । जेवी नेणता वोथेरे[3] ॥ ८२ ॥ सादरें विलोकी जमजेठी । तंव प्रेत न दिसे दृष्टी । नाहीं रक्तघनाची वृष्टी । ना सौभही दिसेना. ॥ ८३ ॥ सौभें विमान पळविलें । प्राग्जोतिषनगरा नेलें । तेथुनी सत्वरा पातलें । कृष्णदृष्टी मागुती. ॥ ८४ ॥ म्हणे, 'दानवी माया प्रबळ । मजही केलें अतिव्याकुळ । आतां त्याचें प्राणमूळ । पैं निर्मूळ करावें.' ॥ ८५ ॥ तंव गर्जिली आकाशवाणी, । 'श्रीकृष्ण देवा ! चक्रपाणी ! । शीघ्र सौभातें वधुनी । शुभ सर्वत्र करावें.' ॥ ८६ ॥ मग पावकास्त्र अभिमंत्रुनी । संगें सुदर्शन प्रेरुनी । तेणें सौभातें बाडुनी । रामें दशानन ज्यापरी. ॥ ८७ ॥ जैसें मार्तंडमंडळ खंडलें । तेंवी विमान भंगिलें । पहासमुद्रीं बुडविलें । नौकापोत ज्यापरी. ॥ ८८ ॥ मेरु खचोनी[4] पडे धरणी, । कीं प्रळयवीज तडके गगनीं, । तेंवी विमान भंगतां ध्वनी । उभयलोकीं न समाये. ॥ ८९ ॥ पूर्वीं पार्वतीचेनि वरें । त्रिपुर

१ वास मलिन २ अजा सर्पाचें. ३ होय तटस्थ ४ खचलें.

भेदिला विष्णुशरें । तेंवी भंगिलें यादवेश्वरें । सौभयान सौभाचें. ॥ ९० ॥ तेथूनि पडतां भूमंडळीं । गदाघात वोपिला मौळीं, । प्राण त्यागुनी तात्काळीं । मोक्षधामीं प्रवेशे. ॥ ९१ ॥ मस्तकीं लागतां कृष्णगदा । जीव पावला मोक्षपदा । शरीर वोपिलें रण गीधा । भक्षावया भूतळीं. ॥ ९२ ॥ दैत्यसेना कृष्णशरीं । खंड विखंड सागरोदरीं । पडतां भक्षिलें जळचरीं । मत्स्यमगरा संतोष ॥ ९३ ॥ वटवृक्ष भंगे चंडवातें । यक्षिणी पळती गगनपंथे । तेंवी दैत्यगण[1] तें तेथें । विमानभंगें[2] पळाले. ॥ ९४ ॥ शाल्व मारिला ऐशियापरीं । मागां अविवेक हस्तिनापुरीं । वर्तला तो माझिये शिरीं । शब्द तुमचा बैसला. ॥ ९५ ॥ त्रयोदश वर्षें होतां पूर्ण । परिहरणें तुमचें ऋण । आधीं गेलिया जीवन । कासया सेतु बांधणें ? ॥ ९६ ॥ वनवास लोटलिया पाठीं । पुढा बोलों विचार गोष्टी । आतां आज्ञा देई, भेटी । वसुदेवाचे मज जाणें.' ॥ ९७ ॥ सन्मानुनी धर्मराजातें, । आलिंगुनी भीमपार्थातें, । तैसेची नकुळसहदेवांतें, । स्नेहें भावें गौरवी. ॥ ९८ ॥ द्रौपदीतें शांतवी वचनें, । ' भगिनी ! दुःशासनाचें उसनें । फेडीन तेव्हां तुझिया ऋणें । मुक्त जालों जाण पां ॥ ९९ ॥ आतां स्वस्थ अंतः-करणीं । अखंड असावें माझिये स्मरणीं । स्वल्पकाळीं राज्यासनीं । बैसवीन धर्मातें. ' ॥ १०० ॥ रथीं वाहूनीं सुभद्रेतें । प्रयाण केलें कृष्णनाथें । अष्टौ भावें पांडवांतें । प्रेमानंद वोसंडे. ॥ १०१ ॥ दिव्यवाजीयुक्त रथ । द्वारकेशीं दारुकें पथ । उल्लंघूनीं, द्वारकानाथ । द्वारावती पावला. ॥ १०२ । तयापरी धृष्टद्युम्न । घेऊनी द्रौपदीचे

---

१ दैत्यांगना. २ विमान भंगतां पळाल्या.

नंदन । पांचाळपुरा चालिला, वचन । गोवूनियां नियमाचें. ॥१०३॥ धृष्टकेतु, केकयराज । घेउनी आपुलालिया अनुजा । 'कौरववधा येतसों' पैजा । बोलोनियां चालिले. ॥ १०४ ॥ कृष्ण आणि धृष्टद्युम्न । यांनीं धनें दिव्य वसनें, । वोपिलीं तितुकीं कुरुभूषणें । ऋषीश्वरां अर्पिली. ॥ १०५ ॥ ऋषिब्राह्मणासहित प्रजा । वनीं विराजे धर्मराजा । कथाकीर्तनें परम वोजा । काळ सार्थक करितसे. ॥ १०६ ॥ सांडूनियां काम्यकारण्य । पुढें पातले अद्वैतवना । यावरी वर्तलें तें मना । चतुर श्रोतीं जाणावें. ॥ १०७ ॥ इति श्रीमहाभारते वनपर्वणि । कथा कामधेनुजननी । चतुर्विध पुरुषार्थ सुधापानीं । तोषवीत जगातें ॥ १०८ ॥ लीलाविश्वंभरपदनखा । उपमा तुळे बोध[1] यमका । मुक्तेश्वर निष्कलंकरेखा । चित्त केलें आपुलें[2]. ॥१०९॥

---

## अध्याय चवथा.

द्वारके गेलिया घनश्याम । अद्वैतवनीं राजा धर्म । जपी, तपी, सिद्ध परम । तयासंगें तोषले. ॥ १ ॥ पांचही बंधू आणि द्रौपदी । धौम्य सर्व ज्ञानाचा उदधी । धर्मकर्म यथाविधी । सांगोपांग संपादी. ॥२॥ पौरजनीं पांडवांप्रती । अपार अर्पिली धनसंपत्ती । ते ब्राह्मणां अर्पुनी पुढती । प्रजा[3] मानें बोळविल्या. ॥ ३ ॥ अद्वैतवना पाहतां दृष्टी ! शाल, तमाल, वृक्षदाटी[4] । आम्र, मधु, कदंब कोटी । कर्णीकार लागले. ॥४॥ हंस, मयूर, पिकपक्षी । शब्द करिती सुफळ वृक्षीं, ।

---

१ परम तद्योम एका. २ पाहिजे. ३ बहु सन्मानें गौरविले. ४ ताल दाटी

तें कौतुक पहातां चक्षीं । परम अल्हाद समस्तां. ॥ ५ ॥ सरस्वती सरळ[1] वाणी । ऋषि गर्जती वेदध्वनी । तंव तेथें मार्कंडेयमुनी । धर्मभेटी पातला ॥ ६ ॥ पूजा सन्मान संतोषीं । घेऊनी तापस पुण्यराशी; । अवलोकुनी मग धर्मासी । हास्य करी संतोषें. ॥ ७ ॥ धर्म म्हणे, 'करुणाराशी ! । आमुची दशा देखोनी ऐशी । खेद मानिती देवर्षी । स्वामी हास्य किमर्थ ?' ॥ ८ ॥ मार्कंडेय म्हणे, 'सुमती ! । तुज देखोनी माझ्या चित्तीं । आठवला पवित्रकीर्ति । दाशरथी श्रीराम. ॥ ९ ॥ जीर्ण वस्त्रातुल्य धरणी । त्याग करूनी पितृवचनीं । सहवर्तमान बंधु पत्नी । दंडकारण्यीं राहिला. ॥१०॥ चौदा वर्षें वनवास । करितां कांहीं[2] न मानी त्रास । शक्ति असोनी अधर्मलेश । नातळेचि[3] तयातें. ॥११॥ बळें शक्राहूनी आगळा । शिक्षा करूं शके कळिकाळा । परि नुलंघी धर्मागळा । सत्य भंगेल म्हणोनियां. ॥१२॥ भरतादिकीं पुण्यश्लोकीं । रा[4]ज्य त्यजूनी राहिले जपीं । सत्यच एक जोडिलें लोकीं । म्हणोनी झालीं पुराणें. ॥ १३ ॥ सत्याचि एक महाबळ । ज्याचा निश्चयो अढळ । ते पावती कैवल्यफळ । पृथ्वीतळ तें किती ? ॥१४॥ जैसा दाशरथीराम । तैसाच तूंही पांडव धर्म । सत्य संरक्षणें काम । पूर्ण होती पैं तुझे.' ॥ १५ ॥ ऐसे सांगोनी धर्मातें । आज्ञा पुसोनी धौम्यातें । मार्कंडेय उत्तरपंथे । जाता झाला तपार्थ. ॥ १६ ॥ मार्कंडेय गेलियावरी । बकदाल्भ्य त्या अवसरीं । धर्माप्रती येऊनी करी । निरूपण स्वमुखें. ॥ १७ ॥ ऋषी बोले सत्यवचन, । 'धर्मराया ! तूं सर्वज्ञ । श्रेय सिद्धीचें कारण । ओळ-

---

१ विशाल वनीं. २ तिळतुल्य. ३ नातळे चित्तीं जयातें. ४ प्राण वेचूनी पुण्यजनकीं.

खिलें त्वां एक. ॥ १८ ॥ पवित्र ब्राह्मणांची संगती, । पवित्र ब्राह्मणाप्रति पाळिती । पवित्रांची सेवा करिती । त्या नरां संपत्ति वोळगण्या. ॥ १९ ॥ अरण्यवासी ऋषीश्वर । समीप पाळिशी शत-सहस्र । हे[2] लक्ष्मीदाते ईश्वर । तुझ्या दारीं तिष्ठती. ॥ २० ॥ ब्राह्मण क्षत्रियांचें बळ । ब्राह्मण क्षत्रियां क्षेम कुशळ; । करूनी शत्रूचें निर्मूळ । पृथ्वीतळ भोगिशी ॥ २१ ॥ ब्राह्मणांचें आशीर्वचन । तें क्षत्रियां शस्त्र बाण । ब्राह्मणकृपेचें अंगत्राण । वज्रकवच अक्षयीं. ॥ २२ ॥ ब्राह्मण कोणते म्हणशी सृष्टी । जे कां वसती तुझ्या निकटी । ऐशिया ब्रह्मांडाच्या कोटी । रचूं शकती संकल्पें. ॥ २३ ॥ जेव्हां दृष्टी होई वांकुडी । तेव्हां त्रलोक्य जाळुनी सांडी । ऐशी ब्राह्मणांची प्रौढी । तूं जाणशी सर्वज्ञा. ॥२४॥ काम, क्रोध, लोभ, मेळ । वाचे हो नेदी सकळ । हा विलास सर्व काळ । ब्रह्मनिष्ठ ब्राह्मणीं. ॥ २५ ॥ जया सर्वत्र ब्रह्मसृष्टी । ब्रह्मबोधें तोषले पोटीं । ब्रह्म जाणोनी लोकीं रहाटी । सदाचारें वर्तती. ॥ २६ ॥ हृदयवृत्ती वृत्तसंपन्न । अग्नीसेवा, वेदाध्ययन । शमदमयुक्त तपोधन । सुख संतोषें संतुष्ट ॥ २७ ॥ पवन, पावक, एकमेळीं । काननें जाळिती समूळीं, । [6]तेवी मंत्र शस्त्र होळी । शत्रुकुळातें होतसे. ॥ २८ ॥ भृगु, अंगिरा वशिष्ठ, । कश्यप, आत्रेय, अगस्त्य, श्रेष्ठ । हे मुख्य करुनी ब्रह्मनिष्ठ । असंख्य वसती तव संगीं. ॥ २९ ॥ त्या ब्राह्मणांचे सेवेस्तव । इच्छिलें पावशी सुखवैभव.' । ऐसे बोलोनी महानुभावँ । जाता झाला स्व-

---

१ ईश्वरार्चनें दिवस लोटिती. २ तेथें लक्ष्मीशीं ईश्वर. ३ वाचा होऊं नेदी विफळ. ४ मंदाचार. ५ द्वादशाग्नि व्रतसंपन्न. ६ तेचि मंत्रें. ७ महानुभव.

आश्रमा. ॥ ३० ॥ व्यास, नारद, जामदग्न्य, । पृथुश्रवा, इंद्रद्युम्न । काश्यप, हारीत, स्थूणकर्ण, । भालुकी आणि बृहदश्वा. ॥ ३१ ॥ विश्वामित्र, सुहोत्र, होत्रवाहन, । अग्निवेश्य, शौनक जाण, । बृहदश्वा तपोधन, । विभावसु, ते ठायीं. ॥ ३२ ॥ कृतचेता, सहस्रपात, । हे मुख्य करूनी असंख्यात । धर्मासंगीं तोषभरित । सुखावले वनवासी ॥ ३३ ॥ धर्मासंगीं सुखभोजन । तपश्चर्या, वेदाध्ययन । धर्मराजा आशीर्वचन, । जय कल्याण इच्छिती. ॥ ३४ ॥ यावरी एकांत अवसरीं । सखेद द्रौपदी सुंदरी । म्हणे, 'राया[1] कवणे परी । अवलंबिलें[2] तुवां[2] एथ ? ॥ ३५ ॥ दीन, तापसी, शक्तिहीन[3] । शिलोंच्छवृत्ती वेंचिती कण । तयां ऐसें हें वर्तणें । ते काय त्वां मांडिलें ? ॥ ३६ ॥ वेंचितां धनाचिया कोटी । आयुष्य नेमिलें[4] घटिकासाठीं । तो अवघों[5] जन्म इये रहाटी । अरण्यवासीं लोटिला ॥ ३७ ॥ आज्ञा देईं भीमार्जुना । करूनी शत्रूच्या दहना । राज्य साधिलीया महाप्राज्ञा ! । उभयलोकीं सुखलाभ. ॥ ३८ ॥ साधलिया स्वराज्य संपत्ती । यज्ञीं देव तृप्त होती, । श्राद्धीं पितृगण अतिथी । अन्नदानें तोषती. ॥ ३९ ॥ हरेल दारिद्र्याचें दुःख, । मित्र बंधु पावती सुख, । अनित्य संसारीं कौतुक । करूनी जाती दादुले. ॥ ४० ॥ जेणें पाविजे परम दुःख । काय तें साधुवृत्तीचें सुख ? । धैर्य[6] उपहासिती लोक । म्हणती दीनें अशक्तें. ॥ ४१ ॥ टाकिशी रायाचें धर्म । तोचि रायातें अधर्म । शांतीनें क्लेश परम । कुटुंबेंसी भोगिसी.

---

१ कल्याण. २ अवलंबू कां. ३ कीर्तिहीन. ४ न मिळे घटिका लुटि. ५ अद्यापि. ६ वैरी.

(वा. ग्रं. ९२८०)

॥ ४२ ॥ आइक आतां इतिहासातें, । विरोचन पुसे प्रल्हादातें । शांति न पाविजे श्रेयातें । क्रोधें होतसे सुखलाभू. ॥ ४३ ॥ ऐकोनी बोले विचारकुशळ । कार्याकार्य बळाबळ । ओळखूनी काळ-वेळ । कार्यसिद्धी जाणतां. ॥ ४४ ॥ व्यवहारीं शांति नये कामा । परमार्थ क्रोध नाशी[1] धर्मा, । जेथें[2] ज्याचाचि महिमा । तें तेथची योजावें. ॥ ४५ ॥ प्रपंचीं अवलंबिल्या शांति । जोडिली ते जाय वृत्ती । आपुल्या दारातें संपत्ती । प्राप्त नव्हे आपणिया. ॥ ४६ ॥ शांतिपुरुषाची अंगना । हेळूनी सांडी जे पतीच्या वचना । पुत्र होऊनी मेहुणा । चेष्टा करी विनोदें. ॥ ४७ ॥ क्रूरासी सेविती सेवक, । क्रूरासी भीती प्रजालोक । क्रूरास्तव हा महा धाक, । शत्रु वाहती सर्वदा. ॥ ४८ ॥ क्रूर जाणोनी स्वभाव । मर्यादेनें वर्तती सर्व, । क्रूरता भोगी वैभव । सात्विका भिक्षा मिळेना. ॥ ४९ ॥ क्रूर पुरुषातें देखोनी । स्त्रीपुरुषें[3] पारिके जनीं, । न्यायें वर्तती स्वधर्मा-चरणीं । बुद्धी[4] न करिती विपरीत. ॥ ५० ॥ प्रपंचीं धरितां सात्वि-कता । तैं आपण केलें आपुल्या घाता; । सत्वगुण तो परमार्था । शोभा आणी सर्वस्वें. ॥ ५१ ॥ लोहकार्य[5] नव्हे कनकें । प्रपंच जिणों न शके सात्विक । लोह कनकाशीं नोहे तुक । तेंवी क्रूरता परमार्थी. ॥ ५२ ॥ साधु बोलती[6] सत्वगुणें । स्त्रिया वोसंडती रजो-गुणें । शत्रु दंडावे तमोगुणें । हें जाणणें शहाणियानें. ॥ ५३ ॥ खळा कुटिळाचे ठायीं । शांति धरितां पडणें अपायीं । जैसें कटक मर्दावें पाहीं । तेवी दुर्जन दंडावें. ॥ ५४ ॥ देखोनियां

१ नाशी. २ म्हणोनी. ३ स्त्रीपुत्र पारखे सेवकजन. ४ बुद्धी न शके परहस्तीं. ५ लोह कार्य नव्हे कनक. ६ तोपती.

साधुसंता । भावें चरणीं ठेविजे माथा, । तेथें दावितां क्रूरता । अधःपाता जाइजे. ॥ ५५ ॥ म्हणोनी शांतता क्रूरता । सर्वां सर्वत्र एकरीत । केलिया व्यवहारीं परमार्थी । दोहींतेही नाडिजे. ॥ ५६ ॥ ऐसें प्रल्हादें पवित्रें । बोलिलें तें पुत्रपौत्रें । स्वीकारूनी आज्ञा मंत्रें । वर्तणूक वर्तला ॥ ५७ ॥ या लागीं ऐकें धर्ममूर्ती ! । करिशीं कौरवांची शांती । तरिच पावशी विश्रांती । येरवीं दुःख अखंड.' ॥५८॥ ऐकोनी द्रौपदीचें वचन । आवेशला भीमसेन । म्हणे, 'चतुर इयेसमान । दुजी नाहीं सर्वथा. ॥ ५९ ॥ इच्या ऐकोनियां वचना । उल्लास वाटे माझिया मना । मज आज्ञापीं कुरुभुषणा ! । दुर्योधनहननार्थ. ॥ ६० ॥ आणिक विचार करितां कांहीं । बुद्धं नको संशयडोहीं; । मुखें प्रेरूनियां पाहीं । रणीं कौतुक बंधूचें, ॥ ६१ ॥ भीष्म, द्रोण, कर्ण, शकुनी । दुर्योधनेशीं बंधुश्रेणी । स्वहस्तकें रणांगणीं । मृत्युसदनीं बसवीन.' ॥ ६२ ॥ धर्म म्हणे, 'बंधु हो ! ऐका । ऐसाचि माझाही आवांका । परी मानसीं एक शंका । वर्तते ती सांगतो. ॥ ६३ ॥ भीष्म, द्रोण, कर्ण प्रबळ । सर्व विषयीं समर्थ कुशळ । यत्न करितां हो विफळ । तरी अपकीर्ति रोकडी. ॥ ६४ ॥ पांडव पवित्र साधु । हा त्रैलोक्यीं भंगेल शब्दु । राज्य अप्राप्तीचा खेदु । अमरनाथ सोडीना. ॥ ६५ ॥ हृदयीं आठवूनी दुःख । म्हणतां परि हे काय अटक । वधिले जाती हें निःशंक । कैंची निश्चय मानावा ? ॥ ६६ ॥ यालागीं नेमाचिये अंतीं । जे बुद्धि सांगेल कृष्णमूर्ती । तेचि करावी युक्ति । चळूं नका

---

१ जाणिजे २ न खंडे. ३ उत्साह. ४ न करीं. ५ विकळ, ६ पंडित. ७ त्रैलोक्यीं. ८ जन वरी खंडेना. ९ साधु म्हणती काय अटक.

विशेषें.' ॥ ६७ ॥ ऐसें बोलतां धर्मातें । कृपेनें व्यास पातला तेथें । नमस्कारूनी कुंतीसुतें । मनोभावें पूजियेला. ॥ ६८ ॥ व्यास म्हणे, 'विवेकखाणी । कासया विकल्पीसी मनीं । निशा लोटलिया तरणी । उगवे ऐसा संशय ? ॥ ६९ ॥ सत्य सुकृत ज्याचें गांठीं । तेथे ईश्वरकृपा मोठी । ईश्वर कृपेस्तव संतुष्टी । पूर्णकामें सर्वथा. ॥ ७० ॥ करुनी शत्रुकुळाचा नाश । राज्यलेभे[१] पावशी यश । येथें संशयाचा लेश । स्पर्शों नेदी मानसा.' ॥ ७१ ॥ ऐसें बोलोनी गुरु पवित्र । महाविद्या[२] बीजमंत्र । धर्माशीं[३] उपदेशिता नेत्र । दिव्यज्ञानें उघडले. ॥७२॥ सर्व सिद्धि कर जोडुनी । उभ्या प्रत्यक्ष देखे नयनीं । पुढतीं रहस्य बोलोनी मुनी, । 'धर्मा ! आईक निर्धारें. ॥ ७३ ॥ अर्जुना ! या विद्येकरून । सर्व शत्रूसी जिंकिसी जाण । यांचें करितां जप ध्यान । प्रसन्न होईल शंकर. ॥ ७४ ॥ मग जपाचे होईल अंतीं । तुज पाशुपतशास्त्राची प्राप्ती.' । ऐसें बोलोनी व्यासमूर्ती । अंतर्धान पावली. ॥ ७५ ॥ धर्म बोले अर्जुनासीं, । 'युद्ध मांडल्या समर्थाशीं । शस्त्रास्त्र सामग्रीशीं । सिद्ध असलें पाहिजे. ॥ ७६ ॥ भीष्मद्रोणाच्या संग्रामा । मानवी शस्त्रें न येती कामा । येथें देवाची नरेंद्रोत्तमा ! । दिव्य शस्त्रें असावीं. ॥ ७७ ॥ या लागीं नर[४] पार्थिवा ! । तपें तोषवीं देवा, महादेवा । तो तुष्टल्या अस्त्रां सर्वां । निवेदील निर्धारें.' ॥ ७८ ॥ ऐकोनी अग्रजाचें वचन । उभा ठेला वीर अर्जुन । घेऊनियां धनुष्यबाण । खड्गचर्मवर्मादि. ॥ ७९ ॥ नमस्कारिले धौम्यचरणा । वंदिलें धर्मा भीमसेना । पूशिले माद्रिच्या नंदना । पांचाळीं समवेत. ॥ ८० ॥

१ लोभें. २ योगविद्या महामंत्र. ३ अर्जुनाशीं उपदेशितां नेत्र. ४ जरी

द्रौपदी म्हणे, ' प्रतापमूर्ति ! । एक वीर तूं त्रिजगतीं । करूनी शत्रुकुळाची शांति । विजयलक्ष्मी तूज वरो. ॥ ८१ ॥ सकळ देव, सकळ ऋषी । आगम, निगम, मंत्र राशी । पंचभूतें प्रसन्नेशीं[1] । जय कल्याण तुज देवोत. ॥ ८२ ॥ घेऊनि ऋषींचें आशीर्वचन । देश पर्वतें[2] उपवनें । उल्लंघुनी सरिता जीवन । उत्तर दिशेशीं चालिला. ॥ ८३ ॥ तपोवनींचे तपोधन । नमस्कारिलें ऋषि ब्राम्हण । महापुरुषांचें दर्शन । सिद्धवनीं लाधला. ॥ ८४ ॥ वोलांडिला हिमाचल । गंधमादनगिरी विशाळ । तेथूनी पुढां रत्न-कील । महापर्वत टाकिला. ॥ ८५ ॥ अनेक वृक्षांचिया दाटी । क्रूर श्वापदांचिया कोटी । उल्लंघूनी[3] किरीटी । [4]इंद्रकीलातें पावला. ॥ ८६ ॥ तेथें झाली आकाशवाणी, । ' पार्था ! राहे ईये स्थानीं, । पुढें मार्ग चालतां चरणीं । नको[6], आतां स्थिर राही. ' ॥ ८७ ॥ स्वर्गवाद्यें पडतीं श्रवणीं । वर्षाव कीजे दिव्य सुमनीं । मेघमंडळ स्पर्शली धरणी । दाही दिशा देखत. ॥ ८८ ॥ भोंवतें पाहे नर-नायक । तंव तपी[7] ब्राह्मण एक । ब्रह्मवंशीं जाणों अर्क : तपोतेजें विराजे. ॥ ८९ ॥ तो म्हणे, ' महापुरुषा ! । मिरविशी ब्राह्मणाच्या वेषा । शस्त्रें धरिलीं तो मानसा । हेतु कांहीं नेणवे. ' ॥ ९० ॥ पार्थ म्हणे, ' कार्याकारणें । केलें असे शस्त्रग्रहण, । व्हावया इंद्रदर्शन । दुरी ठाया पातलों.' ॥ ९१ ॥ संतोषोनी ब्राह्मण म्हणे, । ' देवेंद्र तो मी ऐंथें जाण, । इच्छिलें जें तुझेनि मनें । तें मज सांगे

१ प्रसन्नतेशीं. २ पर्वत वन उपवन. ३ उल्लंघूनियां वीर किरीटी. ४ बहु योजनें पोंचला. ५ धरणी. ६ नये. ७ वृक्षातळीं. ८ आंगें कृश शरीरीं जैसा अर्क. ९ च.

सभाग्या !' ॥ ९२ ॥ अर्जुन म्हणे अमरेंद्रातें, । 'दिव्य शस्त्रें द्यावीं मातें । या लागीं बहुतें कष्टें एथें । येणें जालें स्वामियां !' ॥ ९३ ॥ हांसोनि बोले पाकशासन, । 'माझें जालें दर्शन, । दिव्य भोग, स्वर्ग सदन । भोगीत राहे मजसंगीं.' ॥ ९४ ॥ अर्जुन बोले करुणा शब्दू, । 'धर्मासहित चौघे बंधू । द्रौपदी ऐशी पवित्र वधू । अरण्यवासी कष्टती. ॥ ९५ ॥ राज्य हिरोनी दुष्ट वैरी । धरा भोगिती बळात्कारीं । हेळणा छळणाचिया उत्तरीं । हृदयवर्मीं खोंचती. ॥ ९६ ॥ हें सर्व सोडून मागां । म्यां गुंतिजे स्वर्गसुखभोगा । तरी अधम पुरुष प्रसंगीं जगा । उपमे योग्य मी एक. ॥ ९७ ॥ यालागीं सर्वार्थसमर्था ! । शस्त्रें देईं मज आतां.' शक्र म्हणे तुझिया हिता । निरोपीन ते आइक. ॥ ९८ ॥ राहोनियां हेंचि स्थळीं । तपें तोषवीं चंद्रामौळी । तो भेटलिया तेचि काळीं । पुढती दर्शन म्यां देणें, ॥ ९९ ॥ ते वेळीं शस्त्रें अस्त्रें । इच्छिलीं पावशी सुपवित्रें.' । ऐसें बोलोनि सहस्रनेत्रें । आच्छादिलें आपणातें. ॥ १०० ॥ अर्जुनें स्थिर करुनि मन । धैर्य बसविलें निर्जनवनें[2] । प्रसन्न[3] होय त्रिलोचन । ऐसा यत्न मांडिला. ॥ १०१ ॥ माथां मिरवे जटाभार । दर्भांकुरीं वेढिले चीर । प्रावर्णं व्याघ्रांबर । कृष्णाजिन आसना. ॥ १०२ ॥ प्रथम मासीं तपश्चर्या थोर । तृतीय दिवशीं स्वीकारी आहार; । द्वितीय मासीं परम धीर । षष्ट[4] दिवशीं फळ भक्षीं. ॥ १०३ ॥ तृतीय मासामाजी जाण । पक्षपक्षां फळजीवन । चतुर्थ मासीं पवन[5] । निराहारी निर्जळी. ॥ १०४ ॥ खडतर तपश्चर्या निगुती । देखोनी सकळ ऋषींच्या पंक्ती । दुश्चित्त

१ होत कष्टी. २ निर्जरवन. ३ प्रत्यक्ष. ४ अष्टमादिनीं. ५ मासीं प्राशी पवन.

घेउनी शंकराप्रती । निवेदिती भयवार्ता. ॥ १०५ ॥ शंकर म्हणे, 'ऋषी हो ! ऐका, । पार्थसंकल्प मज ठाउका, । तुम्हां करावया शंका । कारण कांहीं असेना. ॥ १०६ ॥ वधावया शत्रुकुळातें । शस्त्रें मागे देवेंद्रातें, । तुम्हीं सर्वीं[१] स्वस्थचित्तें । चिंता कांहीं न करावी.' ॥ १०७ ॥ यावरी कौतुकें व्योमकेश । धरिता झाला किरातवेश । म्हणे, 'नावेक चाळवूं नरेश । पाठीं पुरवूं कामना.' ॥ १०८ ॥ सुवर्णवृक्ष सुकोमळ । किंवा साजे[२] कनकाचळ । तेथीं भासे जाम्बनीळ । कामकुरंग पारधी. ॥ १०९ ॥ भिल्लीवेशें शैलबाळी । रिद्धिसिद्धि मातृका मेळीं । सहस्र स्त्रियांचे मेळीं । महावनीं विचरत. ॥ ११० ॥ शूक नामा महाअसुर[३] । वराहरूपीं महाक्रूर । पृष्टीं भेदला असतां शर । प्राणधाकें पळतसे. ॥ १११ ॥ धनुष्यबाण सज्जूनि मुष्टी । किरात लागला दिसे पाठीं । वराह येवोनी पार्थनिकटीं । 'रक्षी' 'रक्षी' म्हणतसे. ॥ ११२ ॥ येरु मौनें जपासनीं[४] । संकेत दावी उभउनी पाणी, । परी तें नायकोनि कानीं । पारधियें वधिला. ॥ ११३ ॥ पार्थ म्हणे, पारधियातें, । 'मातें शरण आलिया एथें । विशेषं[५] वारिलियां[६] हातें । वराह कैसा मारिला ? ॥ ११४ ॥ नव्हे हा पारधियाचा धर्म; । श्रेष्ठ म्हणती हा अधर्म' । किरात म्हणे, 'तूं नरेंद्रोत्तम । परी अविवेक जल्पसी. ॥ ११५ ॥ माझिये बाणीं केला[७] स्पर्शु । माझा विभाग अरण्यपशु । तो त्वां मारिला म्हणोनी दोषू । तूं कां मातें ठेविशी ? ॥ ११६ ॥ हें वन माझें वसतिस्थान.' । पार्थ म्हणे, 'माझा बाण ।

१ असा. २ सादृश्य. ३ दनुकुमार. ४ तपासनीं. ५ वाणी. ६ निरोध. ७ केलिया.

एकट असतां पावशी मरण; । असंख्य मातें रक्षिती. ॥ ११७ ॥ माझें हेळूनियां वचन । घेतला आरण्य पशूचा प्राण, । यालागीं तुतें यमसदन । दाखवीन तात्काळीं. ॥ ११८ ॥ दोघेजणीं वाहिलीं चापें । दोघे खवळले महाकोपें, । एकमेकातें साटोपें । लक्षूनियां विंधिती. ॥ ११९ ॥ अग्नि, पर्जन्य, वात, गिरी, । वज्रें, चक्रें, गदा-प्रहारीं । पार्थ ताडितां[1] अंतरीं । सदाशिव संतोषे. ॥ १२० ॥ नाना शस्त्रें सोडितां वेगीं[2] । एकहि न लागे किरीटी[3] आंगी[3] । जेवि[4] कां नामस्मर त्या लागी[4] । दोषें[5] स्पर्श न कीजे. ॥ १२१ ॥ असंख्य बाण विंधितां हातें । रिते पडले अक्षय भाते, । पार्थ म्हणे, ' नवल एथें । आजि देखों संग्रामीं ! ॥ १२२ ॥ माझिया बाणांचा आघात । साहों न शकती देव दैत्य । तें आजि झालें सर्व व्यर्थ । एकही न लागे तयातें. ॥ १२३ ॥ मेघवृष्टी होता प्रबळ । [6]चळे न ढळे जैसा शैल । तेंवी निश्चल जाश्वनीळ । पार्थबाण प्रकटतां[7]. ॥ १२४ ॥ कां निंदेचे[8] घाय तिखट । एकही न मनीं ब्रह्मनिष्ठ; । तेंवी निवांत नीळ-कंठ । अर्जुनास्त्र लागतां. ॥ १२५ ॥ पार्थें मानूनी कौतुक । म्हणे, ' हा होईल त्रिपुरांतक । त्यावांचूनी माझे सायक । कोण साहे त्रैलोक्यीं ! ॥ १२६ ॥ वर्षला शरांचा[9] पाऊस । देखोनी तोषला व्योमकेश, । अर्जुना नावरे आवेश । बाहुयुद्धा मिसळला. ॥ १२७ ॥ मल्लयुद्धीं आंग कवळी, । वज्रमुष्टी ताडितां बळी । अधिक तोषोनी चंद्रमौळी । ' भला रे ! भला ' म्हणतसे. ॥ १२८ ॥ किरातराजें

---

१ तोडितां. २ ताडितां वेगें. ३ लागे आंगें. ४ जैसें नामस्मरणें भंगे. ५ पातकांचा पर्वत. ६ न ढळे महा शैल. ७ झगटतां. ८ कामनेचे. ९ शिळांचा.

तयेकाळीं । पार्थ कवाळितां बाहुजाळीं । मूर्च्छा पावोनी भूतळीं । अचेतन पडियेला. ॥ १२९ ॥ सवेंचि सावध होउनी वेगा, । पूजा मांडिली पार्थिवलिंगा, । पारधी अंतरा ठाकोनी[1] उगा । चोज दृष्टी पाहातसे. ॥ १३० ॥ पार्थिवलिंगीं पुष्पांजली । वोपिली ते किरात-मौळीं । दृष्टी देखोनी चंद्रमौळी । सिद्धसंकेतें[2] शोधला. ॥ १३१ ॥ जाणवलें अंतर्यामीं । 'म्हणे, हा हो शंकरस्वामी.' । लोटांगणें[3] घालूनी अंतर्यामीं । स्तुती मुखें वदतसे. ॥ १३२ ॥ 'कपर्दी ! सर्वदेवेश ! भव ! । अंगारनेत्र ! श्रीशिव ! । देवदेव ! महादेव ! । नीलग्रीव ! जटाधारी ! ॥ १३३ ॥ तूंची कारण परम । विभू त्र्यंबक ! सर्वो-त्तम, । देवत्रया विश्राम । आनंदधाम तूं एक, ॥ १३४ ॥ लीले करिशी विश्वजनन । कृपादृष्टी प्रतिपालन । प्रळयीं करूनी सर्व दहन । शेष उरशी तूं एक. ॥ १३५ ॥ शिव म्हणतां विष्णु जाण, । विष्णु म्हणतां तूं महेश पूर्ण; । नोळखोनी मूढ श्राम । भेदवादें भुंकती. ॥ १३६ ॥ दक्षयज्ञविनाशना ! । हरिहरा ! ललाटनयना ! । कृपा करावी परम दीना । शरण चरणां मी स्वामिया ! ॥ १३७ ॥ देहभिमानें देहाच्या[4] उर्मीं । नकळत मिसळलों जी ! संग्रामीं, । तवं[5] तूं पतितपावन नामीं । क्षमा[6] करीं दासीं या.' ॥ १३८ ॥ ऐसें ऐकोनी स्तवन । संतोषला गिरिजारमण, । परम प्रीती आलिं-गन । पार्थालागीं दीधलें. ॥ १३९ ॥ म्हणे, 'पूर्वीं त्वां स्वधर्मीं । नारायणसमागमीं । तपश्चर्या बदरिकाश्रमीं । बहुकाळ त्वां केली. ॥ १४० ॥ भूभार फेडावया[7] लागीं । अवतरलासी कृष्णसंगीं । निर्मळ

---

१ पाहोनी. २ संकल्प साधला. ३ नमस्कारुनीया भूमी ४ भ्रमाच्या. ५ तें. ६ क्षेम. ७ वेगीं.

भजनें युगानुयुगीं । आराधिलें त्वां मज. ॥१४१॥ भक्तिनें तोषविलें मातें, । कृपेनें पावलों तुतें । जें इच्छिजे तुझेनि चित्तें । तें मज मागें पवित्रा !' ॥१४२॥ कवळूनियां उभय चरणां । अर्जुन म्हणे, 'मल्लिकार्जुना ! । पूर्वी कार्तवीर्यअर्जुना । वधविलें ज्या परी. ॥ १४३ ॥ प्रसन्न झालां श्रीरेणुकासुता । तैसेचि कौरवांच्या घाता । या लागीं मातें कुमारतांता ! । साहाय्य झालें पाहिजे. ॥ १४४ ॥ अस्त्र तुझें अत्यद्भुत । ज्यातें म्हणती पाशुपत । तें मज देऊनी सनाथ । स्वामीनें केलें पाहिजे.' ॥१४५॥ वरद हस्त ठेवूनियां माथां । शंकर म्हणे, 'कुंतीसुता ! । माझिया कृपे पाशुपता । अस्त्रालागीं देतसें. ॥ १४६ ॥ इंद्र चंद्र यम वरुण । सूर्य कुबेर अथवा वरुण । बहु काळ कष्टतांही जाण । प्राप्ति याची न पावती. ॥ १४७ ॥ ब्रह्मशिरोनामास्त्र । माझें रहस्य परम सार, । प्रळयीं सोडूनी संहार । जेणें करीं विश्वाचा. ॥ १४८ ॥ तें देतसें कृपें करीं । त्वां न घालावें कवणावरी, । परम निर्वाण अवसरीं । स्मरण त्याचें करावें. ' ॥ १४९ ॥ शुचिर्भूत झालिया पार्थ । श्रीगुरुमौळ स्पर्शी हातें, । मंत्र उपदेशितां तेथें । अत्यद्भुत वर्तलें. ॥ १५० ॥ निघतां शंकरमुखांतुनी । कोटी सूर्य झळकती गगनीं । जेंवी प्रळयकाळीं प्रळयाग्नी । गगन व्यापूनी कोंदला. ॥ १५१ ॥ कंप झाला भूमंडळा, । भंवडी दाटली कुलाचळां । एकार्णव सिंधुजळा । मेघमाळा उसळती. ॥ १५२ ॥ ते वेळीं नाना ध्वनी वाद्यें । उभय लोकीं लागलीं विविधें, । हर्षे वृंदारकांची वृंदें । कनकाब्जें सांडिती. ॥ १५३ ॥ सूर्य सांठवे

---

१ मनें. २ सांग. ३ वधावया. ४ तैसेंची करावया कौरवांच्या. ५ नीलकंठा. ६ वर्षती.

समुद्रजळीं । तेंवी पार्थाच्या हृदयकमळीं । अस्त्र सामावलें ते काळीं । जयजयकार सुरातें. ॥ १५४ ॥ प्रेरण आणि निवारण । लाहोनी उभयविद्याधन । कृतकृत्यता अर्जुन । प्रसन्नपणे मानसीं. ॥ १५५ ॥ यापरी अर्जुनाच्या हृदयीं । शिवप्रसाद पावला ठायीं । सर्व अस्त्रविद्या पायीं । मूर्तिमंत लोळती. ॥ १५६ ॥ नमस्कारिला त्रैलोक्यगुरु । कृपेनें ठेविला मस्तकीं करु, । वरद वदे गिरिजावरु । अर्जुनातें आवडी. ॥ १५७ ॥ 'करूनी भूमंडळ निःक्षत्री । राज्य पावशी एकछत्री' । वरदाक्षर हृदयमंत्रीं । पार्थभावें रेखिलीं. ॥ १५८ ॥ ऐसें बोलोनी तेचि क्षणीं । अदृश्य झाला शूलपाणी. । अर्जुन म्हणे, 'त्रिभुवनीं । धन्य धन्य मी एक.' ॥ १५९ ॥ यापरी अस्त्र पाशुपत । शिवापासुनी पावला पार्थ, । यावरी वर्तलें तें - संत । निरूपण परिसोत. ॥ १६० ॥ इति श्रीमन्महाभारत । लीलाविश्वंभरानुगृहीत । मुक्तेश्वराचे वचनार्थ । श्रोतीं सादर परिसावे. ॥१६१॥

---

## अध्याय पांचवा

शंकर गेलिया स्वस्थाना । आवडी पार्थाचिया दर्शना । लोकपाळ कुरुभूषणा ! । पातले ते परियेसा.॥ १ ॥ वैडूर्यवर्ण विराजवंत, । दिव्य पुष्पीं सुशोभित, । जळेश्वरगणीं परिवारित । वरुण राजा पातला. ॥ २ ॥ रत्नकिरीट रत्नमाळा, । विमान यानीं भाग्यागळा, । यक्षगणेशीं धरित्री पाळा! । धनेश्वरू पातला ॥ ३ ॥ यावरि

---

१ आवरण. २ मानिता झाला प्रसन्न मनें. ३ त्रैलोक्यनाथ गुरु. ४ वरदवरें सुहृद मंत्रीं. ५ पार्थी भावें रक्षीं कां. ६ तोचि स्थानीं.

आदित्याचा तनय । धर्मराज अपरसूर्य । पवित्रां करुणा[1]वरुणालय । प्रळयानळ दुष्टांतें. ॥ ४ ॥ तो दंडपाणी कृपामूर्ती । स्नेहें पावला पार्थनिकटीं, । म्हणे, 'जें इच्छिशीं अस्त्र पोटीं । तें देईन जाण पां.' ॥ ५ ॥ श्वेत कुंजर चतुर्दंत । रत्नभूषणीं घवघवीत । आरुढोनी अमरनाथ । पुत्रमोहें पातला. ॥ ६ ॥ यमें दंडास्त्र दिधलें हातीं, । वरुणें पाश दिधले हातीं, । कुबेरें कुबेरास्त्र प्रीती । शंकरदत्त दीधलें. ॥ ७ ॥ त्रिपुर दंडिला त्रिनेत्रें, । तेची कृपेनें त्र्यंबकमंत्रें । देउनी म्हणे, 'येणें मंत्रें । भार फेडी महीचा.' ॥ ८ ॥ प्रयोग उपसंहार मंत्रेंशीं । अस्त्रें दीधलीं अर्जुनाशीं । आलिंगूनी सुख संतोषीं । आशीर्वचन दीधलें. ॥ ९ ॥ देवेंद्र म्हणे, 'गा! नंदना! । आले पाहिजे पितृसदना, । तेथें आवडे जें जें मना । तें तें अस्त्र लाधशी.' ॥ १० ॥ ऐसें सांगोनी चौघीजणीं । ऊर्ध्वपंथें निघाले गगनीं । अर्जुनाप्रती तोचि क्षणीं । सूत मातली पावला. ॥ ११ ॥ दाहा सहस्र वारु श्वेत, । शतसहस्र चक्रीं चक्रादित्य, । विजा मीनल्या एक शत । तेंवी पताका झळकती. ॥ १२ ॥ शस्त्रें भरलीं खणोखणीं । ऐसा रहंवर पातला धरणी,[2] । सारथियें जोडुनीयां पाणी । म्हणे, 'पार्था वळघावें. ॥ १३ ॥ स्नेहें पाचारिलें जनकें । पितृआज्ञा चालिजे सुखें, । सर्व भोगांचीं कौतुकें । विलोकावीं सभाग्या!' ॥ १४ ॥ आज्ञा वंदूनिया अर्जुन । नमस्कारीं तपोधन, । सिद्धवनींचे सिद्धगण । परम भक्ती नमियेले. ॥ १५ ॥ स्तवनीं पूजियेला मंदराचळ । कंदमूळ फळ जळ । देऊनियां बहुत काळ । प्रतिपाळिलें धार्मिका. ॥ १६ ॥ आज्ञा मागोनी बैसला रथीं, । मनोवेगें गगनपंथीं, ।

---

१ करुणा करी स्वयें. २ चालिला क्षितीं.

चालता विमानांचिया पंक्ती[1] । चित्रविचित्र देखतु. ॥ १७ ॥ हंसमंडळें, मेघमंडळें[2] । देवगंधर्वांचीं स्थळें । उल्लंघूनी सुकृतबळें । अमरावती टाकिली. ॥ १८ ॥ चंद्रसूर्यांविण प्रकाश । नेणवे रजनी अथवा दिवस । गगन[3] भरूनि सुवास । दाहीं दिशा कोंदल्या. ॥ १९ ॥ मनुष्यलोकींहुनीं । ज्या तारका दिसती नयनीं[4] । तया नक्षत्रांचिया श्रेणी । समीप डोळां देखतु. ॥ २० ॥ राजऋषी, देवऋषीं, योग सिद्ध, तपोराशी, । स्वर्गसंपदाविलासी । विमानयानीं क्रीडती. ॥ २१ ॥ युद्धीं[5] समरंगणीं पडिलें, । तपें स्वर्गातें जिंतलें । ते लोचनीं देखिले । लक्ष कोटी अर्जुनें. ॥ २२ ॥ श्रीरत्नशिखरांचा[6] पर्वत । तेंवि देखिला ऐरावत, । चंद्रकिरणीं चतुर्दंत । दानोदकीं[7] जलधरु[8]. ॥ २३ ॥ नंदन-वनादि नाना वनें, । सर्वदा देती फळें सुमनें । वसंत कुसुमाकर आपण । माळाकार ते ठायीं. ॥ २४ ॥ जें सेविजे अप्सरागणीं[9] । तें सेविजे तपोधनीं । सदा[10] सत्य वदले वाणी । ते ते स्थानीं वासि-नले. ॥२५॥ तपें[11] रहित यज्ञरहित, । युद्धीं पळोनीं वांचवीं जीवित, । जे व्रत[12], दान[12], धर्मरहित, । ते तेथें[13] न पावती. ॥ २६ ॥ वेदश्रुती[14]-सन्मार्गरहित, । पुराणश्रवणरहित[15], । हरिहर प्रातिमार्चनरहित[16], । तेथें न पावती. ॥ २७ ॥ नाना तीर्थोदकीं जाण, । घडलें नाहीं स्नान[17] दान, । पर्वकाळीं[18] नेदिती दान । ते तें स्थान न पावती. ॥ २८ ॥

---

१ दीप्ती. २ गगनमंडळें. ३ गगनी भरोनीं दिव्य सुवास. ४ गगनीं. ५ युद्धीं आपल्या निश्चये पडले; युद्धीं अपलायनीं पडले. ६ रत्नशिखरांचा. ७ मदोदकीं. ८ जळधार. ९ अमरगणीं. १० युद्धकृपण प्राणदानीं. ११ तप-रहित. १२ प्रतिदिनीं. १३ तें स्थान. १४ श्रुतिस्मृतिसन्मार्गरहित. १५ श्रवणस्मरणरहित. १६ प्रतिमाविरहित. १७ स्नानपान. १८ सर्वकाळीं.

जे नताळती परोपकारी । श्राद्धीं उपवास पाडिती पितरां । विक्रयवृत्ति[1] भोगिती दारा, । ते शक्रागारा न पावती. ॥ २९ ॥ अपरात्रीं भोजन, मद्यपानी, । गुरुतल्पग, गमनागमनी,[2] । ऐसे दुरात्मे तये स्थानीं । वाळुनियां दवडिले. ॥ ३० ॥ असो. देव, गंधर्व, परिवारें । सिद्ध महर्षि[3] अत्यादरें । येउनी पार्थासीं सामोरे । पूजिते झाले आवडी. ॥ ३१ ॥ इंद्राज्ञेनें अमरगणीं । विचित्र वाद्यांचा ध्वनी, । राजमार्गे सुरपत्तनीं[4] । जयजयकारीं मिरविला. ॥ ३२ ॥ अमरावतीचिये जनीं । अर्जुन अवलोकितां नयनीं, । म्हणती 'हा ही[6] इंद्रासनीं । राजा होय आमुतें.[7] ॥ ३३ ॥ विजयी वीर्यवंत[8] सहोदर । पितयापरिस प्रतापी थोर, । इंद्रासनीं राज्यधर । राज्यपदीं विभागी ॥ ३४ ॥ छत्र चामरें विराजवंतु । भद्रासनीं अमरनाथु, । पार्थें सांडुनिया रथु । नमन केलें साष्टांगीं. ॥ ३५ ॥ पित्यानें बाहु पसरोनी मोहें । आलिंगिलें परम स्नेहें, । मूर्द्धा अवघ्राण लाहे । सिंहासनीं आरूढें. ॥ ३६ ॥ आवडी बसवूनी अंकीं । प्रीती मुखातें अवलोकी । वारंवार म्हणे, 'सुखीं कीं ?'। 'पुत्रा ! क्षेम असशी कीं ?' ॥ ३७ ॥ कनकताटीं देवांगनीं । ओवाळिलें रत्नकिरणीं, । दुजा इंद्र ऐसा नयनीं । आभासाला जनातें. ॥ ३८ ॥ साध्य विश्वेदेव[9] रुद्रादित्य[10] । ब्रह्मऋषी असंख्यात, । हे सर्व मिळोनियां तेथें । राजऋषी भेटले. ॥ ३९ ॥ दिलीपप्रमुख राजनृपती, । नारद तुंबुरु गंधर्वपंक्ती[11] । हाहा, हूहू परमभक्ती । वोळगती पार्थातें. ॥ ४० ॥ घृताची, उर्वशी, मेनका, रंभा । पूर्वचित्ती स्वयंप्रभा । मिश्रकेशी, जनवल्लभा, । स्वर्गांगना मुख्यत्वे.

---

१ विष्णुवृत्ति; विष्णुवृत्ती. २ मांसाशनी. ३ महेश. ४ इंद्रासनीं. ५ पाटणीं. ६ होय. ७ आमुचा. ८ जयवंत. ९ वैवस्वदेव. १० मारुत ११ गंधर्वपती.

॥ ४१ ॥ दंडगौरी, वरूथिनी, । गोपाळी सहजन्या कुंभयोनी, । प्रजागरा, चित्रसेनी, । चित्ररेखा विचित्रा. ॥ ४२ ॥ नृत्य, गायन, नाना कळा । दाविती पार्थाचिया डोळां । देव गंधर्वी दिव्यमाळा । दिव्यगंधीं[1] पूजिला. ॥ ४३ ॥ शक्रें[2] धरूनि[2] पार्थ । स्वयें[3] नेला शक्रगृहांत[4] । वज्रास्त्रादि असंख्यात । दिव्यशस्त्रें दीधलीं. ॥ ४४ ॥ जे[5] सामग्री द्रोणाभीष्मा । जे सामग्री भार्गवरामा । जे कळा नेणें अश्वत्थामा । [6]ते सुत्रामा देई पुत्रा ! ॥ ४५ ॥ इंद्रगृहीं इंद्रपंक्ती[7] । पांच वर्षें केली वस्ती, । नाना उपचार संपत्ती । इंद्रातुल्य भोगिल्या. ॥ ४६ ॥ स्त्रीसंयोग करुनी भिन्न । दिव्य भोग भोगिले गहन, । जैसा ब्रह्मनिष्ठ आपण । वासनातीत[8] प्रपंचीं. ॥ ४७ ॥ पांच वर्षें लोटल्या पूर्ण । स्वर्गभोगीं विटलें मन; । करिता जाला आठवण । धर्मादिकां बंधूंची. ॥ ४८ ॥ कौरवांचे दुष्ट अपराधू । मनीं आठवुनी मानी खेदू, । स्वर्गवाससुधास्वादू[9] । विषप्राय अवगमे. ॥ ४९ ॥ चित्रसेनगंधर्वसंगीं । नृत्य, गायन, कळा, रंगीं । निपुण जाला जैसा योगी । सिद्धि पावे अभ्यासें. ॥ ५० ॥ शक्र म्हणे चित्रसेनातें, । 'पार्थ पावला स्वर्गसुखातें । परंतु उर्वशीअंगसंगातें । अद्यापि नाहीं स्पर्शला. ॥ ५१ ॥ शतयागांचीं[10] शत[11] नौणीं[11] । वेंचोनि पवित्र तपोधनीं[12] । उर्वशीकामसदनीं । सुरतानंदें क्रीडत. ॥ ५२ ॥ पावोनियां[13] दिव्य स्वर्ग । नाहीं उर्वशीसंगभोग[14] । जेवि भोजनेंवीण व्यंग । सर्वोपचार वाउगे.

१ दिव्यास्त्रें दिधलीं. २ 'हात धरूनिया.' ३ शक्रें. ४ स्वगृहांत. ५ संग्रामी जे. ६ त्या शस्त्रा मी देई; तें सुता मी देई; तें इंद्र दे पुत्रातें ७ इंद्रप्रीतीं. ८ वसताती. ९ स्वर्गवासाचा सुस्वादू. १० संयोगाचीं. ११ शतयाग, सूत्रामणी. १२ तपोवनीं. १३ पावूनि स्वर्गसुख सांग. १४ उर्वशीचा भोग.

॥ ५३ ॥ यालागीं तुवां चित्रसेना ! । शोधूनियां स्वर्गांगना । पाठवीं अर्जुनाचिया शयेना । अंगसंगा साक्षेपें. ॥ ५४ ॥ शिष्यासी स्वरूपानंदप्राप्ती । तेणें सुखावे सद्गुरु चित्तीं; । तेंवि उर्वशीभोगसुखांतीं । परम लाभ मी मानीं. ' ॥ ५५ ॥ देवेंद्र-आज्ञेनें उर्वशी । भोगोपचार सामग्रीसी, । आली अर्जुनशय्येपाशीं । निशासमयीं संतोषें. ॥ ५६ ॥ येऊनि बैसतां अंकावरी, । येरू सत्वर ठाकला दुरी, । 'त्राहें त्राहें' म्हणोनि करीं । आच्छादिलें नेत्रातें. ॥ ५७ ॥ पुरूरव्याची भोग्य कांता, । पौरववंशाची तूं माता, । काम-संकल्प धरितां चित्ता । मातृगमन रोकडें. ॥ ५८ ॥ कुंती, माद्री, इंद्रायणी । तयां तुल्य तूं आमुची जननी । वंशज पुत्र ऐसें मनीं । त्वांहि धरिलें पाहिजे.' ॥ ५९ ॥ ऐकोनी अर्जुनाचे वचन । उर्वशी जाली कोपायमान, । म्हणे, 'पुरुषत्व जाउनी हीन । षंढ हो मच्छापें. ॥ ६० ॥ हारपोनी पुरुषवेख । लागेल स्त्रीवेषाचा कलंक, । 'बृह-न्नडा' ऐसें सर्व लोक । नाम तूतें ठेविती. ॥ ६१ ॥ कंचुकी नीवी बंधासेनीं, । मस्तकीं पल्लव, पाटी वेणी, । ताटंक कर्णीं कर कंकणीं । वर्ष एक वर्तसी. ॥ ६२ ॥ नाटकशाळेचिया नारी । नाचविसी नाना कुसरी । याहुनी जघन्यता थोरी । सांग श्रेष्ठा ! कोणती ?' ॥६३॥ आपुनी गेलिया उर्वशी । अर्जुन पातला इंद्रसभेसी; । शक्र जाणोनिया मानसीं । शांतवीत पुत्रातें. ॥६४॥ 'होणार तैसीच प्रारब्धगती । घडे ऐसें जाणोनी निरुती, । ईश्वरइच्छा मानुनी चित्तीं । विषाद कांहीं न मानावा. ॥ ६५ ॥ नष्टचर्य येक वरुष । विराटगृहीं घडेल यास.

१ गा ! २ सदना. ३ सखी. ४ बालक. ५ बंधवसनी ६ वसन ७ निरुती. ८ विराटगेही. ९ वास.

तेथे धरूनियां अंगनावेष । गुप्त असिलें पाहिजे. ॥ ६६ ॥ यालागी, ईश्वरें रचिली युक्ती; । तुवा असावें स्वस्थचित्तीं । म्हणोनी आलिंगुनी प्रीती । अर्धासनीं बैसविलें. ॥ ६७ ॥ तंव लोमेश तपस्विराज । शक्रसभेसी पातला सहज । अर्धासनीं बैसला धर्मानुज । देखोनी बोले इंद्रासी ॥ ६८ ॥ 'बैसावया न[१] सकेताती मुनी । तेथे हा मानव अर्धासनीं । बैसला हे विचित्र करणी । तुझी देखों सुरेंद्रा !' ॥ ६९ ॥ सुरेश म्हणे, 'मज समान । माझा पुत्र हा अर्जुन, । अर्धशरीरी नारायण । [२]नरावतार जाण पां. ॥ ७० ॥ भूभार फेडावया लागीं । अवतरलासे कृष्णासंगीं, । इंद्रपदाचा विभागी । बैसावया अधिकारी. ॥ ७१ ॥ निवातकवच निवटावया । आणिलासे यया ठायां । मातें न कंठे त्या कार्या । करूं सके सामर्थ्यें. ॥ ७२ ॥ लोमशा ! माझिया आज्ञा । तुवां [३]जावें काम्यकवना, । आदरें कुंतिचिया नंदना । धर्मराजासीं भेटावें. ॥ ७३ ॥ माझा निरोप सांगिजे त्यातें । कीं अर्जुन सुखे असे येथें; ॥७३॥ कार्य साधूनियां [४]तूतें । शीघ्रकाळें भेटेल.' ॥ ७४ ॥ ऐसें होता आज्ञावचन । भूतळा पातला तपोधन । काम्यकवनीं कुरुनंदन । [५]बंधूसहित देखिला. ॥ ७५ ॥ [६]जनमेय राजा नृपती । म्हणे, 'वैशंपायना ! सुमती । अर्जुन शक्रलोकाप्रती । गेला ऐकोनि कौरव ॥ ७६ ॥ काय करिते जाले सकल । तें मज सांगावें अविकळ ।' वक्ता म्हणे, 'ऐक कुशल । चक्रवर्ती सुजाणा ! ॥ ७७ ॥ व्यासाज्ञेनें संजर्य मुनी । धृतराष्ट्रातें जाणवी वचनीं, । म्हणे, 'राजा !

---

१ शंकती २ अवतारमूर्ती जाण पां ३ जाऊनि· ४ तुम्हांतें. ५ वधूसहित. ६ जनमेजय राजनृपती. ७ पाल्हाळ; करोनि विह्वळ. ८ जैमिनी.

विचित्र करणी । सुपुत्राची परियेसी[1]. ॥ ७८ ॥ मनुष्यलोकींचा नरनायक । येणे शरीरें स्वर्गसुख । भोगोनी पातला तो एक । अर्जुन नामा ये[2] लोकीं. ॥ ७९ ॥ अर्जुन जाऊन मंदराचळ । त्यागुनी कंदमूळफळ, । प्रसन्न[3] केला जाश्वनीळ; । पाशुपत[4] लाधला. ॥ ८० ॥ कृपेनें पावला शंभू, । अनुग्रहार्थ दाविला क्षोभू, । दिव्य पाशुपताचा लाभू । तया पासाव पावला. ॥ ८१ ॥ इंद्र, वरुण, यम, कुबेर, । दर्शना पातले सत्वर; । अस्त्रं प्रसाद देउनी वर । देते झाले समस्त ॥८२॥ मातली पाठवुनी प्रीती । शक्रें नेला स्वस्थळाप्रतीं; । पांच वर्षे केली वस्ती । स्वर्गभोगवैभवें ॥ ८३ ॥ वज्र अस्त्रादि दिव्य अस्त्रें । कृपेनें दीधलीं देवें शक्रें । येणें शुत्रु-कुळाची गात्रें[5] । खंड विखंड[6] तू करिसी[6]. ॥ ८४ ॥ तुझिया दिव्या-स्त्रवैश्वानरीं । धृतराष्ट्र सहपरिवारीं । भस्मतील वरद्योत्तरीं[7] । शक्र म्हणे पार्थातें. ॥ ८५ ॥ अस्त्रलाभ, स्वर्गसुख, । शक्रसभेसी मान अधिक । तथापि अर्जुनहृदयीं दुःख । अत्यद्भुत नावरे. ॥ ८६ ॥ धृतराष्ट्रसुतविरुद्धकरणी[8] । स्मरतां[9] धडके प्रतिक्षणी, । धुधुंःकार[10] सांडितां पातला फणीं । तेवीं क्रोधे धुधुःकारे. ॥ ८७ ॥ वर्णी धर्मा-चिया शांतवना । कृष्ण पातला काम्यकवना, । द्यूत ऐकोनी धृष्टद्युम्नां क्रोध अद्भुत नावरे. ॥ ८८ ॥ शपथ करून गेले सकळ । चतुर्दश वर्षी कौरवकुळ । निर्मूळ करूनी पृथ्वीतळ । धर्मराजा वोपणे. ॥८९॥ मज पाहतां कुरुनरेशा ! । ऐसेचि घडेल चवदा वरुषां ; । यासि परिहार

---

१ परियसी. २ त्रैलोकीं. ३ तपश्चर्या फळल्या. ४ कल्पलतेसारख्या. ५ शत्रूची गात्रे. ६ करशील. ७ धृतराष्ट्रासह पुत्र परिवारी. ८ तव पुत्राची विरोधकरणी. ९ स्मरोनि भडके प्रतिदिनी. १० फुत्कार सांडी पातळ फणी.

महापुरुषा ! । माझि दृष्टीं दिसेना.’ ॥९०॥ धृतराष्ट्र म्हणे संजयातें । ‘[1]हें घडलें दिसे मातें । कैसीं चौदा वरुषें तेथें[2] । दुखार्णवीं बुडालीं. ॥९१॥ मातें पातलियां मरण । करणें नलगे देहदहन । आंगींच्या अस्थी जाल्या चूर्ण । चितानळें जाण पां.’ ॥ ९२ ॥ जन्मेजय म्हणे ‘ ऋषी ! । द्वादश वर्षें [3]वनवासी । असंख्य ऋषि तपोराशी । बंधुपत्नीसमवेत. ॥ ९३ ॥ काय भक्षुनी वांचलें वनीं । हें मज सांगा [4]विस्तारें करूनी.’ । वक्ता म्हणे, ‘ ऐक श्रवणीं । धैर्य सत्व वडिलांचें. ॥ ९४ ॥ अरण्यफळें नानिविधें । [5]विहित पशू आणि श्वापदें । मांसें आणुनी ब्राह्मणवृंदें । द्वा[6]दश वर्षें पाळिलीं. ॥ ९५ ॥ तृप्त जालिया सकळ मुनी । पांचां[7] तोषवी भोजनीं, । उरलेनि शेषें याज्ञसेनी । देह रक्षी आपुलें. ॥ ९६ ॥ अस्त्रप्राप्तीलागीं पार्थ । शक्रलोकीं राहिला स्वस्थ; । त्याचेनि वियोगें दुश्चित्त[8] । भीमसेन विलापे[9]. ॥ ९७ ॥ ‘ अर्जुना ऐसा बंधु सगुण । केव्हां देखती माझे नयन ? । तया न देखतां प्राण । [10]जाऊं पाहे तात्काळ. ’ ॥ ९८ ॥ धर्म म्हणे, ‘ राहें स्वस्थ; । शीघ्रचि भेटेल विजयी पार्थ, । कष्टकाळ हा समस्त । सरत आला जाण[11] [11]पां. ॥ ९९॥ करूं शत्रूचा निःपात । पुरती तुमचे मनोरथ ’ । ऐसें बोलतां धर्म तेथें । बृहदश्वा पातला. ॥ १०० ॥ नमस्कारुनी ऋषिश्रेष्ठा । आसन वोपिलें प्रतिष्ठा; । मग म्हणे, ‘[12]माझिया [12]कष्टा । समान कोणी दिसेना[13]. ॥१०१॥ राज्यहानी,

१ आजचि घडे वाटे मातें. २ येथें ३ अरण्यवासी. ४ विस्तारूनी. ५ विहित पशूची सुस्वादें ; मांसें आणुनि विनोदें. ६ ब्रह्मवृंदें. ७ भ्रतार. ८ दुःखयुक्त. ९ प्रलापे. १० जाऊं पाहति. ११ शेवटीं. १२ सांग माझिया कष्टा १३ देखिला.

अरण्यवासू , । बंधुवियोगाचे क्लेशु, । मज समान दुसरा मनुष्य । दुःखी नाहीं 'त्रिभुवनीं.' ॥ १०२ ॥ बृहदश्वा वदे त्यातें, । दुःख पाहतां मागिलांचें । मेरुपुढें सर्षपाचे । तेंवि तुमचें अवगमे. ॥१०३॥ तुझें अरण्यवासीचें सुख । स्वर्गीं नेणती सुरनायक; । तें तूं दुःख म्हणसां मूर्ख । परम हरिख तव संगीं. ॥ १०४ ॥ संगीं द्रौपदी-सारखी वधू । सेवा करिती चौघे बंधू । ऋषीसंगीं विनोदू । कौतुकें काळ जातसे. ॥ १०५ ॥ अरण्यवासामाजी जाण । नित्य लक्षद्विज-भोजन । तूतें दरिद्री म्हणे कोण? सत्य जाण कुरुवर्या ! ॥ १०६ ॥ आत्मचर्चा ग्रंथश्रवण । साधु पुरुषाचे दर्शन, । पवित्र 'तीर्थोदकीं स्नान, । जगीं ते धन्य वनवासी. ॥१०७॥ ऐके नळराजाचे परम कष्ट । ऐकतां होय हृदयस्फोट; । तितुके भोगुनी वरिष्ठ । चळला नाहीं स्वधर्मी.' ॥ १०८ ॥ आतां बृहदश्वा आपण । निरोपील नलोपाख्यान । तेची कथा करावी श्रवण । मुक्तेश्वर कवि वदे. ॥१०९॥

---

## अध्याय सहावा

बृहदश्वा म्हणे, 'धर्मा ! । ऐके नळाचा सत्वमहिमा । ज्याचेनि स्मरणें दुष्ट कर्मा– । पासाव सुटती प्राणिये. ॥ १ ॥ पुण्यश्लोकां-माजी पहिला । सत्यशील सत्वाथिला । उपमे बोलावया बोला । दुजा नाहीं ब्रह्मांडीं. ॥ २ ॥ नैषधदेशींचा नृपवर । वीरसेन नामें राजेश्वर । नळ नामा त्याचा कुमर । जो अवतार अग्नीचा. ॥ ३ ॥

१ ब्रह्मांडीं. २ वाटतें. ३ अरण्य वस्तीचें. ४ तुतें दुःखी म्हणती मूर्ख. ५ तीर्थोदक सेवन. ६ ढळला. ७ हरिश्चंद्राख्यान-काव्येतिहास संग्रहप्रत. ८ नळाची. ९ सत्वशील.

सुरमंडळीं सहस्रनयन । ग्रहमंडळीं सहस्रकिरण । पाताळभुवनीं सहस्र-वदन । तेंवी तो मान्य भूतळीं. ॥ ४ ॥ अक्षय्य[1] तारुण्य रसाळा । कोटीकंदर्पसौंदर्यपुतळा । चतुर्दश विद्या चौसष्ट कळा । विश्रामल्या त्या[2] देहीं ॥ ५ ॥ असिष्ठ द्रढिष्ठ[3] बळिष्ठ । चक्रवर्तीमाजी श्रेष्ठ । ज्याचे आज्ञेचा अखंड[4] पट । वेष्टुनीं[5] मिरवे मेदिनी. ॥ ६ ॥ अक्षहृदय अश्वहृदय । जाणे वीरसेनतनय । जगीं सर्वज्ञतेचा सूर्य । प्रतापकळीं[6] प्रकाशे. ॥ ७ ॥ न्यायें प्रजांचें पाळन[7] । प्रतापें शत्रुकुलाचें दमन । विनयें साधूचें संरक्षण । शीळ वर्तनें[8] सर्वदा. ॥ ८ ॥ विदर्भदेशीं राजा भीम । धरूनि संततीचा काम । दमननामा ऋषिसत्तम । आराधिला सद्भावें. ॥ ९ ॥ संतोषोनी परम ऋषी । वर वोपिला स्त्रीपुरुषीं[9] । एक कन्या लावण्यराशी । पुत्रत्रय[10] प्रसवली. ॥ १० ॥ दमयंती कन्यारत्न । दम दांत आणि दमन । चारी अपत्यें देखोन । विदर्भ राजा संतोषे. ॥ ११ ॥ दमयंती समसमान । भुवनत्रयीं आन[11] रत्न । नाहीं नाहीं ऐशी आण । सरस्वती वाहतसे. ॥ १२ ॥ दमयंतीची अपर प्रतिमा । करूं भाविता कमळजन्मा । निर्मू न शके जितें ब्रह्मा । दुजें[12] रूपें[12] न करवे. ॥ १३ ॥ पतिव्रता सुशीळ सुंदरा । दमयंतीतुल्य नरेश्वरा । 'नाहीं नाहीं' या उत्तरा । प्रत्युत्तर असेना[13]. ॥ १४ ॥ उपजत भाळीं रत्नमणी । अमृतश्रवा[14] पवित्र वाणी । नित्य नूतन लक्षणी । जाति पद्मिनी सुमध्यी[15]. ॥ १५ ॥ अहल्या द्रौपदी

---

१ साक्षात् तारुण्य रूप आगळा. २ तयाच्या. ३ विष्णुसेवे दृढ. ४ अक्षय. ५ वेढुनी. ६ चातुर्य. ७ प्रतिपालन. ८ वर्तन. ९ स्त्रीपुरुषासी. १० कुमारत्रयें. ११ अंगना आन; अंगनारत्न. १२ दुसरें स्वरूप. १३ असेचिना. १४ अमृतश्रवती पवित्र पाणी, १५ सुमध्यमा.

सीता तारा । पांचवी मंदोदरी चतुरा[1] । त्यांचे महिमेचा दांडोरा[2] । भुवनत्रयीं न समाये. ॥ १६ ॥ पतिव्रता ज्या शिरोमणी । त्यांची विचित्र काहाणी । ते विस्तारें वदोनी वाणी । दोषी करणें कासया ? ॥ १७ ॥ रंभा उर्वशी तिलोत्तमा । सौंदर्यसुवर्णरसाच्या प्रतिमा । दमयंतीची पवित्र महिमा । लोकत्रयीं आगळी. ॥ १८ ॥ रति माधवी सुलोचना । उखा कामशास्त्रीं[3] निपुणा । एक एका अवयवाची तुलना । दमयंतीच्या न पावती. ॥ १९ ॥ गंगा पवित्र पतिव्रता । म्हणोनी शंकरें वाहिली माथां । अभागी[4] मानुनी निजभर्ता । रत्नाकरा अनुसरली. ॥ २० ॥ शिवें इच्छितां चुंबन । कदा नेदी उपेक्षून । सहस्र ओघे करून वदन[5] । सागरातें सेवितसे.[6] ॥ २१ ॥ म्हणोनी स्त्रियांची प्रकृती । धनिक देखुनी उपजे प्रीती । दरिद्री भ्रतार[7] अव्हेरिती[8] । हेळुनियां सर्वस्वें. ॥ २२ ॥ पार्वती पर्वताची कुमरी । असुर संहारिले समरीं । सुकुमारता तिये माझारीं । तिळप्राय असेना. ॥ २३ ॥ वामन देखोनी बळीच्या द्वारीं । लक्ष्मी निघाली असुरांचे घरीं । चंचलपण अद्यापवरी । स्थिर कोठे न राहे. ॥ २४ ॥ पित्यानें अभिलाषिली[9] कन्या । ते सरस्वती विश्वमान्या । निर्दोष सर्वगुणी धन्या[10] । हे वैदर्भी निर्धारें. ॥ २५ ॥ म्हणोनि दमयंतीसमान । भुवनत्रयीं नाहीं अंगना आन । 'नव्हे' म्हणावया वदन । कोणाचें ही सरेना. ॥ २६ ॥ अनेक भूपाळांच्या कुमरी । नळें परिशिल्या श्रवणद्वारीं[11] । सत्कीर्ति वरिजे सदाचारी ।

१ सुंदरा. २ डांगोरा. ३ कोकशास्त्रीं. ४ अभाग्य. ५ सहस्रमुखें चुंबन. ६ चुंबितसे. ७ भर्ता. ८ हेळसूनी अव्हेरिती. ९ उपभोगिली १० पवित्र. ११ कर्णद्वारीं.

तेंवीं दमयंती मानिली. ॥२७॥ नवांमाजी तृतीय भक्ती । आवडी [१]स्वीकारिजे महंतीं । तेंवीं नळाचे ह्रदयभिंती । चित्ररूपा [२]वैदर्भी. ॥ २८ ॥ परिमळांमाजी कस्तूरिका । पुष्पामाजी नवमाळिका । तेंवी दमयंती नरनायका । आवडली [३]ह्रिदयपद्मीं. ॥ २९ ॥ बहुसाल राजयांचे कुमर । दमयंतीनें परिशिले [४]सांचार । सुर सांडूनियां श्रीशंकर । जेंवीं गौरीनें वरियेला. ॥ ३० ॥ तेंवीं दमयंती नागपद्मिनी । भूपवृक्षांतें अव्हेरूनी । नैषधराजहरिचंदनीं । वेंटाळिली मानसें. ॥ ३१ ॥ यावरी राजा नळनृपती । पातला शृंगारवनाप्रती तंव राजहंसाचिया पंक्ती । मनोहरा देखियेल्या. ॥ ३२ ॥ चंद्रकिरणीं धवळिलीं आंगें । आरक्त चरणनयनयुगें । पक्ष झळकती सुवर्णरंगें । मुक्ताफळें आननीं. ॥३३॥ त्यांमाजी एक धरिला [५]येत्नें । तो म्हणे, ' राजया ! वांचवीं प्राणें । माझेनी [६]हस्तें कार्य बेणें । जें कां अटक [७]सुरनरां ' ॥ ३४ ॥ राजा म्हणे, ' मीं नरेश्वरू, । तूं पक्षी अरण्यचरू । माझें कार्य तुझेनी थोरु । केंवी करवे सांग पां.' ॥ ३५ ॥ हंस म्हणे, ' ऐक राया ! । दमयंती तुज जाया । होय एशिया उपाया । मी करीन निर्धारें. ॥ ३६ ॥ वचनें तोषला नरेश । कृपेंने सोडिला राजहंस । म्हणे, ' बोलिला बोल उत्तम पुरुष । चळो सहसा नेदिती.' ॥ ३७ ॥ मराळ मुक्त कारितां हातीं । गेला विदर्भदेशाप्रती । लावण्यसरोवर दमयंती । समीप आला कौतुकें. ॥ ३८ ॥ वैदर्भी, ' म्हणे गा ! मराळा ! [९]क्षीर नीर [१०]निवंडीशी कुशळा ! । राजकुमर मेदिनीपाळ । कोण कोण देखिले ? ' ॥३९॥ हंस म्हणे,

---

१ आदरें अंगीकारिजे. २ विदर्भा. ३ हृत्पद्मी. ४ चतुर. ५ येणें. ६ हातें. ७ सुरवरां. ८ तुतें. ९ तूं हिंडशी महीतळा. १० विवेककुशळा.

'चातुर्यखाणी ! । कासया तारागण गगनीं । एकचि चंद्र पूर्ण नयनीं । विलोकावा निवाडें. ॥ ४० ॥ यत्नें साधिजे एक परिस । व्यर्थ पाषाणीं वाउगा सोस । वाचेनें वंदावा व्योमकेश । लोकवर्णन कासया ? ॥ ४१ ॥ अवलोकितां पृथ्वीतळ । गुणीं अपुरे सर्व नृपाळ । गुणसंपन्न राजा नळ । श्रीकृष्णरामासारिखा. ॥ ४२ ॥ करितां पार्थिवांची गणना । एकहीं न मने माझिया मना । आइक नळाच्या सद्गुणा । समान कोणी न देखों. ॥ ४३ ॥ ना तरी स्त्रियांमाजी स्त्रीरत्न । नरवैडूर्य नळनिधान । उभययोग घडे तें धन्य । पुण्य प्रारब्ध दोहींचें. ॥ ४४ ॥ एक ऐकाच्या पडिपाडा । समसमान जोडे जोडा । तैं भवानी चंद्रचूडा । योग्य उपमा त्रैलोक्यीं.' ॥४५॥ अर्पुनी मुक्ताफळांचे घोस । वैदर्भीनें बोळविला राजहंस । म्हणे, 'नैषध जोडे पुरुष । ऐसें करीं अंडजा ! ॥ ४६ ॥ परिसोनी नळाचें लावण्य । दमयंतीस लागलें ध्यान । ध्यानामाजी पंचबाण । विरहानळ माजला. ॥४७॥ त्यागिला क्षुधेतृषेचा संग । हृदयमर्मी उदेला रोग । औषध नैषधसंयोग । आन परिहार असेना. ॥ ४८ ॥ कंदर्पव्यालीच्या दर्शनें । दमयंती अजा तटस्थ मौनें । निद्रा पळाली म्हणोन । नयन पातीं लावूं विसरली. ॥ ४९ ॥ अंतरीं पेटला हुताशन । म्हणोन श्वासोच्छ्वास उष्ण । अश्रुधारा उभय नयन । शांतवितीं सिंचनें. ॥ ५० ॥ चंडांशु तैसें चंद्रकिरण । वज्रधारा मलयपवन । सूचिका अग्रें तैसे तीक्ष्ण । चंपकजाती बकुळादि ॥ ५१ ॥

---

१ तारा गणाच्या गगनीं. २ वर्णावा. ३ राया. ४ ये ५ एक. ६ स्त्रियांमाजी तूं स्त्रीरत्न. ७ पाहिजे ८ एकमेकाच्या. ९ विदर्भी बोलावी राजहंस. १० औषध एक नैषधसंग. ११ सर्पाच्या १२ रसना. १३ ढळों.

कर्पूरकदळी चंदनलेपु । स्फुल्लिंगप्राय लागती वपु । प्राणभार जाला, सर्पु । हार वाटे कंठीचा. ॥ ५२ ॥ बाळा प्रौढा विचक्षणा । विरहज्वराची स्वैरें भावना । जाणोनी वैद्य निपुण । यत्न करिती साक्षेपें. ॥ ५३ ॥ निजपल्लीं नसतां मुक्ताफळें । उकलुनियां शुक्तिदळें । तया माजिल्या शीतळ जळें । हस्तपाद मर्दिती. ॥ ५४ ॥ कर्पूरकदळीचें अंतर । नखीं चिरूनी काढिती सार । तेल शिंपतां वैश्वानर । अधिक आंगीं पाजळे. ॥ ५५ ॥ सोमकांताच्या भाजनीं । शिंपती चंद्रकिरणींचें पाणी । म्हणे, 'हे तप्त तैल नाणी । दृष्टीपुढें सर्वथा.' ॥ ५६ ॥ ऐशी देखोनी दमयंती, । चतुर सखिया निकटवर्ती । तिहीं वृत्तांत रायाप्रती । जाणविला संकेतें. ॥ ५७ ॥ 'कुमारी तापे बहु दुश्चिता । 'चिंता व्यथा मनोगता,' । हृदयीं आणोनी न विचारितां । बहुतां प्रकारें विचारा. ॥ ५८ ॥ जनका जाला संकेतबोधू । म्हणे, 'चढला तारुण्यसिंधू । भ्रतारकामनेचा इंदू । संकल्पव्योमीं उगवला. ॥ ५९ ॥ मंत्रियां आज्ञापीं उत्तरीं । 'कीर्तिघोष विजयभेरी । पिटुनियां स्वयंवरीं । पृथ्वीपाळ पाचारा.' ॥ ६० ॥ दूत प्रेरितांचि सहजें । न पाचारित आले राजे । चतुरंग समुद्र गाजे । पंचवाद्यें सुनादें. ॥ ६१ ॥ पातले तयांतें सन्मानें । भीमें वोपिलीं विश्रांतिसदनें । कन्यामदनमालतीपवनें । भूप केले षट्पद. ॥ ६२ ॥ कीं दमयंतीरूप अमोघ । तेंचि भावोनी रत्नसारंग । पार्थिव होउनी पतंग । झेंपावले दश दिशा. ॥ ६३ ॥

---

१ कस्तूरी. २ मानीवणु. ३ ज्वर. ४ कवळूनि शूक्तिका वळें. ५ सांडिती. ६ अधिकाधिक. ७ कुमारी असे बहु दुःखित; कुमरी देखोनि निश्चिंत. ८ चित्त. ९ हृदयीं जाणोनी त्वरित. १० सुखोपाय.

तंव नारदतुंबरु उभय मूर्ती । पातके अमरसभेप्रती । शक्रें सन्मानुनी हातीं । मुख्यासनीं बैसविले. ॥ ६४ ॥ म्हणे, 'अवलोकितां सृष्टि । कांहीं अपूर्व पडलें दृष्टी । तेणें कौतुकामृतें वृष्टी । कर्णी केली पाहिजे.' ॥ ६५ ॥ नारद म्हणे, 'सुरेंद्रोत्तमा ! । विदर्भदेशीं राजा भीमा[1] । त्याची कन्या उत्तमोत्तमा । दमयंती या नामें. ॥ ६६ ॥ स्वर्गमृत्युपाताळभुवनीं । तियेसमान लावण्यखाणी । नाहीं नाहीं आपुल्या नयनीं । देखिली[2] हे जाणिजे. ॥ ६७ ॥ उदईक तिचें स्वयंवर । मीनले असंख्य राजेश्वर । कवणा सभाग्या ईश्वरें[3] । कृपा करील[4] तें कळेना. ॥ ६८ ॥ जेणें जन्मजन्मांतरीं । पूजिली असेल मंगळागौरी । तरीच दमयंती सुंदरी । माळ घालील सदैवा.' ॥६९॥ ऐकोनी चंचळ जाले देव । विमानीं आरूढले सर्व । भूतळा आले तंव पार्थिव । नैषध मार्गी देखिला. ॥ ७० ॥ अवलोकितां तया चतुरा । परम आश्चर्य सुरवरां[5] । म्हणती, 'मानवीं[6] असुरां । माजी ऐसा न देखों. ॥ ७१ ॥ याचिये सौंदर्यसमुद्रआपीं । माझिये सहस्रनयनांच्या मापीं । उमानिता मन संकल्पीं । प्रमाण नव्हे सर्वथा. ॥ ७२ ॥ रतिपति आणि रोहिणीपती । अश्विनौदेव दिव्य-मूर्ती । याचिया बरवेपणाची ख्याती । भुवनत्रयीं[7] न समाये. ॥७३॥ पाहतां याच्या रूपाकडे । जैंवी खद्योत सूर्यापुढें । मनुष्यव्यक्तीं-माजी एवढें । स्वरूप नाहीं देखिलें. ॥ ७४ ॥ देखोनी नळाचें लावण्य । चमत्कारला सहस्रनयन । म्हणे, 'ऐसा सुलक्षण । उभयं लोकीं न देखों.' ॥ ७५ ॥ विमान उतरोनियां क्षिती । आल्यादरें

---

१ भीम. २ देखिजे तिहीं जाणिजे ३ सत्वर. ४ गांठ घालील; माळ घालील. ५ अमरेश्वरा. ६ मानव असुरसुरां. ७ भुवनत्रयीं.

धरिला हातीं, । म्हणे[1] ' पवित्र ! गुणैकमूर्ती । कवण कोठील कवणाचा ? ॥७६॥ काय तुझें नामाभिधान ? । तो म्हणे, ' नैषधराजा जाण । वीरसेनाचा नंदन । पुण्यश्लोक नळनामा. ॥ ७७ ॥ जाणें दमयंतीस्वयंवरा, । यालागीं असे मार्गी त्वरा. ' । शक्र म्हणे, ' चतुरा ! । विज्ञापना परियेसी ॥ ७८ ॥ धरूनी दमयंतीची आर्ती । आम्हीं पातलों भूतळाप्रती । तुवां जाउनी नाना युक्ती । प्रबोधिली पाहिजे. ' ॥७९॥ नळ पुसे ' हो ! तुम्ही कोण ? ' । शक्र म्हणे, 'मी पाकशासन[2], । यम पावक चौथा वरुण । स्वामी आम्ही जगाचे.' । ॥ ८० ॥ नैषध म्हणे, ऐका वचन । असत्य न बोले गेलिया प्राण । सत्य रक्षितां साध्य साधन । साधेल तें होतसे. ॥ ८१ ॥ आणि राणिवसां राजकुमरी । रक्षपाळ सावध द्वारीं । माझा प्रवेश कवणे परी । होय तेही नेणवे.' ॥ ८२ ॥ देव बोलती वरदवाणी, । 'तुतें कोणी न देखती नयनीं । दमयंतीते प्रबोधोनी । आमुतें वरी तें कीजे. ॥ ८३ ॥ तूं परोपकारी पुण्यवंत । ऐकोनि जाणों यथार्थ । आपुला सांडुनी स्वार्थ । कार्य करीं दुजियांचें. ॥ ८४ ॥ आमुचे आवडीचेनि काजें । निर्लोभ दूतत्व त्वां कीजे । येणें पूर्णकाम सहजें । तूं होशील पवित्रा ! ॥ ८५ ॥ आपुला सांडूनियां स्वार्थ । यत्नें पुरवीं आमचें[3] आर्त । तोची ईश्वर मूर्तिमंत । सत्य सत्य जाण पां. ॥ ८६ ॥ यत्नें साधिलें विधान । तेणें परांची कामना पूर्ण । करी त्या हरिहर कमळासन । सेवक होउनी सेविती[4]. ॥ ८७ ॥ या लागीं तूं पवित्र राया ! । प्रबोधूनी वैदर्भतनैया[5] । ते आमुतें होयि[6] जाया । ऐशी कीर्ती तूं करी.' ॥ ८८ ॥ ' अवश्य ' म्हणोनी

---

१ म्हणती. २ पाकनाशन. ३ परांचें. ४ वर्तती. ५ विदेहतनया. ६ वरी.

राजेंनृपती[1] । पातला कुंडिनपुराप्रती । अदृश्य सिद्धीचीये गती । राजालयीं प्रवेशे. ॥ ८९ ॥ दमयंती मंचकासनीं । लावण्यलतिका जेंवीं सुमनीं । षट्पदप्राय नैषध गुणी । झुंकारला सुशब्दें. ॥ ९० ॥ रिद्धिसिद्धिमाजी[2] रमा । मातृकामंडळीं जैसी उमा । तैसी सखियांमाजी प्रतिमा । दमयंतीची देखिली. ॥ ९१ ॥ नळातें अवलोकितां नयनीं । मूर्ति बिंबली[3] हृदयभुवनीं । पातीं लवों विसरलीं दोन्ही । देहभावीं[4] तटस्थ. ॥९२॥ अनुमान[5] कल्पना भावी पोटीं । ऐसा सुंदर नाहीं सृष्टीं । हाचि नळ ऐशी गोष्टीं । असत्य नव्हे बोलतां. ॥९३॥ मग म्हणे, 'कनकाचिया द्रुमा !। अमृतफळीं सफल सुगमा !। तुझे अमृतप्राय नामा । कर्णीं परिसवीं मातें.' ॥ ९४ ॥ नरेंद्र बोले सत्य निर्धुत, । नैषधनामा मी यथार्थ । परंतु लोकपाळांचा दूत । होउनी आलों तुजप्रती[6]. ॥ ९५ ॥ मृत्युलोकींचे मानाविणी ! । अमरपाळ तुझे गुणीं । वेधोनी पातले हे करणी । सुकृताची विचित्र. ॥ ९६ ॥ त्यांचा करूनियां अंगीकार । मातें देई निश्चयोत्तर । तें ऐकोनी सुरेश्वर । धन्य दूत मज म्हणती.' ॥ ९७ ॥ दमयंती म्हणे, 'एक । नळ असेल तो ग्राहक । त्यावीण नव्हे आणिक । या शरीरा जाण पां. ॥ ९८ ॥ नळावेगळा पुरुष आन । तो मज भीमकासमान[7] । हें सत्य असेल तरी भगवान । सफळ करो कामना. ॥ ९९ ॥ इंद्रादिकांचिया चरणीं । सहस्रवार माझी मूर्ध्नीं । मज दीनातें दया करूनी । नळ भ्रतार मज द्यावा.' ॥ १०० ॥ नळ म्हणे, 'विवेक ठेवी, । दूतत्त्व देउनी धाडिलें देवीं । [8]तें म्यां

---

१ नळनृपती. २ रिद्धिसिद्धिमाजी जैसी रमा. ३ बैसली. ४ अष्टभावीं. ५ अन्य भावना न भावूनि पोटीं. ६ तुजपाशीं. ७ विदर्भासमान. ८ तेथ वर्ततां कुभावीं.

अंगीकारितां जीवीं । श्रेष्ठ म्हणती दुरात्मा.[1] ' ॥ १०१ ॥ ऐकोनी बोले विचारकुशळ, । सहज स्वयंवरा येती सकळ । त्यांमाजी तुझ्या कंठीं माळ । मी घालीन निर्धारें. ॥ १०२ ॥ इतक्यानें कवणा विषाद कांहीं । नये[2] ऐसेंची देवां सांग जाई.' ।' नळ[3] असंतुष्ट हृदयीं । देवांप्रती पातला. ॥ १०३ ॥ ' तुमचे आज्ञेनें सुरपती ! । भैमी[4] भेटली एकांतीं । प्रबोधिली परि मनोवृत्ती । माझ्या ठायीं धरिलीसे. ॥ १०४ ॥ ते परिहारितां युक्तिजाळीं । ते म्हणे, ' स्वयंवरा यावें सकळीं । तेथें जे घडे तये काळीं । तेंचि मान्य सर्वांतें. ॥ १०५ ॥ ईश्वरें प्रेरिलें प्रारब्धातें । प्रारब्धें[5] प्रेरिलें मनातें । यास्तव घडेल तेंचि निरुतें । ब्रह्मसूत्र जाणावें.' ॥१०६॥ देव म्हणती, ' मानलें आम्हां । स्वयंवरीं निर्जरांचा महिमा । देखतां मानवांची प्रतिमा । केंवी वरील कळेना.' ॥ १०७ ॥ यावरी वैद-र्भरायें देखा । शृंगारिली रंगभूमिका । जीतें लाजोनी स्वर्ग मुखा । आच्छादित अंबरें. ॥ १०८ ॥ छप्पन्न देशींचे राजेश्वर । शाणव कुळींचे राजकुमर । शृंगारिले[6] मनोहर । वस्त्राभरणीं साजिरे. ॥१०९॥ रंगभूमिका चक्राकृती, । उभ्या ठेल्या भूपाळपंक्ती । त्यांमाजी प्रवेशे दमयंती । माळ हस्तीं पवित्रा. ॥११०॥ वैदर्भीच्या अवलो-कनें । सोज्वळ जालीं नृपाळवदनें । कीं,[7] त्या मुखचंद्राच्या किरणें । नेत्रकुमुदें विकाशलीं ॥ १११ ॥ उपाधि सांडुनी परती । चैतन्य एक लक्षिजे चित्तीं[8] । तेंवी नृपांतें त्यजुनी सती । अवलोकीत नळातें.

---

१ दुरुक्त. २ ऐसें देवां सांगें जाई. ३ नळ संतुष्ट हृदयीं. ४ भैमीस भेटलों एकांतीं. ५ प्रारब्ध प्रेरील ज्या कार्यातें. ६ शृंगारूनी. ७ कीं त्या मुखचंद्राचीं किरणें । नेत्रकुमुदें तयांची ॥. ८ संतीं.

॥ ११२ ॥ ‘ देवीं माव केली तेथें ! नळची भासे सभोंवतें । मुख्यस्वरूप कोण निरुतें । तें तत्वतां नेणवे. ’ ॥ ११३ ॥ ते वेळीं उभय जोडोनी पाणी । म्हणे, ‘ स्वामी हो ! ऐका श्रवणीं । काया वाचा आणि मनीं । नळचि वसे माझिया ॥ ११४ ॥ हें जरी असेल सत्य भावें । तरी येणें सत्य साहाय्य व्हावें । नळस्वरूप दाखवावें । प्रकट दृष्टी माझिया. ॥ ११५ ॥ सत्य ब्रह्म ईश्वर सत्य । वेद वन्ही सूर्य सत्य । शुद्ध स्वधर्म माझा सत्य । तरी नळ प्रकटो माझ्या [1]दृष्टी. ॥ ११६ ॥ दमयंती आपुली कुमरी । ऐसें भावोनी सकळ सुरीं । मातें आपुलेनि करीं । नळाहातीं ओपणें.’ ॥ ११७॥ ऐशी परिसोनी विनंती । कृपेनें द्रवल्या देवमूर्ती । म्हणती, ‘ पवित्र परम सती । छळूं नये सर्वथा. ’ ॥ ११८ ॥ काढूनियां मायापटला । उघड दृष्टी दाखविलें नळा । जैसें तुटलिया आभाळा । सूर्य अंबरीं जेंवी दिसे. ॥ ११९ ॥ विबुध ओळखिले चिन्हीं । [2]अनिमिषनेयनीं । पाय स्पर्शले नाहीं धरणी । तेजें तरणी प्रकाशे. ॥ १२० ॥ दिव्य वस्त्रें, दिव्य आभरणें, । दिव्य गंध, दिव्य सुमनें, । [3]द्रुम छायातीत ऋणें । जरा विकार असेना. ॥ १२१ ॥ हातीं दाविती नळातें । म्हणती, ‘ माळ घालीं यातें । आम्हीं प्रसन्न होउनी तूतें । नळ भ्रतार दीधला. ’ ॥ १२२ ॥ नमस्कार करुनी चरणां । पुढां चामके चंद्रवदना । वराया मधुसूदना । सिंधुतनया ज्यापरी. ॥ १२३ ॥ एकवट मिळाले कंदर्प कोटी । तेंवी नैषध देखिला दृष्टी । परम आल्हादें गोरटी । लज्जायुक्त जव-

१ हृदयीं. २ निमिषोन्मेषरहित नयनीं. ३ धरणीवरी दिसत तरुणें; पृथ्वीवरी नित्य तरुणें; धर्मछायांतील तरुणें.

ळिकें. ॥ १२४ ॥ उभय हस्तीं घेउनी माळ । आवडी घातली नैषधगळां । हाहाकार पृथ्वीपाळां । थोर झाला अपमान. ॥ १२५ ॥ ऋषि गर्जती आशीर्वादें । जयजयकार केला विबुधें । दिव्य पुष्पकीं देववृंदें । दिव्य सुमनें वर्षती. ॥ १२६ ॥ दिव्य दुंदुभी मंगळ तुरे । उभय लोकीं लागलीं गजरें । लोकपाळ अत्यादरें । निकट आले आवडी. ॥ १२७ ॥ चौघे श्रेष्ठ सुरेश्वर । देते जाले अष्ट वर । मस्तकीं ठेवूनियां अभय कर । दोनी दोनी एकैकें. ॥ १२८ ॥ 'प्रत्यक्ष अग्नीचें दर्शन । इच्छिल्या ठायीं शीघ्र गमन । हो कां ऐसें सहस्रनयन । वरदोत्तरीं गौरवी. ॥ १२९ ॥ शेखीं यावें उत्तम गती । ऐसें बोलतां अमरपती । पावक म्हणे, 'राजनृपती ! । वरप्रदान घे माझें. ॥१३०॥ इच्छिशील जे अवसरीं । अनळ प्रसवेल तुझ्या घरीं । प्रकाश पडेल अंधकारीं । दिव्य ज्योतीसारखा. ॥ १३१ ॥ अन्नें स्वादुतर होतीं । निपजलीं अन्नें इच्छिलें देती.' । 'धर्मी असो सदा रती' । धर्मराज म्हणतसे. ॥ १३२ ॥ 'इच्छितांची पवित्र पाणी । प्रवाहे लोटेल मंदाकिनी । माळा अम्लान दिव्य सुमनीं' । वरुणें कंठीं सूदली. ॥१३३॥ ऐसे देउनीया वर । स्वर्गभुवना गेले सुरेश्वर । निरुत्साहें राजेश्वर । सर्व गेले स्वस्थाना. ॥ १३४ ॥ स्वदेशाप्रती गेलिया राया । भीमकें मांडिलें विवाहकार्या । आप्त सुहृद् सोयरियां । पाचारुनी संभ्रमें. ॥ १३५ ॥ आसनीं वसनीं धनीं दानीं । याचक गौरविले बहुमानीं । हस्ती वाजी हेमाभरणीं । अपार

---

१ दुभकूनि. २ सूदली. ३ अवमानें. ४ काळीं ५ शेवटीं पावें. ६ प्रवेशेल तुझ्या करीं. ७ पडोनी. ८ अन्नें निपजतीं हातीं. ९ आणि इच्छिलीं येती. १० अमूल्य वस्त्रें आर्पिलीं; परिबर्ह अर्पिलें.

द्रव्यें अर्पिलीं. ॥ १३६ ॥ स्वल्प[1] काळें करुनी वस्ती । आज्ञा मागोनी विदर्भाप्रति । दमयंतीशीं नळनृपती । आत्मनगरा पातला. ॥ १३७ ॥ अंगनारत्न पावोनी क्षिती । पुण्यश्लोक चक्रवर्ती । शचीसंगें अमरपती । तेंवी शोभला भूतळीं. ॥१३८॥ शृंगारवनीं रमणीयवनीं । नाना पर्वत गंगापुलिनीं । दमयंतीशीं नैषध गुणी । स्वेच्छानंदें क्रीडत. ॥ १३९ ॥ ययाती नहुषातुल्य सांग । केले अश्वमेध याग । दानोदकीं सर्व जग । अभिषेकिलें पवित्रें. ॥ १४० ॥ धरामडंळीं[2] प्रतापतरणी । प्रसन्नवदना प्रजानलिनी । धर्म संपदा[3] ही दोन्ही । चक्रवाकें एकत्र. ॥ १४१ ॥ दारिद्र्य दोषाची हो राती । नाहींच केली सर्व जगती । दुर्जनतारकाची[4] वस्ती । पाहतां कोठेंही दिसेना. ॥ १४२ ॥ पाषंडउलूकांचे घुंगाट । नाहीं कुतर्क तस्करवाट । हंस कोकिल साधु श्रेष्ठ । विष्णुस्मरणें गुंजतीं.[5] ॥ १४३ ॥ वसुधा पाळिली बहुतकाळ । कीर्तीनें भरला ब्रह्मांडगोल । 'पुण्य-श्लोक राजा नळ । स्मरणें नासती अघें तीं.' ॥ १४४ ॥ यापरी भोगिली ऐश्वर्यदशा । पुढें पातली घोर अवदशा । तुह्मां ऐशी कुरुनरेशा ! । तेही श्रवणीं परियेशीं.' ॥ १४५ ॥ इति 'श्रीभारत वनपर्व' पवित्र आख्यान अति अपूर्व । श्रवणें नाशी दोष सर्व । मुक्तेश्वर कवि वदे ॥ १४६ ॥

---

## अध्याय सातवा

बृहदश्वा म्हणे, 'नृपती ! । नळा लाधली दमयंती । हर्ष

१ स्वेच्छाकाळ. २ धरामंडपीं. ३ धर्मसंप्रदायें दोन्ही. ४ दुर्जन तस्करांची. ५ रुंजती.

मानुनी अपरमिती । देव जाते जाले स्वस्थाना. ॥ १ ॥ मार्गी कली द्वापर दोघे । येतां देखिले लगबगें; । शक्र म्हणे, ‘ कारण सांगें कार्य कवण केउतें ?’ ॥ २ ॥ कली म्हणे, ‘ त्रिदशेश्वरा ! । जाणे दमयंतीस्वयंवरा । ते आमुतें होय दारा । ऐसें करूं बहु यत्नीं. ’ ॥ ३ ॥ इंद्र म्हणे, ‘ निवाडिले सकळ । दमयंतीनें वरिला नळ । आतां तुमचा प्रयत्न विफळे[1] । वांज वृक्षासारिखा. ॥ ४ ॥ कली बोले प्रत्युत्तर, । ‘ प्रत्यक्ष सोडुनी सुरेश्वर । दमयंतीनें वरिला नळ नर । हा अन्याय मज वाटे. ॥ ५ ॥ अनुचित देखतां विशेषें । दंडन केलें नाहीं कैसे ? ’ । शक्र म्हणे, म्यां संतोषें । हें घडविलें आवडी. ॥ ६ ॥ दमयंती पातली शरण, । म्यां होउनी सुप्रसन्न । कृपेनें देउनी दानें[2] । हें सुलग्न लाविलें. ॥ ७ ॥ यथायोग्य पुण्यवंता । हृदयशुद्धशरणागता । इच्छिलें फळ तें न देतां । ईश्वरत्व केंउते ? ॥८॥ नित्य स्मरे त्याचें योगक्षेम । जरी न वाहे पुरुषोत्तम । शरणागताचा न दवडी श्रम । तरी तो देव कासया ? ॥ ९ ॥ न करूं दीनाचें रक्षण । तरी आमुते देव म्हणे कोण ? । हा भाव नेणती अज्ञान । तुजसारिखे कलिपुरुषा ! ’ ॥ १० ॥ अत्यंत कोपा चढला कली । म्हणे, ‘ कौतुक पाहिजे नेत्रकमळीं । नैषधराजा मिळे धुळी । ऐसें करीन क्षणार्धें. ॥ ११ ॥ न लभे दमयंतीचा भोग । पाडीन चिरकाल वियोग । राज्यभ्रंश दारिद्र्ययोग । भोगवीन बहु काळ. ’ ॥१२॥ देवेंद्र म्हणे, ‘ रे ! कुबुद्धि ! । परम पवित्र सत्यवादी । त्यातें तुझें अरिष्ट बाधी । हें अघटित सर्वदा. ॥ १३ ॥ स्वल्प काळ दाउनी[3] क्लेश । पुढतीं कृपा करील ईश । सत्वनिष्ठातें जग-

---

१ निष्फळ. २ वरदान. ३ देउनी

दीश । पदोपदीं रक्षितसे. ॥ १४ ॥ सभाग्य साधुनी जाय निधी । अभाग्य मागें मृतिका शोधी । दमयंतीचा[2] अभिलाषआधीं । पीडूं म्हणसी नळातें. ॥ १५ ॥ परतोनी जाई आपुल्या ठाया, । प्रवर्तूं नको यया कार्या. ' । नायकोनी दोघे राया ! । नैषधनगरा पातले ॥ १६ ॥ दायाद तो सहज शत्रु । पुष्कर नळाचा पितृव्यपुत्र । त्यातें बोलिला कुडा मंत्रु । कली आणि द्वापर. ॥ १७ ॥ म्हणती, ' जिंकोनी[3] नैषधातें । राज्यभ्रष्ट करूं त्यातें, । त्याचें ऐश्वर्य लाधे तूतें । ऐसें करूं तात्काळ. ॥ १८ ॥ अक्षविद्या अवगत आम्हां । तुवां खेळावें करुनी नेमा, । त्याचें ऐश्वर्य भाग्योत्तमा ! । अनायासें पावशीं. ' ॥ १९ ॥ द्वापर निघाला कपटपाशीं,[4] । ते फांसे दिधले पुष्करासी, । कली तिष्ठत अहर्निशी । नळशरीरीं रिघावया. ॥ २० ॥ वृषभरूप होउनी कली । पुष्करगोधनांचे मेळीं । प्रवेशोनी नळराउळीं । छिद्र पाहे रिघावया. ॥ २१ ॥ द्वादश वर्षे होता कष्टी । निषिद्धाचरण न दिसे दृष्टी । जैसें विष्णुस्मरत्या निकटीं । पाप वावरों न शके. ॥ २२ ॥ प्रवेशावया सायासें । जपत ठेला बारा वर्षे । एके दिवशीं देहआळसें । सायंकाळीं सत्वर. ॥ २३ ॥ करूनी मूत्रविसर्जन । न करितां पादप्रक्षालन । संध्या साधितां दुर्जन । संधिकाळ लाधला.[5] ॥ २४ ॥ प्रवेशला तये संधीं । तत्काळ पालटली बुद्धी । सत्यव्यसनवासनानदी । विकारपूर माजला.[6] ॥ २५ ॥ विवेक, विचार, भक्तिज्ञान, । दया स्वधर्म झाला शून्य । काम[7] क्रोध, मत्सर, जाण । तस्कर[8] देहीं उदेले.

१ सांभाळी. २ दमयंतीचे आभिलाषबुद्धि. ३ जिंकी. ४ कपटकपटाशीं. ५ साधला. ६ साजला. ७ काम, क्रोध, मद मत्सर मान. ८ तत्काळ.

॥ २६ ॥ साधुसज्जनीं अभक्ति । दुर्जनसंगीं वाढली रती[1] । म्हणोनी बोले पुष्कराप्रती, । 'वेळ मातें क्रमेना[2]. ॥ २७ ॥ मांडी सारीपाट खेळ । सुखसंतोषें क्रमेल काळ । पुष्कर म्हणे, 'तूं राजा सबळ[3] । हारीं जयीं सारिखा.' ॥ २८ ॥ पाश देखतांची ते[4] डोळां[5] । बुद्धिभ्रंश[6] राया नळा । लुब्ध जाला द्यूतखेळा । जेंवी कामुक स्त्रियेतें. ॥२९॥ कपाटें देउनिया हातें । आज्ञा करी द्वारपाळातें, । 'खेळ सरे तंव कवणातें । न सोडावे ममाज्ञा.' ॥३०॥ जंव जंव हारीं पैंडे[7] डाव । तंव तंव हांवे पडे राव; । म्हणे, 'माझें सर्वस्व जावें । परी हा खेळ न सांडी.' ॥३१॥ पणा घालुनी राज्य सकळ । रायें मांडला द्यूतखेळ । हें ऐकुनी अति विह्वळ । प्रजा दुःखें विलपती. ॥ ३२ ॥ शोक करिती हाहाकारें । एक पिटिती हृदय करें । प्रधान म्हणे, 'निर्धारें विनाशकाळ पातला.' ॥ ३३ ॥ नेत्रीं अश्रूंचिया धारा । समस्त पावले राजद्वारा । म्हणतीं, 'कृपेनें राजेश्वरा ! । दर्शन दिधलें पाहिजे. ॥ ३४ ॥ करीं आमचें[8] प्रतिपालन । न घालीं राजपदाचा पण । सांडी द्यूतपापव्यसन । दुःखदायक सर्वांतें.' ॥ ३५ ॥ दमयंती म्हणे, 'स्वामी ! । प्रजा पाळिल्या स्वधर्मी[9] । तयां पाचारुनी तुम्हीं । आश्वासिलें पाहिजे.' ॥ ३६ ॥ राजा द्यूतव्यसनकोडें । उत्तर कांहीं न बोले तोंडें । दमयंती म्हणे, 'पुढें । बरवे कांहीं दिसेना[10].' ॥ ३७ ॥ नायके कवणाचें ही वचन । दमयंती करी[11] रुदन । पाचारुनी मग प्रधान । रथसारथी आणवी. ॥ ३८ ॥ वार्ष्णेय नामा नळसारथी ।

---

१ वृत्ती. २ गमेना; करमेना ३ सर्व कुशल. ४ हे. ५ नळा. ६ कुबुद्धि भ्रंशला तात्काळ. ७ चढे. ८ आमुतें. ९ धार्मी. १० न दिसें सर्वथा. ११ करितसे घोर.

त्यातें आज्ञापी दमयंती, । ' पुत्र कन्या वाहुनी रथीं । विदर्भप्रती[1] त्वां[2] जावें. ॥ ३९ ॥ जनका वोपीं हीं बालकें । नळाची वार्ता जाणवी मुखें । प्रारब्ध घडवी तरी सुखें । भेटी गोष्टी होतसे. ॥४०॥ रथ ठेउनी कुंडिनपुरीं । त्वां वसावें अयोध्यापुरीं । ऋतुपर्ण[3] राजया-मंदिरीं । सारथी होउनी असावें. ॥ ४१ ॥ जंव अवदशेनें वरिजे नळ । तंववरी तेथें क्रमिजे काळ । पुढां ईश्वरइच्छा खेळ । मांडेल तेंचीं विलोकी. ' ॥ ४२ ॥ सारथी वंदूनियां[4] आज्ञा । धात्री नामें बृहत्सेना । इंद्रसेना राजकन्या । इंद्रसेन बालक. ॥ ४३ ॥ तिघे वाहुनीयां रथीं[5] । पातला वैदर्भनगरीप्रती । वार्ता पुसोनियां भीम-नृपती । दुःखार्णवीं निमग्न. ॥ ४४ ॥ तेथेंची ठेउनी रहंवरा । वार्ष्णेय पातला अयोध्यापुरा । सूतवृत्ती राजेश्वरा । आराधीत राहिला. ॥ ४५ ॥ येरी इकडे खेळुनी द्यूत । राज्य हारविलें समस्त । नैषध जाला दैवहत[6] । दीन केला पुष्करें. ॥ ४६ ॥ मुकुट, कुंडलें, पदक माळा, । मुद्रिका, कंकणें कटिमेखळा । प्रथम डावीं कुरुनृपा ! । हारविलें नरेंद्रें. ॥ ४७ ॥ हस्ती, वाजी, पदाति, रथ । दास दासी असंख्यात । महिषी, धेनु वृषभ तेथ । अजादिक अपारें. ॥ ४८ ॥ उष्ट्र वाजी, खेचर वडवा । संख्येरहित भाग्यार्णवा । प्राशन[7] केलें नरपार्थिवा ! । अभाग्यकाळें कुंभजें. ॥ ४९ ॥ देश, दुर्ग, गड, पर्वत, । नगरें, पुरें, पत्तनें[8] बहुत । ग्रामपाली,[9] खेटकयुक्त । आगरें[10] वनें उपवनें. ॥ ५० ॥ कनकरत्नांचीं भांडारें । शस्त्रास्त्रांचीं आगारें । हारविलीं, मग पुष्करें । हास्य केलें

---

१ विदर्भदेशी. २ त्या नेणें. ३ सूतवृत्ती. ४ घेऊनी. ५ दिव्य रथीं. ६ ऐश्वर्यहत, ७ प्रसन्न, ८ पाटणें, पट्टणें. ९ पल्ली. १० आगार.

अद्भुत[1]. ॥ ५१ ॥ म्हणे, ' राया ! नियमवंता ! । एकी[2] दमयंती उरली आतां । ते ही पणा घालुनी कांता[3] । होय माझी तें करीं. ' ॥ ५२ ॥ ऐकोनी धडकला क्रोधाग्नी[4] । वन्ही उसळों पाहे नयनीं । उभा ठेला एकवसनीं । अरण्यवासा जावया. ॥ ५३ ॥ एकवस्त्रा महासती । पाठीशीं चालली दमयंती । प्रजा मागां पुढां वेहती[5] । शोक करिती आक्रोशें. ॥ ५४ ॥ विवेक दवडूनियां वनीं । अविवेक बैसे सिंहासनीं । तेंवी पुष्कर सिंहासनीं[6] । महोत्सवें मिरवला. ॥ ५५ ॥ वनवासा चालिला नळ । लोक रुदन करिती सकळ[7] । तिघे करिती गदारोळ । कली, द्वापर, पुष्कर. ॥ ५६ ॥ धेंडे पिटोनियां नगरीं । पुष्कर शब्द जाणवी पुरीं, । ' नळमित्र तो माझा वैरी । शिर छेदीन तयाचें. ॥ ५७ ॥ जो जाईल नळाचे संगीं । शूळ भेदीन तयाचे अंगीं । यंत्रमुखीं घालून आगीं । चूर्ण करीन कुंजरें. ' ॥ ५८ ॥ कोणी न ठाकती निकटीं । कोणी[8] करूं न शकती गोष्टी । असो. नगर सांडूनी कष्टी । अरण्यमार्गें चालिलीं[9]. ॥ ५९ ॥ तीन दिवस निराहार । प्राशनालागीं न मिळे नीर । चतुर्थ दिवशीं राजेश्वर । मार्गीं जाता स्त्रियेशीं. ॥ ६० ॥ सुवर्णपक्षांचे पक्षी । चरतां देखिले हो ! वनकक्षी[10] । राजा उभा राहोनी वृक्षीं[11] । विचार करी आहारार्थ ॥ ६१ ॥ ' यांचेनि मांसें क्षुधाहरण[12] । पक्षी विकलिया देईल धन ' । ऐसें भावूनियां महायत्न । करिता झाला धरावया. ॥ ६२ ॥ पक्षी

---

१ अपार; अत्यद्भुत. २ एकटी, एकलीच. ३ वनिता. ४ कोपाग्नी. ५ बघती. ६ राजासनीं; भद्रासनीं. ७ तळमळ; हळहळ. ८ कोणी शब्द करीना गोष्टी. ९ चालती; निघाले. १० वनकुक्षी. ११ कक्षीं. १२ क्षुधाशमन.

पारधियाचे खेळ । पहिलेचि जाणे राजा नळ । पाश मांडूनी विहंग-ममेळ । नाना युक्ती धरियेला . ॥ ६३ ॥ पीतांबराच्या पुढिले पदरीं[1] । कवळुनी पल्लव धरिला करीं । पक्षी सत्वर फडफडा[2] करी । नखें रोवुनी वस्त्रातें. ॥ ६४ ॥ उडोनी गेले गगना आंत । राजा नग्न वस्त्ररहित[3] । हें देखोनी खेदयुक्त[4] । वैदर्भी[5] झाली मानसीं ॥ ६५ ॥ हांसोनी बोलती पक्षिगण, । ' कपटपाश ते आम्ही जाण । तुझें हिरोनियां वसन । उडोनी गेलों[6] अंबरा. ' ॥ ६६ ॥ अर्ध वस्त्रें[7] झांकिली काया । पुढें[8] वनीं चालतां राया । अस्तमान झाला सूर्या । भयानक काननीं. ॥ ६७ ॥ निराहार निरुदक । दोघां मिळून वस्त्र एक । नळाह्रदयीं नावरे शोक । पुढती धैर्य सांवरी[9]. ॥ ६८ ॥ निशा प्रवर्तली[10] प्रबळ । निद्रे लागीं न दिसे स्थळ । शीतनिवारण अळुमाळ । आश्रयो पाहे काननीं. ॥ ६९ ॥ जीर्ण पर्णकुटी तेथ । देखता झाला नळ वनांत । तृणशय्ये[11] भार्येसहित ॥ खेदभूत बैसला. ॥ ७० ॥ दोघीं वेढिलें एक वसन । तळीं शय्या ना प्रावर्ण । पंचरात्र उपोषण । तेणें प्राण जाकळती. ॥ ७१ ॥ राजा विचारी मानसीं, । ' गुह्य न वदावें स्त्रियेशीं । खरतर दुःखाच्या हुताशीं । देह भस्मेल दोघांचा[12], ॥ ७२ ॥ सुंदर सुकुमार पवित्र गुणी । चरण चाली चाले वनीं, । आहारावीण उपोषणीं । प्राण त्यागील तत्वतां. ॥ ७३ ॥ दृष्टीवेगळे होत कां कष्ट । यालागीं[13] वाटे वियोग श्रेष्ठ ।

१ पदर. २ पडत्कारी; फणत्कारीं. ३ वस्त्राविरहित. ४ खेद अद्भुत ; खेद अत्यद्भुत ; शोकयुक्त. ५ वैदर्भीया आपुले. ६ उडवुनि नेलों अंबरीं घेउनि गेलों आकाशीं. ७ वसनें ८ अन्यवनीं चालला राया. ९ आवरीं; १० परिवर्तली. ११ शष्पशय्येवर. १२ दोहींचा. १३ यालागीं त्यागावी हें श्रेष्ठ.

इतें देखोनी हृदयस्फोट । क्षणक्षणीं होतसे. ॥ ७४ ॥ मज वेगळे हो कां भलतें । यालागीं त्यागुनी जाईन ईतें' । ऐसा निश्चय करुनी चित्तें । संकेतें[1] शब्दें शांतवी. ॥ ७५ ॥ म्हणे, 'प्राणवल्लभे ! एथे । घालुनी हृदयकवचातें । तुतें रक्षावें हा हेत । वात स्पर्श तो ही न द्यावा. ॥ ७६ ॥ पाहें माझी क्लेशावस्था । सहज बोलणें तुझिया हिता । देश अवलोकीं समोंवता । सर्व येथुनी दिसताहे. ॥ ७७ ॥ हा पंथ जातसे दक्षिणे । पवित्र सरिता पवित्र जीवनें । अवंती लंघुनी[2] विचक्षणे ! । रेवा तापती, गौतमी. ॥७८॥ पैल तो विंध्याचल साउमा । पयोष्णी नदी जलसुंगमा[3] । तपोधनाच्या आश्रमा । मार्गी जाता देखसी. ॥ ७९ ॥ हा सुपंथ विदर्भाप्रती । जेथें जनका तुझियाँ वस्तों[4] । येणें मार्गे अयोध्यापती । कोसलदेशीं देखिजे.' ॥ ८० ॥ ऐकोनी प्राणेश्वराची मात । वल्लभेहृदयीं शस्त्रघात । म्हणे, 'हा कायसाँ[5] संकेत । दावीतसां साक्षेपें ? ॥ ८१ ॥ मनीं धरूनी माझा त्याग । ज्ञात करितां नाना मार्ग । हा संकल्प अति अयोग्य । पुण्यश्लोका ! तुजलागीं. ॥ ८२ ॥ सांडूनीयां देवाचिया मूर्ती । त्यागुनी पृथ्वीचे भूपती । तुम्हांतें[6] वरिलें परम आर्ती । एक भक्तिभावार्थें. ॥८३॥ काया वाचा आणि मन । त्वांही ठेविला मजवरी प्राण । ऐंशियाचें हृदय कठिन । कैंवी जालें कळेना ? ॥ ८४ ॥ पतिव्रता मी निर्धूतं[7] । तुज ही एकपत्नीव्रत । माझा त्याग करितां एथ । काय ईश्वर संतुष्टे ? ॥ ८५ ॥ गेलें असतां सर्व राज्य । क्षुधेतृषेनें पीडिली आज । अर्धवस्त्रा एकटी मज । त्यागूं म्हणशी

---

१ सखेद. २ सुगमदेश गंगा विपिनें. ३ जलसंगमा. ४ तुझिया पितयाची वस्ती. ५ कासया. ६ तूतें. ७ पवित्र.

काननीं ? ॥ ८६ ॥ तापत्रय निवारणाचें[1] छत्र । भार्येपरता नाहीं मित्र । पतिव्रता मी सुपवित्र । कशी त्यागूं माविशी ? ॥ ८७ ॥ तुज ही प्रबळ क्षुधा बाधी । राज्यहानीची सखेद व्याधी । संगीं भार्या दिव्यौषधी । उपचारीन दासीत्वें[2]. ॥८८॥ भार्या सकळ श्रमातें[3] हर्ती । भार्या सकळ सुखातें[4] कर्ती । भार्या पवित्र वंशधर्ती । यशकीर्ती स्त्रीसंगें. ॥ ८९ ॥ स्त्रीसंगें धर्म निर्दोष । पुरुष कुमार्गीं न पवे भ्रंश । भार्या नसतां महादोष । कामादिक पीडिती[5]. ॥ ९० ॥ या लागीं पवित्र पतिव्रता । वनीं येकली त्यागी भर्ता । तैं दोष अपयश मूर्खता । लोक माथां स्थापिती. ॥ ९१ ॥ मातें घेउनी राजेश्वर । चालिजे वैदर्भीचिया नगरा । दुष्ट काळ क्रमुनी चतुरा ! । पुढें वर्तो प्रारब्धें. ॥ ९२ ॥ भीम दयावंत सहसा । परिहरील आपल्या क्लेशा । संशय सांडुनी मानसा । शीघ्र गेले पाहिजे.' ॥ ९३ ॥ नळ म्हणे, 'विचारनिष्ठे ! । आपत्तिकाळीं न वचीजे कोठें । विशेष सन्मानहानी मोठें । परम दुःख अंतरीं. ॥ ९४ ॥ राज्य हारवुनीयां पणीं । भार्येसहित एकवसनी । श्वशुरगृहीं जातां व्यसनीं । विश्व ठेवील मूर्खता. ॥ ९५ ॥ दारिद्र्य-काळामाजीं देख । नीच श्रेष्ठातें म्हणती मूर्ख । उपहासिती सकळ लोक । आप्तवर्ग विशेषें. ॥ ९६ ॥ या लागीं धरुनियां धीर । प्रारब्धावरी घालूं भार । भोग सरलिया ईश्वर । कृपा करील निर्धारें. ॥ ९७ ॥ आतां ऐकें गुणवेल्हाळी ! । चिंता सांडुनी हृदयकमळीं । चालतां श्रमलीस भूतळीं । निद्रा करी नावेक.' ॥ ९८ ॥ दमयंतीस लागली निद्रा । तळमळ नांवरे[10] नरेंद्रा । ग्रहणीं राहू गिळी चंद्रा । तेंवी

---

१ उष्णींचें. २ दास्यत्वें. ३ श्रमांची. ४ सुखांची. ५ नाडिती. ६ कष्ट. ७ सर्व. ८ वसीजे. ९ अश्लाघ्य जाण परगृहीं. १० लागली.

चितें ग्रासिलें. ॥९९॥ भार्येसी क्षुधे तृषेची[1] झोंप। राजया मनीं[2] उद्वेग ताप। घुधुःकारें जैसा सर्प। 'हा! हा। कष्ट' म्हणोनी. ॥१००॥ कली संचरला अंगीं। यालागीं निश्चय केला त्यागीं। अर्धवस्त्रछेदना-लागीं। उपाय चित्तीं करितसे. ॥१०१॥ अर्धवस्त्र नेणता इतें। खंडोनी गेलें पाहिजे परतें। ऐसा विचार करुनी चित्तें। विलोकित काननीं. ॥१०२॥ कोशरहित पडलें शस्त्र। तेणें छेदिलें अर्ध वस्त्र। निद्रिस्त पतिव्रता पवित्र। निर्जन वनीं एकली. ॥१०३॥ त्यागुनी चालिला तो राया। परतोनी पातला त्याचि ठाया। निद्राभूत देखोनी जाया। जाता जाला मागुता. ॥१०४॥ शिणली पायीं चालतां वाट। उपोषणीं आगळे कष्ट। चेतनारहित पडे काष्ट। तैंवी निद्रिस्त भूतळीं. ॥१०५॥ म्हणे, 'हे पतिव्रता निर्दोष। स्पर्शों न शके परका पुरुष। इचे नेत्रींचा हुताश। भस्म करील दुष्टातें. ॥१०६॥ माझिये आशीर्वचनीं। क्षेम कल्याण वांचो विजनीं[3]। दुःख न देखवे नयनीं। यालागीं त्यागुनी जातसें. ॥१०७॥ निकट असतां आपदा[4]। माझेनी न देखवे कदा। त्यागीलिया पवित्र प्रमदा। ईश्वर ईतें रक्षील. ॥१०८॥ आदित्य रुद्र आणि वसव। अश्विन मरुत नागदेव। सप्तऋषी सिद्ध सर्व। धर्मशील रक्षतु. ॥१०९॥ ग्रहनक्षत्रपंचभूतां। श्वापदें पक्षी वनदेवतां। वृक्षवल्ली गुल्म लता। नमन माझें साष्टांगीं. ॥११०॥ धरादेवी! तुज नमनें[5]। तुजवरी कंटक बहु पाषाण। दमयंतीचे सुकुमार चरण। छिन्नभिन्न न करावे. ॥१११॥ तुम्हीं समस्तीं स्नेहभावें। लावण्य-लतिके सांभाळावें। तुम्हांसी निरवून स्वस्थ जीवें। मी जातसे वन-

---

१ क्षुधा श्रमाची. २ हृदयीं वियोग. ३ वनीं. ४ इच्या आपदा. ५ शरण.

पंथीं. ॥ ११२ ॥ सर्वी वसतिया आत्मारामा ! । तुवां वांचवावी[1] अंगनोत्तमा । पंच प्राण नमन तुम्हां । त्यागूं नका इयेतें. ॥ ११३ ॥ आपतत्त्वा ! तुवां जीवना । इच्छिलिया करीं[2] जळपाना.' । सूर्यासी ह्मणे, 'उष्णकिरणा। लागों ईतें न द्यावें.' ॥ ११४ ॥ 'ईश्वर रक्षील सर्वथा । माझ्यानें न देखवे व्यथा । या लागीं त्यागुनी जातों आतां। क्षेम कल्याण हे असो ॥ ११५ ॥ मी सत्यवादी पुण्यश्लोक । हें सत्यें[3] असेल निष्टंक । तेंरी लोटुनी कोटि दुःख । स्वस्थ जाईल माहेरा.' ॥ ११६ ॥ ऐसा देऊनि आशीर्वाद । जाता जाला नळ नैषध । पुढती पश्चात्तापें खेद । अत्यद्भुत उदेला. ॥११७॥ त्यागुनी जाय परता । परत परतोनि ये मागुता । सात पांच वेळां चित्ता । स्नेहचक्रीं[6] सूदलें. ॥ ११८ ॥ मग कठिणता घालुनी मनीं । कलीनें लोटिलीं[7] दुरी वनीं । खेचरें[8] भूचरांचे नयनीं । अश्रुपात डळमळती. ॥११९॥ या परी सांडुनी दमयंती । नैषध गेला अरण्यपंथीं । स्वल्प उरली असतां रात्री ।प्रबोधली पतिव्रता ॥१२०॥ निकट न देखे भ्रतार । भीमकी करी हाहाकार । सबळ दाटला अंधकार । भंवतें कांहीं दिसेना. ॥ १२१ ॥ घाबेरपणीं धांवोनि चरणीं । अडखळोनीं पडे धरणीं । मस्तकीं लागोनी पाषाणीं । रक्त वाहे भडभडां. ॥ १२२ ॥ हांक मारी दीर्घ स्वरें । म्हणे, 'वल्लभा ! धांव कां त्वरें । मातें सांडोनी पुढारे । पाय कैसे चामकती ? ॥ १२३ ॥ तुज न देखतां प्राण । देहीं न राहे अर्ध क्षण । येईं सत्वर धांवोन । आलिंगन मज देई ॥ १२४ ॥ माझा करुनियां घात । काय तो साधिशी पुरुषार्थ ? । मज वेगळें

---

१ निववावी. २ करवीं. ३ जरी सत्य. ४ हे लोटुनीं कष्ट दुःख. ५ परत ये मागुता. ६ संशयचक्रीं. ७ लोटिली काया वनीं. ८ जातां खेचर. ९ पडलासे.

तुझें चित्त । काय विश्रांति पावेल? ॥ १२५ ॥ क्षुधित[1] वनीं मी गोरटी । अर्ध वसनें[2] होय कष्टी । पडलिया वनसंकटीं[3] । प्राण कंठीं पातला. ॥ १२६ ॥ तुज वेगळी करूं काय । कवणातें मी मोकलूं धाय? । नाहीं बाप अथवा माय । ईश्वर तोही दिसेना. ॥ १२७ ॥ भयें झोंबूं कवणाचे कंठीं । सांग रिघों कवणापोटीं? । तुजवेगळी सर्व सृष्टी । वोस वाटे वल्लभा! ॥ १२८ ॥ स्नेहें धावोनी लवलाही । मातें कवळीं दोन्ही बाहीं । तुज वेगळा मर्जे नाहीं । सोडविता रक्षिता. ॥ १२९ ॥ तुजवरी ठेवूनिया दृष्टी । मी विसरलें दुःखकोटी । तुझ्या संगीं सर्व सृष्टी । सुखभरित मैज वाटे. ॥१३०॥ धांव धांव नैषधराया! । केशीं झाडीन तुझ्यां पायां । झाडणें करूनी सांडीन काया । तुजवरुनी आवडी.' ॥ १३१ ॥ पँडे उठी; मागुती पडे । दिशा अवलोकुनी चहूंकडे । 'नळा! नळा!' म्हणउनी रडे । आकांतली काननीं ॥ १३२ ॥ 'प्राणेश्वरा! नळनरेशा!' । मुखें गाजवी हाचि घोष । ऊर्ध्व अवलोकी आकाशें । रिघों पाहे[10] पातालीं. ॥ १३३ ॥ 'नमन माझें' म्हणे अनिला! । माझी वार्ता जाणवी नळा । लोटुनी आणी मजजवळां । श्रेय घेईं जीवाचें. ॥ १३४ ॥ नमन करितसें तुझिया चित्ता । उपजों नेदी निष्ठुरता । चैर[11] हो! तुम्हातें वाहातसें माथां । परतोनी आणा नळातें. ॥ १३५ ॥ पक्षी हो! तुम्हीं पक्षबळ । उडोनी शोधा माझा नळ । वार्ता सांगोन उतावीळ । शीघ्र आणा मजपाशीं.' ॥ १३६ ॥ चक्रवाकाचिया युग्मा । म्हणे 'वेदना ठाउकी तुम्हां । नळातें शोधुनियां श्रमा । माझिया हो! परिहरीं.'

---

१ क्षुधित वनिता मी धाकुटी. २ अर्धवसना. ३ वनिं संकटीं. ४ आन. ५ मी माने. ६ सुकुमार. ७ रडे. ८ हिंडे. ९ दाही दिशा. १० म्हणे. ११ चरण.

॥ १३७ ॥ मधुकरातें बोलें शब्द । 'तुम्हा प्रिय पुष्पगंध । नळाचा मुखाब्जमकरंद । सेवुनी सांगा शुद्धीतें.' ॥१३८॥ दुःखसमुद्रामाजीं मग्न । संकटीं गेला वर सांडुन ! । परी मुखें नुच्चारी अवगुण । निंदा कांहीं न बोले. ॥ १३९ ॥ आठवुनी नळाचे कष्ट । दुःखें होतसे हृदयस्फोट । नाठवीं आपुलें संकट । वनिताश्रेष्ठ दमयंती. ॥१४०॥ 'हा हा महाराज ! नळनरेशा ! । मातें होत कां तुझे क्लेश । तुवां असावें सुखसंतोष ! तुझे अरिष्ट मज लागो. ॥१४१॥ माझा पतिव्रताधर्म । तुतें सर्वदा करू क्षेम । तुझे अवदशेचा श्रम । सर्व हो कां मजलागीं.' ॥१४२॥ ऐशी मुखीं गाजवी ध्वनी । अश्रुधारा गळती नयनीं, । मार्गरहित वनोपवनीं । कोमळ पायीं चामके. ॥ १४३ ॥ वाहळ वोहळ दरे दरकुटे । विवरें कुहरें गिरिकपाटें । वनें भयानकें कष्टें । लंघूनियां जातसे. ॥ १४४ ॥ उंच नीच महा दरडी । वाट अत्यंत निसरडी । कोसळोनी पडली तोंडीं । अजगराचे ते काळीं. ॥ १४५ ॥ तो क्षुधित विशाळ व्याळू । मुखे कवळूनी लागला गिळूं । येरी[2] आक्रंदे 'नळा ! स्नेहाळू । केउता गेला ये काळीं ? ॥ १४६ ॥ धांव धांव नैषधराया ! । सर्पे गिळिजे माझी काया । तुजविण मज सोडवावया । आन कोणी दिसेना.' ॥ १४७ ॥ तिची ऐकोनी रुदितध्वनी । मृगपारधी विचरे वनीं । धांवोनी पातला तंव नयनीं । देखे सर्पे धरिलीसे. ॥ १४८ ॥ मुखीं घालुनी लोहखांडें । हातेंची[3] चिरिलीं जाभाडें । उभय हस्तीं धरुनी फडे । ओढुनियां कढे काढिली. ॥ १४९ ॥ उदकें प्रक्षाळुनियां काया । म्हणे, 'तूं कवणाची जाया । कोठुनियां कवणा ठाया । येकटी जासी काननीं.' ॥ १५० ॥

---

१ त्वां चाखिले नाना सुगंध. २ परी. ३ हातें उघडिलें.

येरी म्हणे, ' मी वैदर्भकुमरी । नैषधरायाची अंतुरी । कांतें सांडिलें वनांतरी[1] । त्याचे शोधन करीतसें.' ॥ १५१ ॥ तिचें अवलोकितां वदन । व्याधा हृदयीं धडकला मदन । म्हणे, ' सेवीं तूं माझें सदन । भार्या होईं सुंदरी. ' ॥ १५२ ॥ कामबुद्धी येतां निकटी । पवित्रा पाहे क्रोधदृष्टी । प्रेत होउनी पृथ्वीतटी । पडता जाला तात्काळीं. ॥ १५३ ॥ तेथुनी चालिली अमार्गें । देखे वृक्षांचीं दार्गें । मार्ग पुसावया मागें । पुढें कोणी दिसेना. ॥ १५४ ॥ विचित्र श्रृंगाचे पर्वत । तरू लागले असंख्यात । श्वापद पक्षी यांचें गणित । कोणातेंही न करवे. ॥ १५५ ॥ व्याघ्र सिंह[2] देखोनि दृष्टी । निर्भय धांवे गोरटी[3] । नैषध देखिला हे गोष्टी । सांगा ' म्हणे ' सुहृद हो ! ' ॥ १५६ ॥ विशाळ देखोनी पर्वत । तया करूनियां प्रणिपात । पुसे, ' नैषध प्राणनाथ । येणें मार्गें देखिला. ' ॥ १५७ ॥ अशोक वृक्ष देखोनि त्यातें । प्रार्थूनी पुसे जोडिल्या हस्तें, । ' नळाची शुद्धि सांगोनी मातें । अशोक करी अशोका ! ' ॥ १५८ ॥ अनेक श्वापदांचिया थाटीं । भयें कोणी न येती निकटीं । म्हणती, ' पतिव्रता दृष्टी । भस्म करील आमुतें. ' ॥ १५९ ॥ पुढें प्रचंड वनकेसरी । त्यातें विनवी जोडुनी करीं । म्हणे, ' कृपा[4] करोनी माझे शिरीं । नैषध सांग केउता ? ॥ १६० ॥ सव्य घालुनी पद्मनयना । केसरी गेला विशाल वना । पुढें जातां तापसारण्या । देखती जाली ती वनीं. ॥ १६१ ॥ अमृतोदकें देवतटिनी । तैशी सरिता प्रवाहे जीवनीं । माजी विकासल्या नलिनी । श्वेत रक्त बहुवर्ण. ॥ १६२ ॥ तेथें हंस कारंडक । चकोर मयूर चक्रवाक । सदां फळीं फुलले रुख ।

१ कांतारी. २ कुंजर. ३ तयां निकटीं. ४ चतुर्दंष्ट्र क्रूर केशरी.

अनुक्रम ... ... ...

आम्रजंबूपनसादी. ॥ १६३ ॥ बैसल्या तपोधनांच्या श्रेणी । जपी तपी अनुष्ठानीं । एकांतनिष्ठ ध्यानीं । ‘ सोऽहमस्मि ’ या लक्षीं. ॥ १६४ ॥ वसिष्ठ अत्री भृगु ऋषी । तयांसमान तपोराशी । दृष्टी देखोनी मानसीं । परम विश्रांती पावली. ॥ १६५ ॥ तयांते करूनी नमस्कार । विदित केला समाचार, । ऋषी म्हणती, ‘ वो साचार । सर्व आम्हीं जाणतसों ॥ १६६ ॥ आतां चिंता त्यागीं चित्तें । शीघ्र भेटशी वल्लभातें । तुमचें ऐश्वर्यपद तुम्हांतें । प्राप्त होईल जाण पां. ’ ॥ १६७ ॥ ऐसें वदोनी ते क्षणीं । अदृश्य जाले सिद्ध मुनी । नदी ना ते वृक्ष नयनीं । एकही तेथे दिसेना. ॥ १६८ ॥ चमत्कार मानुनी चित्तीं ; पुढां चालिली महासती । वनोपवनें लंघितां क्षितीं । महा मार्ग उतरे. ॥ १६९ ॥ देखतां झाली वसता पंथू । वाणी जाणें असंख्यातू । भरूनी नाना वस्तुजातू । सुखें जाती स्वदेशा. ॥ १७० ॥ हस्तीवाजीउष्ट्रशकटीं । गोणिया वृषभांचिये पृष्ठीं । घंटाघोषें एक दाटी । मार्गीं जाता देखिले. ॥ १७१ ॥ ते उतरतां सरिताजळीं । समीप पातले विदर्भबाळी । तीतें देखोनी वैश्यीं सकळीं । नाना तर्कीं तर्किलें. ॥ १७२ ॥ एक म्हणती, ‘ वनदेवता । शाकिनी डाकिनी देवकांता. ’ । एक म्हणती, ‘ भूमाता । यक्षिणी किंवा राक्षसी. ’ ॥ १७३ ॥ एक प्रार्थिती, ‘ महाशक्ती ! । आम्हीं निर्विघ्न जाईजे पंथीं । ऐसा वर देउनी हातीं । अभय वोपीं आमुतें. ’ ॥ १७४ ॥ येरी म्हणे, ‘ मी मानविणी । नव्हे राक्षसी अथवा यक्षिणी; । पतीनें त्यागिलें दुस्तर

---

१ ध्यानी अनुष्ठानीं. २ मानिली. ३ वाणिग्जन; वणिक्समुदाय. ४ वस्तुवित्तु. ५ नाना तर्कें तर्किलें; अनेक तर्क तर्किलें. ६ भूतमाता.

वनीं । त्याचें शोधन करीतसें. ' ॥ १७५ ॥ वाणी म्हणती, ' तूं डोळसा । एकली मार्ग क्रमिशी कैसा । आम्हीं जातसों चैद्यदेशा । त्वांही संगीं [1]चालीजे. ' ॥ १७६ ॥ शुचीनामा वैश्य एक । सकळ वणिजांचा नायक । आश्वासुनी म्हणे, ' लोक । भेटवीन तुज तुझा. ' ॥ १७७ ॥ तयासंगीं पंच राती । क्रमितां दिवस एक वसती । तडागतटीं वणिक्पती । स्वस्थ आनंदें राहिली. ॥ १७८ ॥ अर्ध रात्रीं कुंजरथाट । पाणिया पातला एक वाट । मार्ग रोधिला दे[2]खोनी आट । मार्गस्थांतें मांडिला. ॥ १७९ ॥ ते कुंजर पाणियाकडे देखा । नित्याभ्यासें येती उदका । मार्ग कोंडिला देखोनी लोकां । महाप्रळय मांडिला. ॥ १८० ॥ तंव[3] वारण मत्त कारणी । असंख्य सावकारांच्या श्रेणी । चूर्ण करूं लागल्या चरणीं । मार्गीं वसती तयांतें. ॥ १८१ ॥ शुंडा [4]कवळूनी पाडी धरणीं । एक हाणोनियां दशनीं । [5]एक ऊर्ध्व सांडितीं गगनीं । पिष्ट करिती अस्थींचें ॥ १८२ ॥ तेथे उठिला हाहाकार । दाहीं दिशा पळती नर । पाठीं लागले कुंजर । पि[6]टूनियां मारिती. ॥ १८३ ॥ वृक्ष-गुल्मीं वणिकमेळा । म्हणतीं, ' पातली काळवेळा । अंधकार दाटला डोळां । पळतां मार्ग दिसेना. ॥ १८४ ॥ म्हणती, ' कवणाचें हें पाप । [7]कीं दुष्ट ग्रहाचा कोप । [8]कां मुहूर्त लोपाचा विक्षेप । किंवा दोष आमुचे. ॥ १८५ ॥ चुकलों यक्षराजाची पूजा । विभागें [9]नेदूं देवराजा । कीं स्थळदेवता क्षोभूनि वोजा । महाव्यसनीं पडियेलों. ॥ १८६ ॥ एक म्हणती, ' संगें नारी । ते नेमस्त निशाचरी ।

१ चलीजे. २ म्हणोनी. ३ मत्त. ४ पिळूनी. ५ रगडूनियां सांडिती चरणीं ६ टिपूनियां. ७ नेणों. ८ किंवा शिवाचा कोप. ९ की विभाग न दिला.

तिचेनि योगें महामारी। पातली हें जाणिजे[1]. ॥ १८७ ॥ दिन उगवल्या पडेल नयनीं। तरी काष्ठीं[2] कां पाषाणीं। मारूनि सांडा येथें, मनीं। अवमान कोणी न करावें.' ॥ १८८ ॥ ऐकोनी हें विदर्भकुमरी। न विचारितां अति घाबरी। पळों लागली अंधकारीं। वनें उपवनें लंघूनी. ॥ १८९ ॥ विचार करी हृदय-स्थळीं, । 'काय बोलिजे जनीं सकळीं। एवढी विस्तीर्ण मही स्थळी[3], । मज एकीतें उबगली. ॥ १९० ॥ उभें राहवया न ठाव। कवण्या कर्में कोपला देव। सुकृतें जोडिलीं तीं वाव। सर्व जालीं एकदां. ॥ १९१ ॥ जन्मोनी असत्य नेणें वदनीं। भूतद्रोह नाठवे मनीं। स्वप्नीं साधुनिंदेची कहाणी। श्रवणीं नाहीं परिशिली. ॥ १९२ ॥ नाहीं गुरूची केली अवज्ञा। छळिले नाहीं तपोधना। एवढा दुःखभोग प्राणा। किमर्थ जाला कळेना. ॥ १९३ ॥ स्वयंवरीं हेळुनी देवपंक्ति। म्यां नैषध वरिला पति। हें[4] पाप कांहीं ग्रंथीं। तें मज कांहीं नेणवे.' ॥ १९४ ॥ ऐशी सखेद अन्तःकरणीं। तंव उव-गला वासरमणी[5]। वसता देश देखे नयनीं। गोधने वनीं विचरती. ॥ १९५ ॥ गोक्षुरकां पुसे पंथ, । ते दाविती हस्तसंकेत, । 'चैद्यदेश हा[6] पुण्यवंत। पवित्र लोकीं वसतसे. ॥ १९६ ॥ पुढें चैद्यनृपाची पुरी। सुबाहु राजा राज्य करी। न्यायें[7] वसत सदा-चारी। प्रजा पाळी स्वधर्में ॥ १९७ ॥ दिवस असतां चार घटिका। नगरीं प्रवेशली देखा। तीनें अवलोकितां लोकां। अत्यद्भुत भासलें. ॥ १९८ ॥ अर्धवस्त्रा, मुक्तकेशी। धूळीधूसर दाटलें शिसीं।

---

१ जाण पां. २ कां शस्त्रीं हो पाषाणीं. ३ तळीं. ४ जरी पाप असेल कांहीं ग्रंथीं. ५ दिव्य तरणी. ६ महा. ७ न्यायवंत.

उपोषणें वदनशशी । क्षीण जैसा अमावस्ये. ॥ १९९ ॥ नेत्रीं क्षीर-सिंधूचें जळ । हृदयीं संतापवडवानळ । परी[1] सत्य स्वधर्म अचळ । न भंगेची स्वधर्मी.[2] ॥ २०० ॥ लहान-थोर लोक बोले । टाकिती कर्दमगोमयगोळे । पिशाच मानुनी सकळें । उपहासिती विनोदें. ॥ २०१ ॥ राजमाता उपरिकासदनीं । दुरूनि देखती झाली नयनीं । धात्री धाडुनी आज्ञावचनीं । पाचारिली जवळिके. ॥ २०२ ॥ दुरी वारूनिया[3] लोकां सकळां[4] । निकट बैसविली वेल्हाळा । वदन अव-लोकितां डोळां । करुणा आली अद्भुत. ॥ २०३ ॥ सुरत्न देखोनी पारखी । म्हणे, 'हे वस्तु अमोलिक निकी.' । तेंवी जाणोनी म्हणे, 'सखी ! । सांग; तूं कवण कवणाची. ॥ २०४ ॥ रूपें श्रियेचा[5] हरिशी मानू । क्लेशें[6] तुझी व्यापिली तनू । एकटी हिंडसी हा कवणू । भोग हा तुझा नेणवें.' ॥ २०५ ॥ येरी म्हणे, 'मी नृप-नंदिनी । पवित्रभूपाळराजपत्नी । पति पडला द्यूतव्यसनीं । तेणें वनीं त्यागिलें. ॥ २०६ ॥ या लागीं वसुधा शोधी । अद्यापी कोठे नलगे शुद्धी । आजी दैवें भाग्यनिधी । पावल्यें मी सुकृतें.' ॥ २०७ ॥ वृद्धा म्हणे, 'गुणवती ! । स्वस्थ राहे मजसंगती । शोधुनी आणीन तुझा पती । हें निश्चित जाण पां. ॥ २०८ ॥ राम जानकी ऐसें जाण । भोग करीन दोघांजणां, । खेद संताप नाठवी मना । चिंता दवडी परौती.' ॥ २०९ ॥ भैमी म्हणे, 'ऐक माते ! । कन्या म्हणोनी पाळिशी मातें । मनें नेमिलीं तिन्ही व्रतें ।

---

१ परी सत्यवचन धैर्य अचळ. २ मर्यादा. ३ सारूनियां. ४ लोकपाळां. ५ स्त्रियांचा. ६ क्लेशे व्यापिली तनू; क्लेशें व्यापिली दिसे तनू. ७ साजणी.

तीं त्वां नेमें रक्षावीं. ॥ २१० ॥ न करी उच्छिष्ट भोजन[1] । न करी परपादप्रक्षालन । परपुरुषाशीं संभाषण । स्वप्नीं तेंही करीना. ॥ २११॥ ऐसा चालविशी नेम । तरिच घडेल समागम' । वृद्धा म्हणे, 'अति उत्तम । भाव मातें मानवला. ॥ २१२ ॥ तूतें पाहेल पापनेत्रीं । त्याचें मस्तक छेदीन शस्त्रीं । समाधानें गुण पवित्रीं । संगीं असें[2] माझिया.' ॥ २१३ ॥ स्वहस्तें सुवास पवित्रीं । अच्छादिलीं सुकुमारगात्रीं । फळें जळें आहोरात्रीं । सांभाळींत असे स्नेहें. ॥ २१४ ॥ सुनंदा[3] आपुली नंदिनी । तीतें म्हणे, 'हे तुझी भागिनी, । दोघीं असावें ऐकमिळणीं[4] । गंगायमुनासारिख्या.' ॥ २१५ ॥ यापरी चैद्यनृपाचे[5] घरीं । स्थिरावली वैदर्भकुमरी. । कथा लागली दुसरी । नळाकडे ते ऐका. ॥ २१६ ॥ इति श्रीभारतवनपर्वणि । कथा नर्मदारसवाहिनी । ओविया रूपें पवित्र पुलिनीं । बाणलिंगें विचित्रें[6]. ॥ २१७ ॥ तटीं[7] श्रवण सुखाचे आर्ती । तपश्चर्या करितां श्रोतीं । भुक्ति मुक्ति आयती । स्वधर्मपत्नी[8] सारिखी. ॥ २१८॥ इति 'वनपर्व' भारत । मुक्तेश्वरकविविरचित । आदरें ऐका समस्त । कथा निश्चित परिसावी. ॥ २१९ ॥

---

## अध्याय आठवा

निद्रिस्त सांडूनी दमयंती । नैषध गेला अरण्यपंथीं । पुढां देखे चंड पर्वतीं । वणवा प्रचंड लागला. ॥ १ ॥ त्यामाजी[10] पडिलासे

---

१ रसभोजन; अशन. २ वसें. ३ सुमेध. ४ सुनिर्मल मनीं. ५ पुढारी. ६ पवित्रें. ७ तरी. ८ भोगा ९ स्वधर्म धार्मिका देतसे. १० त्यामाजी पडला मंडळ ऐसा भोगी.

भोगी । तो म्हणे, 'नैषधा धांवें वेगीं । मातें काढुनी त्रिजगीं । यश घेईं पवित्रा !' ॥ २ ॥ राजा म्हणे, 'पातलों पाहीं । मरण-भयातें न [1]शिवें कांहीं.' । पावकचक्रांतुनी लवलाहीं । महाभुजंग काढिला. ॥ ३ ॥ हातें उचलितां राजा नळ । अंगुष्टमात्र जाला व्याळ । वन्हीपासुनी सुशीतळ । दुरी [2]ठायां पातला. ॥ ४ ॥ त्यांतें [3]सांडितांची धरणी । तव तो जाला विशाळ फणी । म्हणे, 'राजया ! पवित्रपाणी । वरप्रसाद घे माझा. ॥ ५ ॥ कर्कोटक नागराज । शेष वासुकीचा अनुज । नारदशापास्तव निस्तेज । वन्हीचक्रीं पडियेलों. ॥ ६ ॥ 'तुतें ग्रासितां वनपावक । सोडवील पुण्यश्लोक । ते वेळे शापाचा कलंक । परिहरेल निर्धारें.' ॥ ७ ॥ ते आजी पातली प्रतीती । तुझेनि पावलों सुखविश्रांती । आतां सांगेन तें चित्तीं । धरूनी तैसें वर्तावें.' ॥ ८ ॥ उभा करूनियां [5]राया । [6]पदीं गणविली अंगच्छाया । दहावे पाउलीं तीं पाया । दंश केला फणींद्रें. ॥ ९ ॥ दशनीं चावितांची चरण । गौरतेचा सुवर्णवर्ण । लोपुनी श्यामता संपूर्ण । शिरपादांत पातली. ॥ १० ॥ आजानुबाहु लोपुनी शब्द । र्‍हस्वबाहू र्‍हस्वपाद । विरूपता पातली मंद । [8]असौंदर्य जालें स्वदेहीं. ॥ ११ ॥ नागेंद्र म्हणे, 'कारण येथें । अज्ञातवास घडेल तुतें । ओळख न व्हावी कवणातें । नांवें रूपें [9]कधींही . ॥ १२ ॥ माझें विष हें भेदलें आंगीं । हें तुज वज्र-कवच हो [10]जंगीं । कलीची बाधा न हो, आगीं । शीत जैसें बाधिना.

---

१ पवें. २ तेथें. ३ सांडूनी. ४ तेव्हां सोडवील नृपनायक. ५ महाराया. ६ पादीं. ७ नलिता. ८ सौंदय गेलें स्वदेहीं. ९ जनदृष्टीं. १० आंगीं.

॥ १३ ॥ माझें विष महाश्रेष्ठ । कष्ट भोगितां न्हे[1] कष्ट । शीतोष्णादि भय संकट । प्रगटतां ही नें पेवि[2]. ॥ १४ ॥ बाहुक ऐसें धरुनी नाम । सेवितें[3] ऋतुपर्णाचें धाम । चतुर्थ वर्षीं[4] पुरुषोत्तम । कृपा करील निर्धारें. ॥ १५ ॥ स्वस्वरूपाची वासना । उठतां मातें स्मरावें प्राज्ञा ! । स्मरणमात्रें मनकामना । पूर्ण करीन निर्धारें.[5] ' ॥ १६ ॥ ऐशी वदोनी वरदवाणी । अदृश्य जाला विशाळ फणी । नैषध 'बाहुक' या अभिधानीं । अयोध्यापुरा पातला. ॥ १७ ॥ नमस्कारिलें राजोत्तमा । 'अश्वपारखी सूतकर्मा । पाकविद्या दुर्गधामा । निर्मूं जाणें शिल्पक. ॥ १८ ॥ आणिक विद्येची कौतुकें । तीं हीं[5] दावीन मी प्रत्येकें । भृत्यत्व देउनी जवळिकें । पालन केलें पाहिजे.' ॥ १९ ॥ ऋतुंपर्ण[6] अयोध्यापति । म्हणे, 'मज मानले बहुतां रिती । सारथी होउनी सेवावृत्ति । मासवादें असावें. ॥ २० ॥ वार्ष्णेय नामा नळसारथी । तोही असे मजसंगतीं । विशेष विद्या देखोनी प्रीती । तुझ्या ठायीं जडलीसे ॥ २१ ॥ अश्वशाळेचें स्वामित्व, । अन्नपाकाचें कर्तृत्व । निकटवर्तीयां श्रेष्ठत्व । तुज विश्वासें दिधलें. ॥ २२ ॥ सहस्र निष्क मासमासा । वेतन देईन परम पुरुषा ! । तुतें देखतां मानसा । परमानंद वाटतसे.' ॥ २३ ॥ बाहुक म्हणे, 'नरवरेशा । नाहीं द्रव्याची दुराशा । देहनिर्वाहग्रासवासा । कृपेनें कांहीं अर्पावें.' ॥ २४ ॥ आश्रय[7] मानुनी अंतरीं । बाहुक राहिला आयोध्यापुरीं; । रात्रीं निद्रेच्या अवसरीं । हाक मारी आक्रोशें. ॥ २५ ॥ 'अर्ध वस्त्र छेदूनि करीं । कांता सोडिली

१ नेणसी. २ नेणवे. ३ सेवीं. ४ दिवशीं. ५ समयीं. ६ ऋतुपर्ण राया ७ आश्चर्य मानुनी अंतरीं; आश्रय रायाचा धरीं.

वनांतरीं । निरुदक, निराहारी । प्रतिव्रता एकटी. ॥२६॥ धिक् धिक् जळो त्या नराचें जिणें । प्रेतप्राय [2]जितसे प्राणें । गति काय झाली जाणे । ईश्वर एक तियेची. ॥२७॥ निमाली किंवा वांचली प्राणें । हें तत्त्वता जाणिजे कोणें ?। तो आठव आठवूनि मनें । शोक करी अपार. ॥२८॥ राजा म्हणे, 'रे बाहुका ! । कायसा [3]शब्द जल्पिसी मुखा ?' । येरू म्हणे, 'अभाग्य मूर्खा । पुरुषा एका देखिलें. ॥२९॥ त्याची आठवली कथा । तेची मुखीं पातली आतां । तें दुःख आठवुनी चित्ता । खेद वाटे अद्भुत.' ॥ ३० ॥ येरीकडे कुंडिनपुरीं । भीमक भार्येशीं चिंता करी । सुगुण जामात पवित्र कुमरी । काय झाली कळेना. ॥ ३१ ॥ राज्यहानीचा हृदयीं शोक । शरीरीं क्लेशाचें परम दुःख, । निराहारी, निरुदक, । पादचारी, सुकुमार. ॥ ३२ ॥ दोघीं जणीं सांडिला प्राण । इयेविषयीं नाहीं अनुमान; । कीं गांठीं होतें अपार पुण्य । यास्तव दैवें वाचलीं. ॥ ३३ ॥ हाचि कळेला पाहिजे अर्थ, । ब्राह्मण प्रेरिले असंख्यात । वोपूनियां अपार वित्त । छपन्न देशीं धाडिले. ॥ ३४ ॥ 'शोधील जो नळदमयंतीतें । सहस्र धेनु अर्पीन त्यातें । सहस्र ग्राम देईन निश्चितें । शत सहस्र धन संख्या.' ॥ ३५ ॥ पृथ्वी शोधितां ब्राह्मणीं । कोठें वार्ता न पडे श्रवणीं । शून्यवादी यांचे [6]वचनीं । नास्तिकता ज्या परी. ॥ ३६ ॥ त्यांत सुदेव पुरोहित । पुरें पट्टणें अवलोकित । नळ दमयंती पुसत । चैद्यपुरा पातला. ॥३७॥ तेथें राजयाचे सदनीं । मांगल्यगृहांगणीं । सुनंदा वैदर्भी दोन्ही । लावण्यलतिका देखिल्या. ॥ ३८ ॥ न्याहाळुनी पाहतां नयनीं । भैमी वोळ-

---

१ कांतारीं. २ जातसे. ३ कुशब्द. ४ सांडुनी. ५ कल्पिजे. ६ वदनीं. ७ सुमांगल्यकृत्य पुण्याहवाचन.

खली लक्षणीं । प्रपंचनिष्ठांमाजी[1] ज्ञानी । आत्मनिष्ठ बोळखे. ॥३९॥ म्हणे, 'कष्टाची जाली सिद्धी । उदीम करितां लाधला निधी.' । जानकीदर्शनें बलाब्धी । हनुमंत जैसा संतोषे. ॥ ४० ॥ मग संकेतें प्रगटी मात, । 'मी जाण सुदेव पुरोहित । पुरें पहूणें अवलोकित । तुजची लागीं पातलो. ॥ ४१ ॥ क्षेम तुझा जनक जननीं, । क्षेम बंधु बाळकें दोन्हीं । तुझे चिंतेचा वडवाग्नी । आहोरात्रीं जाळीतसे.' ॥ ४२ ॥ ऐकोनी सुदेवाचें वचन । दमयंतीतें पातलें रुदन । अश्रुधारा स्रवती नयन । तें देखिलें सुनंदा ॥ ४३ ॥ तिणें जाणविलें राजमातेतें । ते[2] पचारीं सुदेवातें । 'सर्व वृत्तांत सांग मातें । हे कोठील ? कोण? कोणाची? ॥ ४४ ॥ तो म्हणे, 'हे वैदर्भतनया । नैषध नृपाची प्रिय जाया । [3]दमयंती नामें विश्व इया । मान्य होय सद्गुणीं. ॥ ४५ ॥ द्यूतीं हारवूनी राज्य । वना गेले नैषधराज । वनीं सांडिली हे भाज । ऐसें कर्णीं परिसलें. ॥ ४६ ॥ याचें करावया शोधन । भीमकें प्रेरिले [4]बहु ब्राह्मण । म्यां शोधिलीं वनें उपवनें । दैवें येथें देखिली. ॥ ४७ ॥ उपजत भाळीं अनर्घ्य मणी । तों आच्छादिला मृत्तिकाकणीं । तो म्यां लक्षिला लक्षुनी । जेवीं पारखी रत्नातें. ॥ ४८ ॥ सुनंदा राजमाता हातें । भाळीं पाहतां त्या चिन्हातें । दृष्टी देखोनियां, निरुतें । आश्चर्यातें पावली. ॥४९॥ वातें सारोनी अंबरा । जेवी लक्षिजे भार्गवतारा । तेवी वारुनी कवरीभारा । रत्नमणी देखिला. ॥ ५० ॥ हृदयीं कवळोनी दमयंती । दीर्घ स्वरें रुदना करिती । राजमाता आणि गुणवंती । सुनंदा ही आक्रंदे. ॥ ५१ ॥ स्नेहें बोले राजमाता । 'माझे

---

१ प्रपंचामाजील प्राणी. २ पुसती झाली एकचित्तें ३ दमयंती नावो विश्वमाया. ४ उत्तम.

भगिनीची हें दुहिता । खुणा ओळखिली आतां । हा काळवरी [1]मेणें ॥ ५२ ॥ लग्नामाजीं म्या देखिली । ते आजी लक्षणीं बोळखिलीं । सुनंदेहुनी [2]वहिली । कन्या माझी निर्धारें. ' ॥ ५३ ॥ भैमी म्हणे, 'मातृभगिनी । शोकें शोकलीं पिता जननी । मातें देखिलीया नयनीं । अमृतपान तयातें. ॥ ५४ ॥ कन्या कुमर दोन्ही बाळां । पहाव-याची आवडी डोळां । धेनु वत्सा होय मेळा । ऐसें करीं दयाळे ! ॥ ५५ ॥ तुवां रक्षिला माझा प्राण । कृपेनें केलें संरक्षण । आतां पितयाचें दर्शन । होय ऐसें करावें. ' ॥ ५६ ॥ राजमाता संतुष्ट मनीं । पुत्रा अज्ञापी सुवचनीं, । ' दमयंतीतें शिबिकायानीं । छत्र-छाये बोळवी. ' ॥ ५७ ॥ वस्त्राभरणीं फळीं जळीं । दासदासी-सुहृदमेळीं स्नेहभावें गुणवेल्हाळी । बोळविली माहेरा. ॥ ५८ ॥ कुमारी पातली कुंडिनपुरा । देखोनी आल्हाद राजेश्वरा । आलिं-गुनी अश्रुधारा । अभिषेकिला मस्तक. ॥ ५९ ॥ मातेतें देउनी आलिंगन । दीर्घ स्वरें करी रुदन, । म्हणे, ' धन्य धन्य माझे नयन । तुतें [3]देखिली मागुती. ' ॥ ६० ॥ बंधूंसि भेटोनी गोरटी । उभय बालकें धरिलीं पोटीं । नेत्रीं होय उदकवृष्टि । ते पुसिली जननीयें. ॥ ६१ ॥ अरण्यवास परगृहत्रास । दोहीं क्लेशांचा जाला नाश । पितृगृहींचा सुवास । यातनाप्राय अवगमे. ॥ ६२ ॥ फल तांबूल अन्नोदक । न शिवे आभरणांशुक । पतिवियोगाचें दुःख । देहीं [4]धडके सर्वदा. ॥ ६३ ॥ दुःखें सांगे माते प्रति । मातें वांच-वावयाची आर्ती । तरी शोधावा नैषधनृपति । नाना देशीं भूतळीं. ॥ ६४ ॥ राजयातें सांगे कांता, । ' कुमारीहृदयीं अपार व्यथा । वाटे

१ नेणेंचि पैं. २ हे वहिली. ३ देखती. ४ चिंताग्रस्त मानसीं.

नळातें न देखतां । प्राण त्यजील निर्धारें.' ॥६५॥ अपार वोपोनी धना । रायें पाठविले द्विजगणां । करुनी मेदिनीची खनना । नळनिधान शोधावें. ॥ ६६ ॥ नळशोधना जाती जे द्विज । पवित्र तयां भैमी बोधी बीज- मंत्र । तोची मंत्र जगाच्या श्रोत्रा । ऐकवीत चालिले. ॥६७॥ 'सवर्म[1] ऐकोनी वचनें । उत्तर देईल सखेद मनें । तोची वोळखावा खुणें । कोण वेश केउता.' ॥ ६८ ॥ 'क्षुधित वनिता अर्धवसनी । रात्रीं सांडिली येकटी वनीं । ऐसा पुरुष ये मेदिनी । देखिला अथवा ऐकिला ! ॥ ६९ ॥ जो कथील त्याचीये वार्ते । बहुत पुण्य घडेल त्यातें, । ऐसा घोष हो[2] जगातें । गर्जोनिया बोलती. ॥ ७० ॥ 'नगरें पुरें बहु पट्टणें । शोधिलीं ऋषींचीं तपोवनें । परंतु प्रत्युत्तर 'हो' वचनें । कोणी तोही वदेना. ॥ ७१ ॥ ब्राह्मणीं शोधितां भूमंडळ । कोठे चोजवेना नळ । अभाग्य काळ पातलिया विफळे[3] । कष्ट होती ज्या परी. ॥ ७२ ॥ पर्णाद नामा ब्राह्मण सुमती । मथुरा, माया, कांची काशी । अवंतिका द्वारावती । साही पुऱ्या शोधिल्या, ॥ ७३ ॥ मग पातला अयोध्यापुरा । भेटला ऋतुपर्ण राजेश्वरा । वार्ता जाणवितां, तो उत्तरा । सुफळ कांहीं बोलत. ॥ ७४ ॥ 'आमुच्या घरीं बाहुकनामा । सेवकवृत्ती सूतकर्मा । निद्राकाळीं ब्राह्मणोत्तमा ! । ऐसें कांहीं अनुवादे. ॥७५॥ त्याची घेऊनियां भेटी । त्यातें जाणवी हे गोष्टी । तो बोलेल तेचि पोटीं । जाणवेल शाहाणियां.' ॥ ७६ ॥ मग येउनी बाहुकाप्रति । पर्णाद पुसे नाना युक्ति, । 'अदुष्टा चिन्मया पतिव्रा सती । सानुकूळ सर्वदा. ॥ ७७ ॥ क्षुधिता तृषिता वस्त्ररहिता । वनीं एकटी सांडी भर्ता । धैर्य विश्रांति त्याचिया

---

१समर्थ. २ ते जगातें; या जगातें; सर्व जगातें. ३ विकळ.

चित्त । कोणे विचारें कल्पावें. ॥ ७८ ॥ ऐसा पुरुष ये मेदिनीं । देखिला ऐकिला असेल श्रवणीं । तरी आमुतें सत्य वचनीं । सांगीतलें पाहिजे.' ॥ ७९ ॥ बाहुक परिसोनी द्विजवाणी । अश्रुपात उभय नयनीं । मुख आच्छादुनी वसनीं । परम दुःखें विकल्पतु. ॥८०॥ म्हणे, ' पुरुष तो देखिला । त्याचेनि दुःखें उमड आला । परंतु नेणों केउता गेला । जवळीं म्हणोनी ऐकिजे. ॥ ८१ ॥ तोहि मुखें बोलिला ऐसें, । ' अनुचित राहाटलीया पुरुषें । कुळस्त्रियासी द्वेष-रोषें । निंदा सहसा न करिती. ॥ ८२ ॥ जे अवगुण बोले मुखीं । दोष आच्छादी लौकिकीं । ते पैं देवाचे मस्तकीं । मान्य होय पवित्र.' ॥ ८३ ॥ ऐसें बोलोनी महापुरुषा ! । नेणों गेला कवण्या देशा । पुढती भेट होईल स्वल्प दिवसां । नेमशब्द वदलासे.' ॥ ८४ ॥ ऐकोनी सूताचीं उत्तरें । पर्णाद नगरा पातला त्वरें । दमयंतीस सविस्तारें । निवेदिला वृत्तांत ॥८५॥ ' कांहीं रूपाचा पालट नयना । इतर सर्व सारख्या सूचना[1] । कोण माया ते विचक्षणा । चोजवेना सुजाणे ! ॥ ८६ ॥ स्पर्शला तुझ्या त्यागपापा । म्हणवुनी पालट जाला रूपा । येऱ्हवीं नळची तो, विकल्पा । ठाव नाहीं निर्धारें.' ॥८७॥ सुदेव पाचारुनी सुमती । त्याप्रति अनुवादे दमयंती, । ' तुवां जाउनी अयोध्येप्रति । आन युक्ति करावी. ॥ ८८ ॥ ' शोधितां कोठें न दिसे नळ । दमयंतीचा तारुण्यकाळ । राजा धर्मशास्त्रीं कुशल । सारासार जाणता. ॥ ८९ ॥ पुढती कन्येचें स्वयंवर । करीतसे भीमक नृपवर । पृथ्वीतळींचे राजेश्वर । पाचारिले आदरें. ॥ ९० ॥ उदईक एका प्रहरांत । स्वयंवर नेमिलें नेमस्त । तुम्हीं यावें जी त्वरित ।

---

१ खुणा.

समारंभें सोहळिया.' ॥ ९१ ॥ सुदेव जाउनी अयोध्यापुरा । कथिलें ऋतुपर्ण राजेश्वरा । तेणें सारथिया चतुरा । पाचारूनी आज्ञापी. ॥ ९२ ॥ 'शत योजने विदर्भ नगरी । येका दिवसा हो! माझारी । [१]सूर्य असतां घटिका च्यारी । शीघ्र गेलें पाहिजे.' ॥ ९३ ॥ सारथी [२]म्हणे, 'हें अघटित । शत योजनें दुरी पंथ । अश्व घेउनी जाती रथ । केंवि घडे सांग पां?' ॥ ९४ ॥ दमयंतीचें स्वयंवर । पुढती होतसे नवल थोर । गेलें पाहिजे सत्वर' । बाहुकातें म्हणतसे. ॥ ९५ ॥ बाहुका जाणवलें चित्तीं, । 'आपणा शोधावयाचे आर्ती । मांडलीसे उपाय युक्ति । येर वदंती वाउगी. ॥ ९६ ॥ अथवा माझे अवगुण दोष । आठवुनी घेतला असेल त्रास । नेणवें स्त्रियांचें मानस । विकार पात्रे प्रारब्धें. ॥ ९७ ॥ तथापि दमयंतीचें मन । मजवांचुनी न स्मरे आन । मातें शोधावया [३]जाण । हेंचि घडे निर्धारें. ॥ ९८ ॥ असो. ऋतुपर्ण राजेश्वरा । घेउनी जाणें कुंडिन-पुरा । तेथें घडेल त्या विचारा । जाणवेल स्वभावें.' ॥ ९९ ॥ मग हांसुनी म्हणे आपुले ठायीं, । म्हणे काम अवघड काई । राजा म्हणे तेच समयीं । रथ नेईन त्या ठायां.' ॥ १०० ॥ रायें देउनी आलिंगन । पाठी थापटी संतोषोन । अश्वशाळेप्रति नेउन । म्हणे, 'वारू अवलोकीं ॥ १०१ ॥ जे मानतील तुझिये [४]युक्ति । तेच वारू योजीं रथीं । शतयोजनें दुरी पथीं । एके दिवसीं जे जाती.' ॥ १०२ ॥ बाहुकें अवलोकुनी हातीं । कृश ठेंगणे परि सुजाती । तेची जोडिले कनकरथीं । म्हणे, 'आरूढें नरेंद्रा!' ॥ १०३ ॥ राजा म्हणे, 'बाहुक सुमति । निर्बळ रोडके जुंपिले रथीं.' । तो म्हणे, 'याचिया पंक्ती । बळि-

---

१ दिवस. २ म्हणती. ३ प्रयत्न. ४ चित्तीं; बुद्धि.

वंत आन असेना.' ॥ १०४ ॥ सांट बोपितांची ठायीं । वारू पडले पुढले पायीं । बाहुकें उतरोनी भुई । कुरवाळिले स्वहस्तें. ॥ १०५ ॥ नळाचेनी हस्तस्पर्शें । वारू [1]उडाले गरुडा ऐसे । पवन वेगाहुनी विशेषें । मनोगती निघाले. ॥ १०६ ॥ चमत्कारला अयोध्यापाळ, । 'मिथ्या बाहुकू, यथार्थ नळ । रथविद्ये ऐसा कुशळ । आन त्याविण असेना.' ॥ १०७ ॥ वार्ष्णेय आश्चर्य करी चित्तीं । म्हणे, 'नळा ऐसी रहंवरगति । वाटे नळाचीये संगती । विद्या येणें साधिली.' ॥१०८॥ रथ चालतां मानसगति । राजवसन पडिलें क्षिती, । वार्ष्णेयातें म्हणे [2]नृपति, । 'शीघ्र घेईं सुजाणा!' ॥ १०९ ॥ बाहुक म्हणे, 'कैचें वसन । रथ पातला दश[3] योजन । येतां जातां परतोन । आज तुम्हा न भेटे.' ॥ ११० ॥ मार्गीं भल्लातकाचा तरु । देखोन बोले राजेश्वरु । म्हणे, 'बाहुका! चमत्कारु । माझा कांहीं अवलोकीं. ॥ १११ ॥ तूं तंव विद्यासमुद्र जगतीं । निश्चयें मानला माझ्या चित्तीं । मी ही कुशळ असें गणितीं । लीलावतीग्रंथज्ञ. ॥ ११२ ॥ पत्रें फळें याचीं लक्षीं । तळीं पडलीं जडलीं वृक्षीं । तें मी सांगेन तूं साक्षी । गणना धरूनी पाहें पां. ॥ ११३ ॥ पांच कोटी पत्रीं फळीं । पूर्वे दिशे शाखा सरळी । दहा कोटी वरी आगळीं । पांच शत दक्षिणे. ॥ ११४ ॥ परि हा नाहीं गणिताचा समय । अस्तमाना पावेल सूर्य । सायंकाळ होतां वायो । शीतल वाजूं लागला.' ॥ ११५ ॥ बाहुक म्हणे, 'करीन गणना.' । राजा म्हणे, 'न करी प्राज्ञा! । सूर्य न वचतां अस्तमाना । शीघ्र गेलें पाहिजे.' ॥ ११६ ॥ बाहुक म्हणे, 'राजेश्वरा! । संध्या करूनी परमचतुरा! । दिवस

१ उधळले २ हातीं. ३ दोन; एक. ४ येणें मार्गीं.

असतां कुंडिनपुरा । तुज नेईन निर्धारें.' ॥ ११७ ॥ पत्र फळांची गणना । बाहुकें मोजितां आणिली मना । रायें बोलिल्या प्रमाणा । गांठी पडली नेमस्त. ॥ ११८ ॥ म्हणे, 'बहुरत्ना वसुंधरा । कोणी गर्व न करणें पुरा । गणितविद्या राजेश्वरा ! । अवगत नाहीं आमुतें.' ॥ ११९ ॥ राजा म्हणे, 'विद्याद्वय । गणित आणि अक्षयहृदय । तुज मी देईन, वीर्य शौर्य । जेणें होय वाढतें. ॥ १२० ॥ अश्वविद्या मातें । तुवां सांगावी उदारचित्तें । गुरुत्व शिष्यत्व दोहांतें । समसमान वर्सो दे.' ॥ १२१ ॥ अक्षविद्या कथिली राया । जाणता जाला अश्वहृदया । पाश देती इच्छिल्या डाया । ते दिधली नळातें. ॥ १२२ ॥ अक्षविद्या हृदयकमळीं । रिघतां बाहेर निघाला कली । कृष्णवर्ण जिव्हा काळी । रक्तनेत्र भ्यासुर. ॥ १२३ ॥ नळें देखतांचि तेथ । कोधें खड्गा घातला हात, । पुढती सांवरोनी चित्त । शांत केलें विवेकें. ॥ १२४ ॥ शाप वदों पाहे वदनीं । तो विनवी जोडुनी पाणी, । म्हणे, 'पुण्यश्लोका ! करणी । तामसाची तुज नसों दे. ॥ १२५ ॥ कलियुगीं तुझी कीर्ती । विस्तारीन त्रिजगतीं, । तूतें स्मरती त्या निश्चिती । विषबाधा असेना. ॥ १२६ ॥ तुझें चारित्र जे गाती । अथवा पुढिलासें ऐकविती । त्यांतें अक्षय भुक्ति मुक्ति । विघ्नशांति मी कर्ता. ॥ १२७ ॥ काम क्रोध लोभ मानें । ऐश्वर्याच्या मदानें । प्राणी राहाटे तें तें करणें । मज कलीचें जाण पां. ॥ १२८ ॥ नळदमयंतीचें स्मरण । करितां कलीची बाधा जाण । नाहीं नाहीं हे प्रमाण । सत्य जाण त्रिवाचे.' ॥ १२९ ॥ ऐसा वर वदोनी मुखीं ।

---

१ रथ. २ अश्वहृदय. ३ तामस असुराची. ४ युगानुयुगीं. ५ सत्य आण शिवाची.

कली रिघाला भल्लातकीं । तैंपासुनी ये लोकीं । वृक्ष निषिद्ध जालासे[1]. ॥ १३० ॥ वमन होऊनि तात्कालिक । गेलें आंगीचें विषोदक । श्यामता लोपोनी निःशेष । वैरूप्य[2] कांहीं राहिलें. ॥ १३१ ॥ कृष्णवर्ण लोपली छाया । सुवर्णवर्णी आंतली छाया । विलक्षणता ह्रातां पायां । तों नावेक उरलीसे. ॥१३२॥ दिवस असतां चारी घटिका । राजा वार्ष्णेय सहबाहुका । रथ पातला नगरमुखा । कुंडिनपुरा जवळिके ॥ १३३ ॥ नाहीं राजे, ना राजकुमर । नाहीं चतुरंग दळभार । स्वयंवरवार्ता नारीनर । नगरीं कोणी नेणती. ॥ १३४ ॥ राजा साशंक हृदयीं[3] । म्हणे, 'ब्राह्मणें कथिलें काई । स्वयंवराची इये ठायीं । कथा वार्ता नायको.' ॥ १३५ ॥ ऋतुपर्ण पातला कुंडिनपुरा, । भीमक पातला सामोरा । हृदयीं म्हणे, 'अति सत्वरा । कारण कोण यावया. ॥ १३६ ॥ शत योजने दूरी पंथ । एका दिवसा यावया येथ । कवण कार्य तें यथार्थ । चोजवेना अनुमाना[4]. ॥ १३७ ॥ नळावेगळी हे युक्ती । आणिकां नाहीं त्रिजगतीं । त्याचीं न देखों आकृती । हाही येथे संशय.' ॥ १३८ ॥ असो उदईक विचारूं भाव । विश्रांतीस वोपिला ठाव । भोजन सामुग्री सुदेव । राजआज्ञेनें देतसे. ॥ १३९ ॥ ऐकोनी रथाचा धडधडाट । गृहीं गोपुरीं दणदणाट । दमयंती म्हणे, 'प्रगट । हा निर्घोष नळाचा. ॥ १४० ॥ कृपा करील रमाकान्त । तरी आज देखेन प्राणनाथ । आनंदसिंधु हृदयांत । हेलावत सुचिन्हीं ' ॥ १४१ ॥ राजा आणि वार्ष्णेय दोन्ही । विश्रामले विश्रामसदनीं । रथ घेउनी बाहुक गुणी । अश्वशाळे पातला. ॥ १४२ ॥ वारु

१ निंद्य वृक्ष तो झाला. २ विरूपता. ३ विषयीं. ४ आमुतें.

करूनी श्रमातीत । आपण आसनीं बैसला स्वस्थ । दमयन्ती धाडी वेगें तेथ । राजदासी केशिनी. ॥ १४३ ॥ तिणें वंदुनी मस्तकें । म्हणे, ' पवित्रा ! आलासी सुखें । पर्णाद बोलिला तें मुखें । वाक्य मातें परिसवीं. ॥ १४४ ॥ ऐकूं इच्छितसे दम. यंती । शोकें शोकली अहोरात्रीं । तिचीया शोका होय शांती । ऐसें[1] करीं धार्मिका ! ॥ १४५ ॥ रायासवें तिसरी प्रतिमा । तो कोण सांगे मनवोत्तमा ! ' बेरू म्हणे, ' वार्ष्णेयनामा । नळसारथी जाणतसां.' ॥ १४६ ॥ केशिनी म्हणे, ' गा ! गुणाब्धी ! । तो सांगेल नळाची शुद्धि.' । येरू म्हणे, ' कासया बुद्धि । दहा मार्गी धांवडसी. ॥ १४७ ॥ अपत्यें ठेवुनी तुमच्या घरीं । आपण राहिला अयोध्यापुरीं । नळवृत्तांत तो निर्धारीं । नेणे ऐसें मी जाणें. ॥१४८॥ लोपोनियां रूप नांव । तीर्थे क्षेत्रें पुरें ग्राम । तापसवेषें नरेंद्रोत्तम । अटन करीत वैराग्यें. ॥ १४९ ॥ मुखें बोले ऐसी वाणी । पुरुषें केली अनुचित करणी । उत्तम स्त्रिया दृष्टी वचनी । न बोलती दोषांतें. ॥ १५० ॥ अवदशेचा दुष्टे[2] संचार । जालिया अविवेकें वर्ते नर । अवगुण निंदेचा उच्चार । कुलवधू जे करीना. ॥ १५१ ॥ ते लोटुनी सूर्याचे मस्तक । पावे अक्षय ब्रह्मलोक । उमेसमान वृंदारक-- । मान्य होय ते निर्धारें. ॥ १५२ ॥ दोषी याचे दोष अनेक । बोलणें तें अविवेक । न बोले नाठवी तो देख । मूर्तिमंत ईश्वर. ॥ १५३ ॥ ऐसें बोलतां त्रिचरे महीं । पूर्वीं वार्ता परिसिली पाहीं । प्रस्तुत कोठें कळलें नाहीं । समीप किंवा दुस्तर. ' ॥१५४॥ केशिनी सांगतांचि सुवचनें । पुढती पाठवी चेष्टाचिन्हें । अवलोकोनी

---

१ ऐसें केलें पाहिजे. २ भूत.

आपुल्या नयनें । सर्व सांग मजप्रति. ॥ १५५ ॥ केशिनी पाहे तेचि-क्षणीं । भोजनसामग्री ब्राह्मणीं । आणिली तेही वन्ही पाणी । नसतां तेथें आहुर्के. ॥ १५६ ॥ तृण कवाळितांचि मुष्टीं । ज्वाळा निघाल्या धडधडाटी । हस्त लावितां मृत्तिकाघटीं । गंगोदक उसळलें. ॥१५७॥ क्षणामाजी केला पाक । स्वादिष्ठ सुवास चोंख । केशिनी म्हणे, 'अलौलिक । चमत्कार देखिला.' ॥ १५८ ॥ शतपत्र चंपकाची माळा । रगडुनी हातीं केली गोळा । पुढती स्पर्शतां कोमळा । सद्य साजुक परिमळ ॥ १५९ ॥ दमयंतीनें धाडिलें मांस । स्पर्शतां जालें उष्ण सुरस । भैमी चाखतां म्हणे, 'पीयूष । हस्तगुण नळाचा.' ॥ १६० ॥ केशिनी सांगतां कौतुक । खुणा बाणली प्रत्येक । मग म्हणे, 'दोन्ही बाळक । दृष्टीं नेऊन दाखवी.' ॥१६१॥ अपत्यें देखतांचि दृष्टीं । मोहें धावुनी धरिलीं पोटीं । दुःख दाटोन कंठीं । शोक करीत आक्रोशें. ॥१६२॥ पुढती म्हणे, 'माझिया बाळां । सारिखींही देखिलीं डोळां । यालागीं उपजोनी कळवळा । हृदयीं दुःख दाटलें.' ॥ १६३ ॥ परिसोनी दासीच्या वचना । दमयंती पावली खुणा । मग मातेसी विवंचना । मनोभावें मांडिली. ॥१६४॥ 'रूपावेगळा सर्व गुणीं । नैषध होय हा सुलक्षणी । मी जाऊनियां आपुले नयनीं । अवलोकीन जननीये !' ॥ १६५ ॥ पतीस पुसोनी दिधली आज्ञा । नळपरीक्षे धाडिली कन्या । सती म्हणे, 'महाप्राज्ञा ! । सत्य वायां लोपिसी. ॥१६६॥ प्रकट करीं आपणीयातें । कां वधुनी जाय आपुले हातें । तुझिया वियोगाचिया व्यथे । सांडू न शके सर्वथा. ॥ १६७ ॥ सांडूनि देवसमूह । तुतें आवडी अर्पिला देह । तो विसरोनी सर्व

१ बाटोन.

स्नेह । कैंवि निष्ठुर जालासी ? ॥ १६८ ॥ शत योजनें क्रमुनी पंथ एके दिवशीं आणिला रथ । येवढें विद्येचें सामर्थ्य । तुजविण कोणा सांग पां ?' ॥ १६९ ॥ ऐकोनी दमयंतीची वाणी । अश्रु-धारा स्रवती नयनीं. । म्हणे, 'वल्लभे ! बोलतां वचनीं । लज्जा मातें येतसे. ॥ १७० ॥ कली संचारला मद्यपानें । विवेकस्मरण[1] सांडिलें मनें । म्हणोनी ऐसें कुश्चित करणें । घडलें जाण सुजाणे ! ॥ १७१ ॥ त्या दुर्जनें सांडिली काया । आतां बुद्धि पातली ठाया । पश्चाताप जाला हृदया । तो वदनीं व बोलवे. ॥ १७२ ॥ शकुनीनें वस्त्र नेलें गगना । मग छेदिलें अर्ध वसना । न देखवे तव वेदना । यालागीं त्यागुनी मी गेलों. ॥ १७३ ॥ कर्कोटकें केला दंश । यालागीं रूपा जाला नाश, । बाहुक नामें होऊन दास । ऋतुपर्णातें सेविलें. ॥ १७७ ॥ तुझी परिसिली स्वयंवरवार्ता । म्हणोनियां ऋतुपर्णाचिया रथा । शत योजनें क्रमुनी पंथा । कौतुक पाहों पातलों. ॥ १७५ ॥ पुढती कीजे विवाहकर्म । ऐसी माझी करणी अधम । नूतन भ्रताराचा काम । धरितां दोष तुज नाहीं. ॥ १७६ ॥ पवित्र पुरुषातें पतिव्रता । त्यागिल न घडे सर्वथा । दूत सांगती स्वयंवरवार्ता । भूमंडळीं रायातें.' ॥ १७७ ॥ ऐसें अनुवादितां नळ, । भैमी हस्तें पिटी भाळ[2] । म्हणे, 'साक्ष त्रैलोक्यपाळ । अंतरात्मा कर्मातें. ॥ १७८ ॥ हृदयीं प्राण, सूर्य साक्षीं, । मनीं चंद्रमा, पावक कुक्षीं, । माझिया स्वधर्माची साक्षी, । प्रत्यक्ष होउनी देती कीं. ॥ १७९ ॥ जरी आचरें पाप-लेश । तरी या शरीरा हो कां नाश । नळावेगळा आन पुरुष । जागृतीं स्वप्नीं जाणेना.' ॥ १८० ॥ अंतरिक्ष वायो देवो । म्हणे,

---

१ विवेकविचार    २ कपाळ

'पवित्र बोळखे भावो । दमयंतीच्या विषयीं वावो । विकल्प तुझा सर्वही. ॥ १८१ ॥ हिचा परिहारु म्यां बोलिजे । हिची उपमा हिसीच साजे । सांडुनी विकल्पाचे ओझें । पतिव्रता शांतवी. ॥१८२॥ तुतें शोधावयाचें आर्ती । स्वयंवरशब्दें साधिली युक्ति । अन्यथा असेल तरी क्षिती । भार सांडील विश्वाचा. ॥ १८३ ॥ आतां संशय सोडुनी मना । आलिंगीं हे पवित्रांगना । इंद्रसेनी इंद्रसेना । अंकासनीं बैसवीं. ॥१८४॥ हृदयीं कवळी हे कामिनी । कडिये घेई बाळकें दोन्हीं । विशेष बोलसी तरी हे वाणी । आण विष्णु शिवाची.' ॥ १८५ ॥ दिव्य दुंदुभी लागल्या गगनीं । आशीर्वादें गर्जती मुनी । दिव्याभरणें देवांगनीं । दमयंतीवरी टाकिलीं. ॥ १८६ ॥ ऐसें ऐकतां उत्तर । उभय लोकीं जयजयकार । वर्षले सुमनांचे भार । अमरगणीं विमानीं. ॥ १८७ ॥ करितां कर्कोटकाचें स्मरण । कुरूपतेचें जीर्ण वसन । दृष्टीवातें उडोनी पूर्ण । नलस्वरूप प्रगटलें ॥ १८८ ॥ अभ्रें फिटतां जैसा भानू । दृष्टीं दिसे देदीप्यमानू । तेंवि देखतां । लावण्यधनु । नयनपद्में निवालीं. ॥ १८९ ॥ परस्परें झोंबोनि कंठीं । आलिंगनीं पडली मिठी । परमानंदें कोंदली सृष्टी । सुख संतोष सर्वांतें. ॥ १९० ॥ नाठवे वनवासाचें दुःख । न स्मरे वियोगशोक । ब्रह्मांडघटीं भरिला हरिख । जो कल्पांतीं सरेना. ॥ १९१ ॥ प्रीतिपडिभरें कळवळुनी । प्रवेशला राजसदनीं । नारी करिती अक्षवाणी । एकासनीं दोहींतें. ॥१९२॥ करुनी पादप्रक्षालन । करविलें अभ्यंगमर्दन । सारूनियां सुखभोजन । सुमनशेजे पहुडलीं. ॥ १९३ ॥ मन मीनलें हृदयकमळीं । [1]परस्परें क्षेम कवळीं । उभय तनू जाल्या

---

१ सर्व इंद्रियां क्षेम कवळीं.

मेळीं । जावळ फळापरी. ॥ १९४ ॥ विदेशीं निधान हारपलें । तेंचि आंगणीं सांपडलें । हृदयमांदुसे सांठयिलें । आवळिलें भुजग्रंथीं. ॥ १९५ ॥ म्हणती, 'ब्रह्मीचें अक्षय सुख । द्वैतदर्शनाविण हीन तुक.' । नळ दमयंतीचा हरिख । सांठवेना ब्रह्मांडीं. ॥ १९६ ॥ पुरलें मनोरथाचें आर्त । दमयंतीतें आल्हाद बहुत । क्लेश भोगिले ते म्हणत । तपश्चर्या मज फळली. ॥ १९७ ॥ शांति सुखाची शार्वरी । भोगिताचि भानु उदय करी । मात विस्तारली नगरीं । तेणें[1] आल्हाद पौरजां. ॥ १९८ ॥ भीम पातला दर्शना, । प्रीतीनें दिधलें आलिंगना । म्हणे, 'पारणें झालें नयना । बहुतां दिवशीं आमुतें.' ॥ १९९ ॥ महोत्सव मांडिला नगरीं । गुढिया तोरणे घरोघरीं । गर्जना मांडिली[2] मंगळतुरीं । तेणें अंबर कोंदलें. ॥ २०० ॥ शर्करा फळांचे पर्वत । जना वाटिले अपरमित । धनें वसनें असंख्यात । कुबेर केले मागते. ॥ २०१ ॥ सुदेवा आणि पर्णादातें । धेनु रत्नें अपारें[3] वित्तें । ग्रामें रत्नें अपार नगरातें । अग्रहारें दीधलीं. ॥ २०२ ॥ ऋतुपर्ण करी विज्ञापना, । 'नेणतां घडली जे अवज्ञा । कृपासमुद्रें दीना । क्षमा केली पाहिजे.' ॥ २०३ ॥ नळ बोले प्रतिवचन, । 'तुवां रक्षिला माझा प्राण । तुझिया उपकारा उत्तीर्ण । केंवि होय सांग पां. ॥ २०४ ॥ उचिता वोपोनियां संपत्ति । अयोध्ये धाडिला अयोध्यापति । वार्ष्णेय नामा नळसारथी । पूर्वाधिकारीं राहिला. ॥ २०५ ॥ मास एक क्रमुनी तेथें । आज्ञा पुसोनी विदर्भातें । स्वल्प परिवार सांगातें । घेउनियां चालिला. ॥ २०६ ॥ वहना आपणा दिव्य रथ । दिव्य वारू पांच शत ।

---

१ परमानंद जगातें. २ होत. ३ अपरमितें.

षोडश हस्ती मदोन्मत्त । पायदळ षट् शतें. ॥ २०७ ॥ ऐसें घेऊनी राजेश्वरा । पातला वीरसेननगरा । जनसमुदाय सामोरा । योजन एक धांविन्नला. ॥ २०८ ॥ राहोनी नगराबाहेर क्षिती । निरोप धाडिला पुष्कराप्रति । द्यूत खेळावया पुढती । पण घाळूनी राज्याचा. ॥ २०९ ॥ 'जरी न येसी द्यूतकाजा । तरी सिद्ध होई निर्वाण झुंजा । घालुनियां प्राणाची पैजा । महा युद्धा प्रवर्ते.' ॥२१०॥ पुष्कर म्हणे, ' अभाग्यमूर्ती । पैजा जिंकली संपत्ति । भोगिली नाहीं रे ! दमयंती । ते वासना उरलीसे. ॥२११॥ आज पुरवीन मनींची आशा । पुढती धाडीन अरण्यवासा.' । खेळ द्यूत म्हणोनी फांसा । कपटबुद्धि टाळितु. ॥ २१२ ॥ राज्यमदें मदोन्मत्त । पुष्करें मांडिलेंसे द्यूत । प्रथम डावीं समस्त । राज्य वैभव[1] हारविलें. ॥ २१३ ॥ गेलें कलीचें साह्यबळ । ऋतुपर्णाची विद्या सुफळ । जयवंत जाला राजा नळ । हार आली पुष्करा. ॥ २१४ ॥ शिरच्छेदना उभविला हात । सर्वांचे जाला कृपावंत । कळीच्या अपराधें याचा घात । व्यर्थ करणें कासया ? ॥ २१५ ॥ म्हणे, 'जीवदान दिधलें, जाई । आपुले गृहीं स्वस्थ राहीं, । माझी आज्ञा पाळुनी गृहीं । दासमर्यादें वर्तावें.' ॥२१६॥ समुद्रवलयांकितधरित्री । राज्य पावला एकछत्री । पुत्र कन्या सह कलत्रीं । ऐश्वर्य भोगी स्वानंदें. ॥ २१७ ॥ अश्वमेध राजसूय याग । असंख्य[2] संपादिले सांग । इच्छादानभूषणीं जग । शृंगारिलें पवित्रें. ॥ २१८ ॥ इहलोकीं जोडुनी कीर्ति । परलोकीं साधिली मुक्ति । पुण्यश्लोक चक्रवर्ती । नळनामा सुपवित्र. ॥२१९॥ यापरी कष्ट भोगुनी क्षिती । सत्व रक्षूनी जोडिली कीर्ति[3] ।

१ सर्व. २ अपार ३ निर्दोष कीर्ति.

धर्मा ! तुझे कष्ट किती । नळापुढें सांग पां ? ॥२२०॥ बंधु परिहारिती क्लेशा । द्रौपदीसंगें क्रमिशी निशा । साधुसेवेनें पवित्र पुरुषा । दोषनाश होतसे. ॥ २२१ ॥ चाऱ्ही पुरुषार्थ धरुनी चित्तीं । सत्यें जोडावी सत्कीर्ति । करुनी शत्रुकुळाची शांति । अक्षय राज्य पावसी[1]. ॥२२२॥ ऋतुपर्णे दिधली नळा । ते तुज देतसें नृपाळा । अक्षय अक्षविद्या कुशळा । धर्मा ऋषीनें दीधली. ॥ २२३ ॥ आज्ञा मागोनी बृहदश्वा । आश्रमा गेला कुरुपार्थिवा । नलोपाख्यान श्रवणें जीवा । चारी पुरुषार्थ जोडती. ॥ २२४ ॥ लीलाविश्वंभर ईश्वरू । कवि गुरूचा आदिगुरु । त्याचेनि प्रसादें मुक्तेश्वरू । निरोपीतसे संतोषें[2] ॥ २२५ ॥ इति श्रीभारते वनपर्वणि । ' नलोपाख्यान ' कथाश्रवणीं । दोष दूर्वडोनीं निरोपणीं सादर श्रोतीं परिसावें. ॥ २२६ ॥

———

अनुक्रम ९८३५५
विभाग ८१ ...
क्रमांक ७२८०
नों. दि. २०।१२

## अध्याय नववा

चौघे बंधु आणि पांचाळी । वनीं वसती एके मेळीं । अर्जुनवियोग हृदयकमळीं । परम दुःखी समस्तें. ॥ १ ॥ बृहदश्वा मुळियावरी । ब्रम्हनिष्ठ ब्रम्हचारी । नारद मुनी कृपे करी । धर्मभेटी पावला. ॥ २ ॥ साष्टांग करूनियां नमन । विनीत भावें करी प्रश्न, । म्हणे, ' स्वामी ! तूं सर्वज्ञ । परम गुरु आमुतें. ॥ ३ ॥ केलिया सकळ पृथ्वीप्रदक्षिणा । कर्ता पावेल फळ कवणा ? । भूमंडळीं[3] तीर्थें नाना । केलिया कवण सुकृत ? ॥ ४ ॥ नारद म्हणे, ' ऐक

१ पावाल. २ संताते. ३ भूमंडळींची.

स्वस्थ । गंगाद्वारीं पितृव्रत । भीष्म करितां अकस्मात । पुलस्त्य तेथें पातला. ॥ ५ ॥ त्याप्रति भीष्माचार्यें जाण । तुझ्याचि ऐसा केला प्रश्न । ऋषीनें केलें निरूपण । तेंचि तूं ऐक धर्मज्ञा[1] ! ॥ ६ ॥ जो शुचिर्भूत शुद्धमती । ईश्वरभावना सर्वभूतीं । तो वसे सर्वदा तीर्थीं । तीर्थें वसती त्यासंगी. ॥ ७ ॥ तीर्थीं नै[2] वसतां तीर्थवास । सत्यवंत[3] नित्य निर्दोष । तीर्थीं वसतां पुण्य लेश । तीर्थें एका नेदिती. ॥ ८ ॥ मत्सर नैष्ठुर्य भूतद्वेष । भजनमार्गींचा उपहास । तीर्थें त्याचा घेती त्रास । कीटकदेशीं[4] त्या वसती. ॥ ९ ॥ काम क्रोध लोभ त्रयां । स्पर्श न करी जयाची काया । तो तीर्थवासी जाण राया ! । तीर्थें पाय वंदिती. ॥१०॥ विष्णुस्मरण शिवस्मरण । दोघीं त्रसविलें ज्याचें वदन । तोचि तीर्थवासी जाण । तीर्थें चरण वंदिती. ॥ ११ ॥ इंद्रियनियमाचा[5] व्यसनी[6] । सत्य मधुर असे वाणी । अहंकार ज्याचिया मनीं । संचरेना सर्वथा. ॥१२॥ तो सकल तीर्थांचा धात्रा । तीर्थें करिती त्याची यात्रा । पादोदकालागीं पवित्रा । तीर्थें माथा वोढवती. ॥ १३ ॥ तीर्थीं असोनी इच्छारहित । प्रतिग्रहा न घाली हात । यथालाभें संतोष भरित । तो 'तीर्थस्वरूप' जाणावा. ॥ १४ ॥ परधनीं अंधत्व ज्याचिया नयना । परस्त्री पहातां क्लीबत्व मना, । परापवादीं मूकत्व वदना । तो जनक जाण तीर्थांचा. ॥ १५ ॥ मनइंद्रियनिग्रहकारी । तो गृहीं असोनी जान्हवी तीरीं । तीर्थीं असोनी अनाचारी । तो कीटकवासी जाणावा. ॥ १६ ॥ सत्यशीळ दृढवृत्ती । आत्मभावना सर्वभूतीं । क्रोध कधीं क्षीं नातळे शांती । तो तीर्थीं सर्वी सेविजे.

---

१ सर्वज्ञा. ३ नसतां. २ सत्यनिष्ठ; सत्यव्रत. ४ कीटक देश त्या करिती. ५ नित्यनियमाचा. ६ आसनीं. ७ सृष्टीचा. ८ घटिका.

॥ १७ ॥ सुबुद्धशील[1] विद्यातीर्थीं । साधु सुस्नात सत्यतीर्थीं[2] । कुलांगना लज्जातीर्थीं । पवित्र होती जाण पां. ॥ १८ ॥ धनाढ्य निर्दोष दानतीर्थीं । पाप निःपाप गंगातीर्थीं । क्षत्रिय राजे धारातीर्थीं । प्रक्षाळिती अघातें.[3] ॥ १९ ॥ योगी आत्मज्ञानतीर्थीं । आत्मस्वरूप स्वयंज्योती[4] । श्रवणादिक नव ही तीर्थीं । भक्ति होती हरिरूपें[5] ॥ २० ॥ असो निरूपणाची युक्ती । जाणती अथवा नेणती । भक्तां[6] होय मोक्षप्राप्ती । सत्य[7] जाण निर्धारें ॥ २१ ॥ ऋषीश्वरीं वेदवचनीं । महाफळें कल्पिलीं यज्ञीं । तीं यज्ञफळें तीर्थस्नानीं । वेदवाणी अनुवादे. ॥ २२ ॥ तें प्रमाण करूनियां गंगापुत्रा । ज्या म्यां केल्या तीर्थयात्रा । श्रवणफळालागीं सुपवित्रा । कर्णकूपिका बोडवीं.' ॥ २३ ॥ भारतीं सत्यवतीचा कुमर । तीर्थें बोलिला शतसहस्र । तितकीं सांगतां सविस्तर । दुजें भारत होऊं पाहे. ॥ २४ ॥ या लागीं श्रेष्ठ एकदोनी । तीर्थें परिसवूं श्रोतया श्रवणीं । सकळ तीर्थफळांच्या श्रेणी । बांधुनी देऊं एकदां ॥ २५ ॥ कृतयुगीं मुख्य पुष्कर, । त्रेतीं नैमिषारण्य पवित्र, । द्वापरामाजी कुरुक्षेत्र, । गंगा श्रेष्ठ कलियुगीं. ॥ २६ ॥ गोदा जान्हवी रेवा पाहीं । कृष्णा वेणी जलप्रवाहीं । 'गंगा' शब्द यांच्या ठायीं । नेमिलासे निर्धारें. ॥ २७ ॥ पृथ्वी निर्मितां विधाता । आधीं निर्मी पुष्करतीर्था । तेथील महिमा बोलतां । माझेनीही न बोलवे. ॥ २८ ॥ पुलस्त्य म्हणे, ' मन्मथजिता । भीष्माचार्या ! सत्यव्रता । आधीं जाउनीं पुष्करतीर्था । मग आणिक वंदावीं. ॥ २९ ॥ दहा सहस्र महातीर्थें ।

---

१ शुद्धशील. २ सुस्नात होती संकल्पें. ३ आपणातें. ४ स्वयें होती. ५ प्रिय हरिहरां. ६ शरीर प्रक्षाळितां तीर्थीं. ७ मोक्ष ८ यथार्थ. ९ दारु १० वेणीं; वेण्या.

तुळने घालुनी तुळितां हातें । पुष्करींचा भाग शतें । समानता न पवती. ॥३०॥ दहा सहस्र वर्षेवरी । वास करितां गंगातीरीं । पुष्करामाजी एक रात्री । वसतां ते फळ पावती. ॥ ३१ ॥ त्या वंदोनी तीर्थो-त्तमा । जंबूमार्ग तंदुलिकाश्रमा । अगस्त्यकण्वाश्रमा । श्रीजुष्ट जाण त्यापुढें. ॥२२॥धर्मारण्य महाकाल । कोटितीर्थें असती विशाल ; भद्रवर[1] उमापतिस्थळ । पुढां नर्मदा पवित्र. ॥ ३३ ॥ दक्षिणसिंधू चर्मण्वती । हिमवंत अर्बुदाचल क्षिती । प्रवेशावया पाताळपंथीं । छिद्र जेथें महातें. ॥ ३४ ॥ पूर्वें[2] श्रेष्ठ वासिष्ठाश्रम । पिंगलतीर्थ प्रभास[3] परम । सरस्वती सागर सिंधूत्तम । ब्रह्मतुंग[4] इत्यादि. ' ॥ ३५॥ हीं मुख्य करुनी शत सहस्र । वदला पुलस्त्य ऋषीश्वर । तें परिसोनी गंगा-कुमर । त्याचिरितीं वर्तला. ॥ ३६ ॥ रहस्य वदोनी भीष्माप्रती । अदृश्य जाला मुनि पुलस्ती । त्याचे श्रवणें पवित्र मूर्ती । चारी पुरु-षार्थ पावला . ॥ ३७ ॥ कपटपाश धरिले करीं । तेव्हांच अवदशा तव शरीरीं । प्रवेशली ते नानापरी । पीडा करी जाण पां. ॥ ३८ ॥ काया प्रक्षाळितां तीर्थीं । पुण्य शरीरीं करील वसती । सर्व दोषां होउनी शांती । अष्ट ऐश्वर्य पावसी. ॥ ३९ ॥ आतां लोमश येईल एथें । तो दावील तेणेंचि पंथें । द्रौपदी बंधुत्रय सांगातें । तीर्थयात्रे निघावें. ' ॥ ४० ॥ ऐसें सांगूनी नारदमुनी । जाता जाला तेचि क्षणीं. । धौम्य म्हणे, ' विवेकखाणी ! । तीर्थयात्रा म्यां केली. ॥ ४१ ॥ तेही कांहीं परिसवूं तूतें । मीही येतसे सांगातें । भूप्रदक्षिणा जेणें पंथें । केली तेंही ऐक पां. ॥४२॥ पूर्व दिशे तीर्थाटन । करितां आधीं नैमिषारण्य । गोमती[6]तीर अति-

१ भैरवदेव. २ पुढें. ३ पवित्र. ४ प्रत्यतुंग. ५ वाक्यें. ६ गौतमींतीर.

पावन । वसतिस्थान ऋषींचें. ॥ ४३ ॥ ब्रह्मगया फल्गुतटीं । तेथें पितृगणांच्या कोटी । पाषाणरूपें फल्गूचे वाळवंटीं । अनंतकाळ तिष्ठती. ॥ ४४ ॥ वंशज येउनी गयावर्जनीं । तृप्ती करील पिंड-दानीं । वास्तव अक्षय्य ब्रह्मभुवनीं । वास घडे आमुतें. ॥ ४५ ॥ यालागीं उत्तम पुरुष जाण । गयेस देती पिंडदान । देव त्यातें म्हणती धन्य । येर पाषाण नरदेहीं. ॥ ४६ ॥ भारद्वाजाचा आश्रम । गंगायमुनेचा संगम । प्रयाग ' तीर्थराज ' हें नाम । तया ठाया बोलिजे. ॥ ४७ ॥ वैकुंठ कैलास एक मिळणी । काशीरूपें पातले धरणी । म्हणोनी धूर्जटी मुरारी दोन्ही । एके ग्रामीं वसियले. ॥४८॥ बिंदुमाधव आणि धूर्जटी । सुखसंवाद करिती गोष्टी । मोक्ष विके फुकासाठीं । समस्तातें सारिखा. ॥ ४९ ॥ कौशिकी नदी परम । विश्वामित्राचा आश्रम । शरयूशोणभद्रसंगम । पूर्वप्रयाग बोलिजे. ॥ ५० ॥ तेथूनी सहस्रमुखी गंगा । ऐक्यें मीनली सिंधुओघा । स्मरणें पावन करीं जगा । दर्शनें सायुज्य रोकडें. ॥ ५१ ॥ हिरण्य-बिंदु तीर्थोत्तम । कालंजर पर्वतनाम । अगस्त्याश्रम पवित्र परम । महेंद्र पर्वत त्यापुढें. ॥ ५२ ॥ भार्गवाश्रमीं गंगाआप । ब्रम्हेंशाला धूतपाप । मंगलीयकेदारदर्शनें ताप । संसारींचा परिहरे. ॥ ५३ ॥ मतंग कुंडोद देववन । बाहुदा नदी नद जाण । हे मुख्य करुनी जन पावन । कोटीतीर्थें पूर्वेचीं. ॥ ५४ ॥ आतां तीर्थें दक्षिणदिशे । तींहीं आयका सावकाशें । श्रवणें कोटि पाप नासे । दर्शनें मोक्ष आयता. ॥ ५५ ॥ गोदा तापी पयोष्णी । भीमा कृष्णा तुंगा वेणी । उभय

---

१ ब्रह्मयाग. २ स्वर्गभुवनीं. ३ त्रिपुरारी. ४ तापसाश्रम; तापसाधम. ५ निर्मळ शुभ्र न उरे पाप. ६ मंगल.

कावेरी ताम्रपर्णी । दक्षिण दिशे प्रसिद्ध. ॥५६॥ मार्कंडेय नृगाश्रम । वराहतीर्थ पवित्र परम । माठरवन कण्वाश्रम । वरुण स्रोतसागिरी. ॥५७॥गंगादि सरितांच्या सेवनीं । जितुकें पुण्य लाहे प्राणी । तितुकें पयोष्णीचें पाणी । स्पर्शतां फळ लाहिजे. ॥ ५८ ॥ वेदीतीर्थ शूर्पारक । जमदग्नीचा आश्रम देख । चंद्रतीर्थ आणि अशोक । पाषाणतीर्थ त्यापुढें. ॥ ५९ ॥ पांड्य देशामाजी जाण । अगस्त्य-तीर्थ आणि वारुण । कुमारीतीर्थ अतिपावन । सिंधुपारीं पवित्र. ॥ ६० ॥ ताम्रपर्णी संगमीं विमळें । निपजती माणिकें मुक्ताफळें । सुवर्ण खाणी सरोज नीळें । स्थळस्थळीं प्रसवती. ॥ ६१ ॥ गोकर्ण जें का समुद्रतीरीं । तृ[1]णवृक्षसहित देवगिरी । वैडूर्य पर्वतापरिसरीं । अगस्त्याश्रम साजिरा. ॥ ६२ ॥ सुराष्ट्रीं चमसोद्भेदनपंथीं । प्रभास पिंडारक तें क्षिती । तेथूनीं पुढां द्वारावती । सप्तम पुरी मोक्षाची. ॥६३॥ आतां पश्चिमेमाजी अवधारीं । रेवा सिप्रा अवं[2]तिपुरी । विश्रवसुकुबेराश्रम निर्धारीं । वैदूर्यशिखर पर्वत. ॥ ६४ ॥ पुं[3]ण्य-तीर्था महानदी । विश्वामित्रसामर्थ्यसिद्धी । दि[4]व्यां ऱ्हादिनीं निर्मिली व्याधी- । जन्ममृत्यु दं[5]वडावया. ॥ ६५ ॥ कक्षसेनाश्रम च्यवनाश्रम । जंबूमार्ग शमीनाश्रम । केतुमाल पवित्र परम । मे[6]ध्यातीर्थ जाण पां. ॥ ६६ ॥ स्तुपिवि[7] पर्वत गंगारण्य । पिता-मह सैंधवारण्याश्रमा जाण । पुष्करादि मुख्य करून । तीर्थें अपार पश्चिमें. ॥ ६७ ॥ आतां आइक उत्तरपंथीं अग्निशिर यमुना सर-स्वती । वालखिल्याश्रम दृषद्वती । न्यग्रोधाख्य प्रसिद्ध. ॥ ६८ ॥

---

१ तृण सोमांक देवेश गिरी. २ अवदुंबरी. ३ प्रफुल्लनंदा ही नदी. ४ नदीपार निर्मिल्या व्याधी. ५ खंडावया. ६ मेधा. ७ विश्व. ८ सैंधवारण्य.

पांचालदाल्भ्याश्रम निःपाप । पलाशतीर्थ विशाखयूप । गंगाद्वारक-नखलआप । स्पर्शतां मोक्ष तापसां. ॥ ६९ ॥ भृगुतुंग पुरुपर्वत । विशाल बदरी जगविख्यात । नारायण स्वयें जेथ । तपश्चर्या करितसे. ॥ ७० ॥ नदी उष्णोदकशीतोदका । रत्नपाषाणसुवर्णवालुका । बदरीमहिमा सहस्रमुखा । वर्णवेना निर्धारें. ॥ ७१ ॥ स्वल्प-कांहीं वदलों वाणी । अटतां देखसी अपार नयनीं । धौम्य सांगे तेच क्षणीं । लोमश तेथें पातला. ॥ ७२ ॥ तो मुनिवर्य देखोनि नयनीं । धर्में मस्तक ठेविला चरणीं । नकुल सहदेव याज्ञसेनी । भीमसेनें वंदिला. ॥ ७३ ॥ वंदूनीं चरणतीर्था । पुष्पांजली वोपिली माथां । प्रसन्नमुखें मग सुवार्ता । धर्मराज विचारी. ॥ ७४ ॥ ' कोठूनी येणें जाणें कोठवरी, । एथें कीं वास वा पुढारी. ' । लोमश म्हणे, ' गा ! निर्धारीं । येणें एक तुजपाशीं. ॥ ७५ ॥ शक्रपार्थप्रेरणें । तुजचिप्रती जालें येणें ! बंधूची सुवार्ता सांगणे । परिहरणे तव चिंता. ॥ ७६ ॥ शक्राचिया अर्धासनीं । स्वर्ग-वैभवीं लोकनयनीं । तें देखोनी माझे मनीं । परम आश्चर्य वर्तलें. ॥ ७७ ॥ मनुष्यदेहीं स्वर्गसुख । भोगिता नाहीं देखिला एक । अर्जुनाचें भाग्य चोखं । एक वाचे न वदवे. ॥ ७८ ॥ ब्रह्मशिरो-नाम अस्त्र । त्रैलोक्यातें अनिवार । प्रसन्न होउनीं श्रीशंकरें । पार्था-लागीं दीधलें. ॥ ७९ ॥ पाशुपत दिधलें रुद्रें । लोकपाळीं दिधलीं शस्त्रें । तेणें तुमच्या शत्रूंचीं गात्रें । खंडविखंड होतील. ॥ ८० ॥ सरला अवदशेचा काळ । किंचित् उरला कर्ममळ । तो तीर्थें क्षाळुनी विमळ । स्वधर्म केला पाहिजे. ॥८१॥ प्रार्थना केलीसे पार्थें । लोमश

---

१ आधिक.

ऋषीचे सांगातें। भूमंडळींचीं पवित्र तीर्थें । विलोकावीं ये काळीं. ॥ ८२ ॥ यासी विलंब न कीजे येक क्षण । आतांचि केलें पाहिजे गमन। तीर्थपंथीं हो दर्शन। पार्थाचेंही लाधसी. ॥ ८३ ॥ विलोकीं सुबुद्धीचा मार्गू । ब्रह्मऋषीचा समुदायसंघू । तो हास्तिनापुरा धाडूनी लघू । तुवां जालें पाहिजे. ॥ ८४ ॥ प्रज्ञाचक्षु राया भीष्मा । तुझिये वचनीं स्नेह प्रेमा । पाहूनियां सुखविश्रामा । पाळितील द्विजांतें. ॥ ८५ ॥ कांहीं पाठवीं द्रुपदाप्रती। तोही राजा धर्ममूर्ती। तुझें वचन मानूनी प्रीती। सांभाळील ऋषींतें.' ॥ ८६ ॥ लोमशाचेनि आज्ञाशब्दे। धर्में धाडिलीं[1] ब्रह्मवृंदें । धृतराष्ट्रभीष्में आणि द्रुपदें। ईश्वरातुल्य मानिलीं. ॥८७॥ पुढती धर्माचें आगमन । तंववरी केलें द्विजपालन। जैसें[2] वेदविहित वचन। देवैनार्चन[3] नियमाचें. ॥८८॥ यावरी स्वयें व्यास भगवान। नारद पर्वत दोघेजण । धर्में करितां तीर्थगमन। भेटीलागीं पातले. ॥ ८९ ॥ देखोनिया ऋषिसज्जना। अत्यंत आल्हाद कुरुनंदना । सुमुहूर्तें नैमिषारण्या । तेचि दिवशीं पातला. ॥ ९० ॥ क्रमूनी मार्गशीर्ष मास । पौषमासीं कुरुनरेश। निघता झाला जेवि महेश। नाशावया दुरितांतें. ॥ ९१ ॥ धर्म चालिला तीर्थासी। हें ऐकोनी वनतापसी। अपार पातले तयांसी। समागमें घेतलें. ॥ ९२ ॥ लोमश म्हणे, 'कुरुनंदना । हे तिसरी आवृत्ति तीर्थाटणा। तुझेनी धर्मे बहु ब्राह्मणां । तीर्थयात्रा घडेल.' ॥ ९३ ॥ वंदोनी व्यासचरणा । नारदपर्वतांची आज्ञा । धौम्यलोमशसंगीं जाणा। नैमिषारण्या पातले. ॥९४॥ सारुनी गोमतीचे स्नान। द्विजां दीधले अपार धन। जें कां देउनी गेला श्रीकृष्ण ।

१ धाडिलीं. २ जैसें वेदवचन मान्य ३ तैसें त्यांहीं मानिलें.

धृष्टद्युम्न आवडी. ॥ ९५ ॥ कन्यातीर्थ अश्वतीर्थ । काककोटि गवांतीर्थ । [1]बाहुदा नदी विप्रप्रस्थ । तीर्थें मार्गीं वंदिलीं. ॥ ९६ ॥ तेथूनी पातले प्रयागोत्तमा । गंगायमुनांचिया संगमा । अवलोकुनी तीर्थमहिमा । श्रवण केला पाहिजे. ॥ ९७ ॥ तो प्रयाग तीर्थराज । [2]स्नानेंमात्रीं प्राणी सहज । उल्लंघूनी विष्णुसायुज्य । पूर्ण ब्रह्मीं समरसे. ॥ ९८ ॥ तेथूनी वाराणसी पुरी । मनकर्णिका गंगातीरीं । मुक्तिदासी घरोघरीं । जल[3]वाहिनी शिवाज्ञा. ॥ ९९ ॥ विश्वनाथ बिंदुमाधव । धुंडी काळभैरव । अवलोकिता शिववैभव । जीव तात्काळ पावती. ॥ १०० ॥ पुढें गया देखिली दृष्टी । तेथे पितृगणांच्या कोटी । फल्गुचिये वाळवंटीं । अहोरात्र तिष्ठती. ॥ १०१ ॥ वंशींचें येति उदंड । शमीपत्र प्रमाण पिंड । गयेशी देतां मोक्ष सुरवाड । सप्तगोत्रेंसी आमुतें. ॥ १०२ ॥ तेथे अर्पुनी पिंडदानें[4] । अक्षय्यवटीं द्विजभोजनें[5] । हेमरत्नें धनें[6] वसन । गया-वासियां दिधलीं. ॥ १०३ ॥ गयराजाचें महदाख्यान । लोमशमुखें केलें श्रवण, । जयातुल्य दाता आन । ब्रह्मसृष्टींत असेना ॥ १०४ ॥ सुस्नात जालें अगस्त्यतीर्थी । लोपामुद्रा लाधली सती । इल्वल वातापी यांची शांती । ऋषिमुखें परिशिली ॥ १०५ ॥ दधीच ऋषीचें पवित्र स्थान । अस्थि देवां दीधल्या दान । अगस्त्यानें सिंधुप्राशन । दैत्यनाशाकारणें. ॥ १०६ ॥ पुढती भगीरथाच्या यत्नें । समुद्र भरला गंगाजीवनें । सगररायाचें उद्धरणें । कपिलशापापासूनी. ॥ १०७ ॥ ऋष्यशृंगाचें चरित्र । जमदग्नीचें अति-

---

१ बाहुदा विप्रप्रस्थ. २ श्रवणमात्रीं. ३ पाणी वाहाती. ४ पिंडदानें. ५ द्विजभोजनें. ६ धेनु वसनें.

पवित्र । कार्तवीर्याचे पुत्र पौत्र । निःपातिले भार्गवें. ॥१०८॥ प्रभास तीर्थ देखिलें दृष्टी । यादवपांडवांचिया भेटी । ऋषिसिद्धांचिया थाटी । धर्मराजें वंदिल्या. ॥ १०९ ॥ सुकन्येचें महदाख्यान । रैभ्याचेंही परम स्थान । तेथूनी पुढें गंधमादन । महापर्वता पातले.॥११०॥ तेथ उठिला प्रलयवात । पृथ्वीपासूनी रज दाटलें बहुत । पडली द्रौपदी मूर्छित । श्वासोच्छ्वास लागला. ॥ १११ ॥ धर्माचेही झांकले नयन । द्रौपदी झाली अतिउद्विग्न । ते वेळीं स्मरे भीमसेन । घटोत्कचा पुत्रातें. ॥ ११२ ॥ तो पावला निमिषार्धांत । चौघे पिते मातेसहित । खांदीं वाहूनी बळसमर्थ । गगनमार्गें उडाला. ॥ ११३ ॥ संगीं निशाचर बळनिधी । तिहीं ऋषिश्वर घेतले खांदीं । गगनमार्गें लंघूनी अवधी । पर्वताची पावले. ॥ ११४ ॥ पुढें अलकानदीचे तीरीं । बदरी विशाळ अतिपवित्रीं । नारायणाश्रम विचित्रीं । सभाग्य दृष्टी देखिला. ॥११५॥ द्रौपदी जाली सावधान । हर्षे केलें गंगास्नान । नारायणाचे दर्शनें । समाधान जीवशिवां. ॥ ११६ ॥ तेथूनी पुढां पंथ न्यहाळीं । तंव सुवर्णकमळ सहस्रदळीं । पवनें पातल्या परिमळीं । दाही दिशा कोंदल्या. ॥ ११७ ॥ द्रौपदी त्यां धरूनी करीं । भीमासी म्हणे हर्षोत्तरीं । ' ऐशिया सहस्र कल्हारीं । धर्मराज पूजावा. ॥ ११८ ॥ जेथें निपजती तेथूनियां । तूंचि समर्थ आणावया । माझें आर्त पुरवावया । तुजवीण आन असेना. ' ॥११९॥ ऐकोनी द्रौपदीचें उत्तर । भीम चालला अतिसत्वर । मृगत्वचेलागीं रघुवीर । सीतावाक्यें ज्यापरी. ॥ १२० ॥ धर्मासी म्हणे, ' सकळ तुम्हीं । सुखी असावे बदरिकाश्रमीं । कनकपुष्पें घेउनियां मी । ये

---

१ मंदला. २ पर्वताग्रीं ३ वचनोत्तर.

तंववरी स्वस्थ असावें.' ॥ १२१ ॥ प्रवेशला महावन । वृक्ष देखे नानावर्ण । पक्षी हरित रक्त कृष्ण । श्वेत पीत चित्रांग. ॥ १२२ ॥ अनेक पर्वत अनेकवर्ण । गुहागुल्मलताकीर्ण । नाना सरिता-जीवन । उल्लंघीत जातसे. ॥ १२३ ॥ महिष कुंजर सिंह शार्दूल । शरभ पक्षी अतिविशाळ । गंड भेरवांचे मेळे । भयें पळती दश दिशा. ॥ १२४ ॥ पुढां टाकिलें कर्दळीवन । तंव हिमालयासमान । कपिनायक श्वेतवर्ण । महाविशाळ देखिला. ॥ १२५ ॥ पुच्छ पसरिलें शेषाकृती । तेणें मार्ग रोधिला क्षिती, । तेथ जावया नव्हे शक्ती । पवनातेंही सर्वथा. ॥ १२६ ॥ जांभई-माजी आकाश बुडे । भुभुःकारें कोंदलीं ब्रह्मांडें, । भृकुटी पाहातां प्राण विघडे । कृतांताचा अतिभयें. ॥ १२७ ॥ गर्जना करितां भीमसेन । श्वापद पक्षी मूर्छापन्न । कपि होउनी कोपायमान । म्हणे, "हें काय मानवा! ॥ १२८ ॥ त्रास देणें सकळ जीवां । हा कोण पुरुषार्थ पार्थिवा? । दयावंत तोचि देवा । मान्य होय सर्वस्वें. ॥१२९॥ असो. हें सांग तूं एथें कवण । दुरी यावया काय कारण । मानवियातें जातें स्थान । हें तव नव्हे सर्वथा. ॥ १३० ॥ येणें मार्गें चालतां प्राणी । मृत्यूवेगळा न भेटे कोणी । शीघ्र परत तूं एथूनी । पुढें जातां अनर्थ.' ॥ १३१ ॥ येरू म्हणे, 'मी धर्मानुज । पांडवें कुंतीचा आत्मज । वायुदेवाचा वीर्यज । भीमसेन नाम पैं माझें. ॥१३२॥ द्रौपदी भार्येचिया वचनें । सुवर्णकमळांलागीं जाणें । कृपेनें मार्ग मुक्त करणें । पुच्छ काढीं, कपींद्रा!' ॥ १३३ ॥ कपी म्हणे, 'मी बहुत काळींचा । वृद्धवानर त्रेतायुगींचा । पुच्छ उचलावया

---

१ यादवी.

साचा । लेश बळाचा असेना. ॥ १३४ ॥ तूंही दिससी पुरुषार्थी । तरी प्रकट करीं आपुली शक्ती । पुच्छ सारूनियां हातीं । येणें पंथें चामकें. ॥ १३५ ॥ भीमें मारूनियां हाक । पुच्छीं सूदले द्वय हस्तक । अणुमात्र न ढळे पीनाक । सीतास्वयंवरीं ज्यापरि. ॥१३६॥ कीं रामधर्मी नियम वाणी । विपरीत करितां आप्त जनीं । चळूं न पवे तेंवि धरणी । बाळ विशाळ ढळेना. ॥ १३७ ॥ दांत खाउनी करकर । पुच्छ उचलितां वृकोदर । हस्तपाद जाले चुर । गात्रें विकळ पडियेलीं. ॥ १३८ ॥ धापा दाटोनी पडला क्षितीं । विलंबें सावध झाला पुढती । लोटांगण घालुनी क्षिती । मस्तक चरणीं ठेविला. ॥ १३९ ॥ ह्मणे, ‘ सांग तूं कवण पुरुष ? । ब्रह्मा, विष्णु कीं महेश ? । अवज्ञा घडली, मी तों दास । क्षमा करीं स्वामिया ! ’ ॥ १४० ॥ हांसोनी बोले तो पवित्रु, । ‘ मी अंजनीतनय वायुपुत्रु । रघुनाथभक्त, मुख्य शत्रु । रावणाचा जाण पां. ॥ १४१ ॥ तो मी हनुमंत रामायणीं । ऐकिला असेल बहुतां वचनीं[1] । राम आज्ञेनें मी या धरणी । अटन करित संतोषें. ॥ १४२ ॥ गोष्पदप्राय समुद्र दृष्टी । लंघूनी राक्षस कोट्यानुकोटी । निर्दाळुनी लंका त्रिकुटी । तृप्त केलें पावका. ॥ १४३ ॥ चार कोटी द्रोणाचळा । रात्रींतुनी गेलों चार वेळां । औषधी आणुनी प्राणकळा । सौमित्राची नीवविली. ॥ १४४ ॥ येणें काळें अकस्मात । सुहृद भेटलासी एथ । पवनतनय कृष्णभक्त । मीही दास कृष्णाचा.’ ॥ १४५ ॥ ऐसें बोलितां वचन । भीमें धरिले दोन्ही चरण । आवडी देउनी आलिंगन । प्रेमानंदें स्फुंदत ॥ १४६ ॥ म्हणे, ‘ मी धाकुटें भावंड । प्रीतीचे

---

१ वदनीं.

बालक लडिवाड । अवज्ञा केली ते उदंड । उपेक्षिली पाहिजे. ॥१४७॥ आवडी एक असे हृदयीं । समुद्रलंघन करितेसमयीं । रूप अवगलासी तें इहीं । डोळां प्रकट पहावें.' ॥ १४८ ॥ हनुमान् म्हणे, 'ते उग्र प्रतिमा । प्रकट करितां नरेंद्रोत्तमा ! विश्वप्रळय होईल तुम्हां । ठाव नुरे वांचावया. ॥ १४९ ॥ तथापि तुझिये आर्ति ऐसें । तेज प्रकटवूं सहस्रांशें. ' । उभय नेत्रीं पाणिस्पर्शें । दिव्य दृष्टी बाणली. ॥ १५० ॥ कोटी चंद्र कोटी तरणी । खरतर प्रळयींचा प्रळयाग्नी । तैंवी तेज पहातां नयनीं । मूर्च्छा आली अद्भुत. ॥ १५१ ॥ नेत्र लावूनी बद्धहस्त । भूमी घालुनी दंडवत । म्हणे, ' स्वामी ! हें अद्भुत । आच्छादिलें पाहिजे.' ॥ १५२ ॥ लोपवूनी रौद्र प्रतिमा । हांसोनी बोले, 'राया ! भीमा ! । कुबेरसद्मा जाउनी पद्मां । द्रौपदीलागीं आणी पां. ' ॥ १५३ ॥ चहुं युगांचा आचारू । भीमा सांगोनी वानरेश्वरू । माथां ठेवूनी अभय करूं । स्नेहें आदरें बोलेवति.[1] ॥ १५४ ॥ आज्ञा[2] देईल गोपाळ । तरी कौरवांचे सकळ दळ । पायीं मर्दीन[3] तात्काळ । राज्य देईन धर्मातें. ॥ १५५ ॥ जैसा बिभीषण लंकापुरीं । चिरंजीव चंद्रार्कवरी । कोटिकल्प सहपरिवारीं । धर्म स्थापीन भूलोकीं. ' ॥ १५६ ॥ भीम म्हणे, ' तुझिया कणवा । कौरवांचा केतुला केवा । तुझिया नामस्मरणें सर्वां । अरिष्टांतें बिभांड ' ॥ १५७॥ ऐसें बोलत असतां भीम । अदृश्य जाला प्लवंगम । आश्चर्य मानुनी नरेंद्रोत्तम । निर्भय पंथीं चालके ॥ १५८ ॥ देखे दिव्यवृक्षांची दाटें । रंगली अरूण संध्यारागें । राजहंस कस्तुरीमृगें । चंपकारण्यीं क्रीडती.

१ बोलत. २ आज्ञा देखील जरि कृपाळ. ३ मर्दुनी.

॥ १५९ ॥ अमृतोदकीं सरिता गहन । देखतां हर्षे सारिलें स्नान । स्वस्थ करितां उदकपान । जलानंद ओसंडे ॥१६०॥ त्या गंगेच्या उभय कूलीं । रत्नीं बांधिल्या सरोवरपाळीं । सुवर्ण कमळाच्या परिमळीं । दाहीं दिशा कोंदल्या. ॥ १६१ ॥ सुवर्णनाळीं सुवर्ण-कमळें । सहस्रसंख्य नरनृपाळें[1] । तोडूनी घेतां राक्षसमेळे । युद्ध कदना पातले. ॥ १६२ ॥ कुबेरवन[2] भयंकर । असंख्य धनदाचें किंकर । कमळ छेदितां वृकोदर । शस्त्रपाणी धाविन्नले. ॥ १६३ ॥ मारूं लागले नाना शस्त्रीं । तें वारुनी गदाप्रहारीं । रागें झोडितां पृथ्वीवरीं । असंख्य प्रेतें पाडिलीं. ॥ १६४ ॥ एक पळाले वन-पर्वतीं । एक धाविन्नले कुबेराप्रती । म्हणती, ‘ बळिष्ठ भद्रजाती । पुरुष एक पातला. ॥ १६५॥ सुवर्ण कमळें तोडिलीं बहुत । राक्षस भंगिले असंख्यात ’ । कुबेर म्हणे, ‘कुंतीसुत । भीमनामा मी जाणें ॥१६६॥ तो कृष्णाचा परम भक्त । आम्ही कृष्णाचे अंकित[3] । कमळें तोडितां तो समर्थ । निषेध कोणी न करावा.’ ॥१६७॥ कमळें घेउनी तो नरनाथ । नदी उतरोनी मार्गीं येत । तंव सुटला प्रलय-वात । पर्वत उडवी सत्राणें. ॥१६८॥ चिंता वर्तली राया धर्मा । म्हणे, ‘कवण अवस्था असेल भीमा ?’ । द्रौपदी लोमश धौम्या- । सहित मार्गीं धाविन्नले. ॥ १६९ ॥ सुवर्णकमळांसहित जाणा ; येतां देखिलें भीमसेना । आवडी देउनी आलिंगना । कुबेरवना अवलोकी. ॥१७०॥ भीमदर्शनें चिंता हरली । परी मार्ग न कळे[4], दिशाभुली, । तंव अंबरीं[5] गर्जिन्नली । आकाशवाणी ते काळीं. ॥ १७१ ॥ ‘ पुढें

---

१ भीमनृपाळें २ कुबेरवनीं. ३ स्थापित. ४ दिसे. ५ अंबरीं अकस्मात् गर्जिन्नली.

जावया नव्हे शक्ती । गमन करावें आलिये पंथीं.' । द्रौपदीसहित बंधु नृपती । पूर्वमार्गी मुरडले. ॥ १७२ ॥ पुढती पातले बदरीकाश्रमा । विसरोनी सर्वश्रमा । भेटले तापसां ऋषिसत्तमां । सुख विश्राम पावले. ॥ १७३ ॥ पुढें, जटासुराचा वधू । सहज भेटले पार्थ बंधू । ते कथेचा अतिविनोदू । सादर श्रोतीं परिसावा. ॥१७४॥ इति श्रीभारत वनपर्वणि । अमृत स्त्रवे व्यास वाणी । परम सभाग्य सेविती श्रवणीं । मुक्तेश्वर कवि वदे. ॥ १७५ ॥

---

## अध्याय दहावा

बदरीकाश्रमीं वसतां धर्म । ब्राह्मणवेशें दुष्ट दुरात्मा । राक्षस जटासुर नामा । नित्य सेवे तिष्ठत. ॥ १ ॥ नित्य भोजन धर्म-घरीं । अहोरात्रीं वसे द्वारीं । पत्रें पुष्पें फळसंभारीं । गृहसुश्रूषे सावध. ॥ २ ॥ द्रौपदी हरावयाचा काम । अवसर पाहे नसतां भीम । जैसा विषम काळीं अधम । घात करी पुढिलांचा. ॥ ३ ॥ कोणे एके दिवशीं जाणा । मृगये धाडिलें भीमसेना । धौम्य लोमश अनुष्ठाना । गंगास्नानातें ते गेले. ॥ ४ ॥ घेउनी राक्षसांची सेना । घटोत्कच वळघला गगना । पारधीलागीं दुरी वना । जाता झाला स्वभावें. ॥ ५ ॥ धर्म आणि माद्रीकुमर । एकटी द्रौपदी सुंदर । संधी पाहोनी निशाचर । हरण करी चौघांचें. ॥ ६ ॥ शस्त्रभार घेउनी हातीं । चौघें वाहिलीं पृष्ठीवरुतीं । आडमार्गी वातगती । पापमूर्ती पळतसे. ॥ ७ ॥ धर्म म्हणे, 'रे दुर्जना ! । अमृत न जिरे राहूच्या वदना । बडिश आमिष भावितां मीना । प्राणसंशय रोकडा. ॥ ८ ॥

---

१ अत्यंत प्रेम सत्संगीं. २ प्राणनाश.

पातलिया भीमसेन । हिडिंबबकांचिया दर्शना । पाठवील या वचना । अनमान कांहीं असेना.' ॥ ९ ॥ सहदेव म्हणे, 'देई शस्त्रें । एकांग झुंजोनी निकुरें । मातें जिकोनियां सुंदरे । द्रौपदीलागीं हरीं कां?' ॥ १० ॥ अनाचारिया धर्मशास्त्र । सांगतां मानितो अशास्त्र । तेंवी तो न मानुनीं अपवित्र । चोरमार्गें पळतसे. ॥ ११ ॥ विचित्र प्रारब्धाची गती । राक्षस पळे जये पंथीं । त्याचि मार्गें भद्रजाती । भीमसेन येतसे. ॥ १२ ॥ देखोनी दैत्याचें कौतुक । [1]हांसोनी पावला सन्मुख, । म्हणे, 'भला तूंचि एक । देखिलासी पुरुषार्थी. ॥ १३ ॥ ज्याचे गृहीं सेविलें अन्न । सेवा केली होउनी दीन । त्याचेंचि केलें दाराहरण । धन्य रे! धन्य! राक्षसा!' ॥१४॥ मांसभार ठेउनी वेगें । शत्रुसन्मुख धांवला रागें, । येरें उतरोनियां चौघें । सज्ज झाला झुंझावयातें. ॥ १५ ॥ म्हणे, 'रे भीमसेना! मूर्खा! । सिंचुनी तुझ्या रक्तोदका । [2]किर्मीर हिडिंब आणि बका । तृप्त करीन तर्पणीं.' ॥ १६ ॥ दोघे उपडोनी तरुवरां । ताडिते झाले येरयेरां । खंडविखंडित शतसहस्र । वृक्ष जाले त्यां हस्तीं. ॥ १७ ॥ वन झालिया निझाडी । मग उचलिल्या प्रचंड धोंडी । परस्परें ताडिता प्रौढी । रक्त वाहे भडभडां. ॥ १८ ॥ वाळी सुग्रीव सुंदोपसुंद । मेरूमंदार द्वंद्वयुद्ध । जेंवीं भिडतां घोर शब्द । हुंकारती अतिरागें. ॥ १९ ॥ द्वंद्वयुद्धीं होता मिळणी । सहदेवें शत्रु धरिला चरणीं, । भीम म्हणे, 'दुरूनी नयनीं । कौतुक पाहे बाळका! ॥२०॥ या मशकाची केतुली गोष्टी? । घायें मेळवीन पृथ्वीतटीं' । म्हणोनी वोपिली वज्रमुष्टी । वक्षस्थळीं राक्षसाच्या. ॥ २१ ॥ तेणें

१ वेगें पातला सन्मुख. २ स्वर्गीं निमाल्या बका.

मूर्च्छा दाटली बहुत । सावध झाला निमिषार्धांत, । करकराटें खावूनी दांत । भीम कंठीं कवळीला. ॥ २२ ॥ कोंपरें हाणोनियां उरीं । झिंझाडुनी सांडिला दुरी, । वज्रमुष्टी कवळूनी समरीं । युद्धकदना मिसळला. ॥ २३ ॥ भीमें मुष्टी ताडितां बळें । कडकडाटें मोडती अस्थिजाळें । राक्षस हाणितां बाहुमुळें । उखळूनी जालीं दुखंडें. ॥ २४ ॥ झोंबिये भिडतां आंग नेटी । भीमें पाडिला पृथ्वीतटीं । तळीं शिळा कडकडाटीं । चूर्ण जाल्या अपार. ॥ २५ ॥ मग बैसोनी वक्षस्थळीं । हस्त सूदला कंठनाळीं । शिर उपडोनी निराळीं । झुगारिलें सत्राणें. ॥ २६ ॥ ते टाकूनी गेलें अर्का, । सूर्या गमे राहुशंका, । पुढती उतरलें भूलोका । स्वीकारिलें निर्जीव. ॥ २७ ॥ जाला जटासुराचा वध, । सुरां वाटला महाविनोद, । ऋषी देती आशीर्वाद । 'धन्य ! रे ! भीमा !' म्हणोनियां. ॥ २८ ॥ पांचही पातलीं पूर्वाश्रमा, । धर्मराज म्हणे, 'भीमा ! । पर्वत वनें पवित्र रम्य । विलोकित निघावें.' ॥ २९ ॥ ऋषीसहित चालिले सकळ । देखती पर्वत महाविशाळ । मेरू सागरान्त भूगोल । द्वीपें खंडें भासती. ॥ ३० ॥ गिरी उपगिरी महागिरी । भेदिले स्वर्गाचिये सरी । गंधमादनपरिसरीं । वन विस्तारूनी न वदवे. ॥ ३१ ॥ नाना वनें नाना द्रुम । नाना सरितांचे संगम । नाना श्वापदें विहंगम । नाना वर्ण भासती. ॥ ३२ ॥ देवर्षि गंधर्वगण । यक्ष पिशाच सिद्ध चारण । आश्रम करूनी सुखसंपन्न । परमानंदें क्रीडती. ॥ ३३ ॥ आर्ष्टिषेणाचा आश्रम । देखोनी पावले सुख विश्राम । तेणें धरूनी स्नेह परम । बहुत काळ राहविलें. ॥ ३४ ॥ तेणें धर्म धरूनी हातीं । चालता पूर्वदिशेपती । कैलास

मैनाक देखिला क्षिती । चंद्रप्रभेसारिखा. ॥ ३५ ॥ हिमवत्पृष्ठीं श्वेतगिरी । रत्नशिखरी सुवर्णशिखरी । पर्वत दावूनी ऋषीश्वरीं । माल्यवंता चढिन्नले. ॥ ३६ ॥ पुढती पातले गंधगादना । अमृत-फळें पीयूषासमान[1] । भक्षूनीं सरितांचिया जीवना । अमृतोपमा सेविती. ॥ ३७ ॥ तया पर्वताचिया माथा । भेदूनी वेधला जैसा सविता । भीम चढला तयावरुता । वातवेगें बळिष्ठ. ॥ ३८ ॥ तेथूनी विलोकी बळखाणी । तंव कुबेरनगर[2] देखिलें नयनीं । सरोवर बांधिलें रत्नीं । अमृतोदकीं तुडुंबलें. ॥ ३९ ॥ माणिकफळें कनकद्रुम । चतुर्दंत गज उत्तम । वायुवेगीं तुरंगम । विचित्र नृत्यें नाचती. ॥ ४० ॥ नाना वाद्यांचा ध्वनीं । नादामृत झगटे[3] श्रवणीं[3] । यक्षगंधर्वांचीं गाणीं । कुबेरवनीं परिसिलीं. ॥ ४१ ॥ धनेश्वराचे बळिष्ठ दूत । मणिमंतमुख्य असंख्यात । पारखा देखोनी मदोन्मत्त । युद्धकंदना पातले. ॥ ४२ ॥ नाना शस्त्रें धरूनी मुष्टी । ताडिते जाले कोट्यानुकोटी । जैशी पर्वतावरी वृष्टी । मेघ मांडी अपार. ॥ ४३ ॥ असंख्य पातकांचिया श्रेणी । स्पर्शों न शकती विष्णुस्मरणीं, । कीं धन्वंतरिया काळफणी । विष बाधों न शके ॥ ४४ ॥ तेंवी यक्षांचीं शस्त्रजालें । भीमाअंगीं जालीं विकळें । वृकोदरें ताडितां बळें । यक्ष असंख्य निमाले. ॥ ४५ ॥ सूड घ्यावया मणिमंत । रागें धाविन्नला क्रोधें[4]भरित । भीमाआंगीं शस्त्रघात । असं-ख्यात ताडिले. ॥ ४६ ॥ ते साहोनी महाबळी । प्रचंड गदा ताडिली मौळीं, । हाक मारूनी भूमंडळीं । प्रेत होउनी पडियला. ॥ ४७ ॥ मरण पावला मणिमंत । सैन्य पाडिले असंख्यात । कुबेराप्रति

१ पिशिताशन. २ कुबेरवन. ३ न संटे गगनीं. ४ त्वरित.

धाविन्नले दूत । हाका मारीत आक्रोशे. ॥ ४८ ॥ म्हणती, ‘ मानवी वीर गाढा । संग्रामशूर बली पाडा । मणिमंत मारूनी होडा । यक्ष असंख्य मारिले ॥ ४९ ॥ रागें उठिला धनेश्वर [1]सज्जूनियां रहंवर रणा पावला तंव समोर । महावीर देखिला. ॥ ५० ॥ हस्तलाघव आंगवळ । शस्त्रास्त्रीं परम कुशाळ । अजिंक देखोनी राक्षसपाळ । तुकवी मौळी कौतुकें. ॥ ५१ ॥ तुळितां पर्वतशिखराकार गदा । परम कौतुक वाटे धनदा, । हृदयीं सांडूनियां क्रोधा । वरद वदे स्वमुखें. ॥ ५२ ॥ म्हणे, ‘तुवां मारिलें सैन्य । त्यासी कारण असे आन। अगस्त्याचें शापवचन । [2]आजी आलें प्रतीती ॥ ५३ ॥ अवज्ञा करुनी अगस्तीची । सुवर्णकमळीं आणिकांची । पूजा करितां समर्थाची । मनोवृत्ति क्षोभली ॥ ५४ ॥ म्हणे, ‘ तुझे सकळ सैन्य । मानव हस्तें पावेल मरण, । तें आजी जालें जाण । दोष जाण तुज नाहीं. ’ ॥ ५५ ॥ रथ सांडूनी नैऋत्यपती । भीम आलिंगिला अतिप्रीती, । म्हणे, ‘ कृपा करूनी पर्वतीं । सुखवस्ती असावें. ॥ ५६ ॥ द्रौपदीसहित पांचही जणीं । समागमें पवित्र मुनी । वास करावा इये वनीं । काळमर्यादापर्यंत. ॥ ५७ ॥ अमृतोदकें अमृतफळें । सेवुनी असावें सज्जनमेळें । दास्य असेल या वेगळें । तेंही मातें निरोपी. ’ ॥ ५८ ॥ ऐसें बोलता निधींचा पति । प्रसन्न जाला मुनि अगस्ती, । [3]मणिमंतसेना पुढती । सजीव केली दयाळें. ॥ ५९ ॥ स्वस्थळा गेलिया राक्षसनाथ । धर्मराज बंधुसहित गंधमादन पर्वतांत । विश्रामस्थळीं बैसले. ॥ ६० ॥ अवघीं

१ सज्जूनियां सेना रहंवर. २ फळा आलें ये काळीं; आजी मम आलें प्रतीती ३ मणिमंत सह सेना.

करिती ईश्वरवार्ता । आत्मनिरूपण अध्यात्मकथा । म्हणती, ' क्लेशकाळ आतां । शीघ्रकाळें सरेल. ' ॥ ६१ ॥ तंव स्वर्गीं शक्र म्हणे, ' पार्था ! । तुझे भेटीची परम अवस्था । धर्मा होतसे चिंता । परिहारिली पाहिजे. ॥ ६२ ॥ युगासमान जातसे पळ । सरला स्वर्गभोगाचा खेळ, । पांच वर्षें क्रमिलीं, वेळ । न लावीं आतां पवित्रा !' ॥ ६३ ॥ सवें दिधला मातली रथ । सहस्रसंख्याक देवदूत । दिव्य वाद्यें गर्जतां तेथ । गंधमादनीं ऐकिलीं. ॥ ६४ ॥ ऋषि बोलती धर्मराजातें, । ' स्वर्गवाद्यें वाजती बहुतें । वाटे भेटीलागीं पार्थें । गमन आजी केलें असे. ' ॥ ६५ ॥ ऐसें बोलतां ऋषींचा मेळा । धर्मासी गमली अमृतवेळा, । म्हणे, ' आनंद ब्रह्मांडगोळा । मज होत ये काळीं. ' । ॥ ६६ ॥ तंव दिनकरतेजें दिव्य रथ । छत्रचामरविराजित । माजी देखिला जयस्वी पार्थ । परिवारित सुरगणें. ॥ ६७ ॥ रथ सांडूनी उतरला धरणीं । मस्तक ठेविला धौम्यचरणीं । लोमश वंदूनी पवित्र मुनी । लोटांगणीं वंदिले. ॥ ६८ ॥ धर्मासी करूनी नमस्कार । नमस्कारिला वृकोदर । आलिंगिले माद्रीकुमर । परम स्नेहें आवडी. ॥ ६९ ॥ नेत्रां भरुनी स्नेहजीवनें । द्रौपदीमुख हास्यवदनें । अवलोकितां तीचिया मनें । अमृतपान भाविलें. ॥७०॥ ऋषि करिती जयजयकार । आशीर्वचनें पुष्पभार । माथां सांडिती अपार, । ' हो कल्याण सर्वदा !' ॥ ७१ ॥ तंव दिव्य दुंदुभींचा नाद । होता झाला नानाविध । स्वर्ग सुमनांचा सुगंध । पृथ्वीवरी फांकला. ॥ ७२ ॥ अवघे पहाती गगनपंथ । तंव दिव्य विमानीं अमरनाथ । देवगंधर्वपरिवारित । घंटाघोषें पातला. ॥ ७३ ॥ कोटि सूर्यांहूनी आगळा । प्रकाश दाटला नभ-

स्थळा । विमान पातलें भूतळा । धर्मराजा जवळिकें. ॥ ७४ ॥ क्षिती उतरला पुरंदर । धर्मे केला नमस्कार, । चरण वंदी वृकोदर । माद्री-कुमरद्रौपदीशीं. ॥ ७५ ॥ बद्धहस्तीं उभे ठेले । देवराज आदरें बोले, । 'धर्मा ! तुझे कष्ट गेले । चिंता कांहीं न करावी. ॥ ७६ ॥ शस्त्रें लाधलीं पार्थातें । तेणें विंधील शत्रुकुळातें, । लाहोनी सार्वभौम-पदातें । पृथ्वी पाळीं पवित्रा ! ' ॥ ७७ ॥ धर्म बोले विनीत शब्द, । 'सर्वही चरणींचा प्रसाद, । भणंगभेटी त्रैलोक्यवंद्य । कृपेनें आलेती सांभाळूं. ॥ ७८ ॥ याहूनी काय प्राप्त तें आतां ? ' । म्हणोनी चरणीं ठेविला माथा, । शक्र म्हणे, 'मनोरथा । सफळ करीन तात्काळीं.' ॥७९॥ आश्वासूनी कुरूनंदना, । इंद्र गेला इंद्रभुवना; । धर्म म्हणे, 'आतां अर्जुना ! । समूळ वार्ता मज सांगे. ॥ ८० ॥ गमन केलिया मजपासूनी । जे जे तुवां केली करणी । काय वर्तलें स्वर्गभुवनीं । विस्तरें करूनी मज सांग.' ॥ ८१ ॥ अर्जुन म्हणे, 'स्वामी ! नाथा ! । तपोवनीं तप करितां. । ब्राह्मण भेटला अवंचिता । सर्वज्ञ जैसा नारद. ॥ ८२ ॥ किरातरूपें पातला हर । संग्राम करूनी तोषला थोर । तेणें देऊनियां वर । ब्रह्मास्त्र मातें दीधलें. ॥ ८३ ॥ त्यावरी लोकपाळ आले । तींहीं अस्त्रप्रसाद दीधले । शक्रें पाचारूं धाडिलें । मातलीसीं रथयान. ॥ ८४ ॥ पांच वर्षे स्वर्गभुवनीं । इंद्राचिये एका-सनीं । स्वर्गसुख देखिलें नयनीं । जें पुराणीं परिसिलें. ॥ ८५ ॥ त्यावरी शक्र आज्ञापी गोष्टी, । 'पूर्वसागराचे पोटीं । निवातकवच तीन कोटी । काळशत्रू आमुचे. ॥ ८६ ॥ त्यांचा करूनी निःपात । सुखी करीं सुर समस्त.' । घेउनी मातली रथ । समुद्रतीरीं पातलों.

१ समर्था.

॥ ८७ ॥ तेथें अश्व गज पदाती । कोटीच्या कोटी सज्जुनी येती, । काळशस्त्रें घेउनी हातीं । युद्धकंदना मिसळले. ॥ ८८ ॥ अग्नि पर्जन्य वातगिरी । वज्रचक्रमुसलधारी । कपट युद्ध करितां वैरी । नाटोपती ते कृतांता. ॥ ८९ ॥ क्षणें दिवस, क्षणें रात्री, । क्षणें गगनीं, क्षणें धरित्रीं, । क्षणें गुप्त, प्रकट नेत्रीं, । आभासती बहुरूपें. ॥ ९० ॥ ते वेळीं मंत्रूनी दिव्यास्त्रें । छेदिलीं शत्रुकुळाचीं गात्रें, । जैशीं कुळाचळांचीं गोत्रें[1] । शक्र पाडी भूतळीं. ॥ ९१ ॥ नखीं खंडिजेती[2] कमळें । सुरिया कणसें नवाळें । शस्त्रधारा कर्दळीफळें । घडचि[3] पडती ज्या परी. ॥ ९२ ॥ ते वेळीं रक्ताचिया सरिता । भूमंडळीं लोटल्या बहुत । शीसपद्मीं असंख्यात । पूजा झाली भूलिंगा. ॥ ९३ ॥ निवातकवच तीन कोटी । परिवारेशीं आटली सृष्टी । त्यांच्या वधू वैधव्यपाटीं । बैसविल्या एकदां. ॥ ९४ ॥ संपत्तीशीं दैत्यनगर । अमरपुराहुनी सुंदर । दृष्टी देखिलें मनोहर । हेमरत्नीं मंडीत. ॥ ९५ ॥ कालकेयपुलोमनगर । [4]अमरपुरीहुनी सुंदर । मार्गी येतां सत्वर । चोज अद्भुत देखिलें. ॥९६॥ शक्रसारथी बोले वचन । यासी ब्रह्मयाचें वरदान । देव हस्तें नाहीं मरण । मानव जाण वधील. ॥ ९७ ॥ निश्चय कल्पी माझें मन । तुझे हातीं पावती मरण । यातें वधूनी सहस्रनयन । सुखी करी बळिष्ठा!' ॥ ९८ ॥ अर्जुन प्रवेशे नगरद्वार । तंव कालकेय साठ सहस्र । सज्ज करूनियां रहंवर । शस्त्रास्त्रीं सिद्ध जाले. ॥ ९९ ॥ इंद्रासी मानिती जैसें तृण ॥ म्हणती, ' अर्जुन मशक कोण ? । एकाचि घाये करूं

---

१ वक्त्रें. २ जैशीं तोडिजेती. ३ धडेंचि पडती ज्यापरी. ४ नगर पाहोनि परम सुंदर.

[१]चूर्ण । शिर पाठवूं शक्रातें. ' ॥ १०० ॥ त्याचे निबिड बाणजाळीं । विकळता पातला मातली । पाहातां बाणाचिये धूळीं । लक्ष दृष्टी दिसेना. ॥ १०१ ॥ मायामय दुसरें नगर । गगनीं निर्मिलें मनोहर । तेथूनी वर्षे जेवीं जळधर । तैसीं शस्त्रें मारिती. ॥ १०२ ॥ ऐसें उभयतां संकट । मांडलें देखोनी अतिदुर्घट । म्यां चिंतिला नीलकंठ । दीनदयाळ सर्वात्मा. ॥ १०३ ॥ हृदय करूनी सावधान । आव्हानिला त्रिलोचन । कर्पूरगौर गौरीरमण । कामदहन कृपाळू. ॥ १०४ ॥ प्रत्यक्ष होऊनी कृपावंतें । दिव्यास्त्रें वोपिलीं मातें, । म्हणे, ' मारीं या शत्रूंतें । अर्ध क्षण न लगता. ' ॥ १०५ ॥ [२]अभिमंत्रित सोडितां दिव्यशर । आपेंआप पडती शिरें, । जैसीं प्रळयींचेनि समीरें । वृक्षपर्णें उसळती ॥ १०६ ॥ कालकेय आणि पौलोम । बाणजाळीं जाले भस्म । [३]ग्रीष्मीं दावाग्नी तृणोपम । ऐसें करूनी सांडिलें. ॥ १०७ ॥ नगर देश संपदा भारी । भरितां न सांठे स्वर्गागारीं । शेष सांडिले पृथ्वीवरी । तेंचि हें भूतळीं. ॥१०८॥ छेदिला दानवांचा कंद । स्वर्गीं विजयभेरीचा नाद । ते काळीं इंद्राचा आनंद । ब्रह्मांड घटीं न समाये. ॥ १०९ ॥ [४]सुवर्णभार रत्नें नाना । देऊनी पूजिलें सहस्रनयना । सन्मुख येउनी आलिंगना । देता जाला आवडी. ॥ ११० ॥ किरीट काढूनिया हातें । मस्तकीं लेवविला मातें । विजयमाला कुंडलातें । कृपेनें वोपी दयाळ. ॥१११॥ मातली म्हणे, ' अमरनाथा ! । पार्थवीराच्या पुरुषार्था । उपमें तुळावया आतां । आन नाहीं ब्रह्मांडीं. ॥ ११२ ॥ राम अथवा परशुराम । समान वाटे एक उपमा । दुजी उपमा द्यावया प्रतिमा । ब्रह्मसृष्टींत

---

१ हनन. २ अभिमंत्रुनी. ३ नुरेचि संततीचें नाम. ४ हेमवस्त्रें.

` असेना.' ॥ ११३ ॥ ऐसें ऐकोनी पुरंदर । हृदयीं कवळी वारंवार । म्हणे, 'वाटे हें शरीर । ओंवाळूनी सांडिजे.' ॥ ११४ ॥ देउनी मातली रथयाना । कृपेनें धाडिले तव दर्शना । पूर्वपुण्यें कुरुभूषणा ! । चरण दृष्टी देखिले.' ॥ ११५ ॥ श्रवणें संतुष्ट धर्म समर्थ । आलिंगिला विजयी पार्थ; । म्हणे, 'पुरला मनोरथ । सुहृदाचे दर्शनें.' ॥ ११६ ॥ लोमश मागूनी आज्ञा । जाता जाला शक्रसदना । जन्मेजया! कुरुभूषणा! । तीर्थयात्रा परिसिली[1]. ॥ ११७ ॥ धर्म म्हणे, 'संग्रामदक्षा! । दिव्य अस्त्रांची परीक्षा । पहावी ऐसें माझिया चक्षां । कांक्षा वर्ते अपार.' ॥ ११८ ॥ अर्जुन विनवी अग्रजातें, । 'अस्त्रपरीक्षा दावितां एथें । युगान्त वर्तेल सृष्टीतें । ब्रह्मप्रळयासारिखा. ॥ ११९ ॥ तथापि तुझिया आज्ञेसाठीं । कांहीं कौतुक दाखवूं दृष्टी.' । म्हणोनी अभिमंत्रिलें ओंठीं । मंत्रबीज महास्त्र. ॥ १२० ॥ अस्त्रप्रयोग करितां मुष्टी । गगनीं उदेल्या सूर्यकोटी, । प्रळयकडकडाट आकाशघटीं । होत वृष्टी नक्षत्रां. ॥ १२१ ॥ अस्त्रघोषाच्या कडकडाटें । धरा आतळी खडखडाटे । मेरु उमळोंनी उडाले कडे । स्तंभप्राय भूतळीं. ॥ १२२ ॥ सिंधूदकीं निघती ज्वाळा । धूम्रें व्यापिलें ध्रुवमंडळा । कासाविस अमरपाळ । म्हणती, 'काय उदेलें?' ॥ १२३ ॥ नक्षत्रां प्रळयकाळींचा समयू । रथा सांडूनी खचला सूर्यू । चंद्रशकलें आतला वायू । कल्पांतींचा माजला.' ॥ १२४ ॥ शंभू स्वयंभू चक्रपाणी । उभे ठेले विमानयानीं । प्रार्थूनियां नारदमुनी । पार्थाप्रति धाडिला. ॥ १२५ ॥ तो म्हणे, 'अकाळीं अकारण । अस्त्रप्रयोगीं महा विघ्न । आता उप-

१ संपली. २ समुद्र कढे खळखळाटी

संहारीं; प्राण । वांचवीं या विश्वाचे.' ॥ १२६ ॥ अस्ताचळीं अस्तवे सूर्यू । गगनोदरीं हारपे वायू । तैंवी अस्त्र पांडुतनयू । शांत करी सामर्थ्यें. ॥ १२७ ॥ बंधूंसहित राजा धर्म । पुढती प्रवेशे बदरिकाश्रम । वनफळार्थी गेला भीम । वनविशाळ शोधित. ॥ १२८ ॥ तंव उभय पर्वतांचे संधी । पर्वतप्राय काळ क्रोधी । गोठला कालकूटाचा उदधी । तैंवी अजगर देखिला. ॥ १२९ ॥ पसरूनियां मुखानळ । धुधुःकारला प्रलयानळ[1] । कवळूनियां कुंतीबाळ । काळसर्पें गिळिला. ॥ १३० ॥ कंठप्राय[2] गिळिला सोसे । मस्तकमात्र उघडा दिसे । भीमाचेनि बळसायासें । सुटतां मार्ग दिसेना. ॥ १३१ ॥ दुष्ट चिन्हें धर्मा होती[3], । म्हणे, 'भीमा वर्तली संकटगती.' । आंगेची[4] चालिला लवलाहीं[5] गती । मोहें[6] वना पातला. ॥ १३२ ॥ पहात भीमाच्या पाउला । सर्पस्थळाप्रति पातला । भीम व्याळाननीं पडला । देखोनी झाला दुश्चित. ॥ १३३ ॥ म्हणे, 'एवढें हें कर्म थोर । अवयव असतां[7] गेलें शरीर. । पुढील उद्योग अपार । निष्फळ[8] झाले एकदां. ॥ १३४ ॥ शक्रादिकांचे आशीर्वाद । सदाशिवाचे अस्त्रप्रसाद । ऐसे सर्कळ हे विनोद । ईश्वर दृष्टी दाखवीत. ॥ १३५ ॥ धर्मराजाचे[9] भाग्य गहन । याचेनि मरणें आम्हां मरण.' । मग बोलता झाला सखेद वचन । उरगाप्रति ते काळीं. ॥ १३६ ॥ म्हणे, 'तूं कवण महासर्प ? । हा देह प्राप्त कवणा पापें ? । घेऊनी आमिष अमूप । मुक्त करीं मम बंधू. ॥ १३७ ॥ सर्प म्हणे, 'धर्ममूर्ती । मी जाण नहुष चक्रवर्ती । ऐश्वर्यमदें हे जगती । तृणप्राय मानिली.

१ महाप्रबळ. २ कंठप्रमाण. ३ देहीं. ४ वर्तलें कांहीं. ५ लवलाहीं. ६ महा. ७ असती. ८ असतां; विफळ. ९ धृतराष्ट्राचें.

॥ १३८ ॥ स्वामित्व पावलों शक्रभुवनीं । ऋषि जुंपिले शिबिकायानीं । आरूढोनी इंद्रासनीं[1] । बैसावया लगबगां. ॥ १३९ ॥ नेतां[2] ब्राह्मणांसीं कशाप्रहारें । हाणोनी[3] पीडिलें दंडकरें । त्यांमाजी अगस्ती ऋषीश्वरें । शापशस्त्रें ताडिलें. ॥ १४० ॥ 'सर्प सर्प' ति शीघ्रगमन । म्हणतां कोपला तपोधन । म्हणे, 'सर्पत्व पावोन । पाप भोगीं भूतळीं.' ॥ १४१ ॥ लक्ष यागांचें पुण्य परम । पावलों-पावलीं केलें भस्म, । सर्पत्व देउनी देह अधम । ये पर्वतीं टाकिलें. ॥ १४२ ॥ उःशाप मागतां प्रार्थूनी । तो म्हणे, 'धर्म देखसी नयनीं । त्याचेनी पवित्र वचनप्रश्नीं । मुक्त होसी मागुता.' ॥ १४३ ॥ आतां आहार नेघे आन । मुखें ग्रासीन भीमसेन । अथवा सांग माझे प्रश्न । तेव्हां मुक्त तव बंधू.' ॥ १४४ ॥ ऐकोनी धर्मराज म्हणे, । 'बोल कैसा ऐकों वचनें । तुझी आशंका यथाज्ञानें । परिहारीन फणींद्रा !' ॥ १४५ ॥ सर्प म्हणे, 'एक वचन । चहूं वर्णीं ब्राह्मण कोण ? । जाणावें तें कार्य गहन[4] ? । तें निर्धारें सांग पां.' ॥ १४६ ॥ धर्म म्हणे, 'सावधान । ब्रह्म जाणे तो ब्राह्मण । जाणावें तें ब्रह्म परिपूर्ण । येर अज्ञान सर्वही. ॥ १४७ ॥ जातिमात्र ब्राह्मण नाम । आचरे हिंसकाचें कर्म । तो श्वपचाहूनी अधम । नरक धाम त्या वस्ती. ॥ १४८ ॥ सीतरूनी नाना जन । पोशी उदर आणि शिश्न । तो युगानयुगीं राक्षस जाण । राक्षस-वीर्यें जन्मला. ॥ १४९ ॥ काया वाचा आणि चित्तें । जे नातळतीं

---

१ अर्धासनीं; भद्रासनीं. २ यानब्राह्मण न चालती त्वरें. ३ म्हणोनी दंडिलें आपुल्या करीं. ४ कोण ज्ञान.

परहिंसेतें । ते युगानयुगीं ब्राह्मण निरुतें । ऋषिवीर्यें ते जन्मले. ॥ १५० ॥ जे देहें वर्ण जाती । कर्म धर्म शास्त्र व्युत्पत्ती । ब्राह्मण नव्हे[1] निश्चिती । हे सर्वज्ञा ! जाण पां. ॥ १५१ ॥ जो ओतिला सत्वगुणें । कामादि दोष नातळे मनें । तोचि ब्राह्मण निश्चय जाणें । जातिमात्र तो नव्हे. ' ॥ १५२ ॥ सर्प म्हणे, ' मानलें मनीं । ईहीं[2] लक्षणीं हीन योनी । अशियातें परम ज्ञानी । काय म्हणती सांग पां ? ' ॥ १५३ ॥ धर्म म्हणे, ' हीं लक्षणें । ज्याचे देहीं देखशील नयनें । तोचि उत्तम ब्राम्हण जाण । निर्धारेंसीं जाण पां. ॥ १५४ ॥ सत्य ज्ञान क्षमाशीलता । अनृशंस्यता तपोधनिता । ज्याचे ठायीं तो तत्वता । ब्राम्हण ऐसें जाण पां. ॥ १५५ ॥ अचल सत्य अचल ज्ञान । भूतदया विष्णुस्मरण । हें जो वर्णीं तो ब्राह्मण । तेथे अनुमान असेना. ॥ १५६ ॥ रक्षावया प्रवृत्तिमार्ग । जड मूढां कर्म सांग । वेद बोले अर्थवादांग । जाति प्रमाण ब्राह्मण. ॥ १५७ ॥ ब्राह्मणत्वाचें सकळ फळ । हीनवर्णी पावे अचल । ज्याचें हृदय अतिनिर्मळ । सत्वादि[3] गुणीं वसविलें. ॥ १५८ ॥ ब्राह्मण तो ब्राह्मण नव्हे जाण, । शूद्र तो शूद्र ऐसें न म्हण, । जयापाशीं हें लक्षण । तोचि ब्राह्मण त्रिकाळीं. ' ॥ १५९ ॥ सर्प म्हणे, ' धर्मसुता ! । तुझिया ऐकोनी वचनार्था । जातिकुलवर्ण वृथा । हें यथार्थ मानलें. ॥ १६० ॥ भलतिये वर्णीं भलतिये व्यक्ती । सत्क्रिया विवेक विचारें[4]- शक्ती । जेथें वसे तेथे मोक्षपंथीं । सरता होय निर्धारें. ' ॥१६१॥ धर्म म्हणे, ' यथार्थ वाणी । हीनवर्ण हीनयोनी । पूर्वपुण्यें ईश्वरभजनीं । सुख सायुज्य पावती ॥ १६२ ॥ गरुड हनुमंत जटायु शेष । गजेंद्र

---

१ बोलिजे. २ हीन ३ सत्यादि. ४ विचार शांती.

नक्र ऋक्ष कर्कश । नंदि बहुळा धेनु विशेष । आवडती शिवातें. ॥ १६३ ॥ शिवरात्रीचीं पांचही मृगें । [1]कपोतकें शरीरत्यागें । वसतीं झालीं शिवसंगें । हें पुराणीं परिसतां. ॥ १६४ ॥ पिंगळा वेश्या धर्मव्याध । विदुर ज्ञानियामाजी प्रसिद्ध । [2]गोपाळ गोपिका विष्णुपद । यज्ञपत्न्या[3] सत्संगें. ॥ १६५ ॥ यासी ब्राह्मणत्वाचा अनळ । स्पर्शला नाहीं हो ! अळुमाळ । अक्षय आनंदीं हो सुखकाळ ! विष्णुभजनें पावलीं. ॥ १६६ ॥ मनुष्यजाती वर्णावर्ण । विशेष ब्राम्हण वर्ण जाण । इतर देह जातिहीन । तेथें निवाड असेना. ॥ १६७ ॥ तेथें ही भिन्न मार्गभजनें । विहित स्वधर्मानुष्ठानें । ईश्वरा पावती हें मनें । हें निर्धारें जाण पां. ॥१६८॥ अक्रोधता । अतथ्य[4] वाणी । अप्रशंसा[5] अहिंसा घृणी । हीं ज्यांतें ते शूद्रयोनी- । माजी ब्राम्हण जाण पां. ॥ १६९ ॥ ऐकें पापाचें रूप कवण ? । [6]कासया नामें म्हणिजे पुण्य ? । देहीं अहिंसा अत्यंत गुण । पापपुण्य या नांव. ॥ १७० ॥ देहीं वर्तती उत्तम गुण । त्याचि नामें ओळखें पुण्य । क्रोध हिंसा दुष्ट वचन । तेंचि पाप जाण पां. ॥ १७१ ॥ सर्वभूतीं ज्या सदयता । देहीं निर्लोभ निरभिमानता, । ब्रम्हप्राप्ति हो ! तत्वतां । त्याचि नामें जाणावीं. ॥ १७२ ॥ देहीं अचाळ सत्वगुण । तोचि स्वर्ग निरुतें जाण । ज्यांचा अविचार तमोगुण । तो नरक निर्धारें. ॥ १७३ ॥ निष्काम कर्में मोक्षप्राप्ती । सकाम कर्में स्वर्गा नेती । पापपुण्यें समान होतीं । तंव पावती नरदेहा. ॥ १७४ ॥ तमोगुणीं[7] दोष । यास्तव घडे

---

१ कपोती कपोत त्यागें. २ गोपिका विष्णूतें वंद्य. ३ मोक्ष पावेल सत्संगें. ४ सत्य ज्ञानी. ५ अनृशंसता. ६ कामीं असे दृढ चिंतन. ७ तमोगुणीं नांव दोष.

नरकवास । तिर्यग्योनी[1] महा कर्कश । प्राप्त होती प्राणियां.' ॥१७५ ॥ सर्प म्हणे, 'मजसारिखा । अधम योनींत पडला देख । मुक्त होय नरनायका ! । ऐसें साधन कोणतें ?' ॥१७६ ॥ धर्म म्हणे, 'यथार्थ वचन । मधुर वचन सत्पात्रीं दान । सत्य आणि विष्णुस्मरण । दोघीं वदन वसविलें . ॥ १७७ ॥ अहिंसानिरत सदय पुरुष । स्वर्ग मोक्ष तयाचा दास । जन्ममरणें[2] त्याचा देश । स्पर्शों न शके कल्पांतीं. ॥ १७८॥ साधनीं श्रेष्ठ सत्य दान । त्याहुनी अहिंसा अधिक जाण । अहिंसा तेथे भगवान । मोक्षफळेंशीं तिष्ठत. ' ॥ १७९ ॥ धर्म बोले मधुर शब्दीं, । ' दिससी विवेकाचा उदधी । ऐशियाची चळली बुद्धी । आश्चर्य मज वाटे. ' ॥ १८० ॥ ऐकोनी बोले नागेंद्र नहुष, । ' सर्व विषयीं जाणता पुरुष । ऐश्वर्यमदें पावे भ्रंश । पात्र[3] जाला निर्धारें. ॥ १८१ ॥ इंद्र चंद्र विष्णु ब्रह्मा । श्रेष्ठ शंकर जो परमात्मा । तोही गुणक्षोभ झालिया भ्रमा । पात्र झाला निर्धारें. ॥१८२॥ दळामाजी जो पाचारी । व्याघ्र झपावे तया वरी । ऐसा ज्ञाता गर्वकरीं । महाव्यसनीं पाडिजे. ॥ १८३ ॥ ऐश्वर्याचे महामदें । अगस्तिऋषीतें ताडिलें पदें । पद भ्रंशोनी आपदे । सर्वदेहीं भोगिलें. ॥ १८४ ॥ आजी तुझिये अमृतवचनीं । मुक्त जालों इये व्यसनीं । अगस्ती उच्छापाची वाणी । फळा आली ये काळीं. ॥ १८५ ॥ धर्मराजा ! तुझिये वचनीं । समाधान पावलो मनीं । बंधू मुक्त करीन वदनीं । चिंता न करीं पवित्रा ! ' ॥ १८६ ॥ ऐसें बोलतां बोलतां राया । पालटली सर्पकाया । दिव्यदेह पावोनियां । उभा ठेला जवाळिकें ॥ १८७ ॥ ' माझिये वंशींचा वंशज ।

---

१ नीच योनी. २ जन्ममरणाचा तया दोष. ३ हें कौतुक कर्मांचें.

येथेंभीमा धर्मराज । तुवां उद्धरिला पूर्वज । हें आश्चर्य तंव नव्हे.' ॥ १८८ ॥ करूनी मूर्ध्नीं अवघ्राण । आवडी दिधलें आलिंगन, । म्हणे, 'घेईं आशीर्वचन । राज्य करीं पृथ्वीचें.' ॥ १८९ ॥ आश्वासोनी कुरुनंदना । विमानयानीं शक्रभुवना । जाता झाला सहस्रकिरणा । तुल्यतेजा नरेंद्र. ॥ १९० ॥ हृदयीं कवळूनी अनुज । आश्रमा पावला धर्मराजा । ऋषिबंधूसहित भाज । परमानंद पावलीं. ॥ १९१ ॥ आवरी पातला वर्षाकाळ । पंचम ऋतु झाला प्रबळ । सुटला पश्चिमेचा अनिळ । मेघमाला मोकली. ॥ १९२ ॥ पृथ्वीमंडळींचा जलराशी । पारधी पातला[1] आकाशीं । पिटीत मृगांचे पाठिशीं । सैरा गगनीं धांवत. ॥ १९३ ॥ इंद्रचाप धरूनी मुष्टी । रोहिणी मृगाचिया पाठीं । [2]मेघधारा जीवनवृष्टी । करित वेगें पातला. ॥१९४॥ सूर्यकिरण मृगसमुदाय । निस्तेज होऊनी पावले भय । लपावया शोधीत ठाय । अभ्रें आड करूनियां. ॥ १९५ ॥ किं पृथ्वीखंड त्या शाळुंखा । अनेक पर्वत शिवपिंडिका । इंद्रें मांडिलें अभिषेका । गगनपात्रीं बहुधारा. ॥ १९६ ॥ मयूर चातक कपोतक । दर्दुर करिती महाघोष । मेघ जगाचा पाळक । सर्व लोकां जाणविती. ॥ १९७ ॥ विद्युल्लतांचे कडकडाट । घनगर्जना गडगडाट । गंगादि सरितांचे संघाटे[3] । महापूर माजले. ॥ १९८ ॥ अठराभार वनस्पती । अंकुरवसनें वेढिली जगती[4] । फळ शाका धान्य संपत्ती । पृथ्वी [5]पिके जगातें ॥ १९९ ॥ विष्णु जगाचा प्रतिपाळिता । तोचि मेघ होय तत्वतां । प्रमाण करुनी चंद्र सविता ।

---

१ पातला गमे आकाशीं. २ मेघधारा बाणवृष्टीं. ३ खळखळाट. ४ आनंदें विरूढली क्षिती. ५ वांटी.

अनुक्रम ... २/१०१ ... २८०० ... २०१/१२५

आप वोपी अयनांशें. ॥ २०० ॥ चारी मासे दीपदानें पादुका। छत्रें ऊर्णावसनें । ऋषीश्वरां कुरुभूषणें । अपरिमित वोपिलीं. ॥ २०१ ॥ असो वृष्टिकाळ सरला। कार्तिकाचा प्रवेश झाला ऋषीसहित धर्म वहिला । काम्यकारण्या पातला. ॥२०२॥ पुढें श्रीकृष्ण पांडव भेटी । मार्कंडेयाच्या विचित्र गोष्टी । परिसतां अमृताची वृष्टी । श्रवणीं गमे श्रोतयां. ॥ २०३ ॥ इति श्रीभारत वनपर्वणि । श्रवणें [1]कालिक्केशधुनी । अनायासें विष्णुसदनीं । वसतें करी श्रोतयां. ॥ २०४ ॥ मुक्तेश्वराचा वाग्विलास । देशभाषा परिसंतोष । मानुनियां साक्षीलागीं व्यास । उभा असे जवळिके. ॥ २०५ ॥

---

## अध्याय अकरावा

तीर्थवासी ब्राह्मण भला । तीर्थें करितां द्वारकेसी आला । तेणें वृत्तांत निवेदिला । विश्वजीवनाजवळिकें. ॥ १ ॥ 'पांच वर्षे शक्रानिकटीं । वास करूनी सुख संतुष्टी । दिव्य अस्त्रें लाहोनी किरीटी । धर्माभेटी पातला.' ॥ २ ॥ आयकोनी आल्हाद पुरुषोत्तमा । पार्थभेटीचा अपार [2]महिमा । सवें घेउनी सत्यभामा । [3]काम्यकवना पैं आला. ॥ ३ ॥ काम्यकवना पावतां मुकुंदु । सन्मुख पावले पांचहि बंधु । [4]परस्परें ब्रह्मानंदु । ब्रह्मांडघटीं न समाये. ॥ ४ ॥ सत्यभामा आणि द्रौपदी । [5]प्राप्त जालिया सुखसंवादीं । जेंवि जान्हवी आणि कालिंदी । ऐक्य येती समरसें. ॥ ५ ॥ ऋषिवृंदें वंदुनी भाळीं । बैसका केली [6]कृष्णार्जवळीं । मार्कंडेय तेचि काळीं । गगनमार्गें पातला.

---

१ कलिकिल्मिषधुनी. २ प्रेमा. ३ द्वारकेहुनी चालिला. ४ क्षेमालिंगनें अद्वयानंदू. ५ प्रीतीनें मिनल्या सुखसंवादी. ६ वृक्षातळीं.

॥ ६ ॥ मार्कंडेय ऋषीची समस्या । सविस्तर बोलतां कुरुनरेशा ! । आयुष्य न पुरे तेथें आशा । कैंची पुढील कथेची ? ॥ ७ ॥ [1]प्रसंगें बोलता तेथें । पृथुवैन्यादि राजचरित्रें । सरस्वतीचीं अत्यद्भुतें । संवा_ दिला श्रीरामासीं. ॥ ८ ॥ मत्स्योपाख्यान इंद्रद्युम्न । धुंधुमारचरित्र गहन । पतिव्रतेचें महिमान । अंगिराख्यान त्या पाठीं. ॥९॥ द्रौपदी-सत्यभामासंवादु । सरलिया द्वारके गेला गोविंदु । मागे वर्तला विनोदु । तो निरोपीन परिसावा. ॥ १० ॥ द्वारके गेलिया पुरुषोत्तम । ऋषी-सहित राजा धर्म । अद्वैतवना पातला परम । सुखसंतोष सर्वांतें. ॥ ११ ॥ अद्वैतवनामाजी वसतां । काय कैशी वर्तली कथा । जन्मे-जया धरित्रीनाथा । वैशंपायन परिसवी. ॥ १२ ॥ दुर्योधन सह परि-वारीं । राज्य करितां हस्तिनापुरीं । गर्वें म्हणे, ‘ आपुली सरी । शक्र तोही ठेंगणा.’ ॥१३॥ अरण्यवासी बहु तापस । अन्नोदकीं पावोनी संतोष । वर्णिती पांडवांचें यश । कौरवराजयाजवळिकें. ॥ १४ ॥ म्हणती, ‘ संसारीं जन्मावें । तरीच पांडवां ऐसें व्हावें, । प्रातःकाळीं नाम ध्यावें । पवित्रांचें पवित्र. ॥ १५ ॥ उत्तम पुरुषीं जीयावें कैसें पांडव धर्मराया ऐसें । अरण्यवासीं षड्रसें । लक्ष ब्राह्मण पाळित. ॥१६॥ [2]स्नान करूनी द्विजपंक्ती । इच्छाभोजनें तृप्त होती । लोकत्रयीं निर्दोष कीर्ति । [3]धरटी झाली तयांची. ’ ॥ १७ ॥ ऐकोनी दुर्योधनमनीं । विषादें धडकला क्रोधाग्नी । जैसे साधुंचिया स्तवनीं । संतापती दुरात्मे. ॥ १८ ॥ रामस्तवनें दशाननू । कृष्णस्तवनें मागध-जनू । हरिस्मरणें ध्यावया प्राणू । हिरण्यकशिपू ज्यापरी. ॥ १९ ॥ तेंवी क्षोभला दुर्जन । म्हणे, ‘ येथें उपाय बरवा कवण ? ’ ।

१ तयालागीं संक्षेप केला येथें. २ स्नातक ऋषींचिया पंक्ति ३ धिरटी. ४ रचावा.

तंव तेथेंची अत्रिनंदन । दुर्वास ऋषी पातला. ॥ २० ॥ असंख्य शिष्यांसहित । मुनि पातला अकस्मात । देखोनी दुर्योधनें तेथ । स्वार्थ कांहीं कल्पिला. ॥ २१ ॥ तो महंत देखोनी नयनीं । विनयें मस्तक ठेविला चरणीं । बैसवूनी कनकासनीं । सर्वोपचारें पूजिला. ॥ २२ ॥ ऋषी बोले समर्थोत्तरीं, । 'कांहीं काळ तुमचे घरीं । क्रमावा ऐशी मज अंतरीं । आवडी उपजे अपार.' ॥ २३ ॥ 'अवश्य' म्हणोनी कौरव नृपती । उभा ठेला जोडिल्या हस्तीं, । म्हणे, 'स्वामी ! कृपामूर्ती ! । सनाथ केलें पाहिजे.' ॥ २४ ॥ रत्नागार देउनी वस्ती, । माजी भरल्या [१]सर्व संपत्ती, । जो जो पदार्थ इच्छिजे चित्तीं । तो तो पुढें स्वतःसिद्ध. ॥ २५ ॥ अवकाश नेदितां लगबगें । नाहीं तोचि अकाळीं मागे । सिद्ध करूनी आणिल्या नेघे । तें सांडी चौहटां. ॥ २६ ॥ समस्त जालिया निद्रापन्न । अर्ध रात्रीं मागे अन्न । सहस्र खंडिया उष्ण उष्ण । भक्ष्य भोज्य सर्वही. ॥ २७ ॥ रस शाका धान्य फळ । ऋतुवीण मागे उतावेळ । विलंब होतां प्रलयानळ । [२]तैंवी कोपे घडी घडी. ॥ २८ ॥ रात्रिकाळीं चार प्रहर । जोडूनियां उभय कर । उभा राहें मज समोर.' । दुर्योधना आज्ञापी. ॥ २९ ॥ 'जरी लागेल पातया पातें । तरी माझा कोप ठाउका तूतें.' । येरू सहनशील चित्तें । सर्व सेवे तिष्ठत. ॥ ३० ॥ 'स्नानपानालागीं विमळ । आपुल्या शिरीं आणीं जळ.' । 'अवश्य' म्हणोनी कौरवपाळ । शब्दापाठीं संपादी. ॥३१॥ [३]उग्रें कोपातें न मानून । सेवे सादर दुर्योधन, । हें देखोनी ऋषीचें मन । सुप्रसन्न सद्भक्ती. ॥ ३२ ॥ म्हणे, 'उत[४]रलासी माझे

---

१ बहु २ धडके जैंवी महावातें ३ उबक. ४ उतरलो.

कसीं । आतां वर वोपीन यासी, । जे इच्छा असेल मानसीं । तें मातें माग नरेंद्रा ! ' ॥ ३३ ॥ प्रार्थुनी बोले कौरवपाळ, । ' दुराशा वाहे बहुतकाळ । तरी माझा संकल्प सुफळ । मी मागेन यों[1] करीं.[2] ॥ ३४ ॥ अद्वैतवनीं कुंतीसुत । राहिलासे द्रौपदीसहित । सूर्यप्रसादें असंख्यात । ऋषि पाळी सदा अन्नें. ॥ ३५ ॥ लोटलिया अर्ध रात्री । भोजन सारी द्रौपदी सती । थाली घालुनिया पालथीं । निद्रा करी संतोषें. ॥ ३६ ॥ तुम्हीं जावें अद्वैतवना । लक्ष शिष्यासहित जाणा । उठवूनी कुंतीच्या नंदना । इच्छाभोजन मागावें. ॥ ३७ ॥ कांहीं अनमान करितां धर्म । तुम्हीं शापूनी करावें भस्म, । ऐसा माझा पूर्ण काम । कल्पद्रुमा ! करावा. ' ॥ ३८ ॥ ' अवश्य ' म्हणोनी तपस्वीराज । म्हणे, ' हें माझें सहज काज ' । धर्मा छळावयाची पैज । स्वीकारिली कोपिष्ठें. ॥ ३९ ॥ असंख्य ऋषींचिया पंक्ती । वना पातला अर्धरातीं, । गर्जोनि टाळी पिटिती हस्तीं । ' हरहर ' शब्दें करूनी. ॥ ४० ॥ जागृत होऊनी कुंतीसुत । सन्मुख धाविन्नला बंधूसहित । नमस्कारूनी ऋषि समस्त[2] । कुशासनीं बैसविले. ॥ ४१ ॥ चरणक्षालना आणवी जल । तंव ऋषि बोले उतावेळ; । ' पोटीं क्षुधेच वडवानळ । वरीं उपचार कांहीं रुचेना. ॥ ४२ ॥ भोजन सारावयाचे आर्ती । पंथ लोटितां सत्वर गती । मार्गीं मावळला गभस्ती । निशा जाली यावया. ॥ ४३ ॥ बोलतां अवकाश नाहीं आम्हां, । इच्छाभोजन देईं धर्मा !' । येरे अवलोकुनी भीमा । द्रौपदी उजू[3] पाहिलें. ॥ ४४ ॥ नमस्कारुनि ऋषीच्या चरणा । द्रौपदी म्हणे, ' जावें स्नाना ।

---

१ त्या द्वारीं. २ महंत. ३ कडे.

[१]भुकेलेती भोजना । शीघ्र सारिलें पाहिजे. ' ॥४५॥ ऐकोनी द्रौपदीच्या वचना । नियुतसंख्य ऋषि ब्राह्मण । [२]समस्त भागीरथी स्नाना । [३]मुनी गेलें झपझपां. ॥ ४६ ॥ दर्भ संबळिया देव घोत्रें । शालिग्राम तर्पणपात्रें । आसनें रुद्राक्षमाळा कटिसूत्रें । कमंडलपात्र हस्तकीं. ॥ ४७ ॥ ' दिवसा सर्व कर्म सारिलें, । भोजन मात्र असें उरलें, पळें येतसों वाढिलें । अन्न पात्रींचि पाहिजे. ॥ ४८ ॥ स्वल्प विलंब होतां येथें । [४]शब्द न ठेवावा मातें । ' निकें ' म्हणोनियां हां ! [५]ते । [६]जातां म्हणती पांडव. ॥ ४९ ॥ ऐशी घालूनिया अटक । स्नाना गेलें ऋषींचें कटक, । धर्मापोटीं व्याधि धडक । चिंताज्वरें वाढला. ॥ ५० ॥ द्रौपदी म्हणे, ' स्वस्थ राया ! । आठवीजे श्रीकृष्णपायां, । ऐसा[७] निधी असतां वायां । दैन्य कासया कल्पिशी ? ॥ ५१ ॥ ऐशिया अरिष्टाच्या कोटी । नामें पळती बाराबाटी । स्मरतां पावोनी जगजेठी । अन्न देईल ऋषींतें. ॥ ५२ ॥ हस्तपाद प्रक्षाळूनी । उभी ठेली वृंदावनीं, । द्वारके उजू बद्धपाणी । स्तवन करी कृष्णाचें. ॥ ५३ ॥ भुतीं झडपितां पंचाक्षरी, । [८]कीं शस्त्र प्रयोजी कोंडिल्या चोरीं, । बाण वर्षाव होतां वरी, । कवच आंगीं लेइजे. ॥ ५४ ॥ दुकळीं सेविजे अन्नदाता । तारक कवळिजे पुरीं पडतां । तेंवी आमुते अनंता ! । तूं रक्षिता संकटीं. ॥ ५५ ॥ नौका बुडतां समुद्रोदरीं । कीं विवर सांपडे जळतां जोहरीं । सर्प लागल्या धन्वंतरी । तेंवी तूं हरी ! आमुतें. ॥ ५६ ॥ कीटक पक्षी हीन दिना ।

---

१ भुकेलेती जी भोजना. २ जाउनी. ३ मुनी जातसे लगबगें. ४ माझा कोप ठाउका असे तूतें. ५ हातें. ६ जा जा. ७ हातीं निधी वसतां वायां. ८ कीं शस्त्र परजिजे अडविल्या चोरीं.

संकटीं रक्षिलें करितां स्मरणा, । आमुतें रक्षिसी हें कवण । चोज मानीं सांग पां ? ॥ ५७ ॥ लोह कढईंत भरलें उदक । तळीं[1] प्रज्वळिला पावक । त्यामाजी मंडूक बाळक । लोहतळीं लागलें. ॥५८॥ तें संस्कारें स्मरे कृष्ण । तळीं धडकल्या हुताशन । उदक अणुमात्र नोहे उष्ण । तेणें आश्चर्य समस्तां. ॥ ५९ ॥ पर्वतप्राय जळतां काष्ठें । तोयशीतळता न पालटे । आकाशवाणी महानेटें । गगनोदरीं होसरली. ॥ ६० ॥ म्हणे, 'मंडूक असतां भीतरीं । जाळ घालितां अहोरात्रीं, । उष्ण नोहेल तिळभरी । रिचवा झडकरी जळातें.' ॥ ६१ ॥ तळीं रिचवूनियां जळ । कडे काढा मंडूकबाळ । उदक तापेल तात्काळ । हे निश्चयें जाणिजे. ॥ ६२ ॥ तळीं रिचविता जीवन । पाहती मंडूकबाळ सान । मुखें म्हणे, 'कृष्ण ! कृष्ण !' । विस्मित मन जनांचें. ॥ ६३ ॥ विष्णुविमान येउनी पाहीं । दर्दुर केला दिव्य देही, । तो ठेविला वैकुंठगेहीं । कृष्णा ! तुवां कौतुकें. ॥ ६४ ॥ कुटुंबी कुरंग महावनीं । दुष्ट कर्में पाडिला व्यसनीं । पुढां बाण लावुनी गुणीं । काळव्याधें गोंविला. ॥ ६५ ॥ उभय भागीं पाश-श्रेणी । पाठीं पेटविला वडवाग्नी । अष्टौ दिशा रोधिल्या श्वानीं । झोंबोनी दशनीं मारावया. ॥ ६६ ॥ हरिणी प्रसूतिकाळ प्राप्त । आळसें चालों न शके पंथ । पाडसे रिघती पोटांत । मोहें कंठीं झोंबती. ॥ ६७ ॥ कुरंग म्हणे, 'कमळापति ! । धांव धांव ये आकांतीं' । कळवळूनिया कृपामूर्ती । महा अरिष्ट वारिलें. ॥ ६८ ॥ विंधितां शीत तुटलें मुष्टी । धूम कोंदला विळकपाटीं । ससे पळतां

[1] कढईंतळीं.

तयां पाठीं । श्वान गेले दश दिशा. ॥ ६९ ॥ जाळें जाळिल्या पाशश्रेणी । अकालवृष्टीनें शमला वन्ही । कुरंग कुटुंबेसीं वनीं । जाता झाला संतोषें. ॥ ७० ॥ भारतसेना माजली प्रचंड । तीमाजी पडले[1] पक्षीअंड । तेणें आश्रयूनी[2] झाडें । कृष्णस्तवन मांडिलें. ॥ ७१ ॥ रथीं पार्थाचा सारथी । अवलोकुनी रुक्मिणीपती । म्हणे, 'कृष्ण कृपामूर्ती । बाळक माझें वांचवी.' ॥७२॥ स्तवनें तोषला श्रीपती । कुंजरघंटा पडली वरती । अक्षय गृहाचे आकृती । रक्षण जाले पक्षियां. ॥ ७३ ॥ तयांमाजी चारा जीवन । देउनी वांचविला प्राण, । पाद पक्ष चंचू नयन । अवयव पूर्ण लाधला. ॥ ७४ ॥ घंटा उचालितां भूपाळगणीं । पक्षीं उडोनी भरला गगनीं । पक्षिणीबाळकस्नेहमिळणी । केली तुवां गोविंदा. ॥ ७५ ॥ कौलिक कुलिमवेश नटी । राजकन्या भोगी कपटी । निर्वाण मांडल्या संकटीं । म्हणे, 'धांव श्रीकृष्णा!' ॥ ७६ ॥ या लागी होऊनी सकृप । आंगी जालासीं याचें रूप । पांडवांचा तंव मायबाप । हे प्रसिद्ध त्रैलोक्यीं ॥ ७७ ॥ कपोत कपोती तरुवरीं । तळीं व्याधें लक्षिलीं शरीं । ससणा फेरे घाली शिरीं[3] । झडपोनी मारावया. ॥ ७८ ॥ कपोती म्हणे, 'स्वामी कृष्णा!। कृपेनें रक्षी आमुच्या प्राणा.' । करुणा आयकतां जगजीवना! । चोज कैसें वर्तलें. ॥ ७९ ॥ व्याधें मागें करितां चरणा । सर्पें डंखिले रोंवुनी दशना । हातींहुनी निष्टला बाण । तेणें ससाणा निमाला. ॥ ८० ॥ कपोत कपोती दोघें जणें । सुखी राहिलीं निर्भय मनें, । ऐसे कृष्णा! तुझें करणें । उंच नीच सारिखें. ॥ ८१ ॥ समुद्रें हेळिलीं पक्षीकुळें ।

१ ठेविलें पक्षियें अंड. २ आठवूनी झाड. ३ वरी.

सागरें हरिलीं त्याचीं बाळें । दुःखें पक्षीयांचे पाळे । आड पडेल गरुडातें. ॥ ८२ ॥ मधुमर्दना चालिला हरी । सत्वर गरुडातें पाचारी, । तो म्हणे, ' समुद्रें मजवरी ; बलात्कार केला समर्था ! । ॥ ८३ ॥ माझी हरितली बाळकें, । सेवा करूं कवण्या मुखें ? । अपमान भोगूनिया रंकें । काय जें जिणे संसारीं ? ॥ ८४ ॥ शिक्षा करिसी जरी सागरा, । तरीच मी तुमचा सेवक खरा, । न करितां तुज मज दातारा । संबंध कांहीं असेना. ' ॥ ८५ ॥ देवें पाचारिला सिंधु । नावरे प्रलयाग्नी क्रोधू । रागें कराया वधू । सुदर्शना पराजिलें. ॥ ८६ ॥ समुद्रें रिघोनियां शरण । दीधलीं बाळकें आणोन । ते वेळीं गरुड संतोषोन । विष्णुसेवें लागला. ॥ ८७ ॥ अंबरीष ध्रुव प्रल्हाद । गजेंद्र गणिका रुक्मांगद । अजामिळ धर्मव्याध । विदुरादि तुवां तारिले. ॥ ८८ ॥ हे पवाडे जगप्रसिद्ध । त्यांचा न मज वाटे विनोद, । दीन तारिले अप्रसिद्ध । हें कौतुक आगळें. ॥ ८९ ॥ कोणी म्हणती असाक्ष असें । हें कृष्णेंचि लिहविलें असें, । प्रत्यक्ष वर्तलें जें विशेष । तें आवडे वर्णितां. ॥ ९० ॥ [1]जें कां लोपलें पुराणीं । तें प्रकट करावया तुझी वाणी । प्राकृत बोलती ते जनीं । अभक्तपंक्तीं मानावें. ॥ ९१ ॥ असो. द्रौपदी आर्त चित्तें ! संकटीं बोभाय श्रीकृष्णातें, । करुणारससागरातें । दाटलें भरतें अपार. ॥ ९२ ॥ ' केश कवळितां दुःशासन । तेव्हां रक्षिला माझा मान, । तैसेंचि हें महाविघ्न । तूंचि एक वारिता. ॥ ९३ ॥ ऐशी अपार तुझी करणी । आजी कां न पावशी अजूनी ? ' । धांवा करितां याज्ञसेनी । कृष्णराया जाणवलें. ॥ ९४ ॥ ताट विस्तारिलें रुक्मिणी । भोजना उठतां

---

1 जें वर्णिलें पुराणीं.

चक्रपाणी । आयकोनी द्रौपदीची वाणी । ताट हातें ठोटिलें. ॥ ९५ ॥ लगबग झाली जगजीवना, । सत्वर पातला अद्वैतवना । आवडी द्रौपदीच्या दर्शना । वृंदावना पातला. ॥ ९६ ॥ किरीट कुंडलें कौस्तुभमणी । मेखळेमध्यें वैडूर्य किरणी, । जेंवि उगवले पांच तरणी । अमृतवनाआंतौतें. ॥ ९७ ॥ वेधोनी सौदामिनी स्थिर । तेंवि झळके पीतांबर । ऐसा देखोनियां यदुवीर । परमानंद पांडवां. ॥९८॥ अष्टौ भावें वोसंडत । द्रौपदी करी दंडवत । आनंदसिंधू अत्यद्भुत । विश्व व्यापोनी कोंदला. ॥ ९९ ॥ वंदूनी श्रीकृष्णचरण । हर्षें निर्भर पांचही जण । द्रौपदी म्हणे, 'माझें मन । स्वस्थ कर्ता तूं एक. ॥ १०० ॥ कोपिष्ठ ऋषी गेला स्नाना । ये तंव आयुष्य आमुच्या प्राणा, । विलंब होतां विश्वजीवना ! । भस्म करील आमुतें. ॥ १०१ ॥ ऐकोनी हांसे रुक्मिणीरमण, । 'अकाळीं कैसें पावेल अन्न? । [1]कांहीं वोपीं कृपेकरून । दिधल्याविण स्वस्थ नव्हें मी. ॥ १०२ ॥ परी तें असों दे प्रस्तुत, । मातें क्षुधा पीडी बहुत, । भोजन सांडूनी । धांवत । तुजलागीं पातलों. ॥ १०३ ॥ फळाहार अथवा अन्न । कांहीं वोपीं कृपेकरून । दीधल्याविण माझें मन । स्वस्थ नोहे सर्वथा.' ॥ १०४ ॥ द्रौपदी म्हणे, 'वासुदेवा ! । ऋषीलागीं केला तुझा धांवा, । तुजवेगळे देवाधिदेवा ! । स्मरों कवणा सांग पां.? ॥ १०५ ॥ शुद्धभावावेगळें कांहीं । हृदयगेहीं उरलें नाहीं.' । कृष्ण म्हणे, 'थाली पाहीं, । अन्न असेल लागलें. ॥१०६॥ शेष असेल थाली आंत । तेणें करीन क्षुधा शांत.' । द्रौपदी म्हणे, 'उपाय एथ । बोलावया दिसेना. ॥१०७॥ माझिया भोजना अंतीं ।

---

१ विचारितां दिसे महा विघ्न । हें कैसें निवारें.

थाली घालिजे पालथी, । तुज नेणतां लक्ष्मीपती ! । काय उरेल सांग पां ?' ॥१०८॥ थाली आणूनी दावी मातें.' । द्रौपदीयें ओढवली हातें, । स्वल्प शाकपत्र तेथें । लागलें दिसे लोचनीं. ॥ १०९ ॥ हात ओढवी रूक्मिणीपती । द्रौपदी देंठ घाली हातीं, । देव म्हणे 'इतुकेन तृप्ती । जाली मातें जननीये !' ॥ ११० ॥ 'देवा ! विश्वंभरा ! पावो.' । ऐसें बोले धरूनियां भावो । संकल्प सोडितां श्रीकृष्णदेवो । तृप्त झाला अपाडें. ॥ १११ ॥ थाली पहिलेचि निर्मळ जाण । द्रौपदीहातींचे प्रक्षालन ! शाकपत्र स्वयें आपण । आपणा· लागीं निर्मिलें. ॥११२॥ नाहीं भक्ताच्या प्रारब्धीं । तरी नवें निर्मुनी देतो सिद्धी । असो. या परी कृपानिधी । पांडवांतें रक्षित. ॥ ११३ ॥ ढेंकर देतां जनार्दनें । तृप्तीनें धालीं त्रिभुवनें, । मग म्हणे, 'पाचारा ब्राह्मणें । भुकें पीडिलीं बापुडीं.' ॥११४॥ द्रौपदी पाहे आश्रमांत । तंव पडले अन्नाचे पर्वत । भक्ष्यें भोज्यें अपरिमित । नानाविध रचियेलीं. ॥११५॥ अमृतप्राय शिकरणीं । कथिका वटक शाकाश्रेणी । उष्ण वाफा धांवती गगनीं । घमघमीत सुवासें. ॥ ११६ ॥ घृत-दुग्धाचीं सरोवरें । दधी नवनीत दुग्धसारें । देखोनी द्रौपदी हर्ष-निर्भरें । 'ब्राह्मणांतें म्हणे' 'पाचारा.' ॥ ११७ ॥ येरीकडे अघम-र्षणी । ऋषी चोज देखती नयनीं । गंगातीरीं हेमसदनीं । रत्नदीप लागले. ॥ ११८ ॥ पंच वरेंसी पतिव्रता । नूतन निर्मी विश्वकर्ता । नाना चोज ऋषीचे चित्ता । ब्राह्मण जेवितां भुलले. ॥ ११९ ॥ कनक आडणीयां कनकताटें । हिरे माणिकें रत्नविटे । आसनें सूदलीं हेमपीठें । ऋषी आदरें बैसविले. ॥ १२० ॥ गंध पुष्प परि-मळ माळा । धूप दीप वोपिले सकळा । दुर्वासासहित ब्राह्मणमेळा । सुखें

भोजना बैसले. ॥ १२१ ॥ द्रौपदी उदार हस्तें वाढी । धर्मराज संकल्प सोडी, । क्षुधातुर[1] ब्राह्मण तोंडीं । ग्रास घेती लगबगें. ॥ १२२ ॥ कनकताटीं चंद्रकळा । तैंवी ओदन वोगरोळां[2] । लाजवी मारुती नकुळा । तैंवी सीत सोज्वळ. ॥ १२३ ॥ सोलींव डाळीचें वरान्न । वरी मासे सुवर्ण वर्ण । मुक्ताफळें उपमा सान । तैंवी वळ-वट शोभती. ॥ १२४ ॥ आळलीं[3] कामधेनूचीं दुग्धें । अमृतातें हीं हेळसीती स्वादें । कृष्णहस्तींचीं तीं, शब्दें । कैंवी येती दृष्टांता ? ॥ १२५ ॥ तयांवरी गयेची शर्करा । घृत साजूक पंच धारा । क्षीरभोजनीं ऋषीश्वरां । आराणूक असेना. ॥ १२६ ॥ पूर्ण पोळिया आज्यें तसें । घारिया शेवया नवनीतें । गुळवरिया थिजल्या घृतें । रुचे तितुकें सेवावें. ॥१२७॥ सहदेव बोले कौतुकें, । ' भोज्यें मेळ-वावीं वटकें, । कथिकारसेंसीं प्रत्येकें । शाका अनेक भक्षाव्या. ॥१२८॥ आम्ररसेसीं साखरमांडे, । दधिसायेसी कुरवडे, । दुग्धसायेशीं वांकुडे । कानवले स्वादिष्ट. ॥ १२९ ॥ दुग्धें आळूनी केलीं दाटें । श्वेत पोळिया शुभ्र सपीटें । जेवितां प्रेम वाटे मोठें । अधिकाधिक सेवाया. ॥ १३० ॥ खाज्या करंज्या अनारसे । साखरफेणिया वर बत्तासे । लाडू तिळवे सुरसें । स्वाद विशेषें खांडविया. ॥ १३१ ॥ वडिया पापड तिळवडिया । नवी आगळी सांवरिया । घारगे सांडगे कुरव-डिया । लेहें पेहें पालटे. ॥ १३२ ॥ स्वाद आगळा दध्योदनीं । तक्रा दिधली वोघरणी । लवण शाकांचिया श्रेणी । दुणावती भोजन. ॥ १३३ ॥ बेलें आंबळे सालफळें । भपतीं सुरणें मायणिमुळें । आलें लिंबें अतिरसाळें । कोंभ कोंवळें तोशांचे. ॥ १३४ ॥ मिऱ्या पिंप-

---

१ क्षुधारसें. २ वोगरी धवळा. ३ आणिलीं.

ळियांचे घोस । आंबे मरींव रसाळ सुरस । गाजरें खडशिंगे विशेष । भोकरें कुहिरिया करंवदें. ॥ १३५ ॥ निर्मळ देवगंगेचें जळ । वेळा वाळा सुपरिमळ । सेवितां गात्रें होती शीतळ । तापत्रयातें त्यागिती. ॥ १३६ ॥ अमर्यादेनें फुगलीं पोटें । धोत्रें ढिलाविती बोटें । रिता ठाव न दिसे कोठें । उदक तेहीं घ्यावया. ॥ १३७ ॥ ' भोजन करितां गेला प्राण । पुढती मिळेल होतां जनन । परंतु ऐसें हें पराम । जन्मोजन्मीं न देखों.' ॥ १३८ ॥ बोले दुर्वास आचार्य, । ' अनेक चक्रवर्तीच्या घरीं । जेविलों परी ऐशी परी । नाहीं कोठे देखिली. ॥ १३९ ॥ विश्व पाळी अन्नदानें । त्याचे हातीं निपजलीं अन्नें । त्यांचा स्वाद जाणिजे कोणें । तपोधनें भाग्याचीं ?' ॥ १४० ॥ ऋषींस तृप्ति झाली मोठी । चंद्रमंडळीं लागली दृष्टी । वस्त्रें न दिसतीं तळवटीं । फिटलीं किंवा राहिलीं. ॥ १४१ ॥ म्हणती, ' माथां असतीं मुखें । तरी होतें बहु निकें, । ग्रास उचलूनी हस्तकें । ऊर्ध्व वदनीं घालितों.' ॥ १४२ ॥ करूनी सागरतुल्य उदर । सेविजें धर्माचेंची घर, । द्रौपदीहस्तीं निरंतर । हेंचि भोजन करावें. ॥ १४३ ॥ उठले हस्त प्रक्षालूनी । विडे दिधले त्रयोदशगुणी । बैसका न करवे म्हणोनी । सुखशयनीं पहुडले. ॥ १४४ ॥ डोळे लावितांचि तेथ । साह्यीजणें झालीं गुप्त । कृष्णचारित्र अत्यद्भुत । ब्रह्मादिकां नेणवें. ॥ १४५ ॥ धर्मआज्ञेनें अतिसत्वरा । सहदेव पातला गंगातीरा । नमस्कारीत ऋषीश्वरां । म्हणे, ' जी ! शीघ्र चलावें. ॥ १४६ ॥ अन्नें विस्तारिलीं पात्रीं । ती पहावीं तुमच्या वक्त्रीं । त्वरा करावी पवित्रीं । तीं निवर्तील अतिविलंबें.' ॥ १४७ ॥ दुर्वास बोले ऋषीप्रती, । ' थोर अविवेकें

पडली भ्रांती । दुर्योधनाचीये युक्ती । तपश्चर्ये नागवलों. ॥ १४८ ॥ जाणत केलें विषभक्षणा । कालसर्पेंशीं संघटणा । विष्णुभक्तांची करितां छळणा । आंतले विघ्न रोकडें. ॥ १४९ ॥ अंबरीष करितां कष्टी । चक्र लागलें माझे पाठी, । तैशीच हे ही होईल गोष्टी । उठाउठी पळावें. ॥ १५० ॥ तांतडी अन्नें म्यां करविलीं । तितुकीं दिसती वांया गेलीं, । द्रौपदी सती जर क्षोभली । तर शापील आम्हांतें.' ॥ १५१ ॥ आलिंगुनी सहदेवातें । म्हणे, 'शांतवीं धर्मरायातें । माझा आशीर्वाद तुम्हांतें । कल्याण करू सर्वदा. ॥ १५२ ॥ दुर्योधनाच्या विचारें । सत्य पातलो छळणाचारें । परि सागर शोषावया पामरें । शक्ति कोठूनी आणावी? ॥ १५३ ॥ कृष्णकृपेच्या शशिमंडळीं । सर्वदा वसती पांडव बळी । ते पोळि-जेत विघ्नजाळीं । हें कैसेनी घडेल? ॥ १५४ ॥ कृष्णकृपेची अक्षय नौका । तिमाजी पांडव बैसले देखा । शत्रुअपाय मृगोदका । माजी बुडती कैसेनीं?' ॥ १५५ ॥ निरोप पाठवूनी धर्मा । गेला दुर्वास स्वाश्रमा । कृष्णपांडवांचा प्रेमा । चढावढी दुणावे. ॥ १५६ ॥ धर्म म्हणे, 'कृष्णस्मरणीं । कैंची भवभयाची कहाणी? । अवघी असा समाधानीं । चिंता नेदा आतळों. ॥ १५७ ॥ अमृतसमुद्रीं बसविला । तयासी मृत्यु कोठूनी आला? । कुंजरपृष्ठीं जो बैसला । तया श्वान चावे केउता? ॥ १५८ ॥ मनीं कृष्ण, वदनीं कृष्ण, । भूतमात्रीं देखे कृष्ण, । त्यांचीं विघ्नें होती कृष्ण । स्वयें होत सुख-दाता. ॥ १५९ ॥ हस्त ठेउनी पांडवमाथां । अभय दिधलें समस्तां, । आज्ञा मागोनी विश्वकर्ता । जाता झाला द्वारके. ॥ १६० ॥

१ क्रीडन.

यापरी सरला ' शाकपाक ' । ऐकतां भवभयाचा पंक । नातळत हें कविनायक । व्यास बोले भारतीं. ॥ १६१ ॥ पुढें ' घोषयात्रा ' निरूपण । श्रोते परिसोत सावधान, । मुक्तेश्वराचें चित्तसुमन । संतचरणीं सर्वदा. ॥ १६२ ॥

---

## अध्याय बारावा

हास्तिनापुरींचा वृत्तांत । ' दुर्वासयात्रा ' झाली व्यर्थ । ऐकोनी गांधारीसुत । चिंताग्रस्त मानसीं. ॥ १ ॥ पाचारूनी शकुनी कर्णा । दुःशासना कुरुनंदना । म्हणे, ' उपाय पांडवहनना । शीघ्र काळीं विचारा.' ॥ २ ॥ शकुनी सांगे श्रेष्ठ युक्ती, । ' तुम्हांस[1] प्रसन्न सर्व जगती, । पांडव वनवासी कष्टती । भणंगप्राय पामरें. ॥ ३ ॥ वल्कल-वसनी निराहारी । सखेद[2] द्रौपदी सुंदरी । संकीर्ण काष्ठाचिये परी । कृश मलीनें[3] मानसें[3]. ॥ ४ ॥ श्वेत ताडपत्रें कर्णीं । कमळनालीं वेष्टिले पाणी । लोटलिया अर्धरजनी । स्वल्प आहार अशना. ॥ ५ ॥ नाहीं अभ्यंग ना तांबूल । नाहीं कुंकुम ना काजळ । चीरकंचुकी-वीण सर्वकाळ । दुर्बळवधूसारिखी. ॥ ६ ॥ सेना घेउनी सांगातें । ऐश्वर्य दावितां शत्रूंतें[4] । धिक्कारुनी आपुलीं जीवितें । लज्जे प्राण त्यागिती. ॥ ७ ॥ अमूल्य वस्त्रें रत्नाभरणें । छत्रें चामरें सूर्यपर्णें[5] । सुवर्णशिबिका सुखासनें । विचित्र डोळां दाखवीं. ॥ ८ ॥ दिव्य सुमनें हरिचंदनें । कुंकुम केशर सुंदर[6] वसनें, । कस्तूरीलेप सुगंध चूर्णें । तांबूलपर्णें कर्पूरी. ॥ ९ ॥ प्रचंड

---

१ तुम्हीं संपन्न सर्व संपत्ती. २ सदैव. ३ शरीर डोळसां. ४ पांडवांतें. ५ सुवर्णपर्णें. ६ सुरंग.

वाद्यांचे बोभाट । ऐकतां होय हृदयस्फोट । मेघधारीं हव्यवाट । तेंवी निस्तेज करावें. ॥ १० ॥ महदैश्वर्य देखोनी दृष्टी । पुरुष टाकोनी उठाउठी । अप्रार्थितां ते गोरटी । वश होईल तुम्हांतें. ॥ ११ ॥ तुळितां भासती निर्बळ । तरी मारूनी टाकावे तत्काल । इतुकेन तुम्हां क्षेम कुशल[1] । ध्रुवा ऐसें जाण पां. ॥ १२ ॥ हेचि एक बुद्धि अचल । वना निघावें तात्काळ । विलंब करितां अर्ध पळ । मंत्र फुटेल बहुकर्णीं. ॥ १३ ॥ धृतराष्ट्रातें बोलिजे ऐसें । गोक्षीरा पाहाणे असे, । घोषयात्रेचेनी मिषें । अद्वैतवना निघावें.' ॥ १४ ॥ ऐसें बोलता सौबळ । मानवले कौरव सकळ, । म्हणती, 'बुद्धि-समुद्र हा मातुळ । होय सर्वज्ञ सर्वथा.' ॥ १५ ॥ विकर्ण म्हणे, 'अविचार युक्ति । जो जो संकल्प चिंतिजे चित्तीं । तैसें घडतें निश्चिती । ईश्वर आपणचा नित्रागें. ॥ १६ ॥ आपण करूं जावें एक । प्रारब्ध घडवी आणिक, । ईश्वरमायेचें कौतुक । ब्रह्मादिकां न कळे ॥ १७ ॥ काळ ईश्वर आणि प्रारब्ध । साहा शास्त्रें आणि चार वेद । प्रमाणतेचे[2] शब्द । काय कृत्रिम मानावे ? ॥ १८ ॥ आपुलें केलें पावे सिद्धी । हे मूर्खाची मूर्खबुद्धी । ईश्वरें प्रेरिलिय प्रारब्धीं । जसें असेल तेंचि होतसे. ॥ १९ ॥ उत्तमीं सन्मार्गी वर्तावें । होईल तें उगेंचि पाहावें । इच्छिल्या सारिखें फळ व्हावें । हें सर्वथा अज्ञान. ॥ २० ॥ पुढिलियां उपजवी संताप । तोचि आपण पावे त्रिविध ताप, । कांडकें डंवचितां काळसर्प । दंश कीजे विषदंतीं.' ॥ २१ ॥ ऐसें बोलतां विकर्ण । सकळीं केली हो ! हेळणा, । जेंवी अध्यात्मनिरूपणा[3] । अनाचारी हांसती.

---

१ कुशल २ प्रमाण बोलती ते शब्द. ३ आत्मनिरूपणा.

॥ २२ ॥ प्यावया पांडवांच्या प्राणा । निश्चयो केला जावया वना । प्रज्ञाचक्षूचिया मना । [1]कें बोधवावें पातलें. ॥ २३ ॥ म्हणती भूपाळचक्रवर्ती, । ‘ गोप येऊनी करिती विनंती, । गोक्षीर पशुसंपत्ती । विस्तरली सुरवाडें. ॥ २४ ॥ धेनू महिषी म्हैसे गाढे । काल[2]वेंडी धांवती वृषभा पाडें । [3]हरिणीपाडसां ऐसें कोडें । नूतन वत्सें धांवतीं ॥२५॥ वृषभ पाहोनियां दृष्टी । राजचिन्हें करावीं पृष्ठीं । सेना भगवती हे तुष्टी । क्षीरपानीं पावेल. ॥ २६ ॥ मस्तकीं वंदूनियां आज्ञा । जातसों अद्वैतवना । घोषयात्रा करूनी प्राज्ञा । शीघ्रं[4] येऊं मागुते.’ ॥२७॥ धृतराष्ट्र म्हणे, ‘ न रुचे मनीं । ऐकतां वाटे अनर्थ[5] कर्णीं, । अवघे पडाल महाव्यसनीं । ऐसें चित्ता अवगमे. ॥ २८ ॥ तापसमुखें ऐकिली गोष्टी । । अद्वैतवनाचिये निकटीं । आश्रमीं राहिले जगजेठी । पांडुपुत्र निर्धारें. ॥२९॥ कापट्यें हारविली संपदा । सभेसी द्रौपदीचिया आपदा । दुःशासनाचिया दुरुक्तिवादा । स्मरोनि भीम हुंकारे. ॥३०॥ स्मश्रु पिळूनी हस्तकीं । पार्थ बोलिला[6] क्रोधतवकीं, । कर्णाचियां[7] रक्तोदकीं । प्रक्षाळीन अस्त्रांतें[8].’ ॥३१॥ शकुनिमरणाचे मंत्र । सहदेव जपे अहोरात्र । त्रिपुरदहनीं[9] जेंवी त्रिनेत्र । तेंवी कोपेल[10] देखतां. ॥३२॥ किंवा तळीं पातल्या करीन । सिंहझडपे आंवरी कोण ? । तैसा खवळेल भीमसेन । माझ्या कुमरां देखिल्या. ॥ ३३ ॥ व्यर्थ मरण पावाल मंद । वना जावें हा मूर्खवाद । घोषयात्रा हा कृत्रिम शब्द । लटिका मातें परिसावा. ॥३४॥ न जाउनी[11] अरण्यठ्याहाळीं ।

१ बोधवावया चालिले–पातले. २ कांतारीं. ३ हरिणीबालकांचेनि पाडें. ४ उद्यां येऊं भेटीशीं. ५ विघ्न. ६ बोले. ७ कौरवांचिया. ८ हस्तांतें. ९ त्रिपुरभेदनीं. १० धांवेल. ११ जावें.

महत्त्वें असावें आपुलें स्थळीं, । जिये स्थळीं पांडव दिसती बळीं । पाहों नका तियेतें. ॥३५॥ सर्पफणींचे छायेप्रती । दर्दुर पातला सुखविश्रांती, । [1]व्याघ्रविवराचिये विश्रांती । हरिण पातला स्वभावें. ॥ ३६ ॥ तेंवीं [2]समीप देखोनियां तुम्हां । क्रोध नावरे त्या भीमा, । निमित्त पाहोनी संग्रामा । प्रवर्तेल[3] निघातें. ॥३७॥ असंख्य मिनल्या चतुरंग । तुम्हीं युद्धीं पावाल भंग । माते शोकाचा विभाग । जोडवावया जातसां. ॥ ३८ ॥ अस्त्रें लाधला अर्जुन । तेणें त्रैलोक्य मानी तृण । समीप पातल्या तुमचें सैन्य । बळें कलह करील. ॥ ३९ ॥ पडेल[4] प्राणाशीं संबंधू । युद्धीं अपजयाचा खेदू । प्राप्त जालिया विषादू । जन्मवरी न खंडे. ॥ ४० ॥ शकुनी म्हणे, ' सत्य गोष्टी । न पडो पांडवांच्या दृष्टीं । तयांच्या आश्रमा निकटीं । काज नाहीं आमुचें. ॥ ४१ ॥ यथार्थ ऐके महाराज ! । नाहीं पांडुपुत्रांशीं काज, । घोषयात्रा करूनी सहज । शीघ्र येऊं[6] तव दर्शना. ॥ ४२ ॥ आणीक[7] ऐका जीं ! कारण । अवचट जालिया दर्शन । द्वादश वर्षे न होतां पूर्ण । युद्ध सहसा न करिती. ॥ ४३ ॥ आमुच्या कार्या जातसों आम्हीं । पांडव हीनशक्ती संग्रामीं । त्यांचीं शंका अंतर्यामीं । व्यर्थ वहासी समर्था ! ' ॥ ४४ ॥ राजा म्हणे, ' न कळे मातें । आवडे ते स्वीकारा चित्तें । तुम्हां जाउनियां मागुतें । स्वस्थ[8] यावें स्वस्थाना. ॥ ४५ ॥ आग्रह देखोनि पुत्राचा । पिता वदला सखेद वाचा, । ' जैसा भोग असेल त्यांचा । तैसा घडो प्रारब्धें. ॥ ४६ ॥ क्षेम

---

१ व्याघ्रवृकाचिये. २ सन्मुख. ३ बळें कलह वाढविती. ४ घडेल. ५ सर्वथा. ६ येऊं. ७ आणीक असे एक कारण. ८ बुद्धि. ९ शीघ्र.

जाऊनी क्षेम यावें । पांडवां वरपड न व्हावें '। 'अवश्य' म्हणोनी अघवें । नमस्कारूनी चालिले. ॥ ४७ ॥ होता रायाचें उत्तर । चालिले कौरवांचे भार । जैसा उलथे जळसागर । बुडवावया युगांतीं. ॥ ४८ ॥ नगरवासी सहकामिनी । राजदारा[1] शिबिकासनीं । दासदासीवस्त्राभरणीं । शृंगारोनी चालिले. ॥ ४९ ॥ अठरा वर्णीं जीविका ज्यासी । क्रयविक्रय द्रव्य लाभासी । नाना वस्तूंचिया राशी । असंख्यात[2] संगीं निघाले. ॥ ५० ॥ अठरा सहस्र कनकरथ । दिव्य पताका सुवर्णकेत । वारु[3] जुंपिले शुशोभित । पवनवेगी साजिरे. ॥ ५१ ॥ तीस सहस्र मत्त करटी । झुली घातल्या सुवर्ण पृष्ठीं । महावंत बैसले पृष्ठीं । हेमतकटी पताका. ॥ ५२ ॥ दशन गुंढाळिले कनकरत्नीं । मदोदकें[4] स्रवती धरणी । श्वेत चामरें शोभती कर्णीं । चहूं चरणीं नुपुरें. ॥ ५३ ॥ चवरडोळी राजकुमर । माळाकुंडलेकिरीटधर । छत्रछाये दिनकर । यातें लोटिती माघारे. ॥ ५४ ॥ आप्त सोयरे सुहृदजन । तीन सहस्र बळसंपन्न । मध्यें वेष्टूनी दुर्योधन । अष्टौ दिशा चालती. ॥ ५५ ॥ नव्याण्णव सहस्र नव शतें । नव दशक अधिक तेथें । अमोल्य अश्वपृष्ठां वरुते । राउत राणे शोभती. ॥ ५६ ॥ पदातिसेना असंख्यात । तयाचे कवण करी गणित ? । नाना शस्त्रीं मंडित हस्त । पुढें गर्जत धांवती. ॥ ५७ ॥ प्रस्थानभेरी कुंजरभेरी । प्रलयभेरी विशाळ भेरी । उष्ट्र्यानीं[5] शकटभेरी । वाद्यकारीं ठोकिल्या. ॥ ५८ ॥ सनया नफेरिया बुरंगें । पांवे[6] नरगे जेगट शृंगें । तडक[7] फुटलें तेणें

---

१ राजदासी. २ अंतःपुराचे. ३ वारू सजिले; अश्व पालाणिले. ४ दानोदकें शिंपिती. ५ तुनुग श्रृंगें कोहोळा मृदंग. ६ पांवें नगारे गर्जत श्रृंगें. ७ तटक.

विहंगे । भयें पळती दशदिशा ॥ ५९ ॥ ऐसे हर्षें पातले घोषस्थाना । दुरूनी देखती अद्वैतवना । गोप गोपी दुर्योधना । दंडवतें घालिती. ॥ ६० ॥ गोपकन्या गोपस्त्रिया । कनकताटीं आरतिया । ओंवाळूनी कौरवराया । पैं कुरवंडी सांडिती. ॥ ६१ ॥ तयां वोपूनी वस्त्राभरणें । बल्लव तोषविले मानें, । ते म्हणती, ' जी ! आपुल्या नयनें । धेंनुखिल्लारें पाहिजे. ॥ ६२ ॥ धर्मापासूनी आणिल्या एथें । वृद्धि जाली अपरिमितें । परि गोरसीं गोडी अत्यद्भुतें । पहिल्या ऐशी न देखों. ॥ ६३ ॥ लोपतां पांडवांच्या गोष्टी । खुळगे उपजती म्हैसीपोटीं । क्षीरपानें माजले सृष्टी । थडका देती सात्विकां. ॥ ६४ ॥ घेनूसी धर्मवृद्धि थोडी । वांझा उपजती कालवडी । ऐसी काळाची परवडी । विपरीत डोळां देखिजे ॥ ६५ ॥ असह्य वृषभांच्या दावणी । तरुण धेनूंच्या अपार श्रेणी । पोळ माजले नानावर्णी । गोत्रपुरुष नंदीचे. ॥ ६६ ॥ कोमल तृण चरोनीं वनीं । गोठणीं येती धेनूंच्या श्रेणी । वोहा दाटल्या चहुं स्तनीं । दुग्धधारा वर्षती. ॥ ६७ ॥ तृप्त जालिया मार्ग धरणी । लोटिल्या पयरसाच्या तटिनी । अश्व कुंजर दुग्धपानीं । स्वानंदें माजले. ॥ ६८ ॥ क्षीरपान करिती बहुतें । एक भक्षिती नवनीतें । दधि शर्करा उभय हस्तें । स्वेच्छ एक भक्षिती. ' ॥ ६९ ॥ हस्त रोविल्या न फुटे । ऐसीं दुग्धें सरसे दाटें । सुवर्णपात्रीं अति चोखटें । रायापुढें ठेविलीं. ॥ ७० ॥ मृग वधूनी बहुवसें । आणूनी भक्षिती विचित्र मांसें । मद्यपानीं सुखसंतोषें । एक माजले डुल्लती. ॥ ७१ ॥ संगियां संगें दुर्योधन । स्त्रियांसहित वनक्रीडणें । तें जें जया आवडे वन ।

१ गोक्षीरातें. २ भूतळवटीं. ३ असो. ४ कोनीं. ५ बहुसंतोषें.

तेणें तेथें रमावें. ॥ ७२ ॥ चित्रसेन गंधर्वनाथ । संगीं गंधर्व अप्सरा असंख्यात । सहस्र कामिनीं समवेत । अरण्यक्रीडे पातला. ॥ ७३ ॥ अद्वैतवनींची वृक्षदाटी । रम्य कासारें देखिली दृष्टीं । कमळवनामाजी संतुष्टीं । हस्तियुग्में क्रीडती. ॥ ७४ ॥ चहुं दिशां ठेवुनी दूत । जलक्रीडे स्त्रियांसहित । कौरवसेना [१]पातली तेथ । उद्धटपणे नेणतां. ॥ ७५ ॥ गंधर्वदूत प्रबळ प्रचंड । आडवे केले सुवर्ण दंड । म्हणती, ' मानव अवघे मूढ । चतुर एकही न देखों. ॥ ७६ ॥ गंधर्वराज सहकामिनी । क्रीडा करी सरोवर-जीवनीं । अवसर विलोकूनी नयनीं । [२]यावें जावें विचारें. ' ॥ ७७ ॥ येरु [३]वाहूनीं धनुष्यबाणां । विंधिते झाले गंधर्वगणा, । जाणवले चित्रसेना । सेवकजनीं सकोपें. ॥ ७८ ॥ राजा बोलिला कठिणो-त्तरीं, । ' ताडण करा तीक्ष्ण शरीं । सहज पांडवांचे वैरी । शत्रु असती आमुचे. ॥ ७९ ॥ धरती संग्रामाची पैज । तरी आतांच करा त्यांचे काज । कौरव मारूनी वोपू राज्य । [४]खंडू व्याज वैरि-यांचें ॥ ८० ॥ आम्ही शक्राचें निज गण । अर्जुन शक्राचा नंदन । त्याचा वैरी दुर्योधन । सहज वैरी आमुचा. ' ॥ ८१ ॥ आज्ञापितां गंधर्वपती । [५]आयतीं शस्त्रें प्रयोजिली हातीं । ताडण करितां निर्घातीं. प्राण बहुतीं त्यागिलें. ॥ ८२ ॥ घायाळ झाले असंख्यात । कौरव-राया सांगती दूत । राजा कोपला अत्यद्भुत । मुखें प्रेरी सैनिकां. ॥ ८३ ॥ ' चित्रसेनाचे छेदूनी शिर । एथें आणा अतिसत्वर । दुर्योधन कौरवेश्वर । नाहीं अद्यापि ठाउका. ॥ ८४ ॥ सकळ

---

१ निघाली. २ न वजावें विवेकें. ३ वाहुनियां. ४ पांडवांतें येकाळीं. ५ शस्त्रें सज्ज करूनियां दूतीं.

गंधर्वांच्या शिरीं । माळा बांधाव्या तरुवरीं । जे देखोनी सुरासुरीं । चोज अद्भुत मानिजे. ' ॥ ८५ ॥ दूत धाडिला चित्रसेना, । ' सांडूनियां अद्वैतवना । शीघ्र जावें गंधर्वभुवना ' । आज्ञा केली दुर्योधनें. ॥ ८६ ॥ खेचर बोलती हास्यवचन । ' आम्ही स्वर्गींचे देवगण । मनुष्यआज्ञा आम्हां तृण । मशकप्राय कौरवें. ॥ ८७ ॥ सर्वांसहित रक्षणें प्राण । तरी हस्तिनापुरा करावें गमन । विलंब करितां यमसदन । दृश्य होईल तात्काळीं. ' ॥ ८८ ॥ खळबळिले कौरवांचे कटक । जेंवीं युगांतीं पावकमुख । गंधर्व म्हणती, ' प्रलयोदक । बाणधारा मोकलूं. ' ॥ ८९ ॥ अंकुशें स्पर्शोनियां माथे । गज प्रेरिले तीन अयुतें । उभारले खड्ग हातें । अश्ववार धांवती. ॥ ९० ॥ रथ लोटूनी घडघडाट । बाण सोडिती सणसणाट । अग्नियंत्रांचे[१] कडकडाट । उभयदळीं माजले. ॥ ९१ ॥ कर्ण शकुनी दुःशासन । सकळ जळसंद विकर्ण । रथारूढ अवघेजण । युद्धकंदना मिसळले. ॥९२॥ कर्ण हस्तींच्या शरमारें । गंधर्व लोटिले मावारे[२] । हस्तपाद अवयव शिरें । खंड विखंड पडती[३]. ॥ ९३ ॥ कौरव गर्जती सिंहनादीं । म्हणती, ' खेचर भंगले रे ! युद्धीं ' । हे परिसोनीं काळक्रोधी । गंधर्वराज क्षोभला. ॥ ९४ ॥ आरूढोनी चित्रसेन । मोकली कोटिच्या कोटि बाण । एक एक अवलोकून । बाणजाळीं खिळिले. ॥ ९५ ॥ गंधर्वांच्या शरसंधानीं । मानवशक्ति अपारठणी, । जेंवीं कां पंडिताची वाणी । अव्युत्पन्ना नावरे. ॥ ९६ ॥ गंधर्वहस्तींचे कुऱ्हाडे । कर्णा आंगीं भेदले गाढे । रथ टाकोनियां

१ असिपत्रांचे. २ गंधर्वसेनेचीं अपारें. ३ पडली.

एकीकडे । घाॅव टाकीत राहिला. ॥ ९७ ॥ गंधर्वविद्येचे बळें । एक एक झाले विकळ । जेंवी कां वृक्ष पाषाण अचळ । चालविल्यावीण न चालती. ॥ ९८ ॥ वारू खिळिले ठायींचे ठायीं । कुंजर स्तंभप्राय भुई । रथ गुल्में तैशीं पाहीं । गंधर्वशरीं जर्जर. ॥ ९९ ॥ शकुनी राजा आणि अनुज । धरितां संग्रामाची पैज । गंधर्वबाणीं होउनी निस्तेज, । प्रेतदशा पावले. ॥ १०० ॥ पायदळें ठेऊनी पाठी । पळते झाले बारा वाटी । म्हणती, 'ये ऐसे संकटीं । पांडवांसी रिघावें शरण.' ॥ १०१ ॥ धैर्य धरितां दुर्योधन । पुढें लोटला चित्रसेन । संधीं संधीं भेदले बाण । म्हणे, 'निर्वाण मांडलें.' ॥ १०२ ॥ चत्वार बाण सोडोनी पुढती । चारी वारु पाडिले क्षितीं । सर्वोचि मारूनी सारथी । गतप्राण तो केला. ॥१०३॥ दुर्योधन उतरोनी क्षिती । आरूढला विकर्णरथीं । तया वेष्टीत बंधुपंक्तीं । प्राणधाकें मीनल्या. ॥ १०४ ॥ हें देखोनी गंधर्वनाथ । संगियाशीं धांवला त्वरित । दुर्योधन बंधूंसहित । धरूनी रथीं घातला. ॥ १०५ ॥ हस्त आकळोनीं पाठीशीं । स्तंभी बांधिला मुक्तकेशी । दुःशासन बंधू पाशीं । कर्ण केशीं बांधिला. ॥ १०६ ॥ दुर्योधनाच्या कामिनी । धरूनी वाहिल्या रथयानीं । जयजयकाराचे ध्वनी । खेचरलोका निघाले. ॥ १०७ ॥ तयापासूनी सोडवावया । शक्ती कवणा नव्हेचि राया ! । बंदी पडल्या सकळ स्त्रिया । आणि राजा बंधूंशीं. ॥ १०८ ॥ सेना घेउनी सेनापती । पळत पातला

---

१ घाय टाळीत. २ शकुनी आणि राजानुज; शकुनी आणि अनुजानुज. ३ ध्वजस्तंभ तोडुनी विरथी । पृथ्वीवरी आणिला. ४ दुःशासनादि. ५ शकुनी रथीं घातला.

पांडवाप्रती । धर्मराज देखोनी क्षिती । दंडवतें घातलीं. ॥ १०९ ॥ म्हणे, ' तुझे बंधु सगुण । घोषयात्रे पातले जाण । गंधर्वी करूनी कदन । धरूनी [1]नेती स्वर्गलोकां. ॥ ११० ॥ बंदी धरूनी पुरुष-नारी । रथीं घातल्या बळात्कारीं । रुदन करिती दीर्घ स्वरीं । ' धर्मा ! धर्मा ! ' म्हणोनी ॥ १११ ॥ बाळकें केली अन्याय-करणी । तरी तूं मानाभिमानाचा धनी, । तुवां उपेक्षा केलिया मनीं । रक्षणार कोणी असेना. ' ॥ ११२ ॥ भीम म्हणे, ' बहुत. बरवें । आम्हीं यत्नीं जें करावें । तें सिद्धी पावविलें देवें । अनायासें करूनियां. ॥ ११३ ॥ करावीं तीं फळती पापें । तेथें कायसा विकल्प । आम्हीं करवाया सा[2]पेक्ष । कारण कांहीं असेना. ' ॥ ११४ ॥ पांचांमाजी एक व्यक्ती । स्नेहें असते जरी सांगाती । तरी गंधर्वांची केतुली प्राप्ती ! । वक्रे[3] दृष्टी पहावया. ॥ ११५ ॥ शकुनीलागीं सांगा निरुतें, । ' कपटपाश धरूनी हातें । पुढें होईं संग्रामातें । राजयातें सोडवीं. ' ॥ ११६ ॥ कर्णास म्हणे कठि-णोत्तरीं, ' शत्रु पराभवी समरीं, । दुर्योधनासहित नारी । सोडवीं कां प्रतापें. ' ॥ ११७ ॥ ' दुःशासना ! हीनशक्ती । वस्त्रें फेडिली जया हातीं । ते हस्त तुटोनी पडले क्षिती । कां काजा न येती संग्रामा ? ॥ ११८ ॥ तेचि हस्त करूनियां पुढां । बंधु भाजा सोडवीं मूढा ! । वल्गना केली ते माकडा । विसरलासी ये काळीं ? ' ॥ ११९ ॥ धर्म म्हणे, ' बापा ! भीमा ! । हे बोलणें श्लाघ्य नव्हे आम्हां, । क्लेशकाळीं नरेंद्रोत्तमा ! । वर्मशब्द न [4]वेदावे. ॥ १२० ॥ वोखटें गोमटें स्वभावें । मनुष्यापासूनी घडे अघवें ।

१ नेलें. २ आक्षेप. ३ वक्रनेत्रीं पहावया. ४ खोंचावें.

समयीं वर्मी जरी खोंचावे । तरी पुरुषार्थ कायसा? ॥ १२१ ॥ आपणामाजी हो आपण । आचरावें न्यून पूर्ण । पारखीं गांजिलिया अभिमान । सर्व मिळोनी रक्षावा. ॥ १२२ ॥ पार्था ! धरीं कां पुरुषार्थ ? । भीमा! नाठवीं मागील कथा । नकुलसहदेवा ! माद्रीसुता ! । सिद्ध होईं ममाज्ञा. ॥ १२३ ॥ मैत्री रक्षुनी गंधर्व-राज । मुक्त करी धृतराष्ट्रतनुज । तरीच[1] युद्धाचें काज । नाचरावें तयाशीं. ॥ १२४ ॥ नेऊं भाविती जरी बळात्कारीं । तरी मग शिक्षा करावी समरीं । दुर्योधन सह कलत्रीं । सोडवूनी आणावा. ॥१२५॥ ज्ञातियांमाजी असलिया भेदू । बाह्य दाखवणें अभेदू । ऐसें बोलती वचन साधू । तैसें तुम्हीं वर्तावें. ॥ १२६ ॥ अपमान जाला दुर्यो-धना । तो मज धर्मा कुरुनंदना । ऐसा खेद मानूनी मना । धांवा वेगीं सुहृद हो !' ॥ १२७॥ हांसोनी भीम बोले, 'प्राज्ञा ! । हो कां प्रमाण समर्थाज्ञा.' । पार्थें स्वीकारिली प्रतिज्ञा । मुक्त करा-वया कौरवां. ॥ १२८ ॥ वीरश्री वरूनी चौघीं । वज्रकवचें बांधलीं वेगीं[2] । भीम म्हणे, 'आमुच्या आंगीं । कृतघ्नता परिसिली. ॥१२९॥ गंधर्वें उपकार केला आम्हां । त्या लागीं जातसो युद्धकर्मा । [3]जें मानलें राया धर्मा । तेंचि मान्य आमुतें.' ॥ १३० ॥ कौरवांचिये कनकरथीं । वळघले चौघेही पुरुषार्थी । सवेग गरुडाचिये गती । पाठीलागीं पावले. ॥ १३१ ॥ धनुष्यें सज्ज करूनी मुष्टी । तूणीर आंवळिले पृष्ठीं । खड्ग बांधोनियां कटितटीं । पाठोपाठीं निघाले. ॥ १३२ ॥ म्हणती, ' उभा राहे ! चित्रसेना ! व्यर्थ श्लाघ्यता मानिसी मना । मुक्त करीं गा ! दुर्योधना । बंधु आमुचा

१ तरी मग विरोधाचें काज. २ आंगीं. ३ सोडवितां कौरवां स्वधर्मा.

म्हणोनी. ॥ १३३ ॥ आम्ही नसतो या वनीं । अथवा न देखतों नयनीं । तरी हा पुरुषार्थ तुझा जनीं । प्रकट होता निर्धारें पां. ॥ १३४ ॥ आतां सांडूनी दुर्योधना । बंधू आणि कौरवांगनां । उरलेनि यशें शक्रभुवना । जातां लाभ दिसतसे.' ॥ १३५ ॥ गंधर्व म्हणे, 'अर्जुना ! एक । गुरुवाक्याची प्रमाणता एक । इतर उपदेशिती लोक । परि तें प्रमाण कवणातें ? ॥ १३६ ॥ देवेंद्राचे आज्ञाशब्दीं । हें कार्य पावलें सिद्धी । ते भंगोनी तुझिया बुद्धी । केंवी आम्हीं वर्तावें ? ॥ १३७ ॥ येथे न घालूनियां मन । आश्रमा जावें हो ! परतोन । हित अनहिताचें लक्षण । विचारदृष्टी नोळखां.' ॥ १३८ ॥ अर्जुन म्हणे, 'कळलें सकळ । देहीं अवयव अव्यंग अविकळ । ते खंडितां मूर्ख बरळ । नाश करी रूपातें. ॥ १३९ ॥ जेथ अपाय चिंतिजे मनीं । [1]ते अपाय योग्य नाहींत जनीं । आतां मित्रत्व रक्षूनी । मुक्त करी गोत्रजां.' ॥ १४० ॥ गंधर्व म्हणे, 'कदा न घडे.' । म्हणऊनी युद्धीं मिसळले गाढे । माद्रीपुत्रांसीं [2]वळी पाडें । भीमअर्जुन क्षोभला. ॥ १४१ ॥ गंधर्वांच्या शरसंधानीं । कोंदलें आकाश आणि धरणी । पार्थाचिये तीक्ष्ण बाणीं । खंड त्रिखंड पाडिले. ॥ १४२ ॥ पावकास्त्रें पर्जन्यास्त्रें । वज्रास्त्रें शक्रास्त्रें सर्पास्त्रें । वायव्यास्त्रें पर्वतास्त्रें । परिपेडें [3]हाणिती. ॥ १४३ ॥ दोघे जाणती प्रयोजनें । दोघे जाणती निवारणें । जैशीं पंडितांचीं वचनें । [4]एक एकां न तुटती. ॥ १४४ ॥ गंधर्वविद्येच्या विशेषीं । दुर्योधन बंधू आणि स्त्रियांसी । रथ उड-

---

१ तेथ आपणाशींच ये हानी. २ ईडेपाडें. ३ पीटिती. ४ युक्तिजाळें खंडिती.

वूनीं आकाशीं । गगनमार्गी चालिले. ॥ १४५ ॥ अर्जुनें समंत्रबाण-जालीं । कवळूनीं पाडिले भूमंडळीं । जैसे वृक्षाहूनी भूतळीं । व्याध ओढी पक्षियां. ॥ १४६ ॥ मत्स्यजीवी पसरूनी जाळें । मत्स्य कवळी एकेचि काळें । तेंवी अर्जुनें संधानबळें । रथ पाडिले भूतळीं. ॥ १४७ ॥ गंधर्व माव करूनी तेथ । गुप्त झाला सकळांसहित । अदृश्य होऊनी असंख्यात । बाण मारी निघातें. ॥ १४८ ॥ कालाग्निरुद्र जपोनी बाणीं । प्रगट केला अर्ध क्षणीं । विंधोनी गंधर्वांच्या श्रेणी । असंख्य रणीं पाडिल्या. ॥ १४९ ॥ धरासुवासिनी बाळी । रक्तकुंकुम चर्चिलें भाळीं । खेचरांच्या शीसकमळीं । माथे पुष्पीं तुरंबिले. ॥ १५० ॥ पांच नाराच शरघातीं । चारी वारू आणि सारथी । यांतें मारिलें गदाघातीं । गंधर्व रागें धाविन्नला. ॥ १५१ ॥ सन्मुख सोडुनी दहा बाण । गदा छेदूनी केली चूर्ण । करावया गंधर्वांचें हनन । शर निर्वाण काढिला. ॥ १५२ ॥ अर्जुनहस्तींहुन सुटतां बाण । कांपिन्नला चित्रसेन । म्हणे, 'ब्रह्मांडाचें दहन[1] । करूं शके निर्वाणें.[2]' ॥ १५३ ॥ अंतरा थोकूनी रहंवरा । विनीत बोले जोडूनी करा, । 'प्रवर्तलों मित्राचारा । सुख द्यावया तुम्हांतें. ॥ १५४ ॥ तें तुम्हीं विसरोनी सकळ । युद्धा प्रवर्तलेती उतावेळ । उपकार जाणावया कुशळ । तुम्हीच एक चतुर हो !' ॥ १५५ ॥ पांडव म्हणती, 'अगा मित्रा ! । रहस्य कळलें अतिपवित्रा । परी दृष्टी देखतां कुंतीपुत्रा । श्लाघ्य नव्हे लौकिकीं. ॥ १५६ ॥ आम्ही असतों दूर वनीं । वार्ता न पडती हो ! श्रवणीं । अवस्था न देखतों

---

१ गहन; हनन. २ एका बाणें.

नयनीं । तरी मग हो कां भलतसें. ॥ १५७ ॥ आम्हां देखतां अनुचित कृत्य । होऊं नये हें जाण सत्य । आतां बोलणें हें अगत्य । प्रीतिभावें करूनियां. ॥ १५८ ॥ उपकार ठेवूनी आमच्या माथां । मुक्त करावें कौरवनाथा, । देखोनी तुझिया पुरुषार्था । परम संतोष धर्मातें. ' ॥ १५९ ॥ गंधर्व निवेदी वृत्तांत, । ' शक्रआज्ञेनें पावलो एथ, । दुर्योधन मदोन्मत्त । ऐ[1]श्वर्यमदें मातला. ॥ १६० ॥ ऐश्वर्य दावावया धर्मा । गर्वें पातला दुष्टकर्मा । [2]त्यातें दवडूनियां स्वधामा । बांधोनियां आणावे. ॥ १६१ ॥ तें म्यां सिद्धी नेलें काज । तुम्हीं मागें मांडिले झुज, । आतां सांगेल धर्मराज । तें म्यां करणें सर्वथा. ' ॥ १६२ ॥ पातले धर्माच्या दर्शना । खेचरीं नमस्कारिलें चरणां । धर्में देउनी आलिंगना । स्नेहभावें बोलत. ॥ १६३ ॥ ' [3]माझे सुहृद् बंधपाशीं । पै[4]डिले भोगविशेषीं । ते सोडूनी कीर्तिघोषीं । यश जोडीं सुमित्रा ! ॥१६४॥ दुर्योधन बंदी पडला । तो धर्मवाक्यें मुक्त केला । याहूनी पुरुषार्थ आगळा । कोण तो सांग त्रिलोकीं ? ' ॥ १६५ ॥ अजातशत्रूच्या उत्तरा । दुर्योधन सहबंधुदारा । आणूनियां युधिष्ठिरा । निज हस्तकीं वोपिलें. ॥ १६६ ॥ आज्ञा मागोनी कुरुनंदना । गंधर्व गेले इंद्रभुवना । वृत्तांत ऐकोनी शचीरमणा । परम कौतुक वाटलें. ॥१६७॥ ' शिक्षा केली दुर्योधना । भला भला गा ! चित्रसेना ! ' । आज्ञा देऊनी अमृतघना । मृत गंधर्व उठविले. ॥१६८॥ धर्मासन्मुख दुर्योधन । मुख न दाखवी अधोवदन, । धर्म म्हणे, ' बापा ! मन । व्याकुळ कांहीं न करावें. ॥ १६९ ॥ खेळतां जित अथवा हारी । वांचूनि

---

१ अष्टौ. २ दंडूनियां त्यातें शक्रधामा. ३ माझे बंधु पडले पाशीं. ४ प्रारब्ध.

नाहीं तिसरी परी । तेही पुरुषाचे शरीरीं । काळें कर्मे होतसे. ॥१७०॥ जेणे अनर्थी पाडिजे ताता ! । ऐसा साग्रास न कीजे आतां । घेऊनी सुहृदां समस्तां । निजें नगरासी जाईजे. ॥ १७१ ॥ भीमादिक सहोदर । तुझे आज्ञेचे आज्ञाधार । हे राहाटले विहिताचार । सेवा तुज वडिलाची. ॥ १७२ ॥ कष्टलासी येऊनी वना । विश्रांतीसी जाऊनी सदना । कांहीं खेद मानिसी मना । तरी आण तुज माझी. ' ॥ १७३ ॥ कांहीं नेदितां प्रत्युत्तर । घेऊनी शकूनि सहोदर मौन्यें चालिला हस्तिनापुर । खेद बहुत मानसीं. ॥ १७४ ॥ वस्त्रें आच्छादूनी वदन । मार्गी करीं दीर्घ रुदन । शांतवीती शकुनी कर्ण । परि तो कांहीं नायके. ॥ १७५ ॥ प्राणत्यागचा निर्धारा । नेमूनी न वचे हस्तिनापुर । मुख न दाखवी राजेश्वरा । भीष्मद्रोणकृप यांतें ॥ १७६ ॥ ' गंधर्व स्वस्थळातें नेते । अथवा रणीं प्राण घेते । तें बरें, परंतु पांडवहस्तें । सुटका जघन्य त्रैलोकीं. ' ॥ १७७ ॥ परम चिंतेच्या हव्यवाटीं । पडला दुःखें हृदय पिटी । धर्मे सोडविलें हे मोठी । लाज मानी दुरात्मा. ॥ १७८ ॥इतुकें झालें निरूपण । पुढील कथेचे अनुसंधान । जनमेजयाप्रती सर्वज्ञ । वैशंपायन निरोपी. ॥ १७९ ॥ नगरीं धाडूनी दुर्योधन । अद्वैतवनीं कुरुनंदन । बंधूसहित सुखसंपन्न । ऋषीसंगीं वर्तत. ॥ १८० ॥ मुक्तेश्वराची सुवाणी । मंजीररूपें सद्गुरूचरणीं । गर्जना करीत श्रवणीं । कौतुकानंद [3]नें [3]खंडे. ॥ १८१ ॥ इतिश्रीभारते वनपर्वाणि । घोषयात्रा निरूपणीं । कथा परिसिली श्रोते जनीं । पुढां सादर परिसावें ॥ १८२॥

---

१ गृहा जाईजे संतोषें २ शांतवी. ३ वोसंडे.

# अध्याय तेरावा

शोकयुक्त दुर्योधन । सांडूनियां नगर[1] सदन । प्रवेशला महा-
वन । जेथे सिंहव्याघ्रादि वसती. ॥ १ ॥ अवलोकुनी[2] सरोवर गहन ।
तीरीं[3] रचिलें दर्भशयन[4] । त्यागावया आपुला प्राण । प्रायोपवेशीं
बैसला. ॥ २ ॥ परिवार बोळवूनी नगरा । त्यागिलें वस्त्रअलंकारां ।
भोजन पान फलआहारा । तांबूलादि वर्जिलें. ॥ ३ ॥ पाचारुनी
दुःशासना । म्हणे, ' स्वीकारीं राजासना । सन्मानूनी भीष्मद्रोणां ।
सेवा करीं वडिलांची. ॥ ४ ॥ रक्षूनी ब्राह्मणांच्या वृत्ती । न्यायें
पाळीं सर्व जगती । सांडुनी मनुष्य लोकींची वस्ती । मी जातसें
परलोका. ' ॥ ५ ॥ ऐकूनी बंधू करिती शोक, । ' जळो तें राज-
श्रीचें सुख[6], । तुज वेगळें घेऊनी विख । प्राण त्यागूं अवघेही. '
॥ ६ ॥ कर्णशकुनी म्हणती, ' राया ! । आग्रह वादविशी वायां ।
कवण लवून तुझिया पायां । स्पर्शेल[7] तें सांग पां ? ॥ ७ ॥ जय
अपजय उभय सांग । हा क्षात्रवृत्तीचा विभाग । या वेगळा
तिसरा मार्ग । भुवनत्रयीं असेना. ॥ ८ ॥ दुःशासनबंधुवर्गीं । प्राण
वेंचूनी रणरंगीं[8] । तुज रक्षावें युद्धप्रसंगीं[9] । विहिताचार तयांचा. ॥ ९ ॥
तैसेच अर्जुन वृकोदर । तुझे अनुज आज्ञाधार । त्यांहीं संग्राम तुज
समोर । करूनी सेवा दाविली. ॥ १० ॥ त्याचा खेद कायसा
मना ? । ऊठ चाल राजासना । उभय हस्तांमाजी कोणा । संकोच
वाटे उपकारें. ' ॥ ११ ॥ सुयोधन म्हणे, ' ऐका सत्य । विचारें

---

१ भुवन; गमन. २ प्रवेशोनी महावन. ३ तळीं. ४ दर्भास्तरण.
५ वन. ६ मुख. ७ कवणें लांछनें तुझी काया । स्पर्शिली ही सांग पां.
८ समरंगीं ९ यश द्यावें तुजलागीं; तुज रक्षावें बहुतप्रसंगीं.

त्रोध करितां बहुत । परि माझे हृदयीं संताप शांत । होता मार्ग दिसेना. ॥ १२ ॥ गंधर्व प्राण घेते हातीं । धरूनी नेते स्वस्थळाप्रती । तेणें संतोष होता चित्तीं । जयानंदासारिखा. ॥ १३ ॥ धर्मरायाचे प्रार्थनें । भीमार्जुनांचे आंगवणें । मुक्त झालों हें मज ठेंगणें । पीडा[1] बांधी[1] आप्त हो ! ॥ १४ ॥ [2]स्पर्शलें अपमानाचें श्वान । विटाळले देहभाजन । तें तात्काळ त्यागिल्याविण । शोक माझा शमेना.' ॥ १५ ॥ यावरी प्रवर्तली रजनी । निद्रा [3]लागली सकळां नयनीं । हे वार्ता पाताळभुवनीं । दैत्यदानवीं परिशिली. ॥ १६ ॥ पूर्वीं देवीं पराभविले । ते दानव पाताळ-भुवनीं गेले । शुक्राचार्यें उपदेशिले । दिव्य मंत्रे सबीजें. ॥ १७ ॥ तेणें मंत्रें करूनी होम । भंगिती सुरांचे पराक्रम । दुर्योधना खेद परम । ऐकोनी साहाय्या उदेले. ॥ १८ ॥ कृत्या धाडूनी विशाळा । नेला दुर्योधन पाताळा । मिळोनी दानवांचा मेळा । शांतविती स्वमुखें. ॥ १९ ॥ म्हणती, 'चिंता दवडीं चित्तें । आम्हीं वधूं पांडवांतें, । जय ऐश्वर्य लाधे तूतें । ऐसें करूं जाण पां. ॥ २० ॥ क्षत्रिययोनींत जन्मले । संसप्तक दानव भले । आम्हीं तूतें सहाय दिधले । पांडववधाकारणे. ॥ २१ ॥ हरूनी कवचकुंडलांतें । अमोघ शक्ति कर्णातें । शक्र देईल, अर्जुनातें । वधावया संग्रामीं. ॥ २२ ॥ त्या दिव्य शक्तीशीं निवारण । सहसा नाहीं गा ! जाण । तेणें अर्जुनाचा प्राण । नाश पावेल निर्धारें. ॥ २३ ॥ सहसा त्यागूं नको प्राणा । सुखें जाय राजासना । आम्हीं पांडवांच्या हनना । सहाय [4]तूतें सर्वस्वें.' ॥ २४ ॥ कृत्या प्रेरूनी वेगेंशीं । जेथें होता

---

१ त्या लांछनें. २ बहुत. ३ दाटली; पातली. ४ जालों.

प्रायोपवेशीं । तेथें ठेवितां संपली निशी । प्रातःकाल उदेला. ॥ २५ ॥ न कळे स्वप्न किंवा साचसें । सांगे कर्णाप्रती संतोषें । राधेय म्हणे, ' निज मानसें । खेद सांडीं नरेंद्रा ! ॥ २६ ॥ भाक प्रमाण देतसें हातें । रणीं मारीन अर्जुनातें, । चौघे बंधू वधूनी तूतें । पशुप्राय वोपीन. ' ॥ २७ ॥ पावोनियां समाधान । घेता झाला वस्त्राभरण । सारूनियां सुखभोजन । तांबूलादि घेतलें. ॥ २८ ॥ हस्ती घोडे पदाति रथ । छत्र उभारूनी श्वेत । चौघे[1] गजरें[2] हर्षभरित । हस्तिनापुरा पातले. ॥ २९ ॥ नमस्कारिलें गंगाकुमरा । प्रज्ञाचक्षु राजेश्वरा । द्रोणकृपाचार्यविदुरा । विनयभावें वंदिलें. ॥ ३० ॥ भीष्म म्हणे, ' ऐक बापा ! । वर्जिता आचरे जो पापा । तो शरीरदुःखा[3] अमुपा । पात्र होय निर्धारें. ॥ ३१ ॥ वडिलीं वारितां राहटे अविधी । त्याशीं स्वयें दंडूनी शिकवीं बुद्धी । ईश्वर गुरु[4] प्रमाण शब्दीं । दंड करवी परहस्तें. ॥ ३२ ॥ जेणें जें जें कर्म करावें । त्याशींच पेडेल तें भोगावें । हरिहर साहाय्य जालियां बरवें । विपरीत करूं न शकती. ॥ ३३ ॥ वना जाऊनी केली करणी । ते सुवार्ता ऐकिली श्रवणीं । परम संतोष वाटला[6] मनीं । तो काय वाचा बोलणें ? ॥ ३४ ॥ ज्या कर्णाचा भरंवसा मनीं । तो अवश्यां[5]आधी पळाला रणीं । केउत्या गेल्या बंधुश्रेणी । तुज बंधनीं शिरकल्या. ॥ ३५ ॥ पांडवीं प्रतापें सोडविलें । हें ईश्वरें तूतें उपदेशिलें । पांडवांचें बळ दाविलें । तुळूनियां तुजप्रती. ॥ ३६ ॥ आतां सख्य करूनी त्यांशीं । वांचवी आपणा समस्तांशी । वृद्धपणीं धृतराष्ट्राशीं ।

१ हरित; त्वरित. २ वाद्य. ३ शरीरभोगदुःखा. ४ गुरु. ५ अवश्य. ६ पावलों.

दुःख नेदीं सर्वथा.' ॥ ३७ ॥ ऐकोनी भीष्माची सुवाणी[1] । प्रत्युत्तर नेदिती कोणी । दुर्योधन कर्ण शकुनी । जाते झाले स्वधामा, ॥३८॥ एकत्र मिळोनी अवघेजण । म्हणती, 'पांडवयश न्यून[2] । होय ऐसा महायज्ञ । विशेष आम्हीं करावा. ॥ ३९ ॥ धर्मे राजसूययज्ञ केला । तो कीर्तिघोष विश्वीं भरला । तो लोपोनी जाय वहिला । ऐसी ख्याति करावी. ॥ ४० ॥ दुर्योधनाचा कीर्तिगभस्ती । अक्षयी उजळावा त्रिजगतीं । जेणें पांडवांची कीर्ती । खद्योतप्राय हारपे[3]. ॥ ४१॥ संपदा[4] असे हो ! अपार । कनकरत्नांचे गिरीवर । पाचारूनी ऋषीश्वर । यज्ञारंभ करावा.' ॥ ४२ ॥ ऐकोनी मानले पितयासें, । परम संतोष गांधारीतें, । भीष्म म्हणे, 'याहीपरतें । निकें आमुतें पैं काय ?' ॥ ४३ ॥ विदुर म्हणे, 'क्षेम कुशल । विलंब न करावा अळुमाळ.' । आप्त म्हणती, 'आम्ही सकळ । साहाय्य तूतें सर्वस्वें ? ॥ ४४ ॥ पैलाशतरूचिया[6] तुळणी । धत्तूरवृक्ष योजिला मनीं । कीं आम्रविटपासनीं । अर्कद्रुम बैसाविला. ॥ ४५ ॥ तेंवीं शिल्पकरांहातीं । सभा रचविली कुशल युक्ती । जेणें सकळ लोक म्हणती, । 'उणी येथें मयसभा.' ॥ ४६ ॥ ऋषी म्हणती 'दुर्योधना ! । अयुक्त करणें राजसूययज्ञा । पृथिवीपाळ तूतें प्राज्ञा ! । भणंगप्राय लेखिती. ॥ ४७ ॥ पांडव वलांच्या वसती वनीं । पृथ्वीजयाची कायशी कहाणी ? । महिमा रक्षावया जनीं । वार्ता तेही न बोलिजे. ॥ ४८ ॥ प्रज्ञाचक्षू जीवमानीं । अधिकार नाहीं तव यज्ञीं । हें रहस्य मनींचें मनीं । गुप्त ठेवीं शहाणिया ! ॥ ४९ ॥ विष्णूनें केला वैष्णवयाग । तो तुवां संपादावा सांग ।

१ वाणी. २ शून्य. ३ होतसे. ४ संपदा वेंचूनी अपार. ५ शून्य. ६ फणस.

ज्याचिया सुकृताची शिग । स्वर्गमंडपा भेदिल. ॥ ५० ॥ सुवर्ण-लांगलाचिया मुखें । लेखन कीजे यज्ञभूमिके । सुवर्णरत्नें अमोलिकें । अपार वोपीं ब्राह्मणां ' ॥ ५१ ॥ ' अवश्य ' म्हणोनी दुर्योधन । करिता झाला वैष्णवयज्ञ । पाचारिले ऋषि ब्राह्मण । शतसहस्र जाणते. ॥ ५२ ॥ मूळ पाठविले दूत । राजे पातले समस्त । द्रुपद यादव कृष्णनाथ । न येती ते तया यागा. ॥ ५३ ॥ ' पांडव कष्टती अरण्यवासी । आम्ही येइजे कोण्या संतोषीं ? । आम्हाविण तो विशेषीं । याग सांग संपादावा ' ॥ ५४ ॥ दुःशासन कुटिल-मती । दूत धाडिला धर्माप्रती । नमस्कारूनी बद्धहस्तीं । विज्ञापना जाणवी. ॥ ५५ ॥ ' दुर्योधनें मांडिला यज्ञ । तुम्हांवेगळे आम्हां[२] कोण ? । पांचहीजणीं कृपा करून । अवश्य आलें पाहिजे. ' ॥ ५६ ॥ हांसोनी बोले धर्मराज, । ' कौरववंशीं वंशध्वज[३] । दुर्योधन सभाग्य सहज । भूषणरूप आमुतें. ॥ ५७ ॥ अवश्य आलें पाहिजे आम्हां । परि प्रतिज्ञा नेमिली वाङ्नियमीं । ते पूर्ण न होतां स्वधर्मी । भ्रष्ठ आम्ही विधिमुखें[४] ॥ ५८ ॥ त्रयोदश वर्षें लोटलिया जाण । होईल अमुचे दर्शन ' । तंव आवेशूनी भीमसेन । दूताप्रती बोलत. ॥ ५९ ॥ ' चतुर्दश वर्षांचा आरंभ । होता माजेल समारंभ । धार्तराष्ट्र आणि पद्मनाभ । रणस्तंभीं दो भागीं. ॥ ६० ॥ पार्थशराग्निज्वाळादीप्ती । चापटणत्कार मंत्रोक्ति । धार्तराष्ट्रांचिया आहुती । पाठोपाठीं पडतील. ॥ ६१ ॥ प्रथम आहुती भीष्मद्रोण । पूर्णाहुति दुर्योधन । दुःशास-नाचें रक्तपान । पुरोडाश घ्यावया. ॥ ६२ ॥ सहज येऊं तया ठाया । विभागी असों उत्तरकार्या । निरोप सांगे कौरवराया । पुत्र-

१ सर्व माया भेदिली. २ आप्त. ३ विजयध्वज. ४ गुरुमुखें ; विश्वमुखें.

दुःख नेदीं सर्वथा.' ॥ ३७ ॥ ऐकोनी भीष्माची सुवाणी[1] । प्रत्युत्तर नेदिती कोणी । दुर्योधन कर्ण शकुनी । जाते झाले स्वधामा, ॥३८॥ एकत्र मिळोनी अवघेजण । म्हणती, 'पांडवयश न्यून[2] । होय ऐसा महायज्ञ । विशेष आम्हीं करावा. ॥ ३९ ॥ धर्मे राजसूययज्ञ केला । तो कीर्तिघोष विश्वीं भरला । तो लोपोनी जाय वहिला । ऐसी ख्याति करावी. ॥ ४० ॥ दुर्योधनाचा कीर्तिगभस्ती । अक्षयी उजळावा त्रिजगतीं । जेणें पांडवांची कीर्ती । खद्योतप्राय हारपे[3]. ॥ ४१॥ संपदा[4] असे हो! अपार । कनकरत्नांचे गिरीवर । पाचारूनी ऋषीश्वर । यज्ञारंभ करावा.' ॥ ४२ ॥ ऐकोनी मानले पितयातें, । परम संतोष गांधारीतें, । भीष्म म्हणे, 'याहीपरतें । निकें आमुतें पैं काय?' ॥ ४३ ॥ विदुर म्हणे, 'क्षेम कुशल । विलंब न करावा अळुमाळ.' । आप्त म्हणती, 'आम्ही सकळ । साहाय्य तूतें सर्वस्वें?' ॥ ४४ ॥ पैलाशतरूचिया[6] तुळणी । धत्तूरवृक्ष योजिला मनीं । कीं आम्रविटपासनीं । अर्कद्रुम बैसाविला. ॥ ४५ ॥ तेवीं शिल्पकरांद्वारातीं । सभा रचविली कुशल युक्ती । जेणें सकळ लोक म्हणती, । 'उणी येथें मयसभा.' ॥ ४६ ॥ ऋषी म्हणती 'दुर्योधना! । अयुक्त करणें राजसूययज्ञा । पृथिवीपाळ तूतें प्राज्ञा! । भणंगप्राय लेखिती. ॥ ४७ ॥ पांडव वलाप्य वसती वनीं । पृथ्वीजयाची कायशी कहाणी? । महिमा रक्षावया जनीं । वार्ता तेही न बोलिजे. ॥ ४८ ॥ प्रज्ञाचक्षू जिवमानीं । अधिकार नाहीं तव यज्ञीं । हें रहस्य मनींचें मनीं । गुप्त ठेवीं शहाणिया! ॥ ४९ ॥ विष्णूनें केला वैष्णवयाग । तो तुवां संपादावा सांग ।

---

१ वाणी. २ शून्य. ३ होतसे. ४ संपदा वेंचूनी अपार. ५ शून्य. ६ फणस.

ज्याचिया सुकृताची शिग । स्वर्गमंडपा भेदिल. ॥ ५० ॥ सुवर्ण- लांगलाचिया मुखें । लेखन कीजे यज्ञभूमिके । सुवर्णरत्नें अमोलिकें । अपार वोपीं ब्राह्मणां. ' ॥ ५१ ॥ ' अवश्य ' म्हणोनी दुर्योधन । करिता झाला वैष्णवयज्ञ । पाचारिले ऋषि ब्राह्मण । शतसहस्र जाणते. ॥ ५२ ॥ मूळ पाठविले दूत । राजे पातले समस्त । द्रुपद यादव कृष्णनाथ । न येती ते तया यागा. ॥ ५३ ॥ ' पांडव कष्टती अरण्यवासी । आम्ही येइजे कोण्या संतोषीं ? । आम्हाविण तो विशेषीं । याग सांग संपादावा ' ॥ ५४ ॥ दुःशासन कुटिल- मती । दूत धाडिला धर्माप्रती । नमस्कारूनी बद्धहस्तीं । विज्ञापना जाणवी. ॥ ५५ ॥ ' दुर्योधनें मांडिला यज्ञ । तुम्हांवेगळं आम्हां कोण ? । पांचही जणीं कृपा करून । अवश्य आलें पाहिजे. ' ॥ ५६ ॥ हांसोनी बोले धर्मराज, । ' कौरववंशीं वंशध्वज । दुर्योधन सभाग्य सहज । भूषणरूप आमुतें. ॥ ५७ ॥ अवश्य आलें पाहिजे आम्हीं । परि प्रतिज्ञा नेमिली वाङ्नियमीं । ते पूर्ण न होतां स्वधर्मी । भ्रष्ट आम्हीं विधिमुखें ॥ ५८ ॥ त्रयोदश वर्षे लोटलिया जाण । होईल असांचे दर्शन ' । तंव आवेशूनी भीमसेन । दूताप्रती बोलत. ॥ ५९ ॥ ' चतुर्दश वर्षांचा आरंभ । होता माजेल समारंभ । धार्तराष्ट्र आणि पद्मनाभ । रणस्तंभीं दो भागीं. ॥ ६० ॥ पार्थशराग्निज्वाळादीप्ती । चापटणत्कार मंत्रोक्ति । धार्तराष्ट्रांचिया आहुती । पाठोपाठीं पडतील. ॥ ६१ ॥ प्रथम आहुती भीष्मद्रोण । पूर्णाहुति दुर्योधन । दुःशास- नाचें रक्तपान । पुरोडाश द्यावया. ॥ ६२ ॥ सहज येऊं तया ठाया । विभागी असों उत्तरकार्या । निरोप सांगे कौरवराया । पुत्र-

१ सर्व माया भेदिली. २ आप्त. ३ विजयध्वज. ४ गुरुमुखें ; विश्वमुखें.

मित्रां सर्वांतें.' ॥ ६३ ॥ दूत सांगती हे वार्ता । धृतराष्ट्रा परम चिंता[1] । भीष्माशीं म्हणे, 'माझिया चित्ता । समाधान उपजेना ॥६४॥ बोलिले तैशीच करितीं[2] करणी । हा निश्चय मानिला मनीं.' । भीष्म म्हणे, 'राहे मौनी । होईल तें विलोकीं. ॥ ६५ ॥ असो. मांडिला महायज्ञ । स्थानीं नेमिले ऋत्विजजन । तृप्त जाहला हुताशन । आज्याहुती प्राशितां. ॥६६॥ घृतशर्करा पायस[3] तांटीं[3] । ब्राह्मण तोषले लक्षकोटी । रत्नसुवर्णांचिया मुष्टी । बहु दक्षिणा वांटिली. ॥ ६७ ॥ वस्त्रें भूषणें धेनू महिषी । अश्व कुंजर दासदासी । भूमिदानें[4] निष्कराशीं । याचकइच्छे दिधल्या. ॥ ६८ ॥ कौरवपक्षी बोलती आप्त, । 'युगानयुगीं यज्ञ बहुत । केले परि हे अत्यद्‌भुत । नाहीं श्रवणीं परिसिलें. ॥ ६९ ॥ धर्में राजसूय यज्ञ केला । तो बहुलेकांतें विस्मयो जाला । तो या मेरूपुढें गमला । सर्वपप्राय ये काळीं.' ॥ ७० ॥ 'याग केला धर्में सांग । त्याचा सहस्रावा भाग । न पवे दुर्योधनाचा याग' । ऐसें एक बोलती. ॥ ७१ ॥ कर्ण गर्जोनी बोले वाणी, । 'पांडव मारिल्या रणांगणीं । राजसूय यज्ञ करोनी धरणीं, । दानोदकें बुडविणें. ॥ ७२ ॥' सार्वभौमसंपत्तीची[5] माळा । घालूनिया दुर्योधनाच्या गळां । अश्वमेधयागीं सकळां । महाकौतुक दावणें.' ॥७३॥ ऐकोनी कर्णाचे वचन । अंधें दिधलें आलिंगन । विदुर कृप भीष्म द्रोण । भाळ हातें स्पर्शिती. ॥ ७४ ॥ पुढती प्रतिज्ञा बोले कर्ण, । 'रणीं मारीन मी फाल्गुन । अन्यथा असे तैं तो पाषाण । अथवा प्रेत भूमंडळीं.' ॥ ७५ ॥

---

१ व्यथा. २ करितील. ३ पायस घोटीं. ४ भूमिग्राम; भूतिग्राम. ५ सार्वभौमपदाची माळा.

संपला दुर्योधनाचा यज्ञ । अद्वैतवनीं कुरुनंदन । निशाकाळीं महा स्वप्न ! देखता झाला लोचनीं. ॥७६॥ मृग येऊनी स्वप्नाप्रती । म्हणे, 'राया । धर्ममूर्ती ! । आमुचें कुल पावेल शांती । पुढें संतती खुंटल्या. ॥ ७७ ॥ नित्य वधूनी मृगांचीं शतें । भोजन देशी ब्राह्मणातें । शेष नुरेचि बीजापुरतें । ऐसें केलें पावित्रा ! ॥ ७८ ॥ आतां कृपा करुनी दीना । गमन करावें आणिका वना.' । करुणा आली कुरुभूषणा । अभय वोपी हरिणातें. ॥ ७९ ॥ जागृत होउनी विशाळकीर्ती । स्वप्न सांगे अनुजांप्रती । सांडूनी अद्वैतवनाची वस्ती । काम्यकारण्या चालिले. ॥ ८० ॥ काम्यकवनीं करितां वास । भेटी पातला वेदव्यास । नमस्कारूनी कुरुनरेश । सुखसंवादीं बैसला. ॥ ८१ ॥ 'घेईन अर्जुनाचा प्राण' । ऐसी प्रतिज्ञा बोलिला कर्ण । तें परिसोनी अतिउद्विग्न । धर्मराजा मानसीं. ॥ ८२ ॥ आपुल्या अपराधाचेनि दोषें । बंधु शिणती अरण्यवासें । हेंही स्मरोनी विशेषें । परम दुःखें विलपत. ॥ ८३ ॥ व्यास म्हणे, 'कुंतीसुता ! । कासया व्याकुळ करिसी चित्ता । तपोदानें क्लेशावस्था । हरूनी कल्याण पाविजे.' ॥ ८४ ॥ [1]आवडी पुसे युधिष्ठिर नृप, । 'श्रेष्ठ दान किंवा तप । जेणें खंडोनी संसारताप । परम श्रेय पाविजे.' ॥ ८५ ॥ व्यास म्हणे, सावधान । निग्रहवूनी शरीर प्राण । श्रीपुरुषेंशीं निर्मळ मन । द्विजपूजनीं जयाचें ॥ ८६ ॥ चंदन झिजोनी परातें निववी । अगरू जळोनी परिमळ दावी । आपण शिणोनी [3]परातें जीववी । परोपकारी जो नर. ॥ ८७ ॥ तेणें कोटि तपें केलीं राया । [4]तीर्थें वंदिती त्याचिया पायां । इंद्रादिक देव तया । सदा द्वारीं तिष्ठती. ॥ ८८ ॥ अकिं-

१ आदरें. २ परताप. ३ पुढिलां. ४ तीर्थें नित्य वंदिती पायां.

चन आणि दानशील । भक्तीनें वोपी स्वल्प जळ । तेणें दिधलें भूमंडळ । कनकाचल दक्षिणे. ॥ ८९ ॥ याविषयीं इतिहास गहन । सांगेन ऐकें सावधान । 'व्रीहिद्रौणीक' महदाख्यान । चरित्र मुद्गल- ऋषींचें. ॥ ९० ॥ तो मुद्गलनामें ऋषीश्वर श्रोत्री । वास करूनी कुरुक्षेत्रीं । कंद[2]मूळआहार पत्रीं । धर्मन्यायें वर्तत ॥ ९१ ॥ शिलोंछ- वृत्ती वेचिती क[3]ण । [4]तेणें करिती शरीरपोषण । ऐशापरी चौघे- जणे । पक्षाहार संपादिती. ॥ ९२ ॥ प्रथम[5] ब्राह्मण तोषविती आधीं । भगवद्भावें यथाविधी । उरलेनि अन्नें क्षुधाव्याधी । चौघेंजणें परिहरती. ॥ ९३ ॥ आपण भार्या स्नुषा सुत । चौघांचेंही एकचित्त । शरीरलोभाचा कुवात । एकातेंही नातळे. ॥ ९४ ॥ इंद्र मुख्य करूनी विबुध । अतिथी हो[6]ऊनी घेती प्रसाद । हरिहरब्रह्मा गुणानुवाद । अखंड करिती तयाचा. ॥९५॥ चौथीं षण्मास वेंचूनी कण । प्राणा[7]हार संचित अन्न । तेव्हां आंवतुनियां ब्राह्मण । तृप्त करिती तयांतें. ॥९६॥ वृत्तांत ऐकूनी ऐसा । अत्रिपुत्र मुनि दुर्वासा । ल[8]क्षूनी पारण्याच्या दिवसा । येता झाला मध्यान्हीं. ॥ ९७ ॥ म्हणे, 'भोजन देईं त्वरें । पीडिले क्षुधेच्या वैश्वानरें । नमस्कारूनी आत्यादरें । भोजनपात्रीं बैस- विला. ॥ ९८ ॥ सर्वही अन्न भक्षिलें वेगीं । शेष आंगा लेंपिलें सर्वांगीं । अवंचक भाव जाणोनी योगी । जाता जाला स्वाश्रमा. ॥ ९९ ॥ नाहीं कोप उबग चिन्ह । गेलिया मागें करिती स्तवन । म्हणती आम्ही धन्य धन्य । कृपा केली समर्थें. ॥ १०० ॥ यापरी

---

१ पावक तोषवी अग्निहोत्री. २ त्या जीवन. ३ कपोतिकन्याय जाण. ४ वेंचून एक एक कण. ५ तेणें. ६ मिषें. ७ दशाहार सांचविती अन्न. ८ पहावया मन इच्छा.

साधूनियां वेळ । अन्न भक्षिले सात वेळ । विकृति उपेक्षा अकुमाळ । चैाघांतेंही न देखे. ॥ १०१ ॥ चढता आदर भोजनीं । देखता झाला प्रतिदिनीं । दुर्वासरूपें शूळपाणी । संतोषला दयाळ. ॥ १०२ ॥ ते वेळीं प्रसन्न मुखें जाणा । आलिंगिलें चौघां जणां । म्हणे, ‘ धन्य धन्य तुलना । तुम्हां नाहीं त्रिलोकीं. ॥ १०३ ॥ तुम्हीं इह लोक जिंतिला । परलोक पायतळीं सूदला । ब्रह्मसुखाचा लाधला । स्वानंद-सिंधु निर्धारें. ॥१०४॥ छळितां क्लेश केले तुम्हांतें । तें म्या जाळिले भवबीजातें । आतां अक्षय सायुज्यातें । पावोनियां सुख भोगा. ’ ॥ १०५ ॥ ऐसें अनुवादतां तेथ । घंटाघोष घवघवित । दिव्य विमान हंसयुक्त । ऋषीलागीं पातलें ॥ १०६ ॥ नमस्काराूनियां दूतीं । म्हणितलें, ‘ चालिजे स्वर्गाप्रती । इंद्र चंद्र[1] प्रजापती । वाट पहाती स्वामिया ! ’ ॥१०७॥ मुद्गल म्हणे, ‘ स्वर्गलोकीं । सर्व वस्ती अक्षय सुखीं । किंवा कोणी महादुःखी । पीडिजेती प्रारब्धें ? ॥ १०८ ॥ किती गुण किती दोष । स्वर्गाहूनीं स्थान विशेष । तेथें वसती महा-पुरुष । ते कोण कोण सांगिजे. ’ ॥१०९॥ दूत म्हणती, ‘ स्वर्ग भुवनीं । सर्वही वसती रत्नसदनीं । बैसोनियां विमानयानीं । स्वेच्छानंदें क्रीडती. ॥ ११० ॥ दिव्य वस्त्रें दिव्य आभरणें । दिव्य गंध दिव्य सुमनें । दिव्य सुंदरींचीं आलिंगनें । सुखमैथुनें मनइच्छा. ॥ १११ ॥ स्वेच्छ सुधारसपान, । जरा क्षुधा रोग मरण । मलमूत्रादि कश्मल जाण । तया लोकीं असेना. ॥ ११२ ॥ कामधेनू पुरवी काम । कल्पिलें वोपी कल्पद्रुम । पारिजातांचा आराम । दिव्य गंधे घमघ - मित. ॥ ११३ ॥ परम विश्रांति नंदनवनीं । रत्नपुलिनी मंदाकिनी ।

---

१ सूर्य निशापती.

अमृतोदकीं हेमनलिनी[१] । सहस्रदळीं फुललिया. ॥ ११४ ॥ ऐसा स्वर्गींचा सुरवाड । अंतीं आघाताचे दगड । लागतीं तोही निवाड । स्वल्प कांहीं परिसतु. ॥ ११५ ॥ विशेष देखोनी पावती खेदा । सन्मानालागीं[२] उपजे स्पर्धा । मैत्री आर्जव सुखसंवादा । कोणी कोणाशी न मिळती. ॥ ११६ ॥ पुण्य सरतां एकाएकीं । टोणपा बैसे हो ! मस्तकीं । ते वेळीं होऊनी परम दुःखी । अधःपंथीं उतरणें. ॥ ११७ ॥ म्हणोनी सत्यलोकपर्यंत । सर्व जाणोनी अंतवंत । तत्वनिष्ठ ज्ञानिये संत । सत्य मार्गीं निघाले. ॥ ११८ ॥ तपयोगें स्वर्गस्थान । शुद्ध जें कां ब्रम्ह सनातन । भक्तीनें हरिहराचें भुवन[३] । वैकुंठ आणि कैलास. ॥ ११९ ॥ सांडोनियां देहाभिमान । सर्वभूतीं[४] समसमान । ते पावती पदनिर्वाण । कैवल्यधाम ज्या म्हणती. ॥ १२० ॥ म्हणोनी वामदेव शुक । याज्ञवल्क्य वसिष्ठ जनक । सर्व मानूनी मायिक । ब्रह्मानंदीं मिसळले. ' ॥ १२१ ॥ हे मुद्गलें ऐकोनी वाणी । विमान पाठविलें परतोनी । अहंममतेनें त्यागुनी । सोऽहंध्यानीं बैसला. ॥ १२२ ॥ कर्म अर्पितां भगवंतीं । तात्काळ चित्तशुद्धीची[५] प्राप्ति । चित्तशुद्धीनें वैराग्यशांती । निर्धारेशीं पाविजे. ॥ १२३ ॥ वैराग्यशांतीनें अचल ज्ञान । ज्ञानें कैवल्यनिधान । ब्रह्मप्राप्तीलागी सोपान । सर्व सिद्धांतीं बोलिजे. ॥ १२४ ॥ या परी मुद्गल ऋषि तेथें । पावला अक्षय ब्रह्मस्वरूपातें । पुढती दुःखवार्ता जेथें । कल्पांतींही नाढळे[६] ॥ १२५ ॥ तैसेंचि त्वांही धर्मराया ! । सांडूनी संसारिक माया । विचारें स्वस्थ करुनी हृदया । आत्महिता

१ हेमकुमुदिनी. २ समान पुण्यें. ३ दर्शन. ४ समाधान. ५ चित्तशुद्धीची. ६ नाठवे.

लागावें. ॥ १२६ ॥ प्रारब्ध करूनी प्रमाण । होईल तें पहावें मौने[1] करून[1] । आत्मस्वरूपाहूनी मन । ढळों नेदी सर्वथा.' ॥ १२७ ॥ एसें सांगोनी राया धर्मा, । व्यास गेला निज आश्रमा । वैशंपायन नरेंद्रोत्तमा । जनमेजया निरूपी. ॥ १२८ ॥ इति श्रीवनपर्व भारतीं । श्रीहिद्रौणिकव्रतसमाप्ती । जयद्रथगिटंबना श्रोतीं । अत्यादरें परिसणें. ॥१२९॥ मुक्तेश्वराची मनो आर्ती[2] । कोरान्न मागे संतांप्रती । अवधान स्नेहाचिया हातीं । स्वल्प मुष्टी न घरावें[3]. ॥ १३० ॥

---

## अध्याय चौदावा

काम्यकवनीं कामनातीत । धर्मराज बंधूंहित । सवे[4] धौम्य पुरोहित । सारासार जाणता. ॥ १ ॥ आश्रमीं द्रौपदीनिधान । ठेऊनी पुरोहित संरक्षणा । पारधी गेले पांचही जण । मृगमांसे आणावया. ॥ २ ॥ क्षुधे पीडती ब्राम्हण । शीघ्र द्यावया भोजन । वधूनी आणावया मृगगण । वना गेले प्रतापी. ॥ ३ ॥ सैंधवराजा जयद्रथ । कोटिक सौवीर मित्र सहित । त्रिगर्तराज बलोन्मत । पूर्वद्वेषी[5] धर्माचा. ॥ ४ ॥ वाजी वारण रथ पदाती । सेनासमुद्र लोटला क्षिती । गर्जना परिसोनी श्वापद घाती । गिरीकंदरीं रिघाल्या ॥ ५ ॥ जात असतां विवाहकार्या । चुकोनि आले तया ठाया । आश्रम-द्वारीं पांडवजाया । कनकलतिका देखिली. ॥ ६ ॥ तीतें आव लोकितां नयनीं । हृदय भेदलें पंचबाणीं । जैसा भ्रमें मद्यपानी तेंवी पडला भूतळीं. ॥ ७ ॥ म्हणे, ' हे काय शक्ररमणी । किंवा

---

१ धरूनी मौन. २ वृत्ती ३ घालावें. ४ सर्वज्ञ. ५ पूर्णद्वेषी.

साकार सौदामिनी, । ईचेनी पाडें त्रिभुवनीं । अंगना आन असेना.' ॥ ८ ॥ म्हणे, 'कोटिका ! विचारीं । सुकुमार हे कवणाची कुमारी । कवणा सभाग्याची नारी । प्राणेश्वरी डोळसा ॥ ९ ॥ जरी मिळे ऐसी भाज[1] । तरी पुढारी[2] आर्त[3] नाहीं मज[2] । क्षात्रियकुळीं जन्मोनी काज । सर्वही म्यां साधिलें ' ॥ १० ॥ कोटिक येवोनि आश्रमनिकटीं । वंदी जोडिल्या पाणिपुटीं । म्हणे, 'तूं कवणाची गोरटी । वनसंकटीं एकली ? ॥ ११ ॥ सुवर्णचंपकचारुकलिके ! । लावण्यमूलपीठरेणुके ! । नृप चौडंक गर्जती मुखें । लोलो लागला म्हणोनी. ॥ १२ ॥ तुझा वृत्तांत पडावेया[3] श्रवणीं । जोगवा मागिजे[4] जोडूनी[4] पाणी । उदेयो[5] करीं कुलस्वामिनी । आनंदाचे आनंदीं.' ॥ १३ ॥ द्रौपदी म्हणे, 'मी द्रुपदतनया । पांचा पांडवांची जाया । एकटी[6] वनीं न पवें भया । पती समर्थ म्हणवोनी.' ॥ १४ ॥ कोटिकें सांगतां ही वार्ता, । धैर्य न धरवे जयद्रथा । अद्भुत नावरे कामव्यथा । येता झाला जवळिकें. ॥ १५ ॥ म्हणे. 'कुशल वो कल्याणरूपें ! । येरी म्हणे, 'श्रीकृष्णकृपें' । पुढती बोले, 'दारिद्रतापें । कष्ट भोगिशी काननीं. ॥ १६ ॥ राज्यभ्रष्ट श्रीभ्रष्ट । त्यांचे संगती भोगिशी कष्ट । आतां त्यागीं ते सर्वभ्रष्ट । परम अभाग्य पांच ही. ॥ १७ ॥ माझी भार्या होऊनी प्रीती । आरुढें कां कनकरथीं । पांडव पातल्या शस्त्रघातीं । धाडवीन यमलोका' ॥ १८ ॥ द्रौपदी म्हणे, 'हे मिथ्या मातु । मी तंव बलिष्ठांची वस्तु । अभिलाषितां सद्यो मृत्यु । पावशील पापिष्टा ! ॥१९॥ अन्याव करूनिया अद्भुत । पळशी सप्त पाताळांत । तेथूनी काढील पवनसुत । अर्ध क्षण न

---

१ अंतुरी २ पुरलें सहज. ३ पडतां. ४ मागती पसरूनी. ५ उदो ६ एकली.

लागतां. ॥ २० ॥ मीनल्या राजे कोट्यानुकोटी । एक बाणें वधील किरीटी । जैशीं तृणें हव्यावाटीं । भस्म होती स्पर्शतां. ॥ २१ ॥ निद्रित देखोनी केसरी । त्याची स्मश्रु उपडितां[1] करीं । व्याघ्र ताडोनी लत्ताप्रहारीं । अजाकळपीं[2] लपतोसी. ॥ २२ ॥ सर्पपुच्छ रगडोनी चरणीं । हातें काढी मस्तकमणी । तया वांचता मार्ग जनीं । कोण तो दावी पामरा ! ? ॥ २३ ॥ तेंवी मी पांडवांची वनिता । मृत्यु[3] पावशी स्पर्श करितां । जेंवी ज्वाला आलिंगितां । पतंग भस्मे तात्काळीं.' ॥ २४ ॥ ऐसें बोलतां[4] पांचाळी ते । सैंधव न पवे भयशंकेतें । द्रौपदी धरूनी कठिन हस्ते । बलात्कारें वोढिली ॥२५॥ वेगीं वाहूनी कनकरथीं[5] । पळता झाला पवनगती, । धौम्य म्हणे, 'मंदमती । मृत्यु मोलें घेतला. ॥ २६ ॥ अर्ध घटिकेमाजी जाण । अनर्थ पावशी दारुण । अपमान भोगुनी लांछन । जन्मवरी खंडेना[6].' ॥ २७ ॥ रथ पळे[7] त्वरा मोठी । धौम्य धांवे पाठोपाठी । तंव अवचिन्हें देखे[8] दृष्टी । धर्मराज काननीं ॥२८॥ भालू भुंकती समोरी । पिंगळे करकरती[9] तरूवरी । उलूक सुचविती घूत्कारीं । हानि जाली म्हणवोनि. ॥ २९ ॥ सव्य चाष अपसव्य काक । आडवे जाती दंदशूक । मुखें पसरोनी जंबुक । फिरफिरोनी बोभांती[10]. ॥ ३० ॥ धर्म म्हणे, 'भीमा ! किरीटी ! । आश्रमीं अनर्थ दिसे दृष्टी । मृगयां[11] सांडोनी उठाउठीं । चला वहिलें आश्रमा. ॥ ३१ ॥ वेगीं आश्रमाजवळी पातले । तंव धात्री शोकें

---

१ उपडिशी. २ पहाशी अजाकळपीं लपावया. ३ मृत्यु पावशी मज स्पर्श करिता. ४ बोले. ५ दिव्यरथीं ६ सुटेना. ७ पळवितां ८ देखली. ९ गजबजती. १० बोलती. ११ मृग; वन.

भूतळीं लोळे । हृदय पिटी पाणितळें । केश मोकळे पाठिशीं. ॥ ३२ ॥ वृत्तांत पुसे कुंतीसुतु । ते म्हणे, 'येऊनिया जयद्रथु द्रौपदी घेऊनी निज वस्तु । रथें सहित पळाला.' ॥ ३३ ॥ ऐकोनी धाविन्नले पांचही जण । घेतलीं खड्गें धनुष्यबाण । पुढें पळे सैंधव करीन । पंच सिंह पाठिशीं. ॥ ३४ ॥ योजन एक अंतरेले । ते क्षणामाजी आटोपिळे । गर्जना ऐकोनी कांपिन्नले । सर्व ही संगी नृपाळ. ॥ ३५ ॥ सैंधव सांगे संगियांप्रती, । 'पांडव मारूनी शस्त्रघातीं । पांचही शिरें दूताहातीं । दुर्योधना पाठवा.' ॥ ३६ ॥ आज्ञापितां सैंधवपाळें । परतलीं राजयांचीं दळें । पांडव वेढूनी शस्त्रजाळें । वर्षते झाले अपार. ॥ ३७ ॥ शाल्व कोटिक सुरथपुत्र । त्रिगर्तराज क्षेमंकर । कुलिंदाधिप महाक्रूर । सैन्यें अपार तयांचीं ॥३८॥ द्वादश राजे सौवीर क्रूर । कुहननामाचे राजेश्वर । घेऊनी रथ सो सहस्र । युद्धकंदना मिसळले. ॥ ३९॥ मदोन्मत्त विशाळ करटी । पुढां लोटिले सहस्र साठी । जाती अश्वाचिया थाटी । लक्ष येरु पाठिशी. ॥ ४० ॥ पांच सहस्र झुंजार रथी । प्रचंड धनुष्यें धरूनी हातीं । बाण लावूनियां शीतीं । पांडव उजू लोटले. ॥ ४१ ॥ पांच लक्ष पायींचे वीर । शूलपट्टीशखड्गधर । म्हणती, 'वेढूनी पांडुकुमर । खंडविखंड करावे.' ॥ ४२ ॥ भीम लक्षी कुंजरभार । रथियां उजू अर्जुनवीर । नकुळ म्हणे, 'अश्वभार । तो विभाग पैं माझा. ॥ ४३ ॥ पदाति दळावरी सहदेव । लोटला जैसा रणभैरव । म्हणे, 'एक ही नेदीं जावो । परतोनियां स्वदेशा.' ॥४४॥ गदा वोपितां बाहुबळें । फुटती

१ पापवंत. २ अंतरलें. ३ आटोपिलें. ४ कुलिंदादि महावीर. ५ एक. ६ थाटी. ७ पन्नास. ८ झुंजा. ९ करा रे १० भाग.

गजांचीं कुंभस्थळें । तेथुनियां अशुद्ध गळे । धरा[1] भिजोनी वहातसे. ॥४५॥ महावंतांचीं शिरकमळें । छेदूनी सांडी एकेचि वेळे । सांडणें सांडिता रातोत्पळें । तैंवी भ्यासुर भासती. ॥ ४६ ॥ धनंजयें एकेचि शरें । छेदिलीं सारथियांचीं शिरें । पाठी रथियांतें बाणधारें । शतसहस्र पाडिले. ॥ ४७ ॥ अश्वसहित राउत राणे । नकुळें खिळिले एके बाणें । प्रेते पाडूनी[2] गतप्राणें शरसंधानीं[3] खेळविती. ॥ ४८ ॥ सहदेवें सोडूनियां बाण । पदातियांचे छेदिले चरण । मस्तक करुनियां भिन्न । कोथळे भूमी पाडिले. ॥ ४९ ॥ सोडूनी अर्जुनें शरा । सौवीरराजे पाडिले बारा । माजल्या अशुद्धाचिया पुरा—[4]। माजी पडिले प्रवाहीं. [5]॥ ५० ॥ निमालें त्रिगर्तांचें सैन्य । घेऊनी पळाला एकला प्राण । सेनेसाहित जाला चूर्ण । कुलिंद कोठें दिसेना. ॥५१॥ मुख्य धुरा पातल्या नाशा, । कटकें पळालीं दाही दिशा, । [6]घोर भाविमला वळसा । ध्याबया उश्वासभँासा अवकाश नाहीं. ॥ ५२ ॥ मार देखोनी जयद्रथ । रथ सांडिला द्रौपतीसहित । प्राणधाकें असे पळत । चरणचाली घाबरा. ॥ ५३ ॥ धर्म भीमातें वारित । सैंधव पळाला सांडूनी रथ । दळें मारिशी कां व्यर्थ । दीन हीनें बापुडीं? ॥ ५४ ॥ पुढां पातले पार्थ भीम । तंव द्रौपदीसहित परतला धौम्य । पुसती, 'केउता सैंधव अधम? । तो शोधूनी मारावा. ॥ ५५ ॥ द्रौपदी घेऊनी राया धर्मा । म्हणती जावें स्वाश्रमा । सैंधव वधूनी

१ धरा फुटोनी वहाती जळें । तैंवी अशुद्धें धांवताती ॥ २ करूनी; पाडिलीं; पाडी. ३ शस्त्रें सांधे उखळिती. ४ आधी. ५ गेला. ६ थोर भाविन्नला वळसा; भीम भरला अति आवेशा । म्हणे मारीन अवध्य तें. ॥ ७ श्वासा. ८ जावें जी.

भूतळीं लोळे । हृदय पिटी पाणितळें । केश मोकळे पाठिशीं. ॥ ३२ ॥ वृत्तांत पुसे कुंतीसुतु । ते म्हणे, ' येऊनिया जयद्रथु द्रौपदी घेऊनी निज वस्तु । रथें सहित पळाला.' ॥ ३३ ॥ ऐकोनी धाविन्नले पांचही जण । घेतलीं खड्गें धनुष्यबाण । पुढें पळे सैंधव करीन । पंच सिंह पाठिशीं. ॥ ३४ ॥ योजन एक अंतरेले । ते क्षणामाजी आटोपिले । गर्जना ऐकोनी कांपिन्नले । सर्व ही संगी नृपाळ. ॥ ३५ ॥ सैंधव सांगे संगियांप्रती, । ' पांडव मारूनी शस्त्रघातीं । पांचही शिरें दूताहातीं । दुर्योधना पाठवा.' ॥ ३६ ॥ आज्ञापितां सैंधवपाळें । परतलीं राजयांचीं दळें । पांडव वेढूनी शस्त्रजाळें । वर्षते झाले अपार. ॥ ३७ ॥ शाल्व कोटिक सुरथपुत्र । त्रिगर्तराज क्षेमंकर । कुलिंदाधिप महाक्रूर । सैन्यें अपार तयांचीं ॥३८॥ द्वादश राजे सौवीर क्रूर । कुहननामाचे राजेश्वर । घेऊनी रथ सो सहस्र । युद्धकंदना मिसळले. ॥ ३९॥ मदोन्मत्त विशाळ करटी । पुढां लोटिले सहस्र साठी । जाती अश्वांचिया थाटी । लक्ष येक पाठिशी. ॥ ४० ॥ पांच सहस्र झुंजार रथी । प्रचंड धनुष्यें धरूनी हातीं । बाण लावूनियां शीतीं । पांडव उजू लोटले. ॥ ४१ ॥ पांच लक्ष पायींचे वीर । शूलपट्टीशखड्गधर । म्हणती, ' वेढूनी पांडुकुमर । खंडविखंड करावे.' ॥ ४२ ॥ भीम लक्षी कुंजरभार । रथियां उजू अर्जुनवीर । नकुळ म्हणे, ' अश्वभार । तो विभागें पैं माझा. ॥ ४३ ॥ पदाति दळावरी सहदेव । लोटला जैसा रणभैरव । म्हणे, ' एक ही नेदीं जावो । परतोनियां स्वदेशा.' ॥४४॥ गदा वोपितां बाहुबळें । फुटती

---

१ पापवंत. २ अंतरलें. ३ आटोपिलें. ४ कुलिंदादि महावीर. ५ एक. ६ थाटी. ७ पन्नास. ८ झुंजा. ९ करा रे १० भाग.

गजांचीं कुंभस्थळें । तेथुनियां[1] अशुद्ध गळे । धरा भिजोनी वहातसे. ॥४५॥ महावंतांचीं शिरकमळें । छेदूनी सांडी एकेचि वेळे । सांडणें सांडिता रातोत्पळें । तैंवी भयासुर भासती. ॥ ४६ ॥ धनंजयें एकेचि शरें । छेदिलीं सारथियांचीं शिरें । पाठी रथियांतें बाणधारें । शतसहस्र पाडिले. ॥ ४७ ॥ अश्वसहित राउत राणे । नकुळें खिळिले एके बाणें । प्रेते पाडूनी[2] गतप्राणें शरसंधानीं[3] खेळविती. ॥ ४८ ॥ सहदेवें सोडूनियां बाण । पदातियांचे छेदिले चरण । मस्तक करुनियां भिन्न । कोथळे भूमी पाडिले. ॥ ४९ ॥ सोडूनी अर्जुनें शरा । सौवीरराजे पाडिले बारा । माजल्या अशुद्धाचिया पुरा—। माजी पडिले प्रवाहीं.[5] ॥ ५० ॥ निमालें त्रिगर्तांचें सैन्य । घेऊनी पळाला एकला प्राण । सेनेसहित जाला चूर्ण । कुलिंद कोठें दिसेना. ॥५१॥ मुख्य धुरा पावल्या नाशा, । कटकें पळालीं दाही दिशा, । [6]घोर भाविन्नला वळसा । ध्यावया उश्वासभाँसा अवकाश नाहीं. ॥ ५२ ॥ मार देखोनी जयद्रथ । रथ सांडिला द्रौपतीसहित । प्राणधाकें असे पळत । चरणचाली घाबरा. ॥ ५३ ॥ धर्म भीमातें वारित । सैंधव पळाला सांडूनी रथ । दळें मारिशी कां व्यर्थ । दीन हीनें बापुडीं ? ॥ ५४ ॥ पुढां पातले पार्थ भीम । तंव द्रौपदीसहित परतला धौम्य । पुसती, 'केउता सैंधव अधम ? । तो शोधूनी मारावा. ॥ ५५ ॥ द्रौपदी घेऊनी राया धर्मा । म्हणती जावें स्वाश्रमा । सैंधव वधूनी

१ धरा फुटोनी वहाती जळें । तैंवी अशुद्धें धांवताती ॥ २ करूनी; पाडिलीं; पाडी. ३ शरें सांधे उखळिती. ४ आधी. ५ गेला. ६ थोर भाविन्नला वळसा; भीम भरला अति आवेशा । म्हणे मारीन अवध्य तें. ॥ ७ श्वासा. ८ जावें जी.

शिरपद्मा । दावावया आणितों.' ॥५६॥ धर्म म्हणे, 'धरूनी आणा । नासूं[1] नको त्याचिया प्राणा, । वृद्ध धृतराष्ट्राचिया मना । शोकदुःख न द्यावें[2]. ॥५७॥ दुःशला गांधारीनंदिनी । ते आम्हां कनिष्ठ भगिनी । सैंधव मारिल्या सुवासिनी । विटंबेल वैधव्यें.' ॥ ५८ ॥ द्रौपदी म्हणे, 'भीमा! अर्जुना! । देखतां क्षणीं घ्यावा प्राणा । त्यातें वधिल्यावीण मना । समाधान[3] मज नाहीं.' ॥ ५९ ॥ धर्म धौम्य द्रौपदी सती । इंद्रसेनें वाहूनी रथीं । स्वाश्रमा पाठवूनी भद्रजाती । सैंधवापाठीं धाविन्नले. ॥ ६० ॥ सैंधव बैसोनी आणिके रथीं । पळत असतां पवनगती । अर्जुनें मंत्रबाणशक्ती । अश्वचरण खांडिलें. ॥ ६१ ॥ रहंवर सांडूनी संकटीं । प्राणधाकें पळता नेटीं । भीमें धावोनियां पाठी । मुष्टिघातें ताडिलें. ॥ ६२ ॥ हात घालोनियां केशीं । उलथोनी पाडिला भूमीसी । लत्ताप्रहारें ताडितां कुशीं । अशुद्ध वमी भडभडा. ॥ ६३ ॥ अर्जुन म्हणे, 'गा! धर्मआज्ञा । वधूं नको याचिया प्राणा.' । मुखीं ताडूनी चडकणा । किरीट पार्थे मर्दिला. ॥ ६४ ॥ अर्धचंद्र बाण तिखट । मस्तकीं काढिले पांच पाट । भूमी घांसोनी ल्लाट । रक्तमय[4] तें केलें. ॥ ६५ ॥ मिशी काढिली डावकडे । खांड[5] उजवे अंगें देहुडे । विरूपता मुखाकडे । लोकदृष्टी देखती. ॥ ६६ ॥ कपाळीं काजळ लेपन । नासिकीं लाविला श्वेत चूर्ण । ध्वजस्तंभेशीं बांधोन । धर्माजवळी पातले. ॥ ६७ ॥ ब्राह्मण पाहूनी पिटिती हो । टाळी । द्रौपदी हासे गदारोळी, । भीम म्हणे, वो पांचाळी! । आज्ञा देईं वधावया.'

---

१ नाश न करितां. २ घ्यावें. ३ समाधान पै. ४ पै. ५ खांड उजवागं देव्हडे.

॥ ६८ ॥ ' पांच पाट काढिले शिरीं । हे मरणाहुनी आगळी परी । आतां पापी दुराचारी । जीवदानें सांडावा. ' ॥ ६९ ॥ ऐकोनी द्रौपदीचिया वचना । धर्म म्हणे, 'भीमसेना ! । सोडीं याचिया गळबंधना । देहसंबंधी म्हणवोनी ' ॥ ७० ॥ भीम बोले कठिण[1] वाचा । ' विक्रीत दास मी पांडवांचा । ऐसें बोलेल तरी यांचा । प्राण आम्ही रक्षणें. ॥ ७१ ॥ न म्हणतां करीन शिरच्छेद. ' । धर्म म्हणे, ' न करीं वध । मुक्त केला हा दोषशब्द । धर्मबुद्धी वसों दे. ' ॥ ७२ ॥ मग म्हणे, ' गा जयद्रथा ! । हें उचित मानलें चित्ता । मिळोन दुष्टाचिया मता । ऐसेंच कर्म करावें. ॥ ७३ ॥ पुरे आयुष्याची अवधी । तंवं[2] असो दे हेचि बुद्धी । उपदेश करितां कोटि शब्दीं । दुष्ट भावें[3] न खंडे. ॥ ७४ ॥ कराल तैसें पावाल फळ । असो[4] तूं[4] जांई क्षेमकुशळ. ' । पाठविला[5] सैंधवपाळ । परी तो सखेद मानसीं. ॥ ७५ ॥ न वजाय हस्तिनापुरा । रागें पातला गंगातीरा । आराधूनीं श्रीशंकरा । मनकामना निवेदी. ॥७६॥ म्हणे, ' वरदान वोपीं माझें । रणीं मारीन पांडवांतें ' । हांसोनियां[6] उमाकांतें प्रत्युत्तर बोलिजे. ॥७७॥ ' कालिया कल्पांतीं जें नव्हें । माझेनी जें न देववे । तें मागतां तुझेनि जिव्हे । लज्जा कैशी न पैंविजे ? ॥ ७८ ॥ नरावतार तो अर्जुन । कृष्ण तो आदिनारायण । एकरूपी दोघेजण । सत्य स्वरूप विष्णूचे. ॥ ७९ ॥ विष्णु तोचि मी यथार्थ । त्याचेनि घातें माझा घात । वर मागता तो मूर्ख एथ । देता तोही तैसाची. ॥ ८० ॥ केले तपाचे सायास ।

---

१ क्रूर. २ तंव वरी ३ स्वभाव. ४ आतां. ५ यापरी पाठविला. ६ ऐसे ऐकूनी. ७ वाटे.

तरी जय पावसी एक दिवस । अर्जुन नसतां [1]तो विशेष । कांहीं ऐक देखसी. ॥८१॥ परंतु जय त्यांचे [2]भागीं । हानी अपजय तुमचा संगी । कृष्णकृपेस्तव ते जगीं । नातळती विघ्नातें.' ॥ ८२ ॥ ऐसें बोलोनी विरुपाक्ष । होता झाला अप्रत्यक्ष । सकळ मूर्खांमाजी तो मूर्ख । म्हणवूनी मानी श्लाघ्यता. ॥ ८३ ॥ येऊनी सांगे दुर्योधना 'आराधिलें त्रिलोचना । तेणे पांडवांचिया हनना । वरप्रदान माते वोपिलें.' ॥८४॥ मूर्खवचन प्रमाण मूर्खा । तेंवी संतोष कुरुनायका । म्हणे, 'तूं विभागी सुखदुःखा । [3]आह्मांमाजी तूं जिवलगा.' ॥८५॥ झांकिया जयद्रथविटंबना । पुढें मार्कंडेय ऋषि गहना । कथिल कथानिरूपणा । तें सज्जन परिसोत. ॥ ८६ ॥ इति भारतपर्वणि सकळ तीर्थांचिया श्रेणी । जोडिती इये ग्रंथश्रवणीं । मुक्तेश्वर कवि वदे. ॥ ८७ ॥

---

## अध्याय पंधरावा

धर्मराज काम्यकवनीं । असंख्यात तपोधनांचिया श्रेणी । मार्कंडेय महामुनी । एकासनीं जवळिकें ॥ १ ॥ धर्म म्हणे, 'महापुरुषा ! । द्रौपदी आमुची पवित्र योषा । कायावाचामनें दोषा, । स्पर्शली नाहीं स्वप्नींही. ॥ २ ॥ अनुसूया किंवा सावित्री । उपमे कांहीं वदाव्या वक्त्रीं । यावेगळी पहातां नेत्रीं । ब्रह्मांडघटीं दिसेना ॥३॥ ऐशियां [6]पवित्रेसि दुर्जनीं । दुःख दिधले सभास्थानीं । जयद्रथें स्पर्शोनी पाणी । जायाहरण केलें पापियें. ॥ ४ ॥ मैंज समर्थांची

१ तूंचि यश. २ विभागीं ३ आम्हां लागीं. ४ झाली. ५ शांडिल्या. ६ ऐशिया सतीतें ७ 'मार्गी समार्थांचिया जाया । पावल्या आपत्ति ऐसिया' ॥

जाया । पावली विपत्ति ऐशिया । तें मज सांगा ऋषिवर्या ! । सर्व-द्रष्टया सुजाणा ! ' ॥ ५ ॥ ऐकोनी हांसे सर्वज्ञमूर्ती, । ' हे अवस्था कायशी किती ! । सूर्यवंशीं दाशरथी । रामचंद्र जाणतसां. ॥ ६ ॥ त्याची भार्या गुणसुंदरी । नामें सीता परमेश्वरी । जनकचक्रवर्तीची कुमरी । मूर्त रमा भगवती. ॥ ७ ॥ राक्षसाचिये कारागृहीं । षण्मासवरी शिणली पाहीं. ' । तिची आवस्था ऐकतां मही । खंड-विखंड होऊं पाहे. ' ॥ ८ ॥ नमस्कारूनी धर्मराजें म्हणितलें, ' विस्तारें सांगिजे. ' ऋषि म्हणे, ऐक सहजें । कारण जालें कथावया. ॥ ९ ॥ पुलस्त्य ब्रम्ह्याचा नंदन । विश्रवा सुनामा तपो-धन । भारद्वाजें कन्यारत्न । तयालागीं दीधलें. ॥ १० ॥ तिचे पोटीं जन्मला कुमर । नामें वैश्रवण कुबेर । तेणें सत्यलोकेश्वर । तपोतेजे तोषविला. ॥ ११ ॥ सेवेसी निवेदुनी यक्ष । कृपेनें केला धना-ध्यक्ष । साध्य यक्ष यांमाजी मुख्य । परम प्रिय शिवातें. ॥ १२ ॥ वस्तीसी हेमलंकास्थान । प्रयाणा पुष्पक विमान । लोकपाळांमाजी जाणें । उत्तरादिशाधीश तो केला. ॥ १३ ॥ तेणें तोषवाया जनका । सेवे वोपिल्या त्रय नायिका । पुष्पोत्कटा मालिनी राका । रूपगुणी सुपवित्रा. ॥ १४ ॥ तिहीं पतिव्रताधर्में । पति तोषविला संभ्रमें । संतोषोनी वल्लभोत्तमें । सुफळ केल्या स्वरतें. ॥१५॥ रावण आणि कुंभकर्ण । पुष्पोत्कटेचे नंदन । माळिनीचा बिभीषण । परम पवित्र धर्मात्मा. ॥ १६ ॥ खर पुत्र आणि शूर्पणखा । प्रसवली तिसरी राका । ब्राह्मण वधूनी सहस्र संख्या । नित्य दोघे भक्षिती.

---

१ सांगे. २ शंकरगणांमांजी मुख्य. ३ याना. ४ मान्य. ५ नैऋत. ६ सकळां दीधलें वरातें. ७ खर त्रिशिरा.

॥ १७ ॥ सर्वही वेदशास्त्रीं निपुण । शस्त्रसाधनीं[1] अतिप्रवीण । आगमंत्राचें विज्ञानें[2] । फळापर्यंत जाणती. ॥ १८ ॥ पुत्रां घेऊनी चौघांजणा । पिता पातला गंधमादना । कुबेरसंपदा देखोनी मना । परम विषाद बंधूंतें. ॥ १९ ॥ दक्षिण[3] काशीक्षेत्र गोकर्ण । तेथे पातले चौघेजण । तपश्चर्या अतिदारुण । देहदंडन मांडिलें. ॥ २० ॥ लोहकंटकांवरी अंगुष्ट । ठेवुनी रावण एकनिष्ठ । लक्ष जपाचा शेवट । होतां हवन[4] आरंभी. ॥२१॥ छेदूनिया दाही शिरें । हवनीं होमी आपुल्या करें । पुढतीं ब्रह्माच्या वरें । उद्भवती तात्काळ. ॥ २२ ॥ शीत उष्ण वात पर्जन्य । माथा घेउनी कुंभकर्ण । निराहारी निर्जळी जाण । एकासनीं तिष्ठत. ॥ २३ ॥ द्वादशाग्नि पंचाग्नि धूम्रपान । सूर्यमंडळ अवलोकन । विष्णुस्मरण[5] बिभीषण । तपश्चर्या करितसे. ॥२४॥ खराशी दशग्रीव सांगे, । ' तुवां शुश्रूषा करावी आंगें । माझिया राज्यांच्या[6] विभागें । तुज ऐश्वर्यें रक्षीन. ' ॥ २५ ॥ दहा सहस्र वर्षें होतां । तयांप्रति पातला विधाता । म्हणे, ' कष्टूं नंको आतां । इच्छितार्थ मागिजे. ' ॥ २६ ॥ ' अमरत्व निर्भयत्व । तिन्ही लोकांचें आधिपत्य[9] । देईं ' म्हणोनी मागत । दशानन ब्रम्हातें. ॥ २७ ॥ ' गंधर्व देव दानव असुर । यक्ष राक्षस सर्प-किन्नर । भंग पावोनी मजसमोर । दास्य करिती तें करीं. ' ॥२८॥ आपलें भक्ष्य म्हणोनी गर्वें । मनुष्य वानरांची नांवे । न घे तेथें ब्रह्मदेवें । पुढें उपाय सूचिला. ॥ २९ ॥ कुंभकर्ण नमूनी प्रार्थी, ।

१ शास्त्रसाधनीं. २ विधान. ३ निराहार निर्जळी जाण. ४ यज्ञ आरंभिला. ५ विष्णुस्मरणीं एकाग्र मन. ६ तपाच्या. ७ तयांप्रति ८ नको. ९ अधिपतित्व.

अनुक्रम

' अपार भक्षितां नसे[1] तृप्ती । षण्मास निद्रेवरी जागृती । एक दिवस मज द्यावी. ॥ ३० ॥ माझिया बळासमान बळी । दुजा नसावा ब्रह्मांडगोळीं । स्वर्ग[2] मर्दीन पायांतळीं । ऐसी शक्ति मज द्यावी. ॥ ३१ ॥ यावरी बोले बिभीषण, । ' स्वामी ! जालेती प्रसन्न । तरी जो वर मागेन । तो दीधला पाहिजे. ' ॥ ३२ ॥ बिभीषण म्हणे, ' विश्वपति ! । भगवद्भावना सर्वभूतीं । दया अहिंसा विष्णुभक्ती । चढोवढी मज द्यावी ॥ ३३ ॥ मांडलिया आपत्तिकाळ । धर्मबुद्धि असावी अचळ । [3]कुसंगती ही न पवे चळ । भाव निर्मळ जन्मांचा[4]. ' ॥ ३४ ॥ प्रसन्नमुखें चतुरानन । म्हणे, ' राक्षसयोनींत जनन । पावोनीं रजेस्तमोगुणातीत मन । धन्य धन्य पवित्रा ! ॥ ३५ ॥ वचनें जालें अमृतपान । यालागीं अमरत्व कृपेकरून । तुज दीधलें सत्य वचन । कल्पांतींही चळेना. ॥३६॥ अक्षय्य कोटी कल्पवरी । राज्य करीं सुवर्णनगरीं । लक्ष्मी बसेल तुझ्या घरीं । भर्तारमित्र म्हणोनी. ' ॥३७॥ पाहोनी रावणा कुंभकर्णा । म्हणे, ' संपूर्ण मनकामना । उन्मत्तपणें पावाल विघ्ना । ते ही संज्ञा सांगतसें. ॥३८॥ कराल विष्णूशीं विरोध । तरी पावाल प्राणवध । विष्णुस्मरणें अक्षय्य आनंद । अनंत काळ भोगाल. ॥ ३९ ॥ जगज्जननीचा अभिलाष । उपजेल तेव्हां पावाल नाश । एरवीं भोगाल संतोष । ध्रुवा ऐसा जाण पां. ' ॥ ४० ॥ कैलास आंदोळितां बळी । [6]आणि शिरकमळें पूजितां चंद्रमौळी । शंकरवर महाबळी । लाधला सर्वां[5] वरांतें. ॥ ४१ ॥ प्रसन्न होऊनी

---

१ नसो. २ मही. ३ कुसंगीं ४ मज द्यावा. ५ सर्वगुणी. ६ ' हस्त शिरकला पर्वतातळीं । ते वेळीं स्मरला चंद्रमौळी । गरुडसूक्त व्यासोक्त. ॥ ' ' रुद्रकवच रुद्रन्यासोक्त ' असाही अन्य पाठ.

गिरिजारमण । देता झाला वरप्रदान । म्हणे, 'बोलिला जें चतुरानन । तेंचि वचन पैं माझें.' ॥ ४२ ॥ शंभुस्वयंभुवरदानमेळें[1] । त्रैलोक्यींचें राज्य [2]केलें । ते वेळीं विश्व कैसें गमलें । कीटकप्राय त्यां दृष्टी. ॥ ४३ ॥ दंडूनियां कुबेरातें । हरितलें पुष्पक विमानातें । लंका जिंतोनी आपणियांतें । ठाव केला बसावया. ॥ ४४ ॥ बंदीं घातलें सुरां सकळां । नवग्रहां पायीं एक शृंखळा । ताडूनियां अमरपाळा । भृत्यकामीं योजिलें. ॥ ४५ ॥ मारूनियां ऋषितापस नित्य खाती मेद[3]मांस । वीर[4]श्री माजले राक्षस । धेनुविप्रां भक्षिती. ॥ ४६ ॥ त्रैलोक्य पीडिलें आंगवणें । हरितलीं धनें अमूल्य रत्नें । अपूर्व तितुकें देखोनी नयनें । हिरोनी नेती दुरात्मे. ॥ ४७ ॥ देवगंधर्वांचिया नारी । दासी केल्या लंकापुरी । नागकन्या कोटीवरी । रावणगृहीं [5]कामिनी. ॥ ४८ ॥ तिहीं लोकांच्या सुंदरी । हिरोनी आणिल्या बलात्कारीं । दासी सूदल्या सहस्र घरीं । जाति पद्मिनी, भोगावया. ॥ ४९ ॥ आक्रांतले तिन्ही लोक । दीर्घ स्वरें करिती शोक । क्षोभून वैकुंठनायक । चतुरानना विचारी. ॥ ५० ॥ 'कसा कवणापासूनी वर । पावलासे दशशीर ?' । ब्रम्हा म्हणे, 'नरवानर । भिन्न असती वरदानीं.' ॥५१॥ सुरां आज्ञापी रमानाथ[6] । 'वानरऋक्षयोनिआंत । शरीरें धरा अत्यद्भुत । लंकानाथ वधावया. ॥ ५२ ॥ राज्य करी राक्षसपाळ । युगचौकड्या तेरा वेळ । लोटल्या त्याचा असंख्या प्रबळ । [7]बावन्नयुगें[8] मनुष्याचीं. ॥ ५६ ॥ पांच कोटी संवत्सर । एक लक्ष साठ सहस्र । इतकीं वर्षें वर

१ बळें २ सामर्थ्य आलें; स्वामित्व केलें. ३ मद्यमांस. ४ मदें. ५ काम करिती. ६ अमरनाथ. ७ केवळ. ८ एकसष्ट.

निर्जर । कारागृहीं आदृष्टान्वयें.[1] ॥ ५४ ॥ भोगिताती नाना क्लेश । आतां त्याचा करीन नाश । नांव घ्यावया राक्षस । लोकत्रयीं उरेना. ॥ ५५ ॥ मनुष्यरूपातें[2] धरूनी । हा रावण निर्दाळुनी । स्वर्गीं सुरांतें स्थापूनी । परिहरीन भूभार. ' ॥ ५६ ॥ चतुर्धा झाली एक तनु । सौमित्र भरत शत्रुघ्नु । पूर्ण अवतार रघुनंदनु,[3] । रामरूपें आगळा. ॥ ५७ ॥ आयोध्यपुरींचा नृपनाथ । पुत्र अजाचा दशरथ । अंगनात्रयीं त्रिवेणीयुक्त । तीर्थराज ज्यापरी. ॥ ५८ ॥ कौसल्येचा एक रघुनाथ । कैकयीचा पुत्र भरत । लक्ष्मणशत्रुघ्न चंद्रादित्य देवी सुमित्रा प्रसवली. ॥ ५९ ॥ गर्भाधानापासूनी जाण । चतुर्दश संस्कार जाले पूर्ण । चतुर्दश विद्या हो आपण । वोळगती तयांतें. ॥ ६० ॥ ताडकासुबाहूचें हनन । सिद्धी नेला ऋषीचा[4] यज्ञ । केलें अहिल्याउद्धरण । चरणस्पर्श करूनी. ॥ ६१ ॥ स्वयंवरीं हरचापखंडण । अपमानिला दशानन । केलें जानकींचें पाणिग्रहण । समस्त राया देखत. ॥ ६२ ॥ मार्गीं जिंकिला भृगुपती । जैयस्वी[5] पातले अयोध्येप्रति । रायें जाणोनी पुरुषार्थी । राजाभिषेक मांडिला. ॥ ६३ ॥ दुंदुभीनामें गंधर्वनारी । ते मंथरा प्रेरिली सुंदरी । कैकयी बोधोनी कुटिलोत्तरीं । राज्य देई भरतातें. ॥ ६४ ॥ राम सीता सौमित्र गुणी । अरण्यवासा पाठविली तिन्ही । तेथ वसतां रक्षोगणीं । चालंजेल वैरातें. ॥ ६५ ॥ पंचवटिके वसतां पाहा हो । निकटवासें वाढला कलहो । असंख्य राक्षससमूहो । रामहस्तें शमला. ।

---

१ दुष्टाच्या. २ 'धरूनी मनुष्य रूपातें । निर्दाळूनी रावणातें । स्वर्गीं स्थापूंनी सुरांतें । परिहरीन भूभार ॥ '– असा अन्य पाठ. ३ मधूसूदनु. ४ गाधिज. ५ जायेशी.

गिरिजारमण । देता झाला वरप्रदान । म्हणे, 'बोलिला जें चतुरानन । तेंचि वचन पैं माझें.' ॥ ४२ ॥ शंभुस्वयंभुवरदानमेळें[1]। त्रैलोक्यींचें राज्य [2]केलें। ते वेळीं विश्व कैसें गमलें । कीटकप्राय त्यां दृष्टी. ॥ ४३ ॥ दंडूनियां कुबेरातें । हरितलें पुष्पक विमानातें । लंका जिंतोनी आपणियांतें । ठाव केला बसावया. ॥ ४४ ॥ बंदीं घातलें सुरां सकळां । नवग्रहां पायीं एक शृंखळा । ताडूनियां अमरपाळा । भृत्यकामीं योजिलें. ॥ ४५ ॥ मारूनिया ऋषितापस नित्य खाती मे[3]दमांस । वीर[4]श्री माजले राक्षस । धेनुविप्रां भक्षिती. ॥ ४६ ॥ त्रैलोक्य पीडिलें आंगवणें । हरितलीं धनें अमूल्य रत्नें । अपूर्व तितुकें देखोनी नयनें । हिरोनी नेती दुरात्मे. ॥ ४७ ॥ देवगंधर्वांचिया नारी । दासी केल्या लंकापुरी । नागकन्या कोटीवरी । रावणगृहीं [5]कामिनी. ॥ ४८ ॥ तिहीं लोकांच्या सुंदरी । हिरोनी आणिल्या बळात्कारीं । दासी सूदल्या सहस्र घरीं । जाति पद्मिनी, भोगावया. ॥ ४९ ॥ आक्रांतले तिन्ही लोक । दीर्घ स्वरें करिती शोक । क्षोभून वैकुंठनायक । चतुरानना विचारी. ॥ ५० ॥ 'कसा कवणापासूनी वर । पावलासे दशशीर ?' । ब्रम्हा म्हणे, 'नरवानर । भिन्न असती वरदानीं.' ॥५१॥ सुरां आज्ञापी रमानाथ[6]। 'वानरऋक्षयोनिआंत । शरीरें धरा अत्यद्भुत । लंकानाथ वधावया. ॥ ५२ ॥ राज्य करी राक्षसपाळ । युगचौकड्या तेरा वेळ । लोटल्या त्याची असंख्या [7]प्रबळ । [8]बावन्नयुगें मनुष्याचीं. ॥ ५६ ॥ पांच कोटी संवत्सर । एक लक्ष साठ सहस्र । इतकीं वर्षें वर

---

१ बळें २ सामर्थ्य आलें; स्वामित्व केलें. ३ मद्यमांस. ४ मदें. ५ काम करिती. ६ अमरनाथ. ७ केवळ. ८ एकसष्ट.

निर्जर । कारागृहीं आदुष्टान्वयें.[1] ॥ ५४ ॥ भोगिताती नाना क्लेश । आतां त्याचा करीन नाश । नांव घ्यावया राक्षस । लोकत्रयीं उरेना. ॥ ५५ ॥ मनुष्यरूपातें[2] धरूनी । हा रावण निर्दाळूनी । स्वर्गी सुरांतें स्थापूनी । परिहरीन भूभार. ' ॥ ५६ ॥ चतुर्धा झाली एक तनु । सौमित्र भरत शत्रुघ्नु । पूर्ण अवतार रघुनंदनु,[3] । रामरूपें आगळा. ॥ ५७ ॥ आयोध्यपुरींचा नृपनाथ । पुत्र अजाचा दशरथ । अंगनात्रयीं त्रिवेणीयुक्त । तीर्थराज ज्यापरी. ॥ ५८ ॥ कौसल्येचा एक रघुनाथ । कैकयीचा पुत्र भरत । लक्ष्मणशत्रुघ्न चंद्रादित्य देवी सुमित्रा प्रसवली. ॥ ५९ ॥ गर्भाधानापासूनी जाण । चतुर्दश संस्कार जाले पूर्ण । चतुर्दश विद्या हो आपण । बोळगती तयांतें. ॥ ६० ॥ ताडकासुबाहूचें हनन । सिद्धी नेला ऋषीचा[4] यज्ञ । केलें अहिल्याउद्धरण । चरणस्पर्श करूनी. ॥ ६१ ॥ स्वयंवरीं हरचापखंडण । अपमानिला दशानन । केलें जानकीचें पाणिग्रहण । समस्त राया देखत. ॥ ६२ ॥ मार्गी जिंकिला भृगुपती । जयस्वी[5] पातले अयोध्येप्रति । रायें जाणोनी पुरुषार्थी । राजाभिषेक मांडिला. ॥ ६३ ॥ दुंदुभीनामें गंधर्वनारी । ते मंथरा प्रेरिली सुंदरी । कैकयी बोधोनी कुटिलोत्तरीं । राज्य देई भरतातें. ॥ ६४ ॥ राम सीता सौमित्र गुणी । अरण्यवासा पाठविली तिन्ही । तेथ वसतां रक्षोगणीं । चालविजेल वैरातें. ॥ ६५ ॥ पंचवटिके वसतां पाहा हो । निकटवासें वाढला कलहो । असंख्य राक्षससमूहो । रामहस्तें शमला. ।

---

१ दुष्टाच्या २ 'धरूनी मनुष्य रूपातें । निर्दाळूनी रावणातें । स्वर्गी स्थापूनी सुरांतें । परिहरीन भूभार ॥ '– असा अन्य पाठ. ३ मधूसूदनु. ४ गाधिज. ५ जायेशी.

॥ ६६ ॥ यापरीं साधी देवकाज । प्रतिज्ञा करूनी पातलों कुब्जा । कैकेयींदासी होऊनी वोजा । उपदेशिला कुडा मंत्र. ॥ ६७ ॥ राजा गोंवूनी भाकेतें । म्हणे, 'अभिषेकीं भरतातें । न करितां त्यागीन प्राणातें । [1]तूं असत्यें लिंपलासी. ॥ ६८ ॥ रामसीतालक्ष्मणा । चौदा वर्षे पाठवीं वना । उत्तीर्ण होईं भाकऋणा । सत्यवादी धार्मिक.' ॥ ६९ ॥ वृत्तांत कळला रघुनंदना । राज्य सोडूनी निघाला वना । सवें लक्ष्मण पवित्रांगना । जनकआत्मजा जानकी. ॥ ७० ॥ वना जाता रघुनंदन । दुःखें दशरथें त्यागिले प्राण । रामसीतालक्ष्मण । चित्रकूटीं पातले. ॥ ७१ ॥ राज्य सांडूनी धांवला भरत । तयाचे मस्तकीं ठेविला हात । पादुका घेऊनी स्नेहभरित । नंदिग्रामीं स्थापिल्या. ॥ ७२ ॥ चालतां दंडकारण्यपंथे । विराधें हरिलें जानकीतें । तो मारूनी शस्त्र-घातें । मुक्त केला सुपंथ. ॥ ७३ ॥ शरभंग तपोराशी । देखोनी वंदिला अगस्त्य ऋषी । [2]त्याचिया आज्ञां[3] संगियासी । पंचवटिके पातला. ॥ ७४ ॥ आश्रम करूनी वसतां तेथ । शांब शूर्पणखीचा सुत । काळखड्गार्थ अत्यद्भुत । तपश्चर्या आचरे. ॥ ७५ ॥ त्यावरी वाढि-न्नली तृणाजाळी । शांब लोपला तया तळीं । प्रसन्न होऊनी चंद्रमौळी काळखड्ग पाठविलें. ॥ ७६ ॥ खड्ग प्राप्त होत्या वेळे । लक्ष्मण वेंची तेथें फळें । शस्त्र झेलूनी करतळें, । धारातेज विलोकीं. ॥ ७७ ॥ घावो घालितां वृक्षमूळीं । तुटे शांबाची कंठनाळीं । त्याची शोणित-खळाळीं । भूमि जाली सुरंग. ॥ ७८ ॥ शिरछेद देखतां नयनीं । राक्षस जाणितला लक्ष्मणीं । शत्रुक्षयातें तेथूनी । मूळ जालें विरोधा.

---

१ जरी तूं सत्य लिंपिशी, (लोपिशी). २ राक्षस संगिया निघातेशी । मारूनी पंचवटिके पातला ।. ३ आज्ञे. ४ शांब निवटला तया तळीं. ५ राघवें.

॥ ७९ ॥ माता देखोनी पुत्रघाता । कपटें जाली सुंदर वनिता । 'सौमित्र करीन' म्हणे 'भर्ता' । तें राघवातें चोजविलें. ॥ ८० ॥ संकेत करूनी लक्ष्मणा । तिच्या छेदविलें कर्णघ्राणा । युद्धां येतां खरदूषणा । चौदा सहस्र निवटले. ॥ ८१ ॥ शूर्पणखा स्त्रियांसहित । लंके गेली शोक करीत, । वृत्तांत ऐकोनी लंकानाथ । अत्यद्भुत क्षोभला. ॥ ८२ ॥ मारीच कनकमृगाकृती । गुंफे धाडिले राघवाप्रति । त्याची देखोनी अंग-दीप्ति । लोकदृष्टि वेधल्या. ॥ ८३ ॥ पाहतां हेमकुरंगम । जानकीतें कंचुकीचा काम । म्हणे, 'याचे काढूनी चर्म । मातें देई दयाळा !' ॥ ८४ ॥ धनुष्य बाण धरूनी मुष्टी । राम धाविन्नला मृगापाठी । सौमित्र ठेविला पर्णकुटी । रक्षावया सीतेतें. ॥ ८५ ॥ मायामृग ताडितां शरें । गर्जिन्नला श्रीरामस्वरें । सौमित्रा ! धांव धांव त्वरें । निशाचरीं वधियेलों.' ॥ ८६ ॥ जानकी म्हणे, 'सत्वर धांव' । येरु म्हणे 'राक्षसमाव,' । सीता क्षोभली म्हणे, 'भाव । आजी कळला कपटिया ! ॥ ८७ ॥ राम मारावा[1] राक्षसीं । मातें कपटें भोगूं पहासी, । जळो तुझी भक्ति ऐसी । प्राण देईन पापिष्ठा !' ॥ ८८ ॥ लक्ष्मण पावोनी दुःखा । रक्षणा घातली धनुष्यरेखा, । श्रीराम पाउलांची मार्गभूमिका । लक्षूनी[2] गेला सशोक. ॥ ८९ ॥ दंडी मुंडी काषायवासी । रावण जाला वृद्ध संन्यासी । हस्तें दावूनी जानकीसी । भिक्षा मागे भुकेला. ॥९०॥ फळभिक्षा वोपितां सती । वोढूनी वाहिली पृष्ठीवरुती । वातवेगीं गगनपंथीं । पळता झाला दुरात्मा. ॥ ९१ ॥ दीर्घ स्वरें करीत रुदना, । धांव धांव रघु-

---

१ मारिल्या. २ लक्षीत.

नंदना ! । वेगीं धांव लक्ष्मणा ! । मज रावणें हरियेलें.' ॥ ९२ ॥ करितां साधूंची[1] छळणा । तात्काळ वरपड होईजे विघ्ना । दोष लाविता लक्ष्मणा । दुःखार्णवीं पडियेली. ॥ ९३ ॥ तिचा ऐकोनी शोकशब्द । जीवमात्र हृदय भेद, । पशु पक्षी मानूनी खेद । रुदन करिती आक्रोशें. ॥ ९४ ॥ पर्वतीं स्रवेंती अश्रुधारा । जीवनें सुटती तरुवरां । फुटों[2] पाहे वसुंधरा । दुःखें देखोनी सीतेचीं. ॥ ९५ ॥ विमानयानीं निर्जरदारा । हृदय पिटोनी ताडिती करा । म्हणती, 'क्षयो दशशिरा । शीघ्र हो का या दोषें.' ॥ ९६ ॥ शोक करितां खंजनाक्षी[3] । ऐकोनी कोंपला[4] जटायु पक्षी । पर्वतकुहरांतूनी लक्षी । रावणातें वधावया[5]. ॥ ९७ ॥ उभय पक्षांचा झडझडाट । गर्जनेचा कडकडाट । रोधूनिया रावणवाट[6] । उभा ठेला सन्मुख. ॥ ९८ ॥ म्हणे, 'राक्षसा ! पापभरिता ! । मृत्यु पावसी मैथिली नेतां । दशरथमित्रा मज देखतां । नावें कैसा पाहासी ?' ॥ ९९ ॥ पर्वतप्राय महाबळी । मुकुट हाणोनी पाडिला तळीं । धनुष्य भंगोनी भूतळीं । खंडविखंड पाडियेला. ॥ १०० ॥ नखीं जर्जर केला देह । शरीरीं सुटला रक्तप्रवाह । 'चंचु प्रहारें शीस समूह । छेदीन' म्हणे 'एकदां' ॥ १०१ ॥ बळ अद्‌भुत देखोनी दृष्टी । रावणा भय न सांठवे पोटीं । म्हणे, 'हे सांडूनी संकटीं । प्राण रक्षूनी पळावें.' ॥१०२॥ मग म्हणे,[7] 'रामभक्ता ! ऐक वचना । प्रकट करूनी उभय मरणां । निर्वाण झुंज झुंजो जाणां । इच्छा पुरे दोहींची ॥ १०३ ॥ करितां अंगुष्ठछेदन । आम्हां राक्षसा तात्काळ

---

१ साधु पुरुषांची. २ फुटती. ३ मृगशावाक्षी. ४ पातला. ५ धरावया. ६ गगनवाट. ७ मग रावण म्हणे वचना.

मरण ' । पक्षी म्हणे, ' पक्षखंडन । होतां निधन आमुतें ' ॥१०४॥ अंगुष्ठ छेदितां पक्षधरें, । पक्ष छेदिले दशकंधरें । पर्वत पडे वज्रप्रहारें । तेंवीं पडला भूतळीं ॥ १०५ ॥ रुत्ता ताडी हृदयावरी । [1]बहुत पीडिलें हा काळवरी । रामस्मरणें दीर्घ स्वरीं । [2]महापक्षी पडियेला ॥१०६॥ सीता वाहूनियां स्कंधीं । राक्षस संचरें [3]गगनपंथीं । मातंग पर्वताचे संधी । पांच वानर देखिले. ॥ १०७ ॥ त्यावरी सीतेनें टाकिले अलंकार । वरुते पाहातीं वानर वीर । कोपें कोपला वायुकुमर । धाविन्नला धरावया. ॥ १०८ ॥ म्हणे, ' मारूनी दुराचारी । सोडवूं समर्थाची नारी । धरूनी नेतो बलात्कारीं । तो दंडीन स्वहस्तें.' ॥१०९॥ [4]उडोनी भेदोनी गेला अर्का, । रावण पळाला प्राणधाका । समुद्र लंघोनी हेमलंका । मनोंवेगें [5]टांकिली. ॥ ११० ॥ राक्षस न सांपडेचि हातीं । हनुमान् पावला संगियाप्रति । म्हणे, ' मी करीन याची शांती, । लंके जाऊनी एकदां. ' ॥ १११ ॥ रावणें मानूनी कृतकृत्यता अशोकवनीं रक्षिली सीता । नाना उपायीं प्रबोधितां । तो सर्वथा न बोधे. ॥ ११२ ॥ शापिला असें नलकूबरें । ' परस्त्री भोगितां बलात्कारें । भूमी तुटोनी पडती शिरें ' । तें भय असे मानसीं. ॥ ११३ ॥ यालागीं न करीं बलात्कार । चित्त नेदितसे सामउपचार । मुक्ति न लभे दंभाचार । तेवीं प्रयत्न असाध्य. ॥११४॥ येरीकडे राजा राम । मृग वधूनी काढी चर्म । सौमित्र भेटतां दिधले क्षेम । खेदभूत जाणोनी. ॥ ११५॥ लगबगां गांठिली पर्णकुटी । तंव लावण्यदीपिका न दिसे दृष्टी । शोकांधकार भरला सृष्टी ।

---

१ पीडा पावला पक्षिगिरी. २ दीर्घशरीरी. ३ नक्षत्रपदी. ४ उड्डाण. ५ गांठिली.

सीतेविण श्रीरामातें. ॥ ११६ ॥ अवलोकीत दाही दिशा । डोळां न दिसे ते मृगडोळसा । पृथ्वी आप तेज आकाशा । प्रिया पुसे पवनातें ॥ ११७ ॥ वृक्षवल्लीतृणपाषाणा । अंगना पुसे गंगाजीवना । सर्पा पक्षियां करीना हरिणा । सिंहव्याघ्रा विचारी. ॥ ११८ ॥ जानकीवियोगें जाला वेडा । 'सीते ! सीते !' म्हणउनी कवळी झाडा । चंद्रासि म्हणे, 'रे ! मार्तंडा ! । उष्ण खंडतर सावरीं.' ॥ ११९ ॥ सैरावैरा धांवता वनीं । कोठें न दिसे लावण्यखाणी, । जटायु पडला जिये धरणी । तया ठायीं पातले. ॥ १२० ॥ आलिंगूनी जटायूतें । रुदन कीजे श्रीरघुनाथें । म्हणे, 'सीताहरणाहूनी मातें । दुःख आगळें मित्राचें. ॥ १२१ ॥ 'दुष्टें नेली रावणें सीता । कपटें केलें माझिया घाता.' । रामचरणीं ठेवूनी माथा । प्राण त्यानें त्यागिला. ॥ १२२ ॥ रामआज्ञेनें पुष्पक विमान । घेऊनी आले विष्णुगण । जटायूतें कृपेकरून वैकुंठधामा धाडियेलें. ॥ १२३ ॥ पुढें चालिला जगजेठी । तंव कबंधें कवळिलें दोहीं बाहुटीं । बाहू छेदूनी पाहती दृष्टी । तंव तो विशाळ राक्षस. ॥ १२४ ॥ हृदयावरी विक्राळ वदन । एक एक बाहू शत योजन । सांपडे ते हो ! कवळून । मुखीं घाली सत्वर. ॥ १२५ ॥ अवलोकितां अवनिजानाहो । राक्षस पावला दिव्य देहो । देवयानारूढ पहा हो ! । स्वर्गलोका चालिला. ॥ १२६ ॥ जातां विनवी श्रीरघुनाथा, । 'जावें ऋष्यमूक पर्वता । सुग्रीव भेटतां सर्व चिंता । परिहरेल निर्धारें.' ॥ १२७ ॥ पुढें पंपे पातला रघुपती । तंव भेटला हरि मारुती । राम आलिंगूनां प्रीती ।

१ सत्वर. २ आरूढ करून. ३ एक.

म्हणे, 'हा अवतार हराचा.' ॥ १२८ ॥ म्हणे, हा आमुचा प्राणदाता। संकटीं आमुतें रक्षिता.' । एक पिंड हेही कथा। तो सर्वज्ञ स्वयें जाणे. ॥ १२९ ॥ त्वरें जाऊनी हनुमंत। नळनीळ जांबवंत। तिघांसहित वानरनाथ। सुग्रीव भेटी आणिला. ॥ १३० ॥ नरवानरां पडली गांठी। स्नेहानंदें कोंदली सृष्टी। पिंडप्राण [1]प्रेमें मिठी तेंवी मित्रता बाणली. ॥ १३१ ॥ रामचरणीं ठेवूनी माथा। सुग्रीव सांगे दुःखावस्था। 'तुज देखिल्या श्रीरघुनाथा। दुःखदारिद्र पै नाशलें. ॥ १३२ ॥ वाली माझा जेष्ठ बंधू। तेणें हरिली रुमा वधू। राज्य हरोनी दुःखखेदु। अरण्यवास भोगवी. ॥ १३३ ॥ माझी हरेल दुःखावस्था। तेचि क्षणीं आणीन सीता'। ऐकोनी आवेश रघुनाथा। अत्यद्भुत नावरे ॥ १३४ ॥ बाण लाउनी कोंदडीं। म्हणे, 'युद्धास वाळी काढीं। प्राणशरीरांची जोडी। विखंडीन क्षणार्धें.' ॥ १३५ ॥ सुग्रीव करी वरिगर्जना। वाळी पातला युद्धकंदना। मेरुमांदाराची तुळना। भिडतां भासे दोहींतें. ॥ १३६ ॥ सहस्र मारिले पर्वत। शिळा पादप असंख्यात। दोघांचेंही बळ अद्भुत। एकमेकां नाटोपती. ॥ १३७ ॥ हें देखिलें रघुनंदनें। हृदय भेदिलें तीक्ष्ण बाणें। वज्रप्रहारें सहस्रनयनें। महापर्वत ज्यापरी. ॥ १३८ ॥ रामबाणें देह त्यागून। शक्रशरीरीं प्रवेशे प्राण। [2]सागरोदकीं गंगाजीवन। जेंवी मिळे समरसें. ॥ १३९ ॥ अंगद निरखूनियां देखा। वाळी गेला विष्णुलोका। तारा किष्किंधाकपिनायका। सुग्रीवातें अर्पिली. ॥ १४० ॥ उत्तरक्रियेनंतरें गुणी। सुग्रीव स्थापिला राजासनीं। तंव मेघमाला मांडल्या गगनीं। वर्षाकाल पातला. ॥ १४१ ॥

---

१ जेंवी २ सागरीं.

चतुर्मासामाजी रघुनाथ । माल्यवंता पर्वताआंत । वसता झाला बंधूसहित । निकट हनुमंत दास्यत्वा. ॥ १४२ ॥ रामकार्य जाणोनी पोटीं । कार्तिकमासीं पातला भेटीं । सुग्रीव आज्ञेनें कोट्यानुकोटी । ऋक्षवानर पातले. ॥१४३॥ मासमासाचा[1] अवधी । वानर धाडिले सीताशुद्धी । स्वर्गपाताळ शोधूनी । 'शुद्धी नाहीं' म्हणोनी सांगती. ॥ १४४ ॥ मुद्रिका देऊनी रघुनाथ । दक्षिणे धाडी हनुमंत । अंगदनळनीळजांबवंत । हेही संगे दीधले. ॥१४५॥ दोन मास क्रमितां वाटे । सीताशुद्धि न कळे कोठें । तापसीं बीळ शोधूनी कष्टें । समुद्रतीरा पातले. ॥ १४६ ॥ दुःखें प्राण त्यागितां सकळीं । संपाती पक्षी पातला जवळीं । तो म्हणे, 'लंकें जनकबाळीं । अशोकवनीं दिसताहे. ॥ १४७ ॥ समुद्र योजनें एक शतें । उडोनी जाईल गगनपंथे । सीतादर्शन होईल त्यातें । लंकेमाजी निर्धारें.' ॥१४८॥ धैर्य न धरवे प्लवंगमां म्हणती, 'उलंघवे समुद्रसीमा । मनपवनगरुडोत्तमा— । वांचूनी चौथा न देखों.' ॥ १४९ ॥ ऐकोनी आवेश अंजनीसुता । वळघला महेंद्रपर्वतमाथां । उत्तर दिशे उगवे सविता । तेंवी भासे सुरांतें. ॥१५०॥ उड्डाण कारितां महाबळी । पर्वत उडाले अंतराळीं । चक्रप्राय हो! महीतळीं । वायु भोंवे गरगरां. ॥१५१॥ सिंहिका संहारिली प्रबळ । सुखी[2] केले वीर सकळ । मैनाचळाचेंही मौळ । पादांगुष्टें लोटिले. ॥ १५२ ॥ क्रौंच मारिला पडलंके[3] । शोधन करितां मुख्य लंके । अशोकवनीं हेमकलिके । रामांगने देखिलें. ॥ १५३ ॥ खूणे वोपिली राममुद्रा । वरद वदे श्रीरामभद्रा । चूडामणी रामचंद्रा । प्रत्ययातें दीधला. ॥ १५४ ॥

१ पांच मासांचा. २ लभे. ३ सुरसा केली विकळ.

किंकर वनकर जंबुमाळी । अखया कुमर त्राहाटिला पौळी । इंद्राजित दडाला बिळीं । केली होळी लंकेची. ॥१५५॥ समुद्र लंघोनी पातला पुढती । संगिये भेटले परम प्रीती । जयानंदे कोंदली त्रिजगती । घोषें कारिती गर्जना. ॥१५६॥ वारितां निघाले मधुवनीं । मत्त जाले मदिरा-पानीं । उड्डाणें किराणें घेती गगनीं । कार्य साधिलें म्हणोनी. ॥ १५७ ॥ श्रीराम सांगे ताराधीश, । 'हा कार्यसिद्धीचा गर्जना-घोष.' । राघव म्हणे, निज मानस । मजही साक्ष देतसे.' ॥ १५८ ॥ समीप येऊनी प्लवंगमीं । लोटांगणें घातली भूमी । टाळी लावूनी रामनामीं । जयजयकारें गर्जती. ॥ १५९ ॥ 'सीता देखिली लंके' । अवघे गर्जना करिती मुखें । आवडी उठोनी रघुनायकें । आलिंगिलें समस्तां. ॥ १६० ॥ पुढें ठेवितां चूडा-मणी । श्रीरामा आठविलीं तिन्ही । पिता माता महीनंदिनी । जेंवीं कां भेटो पातलीं. ॥ १६१॥ सुग्रीवा आज्ञापी रघुराजु, । 'दळे चालवा लंके उजु । समुद्रतीरा वानरफौजु । आजी पातली पाहिजे' ॥१६२॥[1] श्वेतलोहितपीतवर्ण । हरितकपिलाचित्रवर्ण । एकैक रंगी वानरगण । सहस्रकोटी न गणवे. ॥ १६३ ॥ हनुमंतपृष्ठीवरी रघुनाथ । अंगदस्कंधीं सुमित्रासुत । अस्ता करितां दिननाथ । समुद्रतीरा पातले. ॥ १६४ ॥ 'सीता देऊनी वांचवीं प्राण' । रावणा सांगे बिभीषण । बोलतां क्षोभला दारुण । बंधु चरणें ताडिला. ॥ १६५ ॥ सांडूनी सुहृन्मित्रजना । शरण आला रघुनंदना । घेऊनी चत्वार प्रधाना । उत्तरतीरा पातला. ॥ १६६ ॥ मस्तक ठेवितां रामचरणीं । 'चिरंजीव' वदे[3] वदनीं । 'रावण वधिल्या लंकाभुवनीं । तूंचि

---

१ हरिखें. २ कृष्ण. ३ वदे श्रीराम वदनी.

वेगीं । अंगद उडाला गगनमार्गीं । सुवर्णमंडप सहस्रशृंगी । मस्तकावरी नेतसे. ॥ १८१ ॥ बाहु झाडितां महाबळीं । राक्षस पडले समुद्रजळीं, । मंडप ठेवूनी सुवेळाचळीं । रामचरण वंदिले. ॥१८२॥ शिष्टाई न मानी रावण । ऐकोनी कोपला रघुनंदन । भुभुःकारूनी वानरगण । लंकेलागीं लागले. ॥ १८३ ॥ लागवेगीं भिडतां दुर्गीं । कर्णाटकयंत्र गंधक आगी । वर्षतां वाटे काळमेघीं । जेंवीं सुटती जलधारा. ॥ १८४ ॥ उल्हाटशक्तीचे पाषाण । गदामुद्गल लहुडी बाण । शूळभिंदिपाळें रक्षोगण । असंख्यात ताडिले. ॥ १८५ ॥ टाळूनी यंत्रमुखींचे मार । गगनींहूनी वानरवीर । वृक्षपाषाण-गिरीवर । राक्षसमाथां टाकिती. ॥ १८६ ॥ तेणें चूर्ण होतीं यंत्रें । समस्त राक्षसांचीं भंगोनी गात्रें । विशाळ पसरूनियां वक्त्रें । प्रेतें पडलीं भूतटीं. ॥ १८७ ॥ रथ पदाति अश्व करटी । गणित पहातां कोटिच्या कोटी । वीरवाद्यें गर्जतां सृष्टी । महाप्रळयो मांडला. ॥ १८८ ॥ निशाचर वानर थोर । संग्राम माजला घोरतर । जैसे पूर्वी सुरासुर । तारकसमयीं माजलें. ॥१८९॥ अठरा पद्में मुख्य झुंजार । युद्धा मिसळले ऋक्ष वानर । अक्षोहिणी सात[1] सहस्र । राक्षससेना दाटली. ॥ १९० ॥ राक्षस-वानरांच्या कोटी । प्रेतें पडलीं पृथ्वीतटीं । रक्तसिंधूचिये लोटीं । क्षीरसिंधु[2] डहुळला. ॥ १९१ ॥ धूम्राक्ष आणि अकंपन । हनूमंतहस्तें पावले मरण । वज्रदंष्ट्र महा दारुण । वालिपुत्रें वधियेला. ॥ १९२ ॥ प्रहस्त प्रधान मारिला नळें । हर्षें नाचती गोलांगुळें, । कोपोनी राक्षसपाळें । कुंभकर्ण उठविला. ॥ १९३ ॥ रणा येतां काळकोपी

---

१ शत २ क्षार.

चवदा सहस्र गिळिले कपी । सुग्रीव धरूनी साक्षेपीं । कक्षापुटीं दाटला. ॥ १९४ ॥ कक्षेहूनी जो निसटला । कर्ण घ्राण घेऊनी गेला । राक्षसें क्षोभोनी मांडिला । महाप्रळय संग्रामीं. ॥ १९५ ॥ रामें सोडोनी दोन बाण । बाहू उडविले छेदून । पाठीं विखंडिले दोन्ही चरण । काळनाराचें कर्कशें. ॥ १९६ ॥ सर्वेची विंधोनी बाण एक । गगना उडविला मस्तक । तें देखोनी सूर्य-शशांक । नभ सांडूनी पळाले. ॥ १९७ ॥ कुंभकर्ण पडला समरीं । प्रळयो मांडला लंकापुरीं । पुढती संग्राम निशाचरीं । झोटधरणी मांडिली. ॥ १९८ ॥ कुंभनिकुंभ संग्रामदक्ष । देवांतक नरांतक मकराक्ष । बलिष्ठ महोदर विरूपाक्ष । सूड घ्यावया पातले. ॥ १९९ ॥ जैसा योगनिष्ठ पुरुष । अरिषड्वर्ग करी नाश । तेंवी सातही राक्षस । पवनात्मजें मारिले. ॥ २०० ॥ सहस्र वारूंनीं जुंपिला रथ । वरी अतिकाय रावणसुत । सौमित्राप्रति रणपंडित । संग्राम करूं पातला. ॥ २०१ ॥ अस्त्रें सोडिलीं दारुणें । तितुकीं खंडिलीं बळसंपन्नें । जेंवी जैनांची वादवचनें । वेदांती अवगणीं. ॥ २०२ ॥ मग सोडूनियां वरद बाणा । शिर उडविलें गगना । ओवाळूनी सहस्रकिरणा । प्रसाद वोपी भूतांतें. ॥ २०३ ॥ इंद्र जिंकोनीं इंद्राजित । रावणाचा ज्येष्ठ सुत । ज्याचे दृष्टी काळ कृतांत । तृणप्राय संग्रामीं. ॥२०४॥ तेणें करूनि बाणवृष्टी । वानर पाडिले सात कोटी । द्रोणाचळाचे वात पृष्टीं । उठावले पिंगाक्षें. ॥ २०५ ॥ श्रीरामसौमित्र गुणैकराशीं । विंधोनी बांधिले नागपाशीं । नारदें गरुडमंत्र उप-देशीं । मुक्त केले समर्थें. ॥ २०६ ॥ निकुंबळेसीं करितां होम ।

---

१ तळीं. २ वाचविले हनुमंतें.

पावकें देतां रथ उत्तम । विघ्न करी प्लवंगम । तिहीं याग भंगिला. ॥ २०७ ॥ संग्राम माजला अत्यद्भुत । क्षणैक प्रकट क्षणैक गुप्त । मही निराळे नभा आंत । दिसे न दिसे मायावी. ॥ २०८ ॥ सर्व शस्त्रें सर्व अस्त्रें । सौमित्रा ताडितां अमित्रें । सौमित्रें वरदमंत्रें । त्या पवित्रें वारिलीं ॥ २०९ ॥ मग अनुवादे प्रमाणनेमा, । ' श्रीराम विष्णु जानकी रमा । मी ब्रह्मचारी तरी अधमा । मृत्यु हो कां या बाणें. ' ॥ २१० ॥ शरसंधानें शिर निवटी । तें धडा लागुनीं मागुतें उठी । धनुष्य बाण धरूनी मुष्टी । युद्ध करी सत्राणें. ॥२११॥ शिरकमळ छेदूनी बाणीं । वायुचक्रीं सूदलें गगनीं । तळीं रुंड पाडलें धरणी । खंडविखंड करूनियां. ॥ २१२ ॥ रोमसंख्य भेदले बाण । तेणें सौमित्राचा विकळ प्राण । रामें देऊनी आलिंगन । अजरामर तो केला. ॥ २१३ ॥ रावणें विचारूनी चित्तीं । सौमित्रा-वरी टाकिली शक्ती । हृदयभेद जालिया क्षिती । प्रेतप्राय पडियला. ॥ २१४ ॥ वांचवावया त्याचा प्राण । औषधी सांगे वैद्य सुषेण, । ' द्रोणाचल लंकेहून । चार कोटी योजनें. ॥ २१५ ॥ रात्रींत आणाल पर्वत । तरीं वांचवीन सुमित्रासुत. ' । ऐकोनी प्रतापी हनुमंत । मनोवेगें धाविन्नला. ॥ २१६ ॥ कालनेमी निशाचर । चौदा सहस्र विद्याधर । मारूनी रात्रींतून गिरीवर । लंकाद्वीपीं आणिला. ॥ २१७ ॥ घायीं पिळूनी औषधीरस । वांचविला तो प्रत्यक्ष प्रतापी शेष । मागुता नुगवतांच दिवस । गिरी ठेवूनी पातला. ॥ २१८ ॥ रावण पेटला घोर संग्रामा । म्हणे, ' मी मारीन रामा. ' । दहा कोटी प्लवंगमां । समरांगणीं पाडिलें. ॥ २१९ ॥ हें देखोनी रघुनंदनें । मारिलें त्याचें घ्यावया उसनें । परदळ

मारिलें तें गणने । करितां कोणा न करवे. ॥ २२० ॥ दहा सहस्र मत्त हस्ती । लक्ष एक अश्वजाती । पन्नास सहस्र वीर रथी । पदाति एक अर्बुद. ॥ २२१ ॥ इतुकी सेना पडतां रणीं । कबंध एक नाचे धरणीं । कोटि कबंध नाचतां ध्वनी । धनुष्यघंटाझणत्कारें. ॥ २२२ ॥ चतुर्दश घंटा एकें हारी । घणघणाट दिवसभरी । वाजिन्नल्या ते संख्या चतुरीं । विचारिली पाहिजे. ॥ २२३ ॥ चंद्रबाण सोडूनी रामें । छेदिलीं दहाही शिरपद्में । तंव मागुती अतिउत्तमें । पूर्वीलिया ऐशीं निघालीं. ॥ २२४ ॥ पाशुपत प्रेरूनी प्रौढी । शिरें निघती तीं छेदूनी सांडी । लक्ष संख्या जालिया वाढी । खंडतां मार्ग दिसेना. ॥ २२५ ॥ मातली वर्म सांगे देवा, । 'हृदयीं असे अमृतकुपीठेवा । ते ब्रम्हास्त्रें भेदिलिया श्रीराघवा ! । शीसवल्ली खंडेल.' ॥ २२६ ॥ अगस्त्यऋषीचा वरद बाण । धनुष्यीं जोडी रघुनंदन । तया मुखीं हुताशन । आणि भास्कर स्थापिला. ॥ २२७ ॥ पुच्छीं ठेविला प्रलयानळ । अष्ट कांडीं लोकपाळ । तो सोडितां ब्रम्हगोल । भंगला वाटे सुरांतें. ॥ २२८ ॥ हृदयीं लागतां कडकडाटी । निस्तेज पडिला पृथ्वीतटीं । प्राण प्रवेशला वैकुंठीं । विष्णुस्मरणें करूनियां. ॥२२९ ॥ जेंवीं कां तापला लोहगोळ । यंत्रमुखीं सुटतां प्रबळ । लागतां भेदूनी वक्षःस्थळ । छिद्र पाडी ज्यापरी. ॥ २३० ॥ तेंवी रावण भेदिला उरीं। प्रेत पडलें धरणीवरी । तें देखोनी उभय करीं । शंख करिती राक्षस. ॥ २३१ ॥ वज्रें ताडिता वज्रधरें । खचतीं पर्वतांचीं शिखरें । तेंवीं दशशिराचीं शिरें । रणमंडळीं लोळतीं. ॥ २३२ ॥ शोणिताचा शोणभद्र ।

1 झणत्कारी.

मिळतां लोपला जलसमुद्र । सकळ सुरांसहित इंद्र । हर्षें टाळी पिटीत. ॥२३३॥ जयजयकार करूनी सुर । भूतळीं सोडिती पुष्पभार । विजयी जाला रामचंद्र । धेंडे पिटले तिहीं लोकीं. ॥ २३४ ॥ शंकर ब्रह्मा इंद्र वरुण । चंद्र सूर्य शमन पवन । स्पर्शोनी श्रीरामचरण । म्हणती, 'निर्दोष जानकी.' ॥२३५॥ जीं जीं जयांची ऐश्वर्यपदें । तीं देऊनियां पूजिलीं देववृंदें । 'निर्दोष जानकी' जातवेदें । प्रमाण करूनी बोलिजे. ॥ २३६ ॥ मूर्तिमंत चारी वेद । मुखें बोलती प्रमाणशब्द । 'जगन्माता जानकी शुद्ध' । साक्ष आम्ही त्रिवाचा. ॥ २३७ ॥ अग्निस्नान करूनी पुढती । शुचिर्भूत पवित्र सती । नमस्कारितां प्राणपती । कृपामूर्ति कळवळली. ॥ २३८ ॥ क्षेम देतां परम प्रीती । सकळ दुःखशोकशांती । लक्ष्मी पातल्या गृहाप्रती । दारिद्र्य कोठें दिसेना. ॥ २३९ ॥ दिनकर आलिया मंदिरा । ठाव न दिसे अंधकारा । टाकिल्या अमृतसागरा । मरणभय केउतें ? ॥ २४० ॥ जालिया अनुभवज्ञान । कैचें भवभयाचें भान । तेंवी भेटतां रघुनंदन । सर्व दुःख विसरली. ॥ २४१ ॥ होतां शिवशक्तीशीं मेळ । हरिखें कोंदला ब्रम्हगोळ । जाला सुखाचा सुकाळ । तिहीं लोकीं न सांठे. ॥ २४२ ॥ पाहूनी अमृताचा घन । जे जे रणीं पावले मरण । [1]तेते उठविले, वसंतानें । जेंवी कां वृक्ष फुटती. ॥ २४३ ॥ स्वहस्तें कोंदडपाणी । बिभीषण बैसवीला राजासनीं । अक्षय्य वदे वरद वाणी । जे कल्पांतीं न मोडे. ॥ २४४ ॥ 'जंववरी चंद्र सूर्य गगनीं, । गंगा आणि गौतमी धरणी, । माझी कथा रामायणीं ।

---

१ 'ते ते उठविले नयन । सुखामृतें पूर्ण झाले' ॥ २ 'गंगा गौतमी आणि धरणी'।

तिहीं भुवनीं वाखाणे. ॥ २४५ ॥ तंववरी लंकेचा भूपाळ । तू अक्षयी अनंतकाळ, । लया गेलिया ब्रह्मगोल । तूं अक्षयी मम आज्ञा.१ ॥ २४६ ॥ आवडी अवनिजा तन्वंगी । प्रीती बैसविली अर्धांगीं । सुग्रीव बिभीषण घेऊनी संगीं । अयोध्यापुरा चालिले. ॥ २४७ ॥ दिव्य विमानीं दोन्ही कटकें । दुंदुभी लाविल्या कौतुकें । जानकीलागीं स्वहस्तकें । आला मार्ग दाखवी. ॥ २४८ ॥ सेतुबंध धनुष्यकोटी । किष्किंधा ऋष्यमूक पंचवटी । भरत शत्रुघ्न पातले भेटी । चित्रकूटाचिया ठाया ॥ २४९ ॥ गंगायमुना मध्य बेटीं । पवित्र प्रयाग पाहे दृष्टीं । भारद्वाजा भेटोनी, भेटी । गुह्यकाचे पातला. ॥ २५० ॥ गुह्यक झाला आनंदभरित । पुढें पाठविला हनूमंत । नंदिग्रामीं बंधु भरत । ऐकतां सन्मुख धाविन्नला. ॥२५१॥ सृष्टी रचितां चतुरानन । बंधु एक भरत जाण । दुजे कुंतीचे नंदन । पांचही जण हे तुम्ही. ॥ २५२ ॥ तिसरी बोलावया गोष्टी । बंधुत्व न दिसे ब्रह्मसृष्टीं । धर्म म्हणे, ' कृपा दृष्टी । सेवा फळें साधूचीं. ' ॥ २५३ ॥ असो. भरतभेटीचा जाणा । परम आल्हाद रघुनंदना । जिवाशिवाची ही तुलना । उणी वाटे ते ठायीं. ॥ २५४ ॥ अयोध्यापुरा धांवले दूत । वसिष्ठ माता प्रधान भृत्य । प्रजा पातल्या समस्त । रामभेटी आवडी. ॥ २५५ ॥ देव ऋषींचिया कोटी । पृथ्वीपाळ पातले भेटी, । राम राजा अयोध्यापट्टीं । अभिषेकिला समस्तीं. ॥ २५६ ॥ सिद्ध आशीर्वाद देती, । भाट ब्रिदावली पढती, । युगानयुगीं रामकीर्ती । विस्तारली प्रतापे. ॥ २५७ ॥ अर्पूनियां वस्त्राभरण । लंके धाडिला बिभीषण । वानरांशीं रविनंदन ।

१ लोकत्रयीं.

बोळविला किष्किंधे. ॥ २५८ ॥ हनूमंता कवळोनी हृदयीं । म्हणे, ' मृत्यु बांधिला तुझ्या पायीं, । कोटि कल्प अचळ देहीं । कौतुक पाहीं सृष्टीचें. ॥ २५९ ॥ मी असे तंव असे जवळा । मजहूनी होशी तूं आगळा । तुझी मूर्ति हृदयकमळा- । माजी अचल धरिली असे. ' ॥ २६० ॥ हनुमंत म्हणे, ' न कळे मातें । तुझें तूंचि जाणसी निरुतें । माझें मीपण करूनियां परतें । चित्त वसो तव पायीं. ' ॥ २६१ ॥ अकरा सहस्र वर्षे वरी । राज्य केलें अयोध्यापुरीं । विमान वाहूनी नगरी । शेखीं नेली वैकुंठा. ॥ २६२ ॥ तैसाचि तूंही धर्मराजा । भरतखंडीं[1] राम दुजा, । जानकी ते द्रुपदात्मजा । पतिव्रता स्वधर्मे. ॥ २६३ ॥ सरले अवदशेचे दिवस । दुष्ट वैरी पावती नाश, । चक्रवर्तीहूनी विशेष । न्यायें पृथ्वी पाळिसी. ॥ २६४ ॥ सैंधवें द्रौपदीतें हरिलें । हे दुर्व्यसन काय केतुलें ? । शतकोटिसंख्य चरित्र कथिलें । या परिहाराचिया लागीं. । ॥ २६५ ॥ धर्मराज हालवी माथा. । ' कायसी पांचाळीची कथा ? ' रामसीतेची अवस्था । ऐकतां दुःख लोपलें. ' ॥ २६६ ॥ धर्मराज पुढती करी प्रश्न । ते परसोत गुरु सज्जन, । ऋषि वदे निरुपण । मुक्तेश्वर कवि वदे. ॥ २६७ ॥

---

## अध्याय सोळावा

धर्म म्हणे, ' सर्वज्ञमूर्ती[2] । पतिव्रता जाल्या[3] बहुती, । त्यांमाजी द्रौपदीचिये पंक्ती । तुके ऐशी सांग पां' ॥ १ ॥ रूपवंत गुणवंत

---

१ भरतवंशीं. २ सर्वज्ञानमूर्ति. ३ ऐकिल्या.

कुलवंत । भ्रतार सेवी सदा निरत । ते भार्यारूपें मूर्तिमंत । महासिद्धी जाण पां. ॥ २ ॥ चिरजीवी पावोनी प्रेमा, । म्हणे चिरजीवी, 'राया ! धर्मा ! । पतिव्रतेचा अगाध महिमा । निरूपीन अवधारीं. ॥ ३ ॥ मद्रदेशीं नरेंद्रोत्तम । अश्वपति हें पवित्र नाम । जयाचे गृहीं नित्य[1] धर्म । वस्तीस असे जाण पां. ॥४॥ जितेंद्रिय सदाचारी । सत्यवादी परोपकारी । भूतदया जया अंतरीं । मूर्तिमंत वसंतसे[2]. ॥५॥ तया नाहीं पुत्रसंतान । चिंताज्वरें व्यापिलें मन, । सावित्रीचें आराधन । तेणें[3] भक्ती मांडिलें. ॥ ६ ॥ दहा लक्ष जप स्मरणी । लक्षें[4] आहुती हव्यवाहनी । स्वल्प आहार अष्टम[5] दिनीं । [6]धेनुदुग्धफळमात्र. ॥ ७ ॥ अष्टादश वर्षें वरी । तपश्चर्या करितां थोरी । प्रत्यक्ष सावित्री सुंदरी । प्रसन्न जाली नृपातें. ॥ ८ ॥ कृपेनें आश्वासूनी राजा । म्हणे, 'हें तपँ[7] कवण्या काजा ? । कवण कामनें[8] भाव तुझा । वेधला असे सांग पां ?' ॥ ९ ॥ राजा म्हणे, 'वेद माते ! । संततिहीन मी कृपासरिते । एक पुत्रफ[9]ळ देई मातें । वंशवृद्धीकारणें' ॥ १० ॥ बोले सावित्री सुशब्दीं, । 'नेम नेमूनी गेला विधी । पुत्रसंतान तव प्रारब्धीं । ये काळीं दिसेना. ॥ ११ ॥ लक्ष्मीसमान गुणवल्ह्राळीं[10] । कन्या लाधशील येणे काळीं । जीचे आख्यान भूमंडळीं । वाखाणितील ऋषिमुखें.' ॥ १२ ॥ ऐसें बोलोनी रायाप्रती । अदृश्य झाली सावित्री भगवती, । संतोष असंतोष चित्तीं । जाहला तेव्हां रायातें. ॥ १३ ॥ स्वल्प काळे हो ! सगर्भा । होती जाली राजवल्लभा ।

---

१ नीति. २ दिसतसे. ३ तपो. ४ लक्ष होमी आंहुती. ५ षष्ठ. ६ धेनुदुग्धपळीमात्र. ७ तप मांडिलें कवण्या. ८ काम. ९ शतपुत्र. १० जाकळती.

कन्या जन्मली प्रत्यक्ष[1] आभा । भास्कराची सुतेज. ॥ १४ ॥ जात-कर्म नामकर्म । करितां झाला नृपसत्तम; । कन्या नोहे ऐश्वर्यद्रुम । दिवसें दिवस वाढला. ॥ १५ ॥ सावित्रीनें दिधलें ललाम । म्हणोनियां तो जनकोत्तम । ' सावित्री ' हें ठेवूनि नाम । स्नेहानंदें पाळित. ॥ १६ ॥ वयें[2] समर्थ देखूनी कुमरी । पिता वरविचार करी, । तीसमान[3] सर्वांपरी ऐसा गुणी दिसेना. ॥ १७ ॥ पिता म्हणे, ' चातुर्यखाणी ! पृथ्वी शोधुमी सर्वगुणी[4] । पुरुषरत्न आपुल्या नयनीं । परीक्षूनी तुवां यावें[5]. ' ॥ १८ ॥ आरूढोनी शिबिकायानीं । वृद्ध पुरोहित प्रधान गुणी । सवें घेऊनी ते सुजाणी । छपन्न देश शोधिले.॥१९॥ द्युमत्सेन राजेश्वर । सत्यवान तयाचा कुमर । मनें भावूनी तो भर्तार । येती जाली स्वदेशा. ॥ २० ॥ अश्वपति आपुल्या सदनीं । असतां[6], पातला नारद मुनी । बैसवूनी कनकासनीं । सर्वोपचारीं पूजिला. ॥ २१ ॥ दृष्टि देखोनी नृपात्मजा । ऋषि म्हणे, महाराजा ! । आळस दिसे विवाहकाजा । तें कां सर्वज्ञा ! सांग पां ? ॥ २२ ॥ राजा म्हणे, ' चतुरेश्वरी । स्वयें गेली वरविचारीं । आली तों[7] वृत्तांत सविस्तरीं । कळला नाहीं आमुतें. ' ॥ २३ ॥ स्वयें विचारी विधिनंदन । वर पाहिला कैसा[9] कोण ? ' । ते म्हणे, ' पवित्र सत्यवान । द्युमत्सेनआत्मज. ॥ २४ ॥ तो एक मानिला माझिया चित्ता ' । तंव तेचिकाळीं दूतीं वार्ता । आणिली, म्हणती, ' अनर्था-माजी पडिला तो नृपवर. ॥ २५ ॥ प्रथमें गेले तयाचे नयन । अंधत्वाचा दोषें[11] गहन । स्पर्धी दायाद मिळोन । राज्य हरिलें तयाचें.

१ जैसी. २ प्रायें. ३ इजसमान. ४ सर्वजनीं. ५ घ्यावें. ६ तंव. ७ कारण ८ या. ९ असें. १० ब्राह्मणी. ११ बलहीन देखोन.

॥ २६ ॥ अंध अक्षम पुत्र गुणी । भार्येसहित दवडिला वनीं । कंदमूलफलाशनीं[१] । वृक्षच्छाये वसतसे.' ॥ २७ ॥ हे ऐकोनी दुश्चित-वार्ता । कन्येलागीं प्रबोधी पिता, । 'सत्यवान त्यजूनी भर्ता । वर आणखी विचारीं.' ॥ २८ ॥ येरी म्हणे, 'न घडे ऐसें । एकदां वरिला जो मानसें । तें मन आणिका स्पर्शे । तो व्यभिचार स्वधर्मीं. ॥ २९ ॥ अभाग्यभाग्याची आभाळें । येती जाती आपुल्या काळें, । निश्चयाचा ध्रुव अचळ । चळत्व सर्वथा न पविजे.' ॥ ३० ॥ नारद म्हणे, 'वो ! गुणवंते । आणिक एक दोष त्यातें[२] । तो मजहूनी आणिकातें । ज्ञात नाहीं जाण पां.' ॥ ३१ ॥ राजा म्हणे, 'ऋषिसत्तमा ! । प्रगट करूनी सांगिजे आम्हां[३] । गूढ, ठेवूनी आम्हां भ्रमा—। माजी न घालो स्वामिया !' ॥ ३२ ॥ [४]नारद म्हणे, लग्नानंतरे । मृत्यु पावेल संवत्सरे.' । हे ऐकूनियां उत्तर । कन्या काय बोलली. ॥ ३३ ॥ येरी म्हणे, 'मी पतिव्रता, । जिणे नाहीं नसतां भर्ता । आजी अथवा वर्षशता । मरणदिवस सारिखा. ॥ ३४ ॥ कृपेनें अवलोकी श्रीहरी । तरी अविवेकाचा विवेक करी; । सुकृत असल्या आपुले पदरीं । सर्व अरिष्टें नाशती. ॥ ३५ ॥ मरण पावो तात्कालिक । अथवा वाचो कल्प एक । सत्यवानाविण आणिक । वरणें नाहीं सर्वथा.' ॥ ३६ ॥ निश्चय देखोनी अंतरीं । नारद म्हणे, 'वो ! धन्य कुमरी, । सत्यवानातेंचि वरीं । सकळ कल्याण मी कर्ता. ॥३७॥ [५]ओळखोनी कन्येचें चित्त । घेऊनी सामग्री

---

१ वल्कलवासी तृणास्तरणी. २ असें त्याते. ३ मन. ४ 'नारद बोले सत्योत्तर । लोटल्या एक संवत्सर । मृत्यु पावेल वरिला वर । हा निर्धार जाण पां ॥' असा या ओंवीचा अन्य पाठ. ५ जाणोनी कन्येचा भावार्थ.

समस्त। वना पातला नृपनाथ। द्युमत्सेना जवळिकें. ॥३८॥ जो दारिद्र्याभिभूत मध्यारण्यीं। शालवृक्षपर्णसदनीं। वल्कलवासी[1] तृणास्तरणीं। वसे दारापुत्रेशीं. ॥ ३९ ॥ यासी जाणवी वृत्तांत। द्युमत्सेन विनंती करित, ।'आमुची दशा हे समस्त। जाणसी कीं सुजाणा? ॥ ४० ॥ नगर देश राज्यसंपत्ती। वैरी हिरोनी वनाप्रती। अंधदशापुत्रभार्येसाहितीं। दरिद्रदानें दवडिलें. ॥४१॥ दृष्टी जाऊनी झालो अंध,। लक्ष्मीविण जालों मंद,[2]। शाकमूलफलजलकंद। सेवूनी काळ कंठितसें. ॥४२॥ आपणा समान होयें[3] महाराजा[3]। त्या घरीं वोपीं सुगुणी आत्मजा,। मातें देखोनी भाव तुझा। विकृति न पवे कैसेनी'? ॥ ४३ ॥ अश्वपतीनें प्रार्थिलें. 'हें साचार। सत्यवानावांचूनी वर। कन्या न करीं[4] हा निर्धार। निश्चयेशीं जाण पां.' ॥४४॥ वोपूनी संपदा कोटि वरी। सत्यवानातें दिधली कुमरी,। कन्या ठेवूनी वनगव्हरीं। राजा नगरा पातला. ॥ ४५ ॥ ती त्यागूनी वस्त्राभरणें। धरिती झाली वल्कलवसनें। ताडपत्रें श्वेतवर्णें। प्रीती कर्णीं सूदली. ॥ ४६ ॥ सासूश्वशुरांची शुश्रूषा। ईश्वरातुल्य मानी पुरुषा। कुटुंबामाजी अनारिसा। विषम भाव न दाखवी. ॥ ४७ ॥ दासीदासांचे प्रतिपालन। अवघियां पाठीं करी शयन,। सकळां आधीं उठे आपण। उषःकाळीं गृहसेवे. ॥ ४८ ॥ अतार विष्णूचे अवयव। तेही नाम विषयीं सर्व। ऐसा मानी अभेदभाव। संतोषवीं[5] पुरुषातें. ॥ ४९ ॥ ब्रह्मीं ठेवूनी ब्रह्मभावना। देवो देवीं रूप जाणा। ब्रह्मनिष्ठ करी भजना। ब्रह्मभावें ज्या परी. ॥ ५० ॥ निशा सरे, तंव नरपार्थिवा।

---

१ कंदमूलफूल सेवूनी. २ अवलक्ष्मीनें केलें मंद. ३ पाहूनी राजा. ४ वरी. ५ समाधान.

॥ २६ ॥ अंध अक्षम पुत्र गुणी । भार्येसहित दवडिला वनीं । कंदमूलफलाशनीं[1] । वृक्षच्छाये बसतसे.' ॥ २७ ॥ हे ऐकोनी दुश्चित-वार्ता । कन्येलागीं प्रबोधी पिता, । 'सत्यवान त्यजूनी भर्ता । वर आणखी विचारीं.' ॥ २८ ॥ येरी म्हणे, 'न घडे ऐसें । एकदां वरिला जो मानसें । तें मन आणिका स्पर्शे । तो व्यभिचार स्वधर्मीं. ॥ २९ ॥ अभाग्यभाग्याची आभाळें । येंती जाती आपुल्या काळें, । निश्चयाचा ध्रुव अचळ । चळत्व सर्वथा न पविजे.' ॥ ३० ॥ नारद म्हणे, 'वो ! गुणवंते । आणिक एक दोष त्यातें[2] । तो मजहूनी आणिकातें । ज्ञात नाहीं जाण पां.' ॥ ३१ ॥ राजा म्हणे, 'ऋषिसत्तमा ! । प्रगट करूनी सांगिजे आम्हां[3] । गूढ ठेवूनी आम्हां भ्रमा– । माजी न घालो स्वामिया !' ॥ ३२ ॥ [4]नारद म्हणे, लग्नानंतरे । मृत्यु पावेल संवत्सरे.' । हे ऐकुनियां उत्तर । कन्या काय बोलली. ॥ ३३ ॥ येरी म्हणे, 'मी पतिव्रता, । जिणे नाहीं नसतां भर्ता । आजी अथवा वर्षशता । मरणदिवस सारिखा. ॥ ३४ ॥ कृपेनें अवलोकी श्रीहरी । तरी अविवेकाचा विवेक करी; । सुकृत असल्या आपुले पदरीं । सर्व अरिष्टें नाशती. ॥ ३५ ॥ मरण पावो तात्कालिक । अथवा वाचो कल्प एक । सत्यवानाविण आणिक । वरणें नाहीं सर्वथा.' ॥ ३६ ॥ निश्चय देखोनी अंतरीं । नारद म्हणे, 'वो ! धन्य कुमरी, । सत्यवानातेंचि वरीं । सकळ कल्याण मी कर्ता. ॥३७॥ ओळखोनी[5] कन्येचें चित्त । घेऊनी सामग्री

---

१ वल्कलवासी तृणास्तरणी. २ असें त्याते. ३ मन. ४ 'नारद बोले सत्योत्तर । लोटल्या एक संवत्सर । मृत्यु पावेल वरिला वर । हा निर्धार जाण पां ॥' असा या ओवीचा अन्य पाठ. ५ जाणोनी कन्येचा भावार्थ.

समस्त। वना पातला नृपनाथ। द्युमत्सेना जवळिकें. ॥३८॥ जो दारिद्र्याभिभूत मध्यारण्यीं। शालवृक्षपर्णसदनीं। वल्कलवासी[1] तृणास्तरणीं। वसे दारापुत्रेंशीं. ॥ ३९ ॥ यासी जाणवी वृत्तांत। द्युमत्सेन विनंती करित, । 'आमुची दशा हे समस्त। जाणसी कीं सुजाणा? ॥ ४० ॥ नगर देश राज्यसंपत्ती। वैरी हिरोनी वनाप्रती। अंधदशापुत्रभार्येसहितीं। दरिद्रदानें दवडिलें. ॥४१॥ दृष्टी जाऊनी झालों अंध,। लक्ष्मी[2]विण जालों मंद,। शाकमूलफलजलकंद। सेवूनी काळ कंठितसें. ॥४२॥ आपणा समान होयें[3] महाराजा। त्या घरीं वोपीं सुगुणी आत्मजा,। मातें देखोनी भाव तुझा। विकृति न पवे कैसेनी'? ॥ ४३ ॥ अश्वपतीनें प्रार्थिलें, 'हें साचार। सत्यवानावांचूनी वर। कन्या न करीं[4] हा निर्धार। निश्चयेंशीं जाण पां.' ॥४४॥ वोपूनी संपदा कोटि वरी। सत्यवानातें दिधली कुमरी,। कन्या ठेवूनी वनगव्हरीं। राजा नगरा पातला. ॥ ४५ ॥ ती त्यागूनी वस्त्राभरणें। धरिती झाली वल्कलवसनें। ताडपत्रें श्वेतवर्णें। प्रीती कर्णी सूदली. ॥ ४६ ॥ सासूश्वशुरांची शुश्रूषा। ईश्वरातुल्य मानी पुरुषा। कुटुंबामाजी अनारिसा। विषम भाव न दाखवी. ॥ ४७ ॥ दासीदासांचे प्रे[5]तिपालन। अवघियां पाठीं करी शयन,। सकळां आधीं उठे आपण। उषःकाळीं गृहसेवे. ॥ ४८॥ अतार विष्णूचे अवयव। तेही आस विषयीं सर्व। ऐसा मानी अभेदभाव। संतोषवी पुरुषातें. ॥ ४९ ॥ ब्रह्मीं ठेवूनी ब्रह्मभावना। देवो देवीं रूप जाणा। ब्रह्मनिष्ठ करी भजना। ब्रह्मभावें ज्या परी. ॥ ५० ॥ निशा सरे, तंव नरपार्थिवा।

---

१ कंदमूलफूल सेवूनी. २ अवलक्ष्मीनें केलें मंद. ३ पाहूनी राजा. ४ वरी. ५ समाधान.

करी पुरुषाची सेवा । दृष्टीं नाणी दरिद्रभावा । सेवासुखें संतुष्ट. ॥ ५१ ॥ नारदें सांगितला दिवस । तो लेखित आली मासोमास, । चत्वार रात्रींचा अवकाश । उरला मृत्युकाळातें. ॥ ५२ ॥ तीन दिवस उपोषण । नेघे फळ मूल अथवा जीवन, । सासरा ह्मणे ' हें निर्वाण । न करी माते ! सर्वथा. ॥ ५३ ॥ कृपेनें आश्वासूनीं राजा । ह्मणे, ' हें तप कवण्या काजा ? । कवण काम तुझा ? । तें सांगावें मजप्रती.' ॥५४॥ ते म्हणे, ' होतां अस्तमाना । फळें भक्षीन तुमची आज्ञा. ' । हें ऐकोनीं सत्यवाना । परम प्रीती प्रियेची. ॥५५॥ फरश घेऊनी हातीं । फळ आणावयाचे आर्तीं । निघता झाला वनाप्रती, । तंव भार्या वारी आग्रहें ॥ ५६ ॥ नायकोनी तिचिया वचना । फळालागीं निघाला वना, । सवें चालली पतिव्रतांगना । पतिमरणा [१]स्मरोनी ॥५७॥ दोघे अटन करितां वनीं । अमृतफळें देखिलीं नयनीं, । [३]भार्या संतोषली मनीं । शुभ सुचिन्हें म्हणोनी. ॥ ५८ ॥ पर्णद्रोण भरिला फळीं । तव अस्ता पातला [४]सहस्रमौळी । प्रिया प्रार्थी तये वेळीं । म्हणे, ' चला स्वामी ! स्वाश्रमा. ' ॥ ५९ ॥ काष्ट मोडितां आंगनेटी । तडाखा बैसला ललाटीं । मूर्च्छा [५]दाटोनी पृथ्वीतटीं । दंडप्राय पहुडला- ॥ ६० ॥ भार्या मस्तक धरोनी अंकीं । हृदय थापुटी मृदु हस्तकीं , । निशा प्रमाण घटिका [६]एकी । तंव प्रहर एक लोटला. ॥ ६१ ॥ तंव रविसमान रविनंदन । वस्त्र वेष्टिलें आरक्तवर्ण । किरीटकुंडलें देदीप्यमान । पदक माळा मेखळा. ॥ ६२ ॥ वामहस्तकीं काळपाश । कवळी लिंगदेहाचा कोश । अंगुष्ठमात्र प्राणपुरूष । [७]आकळोनी

---

१ चरण सेवा. २ जाणोनी. ३ अतिहर्ष झाला मनीं; अति हर्ष अंतःकरणीं. ४ हेलीमौळी. ५ पावूनी. ६ लेखी. ७ आकर्षूनी.

काढिला. ॥ ६३ ॥ घेऊनी चालिला दक्षिण पंथीं। अचेतन काष्ठ ठेविलें क्षिती। पाठोपाठीं चालली सती। धर्मराजा लक्षित. ॥ ६४ ॥ घालूनियां लोटांगण। म्हणे, 'स्वामी! तूं सांग कवण?। तो म्हणे, 'हरी जगाचा प्राण। तो मी जाण यमधर्म. ॥ ६५ ॥ तूं महासती पतिव्रता। म्हणोनी न पाठविलें दूतां,। आंगें येऊनी तव भर्ता। घेवोनिया जातसे ॥ ६६ ॥ आयुष्याचा संग्रह सरला। ऋणानुबंध सहज तुटला,। भ्रतारपिंड असे पडला। तो संस्कारीं वो! पवित्रे!' ॥ ६७ ॥ येरि विनवी करूनी नमन,। 'घेऊनी जाशी पतीचा प्राण,। तुम्हां दोघांतें सोडून। जाऊं कोठें सांग पां?॥ ६८ ॥ पुरुषप्राण ठेविले जेथें। मजही नेऊनी ठेवीं तेथें,। वैधव्य शब्द न शिवे मातें। ऐसें करीं कृपाळुवा! ॥ ६९ ॥ पतीहुनी ईश्वर नाहीं दुजा। ऐसें निश्चय असेल माझा। तरी स्नेह असावा तुझा। प्रसन्न होकां मजप्रती. ॥ ७० ॥ धर्मराजा! तूं पिता माझा। मोहें मानीं मम आत्मजा,। जामात म्हणोनी पुरुष माजा। आप्त भावीं आपुला.' ॥ ७१ ॥ कौतुकें धर्मराज म्हणे,। 'सत्यवान वांचवीं प्राणें। हें भिन्न करूनी सत्यें वचनें। वर एकचि मज माग.' ॥ ७२ ॥ येरी म्हणे, 'द्युमत्सेन। श्वशुर माझा चक्षुहीन। त्यातें देईं दिव्य नयन। कृपे करूनी स्वामिया! ॥ ७३ ॥ दरिद्र दवडोनी दुरी। सर्व संपदा भरा घरीं। हे मज देऊनी प्रथम वरीं। सनाथ करीं स्वामिया!' ॥ ७४ ॥ 'दिधले' म्हणूनी बोले शमन;। 'आतां जाईजे वो! परतोन,। चरणचाली दूरी गमन। घडलें तूतें सुकुमारें! ॥ ७५ ॥ येरी म्हणे, 'तूझिया पायां। सोडूनी जातां पडेल काया,। भ्रतार

१ शव. २ पतिप्राणातें लक्षूनी. ३ पुरला. ४ जरी माझा. ५ एक.

नेशील तया ठाया । मातें नेई स्नेहाळा ! ॥ ७६ ॥ पुत्रमोहें दीन अतिथी । पूजिला असेल एक भक्ती[1] । तरी कृपा उपजो तुमच्या चित्तीं । अनुग्रहो करावया. ' ॥७७॥ हांसोनी बोले विश्वहर्ता, । ' वांचवीं ऐसे न बोलें भर्ता, । या वेगळे आवडे चित्ता । तो दुसरा वर मज माग.' ॥७८॥ ' वैरीं हरूनां राज्यासी । सासरा केला अरण्यवासी । तें स्वराज्य देऊनी त्यासीं । सुखसंतोषीं ठेवावें. ' ॥ ७९ ॥ ' दिधलें ' म्हणे कृपामूर्ती, । आतां परत आलिया पंथीं । परम संतुष्ट तुझिया भक्ती । मी जालोंसें सुशीले ! ' ॥ ८० ॥ पुढती विनवी धर्मराजासी, ॥ ' स्वार्थ नाहीं गा ! मज विशेषीं, । भर्ता[2] जया ठाया नेशी । मजही तेथे त्वां न्यावें. ॥ ८१ ॥ जिता मेलिया वियोग नोहे । ऐसें सर्वथा त्वां करावें, । असत्य शिवलें[3] नसेल जीवें । तरी तुज कृपा उपजो. ॥८२॥ सर्वभूतीं वासुदेवो । ऐसा असेल निश्चित भावो । तरी हें माझे अरिष्ट वावो । तूंचि करिशी दयाळा ! ॥८३॥ सात पावलें सत्संगती । चालता अनुग्रह कीजे संतीं । सप्त जन्मांचीं सुनिश्चिती । दुष्ट कर्मे परिहरती. ॥ ८४ ॥ हांसोनी बोले दयामूर्ती, । ' सत्यवाना वांचवीं पुढती । हें भिन्न करूनी महासती ! । तिसरा वर मज मागें ' ॥८५॥ ' माझा पिता अश्वपती । त्यासीं नाहीं पुत्रसंतती, । शतपुत्र देऊनी मनोआर्ती । पुरवीं त्याची भगवंता ! ' ॥८६॥ ' दिधलें ' म्हणोनी ' उदार हस्तें । आतां जाई संतुष्ट चित्तें, । तुझिया भिडे गोंविलें मातें । पतिव्रते ! सुपवित्रे ! ' ॥ ८७ ॥ ' दुर्भिक्षकाळीं अन्नदान । व्याधिग्रस्तांचें संरक्षण, । केलें असेल तरी तुझें मन । कृपाळु होऊ मजलागीं. ॥ ८८ ॥ गुरुभजन विष्णुस्मरण । हरिहर एकरूपी

१ पंक्ती  २ समर्था.  ३ वदलें.

जाण । [1]इये निश्चयें असेल मन । तरी स्नेहाळ मज होई.' ॥ ८९ ॥ पुढती बोले वरदोत्तर, । 'वांचवी म्हणे निज भर्तार । या वेगळा चतुर्थ वर । माग मातें मन इच्छा.' ॥ ९० ॥ विनयें विनवी वैवस्वता, । 'प्रसन्न मुखें वर वोपितां । वंध्याशब्द माझिये माथा । न [2]बैसे ऐसें करावें. ॥ ९१ ॥ शत पुत्रीं फळीं सुफळ देखा । करीं माझी उदरलतिका, । कृपाळुवा ! सुरनायका ! । संतान-सुख दाखवीं. ॥ ८२ ॥ पितयालागीं दिधला वर, । तैसेचि मातें शत कुमर । द्यावयालागीं मन उदार । केलें तुवां पाहिजे. ॥ ९३ ॥ पुत्रवती सौभाग्यवती । जन्मसावित्री गुणवती । मंगळ-माहेश्वरी म्हणती । उभय लोकीं तें करीं. ॥ ९४ ॥ अनुभवाविण ब्रह्मज्ञान । शरिर जैसें प्राणाविण । संन्यासी आणि ज्ञानहीन । कां निर्धन गृहस्थ. ॥ ९५ ॥ फळाविण पादपलता । जळ नसतां भ्यासुर सरिता । तैसी संततीविण वनिता । शोभाहीन सर्वार्थी. ॥ ९६ ॥ तरावया संसार अपांपति । नौका एक सत्संगति । चारी पुरुषार्थ चारी मुक्ति । दासी होती सत्संगीं. ॥ ९७ ॥ तुझियेसंगे क्रमिलें पंथा । तुजशीं केल्या अमृतवार्ता । अपूर्ण कामें मज [3]समर्था ! । धाडिशीं हें घडेना.' ॥ ९८ ॥ 'दिधलें' म्हणे श्राद्धदेवो, । 'स्वस्थ करीं मानसभावो । टाकूनी जाईं आपला ठावो । विलंब जाला [4]गुणा-लये ! ॥ ९९ ॥ संतुष्ट जालों तुझिये गुणीं । बोलसी तैशी दिसे करणी, । अमृतप्राय तुझी वाणी ! सत्योदकें प्रवाहे. ॥ १०० ॥ दुरी टाकूनी आलीसि स्थळ । पवित्र गोष्टी क्रमिला काळ । [5]प्रेतारपिंडा न शिवे अनळ । ऐसें चिन्ह दिसतसे.'

---

१ या निश्चयीं अचल मन. २ लगे ३ सर्वथा. ४ गुणज्ञे. ५ पुरुषपिंडा.

॥ १०१ ॥ येरी बोले करूनी नमन, । 'स्वमुखें दिधलें वरदान । पुत्रप्राप्ती उपाय कवण । हें तंव कळले पाहिजे !॥ १०२ ॥ 'वांचवीन तव भ्रतार' । ऐसें बोलतां वारंवार । तुवां स्वमुखें दिधला वर । तो अन्यथा होऊं नये. ॥ १०३॥ शत पुत्र वोपिले मजलागीं । तें मानस किंवा पुरुषसंगीं । वैधव्यदशेमाजी जगीं । अश्लाघ्यतेतें नेदिजे.' ॥ १०४ ॥ संकटीं पडला धर्मराज । म्हणे, 'माझिये वचनीं गोंविलें मज, । आतां करूं इच्छिलें काज । एथें अनमान कायसे? ॥ १०५ ॥ दृष्टी देखतां पूर्ण चंद्र । सांडी मर्यादा[1] समुद्र, । तेंवी दक्षिण दिशेचा इंद्र । वरदानीं ओळगला. ॥ १०६ ॥ मग म्हणे, 'रुचे तो अंतरीं । वर पांचवा मागें कुमरी ! । अटक आली सर्वापरी । तरी देईन तुजलागीं.' ॥ १०७ ॥ कर जोडूनी विनवीं मुखीं, । मी न लिंपें वैधव्याचे पंकीं, । ऐसें करावें उभय लोकीं । कृपाळुवा ! जगदीशा !' ॥ १०८ ॥ हस्त ठेवूनियां माथां, । म्हणे,[3] 'तूं माझी धर्मदुहिता, । वांचवीन आतां तव भर्ता । तुज कारणे चिरकाळ' ॥ १०९ ॥ सावित्री म्हणे, 'त्रैलोक्यपती ! । सत्यवानाचें आयुष्य किती ? । प्रकट बोलावें मजप्रती । आपुले मुखें दयाळा'' ॥ ११० ॥ पाणि स्पर्शोनियां माथां । म्हणे,[2] । 'तुष्टलों तुझिया वृत्ता । चिंता सांडूनियां चित्ता । स्वस्थ जाई स्वाश्रमा. ॥ १११ ॥ चारशतें वर्षें वरी । भ्रतारसंगीं पुत्रपौत्रीं । राज्य करीं आपुल्या नगरीं । विहिताचारें स्वधर्मे. ॥ ११२ ॥ ज्या पाव-तील सकळ वैरी । आपुल्या देशीं आपुल्या नगरीं । एक शत वसिष्ठ-कुमरीं । राज्य करीं पतिसंगें.' ॥ ११३ ॥ प्राणास आज्ञापी लव-

---

१ मर्यादा जेंवि. २ म्हणे तुष्टलों तुझिया व्रता ३ म्हणे तूं माझी धर्मदुहिता.

लाहीं, । ' जाऊनी संचरे आपुल्या देहीं, । सावित्रीशीं विश्रांतीगेहीं । गृहस्थाश्रम संपादो. ' ॥ ११४ ॥ वर वदोनी दंडपाणी । अदृश्य जाला तत्क्षणीं, । पतिव्रता समाधानीं । पतिजवळिकें पातली. ॥ ११५ ॥ त्यातें स्पर्शतांची पाणी । श्वास टाकी मुखींहूनी[2] । लवंडोनियां दक्षिण कर्णीं । पर्णास्तरणीं पहुडला. ॥ ११६ ॥ हातें चुरूनियां चरण । म्हणे, ' होईजे जी ! सावधान,। आश्रमीं पिता चक्षुहीन । अतिउद्विग्न वियोगें. ' ॥ १७ ॥ तो म्हणे, ' पावलों सुखनिद्रेतें । तुवां कां थापिटलें हातें ? ' । येरी म्हणे, ' प्रभाते ! । निवेदीन वृत्तांत. ' ॥११८॥ उठोनी बैसला सत्यवान । प्रीती दिधलें आलिंगन, । म्हणे, ' करीं हो ! फळभक्षण । कष्टलीस उपवासें, ' ॥११९॥ येरी म्हणे, ' सासू सासरा दोघें । शिणती दोघांचिया वियोगें, । तेथे जाऊनी तया संगे । फलाहार स्वीकारूं.' ॥१२०॥ वणवा लागला डोंगरीं । तें प्रदीप्त काष्ठ धरूनी करीं । वाट शोधीत पुढारी । स्वाश्रमासी चालिलीं. ॥ १२१ ॥ देऊनियां स्कंधाधार । बाहीं कवळिला प्राणेश्वर, । कंटक वारूनियां सुकुमार । म्हणे, 'स्थिर चलावें. ' ॥ १२२ ॥ देखोनी सावित्रीचें रूप । सिंह व्याघ्र कुंजर सर्प । नमस्कारूनी म्हणती, ' पाप । तव दर्शनें परिहरें. ' ॥१२३॥ स्नुषापुत्र राहिलीं वनीं । आश्रमीं अक्षम वृद्ध दोन्ही[3] । सखेद चिंतातुर मनीं । शोक करिती आक्रोशें. ॥ १२४ ॥ त्यांचा ऐकोनी शोकशब्द । कृपेनें पावले ऋषीश्वरवृंद । म्हणती, ' आमुचा आशीर्वाद । कल्याण करूं तुम्हांतें ' ॥ १२५ ॥ सुवर्चा भारद्वाज धौम्य । आपस्तंब मुनिसत्तम । दाल्भ्य ऋषी पवित्र परम । आश्रा-

१ देहें. २ मुखघ्राणीं. ३ पडलीं दोन्ही.

सिती सुवाचे. ॥ १२६ ॥ ' सत्यवान आणि सावित्री । आतांचि येत असती रात्री, । अरिष्टरहित पवित्र नेत्रीं । अवलोकाल निर्धारें. ' ॥ १२७ ॥ तंव साचाल जाला मार्गांतरी, । घोष ऐकिला नामगजरीं, । समीप येतां मातापितरीं । उभय बाहीं कवळिलीं. ॥ १२८ ॥ मस्तक सिंचोनी अश्रुपातीं । चौघे बैसलीं एका पंक्ती, । परमानंद न सांठवे चित्तीं । देखोनी दृष्टी दोघांतें. ॥ १२९ ॥ पुत्र पाहे पितृवदन । तंव त्या देखे दिव्य नयन, । म्हणे, ' अवदशा जाली शून्य । भाग्योदयो दिसताहे. ' ॥ १३० ॥ वडिलां अर्पूनी अमृतफळां । शेष स्वीकारी वेल्हाळा । तंव समय प्रातःकाळा । होता जाला स्वभावें. ॥ १३१ ॥ उदया येतां दे[१]वतरणीं । तंव वाद्यशब्द ऐकिला श्रवणीं, । घेऊनी सेना अक्षोहिणी । राजमंत्री पातले. ॥ १३२ ॥ प्रजा देशोदेशिक मुख्य । घेऊनी सुवर्णरत्नांचे लक्ष । राजदर्शना पातले दक्ष । राजबुद्धी [२]रक्षिते. ॥ १३३ ॥ निवटूनियां वैऱ्यांचीं कुळें । प्रधानें राज्य साधिलें बळें । राजा न्यावया उतावळे । मेध्यारण्यीं पातले. ॥ १३४ ॥ मार्गीं बोलती सकळ जन, । ' जरी राजा चक्षुहीन । तरी राज्यीं तया स्थापून । राज्य [३]करूं तदाज्ञा. ॥ १३५ ॥ जैसा धृतराष्ट्र प्रज्ञाचक्षू । कौरवकुळीं तो अध्यक्षू, । तैसा द्युमत्सेन मुमुक्षू । राजासनीं स्थापणें. ॥ १३६ ॥ यौवराज्यीं सत्यवान । मुख्य पदीं द्युमत्सेन । राजा करूनी सकळ जन । तया छाये सुख भोगूं. ' ॥ १३७ ॥ जवळीं पातले नमस्कारा । तंव लोचन देखती राजेश्वरा । देखोनी करिती जयजयकारा । महाआनंदें गर्जती. ॥१३८॥

---

१ वासरमणी. २ दीक्षित. ३ रक्षूं.

गजस्कंधीं सत्यवान, । कनकरथीं द्युमत्सेन, । दि्व्य वाजी मत्त करीन । रथ पदाती असंख्य. ॥ १३९॥ सावित्री वाहिली [1]रत्न-शिबिके । असंख्य दासदासींचीं शतकें, । छत्रें चामरें [2]सुहस्तकें । परिचारिका ढाळिती. ॥ १४० ॥ राज्यीं स्थापितां राजसुत । तो पुत्र प्रसवला एक शत । याग केले असंख्यात । वाजिमेध इत्यादि. ॥ १४१ ॥ कीर्तीनें मानवलोक भरला, । धर्में परलोक वश केला, । सावित्रीच्या पुण्यें तरला । सत्यवान या रिती. ॥ १४२ ॥ दर्शना अश्वपती आला । शत पुत्र तोंही लाधला । यापरी सावित्रीयें केला उभय कुळीं उद्धार. ॥ १४३ ॥ जान्हवीसमान सुढाळा । तारिती झाली दोन्ही कुळां, । तैशीच द्रुपदाची बाळा । हे द्रौपदी जाण पां. ॥ १४४ ॥ पराभवूनी शत्रुकुळें । राज्य पावशीं शीघ्र काळें ! । ऐसें बोलोनी पाणिकमळें । साही मौळें स्पर्शिली. ॥ १४५ ॥ कथा सांगोनी धर्मराजासी । आश्रमा गेला दीर्घायुषी. । ' चरित्र गाती ऐकती तयांसी । दीर्घ आयुष्य होईल. ॥ १४६ ॥ सावित्रीचें महदाख्यान । श्रवण करिती पवित्र जन । धर्मराज त्यां लागून । सुप्रसन्न सर्वदा. ॥१४७॥ कृपेनें पाठवी विष्णुसदना । इच्छिली पुरवी मनकामना ' । ऐशा व्यासाचिया वचना । श्रोतीं प्रमाण करावें. ॥ १४८ ॥ मुक्तेश्वराचीं सुढाळ वचनें । [3]परमार्थचंपकाचीं सुमनें । [4]तेथें अभक्त अधमांचीं मनें । योग्य न होती परिमळा. ॥ १४९ ॥ इति श्रीमहाभारते वनपर्वणि । पुढां कुंडलाभिहरणीं । कथा वर्तली ते सज्जनीं । श्रवण केली पाहिजे ॥१५०॥

---

१ दिव्य शिबिकें. २ स्वहस्तकें ३ परिमळ चंपकाचीं सुमनें; ४ तेथें विषयीं चंचरीकांची मनें.

## अध्याय सत्रावा

चक्रवर्तीशिरोमणि । जन्मेजय चातुर्यखाणी । म्हणे, 'वक्त्या ! तुझी वाणी । कामधेनू आमुतें. ॥ १ ॥ जी वर्षोनी परमामृतें । निववी श्रवणा आणि मनातें । तृषाहारी पुण्यदातें । गंगोदक ज्यापरी. ॥ २ ॥ ब्राह्मणवेष धरूनी दंभें । प्रयत्नें शचीच्या वल्लभें । कर्णाप्रति पुत्रलोभें । कवचकुंडलें याचिलीं. ॥ ३ ॥ ते मज ऐका-वयाची आर्ती । म्हणोनी विनवीं जोडिल्या हस्तीं । तुझी वाचा हे भगवती । प्रसन्न हो कां आमुतें. ॥ ४ ॥ वक्ता वदे स्नेहमेळीं । हितोपदेशा-ब्राह्मणवेष धरूनी हेळीं । उतरला असे भूमंडळीं । कारणें. ॥ ५ ॥ वक्ता वदे प्रश्नोत्तरीं । द्वादश वर्षे लोटल्यावरीं । ब्राह्मणवेषें देव अमरी । कर्णाप्रति पातला. ॥ ६ ॥ सुखशयनीं राजा कर्ण । त्यातें करूनी सावधान । म्हणे 'पुत्रा ! स्वहितवचन । हृदयीं तुवां धरावें. ॥ ७ ॥ पार्थ रक्षावया साक्षेपें । पुत्रलोभें निर्जराधिपें । दीन याचकाचेनि रूपें । कवचकुंडलें मागिजती. ॥ ८ ॥ तीं तुवां न द्यावी सर्वथा । पाठवीं देऊनी आणिका अर्था । हेंचि वारंवार ताता ! । प्रार्थूनियां बोलतसे.' ॥ ९ ॥ राधेय म्हणे, 'स्वामी ! तूं कवण ?' । तो म्हणे, 'मी सहस्रकिरण । कुंतीगर्भी तुझें जनन । जालें जाण मद्रेतें. ॥ १० ॥ आंगीं संलग्न सुवर्ण वर्म । वज्र तें लागे तृणासम । कुंडलें असतां [1]नेणिजे श्रम । क्षुधा आणि तृषेचा. ॥ ११ ॥ निश्चयें मारिशी अर्जुनातें । ऐशी शंका देवेंद्रातें । कवच मागूनी पार्थहस्तें । मरण इच्छी तुजलागीं. ॥ १२ ॥ यत्नें रक्षूनी आपुला प्राण ! कार्यें वर्तती विचक्षण, । आत्मनाशें सर्व .........

---

१ न बाधे.

अनुक्रमांक क्र. १०२ ९

शून्य । भाग्यभोग या लोकीं. ॥ १३ ॥ कर्ण म्हणे, 'निज निर्धारीं । धर्मकार्जीं परोपकारीं । शरीर वेंचितां[1] रणचत्वरीं । तो चढे शिरीं शक्राच्या[2]. ॥ १४ ॥ नश्वर देहाच्या पालटीं । सत्य सुकृत जोडे गांठीं । याहूनी श्रेष्ठ लाभ श्रेष्ठीं । कोण तो सांग सुजाणा ! ॥ १५ ॥ शरीर दारा[3] पुत्र बंधू । धन संपदा स्वल्प शब्दू । मागतां अपूर्ण कामें खेदू । याचक न पावे मजपाशीं. ॥ १६ ॥ स्वप्नप्राय संसार क्षणिक । धर्म तोचि सत्य एक । येर सर्वही माइक । दिसे तें जाण पां. ॥ १७ ॥ दधीच ऋषीनें दिधल्या अस्थीं । शिबि-मांस छेदीं आपुल्या हस्तीं । जीमूतवाहन पुण्यकीर्ती । जीवदानीं उदार. ॥ १८ ॥ अमरपाळ असुरवैरी । तो पातला होऊनी भिकारी । ते वेळीं अनेक या संसारीं । माझे दृष्टी दिसेना.' ॥ १९ ॥ सूर्य म्हणे, 'गा ! विचक्षणा ! । बोलसी तें न मने मना । भांडवल रक्षूनीयां शाहणा । उदमी वर्ते विचारें. ॥ २० ॥ बाईल विकूनियां हाटीं । मांडी गृहस्थाश्रमाची रहाटी । फोडूनीयां नौका पाटीं । उतरीन म्हणे मार्गस्थां. ॥ २१ ॥ देहीं लागल्या क्षयरोग । आवडी मांडी विषयभोग । इच्छी आरोग्यता चांग । तोही चतुर तुज[4] ऐसा. ॥२२॥ प्रत्यक्ष जित्या पुत्रातें वधी । मग म्हणे मज हो कां वंशवृद्धी । पुत्रा ! तैशी तुझी बुद्धी । आत्मघातकी मज वाटे. ॥ २३ ॥ रक्षा-वया आपुला प्राण । कवच कुंडलें न देणें[5] जाण' । ऐकोनी हास्य करी कर्ण । म्हणे, 'ऐक गुरूवर्या ! ॥ २४ ॥ ईश्वरइच्छा प्रारब्धगुणीं । सुखदुःख भोग पावे प्राणी । प्रमाण मानी मनुष्य करणी । देव सत्ता वाउगी. ॥ २५ ॥ ऐका माझिया निश्चयनेमा । मी प्रवर्तल्या

---

१ वेंची. २ सूर्याच्या. ३ प्राण. ४ म्हणावा. ५ दान.

## अध्याय सत्रावा

चक्रवर्तीशिरोमणि । जन्मेजय चातुर्यखाणी । म्हणे, ‘ वक्त्या ! तुझी वाणी । कामधेनू आमुतें. ॥ १ ॥ जी वर्षोनी परमामृतें । निववी श्रवणा आणि मनातें । तृषाहारी पुण्यदातें । गंगोदक ज्यापरी. ॥ २ ॥ ब्राह्मणवेष धरूनी दंभें । प्रयत्नें शचीच्या वल्लभें । कर्णाप्रति पुत्रलोभें । कवचकुंडलें याचिलीं. ॥ ३ ॥ ते मज ऐका-वयाची आर्ती । म्हणोनी विनवी जोडिल्या हस्तीं । तुझी वाचा हे भगवती । प्रसन्न हो कां आमुतें. ॥ ४ ॥ वक्ता वदे स्नेहमेळीं । ब्राह्मणवेष धरूनी हेळीं । उतरला असे भूमंडळीं । हितोपदेशा-कारणें. ॥ ५ ॥ वक्ता वदे प्रश्नोत्तरीं । द्वादश वर्षे लोटल्यावरीं । ब्राह्मणवेषें देव अमरी । कर्णाप्रति पातला. ॥ ६ ॥ सुखशयनीं राजा कर्ण । त्यातें करूनी सावधान । म्हणे ‘ पुत्रा ! स्वहितवचन । हृदयीं तुवां धरावें. ॥ ७ ॥ पार्थ रक्षावया साक्षेपें । पुत्रलोभें निर्जराधिपें । दीन याचकाचेनि रूपें । कवचकुंडलें मागिजेती. ॥ ८ ॥ तीं तुवां न द्यावी सर्वथा । पाठवीं देऊनी आणिका अर्था । हेंचि वारंवार ताता ! । प्रार्थूनियां बोलतसे. ’ ॥ ९ ॥ राधेय म्हणे, ‘ स्वामी ! तूं कवण ? ’ । तो म्हणे, ‘ मी सहस्रकिरण । कुंतीगर्भीं तुझें जनन । जालें जाण मद्रेतें. ॥ १० ॥ आंगीं संलग्न सुवर्ण वर्म । वज्र तें लागे तृणासम । कुंडलें असतां [1]नेणिजे श्रम । क्षुधा आणि तृषेचा. ॥ ११ ॥ निश्चयें मारिशी अर्जुनातें । ऐशी शंका देवेंद्रातें । कवच मागूनी पार्थहस्तें । मरण इच्छी तुजलागीं. ॥ १२ ॥ यत्नें रक्षूनी आपुला प्राण ! कार्यें वर्तती विचक्षण, । आत्मनाशें सर्व

---

1 न बाधे.

वा-०१०३

शून्य । भाग्यभोग या लोकीं. ॥ १३ ॥ कर्ण म्हणे, ' निज निर्धारीं । धर्मकाजीं परोपकारीं । शरीर वेंचितां[1] रणचत्वरीं । तो चढे शिरीं शेक्राच्या[2]. ॥ १४ ॥ नश्वर देहाच्या पालटीं । सत्य सुकृत जोडें गांठीं । याहूनी श्रेष्ठ लाभ श्रेष्ठीं । कोण तो सांग सुजांणा ! ॥ १५ ॥ शरीर दारा[3] पुत्र बंधू । धन संपदा स्वल्प शब्दू । मागतां अपूर्ण कामें खेदू । याचक न पावे मजपाशीं. ॥ १६ ॥ स्वप्नप्राय संसार क्षणिक । धर्म तोचि सत्य एक । येर सर्वही माइक । दिसे तें जाण पां. ॥ १७ ॥ दधीच ऋषीनें दिधल्या अस्थीं । शिबि-मांस छेदीं आपुल्या हस्तीं । जीमूतवाहन पुण्यकीर्ती । जीवदानीं उदार. ॥ १८ ॥ अमरपाळ असुरवैरी । तो पातला होऊनी भिकारी । ते वेळीं अनेक या संसारीं । माझे दृष्टी दिसेना. ' ॥ १९ ॥ सूर्य म्हणे, ' गा ! विचक्षणा ! । बोलसी तें न मने मना । भांडवल रक्षूनीयां शाहणा । उदमी वर्ते विचारें. ॥ २० ॥ बाईल विकूनियां हाटीं । मांडी गृहस्थाश्रमाची रहाटी । फोडूनीयां नौका पाटीं । उतरीन म्हणे मार्गस्थां. ॥ २१ ॥ देहीं लागल्या क्षयरोग । आवडी मांडी विषयभोग । इच्छी आरोग्यता चांग । तोही चतुर तुज ऐसा[4]. ॥२२॥ प्रत्यक्ष जित्या पुत्रातें वधी । मग म्हणे मज हो कां वंशवृद्धी । पुत्रा ! तैशी तुझी बुद्धी । आत्मघातकी मज वाटे. ॥ २३ ॥ रक्षा-वया आपुला प्राण । कवच कुंडलें न देणें जाण ' । ऐकोनी हास्य करी कर्ण । म्हणे, ' ऐक गुरूवर्या ! ॥ २४ ॥ ईश्वरइच्छा प्रारब्धगुणीं । सुखदुःख भोग पावे प्राणी । प्रमाण मानी मनुष्य करणी । देव सत्ता वाउगी. ॥ २५ ॥ ऐका माझिया निश्चयनेमा । मी प्रवर्तल्या

१ वेंची. २ सूर्याच्या. ३ प्राण. ४ म्हणावा. ५ दान.

दानधर्मा । न देई असा वदनपद्मा । शब्द न शिवो माझिया. ॥२६॥ उपाय अथवा अपाय घडो, । कायेपासूनी प्राण बिघडो । परी याचकविमुखतेचा न जडो । कलंक मातें सर्वथा.' ॥ २७ ॥ पिता म्हणे, 'गा ! सर्वज्ञा ! । स्वहित साधीं परमप्राज्ञा ! । माझे आज्ञेची अवज्ञा । न घडे ऐसें विचारीं.' ॥ २८ ॥ ऐसें सांगूनी तया सगुणा । गगनचारी संचरे गगना । पुढें स्वल्पचि काळें जाणा । शक्र आला जवाळिके. ॥ २९ ॥ अवगमोनी याचकाचि प्रतिमा । म्हणे, 'स्वस्थ गा ! नरेंद्रोत्तमा ! । कामीकामकल्पद्रुमा । अक्षय नेमा संरक्षीं.' ॥३०॥ कर्णें करूनी नमन । बैसके दिधलें उत्तमासन । म्हणे, 'काय इच्छी तुमचें मन । ते आज्ञा स्वामी ! निरूपीं ॥३१ ॥ जाति पद्मिनी लावण्यसरिता[1] । रत्नभूषणीं सुशोभिता । धेनुवाजिवारणरथा । ग्रामभूमी इत्यादि. ॥ ३२ ॥ कनककवच आंगी जडलें । अमृतस्रावी[2] मणिकुंडलें । हे भिन्न करूनी आपुलें । सर्वही तुझें द्विजवर्या !' ॥ ३३ ॥ याचक म्हणे, 'मनोरथवल्ली । उगवतांच तुवां खंडिली । क्षुधित पातल्या तोषवी बोलीं । भोजनरहित बहु मानें. ॥ ३४ ॥ आंगींच्या लग्न सुवर्ण कवचा । स्वहस्तें काढूनी दे मज त्वचा । तुझिया दिव्य कुंडलांचा । काम कर्णीं ल्यावया.' ॥ ३५ ॥ 'अमूल्य वस्तू बहु अपाडें । तें मज माग आपुल्या चाडें । कवचकुंडलांचिये भिडे । न घालीं मातें ब्राह्मणा ! .' ॥ ३६ ॥ येरू म्हणे, 'यथार्थ पाहीं । बोलसी तितुकें[3] व्यर्थ पाहीं । घेतल्याविण जाणें नाहीं । हा निर्धार दातया !' ॥ ३७ ॥ जंव जंव आग्रह वाढवी द्विज । तंव तंव हांसे कर्णराज, ।

---

१ भरिता २ अमृतोद्भव. ३ सर्वथा कामना दुजी नाहीं.

म्हणे, 'आवडी तृष्णाभोज[1] । पतिव्रता वरिलीसें. ॥ ३८ ॥ नव्हसी यातीचा ब्राह्मण याचक । जाणों अमरांचा नायक, । अर्जुना देऊनी पीयूषक । विष आमुतें वाढिसी. ॥ ३९ ॥ कवचकुंडलमिषें जाण । घेऊं आलासी माझा प्राण, । तरी तुझी वासना पूर्ण । मांझेनि मरणें होतसे. ॥ ४० ॥ करीन अर्जुनाचा वध । ऐसा कौरवां दिधला शद्ब । तो असत्य प्रतिज्ञेचा बाध । मातें न लागे तें करीं. ॥ ४१ ॥ माझी प्रतिज्ञा नव्हे शून्य । तुझी कामना होय पूर्ण । ऐसें सांगसी[2] विचारून । तें मी करीन सुरेशा !' ॥४२॥ तोषोनी बोले सहस्रनयन । 'वज्रा एका करूनी भिन्न । जें जें अस्त्र मागसी दान । तें तें देईन पवित्रा ! ॥ ४३ ॥ सकळ शस्त्रांची भगवती । ते मी देतसें दिव्य शक्ती । प्रकाशे प्रळयींचा गभस्ती । तेंवी[3] तेजें[3] लखलखित. ॥ ४४ ॥ काळरूप हे खेचरी । नेमूनी टाकिशी जयावरी । त्यातें मारील निर्धारीं । देवत्रय रक्षितां ॥ ४५ ॥ पुढती नुठी मागुतेन । हे तुज कळली असो खूण । यालागीं कोठें अकारण । नीच युद्धीं न वेंचीं. ॥ ४६ ॥ एकदा उठोनी अद्भुत । करील एकाचाचि घात । दुसरेन न चले हें निश्चित । वर्म तूतें कळलें असो.' ॥४७॥ संतोषोनी अमरपती । शक्ति वोपी कर्णाहातीं । समंत्रबीजें मंत्रमूर्ती । मृत्युदाती वैरियां. ॥४८॥ होतां दिव्य शक्तीची प्राप्ती । कर्ण शस्त्र घेऊनी हातीं । त्वचा काढूनी धैर्यवृत्ती । शक्रापुढें ठेविली. ॥ ४९ ॥ अमृतस्रावी अमृतोद्भवा । कुंडले देतां संतुष्ट मघवा, । कर्ण म्हणे, 'देवदेवा ! । विज्ञापना परिसिजे. ॥ ५० ॥ छेदूनी देतां आंगत्वचा । नाश झाला मद्रूपाचा । येविषयीं वरद वाचा । कृपेनें दिधली पाहिजे.' ॥ ५१ ॥

१ इच्छाभोग. २ मागें. ३ थोर तेजें. ४ हे अनिवार्य काळखेचरी.

शक्र म्हणे, 'पूर्वील्याहूनी । लावण्य फांकेल सहस्रगुणी । कोटि मदनांचिया श्रेणी । सांडणें होती तव रूपा. ॥ ५२ ॥ जे जे देखेल तुज अंगना । तीतें उपजेल भोगवासना । ऐसें सौंदर्य मनमोहना ! । पावशील तात्काळीं. ' ॥ ५३ ॥ कर्णासीं देऊनी शक्तिवर । स्वस्थळा गेला पुरंदर, । हें ऐकूनी हाहाकार । कौरवकुळीं माजला. ॥ ५४ ॥ हृदय पिटी दुर्योधन, । हस्त चुरी दुःशासन, । शकुनी म्हणे, ' गेला प्राण समस्तांचा एकदां. ' ॥ ५५ ॥ पांडवीं मानिला लाभ थोर । म्हणती ' मोकळें जालें द्वार । आतां वैरी ते किंकर । अर्ध क्षणीं विभांडूं. ' ॥ ५६ ॥ अर्जुनवधा दिधली शक्ति । ऐकोनी धर्म उद्विग्न चित्तीं । धौम्य म्हणे, ' विवेकमूर्ती । पक्षपाती समर्था. ॥ ५७ ॥ शक्तीनिवारण उपावो । कृष्णें केला असेल ठावो । सांडूनी दुश्चित्ततेचा भावो । समाधानीं असावें. ' ॥ ५८ ॥ यापरी ' कुंडलाभिहरण ' । सांग कथिलें निरूपण । जन्मेजयाप्रति सर्वज्ञ । वैशंपायन निरूपी. ॥ ५९ ॥ यानंतर ' अरणीहरण ' । यक्षधर्माचे [1]विचित्र प्रश्न । श्रोतीं होऊनी सावधान । श्रवण केलें पाहिजे. ॥ ६० ॥ इति श्रीआरण्यपर्वभारत । मोक्षदातें कर्णामृत । मुक्तेश्वरकवि विनवीत । कृपा कीजे सज्जनीं. ॥ ६१ ॥

---

## अध्याय अठरावा

अद्वैतवनीं पांडव वीर । सर्वे असंख्यात ऋषीवर । कंदमूलफळआहार । देऊनी त्यातें पाळित. ॥ १ ॥ कथाश्रवणीं क्रमीत वेळ ।

---

१ विविध.

म्हणती, ' कोटला दुष्ट काळ, । त्रयोदश वर्षानंतर खेळ । वीरश्रीचा माजवूं. ' ॥ २ ॥ ऐसें सहज अनुवादत । तंव ब्राह्मण पातला धांवत । धर्मराजा विनवीत । म्हणे' ' दुश्चित[1] निवारा. ॥ ३ ॥ गृहांगणीं मंथनारणी । असतां, पातला हरण हरणीं । वृक्ष मोडोनी संघर्षणीं । अंगकंडू शांतवी. ॥ ४ ॥ अरणी अडकल्या तया शृंगीं । घेऊनी[2] मृग पळाला वेगीं, । अग्निहोत्र न पवे भंगीं । ऐसें करीं धर्मज्ञा !' ॥ ५ ॥ ऐकोनी उठिले पांचहि जण । करीं घेतले धनुष्यबाण । वनोपवनें हिंडतां गहन । कुरंग कोठें लक्षेना. ॥ ६ ॥ मध्यान्हीं पातला भानू । उष्णें श्रांतला कुरुनंदनू । न्यग्रोधछाये करूनी शयनू । बंधूप्रति अनुवादे ॥ ७ ॥ ' जन्मोनी केलें नाहीं पाप । किमर्थ भोगूं हा संताप ? । कवण्या कर्माचा हा लोप ? । तें तत्वता नेणवे. ' ॥ ८ ॥ भीम म्हणे, दुर्योधनें । हरिलीं[3] स्त्रियेचीं वसनें । तो घेतला नाहीं प्राणें । त्याचें फळ हें नरेंद्रा ! ' ॥९॥ अर्जुन म्हणे, 'दुष्ट कर्ण । ताडितां कुशब्दांचे बाण । केलें नाहीं शिरछेदन । त्याचें फळ हें नरेंद्रा !' ॥ १० ॥ सहदेव म्हणे, ' कपट द्युतीं । सौबळें हरितां सर्व संपत्ती । मारिला नाहीं शस्त्रघातीं । त्याचें फळ हें नरेंद्रा !' ॥ ११ ॥ तृषापीडित[4] बहुत आतां । नकुळ वेघोनी वृक्षावरुता । दिशा पाहोनियां समस्ता । जळ सभोंवतें विलोकी. ॥ १२ ॥ येरू[5] दक्षिणेकडे वृक्षीं । वळघोनी

१ दुःखातें. २ म्हणोनी पातला लगबगी. ३ देखत हरिलीं. ४ ' धर्म म्हणे असो आतां । तृषें पीडिलों बहुत + आतां । नकुळ × वळघोनी वृक्षावरुता । जल सभोंवतें विलोकीं.' ॥ असा या ओंवीचा अन्य पाठ. ५ तंव दक्षिणाधिप दिसे वृक्षीं.

+ तत्वतां. × सहदेव.

दिशा अवलोकी चक्षीं । निबिड वृक्षांच्या कुक्षीं । जलचर पक्षी किलबिलती. ॥ १३ ॥ कर्दळी[1] वृक्षांचा मांदोळा[2] । हंसकारंडकांचा मेळा । देखोनी म्हणे, 'एथ जिव्हाळा । जलरसाचा दिसतसे.' ॥१४॥ काष्ठकमंडलू करीं धरून । अतिसत्वर तो करी गमन । तंव पुढां सरोवर विस्तीर्ण । समुद्रप्राय देखिलें. ॥ १५ ॥ रातोत्पलें नीलोत्पलें । पीतोत्पलें सितोत्पलें । विकसलीं, तेथें अलिकुलें । झुंकारती सुवासा[3]. ॥ १६ ॥ हस्तें[4] स्पर्शतां जीवना । वृक्षीं यक्ष करी गर्जना । म्हणे, 'करितां जलप्राशना । महा अनर्थ पावशी. ॥ १७ ॥ माझे प्रश्न हे सांगावे । तरिच जळ प्राशावें, । अवज्ञा करितां हानी जीवें । पावशील तात्काळीं. ॥ १८ ॥ येरें अव्हेरूनी शब्द । प्राशन केलें जल अगाध[5] । अतिशीतळ आणि सुस्वाद । अमृतोपम सुवासें. ॥ १९ ॥ उदरीं प्रवेशतां जल । मृत्यु पावला तात्काळ । पृथ्वीतळीं[6] विशाळ । वृक्ष तैसा पडियेला. ॥ २० ॥ विलंब लागतां नकुळांतें । धर्में पाठविलें सहदेवातें[7] । येऊनी पाहे तंव बंधूतें[8] । प्रेतदशा पातली. ॥ २१ ॥ आधीं करूं जळप्राशन । मग हे विचारूं[9] कारण । तंव त्या यक्षें घातली आण, । ' उदक हातीं नातळें. ॥ २२ ॥ माझे प्रश्न न सांगतां । आवज्ञा करूनी जळ प्राशितां । बंधू जे पावला अवस्था । ते तूं पावशील तात्काळीं. ' ॥ २३ ॥ त्याचें वचन उपेक्षून । येरें करितां जलप्राशन । तात्काळ पावोनियां मरण । बंधूनिकट पडियेला. ॥ २४ ॥ विलंब लागतां दोघांतें । धर्में धाडिले पार्थातें । तो येऊनी पाहे तेथें । तंव

१ कदंब द्रुमाचा. २ दांभोळ. ३ सुस्वरें. ४ पांडवें. ५ ते कदंब. ६ पृथ्वीतळीं महा विशाळ. ७ सहदेवातें. ८ नकुळातें. ९ तृषाहरण.

प्राणरहित देखिले. ॥ २५ ॥ ह्मणे, ' देवदैत्य[1]दानवातें । वधिलें न वचती पुरुषार्थें । ते होऊनी पडिले प्रेतें । हें आश्चर्य भूतळीं. ॥ २६ ॥ बाधा खंडोनी तृषेची । मग शोधना करूं तयाची । जळ प्राशी सव्यसाची । तंव तो यक्षें वारिला. ॥ २७ ॥ म्हणे, ' न सांगता माझे प्रश्न । बळें करितां जळप्राशन । तरी तात्काळ पावशील मरण । हा निर्धार जाण पां. ॥ २८ ॥ मांडल्या दुष्ट कर्माचा भोग । साधनें उपाय होती विलग । मरण पातल्या प्रयोग । औषधाचे न चलती. ॥ २९ ॥ पार्थें[2] सोडूनी[2] बाणवृष्टी । झांकोळली सर्व सृष्टी । यक्ष म्हणे ' तृणासाठीं । वारूं न शके मद्बळ.' ॥ ३० ॥ पार्थ प्राशितांचि जळ । मृत्यु पावला तात्काळ । विलंब देखोनी कुंतीबाळ । भीम धर्में पाठविला. ॥ ३१ ॥ तोही पहुडला त्यांचिये पंक्ति । पाठी पातला धर्ममूर्ती । चौघे देखोनियां क्षिती । कपाळें[3] हातें[3] पिटीत. ॥ ३२ ॥ ' हिमवंत विंध्य मेरु मंदर । तैसे पडिले चौघे वीर, । मारूं न शकती हरिहर । ते हे कवणें मारिले ? ॥ ३३ ॥ शकुनी दुर्योधनें देख । उदकीं कालवलें नेणों विख । कीं यमें प्रेरिला काळपुरुख । तेणें चौघां मारिलें[4]. ' ॥ ३४ ॥ तंव यक्ष बोले गर्जोनी शब्दू, । ' म्यां मारिलें तुझे बंधू । प्रश्न न सांगतां वधू । मजपासाव पावले. ॥ ३५ ॥ तुंवा सांगावे माझे प्रश्न । मग करावें जळप्राशन । तुझ्या बंधूचेही प्राण । दैवयोगें परतती. ' ॥ ३६ ॥ धर्म म्हणे, ' जितुकें ज्ञान । तितकें कांहीं करीन कथन । कैसे कैसे तुझे प्रश्न । ते नावेक परिसावीं. ' ॥ ३७ ॥ यक्ष म्हणे, ' युधिष्ठिरा ! । सांग माझ्या प्रश्नोत्तरा, ।

---

१ मानवातें. २ पार्थें वारितां सोडूनी. ३ करें ललाट. ४ ग्रासिलें.

बंधू पडिले ते परिहारा । सांगशी तो सुविचारू. ॥ ३८ ॥ कोठूनी उदयो पाविजें सूर्य ? । कोठे त्याची प्रतिष्ठा होय ! । कोण त्याचे समागमीं ये ? । अस्तवे तो कैसेनी ? ' ॥ ३९ ॥ उत्तर बोले धर्म सूजाणू, । ' ब्रह्मापासूनी उगवे भानू, । संगीं त्याचे देवगणूं, । धर्मीं त्याची प्रतिष्ठा. ॥४०॥ घेऊनी लोकांचीं आयुष्यें । अस्तमानाशी जात असे । ब्राम्हणपुण्याचे विशेषें । पुढतीं उदया येतसे.' ॥४१॥ यक्षें हांसोनी बोलिजे, । 'कैसेनी श्रोत्रिय होईजे ? । इच्छिलें महा फळ लाहिजे । कवण्या गुणें सांग पां ? ॥ ४२ ॥ अद्वितीय ख्यातिवंत । होता उपाय कोण समर्थ ? । पुरुष होय बुद्धिवंत ऐसें साधन कोणतें ? ' ॥ ४३ ॥ ' सांगवेदवेदार्थज्ञानें । श्रोत्रिय होइजे ब्राह्मणें, । निर्मळ तयाच्या अनुष्ठानें । महा फळ पाविजे. ॥ ४४ ॥ जिव्होपस्थजयो तेज धृती । तेणें पाविजे निर्दोष कीर्ती । वृद्धसेवनें श्रेष्ठपंक्ती । बुद्धिमंतचि आतुडे.' ॥ ४५ ॥ ' कवण दैवत ब्राह्मणातें ? । धर्मसंतान कवण त्यातें ? । मनुष्यभाव म्हणिजे ज्यातें । तें सांग काय पांडवा ! ? ॥ ४६ ॥ प्रयत्नें कीजे पापजोडी । ते काय सांग आपुले तोंडीं ? । तुझ्या चातुर्याच्या पडिपाडी । आन मातें दिसेना. ' ॥४७॥ धर्म म्हणे ' ऐक वचन ! ब्राह्मणदैवत वेदाध्ययन । तपश्चर्यामहाधन । धर्मसंतान या नांव. ॥ ४८ ॥ मनुष्यभाव म्हणिजे हानी । तें मरण ऐसें बोलिजे जनीं । मूर्खताअपेशदारिद्र्यचिन्हीं । मरण त्यातें बोलिजे. ॥ ४९ ॥ पराचे दोष बोलिजे तोंडीं । तेचि जाणे पापजोडीं । याहूनी पुसाववयांची गोडी । काय ते सांग खेचरा ! ' ॥ ५० ॥ ' क्षत्रियाचें दैवत कोण ! । तयाचा धर्म किंलक्षण ! । मनुष्यभाव

१ धर्मगणू. २ पाविजे.

तें म्हणसी[1] मरण। पापाचरण तें कैसें ?' ॥ ५१ ॥ 'क्षत्रियाचें दैवत धनुष्यबाण, । धर्म तो करणें नाना यज्ञ, । भय अथवा पलायन । हीनि[2] भाव क्षत्रिया ॥ ५२ ॥ शरण आलियाचा त्याग । हाचि क्षत्रियाचा पापसंग.' । यक्ष म्हणे, 'शब्द सुभग । निका मातें मानला. ॥ ५३ ॥ सकळ जळांमाजी जळ । कोणतें सुपवित्र निर्मळ ?। स्वल्प पेरिल्या पिके पुष्कळ। तें काय मातें परिसवीं. ॥ ५४ ॥ पूज्यांमाजी पूज्य स्थान । तें निवडूनी सांग पां कवण ? । फळांमाजी फळ पावन । श्रेय ते सांग सर्वज्ञा !' ॥ ५५ ॥ 'उदकांमाजी पवित्र गुणी । जो कां वर्षाव कीजे घनीं, । पेरिल्यामाजी जाण दोनी । पिकें पिकती अचाट ॥ ५६ ॥ औषधी धान्यबीज मेथ । स्वल्प पेरिल्या पिके बहुत, । ब्राह्मणा दिधलें तें अनंत । सहस्रगुणें विस्तारें. ॥ ५७ ॥ पूज्यांमाजी अधिक मान्य । वेदशास्त्रीं बोलिजे धेनू । फळांमाजी श्रेष्ठ जाण । पुत्रफळ त्रिलोकीं.' ॥ ५८ ॥ 'विषयभोगातें भोगीत । बुद्धिसंपन्न जन पंडित । सकळ भूतां मान्य[3] पंडितें[3] । प्रतिष्ठित लौकिकीं. ॥ ५९ ॥ ऐसा कोणीं एक प्राणी । श्वासोच्छ्वास वर्ततां घ्राणीं । मृतप्राय मानिजे जनीं । तो कोण सांग सुजाणा ?' ॥ ६० ॥ धर्म म्हणे, 'धनिक शहाणा । देवअतिथिपितृगणा । भूतां[4] आप्तां आणि आपणा । तृप्त न करीं वैभवें. ॥ ६१ ॥ तो जिताच मृत देख । ऐसे मानिती मन्वादिक' । यक्ष म्हणे, 'पावलों सुख । तुझेनी[5] वचनें पांडवा ! ॥ ६२ ॥ कृपणवृत्ती[6] जीवलोभें । धर्मलोपी असत्य-

---

१ म्हणिजे. २ मनुष्य ३ जी बहुत. ४ भृत्यां. ५ तूं सेवी जीवन. ६ कृत्रिमवृत्ती.

दंभे । विषयलोभाचेनि लाभें । परम श्लाघ्यता मानित. ' ॥ ६३ ॥ ' गुरुस्थानीं कवण श्रेष्ठ ? । देवांमाजी कवण वरिष्ठ ? । पवनाहूनियां बलिष्ठ । वेगवंत कोण तो ? ॥ ६४ ॥ तृणाहूनी बहु अंकुरीं कोणें विस्तार बहुत करीं । हें मज सांग पां निर्धारीं । धर्मराजा ! धार्मिका ! ' ॥६५॥ ' माता श्रेष्ठ गुरूजनीं । पितादेवतामुकुटमणी, । पवनाहूनी सहस्रगुणी । मन हें चपळ । जाण पां. ॥ ६६ ॥ तृणाहूनी बहु अंकुरी। संसारचिंता मन विकारी । विरूढ जाय नानापरी जन्म सहस्रीं न खंडे. ' ॥ ६७ ॥ ' निजलिया न लावी पातया पातें ? । आपुल्या कोण उपजे मागुतें ? । हृदय नाहीं हो ! कवणातें ? । कोण वाढतें बहु वेगीं ? ' ॥ ६८ ॥ ' मत्स्य न लावी पातया पातें । अंडज उपजे हो ! मागुतें । हृदय नाहीं पाषाणातें । नदी वाढे जळवेगीं. ' ॥ ६९ ॥ ' कवण मित्र कुटुंबिया ! । कवण मित्र घरबारिया ? । कवण मित्र रोगिया ? । मित्र मरतया तो कोण ? ' ॥७०॥ ' अर्थ मित्र कुटुंबिया, । भार्या मित्र घरबारिया । औषध मित्र रोगिया । मित्र मरतया धनदान. ' ॥ ७१ ॥ ' कोण अतिथि सर्व भूतां ? । सनातन धर्म कोण समस्तां ? । काय नाम गा ! अमृता ? । जगवी कोण जगातें" ? ॥ ७२ ॥ ' अतिथी सर्वां, हुताशन । गाई चंद्र अमृत जाण, । निष्काम धर्म सनातन । जगवी तो पवन जाण पां. ॥ ७३ ॥ ' सांग एकला विचरे कोण ? । जन्मोनी कोण पावे जनन ? । हिमरोगाचें औषध गहन । सकळां स्थान कोणतें ? ॥७४॥ ' एकला विचरे तो गभस्ती । चंद्रमा जन्मला जन्मे ।

---

१ विषयभोगाचेनि लाभें. २ हलुवट. ३ कवण पूजनीं पावे थोरी । कवण देव श्रेष्ठाधिकारी ॥ ४ वाहे.

पुढती । अग्निऔषध हिमरोगशांती । स्थान ते क्षिती समस्तां.' ॥७५॥ 'कवण एक पद धर्माचें? । कवण एक पद यशाचें? । कवण एक पद स्वर्गाचें? । कवण सुखाचें पद सांग पां?' ॥ ७६ ॥ 'विवेक दृढता दक्षतेचें । तेंचि एक पद धर्माचें, । दान पद एक यशाचें । सत्य स्वर्गाचें पद एक. ॥ ७७ ॥ शील तें पद एक सुखाचें । ऐसें खेचरा ! जाण साचें.' । वचन ऐकोनी धर्माचें । बहु यक्षाचें मन संतोषे. ॥ ७८ ॥ 'कवण आत्मा मनुष्यातें? । कवण सखा गृहस्थातें?। उपजीवन कोण त्यातें? । कोण सर्वांतें रक्षित?' ॥ ७९ ॥ 'पुत्र आत्मा मनुष्यातें, । भार्या मित्र गृहस्थातें, । उपजीवन पर्जन्य तें । दान सर्वांतें रक्षित.' ॥ ८० ॥ 'कवण उत्तम धान्यांत ?। कवण उत्तम लाभांत? । कवण उत्तम सुखांत ? । कवण धन हें उत्तम?' ॥ ८१ ॥ 'धान्यांत उत्तम दक्षता, । धनांत उत्तम तों ज्ञातृता । लाभ तो शरीर आरोग्यता । तुष्टी तेंचि सुख जाणा.' ॥८२॥ 'लौकिकीं कोण तो धर्म प्रबळ ? । कोण धर्म सांग सुफळ ? । काय नियमिल्या चंचळ । पुरुष नव्हे जाणता ? ॥ ८३ ॥ काय असह्य सज्जना? । तें मज सांग कुरुभूषणा !' । धर्म म्हणे, 'महाप्राज्ञा । अनुक्रमें अवधारीं. ॥८४॥ 'भूतदया अचळ मनीं । तो श्रेष्ठ धर्म जाणिजे जगीं, । यज्ञ ज्ञान तप हीं तिन्ही । सुफळ धर्म या नांव. ॥ ८५ ॥ चित्त नियमिलें असतां नेमें । न भुले संसाराचिया भ्रमें । भेदकापट्य बाह्यप्रेमें । सुख नोहे सज्जनीं.' ॥ ८६ ॥ 'काय त्यागिल्या प्रीति लोकां ? । काय त्यागिल्या न पवे शोका? । काय त्यागिल्या पुरुष हो कां । संपत्तिवंत पैं होय ? ॥ ८७ ॥ काय त्यागिल्या होय सुखी ? । हें मज सांग आपुल्या मुखीं' । धर्म म्हणे,

'हें कौतुकीं । यक्षराया! परियेशीं. ॥ ८८ ॥ मान त्यागिल्या प्रीति लोकां । क्रोध त्यागिल्या न पवे शोका । काम त्यागिल्या सकळिका । रिद्धि सिद्धि वोळगती. ॥ ८९ ॥ लोभ त्यागिल्या पाविजे सुख । ऐसें बोलती शुकादिक.' । यक्ष म्हणे, 'तुझें वाक्य । अमृतातुल्य मज वाटे. ॥ ९० ॥ किमर्थ दान ब्राह्मणादिका? । किमर्थ दान नटनर्तकां?। किमर्थ दान गा! सेवकां? । परिचारक भृत्यातें? ॥ ९१ ॥ किमर्थ दान गा! नृपातें । हें निवडूनी सांग मातें.' । धर्म म्हणे, 'एक चित्तें । यक्षराजा! परियेसीं. ॥ ९२ ॥ परलोकसाधन पुण्यप्राप्ती । दान देणें ब्राह्मणहातीं । लौकिकीं वाढवावया स्फीती । नटनर्तकां देईजे. ॥ ९३ ॥ भरणपोषणालागीं जाण । भृत्या देईजे वेतन दान । भयें रक्षावया प्राण। राजयातें देईजे' ॥९४॥ 'कोणें आवरिलें लोकांतें? । कोणे लोपिलें प्रकाशातें ?। कोणें त्यागिलें मित्रातें? । कोणें स्वर्गातें न पावसी.' ॥ ९५ ॥ 'अज्ञानें आंवरिलें लोकांतें । तिमिरें लोपिलें प्रकाशातें। लोभें त्यागिलें मित्रातें । संगीं स्वर्गातें न पवती.' ॥ ९६ ॥ 'जीतचि पुरुष कोण प्रेत? । राज्य कोणतें प्राणरहित? । मृत श्राद्ध कोण तेंथ? । यज्ञही मृत कोणता?' ॥ ९७ ॥ 'दरिद्र पुरुष रहित प्राण । मृत राष्ट्र राजयाविण । अश्रोत्रियातें श्राद्धदान । मृत ऐसें जाण पां ॥९८॥ दक्षिणेरहित याग केला। तो मृत ऐसा वहिला.' । यक्ष म्हणे, 'भला रे भला । धर्मराजा! सुजाण! ॥९९॥ कवण हरी दिशांची तृषा? । हें मज सांग पां! महापुरुषा!। कवण अन्न आणि विषा । रूप करूनी मज सांग ॥१००॥ कोण तो ब्राह्मण। श्राद्धकाळ? । हें मज सांग प्रांजळ. । धर्मराज! परम कुशळ । वक्तयांमाजी मी मानीं. ॥ १०१ ॥ प्रश्न सांगोनी

१ स्नेहें सांडोनियां ठायीं.

ठायीं । स्वेच्छ उदक प्राशना नेई. ' । धर्म म्हणे, 'बोलणें कांहीं । सर्वज्ञातें तुज यक्षा ! ॥ १०२ ॥ अष्टौ दिशांचे तृषाहरण । करी सर्वत्र एकलें संतमन । धेनु शाक आणि धान्य । अन्नपूर्ण मेदिनी. ॥१०३॥ हींचि पावती सर्व काघवा । तेंचि त्रिष गा ! यक्षदेवा ! । 'श्रेष्ठ ब्राह्मण देखिजे जेव्हां । तोचि काळ श्राद्धातें.' ॥ १०४ ॥ 'सांग कथिले माझे प्रश्न । धर्मराजा ! तूं धन्य धन्य । आतां सांगे पुरुष कवण । धनिकश्रेष्ठ त्रिलोकीं ? ' ॥ १०५ ॥ 'ज्याचे कीर्तीच्या चंदनें । विश्व चर्चिलें उत्तम गुणें । अनुभवसाक्षात्कार-ज्ञानें । ब्रह्मनिष्ठ निर्धारें. ॥ १०६ ॥ प्रिय अप्रिय ज्या समान । वस्तु वेगळें न दिसे आन । तोचि एक धनिक जाण । येर सर्वही दरिद्री. ' ॥ १०७ ॥ 'वचनीं तोषविलें मातें, । वरद वदे प्रसन्न चित्तें, । 'चौघांमाजी आवडे तूतें । तो उठवीन तवाज्ञा. ' ॥ १०८ ॥ धर्म म्हणे, 'गुणवेल्हाळ । नकुळ माद्रीचा वडिल बाळ । तो उठविल्या काम सकळ । पूर्ण माझे समर्था ! ' ॥ १०९ ॥ 'बळसमुद्र भीमसेन, । शस्त्रधर गुरु अर्जुन, । जाणांमाजी अति सुजाण । सहदेव पांडवा ! ॥ ११० ॥ ऐसें सांडूनी गुणवंत । इच्छिशी माद्रीचा सुत. ' । धर्म म्हणे, 'गा ! परमार्थ । तूंचि विचारीं विवेकें. ॥ १११ ॥ मी कुंतीचा वडील कुमर । ज्येष्ठ माद्रीचा नकुळ वीर । उभय पुत्रीं या सुपवित्र । दोघी माता लोकीं कीं. ' ॥ ११२ ॥ यक्ष बोले सुप्रसन्न, । 'चौघां दिधलें प्राणदान. ' ऐसें बोलतां चवघेजण । उठते झाले तात्काळीं. ॥ ११३ ॥ नमस्कारिलें धर्मचरणा । तैसेच वंदिलें यक्षगणा । तंव यक्षता सांडूनी आलिंगना । यम आला जवळिकें. ॥ ११४ ॥

म्हणे, ' पुत्रा ! मी तुझा पिता । म्यांच अरणी हरिल्या आंतां । प्रश्न-मिषें तुझिया चित्ता । परीक्षिलें सुबुद्धी ! ॥ ११५ ॥ अरण्यवास सरला देख । उरलें नष्टचर्येचें वर्ष एक । तेंही क्रमितां दुष्ट लोक । तुम्हां कोणी नेणती. ॥ ११६ ॥ होऊनी विराटनगरवासी । नांवें ठेवूनी अनारिसीं । रूपें पालटती आपैसीं । माझेनि वरें वीर हो ! ' ॥ ११७ ॥ अरणी ही दिधल्या आणून । तेणें तोषला ब्राम्हण । पांडवा देऊनी आशीर्वचन । जाता झाला स्वाश्रमा. ॥ ११८ ॥ आश्वासूनी धर्मरावो । अदृष्ट जाला श्राद्धदेवो । याचेनि स्मरणें होतैं वावो । कोटि संग्रह पापाचे. ॥ ११९ ॥

---

## उपसहार.

एथूनी सरलें अरण्यपर्व ।
पुढारें असें विराट अतिअपूर्व ।
तेंही परिसा जैसा शर्व ।
दृष्टी दिसे तपांतीं ॥ १ ॥
लीलाविश्वंभर गुरुचरणीं ।
पुष्पांजली वचनसुमनीं ।
मुक्तेश्वरें अर्पूनी मनीं ।
कृतकृत्यता मानिली. ॥ २ ॥

---

१ तत्वतां. २ सुशब्दीं. ३ पाहा हो. ४ कोटि संग्रह नासे पापाचा.

# मुक्तेश्वरकृत महाभारत

# वनपर्व

## टीपा व स्पष्टीकरण

अनुक्रम ........
विभाग ........
क्रमांक
नों. दि.

# टीपा व स्पष्टीकरण

## अध्याय १ ला

द्यूतांत सर्व राज्य हरल्यावर आपले आजे जे पांडव, त्यांची वनवासांत कशी स्थिति झाली, अशा जनमेजयराजाच्या प्रश्नावरून वैशंपायनानें त्याला सर्व वृत्तांत वर्णन करून सांगितला. वैशंपायन म्हणाला, 'धर्मराजा वनांत जात असतां, त्याची सर्व प्रजा त्याच्या पाठोपाठ चालली. धर्मराजानें त्यांचें सांत्वन करून त्यांपैकीं क्षत्रिय–वैश्य–शूद्रांना परतविलें. ब्राह्मणांनीं मात्र त्याच्याबरोबरच जाण्याचा हट्ट धरल्यामुळें, नाइलाजानें त्यानें संमति दिली. मार्गांत द्रौपदीचे व ब्राह्मणांचे क्लेश पाहून धर्माला फार दुःख झालें. अशा वेळीं शौनक ऋषींनीं येऊन चित्त स्थिर ठेवण्याचा त्याला उपदेश केला. धौम्य पुरोहितानेंही अशा संकटकाळीं पुष्कळांनीं आचरलेली सूर्योपासना त्याला सांगितली. धर्मानें त्याप्रमाणें उपासना केल्यावर सूर्यानें प्रसाद म्हणून थोडें अन्न दिलें, व तेंच वृद्धि पावून अनेक ब्राह्मणांना पोसण्यास कारण होईल, असा वर दिला. अशा रीतीनें अनेक ब्राह्मणांना संतुष्ट करून नित्य पुराणश्रवणांत काळ घालवीत, धर्मराज आपल्या बंधूंसह काम्यकवनाला आला. इकडे विषण्ण होऊन वनाला गेलेले पांडव आपल्या कौरवकुलाचा निःपात करतील, अशी भीति धृतराष्ट्राला वाटून त्यानें विदुराला याबद्दल उपाय विचारिला. विदुरानेंही पांडवांशीं सख्य करून त्यांना परत आणण्याचाच योग्य असा सल्ला दिला. पण तो धृतराष्ट्राला मानवला तर नाहींच, उलट विदुरालाच पांडवांचा पक्षपाती ठरवून राजानें त्यास पांडवांकडे घालवून दिलें. विदुर त्याप्रमाणें काम्यकवनास आला. पांडवांनींही त्याचें मोठ्या प्रेमानें स्वागत केलें. पण पुनः धृतराष्ट्राला विदुराचा विरह सहन न झाल्यामुळें, विदुरास माघारा आणण्यास त्यानें संजयास काम्यकवनास पाठविलें. विदुर परत आलेला पाहून दुर्योधन, कर्ण, शकुनी व दुःशासन या चौकडीनें पांडवांना एकटे

रात्रीं गांठून मारण्यासाठीं, सैन्यासह त्यांच्यावर चाल करण्याचा विचार केला. इतक्यांत त्रिकालज्ञ व्यासांनीं धृतराष्ट्राच्या दरबारीं अकस्मात् अवतरून वरील चांडाळचौकडीच्या बेताकडे दुर्लक्ष केल्याबद्दल धृतराष्ट्राची कानउघाडणी केली. धृतराष्ट्रानें यावर बराच त्रागा केल्यामुळें दुर्योधनादिकांना पांडवांच्या नाशाचा बेत सोडावा लागला. व्यासांनीं याच वेळीं धृतराष्ट्राला कामधेनूची कथा सांगितली. आपले पुत्र जे बैल त्यांना जगांत नाहक त्रास भोगावा लागतो अशी तक्रार कामधेनूनें इंद्राकडे नेली असतां, इंद्रानें बैलांचें पोषण करणारास वर, व त्यांची उपेक्षा करणाऱ्यास शाप दिला, याचा उल्लेख करून पांडवांना स्वतःच्या मुलांप्रमाणें वागविण्यास व्यासांनीं धृतराष्ट्रास परोपरीनें सांगितलें. धृतराष्ट्र यावर व्यासांना म्हणाला कीं, 'तुमचा उपदेश मला शिरसामान्य आहे. पण हाच उपदेश तुम्हीं दुर्योधनाला करावा'. व्यास नंतर म्हणाले कीं, 'मी आतां जातों, व मैत्रेय लवकरच येईल, तो सांगेल त्याप्रमाणें तुम्हीं सर्वांनीं वागावें.' व्यास अदृश्य झाल्यावर मैत्रेय आला व भीष्म-द्रोण-धृतराष्ट्रांनीं त्याचें स्वागत केलें. पहिल्या चार ओव्यांत मुक्तेश्वरानें आपल्या वाडवडिलांना; कुलदेवतांना व गुरूला वंदन केलें आहे. **ओ. १ विश्वंभरा**-जगाचें पोषण करणाऱ्या परमेश्वरा. हा शब्द मुक्तेश्वरानें द्व्यर्थी योजला आहे. विश्वंभर हें जसें परमेश्वराचें नांव आहे, तसेंच तें मुक्तेश्वराच्या पित्याचेंही नांव होतें. म्हणून हें विशेषण परमेश्वराला योजून कवीनें आपल्या पित्यालाही ओघानें वंदन केलें आहे. **विश्वाससी**-खात्री किंवा भरंवसा देतोस, अर्थात् मोक्षाचा भरंवसा. **प्रतीति** इ०-तुझा अनुभव निश्चयानें मनावर ठसतो. **ओ. २. तूंचि** इ०-तुझ्या ठिकाणीं हरिहर, सूर्य, गणेश व शक्ति इत्यादि देवदेवता अनेक रूपानें व्यक्त होतात. वास्तविक तूंच या अनेक देवदेवतांच्या रूपानें व्यक्त होतोस. **बहुधा**—अनेक रूपानें. पहा 'एकं सद्विप्रा बहुधा वदंति.' **ओ. ३. महालक्ष्मी** — करवीरनिवासिनी महालक्ष्मी ही मुक्तेश्वराची कुलस्वामिनी असल्यामुळें, ग्रंथारंभीं तिला वंदन केलें आहे. **भैरवदेव**-सोनारीचा भैरव. हाही मुक्तेश्वराचा कुलस्वामी होता. भैरव हें शंकराचेंच एक नांव आहे. **वोळगण्या होती**— आश्रय करिती. सेवा करिती. शंकराचें आराधन केलें असतां, अष्टसिद्धि भक्ताचा आश्रय

करतात, सेवा करतात. एकनाथ—प्रसिद्ध साधु एकनाथ हे मुक्तेश्वराचे आजे, आईचे वडील. ते गुरुस्वरूप असल्यामुळें, कवीनें ग्रंथारंभीं त्यांना वंदन केलें आहे.

## ग्रंथारंभ

ओवी ५ तृतीय—महाभारताच्या १८ पर्वांपैकीं वनपर्व हें तिसरें पर्व आहे. प्रश्नापाठीं—प्रश्नानंतर. ओव्या ६–८, यांत जनमेजयाचे प्रश्न आहेत. त्यांनाच वैशंपायनानें उत्तर दिलें आहे. ओ. ६. पितामह—जनमेजय हा धर्मराजादि पांडवांचा नातू. आपल्या आजांनीं पूर्वी अरण्यवास कसा सोसला याचें वर्णन तो वैशंपायनास विचारीत आहे. चर्मांबर इ०—कातडें हेंच कापडाप्रमाणें पांघरलें आहे ज्यांनीं, व जटा धारण करणाऱ्या अशा पांडवांनीं. ओ. ७. याज्ञसेनी—द्रौपदी. अरण्य इ० —वनवासाच्या त्रासरूपी अग्नींत. वनवासाच्या कष्टांत. हृदयवदनें—हृदयें आणि वदनें. लोक छाती बडवून घेत होते व तोंडावरही हात घेऊन शंख करीत होते. ओ. ११. या दुष्टाच्या—दुर्योधनाच्या. ओ. १३. पांडवांनीं १२ वर्षें वनवासांत व एक वर्ष अज्ञातवासांत घालवावयाचें होतें. म्हणून १३ वर्षांनीं परत येईन असें धर्मराज आपल्या प्रजेला आश्वासन देत आहे. ओ. १४. धर्मराज प्रजेला म्हणतो, 'तुम्हीं मजबरोबर आला व सर्व नगरी ओस पाडली तर पांडवांनीं एकटें वनाला जाण्याची अट मोडली, व त्यांनीं कबूल केलेल्या नियमाला बाध आणला, अशी दुष्ट कौरव ओरड करतील.' ओव्या १६–२१, पांडवांना पुनः राज्य मिळावें यासाठीं ब्राह्मण तपश्चर्या करण्याचें आश्वासन देतात. ओव्या २२–२५, ब्राह्मण बरोबर आल्यास त्यांना कसें पोसावें हा प्रश्न धर्मराजापुढें होताच, व तो त्यानें ब्राह्मणांना बोलून दाखविला. ओवी २३. हुताशीं—अग्नींत. ओ. २४. निर्वातीं—निवाऱ्याच्या जागीं. भक्ती—भक्तीनें (तृ.) अरण्यवास इ.—अरण्यवासरूपी प्रलयाच्या भोंवऱ्यांत. प्राणकलिका—प्राणज्योत. अरण्यवासांत खावयास न मिळाल्यामुळें, तुम्ही प्राणास मुकाल असा धर्मराजाच्या म्हणण्याचा अर्थ. ओ. २५. विभूति—भस्म.

साचारे–खरोखर. ओ. २८. चारी पुरुषार्थ–धर्म, अर्थ, काम व मोक्ष. ओ. ३१-३२, निरनिराळ्या देशांतील ब्राह्मण, धर्माबरोबर वनांत गेले त्यांचीं नांवें. ओ. ३१. कान्यकुब्ज–कनोज ब्राह्मण. ; तैलभुक्त–तेलंगी. कामरूप–आसामांतले. उत्कल–ओरिसा प्रांताचे. पंचगौड–गौड, कान्यकुब्ज, सारस्वत, मैथिल व उत्कल यांना 'पंचगौड' म्हणतात. हे नर्मदेच्या उत्तरतीरीं राहणारे आहेत. ओ. ३२. चौल–कित्येकांच्या मतें तंजावर. पण चोलमंडळाला हल्लीं कारोमांडेल म्हणतात. मल्याळ–मलबार. पंचद्राविड–तामिळ, कर्नाट, गुर्जर, महाराष्ट्र व तैलंग हे पंचद्राविड असून ते नर्मदेच्या दक्षिणतीरीं राहतात. ओ. ३३. वोळवितू–चढला. गभस्ती–सूर्य. ओ. ३४. वटस्थळीं–वटवृक्षाखालीं.; अंशुमाळी– सूर्य. पहिल्या दिवशीं पांडवांना पाणी पिऊनच रात्र काढावी लागली. ओ. ३६. द्रौपदी—याबद्दल 'दृषदीं' असा दुसरा पाठ आहे. त्याचा अर्थ 'खड्यावरून चालतांना' असा होईल. बहुवस—पुष्कळ. ओ. ३७. शौनकाचे आगमन. ओवी ३७ व ३८ यांमध्यें काव्यसंग्रह व काव्येतिहाससंग्रहप्रतींत व्यत्यास केला आहे. ओ. ३९.—'शोकस्थानसहस्राणि भयस्थानशतानि च । दिवसे दिवसे मूढमाविशंति न पंडितम् ।' या मूळश्लोकाचा येथें अनुवाद केला आहे. ओ. ४१. दळवाडे–समुदाय. विवेकलता–विवेकरूपी खड्गलता, तरवार. विभांडी–दूर करी. सारासार विचारानें दुःखाचे पर्वत नष्ट होतात, असा अर्थ. ओ. ४३. कळिकाळ–पांडवांच्या काळीं कलियुग नव्हतें, म्हणून हा शब्द मुक्तेश्वरानें चुकीनें योजला असावा असें काव्यसंग्रहकार म्हणतात, व त्याच्या ऐवजीं 'कष्टकाळ' असा शब्द सुचवितात. पण हा पाठ मात्र कोठेंच दिलेला नाहीं. तथापि ओ. ६० मध्यें हा शब्द आला असल्यानें येथेंही तो असावा असें वाटतें. 'अष्टकाळ' हा पाठ स्वीकारल्यास, दिवसाचे व रात्रीचे मिळून आठ प्रहर असा अर्थ होईल. ओ. ४५. धौम्य हा पांडवांचा कुलोपाध्याय. तोही शौनकाप्रमाणेंच धर्मराजाला संकटकाळीं धीर देऊन, सूर्याची उपासना सांगत आहे. ओ. ४६. चतुरानन–ब्रह्मदेव. वोजा–चांगल्या रीतीनें. ओ. ४७. उत्तरायणांत पृथ्वींतील रस शोषणें, व दक्षिणायनांत जलधारा सोडणें, हा सूर्याचा धर्म सांगतात. मोकळी–सोडी. ओवी ४९. पद्दा–अन्नाद्भवंति

भूतानि पर्जन्यादन्न संभवः । **ओ. ५२. कार्तवीर्य**– सहस्रार्जुन. **वैन्य**– वेनराजाचा मुलगा. **नाहुष**––नहुष राजाचा मुलगा ययाति. या सर्वांनीं सूर्योपासना केली होती म्हणून त्यांचीं उदाहरणें सांगितलीं आहेत. **ओ. ५३. गोवी**––गुंतागुंत अर्थात् संकट. धर्मराजाबरोबर ब्राह्मण आल्यामुळें, त्यांना पोसण्याचें त्याच्यावर आलेलें संकट सूर्य निवारण करील, असा अर्थ. **ओ. ५४–५६.** सूर्याचीं १०८ नांवें, ब्रह्मदेवाकडून इंद्राला, इंद्राकडून नारदाला, नारदाकडून धौम्याला व धौम्याकडून धर्मराजाला, प्राप्त झालीं असा पारंपरिक क्रम सांगितला आहे. **ओ. ५९.** सूर्य, धर्मराजाला त्याच्या आराधनेचा प्रसाद म्हणून थोडेसें पण चतुर्विध अन्न देतो. **चतुर्विध**–खाद्य, पेय, लेह्य व चोष्य. असें चार प्रकारचें अन्न. **ओ. ६१.** येथें १३ वर्षांनंतर आपोआप तुला आपलें राज्य प्राप्त होईल असा वर, सूर्य धर्मराजाला देतो. **ओ. ६२.** ‘ सूर्यानें धर्मराजाला थालीपात्र दिलें असा प्रवाद आहे. पण व्यासाच्या भारतांत असा उल्लेख नाहीं,’ असें मुक्तेश्वर म्हणतो. तथापि महाभारताच्या प्रचलित प्रतींत थालीपात्र दिल्याचा उल्लेख आहे. यावरून मुक्तेश्वराच्या पुढें हल्लींच्या प्रचलित भारतप्रतीहून निराळी प्रत असावी असें दिसतें. पहा– गृह्णीष्व पिठरं ताम्रं मया दत्तं नराधिप । यावद्वर्त्स्यति पांचाली पात्रेणानेन सुव्रत ॥ वनपर्व. ३।७२. ओव्या ६७ व ६८ बद्दल काव्येतिहाससंग्रह-प्रतींत फक्त ‘भोजनीं तोषती ब्राह्मण । कुरुक्षेत्रींचे तपोधन । यमुनातीरींचे वेदज्ञ । सरस्वतीतीरनिवासी ॥’’ येवढीच ओवी दिली आहे. त्यांत काम्यक-वनाचा उल्लेख नाहीं. ओ. ७०–७३ पांडव रागानें वनाला गेले. प्रजा देखील पांडवांबद्दल शोक करीत असून कौरवांना शाप देत आहे. हा शाप कौरवांना बाधेल म्हणून प्रजेच्या मनांतून पांडवांबद्दलचा शोक कसा जाईल, हा उपाय धृतराष्ट्र विदुरास विचारीत आहे. ओ. ७४–८८. विदुर धृतराष्ट्राला पांडवांना परत आणण्याचा उपदेश करतो. **ओ. ७६. कुमर**–दुर्योधनादि, ( धृतराष्ट्राचे पुत्र ). **पल्लव इ.**–‘ पांडवांच्या पुढें पदर पसरून ‘ आम्हांस मागील अपराधाची क्षमा करावी ’ असें मोठ्या काकुळतीनें म्हणावें, असा विदुराचा धृतराष्ट्रास उपदेश. **ओ. ७८.** पोटांत डोकें खुपसणें, किंवा डोक्यावर हात ठेवून घेणें, म्हणजे शरण आल्याचें चिन्ह होय. दुःशासनानें

भीमाच्या पोटांत डोकें खुपसणें, व दुर्योधनाच्या डोक्यावर धर्मराजाचे हात ठेवणें, म्हणजे कौरव पर्यायानें पांडवांना शरण येऊन दोघांत सख्य घडलें, असें दाखवावें, असा विदुराचा आशय. **निवेदी**–अर्पण कर. **ओ. ७९.** अर्जुन व कर्ण हे परस्परांचे प्रतिस्पर्धी होते, तर सहदेवाचा शकुनीवर विशेष रोष होता. अर्जुनाला कर्णानें वंदन करावें, व सहदेवाला राग आला तरी शकुनीला त्याची झळ न लागावी असें दोनी बाजूंचें सख्य व्हावें, असा विदुराचा उपदेश. **ओ. ८०.** शकुनीचें मरण सहदेवाच्या हातूनच घडावयाचें होतें. म्हणून विदुर धृतराष्ट्राला सांगतो कीं, 'शकुनीला सहदेवाच्या हांतून वाचीव.' **ओ. ८२. मृत्युकवे**–मृत्यूची झडप, उडी. 'मित्रत्वाच्या नात्यानें पांडवांशीं वागलास तरच तुझे पुत्र मृत्यूच्या तावडींतून सुटतील,' असें विदुर सांगतो. **ओ. ८३. निग्रहुनी रक्षावे**–ताब्यांत आणून रक्षावे. जर दुर्योधनादि पुत्र तुझें ऐकणार नाहींत, तर भीष्मद्रोणादिकांच्या मध्यस्थीनें त्यांना ताब्यांत आणून व पांडवांचा नाश करण्यापासून त्यांना परावृत्त करून त्यांचें पांडवांपासून रक्षण करावें. **ओ. ८५. काळजीं**–काळजांत, हृदयावर. **व्रण**–फोड. आपल्या हृदयांवर झालेला व्रण जसा आपल्या हळुवार हातानें कापला पाहिजे, त्याचप्रमाणें मोठ्या प्रेमानेंच दुर्योधनादि दुष्टांना शिक्षा केली पाहिजे. **ओ. ८६. रोकडा**–रोखठोक, स्पष्ट. **ओ. ८७. हे त्यागिल्या इ०**–हे सर्व दुर्योधनादि पुत्र व त्यांचें मित्रमंडळ सोडल्यावर. **ओ. ८८. वोपूनी**–देऊन, समर्पून. **इतुकेन**–असें केल्यानें. **ओ. ८९. धडकला**–अग्नीप्रमाणें भडकला. **दशशीर**–दहा तोंडाचा रावण. **ओ. ९०–९५,** धृतराष्ट्राला विदुराचा सल्ला न मानवल्यामुळें, तो त्याला पांडवांकडे घालवून देतो. **ओ. ९१.** 'तुझ्या ठिकाणीं ब्रह्मनिष्ठाचीं लक्षणें असून तूं ज्ञानी आहेस. शिवाय तूं समदर्शी बुद्धीचा असल्यामुळें, पांडव–कौरव किंवा शत्रू–मित्र असा भेदभाव वास्तविक तुला नसावा.' **ओ. ९३.** 'माझ्या हातीं राज्य आलें असें तुला वाटतें, पण मला मात्र सर्व जग शून्य भासतें. कारण तुझ्या (पांडवपक्षपाती) भावनांनीं माझा छळ होत आहे.' **ओ. ९४.** 'खरें पाहिलें तर पांडवांनीं द्यूतांत राज्य घालविलें, व आपल्याच वचनांत गुंतून त्यांनीं वनवास ओढवून घेतला आहे. मग पांडवांच्या बाजूनें बोलून तूं मला सारखा कां छळतोस?'

पांडवांच्या वनवासाचा व राज्यच्युतीचा दोष त्यांच्याकडेच आहे, असें धृतराष्ट्राचें म्हणणें. ओ. ९५. भ्राता–विदुर हा धृतराष्ट्राचा धाकटा भाऊच होता. ' तूं माझ्या दुःखांत समभागी होतोस म्हणून तुला मीं सल्ला विचारली, हा माझा मूर्खपणा झाला. ( कारण तूं पांडवांच्या बाजूनेंच बोलतोस.) आतां माझें मन द्विधा करूं नको. पांडवाकडे निघून जा. ' ओ. ९६ क्षत्ता–विदुर. ओ. ९७. श्रवण जाले इ.–धर्मराजानें ऐकलें. हांसोनि बोले इ.–धर्मराज हांसून भीमाला व अर्जुनाला बोलला, असाच येथें अर्थ आहे. भीम अर्जुनाला बोलला असा अर्थ काव्यसंग्रहकारांनीं केला आहे, तो चुकीचा आहे, व त्यावरून मुक्तेश्वराजवळ असलेली महाभारताची पोथी प्रचलित पोथीपेक्षां निराळी होती, हा त्यांचा तर्क या उदाहरणापुरता तरी निराधार आहे. ओ. ९८. पुढतीं––पुनः विदुर कां आला असावा याबद्दल धर्मराजानें काढलेले तर्क येथें दिले आहेत. धृतराष्ट्राला पश्चात्ताप होऊन भीष्मद्रोणांच्या विचारानें आपलें हिरावून घेतलेलें राज्य त्यानें परत दिलें हें सांगण्याकरितांच विदुर आला असावा, असा धर्मराजाचा तर्क. ओ. १००. विशीं––विषयीं. ओ. १०१. नातळे––शिवत नाहीं. ओ. १०२. देवद्रुमा–हे कल्पवृक्षा ! ओ. १०४. अंबिकासुत–धृतराष्ट्र. धृतराष्ट्राला विदुराचा वियोग होतो.

ओ. १०५. धृतराष्ट्र अंधळा असल्यामुळें, शरीरानें जसा तो असहाय होता तसाच विदुर गेल्यामुळें बुद्धीनेंही तो असहाय झाला. सर्व सल्लामसलत धृतराष्ट्राला विदुरच देत होता. तो गेल्यावर काय करावें हें राजाला समजेना. ओ. १०९. अंघ्र–पाय. वडील भावाचे पाय पहा. धृतराष्ट्राचें दर्शन घे. व्यग्र–दुःखित. ओ. ११०. गजाव्हय–हस्तिनापुर. पूर्वजपाया–वडील भावाच्या पायास. प्रज्ञाचक्षू–धृतराष्ट्र. त्याला डोळे नसल्यामुळें, बुद्धि हीच त्याचे डोळे झाली होती. ओ. १११.–विदुर परत आलेला पाहून दुर्योधनादिकांना वाईट वाटलें. ओ. ११४. दळभारेंशीं–सैन्यासह. सांडावे–' टाकावे ' याबद्दल मुक्तेश्वर हा शब्द योजतो. ओ. ११५. जोंपर्यंत यादव, पांचाल इत्यादि पांडवांचे मित्र दूर आहेत, श्रीकृष्ण जो त्यांचा पाठीराखा जवळ नाहीं, तोंपर्यंत पांडव एकटे पाहून मारून टाकावे, असा दुर्योधनादिकांचा बेत. ओ. ११६. भीष्मद्रोणांना क

धृतराष्ट्राला न कळतां पांडवांना मारण्याचा दुर्योधनादिकांचा विचार. **पुढां प्रकट इ.**–पांडवांना एकदां मारल्यानंतर सर्वांना ओघानेंच कळेल. **ओ. ११७.** व्यास मनकवडा दिसतो. अशा वेळीं तो अकस्मात् येतो. **ओ. ११८. सुपुत्रा**–धृतराष्ट्रा ! व्यास हे धृतराष्ट्राला पितृस्थानींच होते. दुर्योधनाच्या कपटी बेताबद्दल व्यास धृतराष्ट्रालाच दोषी ठरवितात. **विचारिशी**–विचार करिशी. **ओ. ११९. मागुतीं**–इतकें करूनही. **ते**–दुर्योधनादि. **ओ. १२०.** 'जर माझ्या मुलांचा कपटी बेत मला ठाऊक असेल किंवा त्यांना मी प्रेरणा दिली असेल, तर तुझ्या पायाची शपथ'. **ओ. १२१. त्रिशुद्धि**–त्रिवार सत्य. **ओ. १२२.** धृतराष्ट्राची प्रतिज्ञा ऐकून दुर्योधनादिकांनीं पांडवनाशाचा आपला बेत सोडून दिला. **आवांका**–विचार. **अवधारी**–ऐक. **ओ. १२३.** व्यास धृतराष्ट्राला सुरभीची कथा सांगतात. **चारी खाणी**–उद्भिज, अंडज, स्वेदज, व जरायुज असे चार प्रकारचे प्राणी. कामधेनू इंद्राजवळ जाऊन तक्रार करते. **ओ. १२४. वृषभ**–बैल. **ओ. १२५. शकट**–गाडे. **ओ. १२६–१३०.** आपल्या पुत्रांना–बैलांना कसे कष्ट भोगावे लागतात याचें कामधेनु वर्णन करते. **ओ. १२६. गालीप्रदान**–शिवी देणें. **ओ. १२७. नेदित**–देत नाहींत. **ओ. १२८. बोभाती**–ओरडती, हांक मारती. **ओ. १२९. अनामिका**–अंत्यजास. **ऐसें कर्म इ०**–'हे इंद्रा ! असें कर्म त्यांच्या नशिबीं कां लिहिलें ?' असा कामधेनूचा प्रश्न. **ओ. १३१–१३३.** इंद्र, कामधेनूचें कसें तरी समाधान करण्याचा प्रयत्न करीत आहे. **ओ. १३४. येरी**–दुसरी, कामधेनु. आईला आपलीं सुखी किंवा दुःखी मुलें सर्व सारखींच. त्यांतही जीं मुलें सात्त्विक पण अभागी आहेत, त्यांच्याबद्दलच आईला अधिक कळवळा वाटतो, असा कामधेनूचा युक्तिवाद. **ओ. १३६.** स्वेच्छाचारी व मदोन्मत्त लोकांनीं केलेला छळ, कामधेनु वर्णन करते. **बोकाळती**–माजती. **फुंपाटती**–ओरडती. **ओ. १३७.** अशा लोकांना वेदप्रणीत नियमांची वेसण घालून, व आचारांच्या दावणीला बांधून शिक्षा केली पाहिजे, अशी ब्रह्मदेवाची आज्ञा आहे. **ओ. १३९.** बैलांचा सांभाळ करणारास इंद्राचा वर. **ओ. १४१.** बैलांना नाहक छळणाऱ्यांना इंद्राचा शाप. **अवर्षण**–पाऊस न पडणें. **दुर्भिक्षीं**-दुष्काळांत. **ओ. १४२.** बैलांचा सांभाळ न करणारास

कोणत्या आपत्ति भोगाव्या लागतील, त्यांचें इंद्र वर्णन करतो. धान्यावर व विशेषतः जोंधळयावर पडणाऱ्या; कांहीं रोगांचीं नांवें येथें दिलीं आहेत. **स्वचक्र**—स्वकीयांचा हल्ला. **परचक्र**-परकीयांचा हल्ला. **टोळ**-टोळधाड. **मूषक**-उंदीर. हे प्रकार, सहा ईतिपैकींच आहेत. पहा-'अतिवृष्टिरनावृष्टि-मूषका शलभाः शुकाः । प्रत्यासन्नाश्च राजानः षडेता ईतयः स्मृताः॥' किंवा स्वचक्रं परचक्रं च सप्तैता ईतयः स्मृताः॥' **चिकट**-जोंधळयावर पडणारा चिकट्या रोग. **तांबरा**-जोंधळयावर हा रोग पडून जोंधळा तांबडा होतो. **आळिक**--या रोगानें दाण्यांत आळ्या होतात. **दुग्धश्रवा**-हाही धान्यावरचा एक रोग दिसतो. कदाचित् दाण्यांतून दूध गळण्याचा हा रोग असावा. **ओ. १४४.** 'ज्या वासरांना गवत खातां येत नाहीं, जीं अजून आईला पितात, अशा भुकेल्या वासरांना त्यांच्या आईच्या कांसेपासून जे ओढतात त्यांच्या वंशाचा मी नाश करीन.' असें इंद्र म्हणतो. **ओ.** १४६. या सुरभीच्या गोष्टीचा दाखला घेऊन तूंही आपल्या मुलांप्रमाणेंच पांडवांना वागीव,' असें व्यास धृतराष्ट्राला सांगतात. वर दिलेली सुरभीकथा मूळ भारतांत थोडी निराळी आहे. मुक्तेश्वरानें वर्णिलेला इंद्राचा शाप व वर, प्रचलित महाभारताच्या प्रतींत नाहीं. त्याचप्रमाणें निरनिराळया धान्यरोगांचा मुक्तेश्वरानें केलेला उल्लेख प्रचलित महाभारतांत नाहीं. यावरून मुक्तेश्वरापुढील महाभारताची प्रत हल्लींहून निराळी असावी. किंवा पदरचें वर्णन तरी तो आपल्या ग्रंथात घालीत असावा. **बहुसाल**-पुष्कळ, फार. ओ. १४७-१५८. व्यास पांडवांबद्दल धृतराष्ट्राजवळ रदबदली करतात व त्यांच्याशीं सख्य करून त्यांना परत आणण्याचा उपदेश करतात. **ओ. १४८. भणंगप्राय**-भिकाऱ्याप्रमाणें. **ओ. १५१.** विदुर हा व्यासापासून झालेला दासीपुत्र होता. धृतराष्ट्र व पांडु हेही विचित्रवीर्याच्या पत्नीच्या ठिकाणीं व्यासापासूनच उत्पन्न झाले होते. **ओ. १५६ बुझावीं**-समजावणी कर. **ओ. १५८. पुढतो पुढतीं**--पुनःपुनः ओ. १६०. आपणास केलेला उपदेश दुर्योधनाला करावा, असें धृतराष्ट्र व्यासाला सांगत असतां, व्यासानें तें काम मैत्रेयावर कां ढकलावें समजत नाहीं. दुर्योधनाकडून आपली शोभा होईल अशी शंका तर व्यासांना आली नसेल ना! **ओ. १६२.** मैत्रेयानें केलेला उपदेश दुर्योधनानें ऐकला नाहीं, मैत्रेयऋषीचा शापरूपी

दगड, म्हणूनच त्याच्या हृदयाच्या मर्मी बसला. मैत्रेयानें दुर्योधनाला शाप दिला.

---

## अध्याय दुसरा

धृतराष्ट्रानें मैत्रेयाचें स्वागत केल्यावर मैत्रेयानें आपण तीर्थें करीत काम्यकवनाला कसे गेलों, व तेथें वनवासी पांडव पाहून आपणांस कसें दुःख झालें, याचें वर्णन केलें. दुर्योधनादिकांनीं पांडवांशीं मांडलेल्या कलहाबद्दल धृतराष्ट्राजवळ नापसंती व्यक्त करून मैत्रेय म्हणाला, 'हे राजा, हें असेंच चालेल तर भीष्मासारख्या योद्ध्यालाही रणांत पराजय घडून तुला पुत्रशोक करावा लागेल.' नंतर त्यानें दुर्योधनाला पुष्कळ उपदेश केला, व पांडवांशीं सख्य करून त्यांचें राज्य त्यांस परत देण्यास सांगितलें. आपल्या या 'उपदेशाचा" दुर्योधनाला फार राग आला असें पाहून मैत्रेयानें त्याला असा शाप दिला कीं, 'माझें जर न ऐकशील तर भीमाकडून तुला खात्रीनें मरण येईल. मी सांगतो तसें ऐकशील तर मात्र तुझा कुलक्षय टळेल.' भीमाचा पराक्रम सांगतांना मैत्रेयानें किर्मीर-राक्षसाच्या वधाचा उल्लेख केला होता, हें पाहून धृतराष्ट्रानें किर्मीर-वधाची हकीकत मैत्रेयाला विचारली. ही हकीकत सांगण्याचें काम विदुरा-वर टाकून मैत्रेय गेल्यावर, विदुरानें किर्मीरवधाचें साग्र वर्णन केलें. या वर्णनानें धृतराष्ट्राची भीमाबद्दलची भीति अधिक वाढली. इकडे पांडवांचें राज्य जाऊन त्यांना वनवास घडल्याचें वृत्त समजतांच, श्रीकृष्ण आपल्या यादव सेनेसह धर्मराजाकडे आला. श्रीकृष्णानें सर्वांचें सांत्वन करून कौरवांच्या पुढील नाशाचें भविष्य सांगितलें. पांडवांकडील वीरां-नींही निरनिराळ्या कौरववीरांना मारण्याच्या प्रतिज्ञा केल्या. श्रीकृष्ण

अनुक्रम ......
विभाग ......

धर्मराजाला म्हणाला, 'तुमचें द्यूत खेळणे चाललें होतें त्यावेळीं शाल्वानें द्वारकेवर स्वारी केल्यामुळें मी लढाईत गुंतलों होतों. नाहींतर मी तुम्हांला द्यूतच खेळूं दिलें नसतें. असो, पण याचें उट्टें आपण काढूं.' इतका कथा-भाग या अध्यायांत आला आहे.

ओ. ४. स्वर्ग, मृत्यु व पाताळ या तिन्हीं लोकांत दुर्योधनाला कोणी चांगला म्हणत नाहीं. ओ. ६. 'दुसऱ्याचें चांगलें करूनही आपलें चांगलें होत नाहीं, मग अधर्मानें वागून चांगलें कसें होईल ?' दुर्योधनाचें पांडवांशीं वर्तन, म्हणजे विष भक्षण करून अमर होण्याचाच उलटा प्रकार आहे, असा मैत्रेयाचा आशय. ओ. ७. मैत्रेय धृतराष्ट्रास म्हणतो. पितामहो–भीष्म. वर्तमान असतां–हयात असतां. पुत्रीं–दुर्योधनादि-कांनीं व पांडवांनीं. ओ. ८. भीड सोडुनी इ–'भीड बाजूला सारून तूं दुर्योधनाला कां निक्षून सांगत नाहींस ?' ओ. ९. मैत्रेय दुर्योधनाला म्हणतो. ओ. १०. 'हें नश्वर राज्य तूं हातोंहात मिळविलेंस. पण पांड-वांशीं वैर करून अपकीर्ति मात्र कायमची मिळविलीस. कवण्या दृष्टीं–कोणत्या हेतूनें. 'तूं काय म्हणून आपली बुद्धि वाईट विषयांत गुंतव-लीस ?' ओ. ११. पांडवांशीं विरोध करण्याचा रोग तुझ्या मित्रांसह तुला जडला आहे. संगिया संगीं–मित्रांबरोबर. भ्रूलतेचे रोम–भुवयांचे केस. तापासारख्या रोगांत भुंवयाचे केस जातात. हेंच वैद्यक रूपक पुढें चाल-वून मैत्रेय दुर्योधनास म्हणतो, 'रोग्याचे भुंवयाचे केस जाऊन तो जसा विद्रूप बनतो, तसाच पांडवांशीं चिरकाल वैर केल्यानें तूंही विवेकभ्रष्ट झाला आहेस.' ओ. १२. दीर्घकालीन आजारांत ज्याप्रमाणें नाकाची वास घेण्याची शक्ति जाते, तद्वतच पांडवांशीं दीर्घकाल विरोध करून तुझी प्रतिष्ठा गेली आहे. घ्राण–नाकाची वास घेण्याची शक्ति. ओ. १३. दुर्योधनाला जडलेल्या विरोधरूपी रोगाला मैत्रेय औषध सांगतो. ओ. १४. राहाटी–वागणूक. साक्षेपें–मुद्दाम. ओ. १५. सौबळ–शकुनि. शकु-नीनें सर्वांना द्यूत खेळण्यास उद्युक्त करून संकटांत घातलें. ओ. १७. ओखद–औषध. ओ. १९. नागायुतबळसंपन्न–दहा हजार हत्तींच्या शक्तीनें युक्त. अयुत–दहा हजार. जामदग्न्य–परशुराम. यानेंच कार्त-

वीर्याला मारून पृथ्वी निःक्षत्रिय करण्याची प्रतिज्ञा केली. ओ. २३. मैत्रेय सांगतो, 'तुम्ही पांडवांना राज्य परत दिलें नाहीं तर तुमचें कुळ नष्ट होईल. हें माझें म्हणणें खोटें होईल तर सूर्य पृथ्वीवर पडेल.' म्हणजे सूर्य पतन पावणें जितकें अशक्य तितकेंच आपलें बोलणें खोटें होणें अशक्य, असा मैत्रेयाचा अभिप्राय. ओ. २४–२५. मैत्रेय भीमाचा पराक्रम वर्णन करतो. ओ. २५. प्रस्तुत–भीमसेनानें वनवासांतच किर्मीर राक्षसाचा नुक्ताच वध केला होता, व मैत्रेय तर पांडवांना यावेळींच भेटून आला होता. ओ. २६. आरक्तता–तांबडेपणा. दुर्योधनाचे डोळे रागानें खदिराच्या लाकडाच्या निखाऱ्याप्रमाणें तांबडे लाल झाले. ओ. २७. महाविखार–मोठा सर्प. गजशुंडाकार कर–हत्तीच्या सोंडेच्या आकाराच्यां हातांनीं दुर्योधनानें मांडीवर शड्डू थोपटला. दुर्योधनानें आपल्या रागाचा आविर्भाव अनेक रीतीनें दाखविला आहे. ओ. ३०. 'ज्या मांडीवर तूं आतां शड्डू मारलास, तीच रणांगणांत भीमाच्या गदेनें चूर्ण होईल.' असा मैत्रेयाचा शाप. रणचत्वर–रणांगण.

ओ. ३१. अभंग–मोडणें अशक्य. ओ. ३२. उच्छाप–दिलेल्या शापासून मुक्त होण्यासाठीं दिलेला वर. ओ. ३३. या मैत्रेयाच्या शापाचा पुढें फार विचार न करतां धृतराष्ट्र किर्मीरवधाची हकीकत विचारतो, हें आश्चर्य आहे. ओ. ३७. विदुर किर्मीरवधाचे वर्णन करतो. अहोरात्रीं–दिवसा व रात्रीं. ओ. ३८. भूशय्या–पांडवांना जमिनीवरच निजावें लागलें. ओ. ३९. भूप्रळयो–पृथ्वीप्रळय. राक्षसाच्या आगमनप्रसंगीं पृथ्वीप्रळयाप्रमाणें प्रकार घडले. धूसर–धुरळा. ओ. ४०. शंके–भ्याली. प्राणधाकें–प्राणाच्या भीतीनें. ओ. ४१. किर्मीर राक्षसानें पांडवांचा मार्ग आडविला. ओ. ४२. राक्षसाचें वर्णन. भोवंडी–फिरवी. वैश्वानर–अग्नि. राक्षसाच्या नाका–तोंडांतून अग्नीच्या ज्वाळाच जणुं निघत होत्या. ओ. ४५. भीमाला मारून किर्मीर आपल्या भावाचा सूड घेऊं इच्छितो. ओ. ४७. याज्ञसेनी–द्रौपदी. राक्षसाला पाहून तिला मूर्च्छा आली, व ती धर्मराजाला जाऊन बिलगली. धर्मरूपी वृक्षाला जशी कीर्तिरूपी लता बिलगते, तद्वतच द्रौपदी धर्माला बिलगली. ओ. ४८. धनुर्धरू–

अर्जुन. ओ. ४९. आपल्या हातानेंच किर्मीर राक्षसाचा अंत होणार आहे म्हणून भीमसेनानें अर्जुनास स्वस्थ बसण्यास सांगितलें. भीमाला हें भविष्य कसें समजलें? किंवा किर्मीराला मारण्याची भीमाला खात्रीच होती, म्हणून आत्मविश्वासानें त्यानें असें अर्जुनाला सांगितलें असावें. ओ. ५०. भीमाचें आणि त्या राक्षसाचें युद्ध होतांना ते परस्परांशीं कसे भिडले याचें वर्णन केलें आहे. **नंदिकेश्वरू**–शंकर. **नर**–भीम. **निशाचर**–किर्मीर. **युद्धकदनीं**–युद्धाच्या कत्तलींत. ओ. ५१. दोघेही झाडें उपडून युद्ध करीत असल्यामुळें, सर्व वन थोड्या वेळांत वृक्षरहित झालें. **चंड**–मोठे. ओ. ५२ **क्रोश. द्वि**–कोस दोन कोस उंचीचीं पर्वतांचीं शिखरें उपडून ते एकमेकांवर फेकीत होते, व तीं संपल्यावर ते मल्लयुद्ध खेळूं लागले. ओ. ५३ **राज्यदारार्थी**–राज्यासाठीं व पत्नीसाठीं पूर्वी वाली व सुग्रीव या वानरराजांमध्यें युद्ध झालें होतें. त्यांचीच उपमा, भीम–किर्मीरांना दिली आहे. ओ. ५४. मल्लयुद्धांतील अनेक पेंच येथें दिले आहेत. मुक्तेश्वराला मल्लविद्येचें ज्ञान असावें. सभापर्वांतील भीम–जरासंध युद्ध-वर्णनांत मल्लविद्येचे असेंच ज्ञान त्यानें प्रकट केलें आहे. **लथडवे**–लत्ताप्रहार. **थडका**–ठोसे. **हुणमिया**–थापट्या. ओ. ५५. **कळे**–कळ, दुःखाची रग. **ग्रीवा**–मान, कंठ. **थापा**–थापट्या, चडकणें. ओ. ५६. हातपाय एके ठिकाणीं बांधून वर आकाशांत लाथेनें उडवीत होते. **मूर्ध्नी**–डोक्यावर. **तळपती**–झटापट करिती. ओ. ५७ **न लेखिती**–जुमानीत नव्हते. **येर येरां**–परस्परांना. **आरण्यरोही**–अरण्यांत वाढलेले. ओ. ५८–सुंदर स्त्रीच्या कटाक्षांचा परिणाम विरक्तावर जसा कांहींच होत नाहीं, तसा त्या राक्षसाच्या आघातांचा परिणाम भीमावर होत नव्हता. ओ. ५९–धर्माचरणाचे शब्द जसे अनाचारी माणसाला झोंबतात, तद्वतच भीमाचे आघात किर्मीराला अतिशय दुःखदायक झाले. ओ. ६०. एकाद्या पशूला दावें बांधून ओढावा त्याप्रमाणें, त्या राक्षसाच्या गळ्यांत आपले हात घालून भीमानें त्याला हिसका दिला. त्यावेळीं तो राक्षस एकाद्या पर्वताप्रमाणें त्याच्या पायाजवळ कोसळला. **आसुडणें**–हिसका देणें. **शैलपाडें**–पर्वताप्रमाणें ओ. ६१. भीमसेनाचें भाषण. 'मीच तुझा मृत्युकाळीं संगत करणारा आहे. तुझें

चरें वाईट करणें माझ्याच हातीं आहे.' उपडा–उताणा. ओ. ६३. शुभ्रवर्ण इ०–डोळे पांढरे झाले. ओ. ६४. किर्मीर कसा उलथून पडला त्याचें वर्णन. लवथवित–लवलवणारी, लवलवीत. पहा–'लवथवती विक्राळा ब्रम्हांड माळा'–शंकराची आरती. वमित–ओकत. कल्लोल–लाटा. ओ. ६५. त्राहाटणें–आपटणें. भीमाचें हें भाषण उपरोधिक आहे. किर्मीर आपल्या बक नांवाच्या भावाचा सूड घेण्यासाठीं भीमावर चालून आला होता. म्हणून भीम म्हणतो कीं, 'आतां स्वर्गांतील बकासुराचे अश्रु तूंच तेथें जाऊन आपल्याच हातानें पूस.' ओ. ६६. भीमाच्या विजयानें स्वर्गांतील देवांना आनंद. निर्जरीं–देवांनीं. आतुर्बळी–अतिबलाढ्य. ओ. ६९. तम–मोह. चिंतागर्तें–चिंतारूपी खळग्यांत. आपल्या हिताची वागणूक सोडल्यामुळें, धृतराष्ट्राला काळजींत पडावें लागलें. ओ. ७०. हे विदुराचे शब्द आहेत. 'ज्या भीमानें मोठमोठे राक्षस मारले, त्याशीं विरोध अथवा वैर करून तुझे पुत्र कसे वाचणार?' ओ. ७१. सांकडा–संकटांत. ओ. ७२. पांडवांच्या वनवासाचें वृत्त श्रीकृष्णाला कळतें. अधोक्षज–श्रीकृष्ण. ओ. ७३. संजोगुनी–जोडून. ओ. ७४. भगिनीचे–द्रौपदीची कौरवांनीं केलेली विटंबना ऐकून. ओ. ७७. धाय मोकलणें–हंबरडा फोडणें. ओ. ७८. श्रीकृष्ण द्रौपदीचें सांत्वन करतो. ओ. ७९. खेदसंताप इ०–दुःखाचा वायु आपल्या मनाला लागूं देऊं नका. दुःख करून घेऊं नका. ओ. ८०. धराभारा–पृथ्वीचें ओझें. कौरव हे पापी राक्षस असल्यानें त्यांच्या अस्तित्वानें पृथ्वीला होणारा भार, त्यांच्या मरणानें कमी होईल असा भाव. फेडीन–नाहींसा करीन.

ओ. ८१. नेमस्त–खात्रीनें. निवटील–मारील. ओ. ८२. वृकोदर–भीम. ओ. ८४. धर्मराजानें द्यूतांत हरल्यावर वनवास पत्करण्याचें जें वचन कौरवांना दिलें आहे, त्यामुळें कौरवांवर हल्ला करण्याच्या आमच्या कार्यास धर्मराजाचा पाठिंबा नाहीं असें अर्जुनाचें म्हणणें. ओ. ८५. श्रीकृष्णाच्या द्वारकेवर शाल्वानें हल्ला केल्यामुळें, तोही यावेळीं थोडासा लढाईत गुंतलेलाच होता. म्हणून कौरवांवर हल्ला करण्याच्या पांडवांच्या बेतास पुष्टी देण्यास तोही तितका उत्सुक नव्हता. नावेक–क्षणभर,

थोडासा. ओ. ८६. पांडवांची खबर घेण्यांत आपणाकडून दिरंगाई झाली, हें श्रीकृष्ण कबूल करतो. ओ. ८७. पाडुनि इ०-शकुनीचे दांत पाडून त्याचे कपटी फासे फोडून टाकले असते. ओ. ८८-८९. 'आपण असतों तर वनवासाचा प्रसंग धर्मराजावर आला नसता' असें श्रीकृष्ण सांगतो. ओ. ९०. चामके-जाई.

—※—

## अध्याय तिसरा.

शाल्वानें द्वारकेवर कां स्वारी केली याचें कारण धर्मानें श्रीकृष्णाला विचारलें असतां, श्रीकृष्णानें शिशुपाळवधाचें कारण सांगून शाल्वाच्या स्वारीचें वर्णन केलें. आपल्या प्रद्युम्न, चारुदेष्ण, सांब इत्यादि पुत्रांनीं दारुण युद्ध करून शाल्वाचा कसा प्रतिकार केला, पण शेवटीं आपल्याच हातून शाल्व कसा मृत्यु पावला, ही सर्व इत्थंभूत हकीकत या अध्यायांत श्रीकृष्णानें धर्माला सांगितली आहे. शेवटीं पांडवांना पुढील जयाचें आश्वासन देऊन सुभद्रेसह श्रीकृष्ण द्वारकेस गेला. धृष्टद्युम्न देखील १३ वर्षांनंतर कौरवांचा वध करण्यासाठीं येण्याचें वचन देऊन आपल्या पांचाल देशाला गेला. पांडव यानंतर काम्यकवन सोडून अद्वैतवनाला गेले. ओ. २. राजसूय यज्ञांत शिशुपाल श्रीकृष्णाला कांहीं अपमानकारक बोलला म्हणून श्रीकृष्णाकडून तो मारला गेला. सौभें-शाल्वानें. शाल्व हा शिशुपालाचा बंधु. भावाच्या वधाचा सूड उगवण्यासाठीं यानें द्वारकेवर स्वारी केली. ओ. ४. विमानयानीं-विमानांनीं व रथांनीं. भार-समुदाय. ओ. ५. खचिल्या-नष्ट केल्या. परिघ-प्राकार, घेर. पाळी-बंधारा. पौळी-भिंत, तट. आटाळी-गच्ची, मनोरा. पहा-"वाटाविर्दी नामभरें अटाळ्या। पौरांगना वाजवितात टाळ्या ॥"-सामराज, रुक्मिणीहरण ५।१२. ओ. ६.

प्रजाबाळकें–प्रजारूपी बालकें, प्रजा. ओ. ७. शाल्वाची दुरुक्ति. ओ. ९. सांब–जांबवंतीपासून झालेला श्रीकृष्णाचा मुलगा. गद–यादव वीर. अक्रूर–यादव, श्रीकृष्णाचा भक्त. प्रद्युम्न– श्रीकृष्णाचा रुक्मिणीपासून झालेला पुत्र. ओ. ११. उग्रसेन–श्रीकृष्णाचा मातामह, आजा. यंत्रें–तोफांनीं. औषधें–दारुसामानानें. गुल्मीं–गुल्म–सैन्याचा विभाग. गुल्मांत ४५ पदाति, २७ घोडे, ९ रथ व ९ हत्ती असतात. ओ. १३. लोहो इ०–लोखंडाच्या पिंजऱ्यांनींच वेष्टिली होती कीं काय अशी. शाल्वाचे वीर योद्धे, लोखंडाच्या पिंजऱ्याप्रमाणें अभेद्य होते. ओ. १४. ओजा–चांगल्याप्रकारें.

ओ. १५. क्षेमवृद्धि–हा शाल्वाचा प्रधान. मोकली–सोडी. जलधरु–मेघ. ओ. १७. पाठ देऊन पळणें–युद्धांत पराजय होऊन पळून जाणें. क्षेमवृद्धि रणांगणांतून पळाला. ओ. १८. उजू–समोर, कडे. ओ. २०. दानव–क्षेमवृद्धि. प्राणें विघडे–प्राणांनीं वियोग करणें, मरणें. घालून होडें–पैज मारून. विविधनामा–दुसरा राक्षसवीर. ओ. २१. चारुदेष्ण–हा कृष्णाचा रुक्मिणीपासून झालेला पुत्र. ओ. २२. मौळ–शिर, डोकें. ओ. २४. वांकुडी–वृष्टि. भाविला–मानला. ओ. २५. भीमकीचा–रुक्मिणीचा. कुसुमशराचें–कृष्णाचा मुलगा प्रद्युम्न हाच मदन. त्याचे बाण पुष्पाचे असतात म्हणून त्याला कुसुमशरही म्हणतात. मदनाचें शरसंधान शंकराला व प्रत्यक्ष ब्रह्मदेवालाही असह्य होतें. मदनबाधेंतून कोण सुटला आहे? ओ. २७. त्रिपुर–मयासुरानें लोह, रौप्य व सुवर्ण यांचीं तीन पुरें निर्माण करून त्यांचें आधिपत्य तारकासुर, कमलाक्ष व विद्युन्माली यांना दिलें होतें. महादेवांनीं या तीन पुरांचा नाश करून पर्यायानें त्या तीन राक्षसांचाही नाश केला. ओ. २८. चक्रीं इ०–प्रद्युम्नाच्या रथाचीं चाकें इतकीं तेजस्वी होतीं कीं, त्या ठिकाणीं सूर्य व चंद्रच बसविले आहेत असें भासलें. ओ. २९. दारुक–श्रीकृष्णाचा सारथी. विगति–विविध गति. ओ. ३२. गात्रें गात्रें–प्रत्येक अवयव. ओ. ३३. मुख्य धुर–मुख्य पुढारी, म्होरक्या शाल्व. दाही दिशा इ०–शाल्वाचें सैन्य, दाही दिशा पळूं लागलें. ओ. ३४. मुहूर्त–अडीच घटिका.

ओ. ३५. लवामाजीं–क्षणांत. हस्तलाघव–बाण सोडण्यांत हाताचें कौशल्य. निवारितां–दूर करीत असतांना. ओ. ३६. बळी–पाताळाचा राजा. हा शाल्वाकडून प्रद्युम्नाशीं लढत होता. ओ. ३७. पहुडला–निजला. गुढारीं–रथाच्या हौद्यांत. ओ. ३८. महामारु–मोठा हल्ला. अंगप्रत्यंगीं इ०–शरीराच्या प्रत्येक भागीं घोडे जखमी झाले. रहंवरु–रथ. सारथ्यानें प्रद्युम्नाचा रथ द्वारकेकडे परत फिरवून आपल्या मालकाचें रक्षण करण्याचा थोडा भ्याडपणाचा मार्ग अवलंबिला. ओ. ४०. आपला रथ परत फिरला हें पाहून प्रद्युम्नाला आपल्या सारथ्याचा फार राग येऊन तो म्हणाला, 'रथ मागें कां फिरविलास? यामुळें निष्कारण अपयश अंगाला चिकटलें.' मात–शब्द. ओ. ४१. प्रद्युम्न पुढें म्हणतो कीं, 'आपला रथ परत फिरलासें पाहून श्रीकृष्ण, बलराम व सात्यकी यांना वाईट वाटेल व आपल्या यादव कुलांत प्रद्युम्न हा नपुंसक जन्माला आला काय असें ते म्हणतील.' ओ. ४२. आपण रथ परत कां फिरविला, याचें सारथी समर्थन करतो. विषम वेळे इ०–सारथ्याचें म्हणणें असें कीं, 'अपशकुन झाला असतां परत फिरण्याची जशी चाल आहे, त्याप्रमाणें आपणाला या लढाईत वाईट वेळ आहे असें पाहून मी या वेळेला थोडें पडतें घेतलें.' ओ. ४३. अचलां–पर्वताला. इंद्राचें वज्र जसें पर्वतांचें चूर्ण करतें, तद्वत् मी शत्रूचें सैन्य मारीन असा भाव. ओ. ४४. रथकेसरी–रथश्रेष्ठ. शत्रुभार इ.–शत्रूंच्या सैन्यरूपी हत्तींच्या डोक्यांतील यशरूपीं मोत्यें मिळविण्यास. हत्तींच्या डोक्यांत मोतीं असतात असा कविसंकेत आहे. शत्रूरूपीं हत्तींच्या डोक्यांतील यशरूपीं मोतीं मिळविणें म्हणजेच शत्रूवर जय मिळविणें होय. ओ. ४५. आणिके–दुसऱ्या. ओ. ४७. प्रद्युम्नानें आतां आपलें ब्रह्मास्त्र काढलें. सद्गुरुमुखापासूनियां–जें ब्रह्मास्त्र श्रीकृष्णसद्गुरूच्या मुखानें मंत्रिलेलें होतें. ओ. ४८. तरणी–सूर्य. सागरांत इ०–पर्वतांपासून समुद्रापर्यंत सर्व पृथ्वी. ओ. ४९. भाळ–कपाळ. ओ. ५०. प्रद्युम्नानें शाल्वाचें डोकें उडविण्यासाठीं जो प्रासादिक बाण काढला, तो प्रळयकाळच्या लांब जिभा काढणाऱ्या अग्नीप्रमाणें भासला. वैश्वानर–अग्नि. ओ. ५१. प्रद्युम्नाचा बाण शाल्वाचा प्राण घेणार असें पाहून इंद्र व कुबेर यांनीं नारदाला

त्याच्याकडे पाठविलें. शक्र कुबेर– ही तृतीया घ्यावी. **पवनवेगें**– वाऱ्याच्या वेगानें, तातडीनें. ओ. ५२. शाल्वाचा मृत्यु कृष्णाच्या हातूनच व्हावयाचा हें पूर्वीच ठरलें असल्यानें, प्रद्युम्नानें त्याला मारूं नये असा इंद्राचा व कुबेराचा निरोप. हा निरोप चमत्कारिकच म्हटला पाहिजे. कारण यांत शौर्यापेक्षां पूर्वकर्मांवर किंवा दैववादावर सर्व भिस्त ठेवलेली दिसते. व हें सर्व श्रीकृष्णच आपल्या तोंडानें धर्माला सांगत असल्यामुळें आत्मप्रौढीचा दोष त्याला लागल्याशिवाय रहात नाहीं. ओ. ५७. प्रद्युम्नानें जीवदान दिलेल्या शाल्वास मारल्याशिवाय आपण द्वारकेंत प्रवेश करणार नाहीं, अशी श्रीकृष्ण प्रतिज्ञा करतो. ओ. ६०. **आड**– प्रतिबंधक. ओ. ६१. **मात**–वार्ता. **पांचजन्य**–श्रीकृष्णाचा शंख. **मारा पेटला**–हल्ला करण्यास उद्युक्त झाला. ओ. ६२.–राक्षसाच्या मायेचा खेळ. **मावेचे**–मायेचे, लटके. ओ. ६३. **विंदानी**–कुशल. ओ. ६५. निरनिराळीं शस्त्रें. **फरश**–फरशी, कुऱ्हाड. **पट्टीश**–दांडपट्टा. **पाश**–जाळें. **मुद्गल**–पेलण्याची लाकडाची जोडी. **शूल**–भाला. **तोमर**– घुसळण्याच्या रवीसारखें लोखंडाचें शस्त्र. ओ. ६६. **अंगारवृष्टि**– निखाऱ्याचा पाऊस. **सिकतावृष्टि**–वाळूचा पाऊस. **वातगिरी**–वात व गिरी असे निराळे शब्द मानले पाहिजेत. ओ. ६८. **मंत्रबाण**– मंतरलेले बाण. ओ. ७१. शाल्वाच्या कपटमायेचे आणखी खेळ. ओ. ७२. **धैर्यस्तंभ**––धैर्यरूपी स्तंभ हातानें घट्ट धर. अर्थात् धैर्य धर. **विष्णुस्मरणें**–श्रीकृष्णच विष्णूचा अवतार असतांना त्यानेंच विष्णूचा निर्वाळा देणें चमत्कारिक किंवा अयोग्य वाटतें. ओ. ७५. द्वारकेहून उग्रसेनाचा असा निरोप आला कीं, शाल्वानें वसुदेवावर ( श्रीकृष्णाच्या पित्यावर ) हल्ला करून त्याला ठार केला. **घालणें घालणें**–हल्ला करणें, छापा घालणें, ( Cognate object ). ओ.७६. आपल्या पित्याला असा घोका कसा प्राप्त झाला, याचें कृष्णाला कोडें पडलें. ओ. ८०. पद्य–क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशंति–भगवद्गीता. **येराच**–तेव्हांच. ओ.८२. वसुदेव मृत झालेला पाहून श्रीकृष्णाची मनःस्थिति. **रज्जुसर्प** इ०–साप समजून दोरीलाच जसे लोक भितात, त्याप्रमाणें श्रीकृष्णाला वसुदेवाचें प्रेत खरेंच आहे असा भ्रम होऊन तो स्तब्ध उभा राहिला. **नेणता**–अज्ञानी. **बोथरे**–

घाबरे. ओ. ८३. वसुदेवाचें प्रेत, रक्ताचा पाऊस वगैरे सर्व त्या राक्षसाची कपट-माया होती. तिनें श्रीकृष्णासारख्यालाही थोडा वेळ स्तिमित केलें. ओ. ८५. **पावकास्त्र**– अग्न्यस्त्र. ओ. ८८. **मार्तंडमंडळ**–सूर्यमंडळ. **नौकापोत**–लहान नाव. ओ. ९०. **पार्वतीचेनि वरें**–पार्वतीच्या पतीनें, शंकरानें. **विष्णुशरें**–विष्णुरूपी बाणानें. शिवानें त्रिपुरांचा नाश करतांना, विष्णु त्याच्या धनुष्याचा बाण झाला होता. ओ. ९२. श्रीकृष्णाच्या हातून मरण आल्यामुळें शाल्व शत्रू असूनही त्याला मोक्षपद प्राप्त झालें. **रणगीधा**–रणांगणावरच्या गिधाडांना. ओ. ९५. शाल्वाला मारण्यांत श्रीकृष्ण गुंतला असतां इकडे हस्तिनापुरांत पांडवांकडून द्यूत खेळण्याचा अविचार घडला. श्रीकृष्णाच्या गैरहजेरीमुळें ही आपत्ति आली. म्हणून त्याचा दोष किंवा बोल आपल्यावरच आला, असें श्रीकृष्णाचें म्हणणें. ओ. ९६. धर्मराजानें आतां १३ वर्षांच्या वनवासाची अट अंगावर घेतली आहे. तेव्हां आतां बोलून कांहीं उपयोगी नाहीं. **आधीं गेलिया** इ०– ‘ निर्गते जले किं सेतुबंधेन. ’ ओ. ९७. पाठीं–नंतर. ओ. १००.– ‘ माझें स्मरण करीत स्वस्थ रहा ’ असें श्रीकृष्णानें द्रौपदीस सांगणें थोडें अहंभावाचें वाटत नाहीं काय? ओ. १०१. **अष्टौभाव**–स्तंभ, स्वेद, रोमांच, स्वरभंग, वेपथु, वैवर्ण्य, अश्रू व प्रलय असे आठ सात्विक भाव. **वोसंडे**–कांठोकांठ भरून सांडणें. ओ. १०५. कृष्णानें व धृष्टद्युम्नानें दिलेलें द्रव्य व कपडे पांडवांनीं ब्राह्मणांना वाटलें. वनवासाच्या अटी त्यांनीं कसोशीनें पाळल्या. ओ. १०७. **अद्वैतवना**–भारतांत द्वैतवन असा उल्लेख आहे. ओ. १०८. वनपर्वकथाश्रवणानें चारी पुरुषार्थ साधतात. ओ. १०९. लीलाविश्वंभराच्या पायांच्या नखांना बोधरूपी यमकांचीच उपमा शोभेल. लीलाविश्वंभरांना वंदन केलें असतां बोध प्राप्त होतो, व त्यामुळेंच मुक्तेश्वरांचें चित्त अज्ञानरहित झालें आहे.

—*—

# अध्याय चवथा.

धर्मराज आपल्या बंधूंसह व ब्राह्मणांसह अद्वैतवनांत काळ क्रमीत असतां, तेथें मार्केडेय मुनी येऊन त्यांनीं धर्मराजाच्या स्थितीशीं समान असें श्रीरामाचें चरित्र त्याला निवेदन केलें. यानंतर बकादाल्भ्य मुनींनीं येऊन ब्राह्मणांच्या संगतीचें महत्त्व धर्मराजाला सांगितलें. पुढें द्रौपदीनें धर्मराजाची कानउघाडणी करून, त्यास शत्रूंना मारण्यास प्रोत्साहन दिलें, व व्यवहारांत क्रोध व शांति केव्हां धरावी याचें विवेचन केलें. पण धर्मराजानें वनवासाचें आपलें वचन पाळण्याचा निर्धार दाखविला. पुढें व्यासांनीं येऊन अर्जुनाला महाविद्याबीजमंत्र उपदेशिला, व या मंत्राच्या जपानें शंकर प्रसन्न होऊन अर्जुनाला पाशुपतास्त्राची प्राप्ति होईल असें सांगितलें. धर्मराजानेंही शत्रूंच्या नाशार्थ अशा अस्त्रासाठीं महादेवाला संतुष्ट करण्यास अर्जुनास सांगितलें. अर्जुन तपासाठीं उत्तरेकडे चालला, व हिमालय, गंधमादन व रत्नकील ओलांडून तो पुढें इंद्रकील पर्वतावर आला. तेथें त्यास इंद्र ब्राह्मणाच्या वेषांत भेटला व त्याजजवळ अर्जुनानें दिव्य अस्त्रांची मागणी केली. यावर इंद्रानें शंकरास संतुष्ट करण्यास त्यास सांगितलें. अर्जुनाच्या घोर तपानें शंकर संतुष्ट झाला व त्याची परीक्षा पाहण्यासाठी भिल्लाच्या वेषानें एका वराहाच्या पाठी लागला. तो वराह तप करीत असलेल्या अर्जुनास शरण आला व त्यावरून अर्जुन व शंकर यांचे घनघोर युद्ध झालें. युद्धानें शंकर प्रसन्न होऊन त्यांनीं अर्जुनास ब्रह्मशिरोनामास्त्र दिलें. या अस्त्राबरोबरच शत्रुनाशाचा वरही अर्जुनास शंकराकडून मिळाला.

ओ.३. वनवासास जातांना प्रजेनें पांडवांना बऱ्याच देणग्या दिलेल्या दिसतात. पण त्या त्यांनीं उदारपणानें ब्राह्मणांनाच दिल्या. **ओ. ४–५** अद्वैतवनवर्णन. निरनिराळे वृक्ष व पक्षी. **ओ. ४. मधु**–हरणवेल, हरण-दोडी. मोहाचें झाड असाही अर्थ आहे. **कर्णिकार**–पांगाऱ्याचें झाड. **ओ. ८. देवर्षी**–देव व ऋषि यांना ही आमची वनवासदशा पाहून दुःख

होतें. ओ. १०. जुन्या कपड्याप्रमाणें पृथ्वीचा त्याग करून. पहा–'वासांसि जीर्णानि यथा विहाय । नवानि गृण्हाति नरो पराणि ॥'—गीता. पितृ-वचनीं–दशरथवचनामुळें. ओ. ११. नातळे–न स्पर्शे. ओ. १२. आगळा–अधिक. धर्मागळा–धर्माची अर्गळा–अडसर. धर्माची मर्यादा. ओ. १३. म्हणोनि इ०–म्हणून १८ पुराणांचा जन्म झाला. ओ. १७. बकदाल्भ्य–या नांवाचा ऋषि. निरनिराळे ऋषि धर्मराजाच्या समाचारास येऊन त्याचें सांत्वन करतात. ओ. १८–३४. बकदाल्भ्य, ब्राह्मणांची महति वर्णन करून ब्राह्मणांची व्याख्या सांगतो. ओ. १९. ओळगण्या–याच्यापुढें 'येती' हें अध्याहृत घ्यावें.

ओ. २२. अंगत्राण–चिलखत. ओ. २५. वाचे इ.–जे बोलण्यांतही काम, क्रोध, लोभ दाखवीत नाहींत. ब्रह्मनिष्ठ–ब्रह्मचिंतनांत गढलेले. ओ. २७. वृत्तसंपन्न–चरित्रसंपन्न. या शब्दाचा 'संतोषयुक्त' हा काव्य-संग्रहकारांचा अर्थ योग्य वाटत नाहीं. ओ. २८. अग्नि व वायु एक-मेकांच्या सहाय्यानें ज्याप्रमाणें मोठीं अरण्यें समूळ नष्ट करतात, त्याप्रमाणें ब्राह्मणांच्या मंत्रांनीं व क्षत्रियांच्या शस्त्रांनीं शत्रूसमुदायाची होळी होते. ओ. २९ व ओ. ३१–३३. यांत धर्माबरोबर असणाऱ्या ऋषींचीं नांवें दिलीं आहेत. ओ. ३३. सुखाडले–सुख पावले. ओ. ३४–५८. यांत द्रौपदी धर्मराजाची कानउघाडणी करण्याच्या दृष्टीनें, प्रल्हादानें आपल्या पुत्राला केलेला उपदेश धर्माला सांगते. द्रौपदीची व्यवहारी विचक्षणता येथें चांगली प्रत्ययास येते. ओ. ३५. कवणेपरी इ०–' हे राजा, हें तूं काय आरंभलेंस ? हें तूं काय अंगावर घेतलेंस ?' ओ. ३६. शिलोंच्छवृत्ती–शेतांतील पीक नेल्यावर पडलेल्या धान्यकणांवर उपजीविका करणारे. ओ. ३७. वेचितां इ०–जो जन्म पुष्कळ धन खर्चूनही क्षणा-प्रमाणें भासतो, तो तूं सर्व वनवासांत घालविलास. तूं जन्माचें काय सार्थक केलेंस ? असा भाव. ओ. ४०. दादुले–पति. माझे पंच भ्रतार. ओ. ४१. नुसत्या समाधानी वृत्तीचा द्रौपदी निषेध करते. ओ. ४२. जो राजा आपलें प्रजापालनाचें कर्तव्य सोडतो, तो अधर्मच आचरतो. आत्यंतिक शांति ही सर्वांनाच दुःखदायक आहे.

ओ. ४३. **विरोचन**–हा प्रल्हादाचा मुलगा. मूळ भारतांत हा संवाद बळी व प्रल्हाद, असा नातू व आजा यांच्यांत झाल्याचा उल्लेख आहे. ओ. ४४–५८. शांति कोठें धरावी व क्रोध कोठें अवलंबावा याचा सारासार विचार सांगतात. ओ. ४६. **आपणिया**–आपणहून. ओ. ४७. शांतियुक्त मनुष्याची पत्नी आपल्या पतीची आज्ञा धिक्कारते, व त्याचा मुलगा मेहुण्याप्रमाणें त्याची थट्टा करतो. बायकापोरें अशा शांत मनुष्याची अवज्ञा करतात, असा अभिप्राय. ओ. ५०. **पारके**–परके लोक. ओ. ५१. सत्वगुण परमार्थाला शोभा आणतो, पण प्रपंचांत तो कुचकामाचा आहे. ओ. ५२. **लोहकार्य** इ०–लोखंडाचें कार्य सोन्याकडून होत नाहीं. तद्वतच क्रोधानें साधावयाचें काम सात्त्विकतेनें होत नाहीं. काव्यसंग्रहकारांचा 'लोह कार्य नव्हे कनक' हा पाठ घेतला असतां, अर्थाची ओढाताण होते. ओ. ५३. **वोसंडती**–परिपूर्ण असतात. ओ. ५४. **अपायीं**–संकटांत. पहा—'शिणतां बाह्य उपायीं। जन अपायीं पडताती।'– एकनाथी भागवत १३।५३८. ओ. ५६. जो मनुष्य व्यवहारांत परमार्थ करतो, तो दोहींकडून नाडला जातो. 'नाडिजे' बद्दल 'जाणिजे' हा काव्यसंग्रहकारांचा पाठ अयुक्त असून त्यामुळें त्यांच्या अर्थाचा गडबडगुंडा झाला आहे. ओ. ५८. **शांती**–नाश.

ओ. ६५. 'राज्य न मिळाल्याचें दुःख, इंद्रालाही सुटलेलें नाहीं. तेथें मला काय? पण 'पांडव पवित्र व सज्जन आहेत,' या कीर्तीला डाग लागेल व आपण केलेली प्रतिज्ञा भंगेल, म्हणून आपण युद्धास आतांच प्रवृत्त होत नाहीं, असा धर्मराजाचा आशय. ओ. ६६. 'वनवासाचें दुःख पाहून, आपण केलेल्या प्रतिज्ञेंत काय अर्थ आहे असें तुम्ही म्हणतां. पण कौरव युद्धांत मारले जातील याची तरी आज खाली काय?' ओ. ६७. **नेमाचिये** इ०–१२ वर्षें वनवास व १ वर्ष अज्ञातवास या कालानंतर. ओ. ६९. 'रात्र संपल्यावर सूर्य उगवणारच. त्याप्रमाणें १३ वर्षें संपल्यावर तुम्हांला जय मिळणारच,' असा व्यासांचा अभिप्राय. ओ. ७२–मूळ भारतांत हा मंत्र व्यासांनीं धर्माला, व धर्मराजानें अर्जुनाला सांगितला असा उल्लेख आहे. त्यामुळें 'अर्जुनाशीं उपदेशितां नेत्र' हा काव्य-

संग्रहकारांचा पाठ अयोग्य म्हणून स्वीकारला नाहीं, व त्या ऐवजीं ' धर्माशीं उपदेशीला स्वतंत्र ' या दुसऱ्या पाठाच्या आधारें ' धर्माशीं उपदेशितहे नेत्र ' हा पाठ सिद्ध केला आहे. तसेंच ओवी ७३ नंतर " हाचि जपतां सर्वकाळ । इच्छिलें तें पावशीं फळ । ऐसें बोलोनी दीनदयाळ । अदृश्य झाला ते ठायीं ॥ " ही काव्यसंग्रहकारांनीं दिलेली ओवी अवास्तव म्हणून गाळली आहे. काव्येतिहाससंग्रहकारांनीं ती दिलेली नाहीं, व शिवाय व्यास अंतर्धान पावल्याचा उल्लेख पुढें ओवी ७५ मध्यें आलेलाच असल्यानें, या ओवीचें कार्य रहात नाहीं. ओ. ७८. **नरपार्थिवा**–अर्जुना ! ' पार्थिवा ' याचा ' पृथ्वीसंबंधीं ' हा अर्थ येथें पटत नाहीं. ओ. ७९. **अग्रजाचें**–वडील भावाचें. **चर्म**–ढाल. **वर्म**–चिलखत. ओ. ८३. **आगम**–सहा शास्त्रें. **निगम**–चार वेद. ओ. ८९. **अर्क**–सूर्य. ओ. ९०. अर्जुन ब्राह्मणांच्या वेषांत होता. ओ. ९४. **पाकशासन**–इंद्र. ओ. ९९. इंद्रानें शंकराराधनाचा उपाय अर्जुनास सांगितला. ओ. १०२. अर्जुनाच्या तापस वेषाचें वर्णन. **चीर**–वस्त्र. ओ. १०४. **पक्षपक्षां**–दर पंधरवड्यास. ओ. १०५. **निगुती**–निभ्रांत. पूर्वीं इंद्रपद मिळविण्यासाठीं तपश्चर्या करीत. त्याच उद्देशानें अर्जुन तप करीत असेल, म्हणून ही धोक्याची सूचना ऋषींनीं इंद्राला दिलेली दिसते.

ओ. १०८. **व्योमकेश**–शंकर. **चाळवूं**–झुलवूं. ओ. १०९. **जाश्वनीळ**–शंकर. **कामकुरंग** इ०–कामरूपी हरिणाचा जो पारधी, जो मदनाचा संहारकर्ता. ओ. ११०. **शैलबाळी**–पार्वती. **मातृका**–देवताविशेष. ओ. ११२. **किरात**–किरातरूपी शंकर, त्या वराहाच्या पाठीस लागला असतां, तो वराह अर्जुनाजवळ येऊन ' सोडीव ' असें म्हणूं लागला. ओ. ११३. **येरु**–अर्जुन जपास बसल्यामुळें बोलला नाहीं. त्यानें आपले हात उभारून वराहास न मारण्याबद्दल शंकरास खूण केली. ओ. ११५–११८. किरात व अर्जुन यांचें संभाषण. ओ. ११७. **एकट**–माझ्या एकाच बाणानें तूं मरशील. तथापि माझ्याजवळ असणारे पुष्कळ बाण माझें रक्षण करणारे आहेत. ओ. ११८. **हेळूनिया**–अवमानून. ओ. ११९. **साटोपें**–आवेशानें. ओ. १२०. **अंतरीं**–मनांत. ओ. १२१. **किरिटी**–अर्जुन. **नामस्मरत्यालागीं**–ईश्वराचें नामस्मरण करणारास. ओ. १२२. **अक्षय** इ.–अर्जुनाच्या भात्यांतील बाण कधींही संपत नसत, पण आज त्याच्या भात्यांतील बाण संपले.

ओ. १२५. **घाय**–प्रहार. **निवांत**–स्वस्थ. ओ. १२६. **हा होईल इ०**– हा शंकर असावा असा अर्जुनाचा तर्क. ओ. १२७. **मिसळला**–गुंतला. ओ. १३०. **सर्वेचि**–आपणहून सावध होऊन अर्जुनानें शंकराच्या मातीच्या लिंगाची पूजा आरंभिली. **चौज**–कौतुक. ओ. १३१. चमत्कार असा कीं, अर्जुनानें त्या मातीच्या लिंगावर जी पुष्पांजलि वाहिली, ती त्या किरा-ताच्या डोकीवर पडली. त्यामुळें पार्थिवलिंग व किरात यांतील अभेद अर्जुनाच्या प्रत्ययास आला. ओ. १३२–१३८ अर्जुनानें शंकराचें केलेलें स्तवन. ओ. १३३. शंकराचीं नांवें. ओ. १३६. ‘ शिवस्य हृदयं विष्णुः । विष्णोः हृदयं शिवः ’ । असा शिव–विष्णूंत अभेद सांगितला आहे. ओ. १३७. **दक्षयज्ञविनाशना**–दक्षप्रजापतीच्या यज्ञाचा शंकरानें वीर-भद्राकडून नाश करविला. ओ. १४०. **नारायणसमागमी**–पूर्वी नर व नारायण यांनीं बदरिकाश्रमांत तप केलें. अर्जुन हा नराचा व श्रीकृष्ण हा नारायणाचा अवतार होय. ओ. १४३. **कार्तवीर्य**–सहस्रार्जुनास. **वध-विलें**–मारविलेंस. ओ. १४४. **श्रीरेणुकासुता**–परशरामास. **कुमारताता**– कार्तिकस्वामीच्या पित्या ! ओ. १४५. अर्जुन शंकराकडे पाशुपत अस्त्राची मागणी करतो. ओ. १४७– यांत वरुणाचें नांव दोनदां आलें आहे. ओ. १४९. **निर्वाण**–अगदीं शेवटच्या ( मृत्यूच्या ) घटकेला. ओ. १५०. **श्रीगुरुमौळ**–शंकराचें शीर्ष. ओ. १५२. शंकराच्या मुखांतून अस्त्राचा मंत्र बाहेर पडतांच ही भयंकर स्थिति उत्पन्न झाली. **भवंडी दाटली इ०** कुलपर्वत हलून गेले. ओ. १५३. **वृंदारक**–देव. **वृंदें**–समूह. ओ. १५४. सूर्याचीं किरणें जशीं सायंकाळीं समुद्रांत सांठवलीं जातात. ओ. १५५. **प्रेरण**– अस्त्र सोडणें. **निवारण**–अस्त्र परत घेणें. ओ. १५८. ‘ वरद ’ या अक्षरांनीं युक्त असा मंत्र अर्जुनाच्या हृदयांत लिहिला गेला. अर्जुनाच्या हृदयांत तो मंत्र बिंबला.

---

# अध्याय पांचवा

शंकर गेल्यावर वरुण, यम, इंद्र, कुबेर इत्यादि लोकपाळ अर्जुनाच्या भेटीस आले. त्यांनीं त्यास प्रत्येकीं अस्त्रें दिलीं. अर्जुन हा इंद्राचा पुत्र असल्यामुळें, इंद्रानें आपल्या अमरावतीस येण्यास त्यास आमंत्रण दिलें, व आपल्या मातली सारथ्याबरोबर रथही पाठविला. अमरावतीस पोंचल्यावर इंद्रानें त्याचें स्वागत करून त्याला दिव्य अस्त्रें दिलीं. अर्जुनानें स्वर्गांत पांच वर्षें वस्ती केली व तेथें स्त्रीसंभोगसुखाव्यतिरिक्त सर्व सुखोपभोग भोगले. अर्जुनाच्या सुखांत हें न्यून पाहून इंद्रानें चित्रसेन गंधर्वामार्फत उर्वशीला अर्जुनाच्या महालाकडे पाठविलें. पण ती इंद्राची पत्नी म्हणजे आपणास मातेसमान असें मानून त्यानें तिचा स्वीकार केला नाहीं. उर्वशीला यामुळें अर्जुनाचा राग येऊन तिनें 'तूं बृहन्नडा नामक नपुंसक होशील' असा शाप दिला. पुढें इंद्राकडे आल्यावर इंद्रानें, 'होणार तें टळत नाहीं' म्हणून त्याचें सांत्वन केलें, व त्यास आपल्या अर्धासनावर बसविलें. हें पाहून तेथें येणाऱ्या लोमश नांवाच्या ऋषीनें अर्जुनाबद्दल पृच्छा केली, व इंद्रानेंही आपलें अर्जुनाशीं असणारें पित्याचें नातें सांगून निवातकवच राक्षसांना मारण्यास आपण त्यास येथें आणला आहे, असें निवेदन केलें. पुढें इंद्रानें लोमशाबरोबर काम्यकवनांत धर्मराजाकडे अर्जुनाच्या खुशालीचा निरोप पाठविला. धृतराष्ट्रालाही जैमिनीच्या मुखानें अर्जुनाच्या स्वर्गवासाची व अस्त्रलाभाची वार्ता समजली. कृष्ण व धृष्टद्युम्न, १४ वर्षानंतर कौरववधाची प्रतिज्ञा करून गेल्याचेंही वृत्त त्यास कळलें. त्यामुळें आपल्या पुत्रांच्या जीविताबद्दल तो फार शंकित झाला. अर्जुनाच्या दीर्घ स्वर्गवासानें भीमाला त्याचा विरह जाणवला. धर्मराजानें त्याचें सांत्वन केलें इतक्यांत तेथें बृहदश्व ऋषि आला, व धर्मराजानें आपल्या दुःखाचा पाढा त्याच्यापुढें वाचला. बृहदश्व्यानें 'तुमचे कष्ट कांहींच नव्हेत' असें म्हणून नळराजाची दुःखकारक कहाणी त्यास सांगितली.

ओ. १२५. घाय–प्रहार. निवांत–स्वस्थ. ओ. १२६. हा होईल इ०–हा शंकर असावा असा अर्जुनाचा तर्क. ओ. १२७. मिसळला–गुंतला. ओ. १३०. सवेंचि–आपणहून सावध होऊन अर्जुनानें शंकराच्या मातीच्या लिंगाची पूजा आरंभिली. चौज–कौतुक. ओ. १३१. चमत्कार असा कीं, अर्जुनानें त्या मातीच्या लिंगावर जी पुष्पांजलि वाहिली, ती त्या किरातांच्या डोकीवर पडली. त्यामुळें पार्थिवलिंग व किरात यांतील अभेद अर्जुनाच्या प्रत्ययास आला. ओ. १३२–१३८ अर्जुनानें शंकराचें केलेलें स्तवन. ओ. १३३. शंकराचीं नांवें. ओ. १३६. 'शिवस्य हृदयं विष्णुः । विष्णोः हृदयं शिवः' । असा शिव–विष्णूंत अभेद सांगितला आहे. ओ. १३७. दक्षयज्ञविनाशना–दक्षप्रजापतीच्या यज्ञाचा शंकरानें वीरभद्राकडून नाश करविला. ओ. १४०. नारायणसमागमी–पूर्वी नर व नारायण यांनीं बदरिकाश्रमांत तप केलें. अर्जुन हा नराचा व श्रीकृष्ण हा नारायणाचा अवतार होय. ओ. १४३. कार्तवीर्य–सहस्रार्जुनास. वधविलें–मारविलेंस. ओ. १४४. श्रीरेणुकासुता–परशरामास. कुमारताता–कार्तिकस्वामीच्या पित्या ! ओ. १४५. अर्जुन शंकराकडे पाशुपत अस्त्राची मागणी करतो. ओ. १४७– यांत वरुणाचें नांव दोनदां आलें आहे. ओ. १४९. निर्वाण–अगदीं शेवटच्या ( मृत्यूच्या ) घटकेला. ओ. १५०. श्रीगुरुमौळ–शंकराचें शीर्ष. ओ. १५२. शंकराच्या मुखांतून अस्त्राचा मंत्र बाहेर पडतांच ही भयंकर स्थिति उत्पन्न झाली. भवंडी दाटली इ० कुलपर्वत हलून गेले. ओ. १५३. वृंदारक–देव. वृंदें–समूह. ओ. १५४. सूर्याचीं किरणें जशीं सायंकाळीं समुद्रांत सांठवलीं जातात. ओ. १५५. प्रेरण– अस्त्र सोडणें. निवारण–अस्त्र परत घेणें. ओ. १५८. 'वरद' या अक्षरांनीं युक्त असा मंत्र अर्जुनाच्या हृदयांत लिहिला गेला. अर्जुनाच्या हृदयांत तो मंत्र बिंबला.

———

# अध्याय पांचवा

शंकर गेल्यावर वरुण, यम, इंद्र, कुबेर इत्यादि लोकपाळ अर्जुनाच्या भेटीस आले. त्यांनीं त्यास प्रत्येकीं अस्त्रें दिलीं. अर्जुन हा इंद्राचा पुत्र असल्यामुळें, इंद्रानें आपल्या अमरावतीस येण्यास त्यास आमंत्रण दिलें, व आपल्या मातली सारथ्याबरोबर रथही पाठविला. अमरावतीस पोंचल्यावर इंद्रानें त्याचें स्वागत करून त्याला दिव्य अस्त्र दिलीं. अर्जुनानें स्वर्गांत पांच वर्षें वस्ती केली व तेथें स्त्रीसंभोगसुखाव्यतिरिक्त सर्व सुखोपभोग भोगले. अर्जुनाच्या सुखांत हें न्यून पाहून इंद्रानें चित्रसेन गंधर्वामार्फत उर्वशीला अर्जुनाच्या महालाकडे पाठविलें. पण ती इंद्राची पत्नी म्हणजे आपणास मातेसमान असें मानून त्यानें तिचा स्वीकार केला नाहीं. उर्वशीला यामुळें अर्जुनाचा राग येऊन तिनें ‘ तूं बृहन्नडा नामक नपुंसक होशील ’ असा शाप दिला. पुढें इंद्राकडे आल्यावर इंद्रानें, ‘ होणार तें टळत नाहीं ’ म्हणून त्याचें सांत्वन केलें, व त्यास आपल्या अर्धासनावर बसविलें. हें पाहून तेथें येणाऱ्या लोमश नांवाच्या ऋषीनें अर्जुनाबद्दल पृच्छा केली, व इंद्रानेंही आपलें अर्जुनाशीं असणारें पित्याचें नातें सांगून निवातकवच राक्षसांना मारण्यास आपण त्यास येथें आणला आहे, असें निवेदन केलें. पुढें इंद्रानें लोमशाबरोबर काम्यकवनांत धर्मराजाकडे अर्जुनाच्या खुशालीचा निरोप पाठविला. धृतराष्ट्रालाही जैमिनीच्या मुखानें अर्जुनाच्या स्वर्गवासाची व अस्त्रलाभाची वार्ता समजली. कृष्ण व धृष्टद्युम्न, १४ वर्षांनंतर कौरववधाची प्रतिज्ञा करून गेल्याचेंही वृत्त त्यास कळलें. त्यामुळें आपल्या पुत्रांच्या जीविताबद्दल तो फार शंकित झाला. अर्जुनाच्या दीर्घ स्वर्गवासानें भीमाला त्याचा विरह जाणवला. धर्मराजानें त्याचें सांत्वन केलें इतक्यांत तेथें बृहदश्व ऋषि आला, व धर्मराजानें आपल्या दुःखाचा पाढा त्याच्यापुढें वाचला. बृहदश्व्यानें ‘ तुमचे कष्ट कांहींच नव्हेत ’ असें म्हणून नळराजाची दुःखकारक कहाणी त्यास सांगितली.

ओ. १. परियेसा–ऐका. लोकपाळ–दिक्पाळ. इंद्र, अग्नेय, यम, नैॠत, वरुण, वायु, सोम, ईश्वर या अष्टदिशांच्या आधिष्ठात्री देवता. ओ. २. वैडूर्यवर्ण–नीलवर्ण. जळेश्वरगण–वरुणाचे परिचारक, सेवक. ओ. ३. धरित्रीपाळा–हे राजा धर्मा ! धनेश्वरु–कुबेर. ओ. ४. आदित्याचा तनय–सूर्याचा मुलगा यम. करुणावरुणालय–करुणा-समुद्र. सुष्टावर दया करणारा व दुष्टांना दंडणारा. ओ. ५. पोटीं–मनीं. ओ. ६. इंद्रागमन. श्वेत कुंजर–ऐरावत. धवधवित–ठळक (दिसणारा). 'धवधव' असा शब्द करीत असा अनुकरणवाचक जो शब्दार्थ काव्य-संग्रहकारांनीं दिला आहे, तो येथें लागू पडत नाहीं. हा शब्द शिवकालीन वाङ्मयांत नेहमीं येतो. पहा–'धवधवित जीचा मुखविधू '–रघुनाथ पंडित. पुत्रमोहें–अर्जुनाच्या प्रेमानें. ओ. ९. प्रयोग–अस्त्र सोडणें. उपसंहार–अस्त्र आवरणें. ओ. १०. पितृसदना–अमरावतीला. ओ. ११. चौघी-जणीं–वरुण, यम, कुबेर व इंद्र यांनीं. सूत मातली–मातली इंद्राचा सारथी. ओ. १२. शतसहस्र इ.–इंद्रानें पाठविलेल्या रथाला १ लाख चाकें असून प्रत्येक चाक सूर्याप्रमाणें तेजस्वी होतें. ओ. १३. पाणी–हात. वळघावें–चढावें. ओ. १६. मंदराचळ–मंदरपर्वत. ओ. १७. जातांना अर्जुनानें अनेक विमानांच्या रांगा पाहिल्या. ओ. १८. टाकिली–पावली. हा शब्द देखील यादवकालीन वाङ्मयांत पुष्कळ वेळां येतो. पहा–'संकोचलीं कमळें । पक्षियें टाकिती अविसाळें ।–नरेंद्र–रुक्मिणीस्वयंवर. ओ. २०. अर्जुन वर उंच जात असतां, पृथ्वीवरून दिसणाऱ्या तारकांच्या अगदीं समपातळीवर गेला. ओ. २२. युद्धांत मरण पावलेले व तपी यांनाच स्वर्ग लोक मिळतो. म्हणून ते लोक अर्जुनास तेथें दिसले. ओ. २४. वसंतऋतूंत फुलांना बहार येतो, म्हणून त्यांस कुसुमाकर (फुलांचें आगर) म्हटलें आहे. ओ. २६. स्वर्ग कोणाला मिळत नाहीं, तें सांगितलें आहे. ओ. २९. विक्रयवृत्ती इ०–जे वेश्यागमन करतात ते. शक्रागार–स्वर्ग. ओ. ३०. गुरुतल्पग–गुरुपत्नीबरोबर व्यभिचार करणारें. हें एक महापातकापैकीं पातक आहे. पहा–ब्रह्महा च सुरापश्च स्तेयी च गुरुतल्पगः । एते सर्वे पृथग्ज्ञेया महापातकिनो नराः ॥ मनुस्मृ. ९।२३५ गमनागमनी–स्वस्त्रीचा उपभोग न घेणारे. वाळुनियां–त्यागून, वाळीत

टाकून. ओ. ३६. मूर्द्धा इ०-डोकें हुंगणें हें प्रीतीचें लक्षण होय. ओ. ३७. अर्की-मांडीवर. ओ. ४०. हाहा हूहू-गंधर्वविशेष. ओ. ४१-४२ यांत अप्सरांचीं नांवें दिलीं आहेत. ओवी ४५ सुत्रामा-इंद्र. ओ. ४७. करुनी भिन्न-सोडून. ओ. ४९. स्वर्गवासाच्या अमृताचा आस्वाद, बंधुविरहामुळें अर्जुनाला विषाप्रमाणें वाटला. ओ. ५२. मोठमोठ्या तपोधन ऋषींनीं शंभर यज्ञरूपीं नाणीं खर्च करून, उर्वशीच्या उपभोगाचें सुख भोगलें. आपलें शंभर यज्ञाचें पुण्य खर्चीं घालून मोठमोठ्या ऋषींनीं ही मजा लुटली. ओ. ५५. 'शिष्याला ब्रह्मसाक्षात्कार झाला म्हणजे गुरूला जसा आनंद होतो, तसा अर्जुनाला उर्वशीचा उपभोग मिळाला असतां मला आनंद होईल.' ओ. ५७. अर्जुनाचा अभिजात स्वभाव, येथून दोन ओव्यांत सुंदर वर्णन केला आहे. त्राहे-रक्षण कर. आच्छादिलें-झांकलें. ओ. ६१. हारवोनी-जाऊन. पुरुषवेख-पुरुषवेश. बृहन्नडा-अर्जुन पुढें विराटाच्या घरीं बृहन्नडा म्हणून, उत्तरेला गायननर्तन शिकविण्यास राहिला. ओ. ६२. कंचुकी-चोळी. नीवी-निरी. पल्लव-पदर. तार्टक-कर्णभूषण. ओ. ६३. जघन्यता थोरी-याहून अधिक हलकेपणा तो कोणता? ओ. ६५. निरुती-निश्चयानें. इंद्र अर्जुनाला उर्वशीचा शाप मिळाल्याबद्दल शांतवन करतो. हें शांतवन इंद्रासारख्या देवांच्या राजाला कमीपणा आणणारें आहे. आपल्या पदरच्या एका वेश्येनें आपल्याच पुत्राला दिलेला शाप इंद्राला निवारण करतां येऊं नये, हें विस्मयकारक आहे. ओ. ७२. निवातकवच-हे प्रल्हादाच्या निऱ्हाद नांवाच्या भावाचे तीन कोटी पुत्र असून ते इंद्रालाही अजिंक्य होते. म्हणून इंद्रानें त्यांना जिंकण्यासाठीं अर्जुनाला स्वर्गांत बोलविलें होतें. निवटावया-मारावया. न कंठे-न घडे. ओ.७३. काम्यकवना-मागील अध्यायांत धर्मराज अद्वैतवनाला आल्याचें सांगितलें आहे. मग इंद्रानें लोमशाला काम्यकवनाला जाण्यास कां सांगितलें? ओ. ७७. अविकळ-साग्र. ओ. ७८. मूळ महाभारतांत अर्जुनाच्या इंद्रलोकगमनाची वार्ता व्यासांनींच धृतराष्ट्राला सांगितली आहे. ओ. ८१. अनुग्रहार्थ इ०-अर्जुनावर कृपा करण्यासाठींच शंकरानें अर्जुनाशीं युद्ध केलें, असें संजय धृतराष्ट्राला सांगतो, व पुढें अर्जुनाला पाशुपतास्त्राची प्राप्ति कशी झाली, कृष्ण व धृष्टद्युम्न

यांनीं कौरवांना मारण्याची प्रतिज्ञा कशी केली इत्यादीही हकीकत तो धृतराष्ट्राला निवेदन करतो.

ओ. ९१. हें ऐकून धृतराष्ट्राला इतकी भीति वाटली कीं, आपल्या पुत्रांचा नाश त्याला प्रत्यक्ष डोळ्यापुढेंच दिसूं लागला. ओ. ९२. धृतराष्ट्र म्हणतो, 'चिंतेनें माझीं हाडें चूर्ण झालीं आहेत. आतां जर मला मरण आलें, तर माझें मृतशरीर जाळण्याचें कारणच उरलें नाहीं. इतका चिंतेनें मी जळून गेलों आहे, असा अर्थ. ओ. १०३. बृहदश्वा धर्मराजास म्हणतो, 'मागील कांहीं राजांचें दुःख पाहिलें तर तुझें दुःख म्हणजे मेरुपर्वतापुढें मोहरी ठेवावी त्याप्रमाणें क्षुद्र भासतें.' तुमचें दुःख त्यांच्या दुःखापुढें कांहींच नव्हे. सर्षप-मोहरी. ओ. १०४. हरिख-हर्ष. बृहदश्वयानें येथें अरण्यवासाचीं सुखें वर्णन केलीं आहेत. ओ. १०७. आत्मचर्चा-आत्म्यासंबंधीं चर्चा.

—*—

# अध्याय सहावा

बृहदश्व्यानें धर्मराजाला खालीलप्रमाणें नलराजाची कथा सांगितली. नैषधदेशाच्या वीरसेन राजाचा नळ हा एक अत्यंत प्रतापी मुलगा होता, व विदर्भदेशच्या भीमक राजाची दमयंती ही एक अत्यंत स्वरूपसंपन्न कन्या होती. नळ व दमयंती हीं परस्परांवर अनुरक्त झालीं होतीं. एकदां नलराजा बागेंत विहार करीत असतां, त्यानें एक सुवर्णपंखाचा हंस धरला. पण दमयंतीकडे दूत म्हणून जाण्याची कामगिरी त्यानें स्वीकार-ल्यामुळें राजानें त्याची सुटका केली. हंसानें दमयंतीकडे जाऊन नलाच्या रूपाचें वर्णन केलें, त्यामुळें तिला नलाचा सारखा ध्यास लागला. दमयंतीची विरहावस्था पाहून भीमक राजानें तिचें स्वयंवर आरंभिलें, व ही

स्वयंवरवार्ता नारदानें इंद्रादि देवांना कळविल्यावरून तेही दमयंतीच्या स्वयंवरार्थ विदर्भदेशाला निघाले. वाटेंत त्यांना नल भेटला, व इंद्रादि देवांनीं त्याला आपला दूत करून दमयंतीकडे पाठविलें. दमयंतीनें नलाला ओळखलें, व नलानेंही देवांना वरण्याबद्दल तिच्याजवळ पुष्कळ रदबदली केली. पण दमयंतीनें नलालाच वरण्याचा आपला निश्चय त्याला सांगितला. नलानें झालेली खरी हकीकत देवांना निवेदन केली. पुढें प्रत्यक्ष स्वयंवरप्रसंगीं देव, नलाचें रूप धारण करून बसले असतां, मोठ्या चातुर्यानें दमयंतीनें नलालाच वरिलें. देवांनीं संतुष्ट होऊन नल–दमयंतीना आशीर्वाद दिले. नल आपल्या पत्नीसह आपल्या गांवीं गेला, तेथें त्यानें पुष्कळ ऐश्वर्य भोगलें. पण थोड्याच दिवसांत त्याला अवदशा आली. **ओ १ पासाव**–पासून. **पुण्यश्लोक**--पवित्र आहे कीर्ति ज्याची असा. पहा–'पुण्यश्लोक नृपावळींत पहिला होऊनि जो राहिला'। –रघुनाथपंडित. **सत्वाथिला**–सत्वसंपन्न. मुक्तेश्वर ' संपन्न' या अर्थी 'आथिला' हा शब्द नेहमीं योजतो. पहा–विराटनगरीं बळाथिला। कीचक गंधर्वी मारिला–विराटपर्व. **ओ. ४. सहस्रनयन**–इंद्र. **सहस्रवदन**–शेष. **ओ. ५. कोटिकंदर्प इ.**--एक कोटी मदन एकवटले तर त्यांचें सौंदर्य जेवढें होईल, तेवढें सौंदर्य असणारा. **ओ. ६. द्रढिष्ठ**–अतिशय समर्थ. **ज्याचे आज्ञेचा इ.**–ज्याच्या आज्ञारूपी पटानें सर्व पृथ्वी वेष्टून टाकली होती. ज्याची आज्ञा सर्व पृथ्वीला शिरसावंद्य होती. **ओ. ७. अक्षहृदय**–फासे खेळण्याचें कौशल्य. **अश्वहृदय**–अश्वपरीक्षेचें मर्म. **जगीं इ.** त्याच्या सर्वज्ञतेचा सूर्य, त्याच्या प्रतापाच्या किरणांनीं प्रकाशत होता. तो राजा सर्वज्ञ व प्रतापी होता, असा अर्थ.

**ओ. ९.** दमयंतीचें वृत्त. **ओ. १०.** भीमक राजाच्या पत्नीला एक कन्या व तीन पुत्र झाले. **ओ. ११. दम, दांत, दमन**– हे दमयंतीचे बंधु. **ओ. १२. आन**–दुसरें. **सरस्वती**–ही विद्येची देवता असल्यानें तिनें दमयंतीच्या स्वरूपाबद्दल शपथपूर्वक केलेलें विधान इतर कोणत्याही देवतांपेक्षां जास्त विश्वसनीय होय. **ओ. १३. कमळजन्मा**–ब्रह्मदेवाच्या हातून एकदाच दमयंतीसारखी सुंदर स्त्री घडली गेली. पुनः तशी प्रतिमा

निर्माण करणें त्यालाही अशक्य झालें. पहा–'सा निर्मिता विश्वसृजा प्रयत्नादेकस्थसौंदर्यदिदृक्षयैव' ।—कुमारसंभव. **ओ. १५.** दमयंतीचें रूपवर्णन. **भाळीं**–दमयंतीच्या कपाळावर उपजतच रत्नमणि होता. **अमृतश्रवा**–अमृताप्रमाणें मधुर अशी तिची वाहणारी वाणी. **पद्मिनी**–पद्मिनी, चित्रिणी, हस्तिनी व शंखिनी अशा ज्या स्त्रियांच्या जाति आहेत, त्यांत पद्मिनी ही श्रेष्ठ आहे. त्या जातिची दमयंती होती. पद्मिनीचें लक्षण–'भवति कमलनेत्रा नासिका क्षुद्ररंध्रा अविरलकुचयुग्मा चारुकेशी कृशांगी। मृदुवचनसुशीला गीतवाद्यानुरक्ता सकलतनुसुवेशा पद्मिनी पद्मगंधा. ॥'–रतिमंजरी. **सुमध्या**–जिची कंबर उत्तम म्हणजे बारीक आहे अशी. पहा–'मध्ये क्षामा चकितहरिणप्रेक्षणा निम्ननाभी.'–मेघदूत.

**ओ. १६.** यांत पंचकन्या, ज्यांचें स्मरण पातकनाशक आहे, त्यांच्याहीपेक्षां दमयंतीचा महिमा श्रेष्ठ, असें वर्णन केलें आहे. पहा–'अहिल्या द्रौपदी सीता तारा मंदोदरी तथा। पंचकं ना स्मरेन्नित्यं महापातक नाशनम्' ॥ येथें या पांच पतिव्रतास्त्रियांत द्रौपदीचाही समावेश केला आहे. पण दमयंतीची कथा ही द्रौपदीच्या कालापूर्वी होऊन गेलेली असल्यामुळें, तिचा उल्लेख येथें येणें, कालविपर्यासात्मक आहे. **दांडोरा**–डंका. **ओ. १७.** मुक्तेश्वर आपल्या रचनेंत विस्तारदोष स्वीकारीत नाहीं. **ओ. १९. माधवी**–ययाति राजाची कन्या, गालव ऋषीची पत्नी. **सुलोचना**–इंद्रजिताची पत्नी. **उखा**–उषा–बाणासुराची कन्या. या अत्यंत सुरूप स्त्रिया म्हणून येथें सांगितल्या आहेत. **ओ. १९–२५.** मोठमोठ्या स्त्रियांचीं उदाहरणें देऊन स्त्रिया या वैभवाला भुलणाऱ्या असतात, हें प्रतिपादन केलें. पण दमयंती तशी नव्हती हें पुढें कवीनें वर्णन केलें आहे. **ओ. २०–२१.** यांत गंगेवर केलेल्या हेतूत्प्रेक्षा हृद्य आहेत. **ओ. २१. सहस्र ओघें** इ० शंकराला चुंबन न देणारी गंगा, श्रीमंत रत्नाकराला आपल्या हजार मुखांनीं चुंबन देतें. गंगा, हजार मुखांनीं समुद्राला जाऊन मिळते, यावर कवीनें ही नाविन्यपूर्ण उत्प्रेक्षा केली आहे. **ओ. २४.** लक्ष्मीच्या चंचलतेंचें उदाहरण सांगतात. **ओ. २५.** सरस्वती ही ब्रह्मदेवाची मुलगी, पण तिचा अभिलाष प्रत्यक्ष बापानें केला. गंगा, पार्वती, लक्ष्मी, सरस्वती या सर्व विश्वमान्य आहेत, पण यांच्यांत कांहीं वैगुण्य आहेच. तसें कोण-

तेंही वैगुण्य दमयंतींत नव्हतें. वैदर्भी–दमयंती. ओ. २६.–सरेना–चालेना. पहा–' तैसें लक्ष्मीयेचें थोरपण न सरे'–ज्ञाने. ९।३८० ओ. २७. सत्कीर्ति इ०–सदाचारी माणसाला जशी सत्कीर्ति मिळते, त्याप्रमाणें आपणास दमयंती मिळावी असें नलानें मानलें.

ओ. २८. तृतीयभक्ती–नवविधा भक्तींत, 'पादसेवन' हीच जास्त प्रिय होय. हृदयभिंती–नळाच्या हृदयावर दमयंती कोरली गेली होती असा अर्थ. मुक्तेश्वराला रूपकें योजण्याची फार संवय आहे. ओ. ३१. 'दमयंतीरूपी नागिणीनें इतर राजेरूपी झाडांना टाकून, नलरूपी चंदन वृक्षालाच वेटाळें घातलें. हें परंपरित रूपक होय. नागीण चंदनालाच जशी लुब्ध असते, तशी दमयंती नलावरच आसक्त होती. इतर राजांचा तिनें विचारच केला नाहीं. ओ. ३३. हंसवर्णन. धवळिली–पांढरीं केलीं आहेत. ज्याचें अंग जणुं चंद्रकिरणाच्या रंगानें रंगविल्यामुळें, पांढरें शुभ्र झालें आहे. ज्याची अंगकांति चंद्रकिरणाप्रमाणें स्वच्छ आहे. ओ. ३४. जे कां इ०–' जें कार्य मनुष्यांना व देवांनाही करणें अशक्य आहे, तें कार्य तूं मजकडून करून घे. ' असलें अशक्य व अवघड काम मी करीन असा अर्थ. ओ. ३७. बोलिला इ०–चांगले लोक आपलें वचन खोटें करीत नाहींत. हंस हा तसा मोठा असल्यानें, तो बोलल्याप्रमाणें करील, अशी नलाला खात्री वाटली. ओ. ३८. मराळ–राजहंस. ओ. ४०. इतर तारागणांचा विचार न करतां चंद्राकडेच लक्ष द्यावें. त्याप्रमाणें इतर राजांचा विचार सोडून देऊन एकट्या नलराजाकडे पहावें. ओ. ४१. परीस–लोखंडाचें सोनें करणारा एक विशिष्ट दगड. हंसानें हे दृष्टांत मुद्दाम आपला भाव ठसविण्यासाठीं दिले आहेत. ओ. ४५. पडिपाडा–बरोबरीला, तुलनेला. ओ. ४७. पंचबाण–मदन. ओ. ४८–५२. दमयंतीची विरहदशा. पहा, दमयंतीस्वयंवर–रघुनाथपंडित श्लो. १४५–१५०.

ओ. ४८. रोग–मदनबाधा. औषध–पहा–' औषध नलगे मजला ' परिसुनि जननी ' बरे ' म्हणुनि डोले.–रघुनाथ पंडित–दमयंति स्व–१५०. रघुनाथ पंडितापुढें मुक्तेश्वराचें हें आख्यान असावें. ओ. ४९. मदनरूपी

वाघाला पाहून दमयंतीरूपी शेळी स्तब्ध झाली. मदनबाधेमुळें तिनें मौन धारण केलें. **ओ. ५०. हुताशन**–मदनाचा अग्नि. विरहांत श्वासोच्छ्वास उष्ण येतात, त्यावर कवीनें हेतूत्प्रेक्षा केली आहे. ' दमयंतीच्या हृदयांत अग्नि पेटल्यामुळें, व त्याचे उष्ण धुस्कारे श्वासरूपानें बाहेर पडत असल्यामुळें, दोन नयनांनीं आपल्या अश्रुधारांनींच तो अग्नि शांतविण्याचा प्रयत्न चालविला होता. ' सारांश उष्ण श्वासोच्छ्वास व रुदन यांनीं दमयंती व्यापली होती. **ओ. ५१.** विरही लोकांना शीतल पदार्थही तापदायक होतात. शीतल चंद्रकिरण दमयंतीला प्रखर सूर्याप्रमाणें भासले, मलय-पर्वतावरचा शीतल वारा तिला वज्राच्या धारेप्रमाणें तीक्ष्ण वाटला, व चाफा, जाई, बकुल इ. फुलें ( व त्यांची शय्या ) तिला सुईच्या टोका-प्रमाणें बोचूं लागलीं. **ओ. ५२.** कर्पूरकेळीचा व चंदनाचा शीतल रस तिच्या शरीराला निखाऱ्याप्रमाणें दाहक झाला. तिला आपले प्राण अथवा जीवित जड होऊन, गळ्यांतील हार सर्पाप्रमाणें त्याज्य वाटूं लागला. सारांश विरहावस्थेंत दमयंतीला केलेले सर्व शीतलोपचार तिला उलट त्रासदायक झाले. **ओ. ५३.** वैद्यानींही आपले यत्न चालविले. **ओ. ५४.** दमयंतीला आणखी उपचार करतात. ' ज्या शिंपल्यांत अजून मोतीं उत्पन्न झालीं नाहींत, अशांतील पाण्यानें दमयंतीचे हात पाय चोळण्यांत आले. हाही एक विलक्षण शीतल उपचार असावा. **ओ. ५५. अंतर–गाभा. तैल शिंपितां** इ.–हे शीतल उपचार दमयंतीला, आगींत तेल ओतल्याप्रमाणें भडका उडविणारे, अतएव उलट क्षोभकारकच झाले.

**ओ. ५६. सोमकांत**–चंद्रकांत मणि. **भाजनीं**–भांड्यांत. चंद्र-किरणांनीं चंद्रकांत मण्याला पाझर फुटतो. अशा शीतल भांड्यांतलें पाणी दमयंतीवर शिंपडण्यांत आलें. पण तिला तें तापलेल्या तेलाप्रमाणें वाटलें. **ओ. ५७. रायाप्रती**–दमयंतीच्या वडीलास, भीमकाला. **संकेतें**–सूचनेनें. **ओ. ५९. संकेतबोधू**–दमयंतीच्या सख्यांनीं संकेतानें सुचविलेली दमयंतीच्या कामविकाराची गोष्ट राजाला कळून चुकली, **भ्रतारकामनेचा इ०**–पौर्णिमेच्या चंद्रोदयानें जशी समुद्राला भरती येते, त्याप्रमाणें पती लाभेच्छारूपी चंद्राचा उदय मनरूपी आकाशांत झाल्यावर दमयंतीच्या तारुण्यरूपी सागराला भरती आली. ' मुलीच्या मनांत पती-

बद्दलची इच्छा उत्पन्न झाल्यामुळें, तिच्या तारुण्याला भरतें आलें आहे ' — असें राजा म्हणाला. आपली मुलगी वयांत आल्यामुळें, तिच्या मनांत पती-बद्दलची इच्छा उत्पन्न होणें साहजिकच आहे, अशी भीमक-राजानें मनांत खूणगांठ बांधली. ओ. ६०. **विजयभेरी**—जयसूचक मोठे नगारे. ओ. ६१. **चतुरंग**—घोडे, हत्ती, रथ, पदाती यांनीं युक्त अशी जी सेना, ती चतुरंग सेना. **पंचवाद्यें**—तालज, तंत, मुरजालिक, घमन व वेणु, हीं पांच वाद्यें. ओ. ६२. **कन्यामदन** इ०—दमयंतीरूपी मदनमालती पुष्पाच्या परिमलानें लुब्ध झालेले राजेलोक भृंगच जणुं झाले होते ! अनेक देशांहून राजे स्वयंवराला आले, त्यावर ही व्यंगोत्प्रेक्षा केली आहे. ओ. ६३. ' किंवा दमयंतीचें अमोघ स्वरूप हीच रत्नाची कांति किंवा उजेड समजून राजे लोकांनीं फुलपांखरें होऊन दशदिशांकडून त्यावर उडी घातली. ' **रत्नसारंग**—रत्नाचा उजेड. दमयंतीच्या आकर्षणानें अनेक राजे तेथें आले, यावर उत्प्रेक्षा. ओ. ६५. **कौतुकामृतें** इ०—कौतुकरूपी अमृताची वृष्टि आमच्या कानांत केली पाहिजे. पृथ्वीवर जें काय आश्चर्यकारक ऐकलें असेल, तें आम्हाला ऐकवावें, असें इंद्राचें म्हणणें.

ओ. ७०. **नैषध**—नलराजा. ओ. ७२. ' या नलाच्या सौंदर्यरूपी सागराचें पाणी, माझ्या हजार डोळयांच्या मापांनीं मोजलें तरी, त्यांचा कांहींच थांग लागत नाहीं ' असा अर्थ. आपणास हजार डोळे असूनही नलाचें सौंदर्य इतकें कीं, पाहून तृप्ति होत नाहीं, असा इंद्राचा आशय. **उमानितां**—मोजतां. ओ. ७३. **रतिपति**—मदन. **रोहिणीपति**—चंद्र, **अश्विनौ**—अश्विनीकुमार, देवाचे वैद्य. हे सर्व, सौंदर्याबद्दल प्रसिद्ध आहेत. ओ. ७४. **खद्योत**—काजवे. ओ. ७९. **आर्ती**—इच्छा. **प्रबोधिली** इ.—तूं जाऊन दमयंतीला शिकविली पाहिजेस. आपल्याबद्दल दमयंतीकडे जा असें इंद्र नलास सांगतो. **ओवी ८१**—सत्याचें पालन करीत असतांना जेवढें कांहीं साधणें शक्य होईल तेवढेंच साधावयाचें. ओ. ८२. **राणिवसां**—गोषांत. याला समानार्थक पहा ' ज्यासि जेथें सामर्थ्य नसे त्यातें । कसें तें कार्य तुम्हीं सांगिजेतें ॥ बाळ सानें उचलील काय जातें ? । बोलणाराचें मोल काय जातें ॥१८६॥ सात बंका पलीकडे अहो ते । राजकन्येची भेट कसी होते ? ॥ त्यजुनि राजत्व दूतता कसी ते । धरावी म्या ? हृदयास

जे कसीते ॥१८७॥—रघुनाथ पंडित–दमयंतीस्वयंवराख्यान. ओ. ८४. **दुजियाचें**–दुसऱ्याचें. ओ. ८७. **निधान**–ठेवा, द्रव्य. **कमळासन**–ब्रह्मदेव. ओ. ८९. **अदृश्यसिद्धि**–देवांनीं नलाला अदृश्य होण्याची जी सिद्धि दिली, तिच्या योगानें. ओ. ९०. **मंचकासनीं**–पलंगावर. दमयंती-रूप लावण्यलतिकेच्या पुष्पावर नैषध, भृंगाप्रमाणें गुंजारव करीत गेला कीं काय! ओ. ९१. **मातृकामंडळीं**–मातृकांच्या समुदायांत. मातृका या शिवाची किंवा स्कंदाची सेवा करणाऱ्या देवता असून त्या ब्राह्मी, माहेश्वरी. चंडी, वाराही, वैष्णवी, कौमारी व चामुंडा अशा सात आहेत. ओ. ९२. **देहभाव**–अष्ट सात्त्विक भाव. ओ. ९३. **अनुमान** इ.–तिनें मनांत तर्क केला. ओ. ९५. **निर्धुत**–न कचरतां. ओ. ९६. **मानविणी**–मनुष्य-स्त्री. ओ. ९८. आपल्या शरीराचा ग्राहक, नलाशिवाय कोणी नाहीं, असें दमयंती नलाला सांगते. ओ. ९९. **भीमकासमान**–पित्यासमान. पहा–'नळा वेगळा भर्तार। नलगे स्वप्नींही साचार॥–रघुनाथ पंडित. ओ. १०१. **ते म्यां** इ.—'मी तुला स्वतःच अंगिकारल्यास श्रेष्ठ लोक मला दुरात्मा म्हणतील.' **जीवीं**–स्वतःसाठीं.

ओ. १०२. दमयंतीचें भाषण. ओ. १०४. नलानें प्रामाणिकपणानें झालेलें सर्व वृत्त, देवांना सांगितलें. ओ. १०५. **ते परिहारिता** इ०–नल म्हणतो, 'तिनें मलाच वरलें असें तिनें मला सांगितलें, तरी अनेक युक्तींनीं मी तिचा निषेध केला.' ओ. १०७. स्वयंवरमंडपांत आपणांस पाहून दमयंती नलासारख्या मनुष्याला सोडून आपणासच वरील अशी देवांना ऐट होती. ओ. १०८. तो स्वयंवरमंडप इतका सुंदर होता कीं, स्वर्गानेंही आपलें तोंड आकाशानें (वस्त्रानें) झांकलें. येथें 'अंबर' या शब्दांवर श्लेष असून व्यंग्योत्प्रेक्षाही आहे. ओ. ११२. ज्याप्रमाणें इतर सर्व उपाधि सोडून एकट्या चैतन्ययुक्त परब्रह्माकडेच (योग्याकडून) लक्ष दिलें जातें, तद्वत् सर्व नृपांना सोडून दमयंतीचें लक्ष नळाकडे लागलें. ओ. ११३. देवांच्या मायेनें सर्वत्र नळ दिसूं लागले. त्यामुळें मुख्य नळ कोणता हें कळेना. ओ. ११४. दमयंतीची देवास प्रार्थना. ओ. ११९. **तुटलिया**–लुप्त झाल्यावर. **आभाळ**–ढग. ओ. १२०. **विबुध**–देव.

देवांचीं चिन्हें सांगतात. **अनिमिष इ.**–देवांच्या डोळ्यांच्या पापण्या लवत नाहींत. **पाय स्पर्शले इ.**–त्यांचे पाय भूमीला स्पर्श करीत नाहींत. **ओ. १२१. द्रुमछायातीत ऋणें**–या ओवींतही देवांची चिन्हें सांगितलीं आहेत. पण या ओळीचा समाधानकारक अर्थ लागत नाही. दुसरे जे पाठभेद देण्यांत आले आहेत, त्यांनींही अर्थाचे काम चांगलें भागत नाहीं. मूळ भारतांत 'छायाद्वितीयो म्लानस्रग्रजःस्वेदसमन्वितः' असें नलाचें वर्णन केलें आहे. म्हणजे याच्या उलट ज्यांच्या शरिराची सावली पडत नव्हती, ज्यांचे हार सुकत नव्हते व ज्यांना घाम येत नव्हता ते देव, अशीं आणखी देवांचीं लक्षणें कल्पिलेलीं दिसतात. याच ओळीच्या दिलेल्या पाठभेदांत 'घर्मछायांतील तरुणें' असा एक पाठभेद दिला आहे. वरील देवांचीं लक्षणें लक्षांत घेतां 'घर्मछायातींत तरुणें' अशी ही मुक्तेश्वराची मूळ ओळ असावी असें वाटतें. तिचा अर्थ 'घाम व सावली यांनीं रहित असून जे तरुण होते,' असा होईल. **जरा विकार इ.**–देवांना व गंधर्वांना म्हातारपण नाहींच. पहा–'वित्तेशानां न च खलु वयो यौवनादन्यदस्ति'–मेघदूत. **ओ. १२३. चामके**–जाई. **सिंधुतनया**–लक्ष्मी. **ओ. १२६. पुष्पकीं**–विमानांतून. **ओ. १२५.** 'तुला प्रत्यक्ष अग्नीचें दर्शन होईल' असा वर इंद्रानें दिला. 'प्रत्यक्ष अग्नि नलापुढें उभा असतां इंद्रानें असा वर देण्याची आवश्यकता नव्हती' असें काव्यसंग्रहकार म्हणतात, तें योग्य दिसतें. शिवाय पुढील ओवींतच अग्नीनेंही केव्हांही दर्शन देण्याचा वर नलाला दिलाच आहे. मूळ महाभारतांत 'प्रत्यक्षदर्शनं यज्ञे गतिं चानुत्तमां शुभाम् । नैषधाय ददौ शक्रः प्रीतमाणः शचीपतिः ॥' असा उल्लेख असून, त्यांत इंद्रानें अग्नीबद्दलचा दिलेला हवाला नाहीं. म्हणून या ओवीचे पहिले दोन चरण प्रक्षिप्त असून, 'प्रत्यक्ष अग्नीचें दर्शन' याबद्दल 'प्रत्यक्ष यज्ञीं दर्शन' हा काव्यसंग्रहकारांनीं सुचविलेला पाठ घ्यावा. **ओ. १३०. शेखीं**–शेवटीं, मरणोत्तर. **पावक**–अग्नि. **ओ. १३२. धर्मराज**–यम. **ओ. १३३. सूदली**–घातली. **ओ. १३८. शची**–इंद्राणी. **ओ. १३९. गंगापुलिनीं**–गंगेच्या वाळवंटांत. **ओ. १४०. ययाति**–शर्मिष्ठा व देवयानीचा पति. याच्या पुरु नांवाच्या पुत्रापासूनच पुरुवंश झाला. **नहुष**–चंद्रवंशांतील एक प्रख्यात राजा. स्वर्गांत याचें इंद्राणीवर मन गेलें. सप्तर्षींना यानें आपली

पालखी वाहण्यास लावून इंद्राणीकडे लवकर चलण्यास सांगितलें असतां, ऋषींनीं त्याला दिलेल्या शापानें तो साप झाला. या दोघां राजांनीं पूर्वी पुष्कळ यज्ञ केले होते.

ओ. १४१. 'पृथ्वीवर नलाचा प्रतापसूर्य उगवला असतां, प्रजारूपी सूर्यविकासी कमलें विकसलीं.' नलाच्या प्रतापानें प्रजा आनंदी झाली. **धर्मसंपदा** इ०-सूर्य उगवल्यावर दिवसा चक्रवाक मिथुनाचा वियोग होतो, त्याप्रमाणें नेहमीं धर्म व संपदा यांची ताटातूट असते. पण नलाच्या राज्यांत धर्म व संपदा यांचा कधींही वियोग न होतां, तीं एकत्र नांदत. ओ. १४२. नलाचा प्रतापसूर्य जगावर तळपत असल्यामुळें, दारिद्र्यदोष-रूपी रात्र झालीच नाहीं. म्हणजे लोक दरिद्री झालेच नाहींत. त्याच-प्रमाणें सूर्य उगवला म्हणजे तारका जशा लोपतात, तद्वतच नलाचा प्रतापसूर्य उगवतांच दुर्जनरूपी तारकांनीं आपली वस्ती उठविली. दुर्जन नाहींसे झाले. ओ. १४३. सूर्याच्या प्रकाशांत घुबडें बाहेर पडत नाहींत. त्याप्रमाणें नलाच्या प्रतापसूर्यापुढें पाखांडी लोकरूपी घुबडांचे घूत्कार बंद झाले. नलाच्या प्रतापानें पाखांडी राहिले नाहींत. सूर्यप्रकाशांत चोरांचा रस्ता जसा दबून रहात नाहीं, तद्वत् नलाच्या प्रतापसूर्यापुढें कुतर्करूपी-चोरांची वाट राहिली नाहीं. कुतर्क नष्ट झाले. नलाच्या राज्यांत साधु लोकरूपी हंस, कोकिलादि शुभ पक्षी विष्णूच्या नामस्मरणाचें गुंजन करूं लागले. ओ. १४४. अर्धे-पार्पे.

—*—

# अध्याय सातवा

बृहदश्व्यानें नलाचें पुढील वृत्त धर्मराजाला कथन केलें. नलदमयंतीच्या मीलनानें हर्षित होऊन देव परत स्वस्थानाला जात असतां, वरातीपाठीमागून घोड्याप्रमाणें स्वयंवरास जाणारे, कलि व द्वापर त्यांना भेटले. दमयंतीनें देवांना सोडून नलाला वरलें, हें पाहून या दोघांना राग आला. व नलाला पीडा देण्याचें त्यांनीं ठरविलें. त्यांनीं नळाच्या पुष्कर नांवाच्या चुलत भावास नलाविरुद्ध चिथवून, नलाशीं द्यूत खेळण्यास उद्युक्त केलें. द्वापर हा द्यूत खेळण्याचे कपटी फासे घेऊन निघाला, व कलीनें संधि साधून नलाच्या शरीरांत प्रवेश केला. पुष्कर व नळ यांचा सारीपाटाचा खेळ होऊन, नळ सर्व राज्य हरला, व त्याला वनवास पत्करावा लागला. अशा कष्टकारक काळांत दमयंतीनें आपलीं मुलें आपल्या माहेरीं पाठवून दिलीं, व आपल्या पतीबरोबर तिनेंही धैर्यानें अरण्यवास पत्करला. वनवासांत दमयंतीचे हाल आपल्या डोळ्यांदेखत तरी न होवोत असें मनांत आणून, नलानें एके दिवशीं तिचा त्याग केला व आपण दुसरीकडे निघून गेला. परित्यक्त दमयंतीनें पुष्कळ विलाप केला, पण व्यर्थ. एकदां तर तिला एका अजगरानें गिळिली असतां, एका पारध्यानें तिची सुटका केली. या पारध्यानें तिचाच अभिलाष धरल्यामुळें, तिच्या पातिव्रत्याच्या सामर्थ्यानें तो जळून खाक झाला. या संकटांतून बचावून दमयंती वनांतून मार्ग काढीत असतां, तिला एक व्यापाऱ्याचा तांडा भेटला. त्या तांड्याच्या प्रमुखाच्या आश्वासनावरून ती त्यांच्याबरोबर चालली असतां मध्यंतरी त्या तांड्यावर एका रानटी हत्तीच्या कळपाची धाड पडली, व कित्येक व्यापारी त्यामुळें प्राणास मुकले. ही आपत्ति आपल्याच पायगुणामुळें आली असें समजून ते व्यापारी आपणांस मारणार असें पाहून दमयंतीनें एका सकाळीं तेथून पळ काढला. एका गुराख्याला विचारीत तिनें चैद्यदेश गांठला. त्या देशच्या राणीनें सन्मानानें दमयंतीला आपल्याजवळ ठेवून घेतली.

ओ. २. केउतें–कोठें. ईश्वरत्व तें काय राहिलें? कली व द्वापर–चार युगांपैकीं द्वापर व कलि हीं शेवटचीं असून कृत व त्रेता हीं पहिलीं दोन होत. ओ. ३. त्रिदशेश्वरा–इंद्रा! दारा–स्त्री. पत्नी. ओ. ४. वांज इ०–फळें न धरणाऱ्या वृक्षासारखा निरुपयोगी. ओ. ८. देवानें शरणागताला जर इच्छित गोष्ट दिली नाहीं, तर देवाचें देवपण तरी कोठें राहिलें? अशा अर्थी इंद्र कलीचा निषेध करीत आहे. ओ. ९. योगक्षेम–योग–नवीन वस्तूंचा लाभ. क्षेम–लाभेलल्या वस्तूंचें रक्षण. हा योगक्षेम चालविणें ईश्वराचें कर्तव्य आहे. पहा 'योगक्षेमं वहाम्यहं'–गीता. ओ. १०. कलिपुरुष–हा आधुनिक वाङ्मयांतील खलपुरुष (Villain) होय. ओ. १५. एखाद्या भाग्यवानालाच पुरलेला धनाचा ठेवा अचानक सांपडतो. तेथें नंतर येणाऱ्या अभाग्याला मातीच उकरीत बसावें लागतें. ' दमयंतीच्या अभिलाषाच्या रोगानें पछाड-ल्यामुळेंच तूं नळाला छळण्याची भाषा बोलतोस ' असा इंद्राचा कलीवर आरोप.

ओ. १७. दायाद–भाऊबंद हे स्वाभाविकच शत्रू असतात. त्यांच्या शत्रुत्वाला उपजतच कारण असतें. पितृव्यपुत्र–चुलत भाऊ. कुडा-मंत्र–दुष्ट मसलत. ओ. १८. कलि व द्वापर पुष्कराला म्हणतात. ओ. २०. कपटपाशीं–कपटी फाशासह. रिघावया–शिरावया. ओ. २१. नळ अत्यंत शुद्ध वर्तनाचा असल्यामुळें, त्याच्या शरीरांत कलीला शिरकाव मिळेना. म्हणून तो बैलाच्या रूपानें पुष्कराच्या गाईच्या कळपांत राहिला, व नळाच्या घरांत प्रवेश करून त्याच्या शरीरांत शिरण्यासाठीं त्याच्या वर्तनांतील छिद्र पाहूं लागला. राउळ–राजवाडा. ओ. २२. कलीला याप्रमाणें १२ वर्षे टपून बसावें लागलें. ओ. २४. एके दिवशीं लघुशंका करून पाय न धुतां नलराजा संध्येस बसला. ही अशुद्धतेची वेळ साधून कलीनें त्याच्या शरीरांत प्रवेश केला. ओ. २५. सत्यव्यसन इ०–सत्याच्या व्यसनरूपी वासनेच्या नदींत. सत्याचेंच व्यसन असणाऱ्या राजाच्या मनांत. विकारपूर–वाईट विकारांचा पूर, हलकल्लोळ माजला. मूळ संथ वाहणाऱ्या नदींत ज्याप्रमाणें बाहेरचे गढूळ प्रवाह मिसळून मग त्या नदीचें पात्र फुगावें, त्याप्रमाणें मूळच्या सत्यप्रिय नळाच्या मनांत विकारांचा हलकल्लोळ माजला. ओ. २६. षड्रिपु त्याच्या अंगांत उत्पन्न झाले.

तस्कर–चोर. ओ. २७. रती–आवड, प्रीति. वेळ मातें इ०–माझा वेळ जाईना. ओ. २८. सारीपाट–सोंगट्या व पट. हारीं–अपजयांत. 'तूं इतका समर्थ आहेस कीं, जय अपजय तुला सारखेंच' असा पुष्कराचा म्हणण्याचा आशय. ओ. २९. पाश–फांसे. कामुक–कामुक मनुष्य. ओ. ३०. कपाट देणें–दार लावून घेणें. ओ. ३१. जसजसें नलाला अपयश येई, तसतशी त्याला द्यूताची हांव अधिकच उत्पन्न झाली. ओ. ३३–३५. द्यूतापासून परावृत्त होण्याबद्दल प्रजेनें नलाला केलेली विनंति. ओ. ३७. द्यूतव्यसनकोडें–द्यूतव्यसनाच्या कौतुकानें. ओ. ३८. रथसारथी–रथ आणि सारथी ( द्वंद्व समास ). ओ. ३९. विदर्भाप्रती–दमयंतीनें आपलीं मुलें माहेरीं पाठविलीं. ओ. ४१. सारथ्याला तिनें अयोध्येच्या राजाकडे नोकरीस राहण्यास सांगितलें. ओ. ४३. धात्री–दाई. ओ. ४५. आराधीत–सेवीत. ओ. ४८. अजादिक–शेळ्या, मेंढ्या इ. ओ. ४९. वडवा–घोड्या. संख्येरहित–असंख्य. 'नरपार्थिवरूपी भाग्यार्णवाचें अभाग्यकाळरूपी कुंभजानें प्राशन केलें.' ज्याप्रमाणें समुद्राला पूर्वी अगस्तीनें पिऊन टाकलें, त्याप्रमाणें नलरूपी भाग्यसमुद्राचे, अभाग्यकाळरूपी अगस्तीनें प्राशन केलें. भाग्यवान् नलाला दुष्टकालानें ग्रासलें. कुंभज–अगस्ति. ओ. ५०. ग्रामपाली–ग्रामसमूह, अनेक गांव. खेटक–खेडें. आगर–शेत, मळा. ओ. ५३. एकवसनी–नेसत्या वस्त्राशिवाय आतां नळाजवळ कांहीं राहिलें नव्हतें. ओ. ५५. नलरूपी विवेक–सारासार विचार–वनांत गेला व पुष्कररूपी अविचार राज्यावर बसला.

ओ. ५६. तिघे–कलि, द्वापर व पुष्कर. गदारोळ–गर्जना. ओ. ५७. धेंडे पिटणें–दवंडी पिटणें. नळाचा मित्र तो आपला शत्रू, अशी पुष्करानें शहरांत द्वाही फिरवली. ओ. ५८. शूळ भेदणें–भाला मारणें. यंत्रमुखीं इ.–तोफेच्या तोंडीं देऊन जाळीन. चूर्ण करीन इ.–हत्तीच्या पायीं बांधून चक्काचूर उडवीन. या शिक्षा करण्याच्या रीती, मुक्तेश्वरकालीं मुसलमानी राज्यांत प्रचलित असाव्या. त्यांचाच त्यानें उल्लेख केला आहे. ओ. ६०. स्त्रियेशीं–पत्नीसह, दमयंतीसह. ओ. ६१. वनकक्षीं–वनाच्या मध्यभागीं. ओ. ६२. पक्षी सुवर्ण पंखाचे होते, ते विकल्यास

चन मिळेल, असें राजास वाटलें. ओ. ६३. पहिलेचि–पूर्वींच. पहा–' ते होय हंसगमना पहिलीच आहे–' रघुनाथ पंडित, नलदमयंति–९८. विहंगममेळ–पक्ष्यांचा समूह. ओ. ६४. राजानें आपल्या नेसल्या पितांबराच्या पदराची झांप घालून पक्षी धरण्याचा प्रयत्न केला. ओ. ६५. पक्ष्यांनीं नलाचें अर्धें वस्त्र फाडून नेलें. ओ. ६६. ते पक्षी म्हणजे द्वापराचे कपटी फासेच होते. तेच नलाला त्रास देण्यास, पक्ष्यांच्या रूपानें आले होते. ओ. ६९. अळुमाळ–किंचित्. ओ. ७१. पंचरात्र–पांच दिवस. जाकळती–पोळती, कळवळती. ओ. ७२. गुह्य–गुप्त गोष्ट. आपण तिचा त्याग करणार ही गुप्त गोष्ट. ओ. ७४. पत्नीस कष्ट व्हावयाचेच तर मग ते आपल्या दृष्टीआड तरी होवोत, म्हणून पत्नीचा त्याग करणें नलाला श्रेयस्कर वाटलें. ओ. ७५. माझ्या अपरोक्ष हिचें कांहीं कां होईना ! माझ्या दृष्टीसमोर हिला कष्ट न व्हावें. संकेतशब्दें–पर्यायानें. नल पर्यायानें दमयंतीला आपल्या माहेरीं जाण्यास सुचवितो. ओ. ७६. वात स्पर्श इ०–वाऱ्याचा स्पर्श देखील तुला होऊं नये, अशा रीतीनें तुझें रक्षण करण्याचा माझा हेतु आहे.

ओ. ७८. नलराजानें दमयंतीला दोन मार्ग दाखविले. एक अवंतीकडे जाणारा व दुसरा विदर्भाकडे जाणारा. ओ. ७९. साउमा–समोर ओ. ८२. ज्ञान करितां–समजून देतां. आपणास माहेरी पाठविण्याचा नलाचा विचार दमयंतीस मानवला नाहीं. ओ. ८६–९१. भार्येचें महत्त्व दमयंती वर्णन करते. ओ. ८७. तापत्रय–आधिभौतिक, आधिदैविक व अध्यात्मिक असे त्रिविध ताप. ओ. ९२. दमयंतीच नलाला आपल्या माहेरीं चलण्यास सांगते. ओ. ९४. नल मोठा व्यवहारी दिसतो. वाईट दिवस आले असतां कोणाच्या घरीं जाऊं नये, विशेषतः सासऱ्याच्या घरीं जाऊं नये, तेथें मानहानीचा प्रसंग येतो, हें तो जाणत होता. ओ. १००. भूक व तहान लागल्यामुळें दमयंतीला झोंप लागली. ओ. १०१. नलानें व दमयंतीनें एकच वस्त्र गुंडाळलें होतें. तिला टाकून जातांना, ती जागी होईल म्हणून तें वस्त्र अर्धें फाडणें जरूर होतें. हें वस्त्र कापण्यासाठीं तो कांहीं साधन हुडकीत होता. ओ. १०३. कोशरहित–म्यानाशिवाय,

आच्छादनाशिवाय. ओ. १०६. दमयंतीचा त्याग करून जातांना नल तिला आशीर्वाद देतो. ओ. १०९. 'ऋषि, अष्टदिक्पाल, ग्रहनक्षत्रें, श्वापदें, वनदेवता इत्यादि दमयंतीचें रक्षण करोत ' अशी नलाची प्रार्थना. ओ. १११. धरादेवी–पृथ्वी. ओ. ११९. खेचर–आकाशांत विहार करणारें पक्षी, यक्ष किन्नर इ० भूचर–भूमीवर चालणारीं माणसें, पशु इ. डळमळती–डोळे अश्रुंनी डबडबले. अश्रुपात–अश्रुप्रवाह. ओ. १२०. दमयंती पहाटे जागी झाली. ओ. १२३–१४७ दमयंतीचा विलाप व धांवा. हा विलाप कारुण्याची भावना उद्दीपित करणारा असल्यामुळें अतिशय काव्यमय उतरला आहे. ओ. १२३. चामकती–जाती, उचलती. ओ. १२६. धाय मोकलणें–हंबरडा फोडणें.ओ. १३१. झाडणें करुनी– अंगांतील भूत पिशाच्च काढण्यासाठीं मांत्रिक करतात तो टाहाळ टाकण्याचा विधि करणें. 'तुझ्या अंगांतील विष अगर भूत जावो म्हणून मी माझी काया तुझ्यावरून कुरवंडीन ' असें दमयंती म्हणते. सांडीन काया–माझें शरीर तुझ्यावरून ओवाळून टाकीन. ओ. १३४. अनिला–हे वायो! वाऱ्याची प्रार्थना करते. ओ.१३५. चर–पृथ्वीवर चालणारे प्राणी. ओ.१३७. चक्रवाकांतील नर–मादीचा रात्रीं विरह ठरलेला. त्यांना विरहवेदनेची जाणीव आहे, म्हणून दमयंती त्यांची सहानुभूति अपेक्षिते.ओं.१३८.शुद्धी-शोध,वार्ता. ओ. १३९. वर–पति. नल सोडून गेला तरी दमयंतीनें एका शब्दानें त्याची निंदा केली नाहीं. ओ. १४१. मातें होत इ.–तुझे श्रम किंवा कष्ट मला होवोत. ओ. १४६. व्यालु–सर्प. ओ. १४९. त्या अजगराच्या तोंडांत लोखंडाचा तुकडा घालून त्या पारध्यानें त्याचें तोंड आपल्या हातानें चिरलें. ओ. १५१. अंतुरी–पत्नी. ओ. १५२. धडकला मदन–व्याधाला; मदन-बाधा झाली. तिचा त्याला अभिलाष उत्पन्न झाला. ओ. १५३. दमयंतीच्या क्रोधदृष्टीनें तो कामी पारधी तात्काळ मरण पावला. ओ. १५४. अमार्गें– आडमार्गानें. दांगे–अरण्यें. डंग. ओ. १५५. दमयंती चराचराला नला-बद्दल विचारते. ओ. १५८. अशोक वृक्षाला दमयंती स्वत:स शोकरहित करण्यास विनविते. अशोक वृक्षाला अशी प्रार्थना करणें स्वारस्ययुक्त आहे.

ओ. १५९. थाटी–समुदाय. दमयंती आपणांस आपल्या पातिव्रत्याच्या प्रभावानें भस्म करील या भीतीनेंच श्वापदें तिच्याजवळ आलीं नाहींत.

'हेतोर्वाक्यपदार्थता'–काव्यलिंगालंकार. ओ. १६१. सव्य घालुनी–उजवी घालून. ओ. १६२. देवतटिनी ( गंगा ) ज्याप्रमाणें अमृतोदकानें वाहते तद्वतच (त्या अरण्यांतील ) सरिता जीवनीं प्रवाहे. त्या ( सरिते ) माजीं श्वेत, रक्त व बहुवर्ण नलिनी विकसल्या होत्या. तेथील नदीचें पाणी गंगोदकाप्रमाणें गोड होतें असा अर्थ. ओ. १६३. कारंडक–बदकें. रुख–वृक्ष. ओ. १६४. 'सोऽहमस्मि'–आत्मा–परमात्मा यांचें ऐक्य दर्शविणारें वाक्य. लक्षीं–वरील वाक्याच्या अनुसंधानांत, चिंतनांत. ओ. १६६. साचार–खरें. ओ. १६८. सिद्ध पुरुषांचें हें दर्शन दमयंतीला पुढील शुभसूचक होतें. ओ. १६९. उतरे–जात असलेला दिसला, descended. वसता–वाटसरूंचा मार्ग, रहदारीचा रस्ता. ओ. १७१. घंटाघोषें–घाटींच्या आवाजानें. ओ. १७२. वैश्यांनीं–त्या वाण्यांनीं दमयंतीला पाहून नाना तऱ्हेचे तर्क केले. ओ. १७३. शाकिनी–पिशाची. ओ. १७४. कांहीं तिला 'महाशक्ती' समजून तिची प्रार्थना करूं लागले. ओ. १७६. डोळसा–सुंदर. ओ. १७८. अन्वय–पंचराती क्रमितां वणिक्पती एक दिवस तडागतटीं वसती, तयासंगीं ( ती दमयंती ) स्वस्थ आनंदें राहिली. ओ. १७९. कुंजरथाट–गजांचा कळप. एक वाट–एकच वाट होती तिनें. आट–अनर्थ. नदीला जाण्यास एकच मार्ग होता, तो वाण्यांनीं व्यापलासें पाहून हत्तीच्या कळपानें अनर्थ मांडला.

ओ. १८१. वारण–हत्ती. त्या हत्ती व हत्तिणींनीं अनेक सावकार पायाखालीं तुडवून मारले. ओ. १८५. कवणाचे इ०–आपल्यापैकीं कोणाचें पातक हें असें फळाला आलें? आपल्यावर आलेल्या आपत्तीच्या कारणाबद्दल निरनिराळे तर्क करतात. मुहूर्त इ०–आपल्याकडून निघतांना चांगला मुहूर्त टाळण्याचा दोष झाला काय? ओ. १८६. यक्षराज–कुबेर. देवराज–इंद्र. ओ. १८७. कांहींनीं बरोबर असणाऱ्या दमयंतीबद्दल तर्क लढवून तिला निशाचरी ठरविलें. नेमस्त–खात्रीनें. महामारी–थोर आपत्ति, अनर्थ. ओ. १९०. उबगली–कंटाळली. ओ. १९१. वाव–व्यर्थ. ओ. १९२. आपणाकडून कसलेंच पाप झालें नसतां हा दुःखभोग कां यावा, असा दमयंतीला प्रश्न पडला. ओ. १९४. स्वयंवरांत देवांना अव-

म्हणून, मीं नलाला वरलें, एवढेंच पाप माझ्या गांठीं असल्यास नकळे. ओ. १९५. **वासरमणी**–सूर्य. ओ. १९६. **गोरक्षक**–गुराखी. **हस्तसंकेत**–हाताच्या खुणांनीं. ओ. १९९. **शिर्सी**–डोक्यावर. **धूळीधूसर**–धुळीचें पटल. ओ. २००. **वडवानळ इ.**–वडवानळ जसा समुद्राच्या पोटांत असतो, तसा संताप तिच्या मनांत होता. तो तिनें बाहेर दाखविला नाहीं. ओ.२०१. **कर्दम गोमय इ.**–चिखलाचे व शेणाचे गोळे. ओ. २०२. **उपरिकासद्नी**–माडीवर. ओ. २०४. **निकी**–खरी. ओ. २०८. **वृद्धा**–ती राजमाता. ओ. २०९. **परौती**–दूर. ओ. २१०. **भैमी**–दमयंती. ओ. २१२. **समागम**–संगत, घरीं राहणें. ओ. २१४. **सुवास इ०**–सुवासानें पवित्र झालेल्या हातांनीं. ओ. २१५. **नंदिनी**–मुलगी. चैद्य राजाची बहीण. **एकमिळणी**–एकोपा. हा शब्द शिवकालीन आहे. पहा–' मिळणी उभयासि होय जेथें । अधिकारी अधिकानुराग तेथें ॥–रघुनाथ पंडित. ओ. २१७. या कथारूपी नर्मदा नदीच्या वाळवंटांत हीं ओव्यारूपीं अनेक शंकराचीं लिंगें आहेत. नर्मदेंतील गोट्यांना बाण म्हणतात. वनपर्वातील कथा आपण अनेक ओव्यांत ग्रथित केली आहे, असा मुक्तेश्वराचा आशय. ओ. २१८. या कथारूपी नर्मदातीरावर श्रोत्यांनीं ऐकण्याच्या इच्छेनें जर तपश्चर्या मांडली, तर स्वधर्मपत्नीप्रमाणेंच भुक्ति, मुक्ति त्यांना सहज प्राप्त होईल. ही या कथेची फलश्रुति आहे. **भुक्ति**–उपभोग.

—*—

## अध्याय आठवा

निद्रिस्त दमयंतीला सोडून नल अरण्यांतून चालला असतां, पर्वतावर लागलेल्या एका वणव्यांत सांपडलेल्या कर्कोटक महासर्पानें आपलें रक्षण करण्यासाठीं त्यास हाक मारली. नलानें कर्कोटकाची सुटका केल्यामुळें, त्या

महासर्पानें पुढील गोष्टींची अटकळ करून नलाला दंश केला व सांगितलें कीं, 'माझ्या दंशानें तुझें रूप पालटेल व पुढील चार वर्षांच्या अज्ञातवासांत तें तुझ्या उपयोगीं पडेल. माझें स्मरण करतांच तुझें मूळचें सुंदर रूप तुला प्राप्त होईल.' त्याप्रमाणें आपल्या बदललेल्या रूपानें, नल अयोध्येस आला, व तेथील ऋतुपर्ण राजाच्या पदरीं सारथी, आचारी, व शिल्पशास्त्रज्ञ या नात्यानें, बाहुक हें नांव धारण करून चाकरीस राहिला. रात्रीं बाहुक, 'ज्यानें आपली बायको एकटी वनांत टाकली, त्याचें जिणें जळो' अशा अर्थाचे शब्द झोपेंत बडबडत असे.

इकडे भीमक राजाला आपल्या मुलीची व जांवयाची कांहींच बातमी न लागल्यामुळें, त्यांच्या शोधार्थ त्यानें सर्व दिशांना ब्राह्मण पाठविले. त्यापैकीं सुदेव नांवाचा ब्राह्मण चैद्य नगराला आला असतां, त्यानें दमयंतीला ओळखली. मग ही गोष्ट चैद्याच्या राजमातेला कळल्यावरून सुदेवानें दमयंतीची खरी हकीकत सांगितली. दमयंती ही आपल्या बहिणीचीच मुलगी आहे असें राजमातेला समजल्यावर, दमयंतीच्या इच्छेनुरूप तिनें तिची कुंडिनपुरास आईकडे रवानगी केली. यानंतर भीमकानेंही पुष्कळ ब्राह्मण नलाच्या शोधार्थ पाठविले. 'ज्यानें आपली बायको एकटी वनांत टाकली त्याचें जिणें जळो' हें वाक्य उच्चारतांच जो सखेद होईल, तो नल, अशी खुणगांठ तिनें सर्व दूतांना बांधण्यास सांगितली होती. पर्णाद नांवाचा ब्राह्मण नलशोधार्थ अयोध्येस आला असतां वरील वाक्य उच्चारतांच बाहुक सखेद झालेला पाहून, हा नल असावा असा त्यानें तर्क केला; पण त्याचें वाईट रूप पाहून त्याची खात्री होईना. रूपाशिवाय नलाचीं सर्व लक्षणें बाहुकाच्या ठिकाणीं जमतात, हें वृत्त पर्णादानें दमयंतीस सांगितल्यावर तिनें नलशोधाची एक नवी युक्ति योजली. तिनें, सुदेव ब्राह्मणास ऋतुपर्ण राजाकडे अयोध्येस धाडला व पुनः स्वयंवर करण्याचा आपला मनोदय जाहीर करण्यास सांगितलें. स्वयंवराचा दिवस दुसरेच दिवशीं असल्यामुळें, ऋतुपर्णानें आपल्या बाहुक सारथ्यास एका दिवसांत आपला रथ कुंडिनपुरास नेण्यास आज्ञा केली. बाहुकरूपी नलानें स्वयंवराची ही युक्ति आपल्या शोधार्थच आपल्या पत्नीनें लढविल्याचें जाणलें. अयोध्ये-

हून कुंडिनपुरास येतांना बाहुकाचें सारथ्यकौशल्य पाहून खूष होऊन ऋतुपर्णानें त्याला आपली अक्षविद्या दिली. अक्षविद्येंतील कौशल्य प्राप्त होतांच नलाच्या शरीरांतील कलि बाहेर पडला. पुढें कुंडिनपुरास रथ आल्यावर रथाच्या गतीवरून दमयंतीनें नलाच्या आगमनाचा तर्क बांधला. पार्गत मुक्काम करीत असलेल्या बाहुकाकडे तिनें आपली केशिनी नांवाची दासी पाठविली. गवताला हात लावतांच इच्छित अग्नि उत्पन्न होणें, क्षणांत स्वादिष्ट अन्न तयार होणें, पुष्पें चुरलीं तरी तीं पुनः स्पर्श करतांच टवटवीत होणें, इत्यादि देवांनीं दिलेल्या वरांशीं बाहुकाचीं लक्षणें जुळतात असें पाहून बाहुक हाच नल, अशी केशिनीची खात्री झाली. दमयंतीनें वडिलांच्या आज्ञेनें बाहुकाची गांठ घेतली, व पूर्ववृत्ताच्या खुलाशानें तोच नल अशी तिची खातरजमा झाली. यावर नल–दमयंतीचें मीलन होऊन सर्वत्र आनंद झाला.

आपणास संकटांत आसरा दिल्याबद्दल ऋतुपर्णाचे आभार मानून, नल आपल्या विदर्भ नगराला आला. पुनः द्यूत खेळण्यास अगर लढाईला तयार होण्यास त्यानें पुष्करास आव्हान दिलें. पूर्वी घालविलेलें आपलें राज्य ऋतुपर्णाकडून मिळविलेल्या अक्षविद्येच्या जोरावर नलानें परत मिळविलें. पुष्कराला त्यानें जीवदान दिलें, व अनेक यज्ञ करून पृथ्वीवर राज्य केलें. ही कथा सांगून बृहदश्वा 'नलाच्या कष्टापुढें तुझ्या कष्टांची मातबरी काय ती सांग,' असें धर्मराजास म्हणाला, व ऋतुपर्णानें नळाला दिली तशीच अक्षविद्या धर्मास देऊन तो ऋषि आपल्या आश्रमास गेला.
**ओ. १. चंड**–भयंकर. **ओ. २. भोगी**–सर्प. **ओ. ३. मरणभयाते इ०**–मला मरणाचें भय शिवत देखील नाहीं, हा मी आलोंच. **पावकचक्र**–अग्नीच्या परिघांतून. **ओ. ४. व्याळ**–सर्प. **ठायां**–स्थानीं. **ओ. ५. त्यातें**–सर्पातें. **फणी**–सर्प. **ओ. ६. अनुज**–धाकटा भाऊ. **ओ. ७.** हा नारदानें कर्कोटकाला दिलेला उःशाप होय. **पुण्यश्लोक**–नळराजा. **ओ. ९. उभा करूनियां**–थांबवून. **पदीं इ०**–नलाच्या पायानें आपलें शरीर त्या सर्पानें मोजविलें, व दहाव्या पावलावर येतांच सापानें नलाला दंश केला. **तीं**–त्या. हें 'पाऊलीं' याचें विशेषण घ्यावें. बरोबर दहाव्या

चावलावर असा त्याचा अर्थ होईल. 'ती' याचा 'तीन' असा अर्थ येथें करणें योग्य नाहीं. ओ. १०. **दशनीं**–दातांनीं. **शिरपादांत**–पायापासून डोक्यापर्यंत. ओ. ११. **आजानुबाहु**–गुडघ्यापर्यंत पोंचणारे लांब हात आहेत असा. हें भाग्यवानाचें लक्षण समजतात. ओ. १३. **भेदलें**–भिनलें. **आगीं**–अग्नीनें, उष्णतेनें.

ओ. १४. **कष्ट भोगितां नव्हे** कष्ट–दुःख भोगीत असतां त्रास होणार नाहीं. हें विरोधालंकाराचें उदाहरण असून नलाच्या अंगांत भिनलेल्या विषानें त्या विरोधाचा परिहार होतो. **झगटतां**–झगडत असतां. ओ. १६. **स्वस्वरूपाची**–मूळ स्वरूपाची. ओ. १८. **पाकविद्या**–सूपशास्त्र. स्वयंपाकाचें शास्त्र. **दुर्गधामा**–किल्ले व वाडे. **शिल्पक**–शिल्पशास्त्रज्ञ, ओ. २०. **आप्तवादें**–मित्राप्रमाणें. ओ. २३. **मासमासां**–प्रत्येक महिन्यास. ओ. २४ **देहनिर्वाह** इ०–देहाच्या निर्वाहासाठीं घासभर अन्न व अंगभर कपडा. नलानें निर्वाहप्रतिपन्नवस्तूच ऋतुपर्णाजवळ मागितल्या. ओ. २५. रात्रीं बाहुक झोपेंत चावळत होता. ओ. २८. **निमाली**–मेली. ओ. ३१. **भीमक**–दमयंतीचा पिता ओ. ३६. या ओवीचा प्रथमार्ध अभावात्मक असून दुसऱ्या अर्धांत दिलेली उपमा भावात्मक आहे. म्हणून ही उपमा सदोष आहे. **शून्यवादी** इ०–ईश्वराचें अस्तित्व न मानणाऱ्यांच्या तोंडीं जशी नास्तिकता (ईश्वर नाहीं असें वचन) असते तद्वत्. मुक्तेश्वराला धार्मिक किंवा आध्यात्मिक उपमा देण्याची संवय आहे. ओ. ३८. **मांगल्य** इ०–मांगल्यभरित अशा गृहांत. ओ. ३९. दुसऱ्या अर्धांतील उपमा अध्यात्मिक आहे. संसारी माणसांतून ब्रह्मचिंतनशील ज्ञानी पुरुष जसा ओळखून येतो, त्याप्रमाणें चैद्यराजाच्या वाड्यांतील इतर माणसांतून सुदेवानें दमयंती ओळखली. ओ ४० **उदीम**–व्यापार. व्यापार करतां करतां अचानक गड्डा हातांत यावा. ओ. ४१ सुदेवानें खुणेनें आपला हेतु प्रगट केला. **मात**–हेतु. ओ. ४५ इया दमयंती नामें विश्व मान्य होय. हिला दमयंती या नांवानें जग मान देतें, ओळखतें. ओ. ४६ **भाज**–स्त्री, पत्नी.

ओ. ४८ **अनर्घ्य**–अमूल्य. दमयंतीच्या कपाळावर उपजतच एक अमूल्य मणि होता. मूळ महाभारतांत दमयंतीच्या कपाळीं असणाऱ्या

अमूल्य मण्याचा उल्लेख नसून उत्तम तिळाचा आहे. पहा– ' अस्या ह्येषो भ्रुवोर्मध्ये सहजः पिप्लुरुत्तमः ।' ओ. ५०. वाऱ्यानें मेघ एकीकडे सारल्यावर, ज्याप्रमाणें शुक्रतारा तेजःपुंज दिसतो, त्याप्रमाणें दमयंतीचा केशकलाप एकीकडे सारल्यावर तिच्या भुवयांमधील तें रत्न स्वच्छ दिसलें. **अंबरा**–अभ्रास. **कबरीभारा**–वेणीचा केशकलाप. ओ. ५३. **वहिली**–स्वतंत्र, दुसरी. ओ. ५४. **मातृभगिनी**–मावशी. **शोके शोकलीं**–हें सजातीय कर्माचें ( Cognate object ) उदाहरण आहे. ओ. ५७. **पुत्रा**–चैद्यराजाला. **शिबिकायानीं**–पालखींतून. ओ. ६१. **उभय बालकें**–दमयंतीचा पुत्र व मुलगी. ओ. ६२. **परगृहवास**–दुसऱ्याच्या घरीं राहणें कष्टकारकच. पहा–' हा हा हा परगृहवासदूषणं यद्वैदेह्या प्रशमितमद्भुतैरुपायैः । एतत्तत्पुनरपि दैवदुर्विपाकदालर्कं विषमिव सर्वतः प्रसृप्तम् ॥ ' उत्तररामचरित. **पितृगृहिंचा** इ.–दमयंतीला नलाच्या विरहामुळें सुखद असा माहेरवास देखील कष्टकारक वाटला. ओ. ६६. **खनना**–उकरणें. पृथ्वी उकरून पुरलेला ठेवा काढतात, त्याप्रमाणें पृथ्वी शोधून नळाचा शोध काढावा. ओ. ६७. **बीजमंत्र**–अभिप्रायसूचक वचन. **जगाच्या श्रोत्रा**–जगांतील लोकांना. ओ. ६८. **सवर्म**–मनाला लागणारीं. ओ. ६९. भीमकानें धाडलेले ब्राह्मण जी घोषणा करीत होते, ती या ओंवींत दिली आहे. ओ. ७२. **चोजवेना**–जाणवेना. ओ. ७३. येथें प्रख्यात ७ पुऱ्यांपैकीं ६ दिल्या आहेत. फक्त त्यांपैकीं अयोध्याच शोधावयाची राहिली होती, व तेथेंच बाहुकरूपानें नलाचें वास्तव्य होतें.

ओ. ७५. **सूतकर्मा**–सारथी. **अनुवादें**–तुम्ही घोषणा करतां, तशा प्रकारच्या कांहीं गोष्टी, बाहुक बडबडतो. ओ. ७७. **चिन्मया**–ज्ञानस्वरूप. पण हें विशेषण नेहमीं परब्रह्माला लावतात. ओ. ७८. **धैर्य विश्रांति** इ०–भुकेल्या व ताहनेल्या अशा आपल्या पत्नीला टाकणाऱ्या नवऱ्याच्या चित्ताचें समाधान कोणत्या प्रकारानें होईल ? असा पर्णादाचा बाहुकरूपी नलाला प्रश्न. ओ. ८१. **उभड**–गहिंवर. **जवळी** इ०–आसपास कोठें तरी राहतो असें ऐकतो. येथून ८४ ओवीपर्यंत बाहुकच पर्णादाशीं बोलत आहे. आपली गहिंवरलेली वृत्ति झांकून बाहुकरूपी नल पर्णादाला म्हणतो, 'तुम्हीं म्हणतां तसा पुरुष मीं पाहिला असून तो कुलस्त्रियांच्या महतींचें वर्णन करीत होता.

तो कोठें गेला हें माहित नाहीं, पण थोड्या दिवसांत त्याची गांठ पडेल." ओ. ८३. जी कुलस्त्री आपल्या पतीचे अवगुण आपल्याच ठिकाणीं बोलते व त्या दोषांवर बाह्यतः पांघरूण घालते, ती देवांना मान्य होते. ओ. ८६. पर्णादाला बाहुकाच्या ठिकाणीं नलाच्या सर्व खुणा दिसल्या; फक्त रूपाचा पालट मात्र दिसल्यामुळें, तो नलच अशी त्याची खात्री झाली नाहीं. ओ. ८७. विकल्पा–संशयाला. ओ. ८९. दमयंतीनें आपल्या पुनःस्वयंवराची काढलेली युक्ति. राजा–भीमकराजा. ओवी ९०.–पुढतीं–पुनः. ओ. ९६. दमयंतीचें पुनः स्वयंवर होणार हें ऐकून बाहुकरूपी नलाला सर्व प्रकार उमगला. आपल्या शोधार्थच ही युक्ति योजण्यांत आली आहे, खरें पाहिलें तर ही स्वयंवराची बातमी खोटीच असली पाहिजे, हें त्यानें जाणलें. वदंती–वार्ता. ओ. ९९. अयोध्येला इतक्या तातडीनें रथ नेणें अशक्य असें त्यानें प्रथम सांगितलें. पण प्रत्यक्ष कुंडिनपुरास जाऊन खरा प्रकार काय तो पहावा असें कल्पून तो आतां रथ नेण्यास सज्ज झाला. पहिली अवघड गोष्ट दमयंतीच्या कुतूहलानें त्याला सुलभ करणें भाग पडलें. ओ. १००. मग राजा आपल्याशींच हंसून म्हणाला, 'हें काम काय अवघड आहे!' असेंच ऋतुपर्णाला म्हणावें, व सांगाल त्यावेळीं इष्ट स्थलीं रथ नेईन असें सांगावें.

ओ. १०१. वारू–घोडे. ओ. १०५. सांट–चाबूक. पडले–चालून गेले; उडाले. ओ. १०७. सारथ्याचें हें कौशल्य पाहूनच ऋतुपर्णाला बाहुक हा नल असावा असें वाटलें. ओ. १०८. वार्ष्णेय–हा तर नलाचा सारथी, ऋतुपर्णाकडेच चाकरीस होता. त्यालाही बाहुकाच्या कौशल्याचें आश्चर्य वाटलें. ओ. ११०. रथ किती वेगानें चालला होता हें दाखविण्यासाठीं हा प्रसंग योजला आहे. बाहुक म्हणतो, 'रथ दश योजनें आला आहे. इतका आल्यावर पुन राजवसन आणण्यास परत गेल्यास, आज तुमची व माझी भेट होणार नाहीं.' वस्त्र फार दूर पडलें, असा भाव. ओ. १११. भल्लातकाचा–बेहड्याचा. मूळ भारतांत 'बिभीतक' असा उल्लेख असून त्याचा अर्थ 'बिब्ब्याचा वृक्ष' असा आहे. ओ. ११२. ऋतुपर्ण आपण गणिती आहों हें दर्शविण्यासाठीं आपणास 'लीलावतीग्रंथज्ञ' म्हणवितो. लीलावती ग्रंथ–हा गणितग्रंथ भास्कराचार्यांनीं आपल्या लीलावती नांवाच्या

मुलीच्या नांवानें रचला. या ग्रंथाचा काल शके ११०० च्या सुमाराचा असतां, ऋतुपर्णानें त्या ग्रंथाचें ज्ञान आपणास आहे, असें म्हणणें, म्हणजे कालविपर्यासाचा दोष कवीनें पदरीं घेणें आहे. पण मुक्तेश्वराला जो गणितग्रंथ ठाऊक होता, तोच वरील दोषाचा विचार न करतां त्यानें ऋतुपर्णाच्या तोंडीं घातला. मुक्तेश्वर अशा दोषांचा विधिनिषेध मानीत नाहीं.

ओ. ११३. 'झाडावरील, तळ्यांत व झाडाखालीं पडलेलीं असंख्य फळें व पानें मी बरोबर मोजून सांगतों.' ऋतुपर्णाला ही गणितविद्या अवगत होती. ओ. ११७. बाहुकाच्या सारथ्यकर्मांचें कौशल्य दाखविण्यासाठींच पानें मोजण्याच्या या प्रसंगाची योजना कवीनें मोठ्या कौशल्यानें केली आहे. आपणास कुंडिनपुरास पोंचण्यास वेळ होईल या सबबीवर ऋतुपर्ण ही पानांची गणना आतां नको, असें म्हणत असतां बाहुक ज्या अर्थीं ती गणना त्याच वेळीं करण्याचा आग्रह धरतो, त्याअर्थीं मध्यें पुष्कळ वेळ दवडूनही रथ ठरल्या वेळाच्या आंत नेण्याबद्दल त्याला किती आत्मविश्वास होता, हें येथें दाखविलें आहे. ओ. १२०–१२१. ऋतुपर्णानें गणितविद्या व अक्षविद्या बाहुकाला द्यावी व उलट बाहुकानें अश्वविद्या ऋतुपर्णाला द्यावी, असें ठरलें. ओ. १२२. राया–नलाला. जाणता जाला–ऋतुपर्ण हा कर्ता. डाया–डाव. ओ. १३०. कलीनें भल्लातक वृक्षांत प्रवेश केल्यामुळें, तो वृक्ष त्या दिवसापासून निषिद्ध झाला. ओ. १३१–१३२. कली शरीराबाहेर गेल्यावर नलाच्या शरीराचें वर्णन. ओ. १३२. नावेक–थोडीशी. ओ. १३६. दमयंतीनें कल्पिलेल्या स्वयंवराची वार्ता भीमकाला नव्हती असें दिसतें. ओ. १३८. हे युक्ती–एका दिवसांत शत योजनें रथ आणण्याची कला. ओ. १४०. रथाच्या गतीवरून नळानें हाकलेला रथ दमयंतीनें ओळखला. ओ. १४१. हेलावत–उचंबळत. 'हेलावणें' हें शिवकालीन वाङ्मयांत नेहमीं येणारें क्रियापद आहे. पहा–'हेलावला नलपयोधि दयारसाचा'–रघुनाथपंडित. ओ. १४७. धांवडसी–धांवविणें. उगीच दहा ठिकाणीं आपली बुद्धि कां पळवितेस? वार्ष्णेयाला देखील नलाची खबर नसावी, असें बाहुक केशिनीला सांगतो. ओ. १४७–१५४. यांत बाहुक आपण नल आहे हें केशिनीस न सांगतां, नल तापसवेषांत असून तो कुलस्त्रियांचीं लक्षणें

तोंडानें कशीं बोलतो, हें केशिनीस सांगत आहे. ओ. १५२. 'सूर्यमंडल भेदून अक्षय अशा ब्रह्मलोकाला पोंचतात. पहा–' द्वाविमौ पुरुषौ लोके सूर्यमंडलभेदिनौ '–गीता. वृंदारक–देव.

ओ. १५५. बाहुक काय बोलला हें केशिनीनें सांगितल्यावर आणखी कांहीं खुणेच्या गोष्टी सांगून त्याप्रमाणें प्रत्यक्ष पाहून येण्यास दमयंतीनें केशिनीला बाहुकाकडे पाठविलें. बाहुक आपण नल आहे हें जितकें लपवीत होता, तितकीच दमयंती तो नल असावा याबद्दल त्याची परीक्षा पहात होती. ओ. १५५–१६०. नलाच्या अंगच्या गुणाच्या ज्या खुणा दमयंतीनें केशिनीला बाहुकाच्या ठिकाणीं आहेत काय तें पाहण्यास सांगितलें होतें, त्या केशिनी पाहते. ( १ ) इच्छेप्रमाणें अग्नि उत्पन्न होणें, ( २ ) घागरीस हात लावतांच ती पाण्यानें भरणें. ( ३ ) चुरगळलेली माला स्पर्श करतांच टवटवीत होणें, इत्यादि नळाचे हातगुण केशिनीनें बाहुकाच्या ठिकाणीं आहेत असें सांगतांच, तो नलच असला पाहिजे अशी दमयंतीनें खूणगांठ बांधली. ओ. १५९. शतपत्र–कमळ. ओ. १६१. आतां नलाचीं जीं मुलें होतीं तीं बाहुकाला भेटविल्यास त्याचा जर वृत्तिपालट झाला तर तो नलच, ही खात्री करण्यासाठीं त्या दोन मुलांना बाहुकाला भेटवितात. ओ. १६५. खाणाखुणा पटल्यावर दमयंती स्वतःच बाहुकरूपी नलाला भेटण्यास जाते. ओ. १६६. सत्य इ०–खरी गोष्ट विनाकारण लपवितोस. दमयंतीची नलाशीं भेट व संभाषण.

ओ. १६७. कां वधुनी इ.–किंवा आपल्या हातानें माझा वध तरी करून टाक. ओ. १७०. नल स्वतः प्रगट होतो. आपलें खरें स्वरूप व्यक्त करतो. ओ. १७२. त्या दुर्जनें–कलीनें. ठांया–स्वस्थानीं, ठिकाणावर. ओ. १७३. शकुनीनें–पक्ष्यानें. ओ. १७६. 'तूं दुसऱ्या विवाहाला प्रवृत्त व्हावें, अशीच माझी दुष्ट वागणूक आहे. पुनः स्वयंवर मांडून तूं दुसरा पति निवडल्यास तुझ्याकडे कांहीं दोष येणार नाहीं.' ओ. १७९. चक्षीं–डोळ्यांत. या ओवीला समानार्थक पहा–' आदित्यचंद्रावनिलोऽनलश्च द्यौर्भूमिरापो हृदयं यमश्च। अहश्च रात्रिश्च उभे च संध्ये धर्मोऽपि जानाति नरस्य वृत्तम् ॥' ओ. १८२. परिहारु–निरसन. 'हिच्याबद्दल शंका असल्यास तिचें निरसन मी सांगतों.' हिची उपमा इ०–दमयंतीला दमयंतीचीच

उपमा देण्यास योग्य. हा अनन्वय अलंकार होय. ओ. १८३. ' केवळ तुला शोधण्याच्या इच्छेनेंच स्वयंवराची युक्ति हिनें योजली, हें खोटें असेल तर पृथ्वी जगाचा भार घेण्याचें व्रत सोडील. ' दमयंतीचा हेतु किती खरा होता हें सांगण्याकरितां पृथ्वीच्या व्रताचा उल्लेख वर केला आहे. पृथ्वी जगताचा भार घेण्याचें व्रत जसें सोडणार नाहीं, तसें दमयंतीचें कृत्य खोटें असणें शक्य नाहीं. ओ. १८४. **अंकासनीं**–मांडीवर. **ओ. १९२. प्रीतिपडिभर**–हर्षातिशय. **अक्षवाणी**–आरती, ओवाळणी. ओ. १९३. **अभ्यंगमर्दन**–स्नान व मर्दन. **पहुडलीं**–निजलीं. **ओ. १९४. क्षेम**–आलिंगन. **जावळफळ**–जुळया फळाप्रमाणें. ओ. १९५. **निधान**–धनाचा ठेवा. **हृदयमांदुस**–हृदयरूपी पेटी. ओ. १९४–१९५. नल-दमयंती व नल यांचें मीलनवर्णन केलें आहे.

ओ. १९६. ब्रह्मानंदाचें सुख अक्षय आहे असें म्हणतात. पण त्यांत द्वैत नसल्यामुळें, तें कमी योग्यतेचें ठरतें. ब्रह्मसुखांत भक्त–भगवंत यांचें ऐक्य–अद्वैत झाल्यामुळें, कोण कोणाचें सुख भोगणार ? सुख भोगण्यास कोणी उरत नाहीं. येथें नल–दमयंती हीं दोघें असल्यामुळें, परस्परांना आनंद लुटतां आला असा भाव. **तुक**–महत्त्व. ओ. १९८. **शार्वरी**–रात्र. **पौरजा**–शहरवासियांना. ओ. २०१. धन व वस्त्रें इतकीं वाटलीं कीं, कुबेर देखील भिकारी झाला. **मागते**–याचक. ओ. २०२. **अग्रहार**–ब्राह्मणाला कुटुंबपोषणार्थ अर्पण केलेलें इनाम गांव, जमीन इ० ओ. २०३. बाहुक हा नळच होय, असें समजल्यावर त्याला चाकरीस ठेवण्यांत आपण नलाची अवज्ञा केली असें ऋतुपर्णास वाटलें. ओ. २०४. **उपकारा उत्तीर्ण**–उपकार फेडणें. ओ. २१०. **निर्वाण-झुंजा**–अखेरच्या युद्धाला. ओ. २१२. **पुढती**–पुनः. ओ. २१४. **ऋतुपर्णाची विद्या**–त्यानें नलास दिलेली अक्षविद्या. ओ. २२३. बृहदश्वा धर्माला अक्षविद्या देतो. ओ. २२४. **चारी पुरुषार्थ**–धर्म, अर्थ, काम व मोक्ष. ओ. २२६. **दोष दवडोनी** इ.–या ग्रंथाच्या विवेचनांतील दोष बाजूला सारून, दुर्लक्ष करून.

——*——

# अध्याय नववा

अर्जुनाच्या वियोगांत धर्मराजादि पांडव वनांत दिवस कंठीत असतां, नारद त्यांना भेटण्यास आले. धर्मराजानें नारदाला पृथ्वीप्रदक्षिणेचें फळ काय व पृथ्वीवरचीं तीर्थें केलीं असतां काय पुण्य लागेल म्हणून प्रश्न केला. तेव्हां असाच प्रश्न पूर्वी भीष्मानें पुलस्त्य ऋषीला केला असतां, त्या ऋषीनें, इंद्रियनिग्रही व संयमी पुरुषच कसा तीर्थस्वरूप असतो याचें जें विवेचन केलें व त्यानें ज्या तीर्थांचा नामनिर्देश केला, त्याचाच अनुवाद नारदानें केला. मग अंगांत कपटी अक्षविद्या खेळल्यामुळें मुरलेल्या पापाच्या क्षालनार्थ, लवकरच तेथें येणाऱ्या लोमशाच्या सांगण्याप्रमाणें तीर्थयात्रा करण्यास धर्मराजास सांगून नारद निघून गेला. इतक्यांत तेथें धौम्य आला व त्यानेंही आपण केलेल्या तीर्थांचा पाढा वाचला. ठरल्याप्रमाणें लोमश आला व त्यानें अर्जुनाची खुशाली सांगून, ' लोमश ऋषीबरोबर तीर्थयात्रा करावी ' हा अर्जुनाचा निरोपही धर्मराजास सांगितला. जवळच्या ब्राह्मणांची निरवानिरव करून धर्मराजानें तीर्थयात्रेची तयारी केली असतां, व्यास, नारद व पर्वत हे भेटावयास आले. नंतर नैमिषारण्यांत येऊन तेथून लोमशाबरोबर धर्मादि पांडवांनीं द्रौपदीसह तीर्थयात्रेस प्रारंभ केला. तीर्थयात्रेचें हें पथक गंधमादन पर्वताजवळ आलें असतां, द्रौपदी मूर्च्छित झाली. भीमसेनानें घटोत्कचाचें स्मरण केल्यामुळें, त्यानें सर्वांनाच खांद्यावरून वाहून नेलें. बदरीनारायणाजवळ आल्यावर द्रौपदीनें उत्साहानें गंगेत स्नान केलें. तेथून पुढील मार्गाची प्रतीक्षा करीत असतां वाऱ्यानें उडून आलेलें एक सोन्याचें हजार पाकळ्यांचें कमळ द्रौपदीस सांपडलें, व अशा हजार कमळांनीं धर्मराजाची पूजा करावी अशी इच्छा तिनें भीमसेनाजवळ प्रदर्शित केली. भीमसेन लागलीच तसलीं कमळें आणण्यास बदरिकाश्रमाच्या महावनांत शिरला. वाटेंत त्याला एक पांढऱ्या वर्णाचा विशाल वानर दिसला. त्याच्या शेपटीनें भीमाचा मार्ग रोधला गेला. भीमाच्या गर्जनेनें तो वानर रागावला. भीमानेंही आपल्या येण्याचा हेतु सांगून शेपटी बाजूला करण्यास वानरास विनंति केली. 'तूंच पुच्छ बाजूला सारून

पुढें जा ' असें वानरानें उत्तर दिल्यामुळें, भीमसेनानें पुष्कळ श्रम करूनही ती शेपटी त्याला बाजूला सारतां आली नाहीं. मग त्या वानरानें आपलें मारुतीचें खरें स्वरूप प्रकट करून रामचरित्रांतील आपण केलेलें द्रोणाचल नेण्याआणण्याचें महत्कृत्य भीमास निवेदन केलें. अशा रीतीनें भीमाचा गर्व हरण करून मारुती अदृश्य झाला व भीम पुढील मार्ग आक्रमीत कमळें आणण्यासाठीं कुबेरलोकाला निघाला. तेथील नदीच्या प्रवाहांत भीमाला सुवर्ण कमळें दिसलीं, पण तीं तोडून घेतांना त्याचें व कुबेराच्या सेवकांचें घनघोर युद्ध झालें. कुबेराला भीम आलेला कळतांच, तो कृष्णभक्त आहे हें जाणून कमळें तोडण्यास त्यानें त्यास परवानगी दिली. कमळें घेऊन भीम नदी उतरून येत असतां मोठा वारा सुटला. हें पाहून धर्मराजाला भीमाची काळजी वाटूं लागली. पण भीम येतांना दिसतांच सर्वांची काळजी दूर झाली. इतक्यांत पुढें न जाण्याची सूचना करणारी आकाशवाणी झाल्यामुळें, पांडव द्रौपदीसह आलेल्या मार्गानें परत फिरून बदरिकाश्रमाला आले.

**ओ. २. कृपेकरी**–कृपेनें. **ओ. ४. सुकृत**–पुण्य. **ओ. ८.** जो सत्यनिष्ठ आहे, त्यानें तीर्थवास केला नाहीं, तरी त्याला तीर्थवासाचें पुण्य मिळतें. नाहींतर एखाद्याला तीर्थांच्या ठिकाणीं वास करूनही लवमात्र पुण्य मिळत नाहीं. **ओ. ९. भजनमार्ग**–भक्तिमार्ग. **घेती त्रास**–तीर्थें अशा माणसाचा निषेध करितात. **ओ. ११.** मुक्तेश्वरानें मूळ भारताप्रमाणेंच आपल्या ग्रंथांत ठिकठिकाणीं हरिहरैक्य प्रतिपादन केलें आहे. **ओ. १३. धात्रा**–उत्पत्तिकर्ता. **वोढवती**–पुढें करिती. हा शिवकालीन शब्द आहे. पहा–' कीं सत्य चंचुपुट वोडवलें शुकानें.' ।–रघुनाथ पंडित. **ओ. १४. प्रतिग्रह**–दान घेणें. दान घेण्यास जो हात पुढें करीत नाहीं. **ओ. १५. क्लीबत्व**–नपुंसकत्व. **परापवादीं**–दुसऱ्याच्या निंदेंत. **ओ. १८–२०.** अधिकारपरत्वें कोणतें कोणाचें तीर्थ, तें सांगतात. **ओ. १८. कुलांगना** इ०–कुलस्त्रियेला लज्जा हेंच तीर्थ होय. तिनें मर्यादापालन केलें असतां अन्य तीर्थास जाण्याचें कारण नाहीं. **ओ. १९. धारातीर्थीं**–तरवारीच्या धारारूप तीर्थीं. क्षत्रियानें युद्धांत मरणें, धारातीर्थीं पतन पावणें, हें त्यास भूषणावह आहे. **ओ. २०. श्रवणादि** इ०–श्रवणादि नवविधा भक्तिरूपी तीर्थांत. **ओ. २३.** पुलस्त्य भीष्माला म्हणतो. ' मी ज्या तीर्थयात्रा केल्या त्या तूं ऐक. श्रवणरूपी फलांचें संक-

लन करण्यासाठीं आपली कर्णरूपी कूपिका पुढें कर. ऐकण्यास कान पुढें कर, असा अर्थ. कूपिका--कुपी.

ओ. २४. मुक्तेश्वराला विस्तार करण्याचा कंटाळा आहे, म्हणून तो थोडक्यांत कथा आटपतो. ओ. २७. या सर्व नद्यांना 'गंगा' अशी संज्ञा देतात. ओ. २९. मन्मथजिता-मदन जिंकला आहे ज्यानें अशा. ओ. ३४. येथून पाताळाला मार्ग जातो. ओ. ३८. नारद धर्मराजास म्हणतो कीं, 'तूं कपटपाश हातांत धरल्यामुळें, तुझ्या शरीरांत अवदशा शिरली.' ओ. ३९. तें पाप घालविण्यासाठींच नारद तीर्थयात्रा करण्याची सूचना धर्मराजास करतो.

ओ. ४४. काशीस शंकर व विष्णु या दोघांचें वास्तव्य आहे. यावरून त्यांचें ऐक्य कल्पिलें आहे. धूर्जटी-शंकर. ओ. ४९. मोक्षविके-इ०-काशीस मोक्ष फुकट मिळतो, अनायासें मिळतो, व सर्वांना सारखाच प्राप्त होतो, असा भाव. ओ. ५१. सायुज्य-परब्रह्मरूपीं मिळून जाण्याचा मोक्ष. ओ. ६१. ताम्रपर्णी नदी समुद्रास मिळते, तेथें उत्तम मोती निर्माण होतात असा उल्लेख रघुवंशांतही आला आहे. पहा-'ताम्रपर्णीसमेतस्य मुक्तासारं महोदधेः।' सर्ग ४।५०. ओ. ६३. सुराष्ट्रीं-काठेवाडांत. ओ. ६९. कनखल-हरिद्वाराजवळील एका तीर्थाचें नांव. पहा-'स्नात्वा च कनखले तीर्थे पुनर्जन्म न विद्यते।' ओ. ७१. सहस्रमुख-शेष. ओ. ७२. अटतां-फिरतां. ओ. ७५. पुढारीं-पुढें. हा शब्द शिवकालीन वाङ्मयांत विशेष येतो. पहा-'मोलें उणें व्यजन तें धरितां पुढारीं। छाया करी तपनदीप्तिसही निवारी॥"-हरिपंडितकृत नीतिशतक. ओ. ८३. पण तीर्थयात्रा करीत असतां अर्जुनाची भेट धर्माला झालेली कोठें दिसत नाहीं. ओ. ८४. लघू होणें-सुटसुटीत होणें.

ओ. १०४. गयराजा-हा मोठा धर्मात्मा व यज्ञयाग करणारा होता. सतत शंभर वर्षें हा यज्ञ करीत होता. गयदेशामध्यें हा राजा यज्ञयाग करीत असतां सरस्वती नदीला आमंत्रण दिल्यावरून प्रादुर्भूत झालेल्या सरस्वतीस विशाला असें म्हणूं लागले. ओ. १०५. अगस्त्य-वशिष्ठाप्रमाणें हाही मित्रावरुणांचा पुत्र होय. हा विरक्त होता. तथापि पितरांच्या

आज्ञेनुसार विदर्भाधिपतीची कन्या लोपामुद्रा इच्याशीं त्याचा विवाह झाला. ती राजकन्या असल्यामुळें, तिला अगस्त्यापेक्षां ऐश्वर्याची विशेष कल्पना होती. स्वतःच्या तपःसामर्थ्यानें वाटेल तें संपादणें शक्य असूनही, तपाचा व्यय करण्याची अगस्त्याची इच्छा नव्हती. पण लोपामुद्रेच्या इच्छेवरून श्रुतर्वन्, ब्रध्नश्व, व त्र्यसदस्यू यांच्याकडून संपत्ति मिळविण्याचा यानें प्रयत्न केला. पण याला यश आलें नाहीं. तथापि त्रसदस्यूनें अगस्त्याला इल्वलाच्या अपरंपार संपत्तीचें वर्णन सांगितलें. तेव्हां तिघाही राजांसह तो इल्वलाकडे गेला, व यानें आपल्या सामर्थ्यानें इल्वलाची संपत्ति घेऊन लोपामुद्रेला संतुष्ट केलें. इल्वल–तेरा सैंहिकेयांतील पांचवा व वातापीचा वडील बंधू. हा मणिमति नगरींत राहत असे. एकदां इल्वलानें आपणास इंद्रतुल्य पुत्र द्यावा म्हणून एका ऋषीची प्रार्थना केली. ती त्यानें नाकारल्यामुळें ब्राह्मण भेटला कीं, त्यांस आदरातिथ्याच्या मिषानें हा मारूं लागला. ब्राह्मण आला कीं प्रथम त्याचा आदर करावा, नंतर मेष बनलेल्या आपल्या वातापी बंधूचा पाक करून त्यास भोजन द्यावें, पुढें ब्राह्मण जाऊं लागला कीं, त्याचें शरीर विदारून वातापि बाहेर येतांच ब्राह्मण तात्काळ मरावा, असे सहस्रावधि ब्राह्मण त्यानें मारलें. अगस्ति ऋषि द्रव्यासाठीं इल्वलाकडे आला असतां, नित्याप्रमाणें त्यानें अगस्त्याचें कपटपूर्वक पूजन करून भोजनास राहून घेतलें. अगस्त्यानें त्याचें कपट ओळखून सर्व पाक आपण एकट्यानेंच भक्षिला, व वातापीस पोटांत पचविलें. हें ओळखून इल्वल अगस्त्याची प्राणदानासाठीं प्रार्थना करूं लागला. तेव्हां अगस्त्यानें त्याला अभय देऊन आपल्या आगमनाचें कारण सांगितलें. इल्वलानें यावर अगस्त्याबरोबर आलेल्या त्रिवर्ग राजांस विपुल द्रव्य देऊन अगस्त्यास त्यांच्या दुप्पट द्रव्य दिलें व ब्राह्मणांचा द्वेष सोडला. ओ. १०६. दधीच–वृत्रासुराला कसें मारावें याबद्दल देव विष्णूला विचारावयास गेले असतां विष्णूनें त्यांस सांगितलें कीं, इंद्रानें दधीची ऋषीचीं हाडें मागून त्वष्ट्याकरवीं त्याचें वज्र करून वृत्रास मारावें. नंतर देवांच्या प्रार्थनेवरून दधीचीनें योगबलानें प्राणत्याग केला व पुढें त्याच्या हाडांचें त्वष्ट्यानें वज्र बनविलें. ओ. १०७. भगीरथानें गंगा आणून सगरपुत्रांना कपिलाच्या शापापासून मुक्त केलें, तो कथाभाग. ओ.

१०८. ऋष्यशृंग–विभांडक मुनीचा मृगीपासून झालेला पुत्र. अंग देशांत अवर्षण झालें असतां, तेथील लोमपाद राजानें ऋष्यशृंगास आणून आपण पाळलेली शांता नामक राजकुमारी त्याला दिली. ऋष्यशृंगानें तृप्त होऊन अंगदेशावर पाऊस पाडला. जमदग्नी–भृगुकुलांतील ऋचीक ऋषीस गाधिराजाची कन्या सत्यवती दिली होती, तिच्यापासून हा झाला. याच्या पत्नीचें नांव रेणुका. तिच्यापासून याला रुमण्वान्, सुषेण, वसुमान्, विश्वावसु व परशुराम असे पुत्र झाले. जमदग्नि अत्यंत रागीट होता. आपण लीलेनें सोडत असलेले बाण परत आणण्यास त्यानें रेणुकेस सांगितलें असतां, उन्हानें श्रमल्यामुळें तिला ते आणण्यास उशीर झाला. यावर राग येऊन तो सूर्यावर संतापला. सूर्यानें शरण येऊन 'मी तुझ्या उदरीं येईन' असा त्याला वर दिला. पुढें सूर्य परशुरामाच्या रूपानें जमदग्नीचे उदरीं आला. एकदां रेणुका सरोवरास स्नानास गेली असतां तेथें क्रीडा करावयास आलेल्या चित्ररथादि गंधर्वांचें ऐश्वर्य पाहून तिला त्यांच्याबद्दल अभिलाष उत्पन्न झाला व घरीं येण्यास उशीर झाला. हें पाहून जमदग्नीनें आपल्या पुत्रांना रेणुकेचा शिरच्छेद करण्यास सांगितलें. परशुरामानें मात्र बापाचें ऐकून आपल्या आईचा शिरच्छेद केला. इतर मुलांनीं तें नाकारलें. तेव्हां परशुरामावर प्रसन्न होऊन जमदग्नीनें त्याला वर दिला व त्या वरानें आपल्या आईस परशुरामानें जिवंत केलें. पुढें जमदग्नीनें राग सोडला. कार्तवीर्य–यालाच अर्जुन, सहस्रार्जुन, हयाधिपति अशीं नामांतरें आहेत. मृगयेनिमित्त फिरत असतां हा जमदग्नीच्या आश्रमीं आला. तेथें असलेली कामधेनु त्यानें वासरासह बलात्कारानें नेली. तपश्चर्येस गेलेल्या परशुरामास हें वृत्त कळल्यावर त्यानें कार्तवीर्यावर स्वारी करून त्याला मारलें. पण हें वैर स्मरून कार्तवीर्याच्या पुत्रांनीं परशुरामाचा बाप जमदग्नि ध्यानस्थ असतां त्यांस मारून त्याचें शिर नेलें. परशुराम तीर्थयात्रेहून परत आल्यावर त्याला हें समजतांच आपल्या आईचें सांत्वन करण्यास्तव एकवीस वेळां निःक्षत्रीय पृथ्वी करण्याची प्रतिज्ञा करून त्यानें कार्तवीर्याच्या पांच खेरीज सर्व पुत्रांना मारलें, व जमदग्नीचें मस्तक आणलें.

ओ. ११०. सुकन्या–ही शर्याति राजाची मुलगी, च्यवनभार्गव ऋषीला दिली होती. प्रभास तीर्थाच्या ठिकाणींच सुकन्येच्या पतिनिष्ठेमुळें, तिच्या

वृद्ध पतीस अश्विनीकुमारांच्या प्रसादानें तारुण्य प्राप्त झालें, म्हणून या तीर्थाचें महत्त्व. **रैभ्य**–विश्वामित्राचा पुत्र. हा भरद्वाजाचा मित्र असून याला आर्वावसु व परावसु नांवाचे दोन पुत्र होते. याचा मुलगा परावसु यानें रैभ्याला मृग समजून ठार केलें. पण याला पुनः त्यानें जिवंत केलें. युधिष्ठिर याच्या आश्रमांत गेला होता. **ओ. ११२. घटोत्कच**–हा भीमाचा हिडिंबेपासून झालेला पुत्र.

**ओ. ११५.** बदरीनारायणाश्रमाचा उल्लेख. गंधमादन हें हिमालयाचें अत्युच्च शिखर कल्पिलें आहे. **ओ. ११७.** वाऱ्यामुळें त्या सहस्र पाकळ्यांच्या कमलाचा सुवास द्रौपदीपर्यंत पोचला, व तेथें एक कमल येऊनही पडलें. **ओ. ११८. कल्हार**–कमळ. **ओ. १२०.** सीतेची कंचुकीची इच्छा पुरविण्यासाठीं राम जसा कांचनमृगाच्या पाठीमागें धांवला, तसा भीम, हीं सहस्रदल कमलें आणण्यास गेला. मुक्तेश्वर बहुधा रामायणांतील दाखले बरेच वेळां देतो. कौतुक रामायण रचल्यावर महाभारत रचना केल्यामुळें, रामायण कथा त्याच्या मनांत ताजी असावी. **ओ. १२५. कपिनायक**–वानरश्रेष्ठ. **ओ. १२६. शेषाकृति**–सर्पाकार. **ओ. १३२.** भीमसेन जसा वायुनंदन होता तसा मारुतीही वायुपुत्र होता. म्हणून एकाकडून दुसऱ्याचा गर्व हरण केला आहे. **ओ. १३६. पीनाक**–शिवधनुष्य. रावणाला शिवधनुष्य हालवितां आलें नाहीं त्या कथेचा उल्लेख. मुक्तेश्वर येथेंही रामायणकथेचाच दृष्टांत देत आहे. **ओ. १३७. वाळ**–शेपूट. **ओ. १४३. गोष्पद्प्राय**–गाईच्या पावलांत सांठलेल्या पाण्याप्रमाणें ओलांडण्यास सुकर. **ओ. १४४.** इंद्रजिताची शक्ति लक्ष्मणाला लागली असतां सुषेण वैद्याच्या सुचनेवरून औषधीसाठीं मारुतीनें द्रोणागिरी आणला व पुनः जेथल्या तेथें नेऊन ठेवला. **ओ. १४५.** मारुती स्वतःस कृष्णाचा दास म्हणतो. **ओ. १४८.** मारुतीनें पूर्वीं समुद्रोल्लंघन करतांना धरलेलें प्रचंड स्वरूप दाखविण्यास भीमसेन त्याची प्रार्थना करीत आहे. **अवगणें**–धारण करणें, स्वीकारणें–पहा–' राजसां तामसां भावाची परी। तेही नटिला तो। ऐसें अवगौनि मुरारी। येतसे गोकुळा माझारी।'–वच्छहरण २८९–९०.

ओ. १५२. मारुतीचें रौद्ररूप पाहून भीमाला मूर्च्छा आली. म्हणून तें झांकण्यास तो विनंति करतो. ओ. १५७. कणवा–कृपेनें. केतुला केवा–त्यांची काय किंमत ? ओ. १५८. प्लवंगम–वानर. ओ. १६१. कूळीं–तीरावर. ओ. १६२. सुवर्णनाळीं–सुवर्ण देठासह. ओ. १६३. धनद्–कुबेर. ओ. १६५. भद्रजाती–हत्ती. ओ. १६८. सत्राणें–जोरानें. पहा–' सत्राणें उड्डाणें हुंकार वदनीं. ' ओ. १७२. पूर्वमार्गीं–आल्या वाटे परतले. ओ. १७४. अति विनोदु–अति कौतुक.

—*—

## अध्याय दहावा

पांडव बदरिकाश्रमांत रहात असतां जटासुर नांवाचा राक्षस ब्राह्मण-वेषानें त्यांची सेवा करून राहिला होता. धर्मराजाचें अन्न खाऊन द्रौपदीचें हरण करण्याचा या राक्षसाचा विचार होता, व यासाठीं तो भीमाच्या गैरहजेरीची वाट पहात होता. एके दिवशीं भीम शिकारीला गेला आहे असें पाहून त्या राक्षसानें धर्म, नकुल, सहदेव व द्रौपदी या चौघांचें हरण केलें, व त्यांना आडमार्गानें वनांतून तो घेऊन चालला. पण याच मार्गानें परत येणाऱ्या भीमाची व जटासुराची गांठ पडून दोघांत घनघोर युध्द झालें. राक्षसाला मारून भीमानें सर्वांची सुटका केली. पुढें फिरतां फिरतां भीम एकदां गंधमादन पर्वतावर चढला व तेथून त्यानें कुबेरनगर गांठलें. परका भीम पाहून मणिमंतादि कुबेराच्या सेवकांनीं त्याच्याशीं कुरापत काढून युद्ध आरंभिलें. भीमानें मणिमंताला मारलें, पण अगस्तीच्या शापाप्रमाणें आपलें सैन्य मारलें जाणारच होतें, हें ठाऊक असल्यामुळें, कुबेरानें न रागावतां उलट भीमाचा व त्याच्या बंधूंचा सन्मान केला. अगस्तीनें कुबेराचें सैन्य व त्याचा परिचारक मणिमंत यांना उठविलें.

धर्मराजादि पांडव अशाप्रकारें कुबेरासह गंधमादन पर्वतावर मजेंत असले असतां, स्वर्गाहून अर्जुन परत आल्याची वार्ता अनेक नगाऱ्यांनीं त्यांना दिली. अर्जुन सर्वांना भेटला. पाठोपाठ इंद्रही तेथें येऊन पुढील जयाचें आश्वासन देऊन गेला. धर्मराजाच्या प्रश्नावरून अर्जुनानें आपण पाशुपतास्त्र कसें मिळविलें, इंद्राचे शत्रू तीन कोटी निवातकवच राक्षस कसे मारले, इत्यादि सर्व वृत्तांत कथन केला. पुढें पाशुपतास्त्राचा प्रभाव पाहण्याची इच्छा धर्मराजानें प्रदर्शित केल्यावरून अर्जुनानें तो दाखविला. पण त्या अस्त्रामुळें प्रलयकालची स्थिति प्राप्त झाल्यामुळें, अर्जुनानें तें आवरलें. यानंतर एकदां बदरिकाश्रमाच्या वनांत फळें आणण्याकरितां भीम गेला असतां एका मोठ्या अजगराकडून तो गिळला गेला. फक्त भीमाचें डोकेंच तेवढें बाहेर राहिलें होतें. भीमाच्या पावलांचा माग काढीत धर्मराज सापाच्या ठिकाणापर्यंत आला, व हा साप म्हणजे अगस्तीच्या शापानें साप झालेला नहुष राजा होय, हें त्यास कळून आलें. आपण विचारणार असलेल्या प्रश्नांचीं समाधानकारक उत्तरें मिळाल्यास आपण भीमास मुक्त करूं असें सापानें सांगितलें. त्याप्रमाणें धर्मराज व तो साप यांमध्यें ब्राह्मण्याचीं लक्षणें, पापपुण्यविवेक, हीन योनींतून मुक्त होण्यास साधन, इत्यादि विषयांवर प्रश्नोत्तरें होऊन धर्माच्या उत्तरांनीं प्रसन्न होत्सात्या सर्पानें भीमाची सुटका केली. वरील संभाषणानंतर सर्पाची काया पालटून तो दिव्यदेही झाला. आपल्या वंशांत उत्पन्न झालेल्या धर्मराजानें आपला उद्धार केला हें पाहून, त्यांस आशीर्वाद देऊन नहुष स्वर्गाला गेला. पुढें पावसाळा आला व कार्तिकमासीं धर्मराज ऋषींसह काम्यकवनाला आला. ओ. ५. वळघला–चढला. ओ. ८. बडिश–गळ. माशानें जर गळालाच आमिष मानलें, तर त्याच्या प्राणावर ज्याप्रमाणें बेततें. अमृत इ०–पूर्वी अमृतमंथनाच्या वेळीं मोहिनीनें देवांना अमृत वाढलें. राहू देवाच्या रूपानें पंक्तींत बसला असतां, चंद्रसूर्यांनीं त्याची चहाडी केली व त्यास अमृत पचूं दिलें नाहीं. त्यामुळें राहू चंद्रसूर्यांना ग्रासतो. ओ. १०. एकांग–एकदेशी. निकुरें–निश्चयपूर्वक. तुझी शहामत असल्यास माझ्या एकट्याशीं लढ, असा अर्थ. ओ. १५. मांसभार–शिकारीस गेल्यामुळें भीमानें पुष्कळ श्वापदें मारून त्यांचें मांस आणलें होतें तें.

**ओ. १६.** भीमानें आपले हे जातभाई मारले, म्हणून जटासुराचा भीमावर राग होता. **ओ. १८. निझाडी**–वृक्षरहित. **ओ. २१. मशक**–घुंगुरटें. **ओ. २७.** भीमानें जटासुराचें शीर इतकें वर उडविलें कीं, तें सूर्यापर्यंत पोंचलें, सूर्याला तें राक्षसाचें डोकें पाहून राहूच आला अशी भीति वाटली. राहू हा देखील राक्षसच होता. म्हणून जटासुराचें शीर व राहूचें शीर यांत सूर्याला साम्य वाटून तो भ्याला. अतिशयोक्ति अलंकार. **ओ. ३८. भेदूनी** इ०–तो पर्वत इतका उंच कीं, सूर्यास भोक पाडूनच तेथें तो बसविला आहे कीं काय असें वाटे. **ओ. ४२. पारखा**–परका. **ओ. ४४. धन्वंतरी**–देवांचा वैद्य. चौदा रत्नांपैकीं एक. पद्य–'लक्ष्मी कौस्तुभ पारिजातक सुरा धन्वंतरिश्चंद्रमाः '–**काळफणी**–काळसर्प. **ओ. ५१ राक्षसपाळ**–कुबेर. **ओ. ५५.** अगस्तीनें कुबेरास शाप दिला होता. भीमासारख्या माणसाकडून त्याचें सैन्य मारलें गेल्यामुळें, अगस्तीच्या शापाची प्रतीति कुबेराला आली होती. **ओ. ५६.** नैर्ऋत्यपती–कुबेर.

**ओ. ७५ पुरंदर** –इंद्र. **ओ. ७९ याहुनी** इ०–याहून मिळावयाचें तें काय राहिलें ? **ओ. ८२.** पासून अर्जुन, पाशुपतास्त्रलाभाची व आपल्या स्वर्गवासाची हकीकत सांगत आहे. **ओ.८५.** जें स्वर्गसुख आम्ही पुराणांतच ऐकत होतों, तें आम्हांस प्रत्यक्ष पहावयास मिळालें. **ओ. ८६. निवातकवच**–प्रल्हादभ्राता जो संह्लाद, त्याच्या पुत्रांना हें नांव दिलें आहे. हे राक्षस इंद्रासही अजिंक्य असून रावणाचे मित्र होते. अर्जुनानें यांचा वध केला. हे साठ किंवा चवऱ्याहत्तर हजार होते. कश्यपपुत्र पौलोम व कालकेय यांसही निवातकच म्हणतात. **ओ. ९१.** इंद्र हा पर्वताचा शत्रु आहे. **ओ. ९२. सुरिया** इ.–सुरीनें नवीन कणसें, किंवा शस्त्राच्या धारेनें केळीचे घड ज्याप्रमाणें कापले जातात, त्याप्रमाणें. **ओ. ९३ शीसपद्मीं** इ.–शीर्षरूपीं कमलांनीं पृथ्वीरूपी शंकराच्या पिंडीची पूजा झाली. शत्रूंचीं अनेक डोकीं रणांगणावर पडलीं. या रूपकाची मुक्तेश्वराला हौस दिसते. **ओ. ९४. वैधव्यपाटीं**–शत्रूंच्या बायका वैधव्याच्या पाटावर बसविल्या, विधवा केल्या. अर्थात् शत्रु मारले असा आशय.

**ओ. ९६. कालकेय** ( कालेय )–हिरण्यपुरांत राहणारे असुर. ह्यांना अर्जुनानें मारलें. मारीचाची स्त्री कालका, तिचे पुत्र कालकेय. यासच

कालकंज असेंही नामांतर आहे. **पौलोम**–पुलोमेचे पुत्र. हे हिरण्यपुरांत राहत असत. हे ब्रह्मदेवाच्या वरानें मत्त झाले असतां अर्जुनानें त्यांचा वध केला. **ओ. ९७. यासी**–कालकेयादिकांना. **ओ. १००. मशक**– घुंगुर्टे. **ओ. १०९. कंद**–गड्डा. **ओ. ११८. कांक्षा**–इच्छा. या ओवींतील अनुप्रास लक्षांत ठेवण्यासारखा आहे. **ओ. १२२. मेरु** इ०–मेरुपर्वत उखळून जाऊन एकीकडे पडला. **ओ. १२४. चंद्रशकलें** इ०–चंद्राचे तुकडे पडून कल्पांताच्या वेळचा वारा वाहूं लागला. **ओ. १२६. उपसंहारी**–आटोपतें घे. **ओ. १२९. गोठला** इ०–विषाचा गोठलेला समुद्रच, असा सर्प. ही कल्पना नवीन आहे. **ओ. १३३. पहात** इ०–भीमाचीं जीं पावलें उमटलीं होतीं त्या मार्गानें.

**ओ. १३६. उरगाप्रती**–सापास. **ओ. १३८. नहुष**–हा ययातीचा पिता. इंद्रानें त्रिशिराला मारल्यामुळें त्याच्या हांतून ब्रह्महत्येचें पातक घडलें व तो वेडा होऊन हिंडूं लागल्यामुळें इंद्रपद रिकामें पडलें. तेव्हां सर्व देव ऋषि यांनीं नहुषाला इंद्रपदीं बसविलें. कांहीं दिवस स्वर्गाचें राज्य केल्यावर त्याला गर्व प्राप्त होऊन तो विषयलंपट बनला. एके दिवशीं इंद्राणीला पाहतांच तो कामोत्सुक झाला. ही गोष्ट इंद्राला तिनें सांगितल्यावर इंद्र म्हणाला, ' तूं नहुषाकडे जाऊन सांग कीं,' तुम्हीं जर आपल्या पालखीला सप्तर्षी वाहनासाठीं लावलेंत तर मी तुम्हांस वरीन. ' इंद्राणीनें ही अट नहुषाला सांगितल्यावर, त्यानें सप्तर्षींना वाहनास लावले व वाटेंत अगस्त्य ऋषीच्या डोक्याला पाय लावून ' सर्प सर्प ' म्हणजे लवकर चला असें म्हटलें, अगस्त्यानें यावर संतापून नहुषाला ' पृथ्वीवर दहा हजार वर्षें सर्प होऊन पड ' असा शाप दिला. पण नंतर दया येऊन ' तुझी मुक्तता युधिष्ठिर करील ' असा त्यास उःशाप दिला. **ओ. १४४.** ' एक तर माझ्या प्रश्नाचीं उत्तरें सांग, नाहीं तर भीमाला गिळतों ' असा पेंच सर्पानें धर्मापुढें टाकला.

**ओ. १४८. श्वपच**–चांडाल. पहा–'शुनि चैव श्वपाके च पंडिताः समदर्शिनः ' ।–गीता. **ओ. १४९. सीतरूनी**–फसवून. हा शिवकालीन शब्द आहे पहा–' त्वरें यमाचे गति सीतराया '–नागेश–सीतास्वयंवर ' पूर्वजासि सिंतरिलें । पक्ष श्राद्ध नाहीं केलें '–दासबोध. ३।३।९.

ओ. १५०. नुसत्या जन्मानें जे ब्राह्मण आहेत, ते खरे ब्राह्मण नव्हेत. ओ. १५५. अनृशंस्यता–अक्रौर्य, अदुष्टता. येथें, भाववाचक नामाचे दोन प्रत्यय लावले आहेत. ओ. १५७. अर्थवादांग–अर्थाची धुसफुस, ओढाताण. ओ. १६१. सरता होय–मान्य होय. पहा–'तुका म्हणे माती होय कस्तुरीनें सरती.'–तुकाराम. ओ. १६३. हे सर्व हीनयोनी असूनही, ईश्वरभक्त असल्यामुळें मोक्षाला गेले. ऋक्ष–अस्वल, जांबवान्. बहुळा–अतिशय (आवडे) ओ. १६४. पांचही मृगें–एकदां एक व्याध शिवरात्रीच्या दिवशीं एका सरोवराजवळ शिकारीसाठीं बसला असतां तेथें अनुक्रमें चार हरिणी आल्या. प्रत्येकीनें अनुक्रमें, आपल्या गर्भाला घरीं ठेवून येण्याचें, आपल्या पतीला भेटून येण्याचें व मुलांना स्तनपान देऊन येण्याचें अभिवचन दिलें, व आल्यानंतर आपणास मारण्यास विनंति केली. शिवरात्रीच्या शिवभजनानें व्याधाची वृत्ति शिवमय झाली, तोंच त्या हरिणी वचन दिल्याप्रमाणें आपल्या पतीसह पारध्याकडे आल्या. मरणाबद्दल त्या हरिण–हरिणीमध्यें अहमहमिका लागली, त्यामुळें व्याध सद्गदित झाला. हरिणांच्या निरूपणानें व वर्तनानें त्याचें पाप जळालें. इतक्यांत शिवलोकाहून विमान येऊन सर्वांना शंकरांचें दर्शन घडलें. व्याध व हरिण यांना दिव्य शरीरें प्राप्त झालीं. ही कथा स्कंदपुराणांतील ब्रह्मोत्तर खंडांत दिली आहे. ओ. १६४. कपोत–कपोती–किरात देशाचा राजा विमर्शन हा शिवभक्त होता. पूर्वजन्मीं तो कुत्रा होता व त्याची राणी कपोती होती. शिवोपासनेनें त्यांना राजाराणीचे अनेक जन्म मिळून शेवटीं त्यांचा उद्धार झाला. ओ. १६५. पिंगळा–मिथिला नगरींतील एक वेश्या. एके दिवशीं ही नेहमींप्रमाणें परपुरुषाची वाट पहात बसली असतां मध्यरात्रीपर्यंत कोणीही न आल्यामुळें, हिला वैराग्य प्राप्त होऊन ही ईश्वरप्राप्तीला अधिकारी झाली. अवधूतानें हिला गुरु केलें. पहा–भागवत ११।८. धर्मव्याध–मिथिला नगरींत राहणारा एक व्याध. यानेंच तपानें गर्वित झालेल्या कौशिक ब्राह्मणास उपदेश केला. धर्मव्याध अत्यंत धार्मिक होता. त्याचीं नित्यकर्में कधींच चुकत नसत. तथापि हा आपला उदरनिर्वाह शीकारीवरच करीत होता. याला अर्जुनी म्हणून

एक मुलगी होती, तिचा विवाह मातंग ऋषीचा मुलगा प्रसन्न याच्याशीं झाला होता. अर्जुनीची सासू तिला ' जीवघातक्याची कन्या ' असें लागून बोलली असतां, धर्मव्याधानें मातंगाला ' तूं शाकाहारी असलास तरी जीवघातकच आहेस ' असें उलट उत्तर पाठविलें.—वराहपुराण ८. यज्ञपत्न्या—एके दिवशीं श्रीकृष्णबलरामासह रानांत जाणाऱ्या गोपाळांनीं बरोबर शिदोऱ्या नेल्या नव्हत्या. त्यांना भूक लागतांच श्रीकृष्ण म्हणाले, ' जवळ ब्राह्मणांचा ' बृहस्पतिसत्र ' नांवाचा यज्ञ चालला आहे, तेथें आमचीं दोघांचीं नांवें सांगून अन्न मागा. ' त्याप्रमाणें गोपाळ ब्राह्मणांजवळ जाऊन अन्न मागूं लागले असतां तें त्यांनीं दिलें नाहीं. मग श्रीकृष्णांनीं ब्राह्मणांच्या बायकांजवळ अन्नाची मागणी आपल्या व बळरामाच्या नांवानें करण्यास सांगितलें. ब्राह्मणांच्या स्त्रिया मात्र आपल्या पतींचा विरोध न जुमानतां श्रीकृष्णाकडे चतुर्विध अन्न घेऊन आल्या. श्रीकृष्णानें प्रसन्न होऊन ब्राह्मणस्त्रियांना गृहस्थाश्रम चालविण्याचा वर दिला. म्हणून या कथेस यज्ञपत्न्याख्यान असें नांव पडलें. वरील दोन ओव्यांत दिलेले ईश्वरभक्त हीन जातींतील निषिद्ध कर्म करणारे स्त्रीशूद्रादि असूनही ईश्वरभक्तीमुळें तरून गेले, असें धर्मराजानें सोदाहरण सिद्ध केलें आहे.

ओ. १६६. वरील ईश्वरभक्त ब्राह्मण नव्हते, ब्राह्मणत्वाचा अग्नि त्यांना स्पर्शला नव्हता, तरी ते विष्णुपदीं विलीन झाले. मुक्तेश्वरानें वरील भक्तांच्या यादींत शिवभक्तांचा व विष्णुभक्तांचा समावेश करून शिवविष्णु या देवांचें ऐक्य वर्णन केलें आहे. ओ. १६७. विशेष इ०—ब्राह्मण हा वर्ण प्रमुख आहे. बाकीचे मनुष्यप्राणी, जातिहीन असून, त्यांत श्रेष्ठ-कनिष्ठ कोणी नाहीं. ओ. १६९. अतप्त—शांत. अप्रशंसा—निरभिमानता. घृणी—घृणा असें असावें. घृणा=दया. ओ. १७५. तिर्यग्योनी—हीन योनी. पशुपक्ष्यांचा अथवा भूतपिशाचांचा जन्म. ओ. १८०. धर्म, सर्परूप नहुषाला म्हणतो, ' इतका विवेकशील तूं असतां ब्राह्मणांचा अपमान करून तूं आपल्यावर ही शापाची आपत्ति कां ओढवून घेतलीस ? ' ओ. १८३. जो शेतांत किंवा अरण्यांत जाऊन वाघास आव्हान देतो, त्याच्यावर वाघ चाल करतो. तद्वतच ज्ञानीदेखील गर्वाधीन झाल्यावर महासंकटांत पडतो. दळामाजी—शेतांत, रानांत. पाचारी—बोलावतो, आव्हान देतो.

ओ. १८८. वंशज–नहुष हा धर्मराजाचा पूर्वजच होता. ओ. १८९. मूर्ध्नी अवघ्राण–डोकें हुंगणें. वात्सल्याचें लक्षण. ओ. १९१. भाज–भाजा=पत्नी, ( द्रौपदी ). ओ. १९०–२००. हें वर्षाकाळचें वर्णन स्वतंत्र असून मुक्तेश्वराच्या उच्च प्रतिभेचें द्योतक आहे. ओ. १९२. पंचम ऋतु–सहा ऋतूंत वर्षाकाल हा पांचवा आहे. मोकली–सोडी. ओ. १९३.' पृथ्वीवरील सर्व जलसंचय जणुं काय पारध्याच्या रूपानें आकाशांत अवतरला असून तोच आज मृगनक्षत्ररूप श्वापदाच्या पाठीमागें धांवत त्यांना इच्छित स्थलीं पिटाळून नेत आहे.' आकाशांत मेघांच्या चाललेल्या धिंगाण्यावर ही उत्प्रेक्षा केली आहे. ओ. १९४. 'त्या पारध्यानें इंद्रधनुष्यरूप चाप मुठींत धरलें असून रोहिणीमृगादि नक्षत्रश्वापदांवर तो मेघधारारूप बाणांची वृष्टीच जणुं करीत आहे.' वर्षाकालीं इंद्रधनुष्याचा प्रादुर्भाव असतो, त्याच्यावर पारध्याच्या चापाचा आरोप हृद्य आहे. ओ. १९५. वर्षाकालावर दुसरें रूपक. सूर्यकिरण हेच कोणी मृगांचा समुदाय, ते पारध्याच्या भयामुळें निस्तेज होऊन मेघांच्या मागें लपण्यासाठीं जागाच जणुं शोधीत आहेत. हें संबंधोत्प्रेक्षेचेंही उत्तम उदाहरण आहे. पावसाळ्यांत सूर्यकिरणें निस्तेज असून मेघाआड लपलेलीं असतात, यावर कवीनें बसविलेली कल्पना उत्तुंग आहे. ओ. १९६. किंवा पृथ्वीचे भाग याच शाळुंखा असून त्यांवर असणारे पर्वत हे त्यावरील शिवपिंडिकाच होत. या शिवपिंडिकांवर इंद्र, गगनरूपी भांड्यानें अभिषेकच करीत आहे कीं काय! वर्षाकालीं पर्वतावर पडणारा पाऊस त्यावर केलेल्या अभिषेकाप्रमाणें भासतो. मुक्तेश्वरानें या वर्षाकालाच्या वर्णनांत रूपक व उत्प्रेक्षा यांचा संकर करून वर्णनाला विशेष शोभा आणली आहे. शंकराची पिंडी व त्यावरील अभिषेक ही मुक्तेश्वराची आवडती कल्पना आहे. सोनारीच्या भैरवाच्या उपासकास या कल्पना सुचणें स्वाभाविकच आहे.

ओ. १९७. मयूर, चातक, कपोतक व बेडूक यांना पावसाळ्यांतच कंठ फुटून ते आनंदानें वर्षाकालाचें आगमन निरनिराळ्या शब्दांनीं सुचवीत असतात. ओ. १९८. संघाट–समुदाय. ओ. १९९. अठरा भार इ०–वनस्पतीचे अठरा प्रकार. पहा–' अठरा भार वनस्पतीची लेखनी। समुद्र

भरला मषीकरूनी। माझे अवगूण लिहितां घरणीं। तरी लिहिले न जाती॥' देवदास–व्यंकटेशस्तोत्र. ओ. २००. अयनांशें–दक्षिणायनाच्या सहामाहींत. ओ. २०१. दीपदानें–धार्मिक व्रतवैकल्याच्या प्रसंगीं ब्राह्मणास करावयाचें दिव्याचें दान. ऊर्णावसनें–लोकरीचीं वस्त्रें. ओ. २०४. कलिक्लेशधुनी–कलियुगांतील संकटांचीं नदी. श्रवणानें कलियुगांतील संकटें ( जातात ).

—*—

## अध्याय अकरावा

अर्जुन स्वर्गांत पांच वर्षें राहून परत आल्याचें वृत्त कळतांच श्रीकृष्ण आपल्या दोन्ही पत्न्यांसह काम्यकवनांत पांडवांना भेटण्यास आले. द्रौपदी व सत्यभामा यांचीं आनंदाचीं संभाषणें झालीं, व श्रीकृष्णही द्वारकेस परत गेला. पांडवही अद्वैतवनास आले. तेथें रहात असतां पांडवांच्या दातृत्वाची कीर्ति ऐकून दुर्योधनास विषाद वाटला, व याला काय उपाय करावा या विचारांत तो असतांनाच दुर्वास ऋषीची स्वारी तेथें आली. दुर्योधनानें दुर्वासाची करून सेवा केली. त्याच्या पाठीमागें तो एखाद्या सावलीप्रमाणें असल्यामुळें, त्यावर दुर्वास संतुष्ट होऊन त्यानें वर मागण्यास त्यांस अनुज्ञा दिली. दुर्योधनानें असा वर मागितला कीं, 'अद्वैतवनांत पांडव अनेक ब्राह्मणांसह सुखानें रहात आहेत, त्यांच्याजवळ सूर्यानें दिलेली थाली असल्यामुळें, अर्धरात्रीपर्यंतच त्यांना असंख्य ब्राह्मणांना भोजन देतां येतें. तरी तुम्ही अर्धरात्र टळल्यावर तेथें असंख्य शिष्यांसह जाऊन इच्छाभोजन मागावें, व त्यांचें सत्त्व हरण करावें. त्यांनीं तुमचा अपमान केल्यास तुम्ही त्यांना शापून भस्म करावें.' याप्रमाणें दुर्योधनाला वर देऊन दुर्वास त्या वनाला आला, व अर्धरात्रीं आपण आल्याची

खबर त्यानें पांडवांना दिली. धर्मानें त्याचें स्वागत केलें. पण ' या रात्रींच आम्हांस भोजन दे ' अशी मागणी ऋषीनें करतांच सर्वांना काळजी उत्पन्न झाली. द्रौपदीनें दुर्वासाला व शिष्यांना गंगेस स्नानास जाण्यास सांगितलें, व तेही ' आम्ही परत येईपर्यंत भोजन तयार पाहिजे ' असें बजावून स्नानास निघून गेले.

द्रौपदीनें या संकटांतून आपणास वांचविण्यासाठीं श्रीकृष्णाचा धांवा आरंभिला. हा धांवा श्रीकृष्णाला रुजू झाला, त्यावेळीं तो जेवणास बसण्याच्या बेतांत होता. पण पुढचें ताट बाजूस सारून तो द्रौपदीकडे धांवला. द्रौपदीनें धांव्याचें कारण निवेदन केलें. यावर श्रीकृष्ण म्हणाला, ' मलाच अगोदर भूक लागली आहे, थालीला कांहीं पानबिन चिकटून राहिलें आहे कां पहा. ' तों खरोखर एक भाजीचें पान थालीला चिकटलेलें दिसलें. श्रीकृष्णाची भूक शमन झाली. त्यानें ढेकर दिला, तों चमत्कार असा झाला कीं, त्या आश्रमांत अन्नाचे पर्वत पडलेले द्रौपदीला दिसले. अनेक तऱ्हेचीं पक्वान्नें उत्पन्न झालेलीं दिसून आलीं. मग श्रीकृष्णानें दुर्वासादि ब्राह्मणांना भोजनास बोलावण्यास सांगितलें. इकडे श्रीकृष्णाच्या आज्ञेनें विश्वकर्म्यानें गंगातीरावर सोन्याचीं सदनें उभारलेलीं दुर्वासादिऋषींना दिसलीं, व पात्रांची सर्व सिद्धता होऊन द्रौपदी व पांडव आपणास वाढीत आहेत असा त्यांना चमत्कार दिसला. दुर्वासादि ब्राह्मण पोट फुटेपर्यंत जेवले, व त्यांना भोजनोत्तर झोप लागते, तों कृष्णमायेनें हा सर्व देखावा त्यांना गुप्त झालेला दिसला. मध्यंतरीं भोजनाची सर्व सिद्धता करून धर्मराजानें, दुर्वासादिकांना बोलविण्यास सहदेवास नदीतीरीं पाठविलें. हें पाहून दुर्वास खिन्न झाला व दुर्योधनाच्या नादानें विष्णुभक्त पांडवांचा छळ करून आपण आपली तपश्चर्या गमावली असें तो शिष्यांना म्हणाला. मग सहदेवाकरवीं धर्मराजाला आशीर्वाद पाठवून दुर्वास परभारेंच आपल्या आश्रमाला चालता झाला.

ओ. १. विश्वजीवन–श्रीकृष्ण. ओ. ५. जान्हवी इ०–द्रौपदी व सत्यभामा यांचा संवाद, गंगा–यमुनांच्या संगमाप्रमाणें भासला. ओ. ७. समस्या–संगति. एखाद्या श्लोकाचे तीन चरण सांगितले असतां, त्यास

अनुसरून चौथाही चरण कल्पून सांगणें, याला समस्यापूर्ति म्हणतात. पहिल्या तीन चरणांना समस्या असें नांव आहे. मूळ महाभारतांतर्गत मार्कंडेय समस्यापर्व अध्याय, १८२–२३२ अशा ५० अध्यायांचें आहे. तें देण्याचें विस्तारभयास्तव मुक्तेश्वरानें टाळलें आहे. ओ. ८. पृथु–राजा. यालाच वैन्य हें विशेषण लावलें आहे. यानेंच पृथ्वीचें दोहन केलें. त्या राजाचें चरित्र. **सरस्वतीचीं** इ.–सरस्वती–तार्क्ष्यसंवाद हा या मार्कंडेयसमस्यापर्वांतच आला आहे, त्यास अनुलक्षून सरस्वतीचें चरित्र. **संवादिला** इ०–मार्कंडेय हा पांडवांच्या पूर्वी हजार वर्षें हयात होता, त्यानें श्रीरामाशींही संभाषण केलें होतें, इतका तो जुना होता. ओ. ९. या ओवींत सांगितलेलीं सर्व आख्यानें वनपर्वांतर्गत मार्कंडेयसमस्यापर्वांत आलीं आहेत. मुक्तेश्वरानें त्यांचा फक्त नामनिर्देश केला आहे. **मत्सोपाख्यान**–सूर्यवंशांतील मनुप्रजापति, सकाळीं संध्या करीत असतां त्याच्या अर्घ्यांत एक मत्स्य आला. मत्स्यानें आपणांस मोठे होईपर्यंत सांभाळण्याची मनूस विनंति केली. मनूनें हा मत्स्य मोठा झाल्यावर महासागरांत सोडला. पुढें जलप्रलय होऊन सर्व प्राणी वाहून गेले असतां मनूला मत्स्याचें मोठें साहाय्य झालें, व तो वांचला. **इंद्रद्युम्न**–हा राजर्षि पुण्य संपल्यामुळें मृत्युलोकीं आला असतां, आपली कीर्ति नष्ट झाली कीं काय हें अजमावण्यासाठीं अनेक वृद्धांकडे जाऊन आपली कीर्ति त्यांना ठाऊक असल्याबद्दल त्यानें पृच्छा केली. शेवटीं अकूपार कासवानें इंद्रद्युम्नाची कीर्ति तो मोठा यज्ञकर्ता म्हणून सांगितली. कीर्ति असेपर्यंत मनुष्य असतो, हें सांगण्यासाठीं मार्कंडेयानें ही गोष्ट पांडवांना सांगितली आहे.—प्राचीन–चरित्र कोश–चित्रावकृत. **धुंधुमार**–धुंधु दैत्यास मारल्यामुळें कुवलाश्वास पडलेलें नांव. याला दृढाश्व, घृण व कपिलाश्व असे तीन पुत्र होते. यानें वरूथिनी एकादशीचें व्रत केलें होतें. त्या योगानें त्याला स्वर्गप्राप्ति झाली.—चित्रावकृत, प्राचीन चरित्रकोश. **पतिव्रतेचें महिमान**–कौशिक नांवाचा एक ब्राह्मणश्रेष्ठ होता, तो भिक्षा मागण्यासाठीं एका गांवांत शिरला व भिक्षेला एका घरीं गेला असतां घरांतील स्त्रीनें ‘ उभा रहा ’ असें सांगितलें. इतक्यांत भुकेनें व्याकुळ होऊन त्या स्त्रीचा पति घरीं आला, म्हणून त्या स्त्रीनें भोजनादिकांनीं आपल्या पतीची परिचर्या आरंभिली, हें पाहून भिक्षार्थी ब्राह्मण

संतप्त झाला. यावर त्या पतिव्रता स्त्रीनें त्याला ब्राह्मणधर्माचा उपदेश केला. ब्राह्मण तिला वर देऊन घरीं गेला. **अंगिराख्यान**–पूर्वी अंगिरामुनि तपश्चर्या करीत असतां त्याच्यापुढें अग्नीही फिका पडला. त्यामुळें जगाला अंगिराच प्रकाशित करूं लागला. अग्नि आपला अधिकार सोडून देण्यास तयार झाला असें पाहून अंगिरा अग्नीस म्हणाला, ‘ तूंच अग्नीचें काम कर व मला एक पुत्र दे.’ अग्नीनें मुनीला बृहस्पतिनामक पुत्र दिला. **ओ. १३. आपुली सरी इ०**–आमच्या तुलनेला इंद्रदेखील कमीच पडेल. **ओ. १६. षड्रस**–मधुर, कडु, कषाय, आंबट, खारट, व तिखट. **ओ. १७. घरटी घाली**–फेरी घालते. लोकत्रयांत त्यांची कीर्ति पसरली आहे असा अर्थ. **ओ. १९. मागधजनू**–मागधाचा पुत्र, शिशुपाल. **हिरण्यकशिपू**–प्रल्हादाचा पिता. हा नृसिंहावतारांत विष्णूकडून मरण पावला. **ओ. २१. स्वार्थ इ०**–आपला स्वार्थ साधून घेण्याचें ठरविलें. **ओ. २५. रत्नागार**–रत्नशाळा. **ओ. २६.** दुर्वासाचा हट्टी स्वभाव वर्णिला आहे. **चौहटा**–चवाठ्यावर. **ओ. २८. ऋतुवीण**–ज्या ऋतूंत जो जिन्नस पिकत नाहीं, तोच उताविळपणानें मागत असे. **ओ. ३०. पातयापातें**–जर डोळ्याचें एक पातें दुसऱ्यास लागलें तर; झोंप घेण्याचा प्रयत्न केल्यास. **ओ. ३१.** दुर्वास ऋषीच्या स्नानाकरितां व त्यांना पिण्यासाठीं दुर्योधन राजा आपल्या डोक्यावरून पाणी आणीत होता. **ओ. ३३. उतरलासी इ.**–माझ्या कसास–परीक्षेस तूं उतरलास. **ओ. ३५.** मुक्तेश्वर मागें १।६२ मध्यें ‘ सूर्यानें द्रौपदीला थालीपात्र दिल्याचा उल्लेख व्यासानें केला नाहीं ’ असें म्हणतो. पण येथें तर तसा उल्लेख स्पष्ट आला आहे. **ओ. ४१. कुशासनीं**–दर्भासनावर. **ओ. ४६. नियुत**–लक्ष. **ओ. ४७. संबळिया**–देवाचीं उपकरणीं ठेवण्यासाठीं बांबूच्या अगर वेताच्या केलेल्या पेट्या. **ओ. ४८–४९.** दुर्वास, जेवण तयार ठेवण्यासाठीं बजावून स्नानास जातो. **ओ. ५४.** भुतानें झपाटल्यास मांत्रिकाला जसें बोलावतात किंवा चोरांनीं चहूंकडून घेरल्यास शस्त्रांचा जसा उपयोग करितात, अथवा शत्रूकडून बाणांचा वर्षाव होत असल्यास ज्याप्रमाणें चिलखत घातलें जातें, तद्वतच संकटकाळीं श्रीकृष्णाचें स्तवन हेंच तारक होतें.

ओ. ५५. दुकळीं–दुष्काळांत. पुरीं–पाण्याच्या पुरांत. ओ. ५६. जोहरीं–अग्निप्रळयांत. ओ. ५८. मंडूकबालक–कासवाचें पोर. ओ. ५९. संस्कारें–पूर्व जन्मींच्या संस्कारामुळें. ओ. ६०. होसरली–झाली. ओ. ६१. रिचवा–ओता. ओ. ६४. दर्दुर–बेडूक. द्रौपदी कृष्णाचा धांवा करीत असतां श्रीकृष्णानें पूर्वी बेडूक, हरिण इत्यादि कीटक पशूवर कसा कृपाप्रसाद केला तें वर्णन करते. ओ. ६६. पाशश्रेणी–जाळ्याच्या रांगा. दशनीं–दांतांनीं. ओ. ६९. परमेश्वरानें त्या हरिणावरील अरिष्ट कसें टाळलें. शीत–धनुष्याची दोरी. व्याधाच्या मुठींतील धनुष्याची दोरी तुटली, सशाच्या बिळांत धूर कोंडून राहिल्यामुळें ससे पळाले, व कुत्रे त्यांच्या पाठीमागें लागले. ओ. ७०. वनांतील अग्नीनें, जाळें जळल्यावर अचानक पाऊस पडून वणवा शमला. अशा रीतीनें त्या व्याधाची पांगापांग होऊन, तो हरिण त्या संकटांतून वांचला. ओ. ७१. या ओंवींत अनवधानानें मुक्तेश्वराकडून कालविपर्यासाचा दोष घडला आहे. मुक्तेश्वरानें येथें द्रौपदीच्या तोंडीं ज्या भारतसेनेचा उल्लेख घातला आहे, तो भारतीय युद्धाचा प्रसंग प्रस्तुत दुर्वास ऋषीच्या प्रसंगानंतर पुष्कळ वर्षांनीं झाला. नंतर घडलेल्या गोष्टींचा उल्लेख पूर्वी घडलेल्या प्रसंगीं करणें हें कवीच्या अनवधानाचें द्योतक आहे. ओ. ७३. कुंजरघंटा–हत्तीची घांट. त्या अंड्यावर व पक्ष्यावर घंटा पडून तिच्याखालीं त्यांचें रक्षण झालें. ओ. ७६. कौलिक–कोळी. ओ. ८०. निमाला–मेला. ओ. ८२. आड पडले–नमस्कार केला. ओ. ८३. मधु–दैत्य. गरुडातें–गरुड विष्णूचें वाहन. ओ. ८६. सुदर्शन–श्रीकृष्णाचें चक्र.

ओ. ८८. अंबरीष–हा राजा महान् विष्णुभक्त होता. दुर्वासानें याचा छळ केला असतां विष्णूचें सुदर्शन दुर्वासाच्या पाठीं लागलें, व दुर्वास अंबरीष राजास शरण आला. गणिका–पिंगला. रुक्मांगद–याची एकादशी व्रतावर विशेष श्रद्धा होती. त्या व्रतापासून भ्रष्ट करण्यासाठीं ब्रह्मदेवानें मोहिनीला त्याजकडे पाठविलें. त्यानें मोहिनीशीं विवाह करण्याचें ठरविलें. एकदां एकादशी व्रत मोडण्याचा तिनें आग्रह धरला असतां, रुक्मांगदानें तें ऐकलें नाहीं. तेव्हां तिनें पुत्राच्या डोक्याची मागणी केली.

तें देण्यासाठीं तरवार चालवणार इतक्यांत विष्णूनें त्यांस प्रत्यक्ष दर्शन दिलें–चित्रावकृत, प्राचीन चरित्रकोश. **अजामिळ.** कान्यकुब्ज देशचा एक ब्राह्मण अनन्वित कृत्यें करून पोट भरीत असे. वेश्येपासून याला १० अपत्यें झालीं. त्यांपैकीं, नारायण नांवाच्या धाकट्या पुत्रावर त्याचें प्रेम होतें. मरणसमयीं त्यानें आपल्या पुत्राला 'नारायण' अशी हांक मारली. पण अंतकालीं देवाचें नांव तोंडीं आल्यामुळें तो वैकुंठास गेला. **ओ. ९१. अभक्तपंक्तीं**–अभक्तांच्या मालिकेंतले. **ओ. ९२. बोभाय**–मोठ्यानें हांका मारी. **ओ. ९५. विस्तारलें**–मांडलें. **ओ. ९७. अमृतवना** इ०–अमृतवनांत. **ओ. ९८. सौदामिनी**–वीज. **वेधोनी** इ०–विजेला स्थिर करण्यासाठीं ओढून धरावी त्याप्रमाणें. **ओ. १०१. ये तंव** इ० दुर्वास परत येईपर्यंतच आमच्या प्राणांना आयुष्य आहे. तो येईपर्यंतच आमचें या जगीं वास्तव्य, असा अर्थ. **ओ. १०२.** ऋषींना भोजन कसें घालावें हें कोडें उलगडण्यासाठीं द्रौपदीनें श्रीकृष्णाचा धांवा केला, तों श्रीकृष्णच मुळीं भुकेजलेला, द्रौपदीजवळ कांहींतरी खावयास मागत आहे. यावरून देव देखील भक्तानें कांहीं दिल्याशिवाय त्याच्यावर कृपा करीत नाहीं, हेंच खरें. 'न ऋते श्रांतस्य सख्याय देवाः'

**ओ. १११. संकल्प सोडणें**–ब्राह्मणभोजन घालतांना 'नद्यो वर्षंतु पर्जन्यः' इत्यादि म्हणून उदक सोडतात ते. **अपाडे**–फार. **ओ. ११२. पहिलेची**–मूळची. वास्तविक थाली द्रौपदीनें स्वच्छ केली होती. तेथें भाजीचें पान कसें असणार? पण श्रीकृष्णानें तें आपणासाठींच तेथें निर्माण केलें. **ओ. ११६.** पासून पक्वान्नांचें वर्णन असून मुक्तेश्वरानें स्वकालीन पक्वान्नांचाच येथें उल्लेख केला आहे. **कथिका**–कढी. **वटक**–वडे. **ओ. ११७. दुग्धसार**–लोणी. **ओ. ११८. अघमर्षणीं**–स्नान करीत असतां संध्येंत 'पृथ्वी त्वया धृता लोकाः' इ. मंत्र, अघमर्षण म्हणजे पाप घालविणारेच आहेत. **ओ. ११९.** इकडे विश्वकर्म्यानें पांच पति व एक पतिव्रता अशा सहा नव्या व्यक्ती उत्पन्न केल्या. पांडव व द्रौपदी नवी उत्पन्न केली. **ओ. १२०. आडणीया**–तिवया. पहा 'मांडुनि स्वस्तिक सुवर्णपाट अडणीवरि सोन्याचें ताट'–अमृतराय–कटाव. **रत्नविटे**–रत्नाच्या विड्यांनीं युक्त. **ओ. १२३. चंद्रकळा**–चंद्राच्या कांतीप्रमाणें. **बोगराळां**–भाताच्या

मुदी करून वाढण्याचें पात्र. ओ. १२४. वळवट—चोटवे. गव्हल्याचा एक प्रकार. ओ. १२५. आळली—आटिवलेली. ओ. १२६. आराणूक—विश्रांति. ओ. १२७. घारिया—घाऱ्या. शेवया—रव्याच्या पिठाची लांब वळवटें. शेवयाची खीर प्रसिद्ध आहे. ओ. १२९. दधिसायेसीं—साई-सकट दह्याबरोबर. ओ. १३०. सपीटे—गव्हाच्या बारिक पिठाच्या. ओ. १३१. तिळवे—तिळाचे. खांडविया—खांडवे. यांना करवीर प्रांतीं खान-तोळ्या म्हणतात. तांदुळाचा रवा काढून त्यांत गूळ, खोबरें, लवंगा व वेलदोडे घालून त्याचा सांजा बनवून केलेल्या वड्या.

ओ. १३२. सांवरिया—सांजवऱ्या असाव्या. सांजाच्या पुऱ्या. कुर-वड्या—शेवग्यांतून पाडलेले सांडगे. लेहें पेहें इ०—चाटण्याच्या व पिण्याच्या पदार्थांनीं रुचिपालट होत होता. ओ. १३३. दध्योदन—दही-भात. वोघरणी—फोडणी. दुणावती—दुप्पट करतात. ओ. १३४. निर-निराळीं लोणचीं. सालफळें—एक झाड. सालढोल. नेपती—एक फलवृक्ष. मायणीमुळें—माइनमूळ. तौशाचे—तवशाचे. पावसाळी काकडीचे. ओ. १३५. आंबे भरीव—मसाल्यानें भरलेले आंबे. खडशिंगे—खड-शिंगीचें फळ. खडशिंग हा सागवानाच्या जातीचा एक मोठा वृक्ष. कुहि-रिया—कोवळे फणस. ओ. १३६. वेळा—वेलदोडा. ओ. १३७. अधिक जेवण्याचा परिणाम. ओ. १४१. चंद्रमंडळी इ०—आकंठ भोजनानें डोळे वर झाले. खालीं पाहण्याची शुद्ध राहिली नाहीं. अशाच प्रकारचें वर्णन पहा—‘ तारका गणिति भूमि दिसेना । मोहरीहि उदरांत घसेना.’—वामन—द्वारकाविजय. ओ. १४२. डोक्याला जर तोंडें असतीं तर अधिक खातां येऊन चांगलें झालें असतें. ‘ मानापमानां ’ तील दागिन्याचा हव्यासी लक्ष्मीधर असेंच म्हणतो—‘ मज दोन पाय अधिक देईना, देव कसा तो त्या-नच करुणा. ’ यांत स्वभावोक्ति साधली आहे. ओ. १४४. त्रयोदशगुणी विडे—सुपारी, पानें, चुना, कात, जायफळ जायपत्री, वेलची, केशर, कंकोळ, कापूर, लवंगा बदाम, व खोबरें इतक्या पदार्थांनीं बनविलेला विडा. बैसका—बैठक, बसणें.

ओ. १४८ नागवलो—घालवून बसलों.आतलें—प्राप्त झालें. ओ.१४९. आंबरीषाला असाच त्रास देतांना दुर्वासांना कटु अनुभव आला होता.

पण त्यांचा देहस्वभाव गेला नव्हता. ओ. १५४. शशिमंडळीं–शीतल चंद्रिकेंत. ओ. १५५. शत्रुअपाय इ.–शत्रूंच्या अपायरूपीं मृगोदकांत. शत्रूंनीं उत्पन्न केलेलीं संकटें पांडवांना मृगजळाप्रमाणें खोटीं व अल्पकाळ भासणारीं होतीं. ओ. १५७. भवभयाची–संसारभीतीची (कथा).

—※—

# अध्याय बारावा

दुर्वासाची यात्रा व्यर्थ झाली असें पाहून दुर्योधनाला काळजी लागून राहिली, व त्यानें शकुनी कर्णादिकांना बोलवून पांडवनाशाचा उपाय विचारला. शकुनीनें असा सल्ला दिला कीं, ‘पांडवांना आपलें अतुल वैभव दाखवून लाजवावें. यामुळें ते सहजच लाजेनें प्राणत्याग करतील. पांडव खिजले म्हणजे द्रौपदीही आपोआप आपणास वश होईल. पांडव फारच निर्बळ दिसून आल्यास मारून टाकण्यासही हरकत नाहीं. धृत-राष्ट्राला आम्ही घोषयात्रेला निघतों अशी थाप मारून आपण अद्वैत-वनाला जावें.’ ही मसलत विकर्णाशिवाय सर्वांना मानवली. ठरल्या-प्रमाणें धृतराष्ट्राला सांगून कौरव अद्वैतवनाला जाण्यास निघाले. पण धृत-राष्ट्राला त्यांत थोडें पाणी मुरत असल्याची शंका येऊन तो म्हणाला, ‘अद्वैतवनांत पांडव सांप्रत राहतात, तर त्यांची कुरापत काढून आपल्या-वर संकट ओढवून घेऊं नका.’ यावर पांडवांच्या वाऱ्यालाही न जाण्याचें अभिवचन देऊन घोषयात्रेच्या मिषानें कौरव मोठ्या सैन्यासह अद्वैत वनाला चालले. आपल्या मित्रपरिवारासह दुर्योधनानें तेथें पुष्कळ क्रीडा व शिकार केली. याच वेळीं चित्ररथ गंधर्व आपल्या अप्सरांच्या परिवारा-सह वनक्रीडा करण्यासाठीं त्याच वनांत आला होता. आपल्या स्त्रियांसह

जलक्रीडेसाठीं त्यानें चारी दिशांनीं रस्ते रोखले होते. कौरवसैन्य त्या दिशेनें उद्धटपणानें चाललें असतां, त्यांची व गंधर्वदूतांची बोलाचाली होऊन दोघांमध्यें तुंबळ युद्ध झालें. कर्ण, शकुनी इत्यादि वीर नामोहरम होऊन दुर्योधन चित्रसेनाचा बंदिवान झाला. ही खातमी कौरवांच्या सेनापतीनें धर्मराजाच्या कानावर घातली, व त्याच्या मदतीची अपेक्षा केली. भीमाला व अर्जुनाला कौरवांची ही परभारेंच खोड मोडल्याचा आनंद झाला. पण धर्मराजाच्या आज्ञेनें ते चारी बंधु कौरवांना चित्ररथापासून सोडविण्यास सिद्ध झाले. अर्जुनाच्या निर्वाणीच्या बाणानें चित्ररथ शरण आला व त्यानें पांडवांच्या इच्छेप्रमाणें दुर्योधनाची सुटका केली. पांडवांच्या पराक्रमानें संकटमुक्त झालेल्या दुर्योधनास लाजेनें धर्माकडे पाहवेना. असलें जिणें जगण्यापेक्षां प्राणत्याग केलेला चांगला, असें म्हणून तो हस्तिनापुरालाही परत जाईना. पांडवांच्या हातून सुटका होण्यापेक्षां, गंधर्वांचा बंदिवासही पुरवला, असें त्यास वाटलें. ओ. २. **विचारा**–विचार करा. ओ. ३. **जगती**–पृथ्वी. ओ. ५. **कमळनाळ**–कमळाचे देंठ. ओ. ६. **अभ्यंग**–स्नान. **दुर्बळ** इ०–भिकाऱ्याच्या बायकोसारखी. ओ. ८. **सूर्यपर्णें**–सूर्यपान; सूर्याची आकृति काढलेली अब्दागिरी. **शिबिका**–पालख्या. ओ. १०. **बोभाट**–आवाज. **हव्यवाट**–अग्नि. ओ. ११. **पुरुष टाकोनी** इ.–आपल्या पतींचा त्याग करून. ओ. १२. **ध्रुवाऐसें**–तुमचें क्षेम कल्याण, ध्रुवासारखें अचल आहे. कशानेंही तुम्हाला बाध येण्याचें कारण नाहीं. ओ. १३. मसलत षट्कर्णी होऊन फसेल असा अर्थ. ओ. १४. **घोषयात्रे** इ. गौळवाड्याला भेट देण्याच्या निमित्तानें.

ओ. १५. **सौबळ**–शकुनी, दुर्योधनाचा मामा. **मानवले**–संतुष्ट झाले. पहा–' पवनाचे दार फार मानवती '–मोरोपंत–कुशलवोपाख्यान. ओ. १६. **विकर्ण**–दुर्योधनाचा एक बंधु. हा एवढाच सारासार विचार करणारा होता. ओ. १७. **आणिक**–दुसरेंच. ओ. २१. **पुढिलियां**–दुसऱ्याला. **कांडकें**–लांकडाच्या ठोकळ्यानें. ओ. २३. **कें**–कसें. धृतराष्ट्राची कशी समजूत घालावी हा त्यांना प्रश्न पडला. ओ. २४. **सुरवाडे**–सुखानें. ओ. २६. **राजचिन्हें** इ०–बैलांच्या पाठीवर राजमुद्रा कराव्या. **भगवती**–देवीरूप

सेना. ओ. ३१ स्मश्रु इ०–हातानें मिशा पिळून, मिशीवर ताव मारून. तवकीं–आवेशानें. ओ. ३३. तळीं–मैदानांत. करीन–गजश्रेष्ठ. सिंह-झडप–सिंहाची उडी. ओ. ३५. अरण्यव्याह्याळीं–अरण्यरूपी खळग्यांत. ओ. ३६. या दृष्टांतांत दिलेली परिस्थिति जशी अशक्य, तसेंच पांडवांच्या जवळ जाऊन सुरक्षित परत येणें अशक्य असा भाव. ओ. ३७. निघातें–जोरानें. ओ. ३८. चतुरंग–सेना. ओ. ४३. न जाणो पांडव दृष्टीस पडलेच तर बारा वर्षे पूर्ण होण्यापूर्वी ते युद्धास तयार होणार नाहींत, असें म्हणून शकुनी धृतराष्ट्रापुढें घोषयात्रेला जाण्याचें समर्थन करतो. अवचट–अचानक. पहा–'अवचट पलंगीं पहुडतो'–वामन. ओ. ४७. वरपड होणें–ज्ञान होणें. 'पांडवांना तुम्हीं तेथें गेल्याचें ज्ञान न व्हावें.' असा अर्थ. ओ. ५०. अठरा पगड जातींवर ज्यांचा निर्वाह अवलंबून आहे, खरेदी–विक्रींत ज्यांना फायदा करून घ्यावयाचा आहे, असे अनेक लोक, असंख्य वस्तूंसह कौरवांबरोबर निघाले. ओ. ५१. सुवर्णकेत–सुवर्णाचा ध्वज. ओ. ५२. करटी–हत्ती. महावंत–महात. हेमतकटी–सोन्याच्या तबकडीच्या पताका. ओ. ५३. हत्तींच्या सजावटीचें वर्णन. ओ. ५४. चवरडोली–अंबारी. छत्रछाये इ.–छत्राच्या छायेनें सूर्याचा ताप निवारीत होते. ओ. ५६. राउत–स्वार. ओ. ५८. निरनिराळे नगारे. प्रस्थानभेरी–स्वारीस निघतांना वाजवावयाचे नगारे. प्रलयभेरी–युद्धाच्या वेळीं वाजवावयाचे नगारे. शकटभेरी–गाडी-वरचे नगारे. ओ. ५९. निरनिराळीं वाद्यें. नफेऱ्या–पडघम. बुरंगे–एक वाद्य. नरगे–तंबले. (बडोदें) जेगट–झंगट. तडक–मोठा आवाज. पहा–'तडकें बुजालीं खेंचरें'–मुक्तेश्वर–विराटपर्व. 'तडक फुटलें एक-सरे । भिंदिपाळाचे पागोरे ॥'–एकनाथ, रुक्मिणीस्वयंवर.

ओ. ६३. धर्मापासून आणलेल्या गाईम्हशींच्या दुधाला दुर्योधनाकडे आल्यावर गोडी राहिली नाहीं, असें बल्लवांचें म्हणणें. पण हें पांडवांच्या पक्षपातानें म्हटल्यासारखें वाटतें. ओ. ६४. खुळगे–रेडे. गाईंची व म्हशींची पैदास न होता, बैल रेडेच अधिक झाले, हेंही दुर्योधनाच्या राज्यांत विपरीतच. ओ. ६७. बोहा–कांस. ओवी ७२. संगियांसंगें–मित्राबरोबर. ओ. ७४. कासारें–सरोवरें. ओ. ७८. येरु–दुर्योधनाचे लोक.

ओ. ७९. राजा–चित्रसेन. ओ. ८०. व्याज–कपट. ओ. ८५. माळा बांधाव्या इ०–सर्व गंधर्वांच्या डोक्यांच्या माळा करून त्या झाडावर बांधाव्या अर्थात् त्यांचा वध करावा असा अर्थ. ओ ८७. खेचर–गगनविहारी गंधर्व. ओ. ९०. अयुत–लक्ष. अश्ववार–घोडेस्वार. ओ. ९१. अग्नियंत्रें–तोफा, बंदुका. ओ. ९७. धाय–हंबरडा. ओ. ९९. गुल्में–सैन्याचा भाग. ओ. १०६. आकळणें–बांधणें. ओ. ११४. साक्षेप–श्रम. ओ. १२२ आपापल्यांत कमी अधिक वागावें, पण परक्याशीं प्रसंग पडला असतां, सर्वांनीं मिळून तो निस्तरला पाहिजे.

ओ. १२९. वास्तविक कौरवांना पकडून गंधर्वांनीं आमच्यावर उपकार केला आहे. तो बाजूस सारून आपण गंधर्वांशीं उलट युद्ध करण्यास जाणें म्हणजे त्याशीं कृतघ्न होणें होय, असें भीमाचें मत. ओ. १३२. तूणीर–भाते. ओ. १३३. श्लाघ्यता–प्रौढी. ओ. १३६–१३७. इंद्राच्या आज्ञेनें आपण कौरवांशीं युद्ध केलें आहे, तरी त्याची आज्ञा आपणांस मोडतां येत नाहीं, असें चित्ररथाचें म्हणणें. ओ. १३९. बरळ–भ्रमिष्ट. ओ. १४०. गोत्रजां–भाऊबंदांना. ओ. १४३. परिपाडें–निरानिराळ्या प्रकारें. ओ. १४४. प्रयोजन–अस्त्र सोडणें. निवारणें–अस्त्र आवरणें. ओ. १४७. मत्स्यजीवी–कोळी. ओ. १४८. माव–माया. ओ. १५०. ‘ पृथ्वी हीच कोणी एक सुवासिनी स्त्री, तिला शत्रूच्या रक्तरूपी कुंकवाचा तिलक लावला, व गंधर्वांच्या शिररूपी कमळांनीं तिचा केशकलाप सुशोभित केला. ’ अर्जुनानें गंधर्वांच्या रक्ताचा रणभूमीवर सडा घातला व त्यांच्या शिरांचा पाऊस पाडला असा आशय. तुरंबिलें–पूजिलें. ओ. १५४. अंतरा–मध्येंच. ओ. १५५. गंधर्वांचें वक्रोक्तिपूर्ण भाषण.

ओ. १५७ भलतसें–वाटेल तें. ओ. १६९–१७३ धर्माचें दुर्योधनाशीं आदराचें व सामोपचाराचें भाषण. ओ. १७६ राजेश्वरा–धृतराष्ट्रास. ओ. १७७ जघन्य–कमीपणाची. ओ. १८१ मंजीर–नूपुर, पैंजण. मुक्तेश्वराची वाणी सद्‌गुरूच्या चरणीं मंजीररूपानें नाद करीत आहे. मुक्तेश्वरानें आपली वाणी आपल्या गुरूच्या चरणीं वाहिली आहे असा अर्थ.

—*—

# अध्याय तेरावा

आपल्या नगराकडे न जातां खिन्न झालेल्या दुर्योधनानें वन गांठलें, व तेथें प्राणांतिक उपोषण आरंभिलें. कर्णदुःशासनांनीं त्याची पुष्कळ मनधरणी केली पण व्यर्थ. यांतच रात्र झाली असतां दुर्योधनाच्या उपोषणाची ही बातमी पाताळांतील दैत्यांना समजली, व त्यांनीं एक कृत्या पाठवून दुर्योधनाला पाताळांत नेला. दैत्यांनीं दुर्योधनाचें सांत्वन करून पांडवांचा नाश करण्याचें अभिवचन दिलें, व प्राणत्याग न करण्याबद्दल सांगितलें. दुसरें दिवशीं सकाळीं दुर्योधनानें रात्रीं घडलेल्या स्वप्नप्राय प्रकाराचा वृत्तांत आपल्या कर्णप्रभृति आप्तांना निवेदन केला. मग कर्णानेंही राजा दुर्योधनापुढें भाषण करून अर्जुनाला मारण्याची प्रतिज्ञा केली. दुर्योधन यामुळें संतुष्ट होऊन हस्तिनापुरास पुनः मोठ्या वैभवानें आला. भीष्मानें संधि साधून पांडवांशीं सख्य करण्याचा त्याला आणखी उपदेश केला. पुढें कर्ण–शकुनी इत्यादि एकत्र मिळाले असतां, राजसूययज्ञ करण्याची कल्पना निघाली. पण ऋषींच्या अभिप्रायानुसार दुर्योधनानें मोठा विष्णुयागच केला. या यागास धर्मराजादि पांडवांना खवचटपणानें आमंत्रण देण्यांत आलें होतें. कर्णानें अर्जुननाशाचा पुनरपि येथें उच्चार केला.

इकडे अद्वैतवनांत धर्मराज मृगांची शिकार करून ब्राह्मणादिकांचें पोषण करीत असतां, एका हरिणानें त्याच्या स्वप्नांत येऊन सांगितलें, ' महाराज आपल्या येथील वस्तीनें आमच्या कुळाचा लवकरच निःपात होईल. ' हें ऐकून धर्मराज काम्यकवनाला निघून गेला. तेथें नेहमींप्रमाणें व्यास भेटीला आले असतां, कर्णाच्या प्रतिज्ञेनें सचिंत झालेल्या धर्मराजानें, ' श्रेष्ठ दान व तप कोणतें ' असा प्रश्न केला. त्यावर व्यासांनीं त्याला मुद्गलकुटुंबाच्या दानधर्माची कथा सांगितली. मुद्गल, त्याची पत्नी, मुलगा व स्नुषा अशी चौघे, धान्य टिपून आपला निर्वाह करीत. त्यांच्या दानाची परीक्षा पाहणाऱ्या दुर्वास ऋषीला त्यांनीं कसें संतुष्ट केलें, व स्वर्गांतून विमान आलें असतां, तें बाजूला सारून मुद्गलानें ब्रह्मचिंतनांत आपलें

आयुष्य व्यतीत करून, तो ब्रह्मलोकाला कसा गेला," हें वृत्त सांगून व धर्मराजास आत्महिताचा उपदेश करून व्यास निघून गेले. ओ. २. दर्भ-शयन-दर्भांची शय्या. प्रायोपवेशीं-उपोषण करण्यास. ओ. ६. विख-विष. ओ. ७. कवण लवूनि इ.-तुझ्या पायांना कोणी वंदन केलें असतां तुझें समाधान होईल? तुला कोणं शरण आलें म्हणजे तुझा राग जाऊन तूं नगरास येशील?

ओ. ९ रणरंगी-रणांगणावर. विहिताचार-घालून दिलेले नियम, अर्थात् योग्य मार्ग. ओ. १०. विशेषतः आपण पांडवांच्या मदतीमुळें चित्र-रथाच्या बंदींतून सुटलो, म्हणून दुर्योधन खिन्न झाला होता; त्यावर कर्ण-शकुनी त्याची अशी समजावणी करतात कीं, 'हे राजा! पांडवांनीं तुझी सुटका केली यांत तूं कमीपणा मानण्याचें कारण नाहीं, वास्तविक तुला सोडविणें, हें त्यांचें कर्तव्यच होतें, तें त्यांनीं केलें आहे.' ओ. ११ उभय इ.-दोन हातांची सेवा घेतांना मनुष्य ज्याप्रमाणें उजवा डावा असा पक्षपात करीत नाहीं, त्याचप्रमाणें पांडवांनीं तुला मदत करून जी सेवा केली आहे, त्याबद्दल उपकाराचा खेद मानण्याचें कारण नाहीं.' कौरव काय किंवा पांडव काय दुर्योधन राजाला उजव्या डाव्या हाताप्रमाणें उपकारकच आहेत, असा कर्ण-शकुनींचा म्हणण्याचा आशय. ओ. १४. आंगवणें-शक्तीनें. ठेंगणें-कमीपणाचें. ओ. १५. 'माझ्या देहरूपी भांड्याला अपमानरूपी कुत्रें शिवलें आहे. माझा अपमान झाला आहे, व देहत्याग केल्याशिवाय माझा शोक जाणार नाहीं.' ओ. १७. दैत्यांचा राजा वृषपर्वा असून शुक्राचार्य त्याचा गुरु होता, हें प्रसिद्ध आहे. ओ. १८. दुर्योधन खिन्न झाला असें पाहून, हे दैत्य त्याच्या मदतीला धावले. ओ. १९. कृत्या-एक दुष्ट देवता. ओ. २१ संशप्तक-युद्धांत पाठ दाखविणार नाहीं अशी शपथ घेणारा योद्धा. ज्यानें युद्धांत मी अमुक प्रतिपक्षीय योद्ध्यास मारीन, आणि न मारीन तर पंचमहापातकांचा दोषी होईन अशी शपथ घेतली आहे, तो संशप्तक होय. असे संशप्तक दुर्योधनाच्या पदरीं होते.

ओ. २२ अमोघ-व्यर्थ न जाणारी. कर्णाला उपजतच लाभलेलीं कवचकुंडलें, इंद्र ब्राह्मणरूपानें हरण करील व त्याबद्दल तो अर्जुनास

मारण्यास उपयोगी पडणारी अमोघ शक्ति कर्णाला देईल. ओ. २५ कृत्येनें दुर्योधनाला सकाळीं जिथल्या तेथें आणून ठेवला. ओ. २७ भाक–प्रतिज्ञा. ओ. २८ दुर्योधनानें राजैश्वर्याचा पुनः स्वीकार केला. ओ. ३० गंगाकुमरा–भीष्मास. ओ. ३१. वर्जिता–निषेध केला तरी; नको म्हणून सांगितलें तरी. अमुप–पुष्कळ. ओ. ३२. अविधि–नियमबाह्य. ओ. ३४. भीष्माच्या या बोलण्यांत उपरोध भरपूर आहे. ओ. ४१. कीर्तिगभस्ती–कीर्तिरूपी सूर्य. ओ. ४३. पितयातें–धृतराष्ट्राला. गांधारी–दुर्योधनादिकांची आई. ओ. ४५. पलाश–पळसाचा वृक्ष. धत्तुर–धोतऱ्याचें झाड. आम्रविटप–आंब्याचें झाड. अर्क–रुईचे झाड. धर्मराजाच्या यज्ञाशीं दुर्योधनाच्या यज्ञाची तुलना करणें म्हणजे उत्तम वृक्षाची क्षुद्र वृक्षाशीं तुलना करण्यासारखेंच होय. ओ. ४८. पृथ्वी इ.–पृथ्वीची त्यांना काय कथा आहे. ओ. ४९. जीवमानीं–जीवंत असतां. धृतराष्ट्र असतांना दुर्योधनाला राजसूय यज्ञ करण्याचा अधिकार नाहीं, असा भाव. ओ. ५०. शिग–शिखर. ओ. ५१. लांगल–नांगर. सोन्याच्या नांगराच्या फाळानें. यज्ञभूमी नांगरींत. ओ. ५३. मूळ–बोलावणें. ओ. ५८. वाङ्नियमीं–शब्दानें घालून दिलेल्या मर्यादेनें. ओ. ६० भीमसेनाच्या पुढील भाषणांत युद्धावर केलेलें यज्ञाचें सांग रूपक आलें आहे. रणस्तंभी–युद्धांतील पक्षांत. यज्ञांत स्तंभ, तसा येथें युद्धांत प्रत्येक पक्ष.

ओ. ६१ या युद्धरूपी यज्ञांत, अर्जुनाच्या बाणरूपी अग्नीच्या ज्वाळा दिसतील. चापाचे टणत्कार हाच तेथें मंत्र, व दुर्योधनादिकांच्या आहुति त्या यज्ञांत पडावयाच्या. ओ. ६२ पूर्णाहुति–शेवटची आहुति. पुरोडाश–हविर्द्रव्य. दुःशासनाचें रक्त प्राशन करणें म्हणजेच हविर्द्रव्य सेवन करणें. तात्पर्य युद्धांत दुर्योधन–दुःशासन मरावयाचेच. दुर्योधनानें आरंभिलेल्या विष्णुयज्ञाला येण्यापेक्षां, आम्हाला या युद्धयज्ञाला पुढें यावयाचेंच आहे, असा भीमाचा प्रतिसवाल. ओ. ६३. उत्तरकार्य–प्रेतसंस्कार. भीमाचें म्हणणें कीं, प्रेतसंस्कार करण्याचा अधिकार भाऊबंद नात्यानें आम्हांला आहेच. मग यावयाचेंच तर हें कार्य करण्यास शेवटींच येऊं.' ओ. ६६. आज्याहुति–तुपाच्या आहुति. ओ. ६८. निष्क–नाणीं. ओ. ७२. दानोदकें–दान देतांना सोडलेल्या उदकानें. ओ. ७४. अंधें–धृतराष्ट्रानें.

मारण्यास उपयोगी पडणारी अमोघ शक्ति कर्णाला देईल. **ओ. २५** कृत्येनें दुर्योधनाला सकाळीं जिथल्या तेथें आणून ठेवला. **ओ. २७ भाक**–प्रतिज्ञा. **ओ. २८** दुर्योधनानें राजैश्वर्याचा पुनः स्वीकार केला. **ओ. ३० गंगाकुमरा**–भीष्मास. **ओ. ३१. वर्जिता**–निषेध केला तरी; नको म्हणून सांगितलें तरी. **अमुप**–पुष्कळ. **ओ. ३२. अविधि**–नियमबाह्य. **ओ. ३४.** भीष्माच्या या बोलण्यांत उपरोध भरपूर आहे. **ओ. ४१. कीर्तिगभस्ती**–कीर्तिरूपी सूर्य. **ओ. ४३. पितयातें**–धृतराष्ट्राला. **गांधारी**–दुर्योधनादिकांची आई. **ओ. ४५. पलाश**–पळसाचा वृक्ष. **धत्तुर**–धोतऱ्याचें झाड. **आम्रविटप**–आंब्याचें झाड. **अर्क**–रुईचे झाड. धर्मराजाच्या यज्ञाशीं दुर्योधनाच्या यज्ञाची तुलना करणें म्हणजे उत्तम वृक्षाची क्षुद्र वृक्षाशीं तुलना करण्यासारखेंच होय. **ओ. ४८. पृथ्वी इ.**–पृथ्वीची त्यांना काय कथा आहे. **ओ. ४९. जीवमानीं**–जीवंत असतां. धृतराष्ट्र असतांना दुर्योधनाला राजसूय यज्ञ करण्याचा अधिकार नाहीं, असा भाव. **ओ. ५०. शिग**–शिखर. **ओ. ५१. लांगल**–नांगर. सोन्याच्या नांगाराच्या फाळानें. यज्ञभूमी नांगरींत. **ओ. ५३. मूळ**–बोलावणें. **ओ. ५८. वाङ्नियमीं**–शब्दानें घालून दिलेल्या मर्यादेनें. **ओ. ६०** भीमसेनाच्या पुढील भाषणांत युद्धावर केलेलें यज्ञाचें सांग रूपक आलें आहे. **रणस्तंभी**–युद्धांतील पक्षांत. यज्ञांत स्तंभ, तसा येथें युद्धांत प्रत्येक पक्ष.

**ओ. ६१** या युद्धरूपी यज्ञांत, अर्जुनाच्या बाणरूपी अग्नीच्या ज्वाळा दिसतील. चापाचे टणत्कार हाच तेथें मंत्र, व दुर्योधनादिकांच्या आहुति त्या यज्ञांत पडावयाच्या. **ओ. ६२ पूर्णाहुति**–शेवटची आहुति. **पुरोडाश**–हविर्द्रव्य. दुःशासनाचें रक्त प्राशन करणें म्हणजेच हविर्द्रव्य सेवन करणें. तात्पर्य युद्धांत दुर्योधन–दुःशासन मरावयाचेच. दुर्योधनानें आरंभिलेल्या विष्णुयज्ञाला येण्यापेक्षां, आम्हाला या युद्धयज्ञाला पुढें यावयाचेंच आहे, असा भीमाचा प्रतिसवाल, **ओ. ६३. उत्तरकार्य**–प्रेतसंस्कार. भीमाचें म्हणणें कीं, प्रेतसंस्कार करण्याचा अधिकार भाऊबंद नात्यानें आम्हांला आहेच. मग यावयाचेंच तर हें कार्य करण्यास शेवटींच येऊं.' **ओ. ६६. आज्याहुति**–तुपाच्या आहुति. **ओ. ६८. निष्क**–नाणीं. **ओ. ७२. दानोदकें**–दान देतांना सोडलेल्या उदकानें. **ओ. ७४. अंधें**–धृतराष्ट्रानें.

भाळ इ.–दुर्दैव म्हणून कपाळाला हात लावला. ओ. ७८. शेष नुरेचि इ०–मार्गे संततीच्या उत्पत्तीसाठीं एकही हरिण उरेना. ओ. ८६. निग्रहवूनी–ताब्यांत ठेवून. ओ. ८७. अगरु–चंदनविशेष. ओ. ८९. अकिंचन–दरिद्री. ओ. ९०. व्रीहिद्रौणिक–मुद्गल नांवाचा ब्राह्मण शेतांत राहून गेलेला धान्याचा एकेक दाणा टिपून पानाच्या द्रोणांत सांठवी, व द्रोण भरल्यावर अतिथीस भोजन देऊन आपण भोजन करी. यावरून या आख्यानास 'व्रीहिद्रौणिक' असें नांव पडलें.

ओ. ९२. शिलोंछवृत्ती–दाणे टिपून निर्वाह करणें. चौघेजण–मुद्गल, त्याची पत्नी, पुत्र व स्नुषा. पक्षाहार–पंधरवड्याचा आहार. ओ. ९४. कुवात–वाईट वारा. ओ. ९६. आवंतुनियां–बोलावून. ओ. ९७. दुर्वास–हा नेहमींच सत्त्वपरीक्षा घेणारा परीक्षक म्हणून ठरलेला. पण जैमिनी अश्वमेधांतील याच कथेंत दुर्वासाबद्दल यम, मुद्गलाची परीक्षा घेण्यास आल्याचा उल्लेख आहे. ओ. ९९. शेष–उरलेलें अन्न. अवंचक–भोळा. ओ. १००. उबग–कंटाळा. ओ. १०२. शूलपाणी–शंकर. ओ. १०५. भवबीजातें–संसाराचें, जन्ममरणाच्या फेऱ्याचें बीज. सायुज्य–ब्रह्मांत मिळून जाण्याचा मोक्ष. ओ. १०९. स्वर्गाहूनी इ०–स्वर्गापेक्षां श्रेष्ठ असें दुसरें स्थान आहे काय? ओ. ११२. कश्मल–मळ. ओ. ११४. रत्नपुलिनी–रत्नाच्या वाळवंटाची. ओ. ११५. सुखाड–सुख. स्वर्गांत सुख आहे, पण कांहीं तडाखेही शेवटीं खावे लागतात, ते ऐक. ओ. ११७. स्वर्गांत गेलेल्या लोकांचें पुण्य सरतांच त्यांना खालीं पृथ्वीवर पडावें लागतें. पहा–'क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशंति'–गीता. ओ. ११८. ब्रह्मदेवाच्या सत्यलोकापर्यंतचे सर्व लोक क्षणिक आहेत. सत्यलोकच तेवढा सनातन व अक्षर आहे. ओ. १२०. पदनिर्वाण–मोक्षपद, पहा–'ब्रह्मनिर्वाणमृच्छति'–भगवद्गीता. ओ. १२२. स्वर्गाची अशाश्वति पाहून स्वर्गाचें आलेलें विमान मुद्गलानें परत पाठविलें. सोऽहं– 'सोऽहमस्मि,' अशा आत्मापरमात्म्याच्या ऐक्यचिंतनांत. ओ. १२४. येथें मोक्ष मिळविण्याच्या, ईश्वराला कर्मे अर्पण करणें, चित्त-शुद्धि, वैराग्यशांति, आत्मापरमात्म्यैक्याचें ज्ञान, अशा चार पायऱ्या सांगि-

तल्या आहेत. **ज्ञानें कैवल्य**–पहा–ज्ञानादेव तु कैवल्यम् । ओ. १२७. **आत्मस्वरूप**–आत्मानात्मविचार. ओ. १३०. मुक्तेश्वर श्रोत्यांकडे अवधानाची भिक्षा मागतो, व तें त्यांनीं सढळ हातानें द्यावें, अशी विनंति करतो. **कोरान्न**–कोरड्या अन्नाची भिक्षा. आपल्या व्याख्यानाकडे श्रोत्यांनीं लक्ष द्यावें, अशी कवीची विनंति.

—✻—

# अध्याय चौदावा

काम्यकवनांत रहात असतां एके दिवशीं द्रौपदीला आश्रमांत धौम्य पुरोहिताच्या संरक्षणाखालीं ठेवून, ते पांचही पांडव शिकारीला निघून गेले. इकडे सिंधुदेशाचा राजा जयद्रथ, एका लग्नसमारंभाला जात असतां पांडव रहात होते त्या ठिकाणीं अचानक आला, व आश्रमाच्या दारांत त्यानें द्रौपदीला पाहिली. मदनबाधेनें पीडलेल्या जयद्रथाचें भान हरपून त्यानें आपला मित्र कोटिक तिच्याकडे पाठविला. द्रौपदीनें आपण कोण हें सर्व वृत्त कोटिकाला सांगितलें, व कोटिकाकडून तें कळल्यावर तर जयद्रथाचा आपल्या मनावरील ताबा उडाला. द्रौपदीजवळ येऊन आपणास वश होण्याबद्दल तिची विनवणी करतांना त्यानें पांडवांची यथेच्छ निंदा केली. ‘मी शूर वीर पांडवांची पत्नी आहे, माझा अभिलाष धरून नाहक मरूं नको’ अशा द्रौपदीच्या तेजस्वी भाषणाकडे दुर्लक्ष करून जयद्रथ बलात्कारानें तिला, रथावर घालून लगबगीनें जाऊं लागला. धौम्यानें त्याचा पाठलाग केला.

मध्यंतरीं धर्मराजाला वनांत दुश्चिन्हें झालीं, व तो बंधूंसह आश्रमास परत आल्यावर धात्रीकडून द्रौपदीहरणाचें वृत्त त्याला समजलें. भीम,

अर्जुन, नकुल व सहदेव यांनीं जयद्रथाचा पाठलाग करून त्याच्या चतुरंग सेनेचा धुव्वा उडविला. हें पाहून जयद्रथ द्रौपदीला सोडून प्राणरक्षणार्थ पळूं लागला. धौम्याबरोबर द्रौपदी आश्रमाला परत गेली व भीमादि पांडव, जयद्रथाला पकडून मारण्याचा प्रयत्न करूं लागले. जयद्रथ दुःशलेचा म्हणजे पर्यायानें आपल्या कनिष्ठ बहिणीचा नवरा आहे, हें मनांत आणून जयद्रथाला न मारण्याबद्दल धर्मराजानें भीमाला परोपरीनें सांगितलें. जयद्रथ पळत असतांना भीमानें त्याचे केंस धरून त्याला भूमीवर पाडला, व त्याच्या डोक्याचे पांच पाट व मिशा काढून त्याला त्यानें धर्मराजाजवळ आणलें. मग धर्म व द्रौपदी यांच्या म्हणण्याप्रमाणें जयद्रथाला जीवदान देऊन भीमानें सोडून दिलें. या प्रकारानें खिन्न झालेल्या जयद्रथानें हस्तिनापुरास न जातां गंगातीरीं शंकराचें आराधन मांडलें, व 'आपल्या हातून पांडव मरावें' असा वर मागितला. पण 'जें कधींही व्हावयाचें नाहीं, तें मी तरी कसा देऊं' असें म्हणून व पांडव हे कृष्णभक्त आहेत, आपण व कृष्ण एकच आहों, असें सांगून शंकर अदृश्य झाला. शेवटीं आपणास पांडवनाशाचा वर शंकराकडून मिळाला आहे, अशी खोटी थाप मात्र दुर्योधनास देण्यास जयद्रथ चुकला नाहीं.

ओ. १. कामनातीत–निरिच्छ. ओ. ४ सैंधवराजा–सिंधुदेशचा राजा. कोटिक–सुरथाचा पुत्र. यानें जयद्रथाकरितां द्रौपदीची चौकशी केली. नंतर जयद्रथानें द्रौपदी पळविल्यावर पांडवांशीं झालेल्या युद्धांत यांस भीमानें मारलें. ओ. ७. पंचबाणीं–मदनानें. ओ. ८. पाडे–तुलनेला. ओ. १०. पुढारी–यापुढें. ओ. ११. पाणिपुटीं–हाताच्या ओंजळीनें. ओ. १२ सुवर्ण इ.–सोनचाफ्याची सुंदर कलिका. सोनचाफ्याच्या पुष्पाच्या वर्णाची. लावण्य इ.–सौंदर्याच्या मूलस्थानाची रेणुका. चौडंक–तुणतुणें. लोलो–छंद. रेणुकेचे भक्त वाघ्यामुरळी, ज्याप्रमाणें लोलो म्हणून तिच्या भोंवतीं तुणतुणें घेऊन नाचतात, त्याप्रमाणें द्रौपदीरूपी रेणुकेच्या भोंवतीं राजेरूपी तुणतुणी 'तुझा छंद लागला' म्हणून तोंडानें गजर करतात. अनेक राजांना द्रौपदीचा छंद लागला होता, असा अर्थ. ओ. १३. जोगवा–जोगेश्वरी देवीच्या नांवानें मागितलेली भिक्षा. द्रौपदीला येथें

कुलस्वामिनी, जगदंबा असें संबोधिलें आहे. ओ. १६. पुढती बोले–( कर्ता जयद्रथ ). ओ. २०. पवनसुत–भीम. ओ. २१. हव्यवाटीं–अग्नींत. ओ. २२. अजाकळपीं–मेंढरांच्या कळपांत. ओ. २३. मस्तकमणीं–सर्पाच्या फणेवर मणी असतो, अशी कल्पना आहे. पांडवांची कळ काढणें म्हणजे सिंहाचें आयाळ उपटून किंवा वाघाला लाथ मारून मेंढराच्या कळपांत लपणें, अर्थात् मृत्यु ओढवून घेणें आहे. सापाच्या शेपटीवर पाय देऊन त्याच्या मस्तकावरील मणि काढणाऱ्यास जिवंत राहण्याचा कोण मार्ग सांगेल ? तो मरणार हें निश्चित. या ओंवींतील कल्पनेस समानार्थक पद्य–व्यालं बालमृणालतंतुभिरसौ रोध्दुं समजृंभते । किं वा वज्रमणिः शिरीषकुसुमप्रांतेन सन्नह्यते ॥ माधुर्यं मधुबिंदुना रचयितुं क्षारांबुधेः ऱ्हीयते । नेतुं वांच्छति यः खलान्पथि सतां सूक्तैः सुधास्यंदिभिः ॥ १ ॥–नीतिशतक.

ओ. २९. अवचिन्हें–अपशकुन. भालु–कोल्हा. उलूक–घुबड. ओ. ३०. सव्य–डावा. चाष–तास पक्षी. अपसव्य–उजवा. दंदशूक–सर्प. ओ. ३४. करीन–हत्तींचा राजा. ओ. ३५. आटोपिले–भरून काढले. ओ. ३९. सा–सहा. ओ. ४५. अशुद्ध–रक्त. सांडणें सांडिता–ओवाळून टाकतांना. रातोत्पळें–कमळें. ओ. ५२. या ओवीचा शेवटचा चरण थोडा अधिक लांब आहे. वळसा–घोटाळा. ओ. ६०. इंद्रसेन–धर्मराजाचा सेवक. ओ. ६४. त्याचा किरीट पायानें तुडविला. चडकणा–चपाटा. ओ. ६५. पांच पाट–डोक्यावरील केसाचे वस्तऱ्यानें पांच पट्टे काढणें. अप्रतिष्ठा करण्याची ही एक रीत पूर्वी रूढ होती. ओ. ६६ खांड–अर्धी मिशी. देहुडे–वांकडे. ओ. ६७. नासिकीं इ०–नाकाला चुना लावणें म्हणजे अपयश देणें. पहा–' नाका चुना लावुनि जात आहे–सामराज. ' सोसे कुलजा मृत्यु न अयशाचा सोसवे चुना नाकीं ' –मोरोपंत ओ. ७०. देहसंबंधी–आप्त. ओ. ७२. मुक्त केला इ०–आम्ही त्याला सोडला एवढा टपका त्याच्यावर राहूं दे. ओ. ७४. पुरे इ०–आयुष्य संपेपर्यंत. ओ. ७६. नव जाय–न जाई. ओ. ८१. अर्जुन नसतांना एक दिवस तुला कांहींसा जय मिळेल. पुढें अभिमन्युवधाचे वेळीं जयद्रथाला एक दिवस जय मिळाला आहे, व त्यावेळीं अर्जुन हजर नव्हता. ओ. ८३. श्लाघ्यता–थोरवी.

# अध्याय पंधरावा

धर्मराज काम्यकवनांत असतां, मार्कंडेय ऋषि तेथें होतेच. आपल्या प्रिय पत्नीचें जयद्रथानें हरण करून आपल्यावर आणलेल्या आपत्तीसंबंधीं धर्मराजानें मार्कंडेयाजवळ दुःखोद्गार काढले असतां तो ऋषि म्हणाला, 'तुझी स्थिति ती काय! दाशरथी रामाच्या पत्नीची स्थिति पृथ्वीला पाझर फोडण्याइतकी करुण आहे.' यावर धर्माच्या विनंतीवरून मार्कंडेयानें, 'रावणजन्म, त्याला ब्रह्मदेवाचा वर, त्यानें केलेला देवादिकांचा छळ, विष्णूनें घेतलेला रामाचा अवतार, सीतास्वयंवर, रामाचा वनवास, शूर्पणखेनें रावणाकडे नेलेली कागाळी, कांचनमृग, सीताहरण, जटायुवध, अशोकवनांतील सीतेचा वास, रामाचा विलाप, सुग्रीवाशीं रामाचें सख्य, सीतेचा शोध, संपाती पक्ष्यानें दिलेली सीतेची बातमी, हनुमंतानें सीतेची घेतलेली गांठ, सेतुबंध, लंकेवर रामाचा हल्ला, बिभीषणाचा रावणास उपदेश, अंगदशिष्टाई, रावणाकडून शिष्टाईला नकार, रामरावणयुद्ध, कुंभकर्णहनन, रावणाकडून लक्ष्मणावर शक्तिक्षेपण, औषधीसाठीं मारुतीनें द्रोणाचल आणणें व परत नेणें, रावणवध, सीतेच्या शुद्धत्वाबद्दल देवादिकांची साक्ष, सीतेचें अग्निदिव्य, नंदीग्रामीं भरतभेट, सीतेसह रामाचें अयोध्येस आगमन व रामराज्य.' इत्यादि इत्थंभूत हकीकत वर्णन करून सांगितली. ती ऐकून 'या सीताहरणाच्या दुःखापुढें पांचालीहरणाचें दुःख कांहींच नव्हे' असें धर्मराज म्हणाला, व त्याचें दुःख कमी झालें.

ओ. २. योषा–स्त्री. ओ. ३. अनुसूया–अत्रि ऋषीची पत्नी, दत्तात्रयाची माता. ओ. १०. रावणजन्मवृत्तांत. विश्रवा–पुलस्त्य हा ब्रह्मदेवाचा मानसपुत्र. त्याला वैश्रवण नांवाचा पुत्र झाला. तो आपल्या बापाची सेवा न करतां ब्रह्मदेवाची (आपल्या आजाची) सेवा करूं लागला. त्यामुळें पुलस्त्य रागावला, पण ब्रह्मदेव प्रसन्न झाला. ब्रह्मदेवानें वैश्रवणास धनाध्यक्ष केला. पुलस्त्यानें रागानें आपल्या देहाचे दोन भाग करून, त्यांपैकीं एका भागाचे विश्रवा असें नांव ठेविलें. ओ. १२. उत्तरदिशाधीश–कुबेर हा उत्तर दिशेचा अधिपति आहे. जनकां–

विश्रवणास. ओ. १५. स्वरेतें–स्ववीर्यानें. ओ. १८. आगम–वेद. ओ. १९. कुबेराची संपत्ति पाहून रावणादि बंधूना त्याचा मत्सर वाटला. ओ. २४. द्वादशाग्नि–बारा अग्नि. पंचाग्नि–दक्षिण, गार्हपत्य, आवहनीय, सभ्य व आवसथ्य असे पांच अग्नि. ओ. २९. रावणानें ज्यांच्यावर आधिपत्य मागितलें, त्यांत मनुष्य व वानर हे क्षुद्र म्हणून त्यांचीं नांवें घेतलीं नाहींत; पण नेमक्या त्यांच्याकडूनच रावणाला मरण आलें. ओ. ३७. भर्तार इ०–आपल्या पतीचा–विष्णूचा, बिभीषण हा मित्र हें समजून लक्ष्मी बिभीषणाच्या घरीं वास करील असा ब्रह्मदेवाचा वर. ओ. ३८. संज्ञा–खूण. ओ. ४०. जगज्जननीचा–सीतेचा.

ओ. ४१. शिरकमळें–आपलीं दहा शिरें वाहून. ओ. ४२. शंभुस्वयंभु इ०–शंकर व ब्रह्मदेवाच्या जोड वरानें. ओ. ४९. जातिपद्मिनी–पद्मिनी जातीच्या स्त्रिया. ओ. ५०. वैकुंठनायक–विष्णु. ओ. ५४. अदृष्टान्वयें–दुर्दैवानें. ओ. ५७. विष्णूच्या शरीराचे चार भाग झाले. ओ. ५८. त्रिवेणी–गंगा–यमुना–सरस्वती या नद्यांनीं युक्त. तीर्थराज–प्रयाग तीर्थ. ओ. ६१. ताडका–राक्षसी. सुबाहु–राक्षस. ऋषीचा–विश्वामित्राचा. अहिल्या–गौतमपत्नी. ही पतीच्या शापानें शिळा झाली होती, तिचा रामपदस्पर्शानें उद्धार झाला. ओ. ६२. हरचाप इ०–शिवधनुर्भंग. ओ. ६३. भृगुपति–परशुराम. ओ. ६८. राजा–दशरथ. ओ. ६९. भाकऋणा–प्रतिज्ञेच्या ऋणांतून. ओ. ७३. विराध–राक्षस. ओ. ७४. शरभंग–दंडकारण्यांत तप करणारा एक ब्रह्मर्षि. विराधाच्या सांगण्यावरून राम त्याच्या आश्रमांत गेले होते. ओ. ७५. शूर्पणखा–रावणाची बहीण. काळखड्गा–शंकरापासून अपेक्षिलेलें खड्ग. ओ. ७८. कंठनाळी–कंठनलिका. ओ. ७९. शांबाचा मृत्यु हेंच रामरावणयुद्धाला मोठें कारण झालें. ओ. ९३. वरपड–प्राप्त. ओ. ९७. खंजनाक्षी–खंजनपक्ष्याप्रमाणें सुंदर डोळे आहेत अशी. ओ. १०३. उभयमरणा–प्रत्येकाचें मरण कशांत आहे, तें सांगून. ओ. १०५. पक्षधरें–पक्ष्यानें, जटायूनें. ओ. १०८. वायुकुमर–मारुती. ओ. ११०. टाकिली–पावली. ओ. १११. शांति–मृत्यु.

ओ. ११३. नलकूबरे–कुबेरपुत्र. याच्या स्त्रीवर रावणानें बलात्कार केल्यामुळें तिनें त्याला शाप दिला होता. ओ. ११४. मुक्ति इ.–ढोंगी आचरणानें ज्याप्रमाणें मोक्ष मिळत नाहीं तद्वत्. ओ. १२४. कबंधें–राक्षसानें. ओ. १२६. अवनिजानाहो–सीतेचा पति. ओ. १२८. पंपे–पंपासरोवरास. हरि–वानर. ओ. १३५. प्राणशरीराची इ०–शरीरापासून प्राणांची ताटातूट करीन. प्राण घेईन, असा अर्थ. ओ. १३९. वालीचा प्राण इंद्राच्या शरीरांत मिळून गेला. ओ. १४०. अंगद्–वालीचा पुत्र. ओ. १४४. शुद्धि–शोधास. ओ. १४५. मुद्रिका–अंगठी. ओ. १४७. संपाती पक्षी–जटायूचा भाऊ. ओ. ११० वळघला–चढला. ओ. १५२. सिंहिका–राक्षसी. ओ. १५४. चूडामणी–सीतेच्या डोक्यांतील रत्न. ओ. १५५. जंबुमाळी–बागेचें रक्षण करणारा राक्षस. पहा–‘ जंबुमाली जहौ प्राणान्प्राण्णा मारुतिना हतः ! ’ अखया–रावणाचा मुलगा. ओ. १५७. किराणें–उड्डाणें. ओ. १५८. ताराधीश–सुग्रीव. ओ. १६३. लोहित–तांबडें. हरित–हिरवें. कपिल–काळें. ओ. १६७. चिरंजीव–पहा–‘ अश्वत्थामा बलिर्व्यासो हनुमांश्च बिभीषणः । कृपः परशुरामश्च सप्तेते चिरजीविनः ॥ ’ ओ. १७०. नलहस्ते–नल वानराच्या हातानें. ओ. १७३ शुक सारण–हे रावणाचे प्रधान. ओ. १७४. अंगदानें शिष्टाईच्या प्रसंगीं टाकलेला सवाल सडेतोड आहे. ओ. १७८. वैधव्य इ०–वैधव्यरूपी शेणानें बरबटून टाकूं नको. बरवंटे–सुंदर. लागवेगें–तात्काळ. ओ. १८४. कर्णाटकयंत्र–तोफ. मुक्तेश्वराच्या काळीं कर्नाटकांत मुसलमानांचा अंमल होता. मुसलमानांनीं तोफांचा प्रचार केल्यामुळें त्यांना ‘कर्णाटकयंत्र’ असें प्रांतावरून नांव दिलें गेलें असावें.

ओ. १८५. उल्हाटशक्ती–तोफ, गरनाळ. लहुडी–लोखंडाचें अग्र बसविलेली काठी. भिंदिपाळ–गोफणीचा दगड. ओ. १८९. तारकसमयीं–कार्तिकस्वामीकडून तारकासुराचा वध झाला त्याप्रसंगीं. ओ. १९२. धूम्राक्ष, अकंपन व वज्रदंष्ट्र हे राक्षस. ओ. १९३. गोलांगुळ–वानर. ओ. १९७. कुंभकर्णाचें शिर उडालेलें पाहून सूर्यचंद्रांना राहूची भीति उत्पन्न झाली असावी, व ते भीतीनें नभ सोडून पळाले असावे. ओ. १९८. झोटधरणी–केशाकेशी युद्ध. ओ. १९९. यांतही कांहीं राक्षसांचीं नांवें

दिलीं आहेत. ओ. २००. अरिषड्वर्ग–कामक्रोधादि ६ रिपु. ओ. २०१ अतिकाय–विशाळ शरीराचा. ओ २०५. पिंगाक्ष–राक्षस विशेष. ओ. २०६. इंद्रजितानें रामलक्ष्मणांना नागपाशांनीं बांधले असतां नारदानें गरुडमंत्राच्या उच्चारानें त्यांची सुटका केली. नागपाशावर गरुडमंत्राचा उतारा. ओ. २०९. अमित्रें–शत्रू. ओ. २१३. रोमसंख्य–अंगावरील केसांच्या संख्येइतके. पहा–' तिस्रःकोट्यार्ध कोटी च यानि लोमानि मानवे । तावत्कालं वसेत्स्वर्गे भर्तारं याऽनुगच्छति ॥ ' ओ. २१४. प्रचलित रामायणांत लक्ष्मणावर इंद्रजितानें शक्ति टाकल्याचा उल्लेख आहे. ओ. २१५. सुषेण–वानरांचा वैद्य. ओ. २१७. विद्याधर–गंधर्व. ओ. २१८. शेष–लक्ष्मण. हा शेषाचा अवतार होय. ओ. २२२. कबंध–धड, डोक्याशिवाय शरीर. ओ. २२५. रावणांचीं जीं शिरें पुनःपुनः उत्पन्न होत, तीं लक्षसंख्येपर्यंत वाढून पुढें त्यांची वाढ खुंटली. ओ. २२६. मातली–इंद्रानें आपला हा सारथी व रथ रामांना या लढाईचे वेळीं दिला होता.

शीसवल्ली–शीर्षांची वल्ली, शीर्षांचा वेल. ओ. २२८. अष्टकांडीं–बाणांच्या आठ कांड्यांत प्रत्येकीं एक एक लोकपाल वसत होता. ओ. २३०. यंत्रमुखीं–तोफेच्या तोंडांतून. ओ. २३३. शोणभद्र–नद. ओ. २३४. धेंडे पिटले–द्वाही फिरविली, दौंडी पिटली. ओ. २३५. शमन–यम. निर्दोष–निष्कलंक. शत्रूच्या घरीं राहूनही शुद्ध राहिलेली. ओ. २३६. जातवेद–अग्नि. ओ. २३८. अग्निस्नात–अग्नींतून तावून सुलाखून निघालेली. ओ. २३९. क्षेम–आलिंगन. ओ. २४०. टाकिल्या–पावल्या. ओ. २४२. शिवशक्तीशीं–रामसीतेचें मीलन म्हणजे शिवशक्तीचेंच मीलन होय. ओ. २४८. आला मार्ग–लंकेहून परत अयोध्येस जातांना आपण लंकेला कोणत्या मार्गानें आलों, तो रामांनीं सीतेस दाखविला. ओ. २४९. वरील मार्गावरील हीं स्थानें रामानें सीतेला दाखविलीं. ओ. २५५. पृथ्वीवर बंधु असा एक भरत तरी, किंवा पांच पांडव. ओ. २५४. भरत व राम यांची भेट म्हणजे जीवशिवैक्यच होय. ती तुलनाही थोडी कमीच होईल. ओ. २५८. रविनंदन–सुग्रीव. ओ. २५९.

मृत्यू बांधिला इ०—मृत्यूला तुझ्या अंकित केला आहे. 'तोंडरीं घालणें' यासारखीच ही म्हण आहे. **ओ. २६५. परिहाराचिया लागीं**—धर्मराजाच्या मनांतील खिन्नता जावी म्हणून.

—*—

## अध्याय सोळवा

धर्मराजानें मार्कंडेयाला असा प्रश्न केला कीं, 'आजपर्यंत पुष्कळ पतिव्रता झाल्या असतील, पण द्रौपदीच्या तोडीची पतिव्रता झाली असल्यास सांग.' मार्कंडेय म्हणाला, कीं, मद्रदेशचा अश्वपति म्हणून एक राजा होता. पोटीं पुत्रसंतान नसल्यामुळें, त्यानें सावित्रीचें आराधन केलें. देवी प्रसन्न होऊन राजाला बोलली, 'तुझ्या नशिबीं पुत्र नाहीं, पण लक्ष्मीप्रमाणें तुला रूपगुणसंपन्न अशी मुलगी मात्र होईल.' थोड्याच दिवसांत राजाला मुलगी होऊन, तिचें त्यानें सावित्री असें नांव ठेविलें. वयांत आल्यावर पति निवडण्याचें काम राजानें मुलीवरच सोंपविलें. सावित्रीनें पुष्कळ देश फिरून द्युमत्सेन राजाचा सत्यवान् नांवाचा मुलगा पसंत केला. पुढें नारद मुनींनीं अश्वपतीजवळ सावित्रीच्या भावि पतीबद्दल पृच्छा करतां सत्यवानाला तिनें मनानें वरल्याचें सर्वांना समजलें. इतक्यांत दूतांनींही द्युमत्सेनाचें सर्व राज्य गेल्याचें व तो वनवासी झाल्याचें वृत्त आणलें, व नारदांनींही सत्यवान् अल्पायुषी असल्याची अंदरकी बात सांगितली. सत्यवानाला अशा स्थितींत न वरण्याबद्दल अश्वपति राजानें सावित्रीला पुष्कळ सांगून पाहिलें. पण तिनें आपला निश्चय सोडला नाहीं. सावित्रीचा सत्यवानाशीं रीतसर विवाह झाल्यावर आपल्या श्वशुरासह व पतीसह तिनें अरण्यवास पत्करून त्यांची मनोभावें सेवा आरंभिली, व पुष्कळ नियमधर्म केले.

एके दिवशीं सत्यवान् सावित्रीसह रानांत लाकडें तोडण्याकरितां गेला असतां, लाकडाचा तडाखा कपाळीं बसून तो मूर्च्छा येऊन पडला. यमधर्मानें येऊन त्याच्या प्राणांचें हरण केलें, व सत्यवानाचा अंगुष्ठमात्र देह घेऊन तो जाऊं लागला. सावित्री यमधर्मामागून चालू लागली, व परत फिरण्याबद्दल त्यानें पुष्कळ सांगितलें तरी आपला क्रम न सोडतां प्रसन्न होण्याबद्दल तिनें त्याच्याशीं विनयानें युक्तिवाद केला. यमानें संतुष्ट होऊन सत्यवानाच्या प्राणाव्यतिरिक्त कोणताही वर मागण्यास तिला परवानगी दिली. सावित्रीनें यावर तीन चार वर मागितले, व यमधर्मानें ते दिलेही. पण शेवटच्या वरांत तिनें 'आपल्यास शंभर पुत्र व्हावे' असा वर मागून यमधर्मास पेंचांत धरलें. यामुळें यमधर्माला नाइलाजानें तिच्या पतीला जिवंत करणें भाग पडलें. सत्यवान् याप्रमाणें जिवंत झाल्यावर त्याच्यासह सावित्री आपल्या आश्रमांत आली. पुढें यमाच्या वराप्रमाणें तिच्या सासऱ्याचें राज्य त्यांस परत मिळून सावित्रीनें सत्यवानासह ४०० वर्षें वैभवानें राज्य केलें. **ओ. ३. चिरजीवी**–मार्कंडेय ऋषि. याचें आयुष्य चवदा कल्पांचें होतें. **ओ. ६. सावित्रीचें**–सावित्री देवीचें. **ओ. ११. नेम नेमूनी** इ.–ब्रह्मदेवानें ठरवून टाकलें आहे. **ओ. १३. संतोष असंतोष** इ.–आपणास नव्हतें तें अपत्य होणार म्हणून आनंद व पुत्र न होतां मुलगी होणार म्हणून थोडी खिन्नता राजाला वाटली. अशाच द्विधा भावाची मुक्तेश्वराची ओवी पहा–'विराट नगरीं बळाथिला । कीचक गंधर्वें मारिला । हें ऐकून राजयाला । संतोष आणि संशय ॥'—विराटपर्व.

**ओ. १४. आभा**–प्रभा. **ओ. १५. जातकर्म**–जन्मसंस्कार. **नामकर्म**–नांव ठेवण्याचा विधि. **ओ. १६. ललाम**–भूषण. **ओ. १७. वयें समर्थ**–वयांत आलेली पाहून. **ओ. १९.** मुलींना स्वतःचा पति निवडण्याची केवढी मुभा पूर्वीं दिली जात होती पहा. **ओ. २४. विधिनंदन**–नारद. **ओ. २५. तो नृपवर**–द्युमत्सेन. **ओ. २६. स्पर्धी दायाद**–स्पर्धा करणारे भाऊबंद. **ओ. २८. विचारीं**–विचार कर. **ओ. ३०.** भाग्य किंवा दुर्भाग्य ढगाप्रमाणें येतें जातें. परंतु निश्चयी माणसाचें मन ध्रुव ताऱ्याप्रमाणें कोणत्याही काळीं चळत नाहीं. **ओ. ३४. आजी अथवा**

इ०-तुलनार्थ पहा-' अद्य वा अब्दशतांते वा मृत्युर्वै प्राणिनां ध्रुवः । '- महाभारत. ओ. ३९. **शालवृक्ष** इ०-शालवृक्षाच्या पर्णकुटिकेंत. **तृणास्तरणीं**-गवताच्या आंथरीवर. ओ. ४१. **दरिद्रदानें**-शत्रूंनीं आम्हांस दरिद्र देऊन घालवून दिलें आहे. ओ. ४३. ' आपल्या तोलाच्या दुसऱ्या राजाच्या घरीं आपली मुलगी द्यावी. माझी ही दशा पाहून तुमचें मन कसें परावृत्त होत नाहीं, ' असें द्युमत्सेनाचें अश्वपतीस सांगणें. ओ. ४५. **वनगव्हरीं**-वनगुहेंत. पहा-' गौरीगुरोर्गव्हरमाविवेश । -रघुवंश २. ओ. ४७. **अनारिसा**-दुसरा, वेगळा. ओ. ५२. **दिवस**-सत्यवानाच्या मृत्युचा दिवस. **लेखित**-मोजत. ओ. ५६. **फरश**-कुऱ्हाड. ओ. ५८. अमृत-फळांचें दर्शन हें शुभ चिन्ह आहे असें त्यांना वाटलें. पहा-' प्रसाद-चिन्हानि पुरःफलानि'-रघुवंश. ओ. ६०. **आंगनेटीं**-जोरानें. **पहुडला**-निजला, पडला. ओ. ६२. **रविनंदन**-यम.

ओ. ६३. **अंगुष्टमात्र**-अंगठ्याएवढ्या आकृतीचा प्राण. देह दोन प्रकारचे आहेत. शरीराला लिंग देह व त्यांत असणाऱ्या प्राणाला सूक्ष्म देह म्हणतात. **आकळोनी**-ओढून. ओ. ६४. **दक्षिणपंथीं**-यम हा दक्षिण दिशेचा पालक आहे. **अचेतन** इ०-सत्यवानाचा प्राणरहित देह लाकडाप्रमाणें जमिनीवर पडला होता. ओ. ६६. **आंगें**-स्वतः ओ. ६७. **संस्कारी**-त्याला अग्निसंस्कार कर. ओ. ७१. **मम**-मला **पुरुष**-पति, सत्यवान्. ओ. ७२. हें **भिन्न** इ.-हें सोडून, या व्यतिरिक्त. ओ. ७५. **शमन**-यम. ओ. ८२. **जिता मेलिया** इ.-माझा पति मेला किंवा जगला तरी त्याचा वियोग मला न होईल असें कर. कोणत्याही स्थितींत त्याची व माझी ताटातूट करूं नको. ओ. ८३. **वावो**-व्यर्थ. ओ. ८४. पहा-आहुः साप्तपदं मैत्र्यम् ।-महाभारत. ओ. ९२. **उदरलतिका**-उदररूपी लता. या लतेला पुत्ररूपीं शंभर फळें येवोत. माझ्या पोटीं शंभर पुत्र येवोत. ओ. ९५. **कां**-किंवा. निर्धन पुरुष ज्याप्रमाणें शोभाहीन असतो. ओ. ९७. **आपांपति**-समुद्र. ओ. ९८. **अमृतवार्ता**-गोड गोष्टी. ओ. ९९. **श्राद्धदेवो**-यम हा श्राद्धपति आहे. ओ. १०४. तूं जो शंभर पुत्रांचा वर दिलास ते शंभर पुत्र मानस कीं, पुरुषाच्या संसर्गानें

व्हावयाचें ? कारण वैधव्यदशेंत मानसपुत्र होणें किंवा अन्यपुरुषसंगानें ते होणें अपकीर्तिकारक आहे. पुरुषसंगानें व्हावयाचें तर ते पतिसंगानेंच झाले पाहिजेत, असा सावित्रीचा आशय. ओ. १०६. **ओळगला**–वळला. ओ. १०७. **अटक**–अडचण. ओ. ११६. **दक्षिणकर्णीं**–उजव्या कुशीवर.

ओ. १२२. **स्कंधाधार**–खांद्याचा आधार. ओ. १२८. **साचाल**–चाहूल. ओ. १३४. **मेध्यारण्यीं**–यज्ञारण्यांत. ओ. १३६. या ओंवींत कालविपर्यासाचा दोष घडला असून कवीचें अनवधान येथें स्पष्ट दिसतें. कौरवपांडवांच्या कितीतरी पूर्वी होऊन गेलेल्या द्युमत्सेनाला, धृतराष्ट्राची उपमा देणें अप्रासंगिक आहे. ओ. १४१. **वाजिमेध**–अश्वयज्ञ. ओ. १४४. **सुढाळ**–पवित्र. ओ. १४५. **साहीं मौळें**–पांच पांडवांचीं व सहाव्या द्रौपदीचें अशीं सहा शिरें. ओ. १४६. **दीर्घायुषी**–मार्कंडेय. ओ. १४७. **धर्मराज**–यम. ओ. १४९. **परमार्थचंपक इ०**–परमार्थरूपीं चाफ्याचीं फुलें.

--*--

## अध्याय सत्रावा

जनमेजय राजाने वैशंपायन ऋषीला, इंद्रानें कर्णाच्या कुंडलांचें कसें हरण केलें ती कथा विचारली असतां वैशंपायन सांगूं लागला. " सूर्य हा आपला पुत्र जो कर्ण त्याकडे मुद्दाम येऊन म्हणाला, ' हे पुत्रा, इंद्र हा आपल्या पुत्राच्या–अर्जुनाच्या–कल्याणासाठीं तुझ्याकडे तुझ्या अंगचीं कवचकुंडलें मागण्यास येईल, तीं त्याला देऊं नको. ' पण ही गोष्ट कर्णानें मनावर घेतली नाहीं. थोड्या वेळांत इंद्र कर्णाकडे येऊन त्याचीं कवचकुंडलें मागूं लागला. कर्णानें त्यास ही भीड न घालण्यास पुष्कळ सांगितलें. पण इंद्रानें आपला हेका सोडला नाहीं. शेवटीं अर्जुनास मारण्या-

-साठीं इंद्राकडून एका दिव्य शक्तीचा मोबदला घेऊन, कर्णानें आपलीं कवचकुंडलें देण्याचें कबूल केलें व तात्काळ तीं आपल्या अंगापासून सोलून काढून दिलीं. यामुळें विद्रूप झालेलें कर्णाचें अंगही इंद्रप्रसादानें पूर्वीच्याहून सुंदर झालें. कर्णाचीं कवचकुंडलें गेलेलीं पाहून दुर्योधनादिकांना जसें फार दुःख झालें, तसा पांडवांना फार आनंद झाला. पण इंद्रानें अर्जुनवधासाठीं कर्णाला शक्ति दिलेली ऐकून, धर्मराज उद्विग्न झाला. धौम्यानें यावर या शक्तीच्या निवारणाचा उपाय श्रीकृष्णाला ठाऊक आहे, असें सांगून धर्माचें सांत्वन केलें." ओ. १. **वक्त्या**–वैशंपायना–ओ. २. **श्रवणा**–कानांना. ओ. ३. **पुण्यदातें**–पुण्यदायक. **शचीच्या वल्लभें**–इंद्रानें. **पुत्रलोभें**–अर्जुनाच्या प्रेमामुळें. ओ. ५. **हेली**–सूर्य. सूर्य ब्राह्मणवेषानें आपल्या पुत्राकडे, कर्णाकडे आला. ओ. ६. **द्वादश वर्षें**–पांडवांच्या वनवासाचीं १२ वर्षें संपल्यावर. **अमरी**–इंद्र. इंद्रही ब्राह्मण वेषानें कर्णाकडे आला. ओ. ७. सूर्याचें कर्णास सांगणें. ओ. ११. **संलग्न**–चिकटलेलें. **वज्र ते इ.**–या चिलखतामुळें वज्राचा प्रहार देखील गवताच्या काडीच्या स्पर्शाप्रमाणें कर्णाला क्षुल्लक भासे. ओ. १२. या कवचकुंडलामुळेंच तूं अर्जुनाला मारशील अशी इंद्राला भीति आहे. ओ. १४. **धर्मकार्जीं**–धर्मकार्यांत. **रणचत्वरीं**–रणांगणांत. ओ. १५. **पालटी**–बदली. 'फेऱ्या' हा काव्यसंग्रहकाराचा अर्थ चुकीचा आहे. ओ. १८. **दधीच**–वृत्रासुराचा वध इंद्राच्या हातून घडेना, म्हणून ब्रह्मदेवाच्या सांगण्यावरून इंद्रानें दधीचीजवळ अस्थि मागितल्या असतां, दधीचीनें देहत्याग केला. मग दधीचीच्या अस्थीचें वज्र करून इंद्रानें वृत्राचा वध केला.

**शिबि**—हा एक राजा असून याची परीक्षा पाहण्यासाठीं अग्नीनें कपोताचें व इंद्रानें श्येनाचें अशीं रूपें घेतलीं. श्येन कपोताच्या मार्गे लागला असतां कपोत राजास शरण आला. तेव्हां श्येनानें 'माझें भक्ष्य कपोत मला दे, किंवा मला त्याच्या वजनाचें मांस दे,' असें म्हटलें असतां शिबीनें थोडें थोडें म्हणतां सर्व शरीर दिलें; तेव्हां अग्नि व इंद्र प्रकट झाले व राजाची स्तुति करून निघून गेले. **जीमूतवाहन**–हा पूर्वजन्मीं मध्य देशाचा शूरसेन नांवाचा क्षत्रिय होता. यानें शंखचूडास

जीवदान दिलें.–चित्रावकृत–प्राचीन चरित्रकोश. **ओ. १९.** ते वेळीं इ०–अशा वेळीं एक किंवा अनेक याचक, हा विचार माझ्या मनास शिवत नाहीं. **ओ. २०–२३.** सूर्य येथें कांहीं आत्मघातकी वर्तनाचीं उदाहरणें देतो. **ओ. २०.** **उद्‌मी**–वाणी. **ओ. २१.** **हाटीं**–बाजारांत. **पाटी**–फळी. **उतरीन**–नावेवरील उतारूंना पैलतीराला नेईन. **ओ. २९.** **गगनचारी**–सूर्य. **ओ. ३०.** **अवगमोनि**–घेऊन. **कामीकाम इ०**–याचकांची इच्छा पूर्ण करणारा कल्पवृक्ष. **अक्षय नेम**–दातृत्वाचा नियम. कर्णाचें दातृत्व प्रसिद्ध होतें. **ओ. ३२.** **जाति पद्मिनी**–पद्मिनी जातीची स्त्री. **ओ. ३४.** याचक म्हणाला, ' तूं माझी मनोरथरूपी वेल उगवतांच तोडून टाकलीस. मनांत इच्छा उत्पन्न झाली, तोंच तिचा तूं नाश केलास. एकादा भुकेला मनुष्य आला असतां, त्याला खावयास न देतां नुसतें बोलून गार करण्यापैकींच हें होय ' **ओ. ३६.** **चाडे**–इच्छेनें. **ओ. ३८.** **तृष्णाभाज**–तृष्णारूपी पत्नी. तुला हांव अधिक असा अर्थ. **ओ. ३९.** **पीयूषक**–अमृत. कर्णाचीं कवच कुंडलें नेल्यानें, अर्जुनाच्या मृत्यूचें एक कारण नष्ट होऊन कौरवांची बाजू कमकुवत होणार होती. **ओ. ४५.** **खेचरी**–आकाशांत विहार करणारी. **देवत्रय**–ब्रह्मा, विष्णु, महेशांनीं त्याचें रक्षण केलें तरी. **ओ. ५०.** **मघवा**–इंद्र. **ओ. ५२.** **सांडणें होणें**–तुझ्या रूपावरून ओवाळून टाकल्या जातील. **ओ. ५८.** **कृष्णें इ०**–शक्तिनिवारणाचा उपाय कृष्णाला ठाऊक असेल. त्यानें त्याबद्दल अगोदर तरतूद करून ठेविली असेल.

—✱—

## अध्याय आठरावा

अद्वैतवनांत पांडव ऋषींबरोबर सुखदुःखाच्या गोष्टी बोलत असतां, अचानक तेथें एक ब्राह्मण आला व धर्मराजाला विनवून म्हणूं लागला, ' माझें संकट निवारण करा. माझ्या घरांतील अंगणांत यज्ञाच्या अरणी,

पडल्या असतां, एका हरिणानें त्यांशीं अंग घांसतां घांसतां शिंगांत अडकवून घेऊन त्या हरण केल्या. त्यामुळें माझें अग्निहोत्र अडलें आहे.' हें ऐकून पांचही पांडव वनांत हरिणाच्या मागें धांवले, पण हरिण कोठेंच दिसेना. दोनप्रहरच्या वेळीं धर्मराजाला तहान लागली यासाठीं, पाण्याचा शोध करण्यास त्यानें नकुलास सांगितलें. नकुलाला लांबून एक स्वच्छ सरोवर दिसलें, म्हणून तो लाकडाचा कमंडलु घेऊन तिकडे गेला. नकुल जलाला स्पर्श करणार तोंच, तेथील वृक्षावर असणाऱ्या यक्षानें, आपल्या प्रश्नाचीं उत्तरें दिल्याशिवाय पाण्याला स्पर्श न करण्यास त्यांस बजावलें, व आपली आज्ञा मोडल्यास नाहक प्राणाला मुकण्याचेंही भय घातलें. नकुलानें यक्षाच्या भाषणाकडे दुर्लक्ष करून जलप्राशन करतांच तो तात्काळ तेथें मरून पडला. इकडे नकुलाला पाणी घेऊन येण्यास वेळ लागला असें पाहून धर्मानें सहदेवाला त्याच्या शोधार्थ पाठविलें. यक्षानें नकुलाप्रमाणेंच सहदेवालाही बजावलें, व त्यानेंही त्याच्या शब्दाची अवज्ञा केल्यामुळें, सहदेवाची नकुलाप्रमाणेंच अवस्था झाली. यानंतर धर्मानें अनुक्रमें अर्जुनाला व भीमाला तिकडे पाठविलें. त्यांची तीच स्थिति झालेली पाहून धर्मराज स्वतः त्या सरोवराजवळ आला. यक्षानें धर्मराजाला घडलेली सर्व हकीकत सांगून आपल्या प्रश्नांचीं उत्तरें देऊन जलप्राशन करावें व मग बंधूही आपोआप उठतील असें आश्वासन दिलें. धर्मराजानें यक्षाच्या प्रश्नांचीं समाधानकारक उत्तरें दिल्यामुळें, यक्षानें प्रसन्न होऊन, 'या मृत बंधूंपैकीं कोणता बंधु उठवूं' असा खोचदार प्रश्न धर्मराजास केला. यावर 'मी जसा कुंतीचा वडील पुत्र, तसा नकुल हा माद्रीचा वडील पुत्र आहे. तर त्यालाच उठीव.' अशा धर्माच्या निःस्वार्थी व न्याय्य उत्तरानें अधिकच प्रसन्न होऊन यक्षानें भीमादि सर्व बंधूंना उठविलें. शेवटीं यक्षानें आपलें—यमाचें खरें रूप प्रकट केलें व 'आतां तुमचा वनवास संपलाच आहे. फक्त एकच वर्ष अज्ञातवास आहे व माझ्या वरानें तुमचीं रूपें पालटून तुम्ही विराटनगरींत राहा.' असा वर देऊन ब्राह्मणाच्या अरणीही परत करून तो अंतर्धान पावला. ब्राह्मणही अरणी मिळाल्याच्या आनंदांत आपल्या आश्रमास गेला.

ओ. ३. दुश्चित–वाईट कृत्य. ओ. ४. मंथनारणी–यज्ञासाठीं अग्नि उत्पन्न करण्याचे लाकडाचे दोन तुकडे. हरणीं–नेण्यासाठीं. ओ. ७. न्यग्रोध–वटवृक्ष. ओ. ९. स्त्रियेचीं–द्रौपदीचीं. घेतला नाहीं प्राणें–मारला नाहीं. ओ. १२. वेंघोनी–चढून. ओ. १३. चक्षीं–डोळ्यांनीं. ओ. १४. मांदोळा–समूह. ओ. १८. हानीं जीवें पावशील–मरशील. ओ. २६. वधिले न वचती–मारले जाणार नाहींत. ओ. २७. सव्य-साची–अर्जुन. ओ. ३०. तृणासाठीं इ०–अर्जुनानें बाणवृष्टि केली ती यक्षाला तृणाप्रमाणें तुच्छ वाटली म्हणून तो म्हणतो, 'गवताचा समुदाय माझ्या शक्तीचा प्रतिकार करूं शकणार नाहीं.' येथें 'तृणासाठीं' याबद्दल 'तृणसाठी' असा शब्द असावा. ओ. ३४. वधू–वध, मरण. ओ. ३९. येथून यक्षप्रश्न सुरू होतात व त्यांना धर्मराज उत्तर देतो. ओ. ४५. जिव्होपस्थजयो–जिव्हालौल्य व कामेच्छा यांवर जय मिळवणें. आतुडे–मिळे. ओ. ४६. धर्मसंतान–धर्मविस्तार. ओ. ५०. खेचरा–यक्षा ! ओ. ६०. श्वासोच्छ्वास इ०–नाकानें श्वासोच्छ्वास घेत असतां. ओ. ६३. या ओवींत ज्या प्रश्नांचीं उत्तरें आहेत, ते प्रश्न जिच्यांत असले पाहिजेत ती ओवी आपल्या जवळच्या कोणत्याही प्रतींत नाहीं, असें काव्य-संग्रहकार व काव्येतिहाससंग्रहकार दोघेही म्हणतात. त्यांच्या मतें ६२ व ६३ या ओव्यांमध्यें आणखी एक ओवी असावी.

ओ. ६७. विरूढ जाय–वाढत जाते. ओ. ७०. घरबारी–गृहस्थाश्रमी. ओ. ८२. ज्ञातृता–ज्ञान. ओ. ९३. स्फीती–कीर्ती. ओ. ९५. आंवरिलें–व्यापिलें. ओ. ११५. तुझा पिता–धर्मराज हा कुंतीच्या ठिकाणीं यमाच्या अंशानें जन्मला होता. म्हणून यक्षरूपी यम, हा धर्माचा पिताच होतो. ओ. ११६. नष्टचर्येचें वर्ष एक–अज्ञातवासाचें वर्ष. उपसंहार–ओ. १. शर्व–शंकर.

—*—

६७०५

# कठीण शब्दांचा कोश

अ

अटक–अडचण.
अघ–पाप.
अनामिक–अंत्यज.
अनिमिष–पापण्या न लवणें.
अपाडें–फार.
अपाय–संकट.
अभ्यंग–स्नान.
अमित्र–शत्रु.
अर्क–सूर्य.
अवगमणें–घेणें.
अवचट–अचानक.
अवधारणें–ऐकणें.
अविकळ–साग्र.
अवंचक–भोळा.
अशुद्ध–रक्त.
अलुमाळ–किंचित्.
अक्षवाणी–आरती.

आ

आकळणें–बांधणें.
आगम–सहा शास्त्रें.
आगळा–अधिक.
आंगवण–शक्ति.
आटाळी–गच्ची, मनोरा.
आडणी–तिवई.
आणिक–दुसरा.
आतळणें–शिवणें.
आतुर्बळी–अति बलाढ्य.
आन–दुसरें.
आभाळ–मेघ.
आराणूक–विश्रांति.
आर्ती–इच्छा.
आवांका–विचार.
आसुडणें–हिसका देणें.
आळणें–आटविणें.

उ

उजु–समोर, कडे.
उपडा–उताणा.
उबगणें–कंटाळणें.
उभड–गहिंवर.
उरग–सर्प.

ऋ

ऋक्ष–अस्वल.

ए

एकमिळणी–एकोपा.

ओ

ओखद्–औषध.

ओळविणे–चढणें.

अं

अंगत्राण–चिलखत.

अंघ्र–पाय.

अंतुरी–स्त्री.

अंबर–अभ्र.

अंशुमाळी–सूर्य.

क

कणव–कृपा.

कथिका–कढी.

कबरी–वेणी.

कबंध–धड.

कमळजन्मा–ब्रह्मदेव.

करटी–हत्ती.

कर्णिकार–पांगाऱ्याचें झाड.

कल्लोल–लाटा.

कल्हार–कमळ.

कवा–झडप.

कश्मल–मळ.

कक्ष–मध्यभाग.

कारंडक–बदक.

कासार–सरोवर.

किराण–उड्डाण.

किरीटी–अर्जुन.

कुपिका–कुपी.

केउतें–कोठें.

कौलिक–कोळी.

कंठणें–घडणें.

कंद्–गड्डा.

कांक्षा–इच्छा.

कुंजर–हत्ती.

कुंभज–अगस्ति.

ख

खचणें–नष्ट करणें.

खद्योत–काजवा.

खुळगा–रेडा.

खेचर–आकाशांत फिरणारे.

खेटक–खेडें.

ग

गदारोळ–गर्जना.

गभस्ति–सूर्य.

गुढार–रथाचा हौदा.

गुल्म–सैन्याचा विभाग.

गोरक्षक–गुराखी.

गोलांगुल–वानर.

गोवी–गुंतागुंत.

ग्रीवा–मान.

घ

घरबारी–गृहस्थाश्रमी.

घवघवीत–ठळक.

घाय–प्रहार
घृणा–दया.
घ्राण–वास घेण्याची शक्ति.

च

चर्म–ढाल.
चवरडोली–अंबारी.
चक्षु–डोळे.
चाड–इच्छा.
चामकणें–जाणें.
चाळविणें–झुलविणें.
चोज–कौतुक.
चोजविणें–जाणविणें.
चौंडंक–तुणतुणें.
चौहट–चव्हाटा.
चंड–मोठें, भयंकर.

ज

जगती–पृथ्वी.
जलधर–मेघ.
जवळिके–जवळ.
जळेश्वर–वरुण.
जावळफळ–जुळें फळ.
जाश्वनीळ–शंकर.
जोहर–अग्निप्रलय.

झ

झोटधरणी–केशाकेशी युद्ध.

ट

टाकणें–पावणें, पोंचणें.

ड

डळमळणें–डबडबणें.
डाया–डाव.
डोळस–सुंदर.

त

तकटी–तबकडी.
तळपणें–झटापट करणें.
तुक–तुलना.
तोमर–रवीसारखें लोखंडाचें शस्त्र.
त्राहाटणें–आपटणें.
त्रिदशेश्वर–इंद्र.

थ

थडका–ठोसा.
थाटी–समुदाय.
थापा–थापट्या, चडकणें.

द

दर्दुर–बेडूक.
दळवाडे–समुदाय.
दादुला–नवरा.
दायाद–भाऊबंद.
दारा–स्त्री, पत्नी.
दांग–अरण्य.
दांडोरा–डंका.
दुकळीं–दुष्काळांत.

दुग्धसार—लोणी.

देवराज—इंद्र.

द्रढीष्ठ—अति समर्थ.

ध

धडकणें—पेटणें.

धनद—कुबेर.

धनेश्वर—कुबेर.

धर्मराज—यम.

धरा—पृथ्वी.

धरित्री—पृथ्वी.

धात्री—दायी.

धाय—हंबरडा.

धुनी—नदी.

धूसर—धुरळा.

न

नातळणें—न शिवणें.

नावेक—क्षणभर.

नाळ—देंठ.

निकुर—निश्चयानें.

निकें—खरें.

निगम—चार वेद.

निगुतीं—निभ्रांत.

निझाडी—वृक्षरहित.

निधान—ठेवा.

नियुत—लक्ष संख्या.

निर्जर—देव.

निर्धुत—न कचरतां.

निर्वाण—अखेरची घटका.

निवटणें—मारणें.

निवारणें—अर्पण करणें.

नीवि—निरी.

नेमस्त—खात्रीनें.

नौकापोत—लहान नाव.

नंदिनी—मुलगी.

प

पडिपाड—बरोबरी.

परिएसणें—ऐकणें.

परौती—दूर.

पल्लव—पदर.

पहुडणें—निजणें.

पक्ष—पंधरवडा.

पाकशासन—इंद्र.

पाठी—नंतर.

पारका—परका.

पावक—अग्नि.

पाश—फांसे.

पासाव—पासून.

पाळी—बंधारा.

पीनाक—शिवधनुष्य.

पुढतोपुढतीं—पुनःपुनः

पुलिन—वाळवंट.

पौरज—शहरवासी.

पंचबाण–मदन.
प्रतिग्रह–दान घेणें.
प्लवंगम–वानर.

फ

फणी–सर्प.
फरश–कुऱ्हाड.
फेडणें–नाहींसें करणें.
फुंपाटणें–ओरडणें.

ब

बडिश–गळ.
बरळ–भ्रमिष्ट.
बहुवस–पुष्कळ.
बहुसाल–पुष्कळ.
बहुळा–अतिशय.
बुझावणें–समजावणें.
बोकाळणें–माजणें.
बोभाइणें–ओरडणें, हाक मारणें.
बोभाट–आवाज.

भ

भणंग–भिकारी.
भद्रजाति–हत्ती, चांगल्या जातीचा.
भाक–प्रतिज्ञा.
भाज–स्त्री.
भाजन–भांडें.
भालु–कोल्ही.
भावणें–मानणें.
भिंदिपाळ–गोफणीचा दगड.
भुक्ति–उपभोग.
भेरी–नगारा.
भोवंडणें–फिरवणें.

म

मधु–हरणवेल.
मशक–घुंगुरटें.
महामारी–थोर आपत्ति.
महाविखार–मोठा सर्प.
महामारु–मोठा हल्ला.
मागुती–इतकें करूनही.
मात–शब्द, वार्ता, हेतु.
मानविणी–मानव स्त्री.
माव–माया.
मिसळणें–गुंतणें.
मोकलणें–सोडणें.
मौळ–डोकें.
मंचक–पलंग.
मंजीर–पैंजण.
मंडूक–बेडूक.
मंत्र–मसलत.
मांदुस–पेटी.
मांदोळा–समूह.

य

यक्षराज–कुबेर.
येराच–तेव्हांच.

अनु. २.५३.५ ९२५ २०११५

र

रणगीध–रणांगणावरील गिधाड.
रणवेल्हार–रणांगण.
रति–आवड.
रतिपति–मदन.
रत्नसारंग–रत्नाचा उजेड.
रहंवर–रथ.
राउळ–राजवाडा.
राणीवसा–अंतःपुर.
राहाटी–वागणूक.
रिचवणें–ओतणें.
रिघणें–शिरणें.
रोकडा–रोखठोक.

ल

लथडवे–लत्ताप्रहार.
लव–क्षण.
लवथवित–लवलवित.
लांगल–नांगर.
लेखणें–जुमानणें.

व

वटक–वडा.
वडवा–घोडी.
वडवानळ–अग्नि.
वर्म–चिलखत.
वहिली–स्वतंत्र.
वळघणें–चढणें.
वळवट–वोटवे.
वांकुडी–वृष्टि.
वारण–हत्ती.
वारु–घोडा.
वाव–व्यर्थ.
वासरमणि–सूर्य.
विगति–विविध गति.
विचारणें–विचार करणें.
विटप–वृक्ष.
विनोद–कौतुक.
विभांडणें–दूर करणें.
विभूति–भस्म.
विस्तारणें–मांडणें.
विंदान–कौशल्य.
वृंदारक–देव.
वैश्वानर–अग्नि.
वोगराळें–मुदी करण्याचें अगर आमटी वाढण्याचें पात्र.
वोघरणी–फोडणी.
वोजा–चांगल्या रीतीनें.
वोपणें–देणें.
वोसंडणें–भरून सांडणें.
वोळगणें–आश्रय करणें.
वोळविणें–चढणें.
वोहा–कांस.
व्याहाळ–खळगा.

व्याळ–सर्प.
व्योमकेश–शंकर.

**श**

शची–इंद्राणी.
शतपत्र–कमळ.
शर्व–शंकर.
शाकिनी–पिशाची.
शांति–नाश.
शार्वरी–रात्र.
शिग–शिखर.
शिबिका–पालखी.
शीस–डोकें.
शुद्धि–शोध.
शूल–भाला.
शखी–शेवटीं.
शंकणें–भिणें.
श्वपच–चांडाल.
श्लाघ्यता–थोरवी.

**स**

सत्राणें–जोरानें.
सत्वाथिला–सत्वसंपन्न.
सवेंचि–आपणहून.
सर्षप–मोहरी.
साउमा–समोर.
साचाल–चाहूल.
साटोप–सत्वर.
सारीपाट–सोंगट्याचा खेळ.
साक्षेप–मुद्दाम.
सिंधुतनया–लक्ष्मी.
सितरणें–फसविणें.
सुखाडणें–सुख पावणें.
सुढाळ–पवित्र.
सुत्रामा–इंद्र.
सुमध्या–सुंदर कटीची.
सूतकर्मा–सारथी.
सूदणें–घालणें.
सोमकांत–चंद्रकांतमणि.
संघाट–समुदाय.
संजोगणे–जोडणें.
सांकडे–संकट.
सांट–चाबूक.
सांडणें–टाकणें.
स्फीति–कीर्ति.

**ह**

हरिख–हर्ष.
हाट–बाजार.
हारी–अपजय.
हुताशन–अग्नि.
हुमणिया–थापट्या.
हेली–सूर्य.
हेळणें–अवमानणें.
होडा–पैज.

**क्ष**

क्षेम–आलिंगन.

REFBK-0006775